# तृतीय वर्ष कला

# इतिहास अभ्यासपत्रिका क्र. ५

# आधुनिक भारत

## (१८५७ -१९८४)

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**डॉ. कविता लघाटे**
प्राध्यापक नि-संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अनिल आर. बनकर,**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक व
प्रभारी अध्ययन साहित्य विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक इतिहास आणि सहाय्यक संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **प्रा. शिवदास चांगदेव घाडगे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : **प्रा. साळूंके जी.डी.**
माजी इतिहास विभाग प्रमुख
कला व वाणिज्य महाविद्यालय,वाडा.जि. ठाणे.

: **प्रा. युवराज नलावडे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
हजारीमल सोमानी भवन्स कॉलेज, चौपाटी,
मुंबई. ४०० ००७

: **प्रा. डॉ. प्रदिप वाघमारे**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
रामनारायण रुईया महाविद्यालय,
माटुंगा, मुंबई -४०००१९.

**डिसेंबर, २०१९, तृतीय वर्ष कला, इतिहास अभ्यासपत्रिका क्र.५**

**आधुनिक भारत (१८५७ -१९८४)**

**प्रकाशक** : प्रभारी संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था,मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई-४०० ०९८.

**अक्षर जुळणी** : अश्विनी आर्टस्,
गुरुकृपा चाळ, एम्. सी. छगला मार्ग, बामणवाडा,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०९९.

**मुद्रण** :

# अनुक्रमणिका


| युनिट क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | १८५७ च्या उठावाची पार्श्वभूमी | १ |
| २. | भारतीय राष्ट्रवादाचा उदय - १ | २८ |
| | सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ व आणि आर्थिक राष्ट्रवाद | |
| ३. | भारतीय राष्ट्रवादाचा उदय -२ | ४८ |
| | राजकीय संघटनांचा विकास आणि राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना. | |
| ४. | भारतीय स्वातंत्र्य चळवळ - १ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा विकास | ६० |
| ५. | भारतीय स्वातंत्र्य चळवळ - २ : गांधीयुग | ८८ |
| ६. | भारतीय स्वातंत्र्य चळवळ - ३ : क्रांतिकारी राष्ट्रवादी चळवळ | १०३ |
| ७. | भारतीय स्वातंत्र्य चळवळ - ४ : स्वातंत्र्य आणि फाळणी | ११९ |
| ८. | नेहरु कालखंड (१९४७ - १९६४) - १ | १३१ |
| | भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये, संस्थानाचे | |
| | विलिनीकरण व भाषावार प्रांतरचना | |
| ९. | नेहरु युग -२ : सामाजिक व आर्थिक सुधारणा | १५९ |
| १०. | नेहरु युगानंतरचा भारत - १ | १६९ |
| | देशांतर्गत विकास,बँकाचे राष्ट्रीयीकरण व हरितक्रांती | |
| ११. | नेहरु युगानंतरचा भारत - २ : आणिबाणी आणि भारत | १९३ |
| १२. | आणीबाणीनंतरचा राजकिय विकास | २१० |
| १३. | स्वतंत्र भारताचे परराष्ट्रीय धोरण १९४७-१९८४ | २२६ |
| १४. | मुख्य प्रवाह - १ | २५३ |
| | अ)जमातवादाचा विकास आणि फुटीरतावादी चळवळी | |
| | ब) महिलांचे सबलीकरण | |
| १५. | मुख्य प्रवाह - २ | २७९ |
| | क) आरक्षणाचे धोरण | |
| | ड) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास | |


❖❖❖❖

# सुधारीत अभ्यासक्रम
# तृतीय वर्ष कला - इतिहास - पेपर ५
# आधुनिक भारत (१८५७ - १९८४)

**प्र.**

१) १८५७ चा उठाव - पार्श्वभूमी, कारणे, स्वरुप आणि परिणाम

२) भारतीय राष्ट्रवादाचा उदय
   * सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी
   * आर्थिक राष्ट्रवाद
   * राजकीय संघटनाचा विकास आणि राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना

३) भारतीय स्वातंत्र्य चळवळ.
   * भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचा विकास १८८५ - १९२०
   * गांधीयुग
   * क्रांतीकारी राष्ट्रवाद
   * स्वातंत्र्य आणि विभाजन

४) नेहरुयुग (१९४७ - ६४)
   * भारतीय राज्यघटनेची वैशिट्ये
   * एकीकरण आणि भारतीय राज्यांची पुनर्रचना
   * सामाजिक - आर्थिक सुधारणा

५) नेहरुयुगानंतरचा भारत
   * देशांततर्गत विकास - संस्थानिकांचे विशेष हक्क, पदव्या रद्द बँकांचे आणि उदयोग व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण, हरितक्रांती
   * आणिबाणी

६) आणिबाणीनंतरचा राजकीय विकास

७) स्वतंत्र्य भारताचे परराष्ट्र धोरण (१९४७ - १९८४)
   * परराष्ट्र धोरणाची मूलतत्वे (उद्दिष्टये)
   * शेजारील राष्ट्रांशी संबंध
   * अमेरिका आणि रशियाशी संबंध

८) मुख्य प्रवाह
   * जातियवादाचा विकास आणि फुडीरतावादी चळवळी
   * महिलांचे सबलीकरण
   * आरक्षणाचे धोरण
   * विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास

❖❖❖❖

II

## संदर्भसूची


१) डॉ.बिपनचंद्र -इंडिया स्ट्रगल फॉर इंडिपेन्डंस - भारताचस्वातंत्र्यलढा(१८५७ते १९४७)

२) डॉ. बिपन चद्र - इंडिया आफटर इंडिपेन्डंस - स्वातंत्र्यानतरचा भारत (१९४७ ते २०००)

३) प्रा. ग्रोवर व बेल्हेकर - आधुनिक भारताचा इतिहास

४) डॉ. नि. आ. वकाणी - आधुनिक भारताचा इतिहास

५) बिपन चंद्र त्रिपाठी व बरुन डे - फ्रिडम स्ट्रगल - भारताचा स्वातंत्र्यलढा

६) डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर - आधुनिक भारताचा इतिहास (१८५७-१९२०)

७) डॉ.जयसिंगराव पवार - आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास

८) प्रा. धनजंय आचार्य -आधुनिक भारताचा इतिहास

९) डॉ. शांताराम भोगले - भारताचे परराष्ट्रीय धोरण

१०) डॉ.बिपन चंद्र - आधुनिक भारत

११) डॉ. श. गो. कोलारकर - आधुनिक भारत (१७६०-१९५०)

१२) डॉ. श. गो. कोलारकर - स्वतंत्र भारताचा इतिहास(१९४७-१९८०)

१३) डॉ.भा. ल. भोळे - राजकीय भारत (१९६७-१९७७)

१४) डॉ. भा. ल. भोळे - आधुनिक भारतातिल राजकिय विचार

१५) प्रा. गजानन भिडे - आधुनिक भारताचा इतिहास

# १

# १८५७ चा उठाव
# उठावाची पार्श्वभूमी

**प्रकरण रुपरेषा :-**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ उठावाची पार्श्वभूमी
१.३ उठावाची कारणे
१.४ उठावाचे क्षेत्र
१.५ उठावाच्या अपयशाची कारणे
१.६ उठावाचे स्वरुप
१.७ उठावाचे परिणाम
१.८ सारांश
१.९ प्रश्न

## १.० उद्दिष्टे

१) १८५७ च्या उठावाच्या पार्श्वभूमीचा अभ्यास कारणे.
२) १८५७ च्या उठावाची विविध कारणे समजून घेणे.
३) उठावाचे क्षेत्र समजून घेणे.
४) उठावाचे नेमके स्वरुप अभ्यासणे
५) उठावाच्या अपयशाची कारणे समजून घेणे.
६) उठावाच्या परिणामांचा अभ्यास कारणे.

## १.१ प्रस्तावना

जगाच्या इतिहासात १८ वे शतक हे अत्यंत क्रांतिकारक समजले जाते. या कालावधीत युरोपच्या इतिहासात अभूतपूर्व घटना घडल्या त्यामुळे युरोपाच्याच काय संपूर्ण जगाच्या इतिहासास एक नवीन कलाटणी मिळाली. ह्या अभूतपूर्व घटना म्हणजे युरोपात घडून आलेल्या औद्योगिक क्रांती आणि फ्रेंच राज्यक्रांती या दोन क्रांतीकारी घटनांमुळे जुने जग ढवळून निघाले.

औद्योगिक क्रांतीमुळे तर युरोपचा चेहरामोहरा बदलून गेला. युरोपच्या राजकीय इतिहासात फ्रेंच राज्यक्रांतीला तर अभूतपूर्व महत्त्व आहे. जमीनदारी, सरंजामशाही व हूकूमशाही इत्यादी बाबी नष्ट करुन या राज्यक्रांतीने आधुनिक जगात लोकशाहीचा पाया घातला असेच म्हणावे लागेल. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचे एक नवीन युग अस्तित्वात आले.

भारताच्या दृष्टीनेही १८ वे शतक महत्त्वाचे ठरले. व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या विविध युरोपीय राष्ट्रांनी खरे रुप दाखविण्यास प्रारंभ केला. त्यातूनच भारतात इंग्रजी सत्तेचा पाया रोवला गेला. भारताच्या इतिहासास एक वेगळे वळण मिळाले. यादृष्टीने अठराव्या शतकाच्या मध्यकाळात झालेली प्लासीची लढाई (१७५७) म्हणजे इंग्रजी सत्तेची सुरुवात मानली जाते.

## १.२ उठावाची पार्श्वभूमी

३१ डिसेंबर १६०० रोजी इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिने ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीला पूर्वेकडील राष्ट्रात व्यापार करण्याची सनद दिली. राणी एलिझाबेथचा ईस्ट इंडिया कंपनीला केवळ पाठिंबाच होता असे नव्हे तर ती कंपनीची भागीदारही होती. हातात तराजू घेऊन भारताच्या भूमीवर पाऊल ठेवलेल्या या कंपनीने स्वतःच्या हितसंबंधाच्या रक्षणाकरिता लवकरच दुसऱ्या हातात तलवार घेतली व ह्या बळावर १९ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत भारत आपल्या नियंत्रणाखाली आणला. ब्रिटीश भारताचे स्वामी बनले. व्यापाराची मिळालेली सनद खिशात घालून भारतात आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने पश्चिम किनाऱ्यावर आपले पहिले व्यापारी केंद्र १६०८ मध्ये सुरत येथे प्रस्थापित केले. नंतरच्या काळात भारताचे सत्ताधिश बनलेल्या ब्रिटीशांना भारतात व्यापार करण्याचे हक्क मिळविण्यासाठी मोगल बादशहा व त्यांचे प्रांतिक सुभेदारांच्या नाकदुऱ्या काढाव्या लागल्या. हजारो मैलावरुन व्यापाराकरिता आलेले इंग्रज भविष्यात भारतीय स्वातंत्र्यावर घाला घालतील हे मोगल सत्ताधीशांना त्यावेळी कसे कळणार ? कंपनीने चालविलेल्या व्यापारामुळे भारतीय कारागीर, व्यापारी यांचा फायदा होतो शिवाय केंद्रीय तिजोरीत भर पडते, एवढेच त्यावेळी त्यांना कळत होते. सागरावर प्रबळ असलेल्या ब्रिटीशांमुळे भारताचा इराण, पूर्व व पश्चिम आशिया, उत्तर व पूर्व आफ्रिका येथील व्यापार व मक्केकडील सागरीमार्ग धोक्यात येऊ शकतो याची शक्यतो जाणीव न झाल्याने मोगलांनी त्यांना भारतात व्यापाराची परवानगी दिली.

१७ व्या व १८ व्या शतकात कंपनीला प्रामुख्याने दोन गोष्टी हव्या होत्या, एक म्हणजे भारत व पूर्वेकडील अन्य राष्ट्रांशी एकतंत्री व्यापार व दुसरी म्हणजे भारतातून माल खरेदी करण्याच्या व तो विकण्याच्या बाबतीत त्यांना युरोपीय काय पण भारतीय व्यापाऱ्यांशीही स्पर्धा नको होती त्यांना व्यापाराची मक्तेदारी हवी होती. कंपनी व्यापाराकरिता भारतात येण्यापूर्वीच पोर्तुगीज व डच व्यापार कंपन्या भारतात कार्यरत होत्या. १६ व्या शतकाच्या प्रारंभीच पोर्तुगीजांनी दीव, दमण, गोवा इ. ठिकाणी आपल्या वखारी स्थापन केलेल्या होत्या. डचांचे लक्ष प्रामुख्याने आग्नेय आशियातील मसाल्यांच्या बेटांवर असले तरी भारतातही सुरत, भडोच,

अहमदाबाद, कोचीन, पाटणा, आग्रा इत्यादी ठिकाणी त्यांची व्यापारी केंद्रे भरभराटीस आली होती. पण अठराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत ह्या स्पर्धक कंपन्याची भारतातून हकालपट्टी करण्यात ईस्ट इंडिया कंपनीला यश मिळाले. एवढेच नव्हे तर भारताचा व्यापार, संपत्ती व प्रदेश या सर्वच बाबतीत कंपनीचा एक बलशाली स्पर्धक बनलेल्या फ्रेंचानाही त्यांनी १७४४ ते १७६३ या काळात पराभूत केले इ.स. १७५७ ते इ.स. १८५६ पर्यंत ब्रिटीशांनी अनेक मार्गाचा अवलंब करुन प्रचंड साम्राजविस्तार केला.

## १.३ १८५७ च्या उठावाची विविध कारणे :

इ.स. १८५७ मध्ये जो महान संघर्ष झाला तो काही अचानक निर्माण झाला नव्हता. जेव्हापासून भारतात इंग्रजी साम्राज्याचा पाया घातला गेला तेव्हापासून कारणांना सुरुवात झाली होती. हळूहळू ब्रिटीश राजवटीविरुध्द असंतोष निर्माण होऊन तत्कालीन कारणांमुळे एकदम स्फोट झाला होता. थोडक्यात ब्रिटीशांच्या अन्यायी धोरणामुळे जो असंतोष निर्माण झालेला होता त्याचा उद्रेक म्हणजे १८५७ चा संघर्ष होय. १८५७ च्या उठावाची विविध कारणे खालीलप्रमाणे :

### १.३.१)राजकीय कारणे :

**अ) इंग्रजांचे साम्राज्यवादी धोरण :** रॉबर्ट क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंगज, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड हेस्टिंग्ज यांनी पुढे रेटलेले आक्रमक साम्राज्यवादी धोरण पाहून भारतीयांना इंग्रजाबद्दल तिरस्कार वाटू लागला. त्यांच्या राजनीतिक व कूटनीतिक कारवायामुळे इंग्रजाबद्दल चीड निर्माण होऊ लागली.पुढे साम्राज्यावादी धोरणाचा अवलंब करुन इंग्रजांनी भारताचा सर्व भाग आपल्या ताब्यात आणला त्यामुळे त्यांच्याविरोधात असंतोष निमार्ण झाला व याचे रुपांतर १८५७ च्या उठावात झाले.

**ब) तैनाती फौजेच्या पध्दतीचे दुष्परिणाम :**

इंग्रजांनी आपले साम्राज्य उभे करताना अनैतिक बाबींच्या तत्त्वाचा नेहमीच अवलंब केला. क्लाईव्ह, वॉरन हेस्टिंगसारख्या अधिकाऱ्यांनी निती-अनितीचा फारसा विधिनिषेध पाळला नाही. त्यातच इंग्रजांची भेदनीती, त्यांचा व्यापारी साम्राज्यवाद, त्यांची शस्त्रास्त्रे व संस्कृतीचे सामर्थ्य यांचे रहस्य अनेक हिंदी राजेरजवाड्यांना समजून आले नाही. आपापसातील हेवेदावे व सुखासीन वृत्ती यामुळे त्यांचा ऱ्हास अधिक झपाट्याने झाला. लॉर्ड वेलस्लीने १७९९-१८०५ या काळात तैनाती फौजेचा वापर करुन अनेकांचे प्रदेश आपल्या ताब्यात आणले, बहुतेक सर्व हिंदी सत्ताधीशांवर अनेक प्रकारचे करार लादण्यात आले. त्यांची परराष्ट्रीय धोरणे इंग्रज ठरवू लागले. युध्द व तह करण्याचा राज्यकर्त्यांचा प्रमुख अधिकार त्यांच्याकडून काढून घेतला. त्यामध्ये विशेषतः हैद्राबादचा निजाम, शिंदे, भोसले, होळकर, मराठे सरदार, पेशवे, अयोध्येचा नबाव इत्यादी सत्ताधीश प्रमुख होते. तैनाती फौजेच्या पध्दतीमध्ये इंग्रजी फौजेचा खर्च हिंदी राजांनी करावयाचा व ह्या फौजेवर अधिकार मात्र इंग्रजांचा. हिंदी राजे तैनाती फौजेच्या प्रभावाखाली गेल्यामुळे ते दुबळे बनले. त्यांच्या ठिकाणची पराक्रमाची परंपरा लुप्त झाली इंग्रजानीच त्यांच्या

संरक्षणाची जबाबदारी स्विकारल्याने ते आपल्या राज्याच्या कारभाराकडे दुर्लक्ष करु लागले. परिणामी राज्यकारभारातून गोंधळ, अशांतता व अव्यवस्था निर्माण होऊ लागली.

**क) लॉर्ड डलहौसीचे विलीनीकरणाचे धोरण :**

डलहौसीने भारतात साम्राज्यविस्तार करण्यासाठी भारतीय प्रदेशाचे विलीनीकरण करण्याचा सपाटा लावला होता. युध्दाच्या मार्गाने, दत्तक विधानास परवानगी न देऊन, कुशासनाचा आरोप करुन, कर्जवसुलीसाठी प्रदेश घेऊन, पेन्शन व पदव्या रद्द करुन डलहौसीने भारतीय प्रदेशांचे विलीनीकरण केले. इ.स. १८५४ साली शीखांचा पराभव केला व त्यांचे राज्य जिंकले तर १८५२ साली ब्रम्हदेशाशी युध्द करुन दक्षिण ब्रम्हदेश साम्राजात विलीन केला. निपुत्रिक राजेरजवाड्यांनी आपल्या वारसास कंपनी सरकारची पूर्व संमती घेणे आवश्यक असल्याचे घोषित केले.कंपनी सरकारच्या डायरेक्टरांनीच हे तत्त्व घोषीत केले होते. साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी या तत्त्वाने मोठी संधी प्राप्त झाली. मृत्यूपूर्वी त्यांनी घेतलेला दत्तक डलहौसीने नामंजूर करुन साताऱ्याचे राज्य खालसा केले. १८५३ साली नागपूरचा राजा निपुत्रिक मरण पावला. त्याच्या राणीने घेतलेला दत्तक वारसही डलहौसीने नामंजूर करुन परिणामी नागपूरचे राज्य खालसा करुन साम्राजात विलीन केले. झाशीची राणी १८५३ मध्ये विधवा झाली. पतीच्या मृत्यूपूर्वी तिने दत्तक पुत्र घेतला होता. हे दत्तक विधान नामंजूर करुन डलहौसीने तिचे राज्य खालसा केले. अशाच प्रकारे या तत्त्वाचा वापर करुन त्याने संबळपूर, जैतपूर,भगत व उदयपूर ही राज्ये खालसा केली. याशिवाय तैनाजी फौजेची थकबाकी वसूल करण्याचे निमित्त करुन डलहौसीने हैद्राबादच्या निजामाकडून त्याचा वऱ्हाड प्रांत १८५३ साली घेतला. तसेच गैरकारभार व अराजकता या कारणाखाली अवधच्या नवाबाचे राज्य १८५३ मध्ये खालसा करण्यात आले. त्यांचे हे वागणे अन्यायपूर्ण होते. भारतीय शासक व प्रजा इंग्रजांची शत्रू बनली.

**ड) भारतीय राजेरजवाडयांचा अपमान :**

डलहौसीने अनेक राजेरजवाडयांच्या पदव्या, किताब व तनखे बंद करुन टाकले. पदव्या अथवा तनखे या गोष्टी वंशपरंपरेने चालत नसतात, असे त्याचे मत होते. त्याने १८५२ साली दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर त्याचा दत्तकपुत्र नानासाहेब याचा वारसाहक्क नामंजूर केला व त्यास मिळत असलेला आठ लाखाचा तनखाही बंद केला. पेशवा ही पदवी आता नाममात्र होती, पण तीही त्याला देण्यात आली नाही. १८५५ मध्ये तंजावरचा राजा मृत्यू पावला. त्याच्या वारसदाराची जहागीर व तनखा या बाबी डलहौसीने जप्त केल्या. तंजावरच्या राजाचे छत्रपती पदही काढून घेण्यात आले. मोगल बादशहा निर्माल्यवत झाला होता. अधिकार व संपत्ती या गोष्टी केव्हाच लयाला गेल्या होत्या. तोही इंग्रजांच्या तडाख्यातून सुटला नाही. मोगल बादशहाच्या मृत्यूनंतर गादीवर येणाऱ्या बादशहाला मोगल सम्राटाच्या राजवाडयात राहता येणार नाही व त्याचा बादशहा किताब काढून घेतला जाइल असे डलहौसीने बजावले होते. डलहौसीच्या या आक्रमक व अन्यायी धोरणामुळे हिंदी राजेरजवाडे हवालदिल बनले. या नीतीमुळे संस्थानिकांना संभाव्य धोक्याची जाणीव झाली. याशिवाय सातारा, नागपूर, झाशी, उदयपूर ही राज्ये खालसा केल्याने हिंदू प्रजेच्या भावना दुखावल्या तर औधच्या नवाबाचे राज्य नष्ट झाल्याने

व मोगल बादशहाला निर्माल्यवत बनविल्याने मुसलमान दुखावले गेले. नीती-अनीतीची चाड न बाळगता इंग्रजांना हिंदुस्थानातील सर्व राज्ये खालसा करावयाची आहेत असे सामान्य लोकांना वाटू लागले.

### इ) नेपियरची गर्वोक्ती

सर चार्लस नेपियर याची गर्वोक्ती स्वातंत्र्य युध्दला कारणीभूत ठरली. तो गर्वाने म्हणाला होता की, जर मी १२ वर्षे भारताचा सम्राट असतो तर एकही भारतीय राजा शिल्लक राहीला नसता. निजामाच्या बाबतीत कांहीच ऐकले नसते व नेपाळ देखील आमचा झाला असता. यामुळे भारतीयांना असे वाटू लागले की इंग्रज हे भारतीय राजांना नेस्तानाबूत करण्यामागे लागले आहेत. त्यामूळे भारतातील संस्थानिकांच्या मनात इंग्रजाबद्दल अनादर निर्माण झाला व पुढे त्यांनी १८५७ च्या उठावात भाग घेतला.

## १.३.२ आर्थिक कारणे :

**अ) हस्तव्यवसाय व कारागिरी बुडाली :** इंग्रजांचा साम्राज्यवाद हा आर्थिक साम्राज्यवाद होता. हिंदुस्थानातून कराच्या रुपाने अथवा व्यापाराच्या रुपाने जास्तीत जास्त संपत्ती मायदेशी नेणे, हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट साध्य करण्यात ते पूर्ण यशस्वी झाले. हिंदूस्थानच्या प्रदेशांवर त्यांची मालकी प्रस्थापित होताच, ते मनमानी व्यापार करु लागले. हिंदी माल त्यांच्या यंत्रावर तयार होणाऱ्या मालाशी स्पर्धा करु शकला नाही. परिणामी हिंदुस्थानातील परंपरागत हस्तव्यवसाय व कलाकुसरीचे धंदे बुडाले, कारागीर बेकार झाले. त्यामुळे बहुतांश लोक शेतीकडे वळले. परंतु सरकारने शेतसारा जास्त वाढविल्याने लोकांच्या असंतोषात अधिकच भर पडली. प्रारंभापासूनच भारतीय संपत्तीचा ओघ पश्चिमेकडे वळविण्यात आला होता. व्यापार इंग्रजांच्याताब्यात असल्यामुळे इंग्रजी मालाला वारंवार अनेक सवलती देण्यात आल्या. हुकमी बाजारपेठ व कच्चा मालाचा पुरवठा करणारी वसाहत यादृष्टीने इंग्रज भारताकडे पहात होते. भारताचे आर्थिक शोषण फार मोठ्या प्रमाणावर चालू होते. त्यामुळे भारतातील सर्वसाधारण माणूस दरिद्री राहिला. डॉ. ईश्वरी प्रसाद यांच्या मते, "भारतमातेच्या दुधावर इंग्रज पुष्ट बनले परंतु तिच्या लेकरांवर मात्र उपासमारीची पाळी आली".

### ब) करमुक्त भूमीवर कर :

इंग्रजांच्या पूर्वीच्या शासकांकडून अनेक धार्मिक संस्थाना व व्यक्तीना अनेक वर्षापासून अनुदान म्हणून करमुक्त जमिनी मिळाल्या होत्या. सर विल्यम बेटिंगच्या कारकीर्दीत त्यांना अनुदानासंबंधीचे कागदपत्र दाखविण्यास सांगण्यात आले. शेकडो वर्षांच्या पूर्वीचे कागदपत्र दाखविण्यास सांगण्यात आले. शेकडो वर्षाच्या पूर्वीचे कागदपत्र नष्ट झाले असल्यामुळे ते दाखवू शकले नाहीत म्हणून इंग्रजांनी त्यांच्यावर कर लावला. जे कर भरु शकले नाहीत त्यांच्या जमिनी इंग्रजांनी जप्त केल्या. ज्यांच्या जमीनी गेल्या अशांची संख्या वीस हजार होती. ते सर्व इंग्रजांच्या विरोधात गेले.

**क) इंग्रजी भांडवलदारांकडून होणारी पिळवणूक :**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने भारतातही रेल्वे, रस्ते, तारायंत्रे यासारख्या सुधारणा झाल्या हे खरे, पण त्यामुळे या देशाच्या आर्थिक पिळवणुकीस अधिक गती प्राप्त झाली. इंग्लडमधील तयार झालेला माल कमी वेळात हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात पोहचू लागला व तेथून कच्चा माल जलद गतीने इंग्लंडकडे निर्यात होऊ लागला. इंग्रजांचा व्यापार वाढला, कारखानदारी वाढली. परिणामी भांडवल वाढले. हे भांडवल हिंदुस्थानमधील अनेक उद्योगधंद्यात इंग्रज व्यापाऱ्यांनी गुंतवले. या भांडवलावर होणारा फायदा ते मायदेशी नेत असल्यामुळे हिंदुस्थान दरिद्रीच राहिला.

**ड) शेतकरी व जमीनदार यांचा असंतोष व बेकारी :**

बंगालमधील कायमधारा पध्दतीने महसूल व्यवस्थेला स्थिरपणा आला पण सरकारचा ठराविक सारा न देता आल्याने अनेक जमीनदारांच्या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या. अशा जमिनदारांची प्रतिष्ठा धुळीला मिळाली. मद्रास, मुंबईसारख्या प्रांतातून रयतवारी पध्दती सुरु करण्यात आली. पण तेथे जमीन महसुलाचा दर कांही वेळा उत्पन्नाच्या ५०% इतका अन्यायी असे अशा प्रसंगी शेतकऱ्यांच्या हलाखीस पारावार राहत नसे. औधचे राज्य खालसा केल्यावर तेथे ते जमीनदार दूर सारले गेल्यामुळे नाराज झाले. त्यांचे आश्रित बेकार बनले. जमीनदारांच्या जमीनीबरोबरच जहागिऱ्याही जप्त केल्या.

**इ) भारतीयांच्या नोकऱ्या गेल्या :**

इंग्रजांनी भारतीय संस्थानिकांची राज्ये इंग्रजी साम्राज्यात विलीन केल्यामुळे तेथील एकूण साठ हजार सैनिक व असैनिक कर्मचाऱ्यांना नोकरीवरुन काढून टाकले. नोकऱ्या गेल्यामुळे अनेकांची उपासमार होऊ लागली. ज्यांचे ज्यांचे आर्थिक नुकसान झाले, त्यांनी इंग्रजांच्या अन्याय्य व्यवहाराचा प्रचार करुन इंग्रजांच्या विरोधात वातावरण तापविले. स्वातंत्र्य युध्दाला त्यामुळे बळकटी आली.

**१.३.३ सामाजिक कारणे :**

**क) हिंदी लोकांना रानटी समजले जाई :**

इंग्रज हिंदुस्थानचे राजकर्ते बनल्यानंतर त्यांचा ठिकाणी असणारा संस्कृतिश्रेष्ठत्वाचा गंड हिंदी लोकांच्या लक्षात येऊ लागला. इंग्रज केवळ आपली संस्कृतीच श्रेष्ठ मानीत असे नव्हे तर हिंदी संस्कृतीला रानटी संस्कृती व हिंदी लोकांना रानटी माणसे असे संबोधीत. हिंदुस्थानातील लोकांचा उध्दार करण्याकरिता आम्ही आलेलो आहोत असा त्यांचा भाव होता. इंग्रजांच्या वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार, त्यांची अरेरावी व भारतीयांना हीन लेखण्याची त्यांची प्रवृत्ती यांचे चटके समाजात मान्यता व प्रतिष्ठा पावलेले मुंबई न्यायालयाचे सरकारी वकील मंडलिक किंवा बंगालचे उच्चकुलीन सर्वमान्य समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनाही सोसावे लागले. मग सामान्य भारतीयांची काय गत असेल याची कल्पना करणे कठीण आहे. रस्त्यावरुन अगदी सर्वात कनिष्ठ दर्जाचा जरी एखादा इंग्रजी माणूस जात असेल तर तेथून जाणाऱ्या भारतीयांनी घोडागाडीतुन

जात असल्यास खाली उतरुन त्याला नम्रपणे सलाम ठोकला पाहिले असा दंडक असे. रेल्वेच्या डब्यात इंग्रज माणूस चढला तर तेथे आगोदरच बसलेल्या हिंदी माणसाला हाकलून लावणे, इंग्रजांच्या मनोरंजन केंद्रात किंवा उपहारगृहात कुत्री व भारतीय यांना मज्जाव आहे अशा अत्यंत असंस्कृत व मानहानीकारक पाटया लावणे, क्षुल्लक निमित्त करुन मारहाण करणे असे प्रकार होत असत. इ.स. १७८४ साली वॉरन हेस्टिंग्जने सुध्दा इंग्रजांच्या तुच्छ भावनेविषयी स्पष्ट कबुली दिली आहे. हिंदी माणसे रानटी असून युरोपातील सर्वात मागासलेल्या देशातील सर्वात मागासलेल्या माणसांची सुध्दा ती बरोबरी करु शकणार नाहीत अशी दर्पोक्ती इंग्रज अधिकारी करत. स्वाभाविकच राज्यकर्ते व प्रजा यांच्यामध्ये दरी निर्माण झाली होती. राज्यकर्ते प्रजेपासून फटकून वागत असल्याने ही दरी होऊ कमी शकली नाही.

**ख) हिंदू संस्कृतीवर संकट आल्याची भावना :**

लॉर्ड बेटिंक, लॉर्ड डलहौसी यांसारख्या काही सुधारणावादी इंग्रज राज्यकर्त्यांनी समाजिक कायदे करुन हिंदी समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. उदा. सतीबंदी कायदा, बालविवाह प्रतिबंध कायदा, विधवा पुर्नविवाह संमती कायदा इत्यादी. या कायद्यांमागची भूमिका योग्य होती, पण सामान्य लोकांना त्यामुळे आपल्या समाजाची चौकटच नष्ट होत आहे, असे वाटू लागले.

ब्रिटीशांनी इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य देऊन इंग्रजी शाळा सुरु केल्या. हिंदुस्थानातील पारंपारिक धर्मशास्त्रांचा अभ्यास, संस्कृत, अरबी, फारसी भाषांचे अध्ययन इत्यादी बाबी इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे कमी महत्त्वाच्या बनून मागे पडू लागल्या. राज्यकर्त्यांनीही अशा परंपरागत विद्याभ्यासाला उत्तेजन देणे बंद केले. पूर्वी राज्यकारभाराची भाषा फारसी होती. तिची जागा इंग्रजीने घेतली. इंग्रजी शिक्षण घेणाऱ्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळू लागली. त्यामुळे हिंदी समाजात आतापर्यंत प्रतिष्ठा व वजन असणारा हिंदू पंडीतांचा व मुसलमान मुल्ला-मौलवींचा वर्ग असंतुष्ट बनला. या देशात जातिव्यवस्था फार प्रखर होती त्यामुळे शाळेत ज्यावेळी निरनिराळ्या जातींची मुले एकमेकांशेजारी बसू लागली त्यावेळी सुध्दा आपली जात सरकारला नष्ट करावयाची आहे असा लोकांना संशय येऊ लागला. सरकार आपल्याखाजगी आणि सामाजिक जीवनात हस्तक्षेप करीत आहे असे लोकांना वाटू लागले.

**१.३.४ धार्मिक कारणे :**

**अ) ब्रिटिशांचे धार्मिक धोरण :**

इंग्रजांच्या आक्रमणाने प्रथम हिंदी लोकांची राज्ये गेली. नंतर व्यापार उद्दीम बुडाला आणि आता धर्म नष्ट होत आहे, अशी असंतोषाची भावना हिंदी समाजात उत्पन्न झाली. पोर्तुगीजाप्रमाणे सरकारी फतवे काढून व जुलुम जबरदस्ती करुन इंग्रजांनी धर्म प्रसार केला नाही. पण त्यांचे अधिकारी ख्रिश्चन धर्मप्रसाराला अनेक वेळा उघड उघड प्रोत्साहन व पाठिंबा देत. एखाद्या हिंदूने धर्मांतर केले की त्यास सरकारी नोकरी दिली जाई अथवा नोकरीत बढती दिली जाई. १८५६ साली कायदा करुन धर्मांतरीत व्यक्तीचा बापजाद्याच्या मालमत्तेवरील हक्क

आबाधित राहीला, असा जो इंग्रजांनी कायदा केला तो धर्मप्रसाराला प्रोत्साहन देणारा होता असे हिंदू व मुसलमानांना वाटत होते.

इ.स. १८१३ च्या कायद्याने ख्रिश्चन धर्मगुरुना धर्मप्रसारांसाठी हिंदुस्थानात जाण्याचे स्वातंत्र्य दिले गेले. अनेक प्रकारची आमिषे दाखवून प्रसंगी धाक दाखवून हे मिशनरी धर्मांतराचे कार्य करत असत. दुष्काळासारख्या घटना म्हणजे त्यांना पर्वणीच लाभे. या दुष्काळात अनेक आईबाप मृत्यू पावत व त्यांची निराश्रित मुले हे मिशनरी ताब्यात घेत, प्रसंगी पैसे देऊन विकत घेत व त्यांना आपल्या धर्माची दीक्षा देत. धर्मांतरासाठी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी शैक्षणिक संस्था, दवाखाने, आर्थिक मदत, अनाथालये इत्यादी मार्गाचा अवलंब केला. प्रसंगी अनैतिक मार्गांचा अवलंब करुन धर्मप्रसाराला उत्तेजन दिले. स्वाभाविक हे मिशनरी व त्यांना प्रोत्साहन देणारे राज्यकर्ते हे आपल्या धर्माचे शत्रू आहेत, अशी भावना हिंदी समाजात निर्माण झाली. ब्रिटीशांनी केलेल्या सामाजिक कायद्यांचा व सुधारणांचा वेगळा अर्थ लावून इंग्रज आपली संस्कृती व धर्म नष्ट करण्याचा पध्दतशीर प्रयत्न करीत असल्याचे भारतीयांना वाटू लागले.

**आ) राज्यकर्ते व ईस्टइंडिया कंपनीचा धर्मप्रसाराला पाठिंबा :**

इंग्रजांनी आपला धर्म व संस्कृती भारतीयांवर लादून राजकीय सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांनी केलेल्या सुधारणांमुळे आपली जुनी संस्कृती कदाचित नष्ट होईल असे सनातन्यांना साधार वाटू लागले होते. मुलकी व सैन्यातील लोकांना आपल्याला जबरदस्तीने इंग्रज, ख्रिश्चन धर्माची दीक्षा देणार आहेत अशी भीती भेडसावत होती. पुष्कळशा ख्रिस्ती मिशन-यांच्या धर्मप्रचाराच्या सभा जिल्हा कलेक्टरच्या अध्यक्षेतेखालीच होत. कंपनीच्या संचालक मंडळाचा अध्यक्ष डी मेकलस याने तर ख्रिस्ती धर्माचा प्रसार व्हावा म्हणूनच ब्रिटीश साम्राज्य हिंदूस्थानात स्थापन झालेले आहे असे पार्लमेटमध्ये उघड बोलून दाखविले होते. मिशनरी लोकांच्या कारवायांमुळे हिंदूच्या धर्म भावना दुखावल्या गेल्या. हिंदू देव-देवतांच्या तसेच मुसलमानांच्या पीर-पैगंबराचा सरळ सरळ निरादर करणे सुरु केले.

**१.३.५ लष्करी कारणे :**

**अ) हिंदी शिपायांना मिळणारी वागणूक :**

१८५७ चा उठाव प्रथम लष्करातील हिंदी शिपायांनी केला, याचे कारण त्यांच्यामध्ये कंपनी सरकारविरुध्द असंतोष खदखदत होता. हिंदी शिपायांना अत्यंत अपमानास्पद व अन्यायी वागणूक दिली जात होती. याउलट गोऱ्या शिपायांची प्रतिष्ठा व मिजास राखली जाई. त्याकाळात भारतीय सैनिकाला फक्त ९ रु. मासिक पगार मिळत होता. या ऐवजी इंग्रज सैनिकाला मात्र सैनिक अधिकाऱ्याइतका प्रचंड पगार मिळत असे. एखाद्या हिंदी शिपायाने धर्मांतर करुन ख्रिस्ती धर्म स्विकारला की त्याला बढती मिळत असे. याशिवाय लष्करातील वरच्या हुद्याची जागा हिंदी सैनिक कितीही पराक्रमी असला तरी त्याला दिली जात नसे.

लष्करी मोहीमांत इंग्रज अधिकारी प्रथम हिंदी शिपायांची फौज आघाडीवर पाठवत लढाई होऊन पहिल्या हल्ल्यात अनेक हिंदी शिपाई मारले गेले की, मग गोरी फौज पुढे सरकत असे. हिंदी शिपायाची जीवितहानी मोठी होई व शेवटी विजयश्रीची माळ गोऱ्यांच्या गळयात पडे. हा सर्व प्रकार हिंदी शिपायांना संतापजनक वाटत होता.

**ब) हिंदी शिपायांवरील जाचक निर्बंध :**

इंग्रजांनी इ.स. १८०६ साली मद्रास लष्करातील हिंदू शिपायांवर गंध न लावण्याची व दाढी न राखण्याची सक्ती करण्यात आली होती. इ.स. १८२४ साली ब्रम्ही युध्दात बंगाल लष्करातील हिंदू शिपायांवर समुद्र पर्यटनाची सक्ती करण्यात आली होती. समुद्राचा प्रवास केल्यास जात बुडते अशी सर्वसाधारण कल्पना असल्याने शिपायांनी प्रत्येक वेळी देशाबाहेर जाण्यास विरोध केला. इ.स. १८४४, १८४९, १८५०, १८५२ या वर्षी याकरिताच सैन्यात बंडे झाली. परंतु लॉर्ड कॅनिंगने १८५६ साली कायदा करुन भारतीय सैनिकाला लढण्याकरिता कोठेही जावे लागेल असे जाहीर केले. त्यामुळे हिंदूना बाटविण्या करिता हा कायदा अमलात आणला असा समज सर्वत्र पसरला. बंगालच्या लष्करात ब्राम्हण आणि राजपूत लोकांचा भरणा होता. ते सैन्य वंशपरंपरागत चालत असल्याने त्यात एकमेकांबाबत स्नेह व मातृभाव निर्माण झाला होता. परंतु कालांतराने शूद्र आणि अन्य जाती बंगालच्या सैन्यात भरती होऊ लागल्याने या उच्चपदस्थ जातींमध्ये असंतोष निर्माण झाला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे दहा हजार मैलांवर राहणाऱ्या ‘इंग्रज बादशहाशी मी एकनिष्ठ राहीन ’ अशी भारतीय शिपायाला शपथ घ्यावी लागत असे.

**क) गोरी फौज संख्येने कमी व महत्त्वाची ठाणी भारतीय सैनिकांच्या नियंत्रणात :**

बंगाल सैन्यातील किंवा इतर लष्करातील बेशिस्तीने कदाचित गंभीर स्वरुप धारण केले नसते, परंतु यावेळी सैन्यात युरोपियन अधिकाऱ्यांची संख्या केवळ १९ टक्के होती. भारतीय सैन्य व इंग्रज सैन्य यांच्यात बरीच तफावत होती. इंग्रजी लष्कारात २ लाख ३३ हजार हिंदी फौज होती, तर गोरी फौज फक्त ४५ हजार होती. आपण बंड पुकारले तर संख्येच्या जोरावर विजयी होऊ असा आत्मविश्वास शिपायांना वाटत असावा. इंग्रज राज्याच्या सुरक्षिततेसाठी गोऱ्यांची फौज वाढविली पाहिजे, असा इशारा डलहौसीने ब्रिटीश सरकारला दिला होता. पण सरकारने या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले होते.

इ.स. १८४९ साली ब्रिटीशांनी पंजाब जिंकला होता. तेथे बंडाळी होऊ नये म्हणून ४५ हजार गोऱ्यापैकी ४० हजार फौज तेथेच ठेवण्यात आली होती. कलकत्ता व प्रयाग या मधील दिनाजपूर या एका ठिकाणी इंग्रज सैन्याचे नियंत्रण होते. मीरत, दिल्ली, कानपूर या महत्त्वाच्या ठाण्यावंर मात्र भारतीय सैनिकाचे नियंत्रण होते. त्यामुळे भारतीय सैनिकांना उठाव करणे सोईचे ठरले.

**ड) इंग्रजी राज्य संपणार ही अफवा :**

सामान्य जनतेत व भारतीय सैनिकांत इंग्रजांचे राज्य शंभराव्या वर्षी संपणार अशी अफवा पसरली. इंग्रजांचे राज्य १७५७ मध्ये स्थापन झाले. १८५७ मध्ये त्यास शंभर वर्ष पूर्ण होतात म्हणून इंग्रजांचे राज्य १८५७ मध्ये संपणार व भारत पुन्हा स्वतंत्र होणार या आत्मविश्वासाने भारतीय सैनिक मनोवैज्ञानिक कारणामुळे इंग्रजांच्या विरोधात संगठित होऊ लागले. पुढे त्यांनी १८५७ च्या उठावात भाग घेतला.

### १.३.६ तात्कालिक कारण : (चरबीयुक्त काडतूस)

भारतीय सैनिकांना एनफील्ड नावाच्या नवीन बंदुका व काडतुसे परविण्यात आल्या होत्या. रायफलीत ठेवण्याअगोदर या काडतुसांना दातांनी तोडावे लागत होते. या काडतुसांना गाईची व डुकराची चर्बी लावण्यात आली आहे, असे जेव्हा सैनिकांना समजले तेव्हा त्यांना वाटले की, इंग्रज सरकार आपला धर्म भ्रष्ट करु पाहत आहे. इंग्रजांनी या आरोपाचे खंडन केले पण काही उपयोग झाला नाही.

एन्फिल्ड बंदुकांसाठी वापरावयाच्या काडतुसांना अशा प्रकारे ३४ व्या पलटणीने नकार दिला. ही बातमी १९ व्या पलटणीत पोहचताच यातील भारतीय शिपायांनी निषेध व्यक्त केला. तेव्हा ती पलटणच बरखास्त करण्यात आली. ३४ व्या पलटणीवरही कारवाई करण्यात आली. त्या सैनिकांवर लष्करी खटले भरण्यात आले. ह्या सर्वांना १० वर्षाची शिक्षा ठोठावण्यात आली. परिणामी त्याच पलटणीतील मंगल पांडे यांनी कवायत सुरु असतांना गोळ्या घालून युरोपीयन अधिकाऱ्यांना २९ मार्च १८५७ रोजी ठार मारले. मंगल पांडेला ताबडतोब पकडण्यात येऊन लष्करी खटला चालवण्यात आला व ८ एप्रिल रोजी फाशी देण्यात आली. बराकपूरच्या छावणीतील उठावाची बातमी समजताच मीरत येथील सैनिकांनीही बंड केले व उठावास सुरुवात झाली.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की १८५७ चा उठाव हा कोणत्याही एका कारणामुळे घडलेला नसून त्यापाठीमागे राजकीय,सामाजिक,आर्थिक,धार्मिक व लष्करी स्वरुपाची कारणे जबाबदार होती.१७५७ च्या प्लासीच्या लढाईपासून ते १८५७ च्या उठावापर्यंच्या इंग्रंजाच्या विविध धोरणामुळे राष्ट्रीय उठाव घडून आला असे आपल्या निदर्शनास येते. त्यामुळे या घटनेला आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

### १.३.७ आपली प्रगती तपासा :

१८५७ च्या उठावाची कारणे सांगा.

---

---

---

## १.४ १८५७ च्या उठावाची व्याप्ती :

### १.४.१ दिल्ली हस्तगत

मीरतपासून दिल्ली २० मैल अंतरावर आहे. हे अंतर पार करुन हिंदी शिपाई दुसऱ्या दिवशी दिल्लीस आले. बहादूशहास सिंहासनावर बसवून त्याची राजवट सुरु झाल्याची घोषणा करावयाची होती. बादशहा नामधारी बनून तो इंग्रजाच्या हातातील बाहुले बनला होता. अशा परिस्थितीत बंडवाल्यांना साथ देणे त्याला धोक्याचे वाटत होते. बंडवाल्यांनी दिल्लीतील इंग्रजाच्या कत्तली करुन मोठी धामधूम माजली होती. बंडवाल्यांचे पारडे जड होते. शेवटी त्यांच्या दबावाखाली त्याने सिंहासनावर बसण्याचे व हिंदूस्थानचा बादशहा होण्याचे कबूल केले. यानंतर दिल्लीतील दारुगोळ्याच्या कोठाराचा ताबा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण कोठारावर असणाऱ्या इंग्रजांनी कोठारास आग लावून प्रचंड स्फोट घडवून आणला, शेकडो लोक ठार झाले. हे घडत असताना प्रसंगावधान राखून काही इंग्रजांनी ही बातमी तारयंत्राच्या सहाय्याने उत्तर हिंदुस्थानातील प्रमुख इंग्रज अधिकाऱ्यांना कळवून टाकली होती. २४ तासांत दिल्ली बंडवाल्याच्या हातात आली. कालपर्यंत गुलाम असलेला बहादूरशहा हिंदूस्थानचा सम्राट बनला. परंतु बंड करणे सोपे असते पण ते यशस्वी करणे अवघड असते याची प्रचिती लवकरच बंडवाल्याना आली.

लॉर्ड कॅनिंगने पंजाब वगैरे प्रदेशातून दिल्लीकडे फौजा गोळा केल्या. गुरखा, शीख या लढाऊ जातीची नव्याने भरती करण्यात आली. जूनमध्ये इंग्रजांची एकूण ६५ हजार फौज दिल्लीभोवती उभी राहिली. आपण दिल्ली काबीज केली की, बंडवाल्यांचा उठावाचा कणा मोडेल असा इंग्रजांचा अंदाज होता. बंडवाल्यांची फौज वाढत होती. बंडवाल्यापैकी कांहीनी खुद्द दिल्लीत जाळपोळ व लुटालुट करण्यास प्रारंभ केला होता शिवाय दिल्ली व आसपासच्या जिंकलेल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करता आली नाही. त्यामुळे बंडवाल्यांना स्थानिक प्रजेची सहानुभूती मिळाली नाही. १५ सप्टेंबर १८५७ रोजी इंग्रज व बंडवाले यांच्यालढाईस तोंड फुटले. १० दिवसाच्या कडव्या झुंजीनंतर बंडवाल्यांचा पराभव होऊन दिल्ली इंग्रजांच्या ताब्यात आली. इंग्रजानी दिल्ली जिंकल्यानंतर बहादूरशहाला रंगून येथे पाठवले व पुढे याच ठिकाणी कैदेत त्यांचा मृत्यू झाला.

### १.४.२ कानपूर

मीरत येथील शिपायांचे बंड, त्यांची दिल्लीवरील चाल, दिल्लीतील प्रारंभीचा विजय अशा बातम्या शिपायांच्या कानावर आल्या. कानपूर येथे इंग्रज फौजेच्या छावण्या असत नानासाहेब याने कानपूरच्या जवळपासचे प्रदेश ताब्यात घेतले. इंग्रज सेनापती सर हयूम व्हीलरला पळून जावे लागले. त्याने कानपूरच्या किल्ल्यात आश्रय घेतला. नानासाहेबाने कानपूरच्या किल्ला जिंकून घेतला व त्यास आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले. प्रयाग येथे जनरल नील याने क्रांतीकारकांवर अत्याचार केले म्हणून सैनिकांची बदला घेण्याची भावना

वाढली. याचा परिणाम असा झाला की, इंग्रज स्त्रिया व मुले यांची १२५ ची संख्या ही काही सौदा कोठी येथे सुरक्षितपणे पोहचू शकली नाही. यापैकी ५ जण पळून गेल्याने वाचले. २८ जून रोजी एक दरबार भरवून सम्राट बहादूरशहा यास १०१ तोफांची सलामी देण्यात आली व नानासाहेब यास पेशवेपद बहाल करण्यात आले. परंतु कानपूर हातातून गेल्याचे कळताच इंग्रजांनी तिकडे फौजा कानपूरावर येण्यापूर्वीच नानासाहेबांच्या फौजेचा धुव्वा उडाला व ती पराभूत झाली. १७ जुलै रोजी इंग्रजांनी चाल करुन कानपूर सर केले. पराभूत झालेले नानासाहेब औंधच्या प्रदेशात निसटला व प्रतिकाराची तयारी करु लागले.

सैन्याची जमवा जमव करुन नानासाहेब व त्यांचा सेनापती तात्या टोपे यांनी कानपूरवर चाल केली व ते पुन्हा जिंकले पण तो विजय अल्पकाळ टिकला. जनरल कॅम्पबेलने कानपूरवर चाल करुन नानासाहेबांचा पुन्हा एकदा पराभव केला. नानासाहेब व तात्या टोपे ६ डिसेंबर १८५७ रोजी पळून गेले.

### १.४.३ लखनौ

लखनौ ही अवधची राजधानी होती. अवधच्या नबाबाचे राज्य तर कंपनी सरकारने खालसा केले होतेच. शिवाय नव्या सरकारी धोरणामुळे हजारो जमीनदार बेकार व प्रतिष्ठाहीन बनले होते. नबाबाचे राज्य खलसा केल्याने हजारो शिपाई बेकार झाले होते. मीरत, दिल्ली, कानपूर इ. ठिकाणच्या बंडाच्या बातम्यांनी ही ठिणगी अवधच्या प्रदेशात टाकली गेली. ३० मे १८५७ रोजी अवधच्या प्रदेशात बंडाचा झेंडा उभारला गेला उठाव एवढा जबरदस्त होता की, अवधमधील इंग्रजी राज्य अवघ्या १०-१२ दिवसात समाप्त झाले.

लखनौमधील इंग्रज लोक व गोरे सैन्य यांनी प्रसंगावधान राखून इंग्रज रेसिडेन्सीत आश्रय घेतला. रेसिडेन्सीमध्ये दोन हजार इंग्रज होते व त्यांच्याभोवती १ लाख बंडवाल्यांनी गराडा घातला होता. इंग्रजांनी मनोधैर्य खचू न देता सतत ६ महिने बंडवाल्यांशी प्रतिकार केला ही बाब कौतुकास्पद मानली पाहिजे. अवधमधील बंडवाल्यांनी इंग्रज स्त्रीपुरुषांवर अत्याचार केले नाहीत ही गोष्ट नोंद घेण्यासाखी आहे. बंडाचे नेतृत्व नबाबाची पत्नी बेगम हजरत महलने स्विकारलेले होते. तिने अल्पवयीन पुत्राला अवधच्या गादीवर बसून इंग्रज राजवट समाप्त झाल्याचे घोषित केले. बहादूरशहाचा अंकित म्हणून अवधचा नवाब राज्य करणार होता पण इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे ही राजवट फार काळ टिकू शकली नाही. सप्टेंबर १८५७ मध्ये इंग्रज सेनापती औट्रॅम यांनी लखनौवर चाल केली. १७ नोव्हेंबरला इंग्रज रेसिडेन्सीभोवतीचा बंडवाल्यांचा वेढा उठविला. ज.कॅम्बेलची २० हजाराची फौज लखनौला येऊन पोहचली. इंग्रजांच्या संयुक्त फौजांनी २२ मार्च १८५८ रोजी हल्ला करुन लखनौ सर केले.

### १.४.४ बिहार

बिहारमधील दानपूर येथे इंग्रजांची हिंदी फौज हाती. ही फौज बंड करेल, ही भिती लक्षात घेऊन लॉईड या इंग्रज अधिकाऱ्याने हिंदी शिपायांना निःशस्त्र करण्याचा निर्णय घेतला.

त्याच्या हुकुमाप्रमाणे हिंदी शिपाई आपली शस्त्रे खाली ठेवत असतानाच गोऱ्यांची फौज तेथे येऊन पोहचली. हिंदी शिपायांचा असा समज झाला की आपणांस निःशस्त्र करुन आपली कत्तल करण्याचा लॉईडचा डाव आहे. त्यांनी लगेच शस्त्रे हाती घेऊन गोऱ्या फौजेवर गोळीबार सुरु केला अशाप्रकारे दानापूरमध्ये बंडाची सुरुवात झाली.

बिहारमधील जगदीशपूरचा वृद्ध जमीनदार कुवरसिंह यावर इंग्रजांनी बरीच जुलूम जबरदस्ती केली होती. त्याने बंडवाल्याशिपायांचे नेतृत्व स्विकारले. अनेक लढाया घडून आल्या. कुवरसिंहने असामान्य शौर्य गाजविले. तथापि इंग्रज फौजेपुढे त्याचा निभाव लागला नाही व तो १८५८ साली मरण पावला. त्याच्या नंतरच्या अमरसिंग नावाच्या बंधूने धैर्याने संघर्ष चालू ठेवला, पंरतु त्यांना यश मिळाले नाही.

### १.४.५ झाशी

दत्तक वारसा नामंजूर या तत्वानुसार झाशीच्या राणीच्या दत्तक पुत्रास डलहौसीने राज्याधिकार नाकारुन झाशीचे राज्य खालसा केले होते. राणीला पारतंत्र्याची जाणीव सारखी सतावत होती. खुद्द तिच्याखजिन्यावर तिचा ताबा नव्हता. १८५७ च्या उठावाने या क्षात्रतेजाला संधी मिळाली.बंडाच्या बातम्या झाशीवर थडकल्या तेव्हा तेथील हिंदी शिपायानीही बंड पुकारुन ६ जून १८५७ रोजी इंग्रज अधिकाऱ्यांची कत्तल केली. त्यातून बचावलेल्या इंग्रजांनी झाशीच्या किल्ल्यात आश्रय घेतला. बंडवाल्यांनी त्यांच्याशी वाटाघाटी करुन त्यांना जीवनदानाचे आश्वासन दिले. पण इंग्रज जेव्हा बाहेर आले तेव्हा त्यांना विश्वासघाताने ठार केले. इंग्रजांची ही कत्तल राणीने घडवून आणली नव्हती. तथापि यानंतर बंडवाल्यांनी राणीकडे जाऊनबरेच द्रव्यसाहय घेतले व त्यांनी दिल्लीकडे कूच केली. यावेळी नानासाहेब पेशव्याप्रमाणे तिने बंडवाल्याचे नेतृत्व स्विकारले नाही. एवढेच नव्हे तर राणी आपल्याशी एकनिष्ठ राहिल्याचे पाहून इंग्रजानी झाशीचा कारभार आपल्यावतीने तिच्याकडे सुपूर्त केला. तथापि हा इंग्रजांचा डावपेच होता. बंडाच्या संकटातून सावरत असतानाच ते झाशीस झालेल्या इंग्रजांच्या कत्तलीचा राणीविरुध्द पुरावा जमा करु लागले. झाशीच्या कत्तलीत शिपाई कसे रानटीपणाने वागले आणि आपले त्यांच्यापुढे कांही चालले नाही याबद्दल राणीने इंग्रजांना वारंवार लिहून आपली बाजू स्वच्छ असल्याचे निदर्शनाला आणून दिले होते. पण आत इंग्रजांना राणीभोवती फास आवळायाचा होता. परिणामी राणीचे इंग्रजांशी असलेले संबंध झपाटयाने बिघडू लागले. झाशीच्या कत्तलीचा आरोप आपणावर ठेवून इंग्रज आपणास फाशी देणार याबद्दल तिची खात्री झाली. तेव्हां नामुष्कीचे मरण पत्करण्यापेक्षा इंग्रजांशी लढून मरण पत्करण्याचे तिने ठरविले.

झाशी लढविण्यासाठी राणीने पूर्ण लष्करी तयारी केली सर हयू रोज या सेनानीच्या अधिपत्याखाली इंग्रज फौजा झाशीवर चाल करुन आल्या आणि त्यांनी झाशीच्या किल्ल्यास वेढा दिला. राणी मोठ्या त्वेषाने किल्ला लढवू लागली. सेनापती तात्या टोपे झाशीच्या मदतीस धावला पण इंग्रजानी त्यांना पराभूत केले. इंग्रजांनी जोमाने हल्ला करुन त्यांनी झाशीच्या तटबंदीस खिंडार पाडले. इंग्रज फौज आत शिरुन लुटालुट व कत्तल करु लागली. झाशी इंग्रजांच्या हाती

पडत असताना घोड्यावर स्वार होऊन ती मोठ्या युक्तीने किल्ल्याबाहेर पडली होती. राणी प्रथम काल्पीला पोहचली. काल्पीत नानासाहेब, तात्या टोपे, बांद्याचा नबाब, बाणपूर व शहागड येथील राजे यांचेशी सल्लामसलत केली. पण सर हयू रोजने दोन मोठ्या लढायांत बंडवाल्यांचा पराभव करुन काल्पी जिंकली. राणी व तात्या टोपे ग्वाल्हेरला निघून गेले. ग्वाल्हेरचा राजा शिंदे व मंत्री दिनकरराव पळून गेले. इ.स. १८५८ रोजी ग्वाल्हेरचा किल्ला राणीच्याताब्यात आला. हयू रोजच्या समवेत इंग्रजांना पिटाळून लावले. दुसऱ्या दिवशी १८ जूनला जनरल स्मिथ व हयू रोजने ग्वाल्हेरवर स्वारी केली. राणीने दत्तक पुत्राला पाठीशी बांधून घोडयासकट ग्वाल्हेरच्या किल्ल्यावरुन उडी घेतली व इंग्रजांचे सैन्य उध्ववस्त करीत जाऊ लागली. इंग्रजानी तिचा पाठलाग सुरु केला. शेवटी या लढाईमध्ये राणींना वीर मरण आले.

वरील प्रमुख ठिकाणच्या उठावाशिवाय उत्तर प्रदेशात बनारस, अलाहाबाद, लाहोर मध्य प्रदेशात बाणपूर व शहागड, रामगढ, इंदूर, महू, राजपुतान्यात अजमेर, नासिराबाद, रोहिलखंड इ. ठिकाणची सर्व बंड मोडून काढण्यात इंग्रज यशस्वी झाले. ग्वाल्हेरच्या लढाईनेच बंडाचा खरा शेवट झाला होता. झाशीची राणी रणांगणावर ठार झाली. नानासाहेब पेशवा, बेगम हजरत महल इ. नेत्यांनी देशत्याग केला. तात्या टोपेने इंग्रजांविरुध्द हालचाली कांही दिवस चालू ठेवल्या. अखेर मानसिंह नावाच्या विश्वासघातकी देशद्रोही सरदाराने अलवारच्या जंगलात झोपले असताना तात्या टोपेला ९ एप्रिल १८५९ च्या रात्री पकडून दिले. अशा प्रकारे इंग्रज साम्राज्याविरुध्द भारतातील लोकांनी घडवून आणलेला हा सशस्त्र उठाव अपयशी झाला.

**१.४.६ आपली प्रगती तपासा :**

१८५७ च्या उठावाचे व्याप्ती सांगा.

## १.५ १८५७ चा उठाव अयशस्वी का झाला ?

**१.५.१ बंडाचा फैलाव सर्व हिंदूस्थानावर झाला नाही :** हा उठाव एकाच वेळी सर्व हिंदूस्थानभर होऊ शकला नाही हे त्यांच्या अपयशाचे पहिले कारण आहे. दक्षिण हिंदुस्थानातील महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास, केरळ इत्यादी प्रदेशात शांतता राहिली. उत्तरेकडेही राजपुताना, पंजाब, नेपाळ व बंगालचा बराचसा भाग येथे बंडाचा उद्‌भव झाला नाही. अफगणिस्थाननेही

यावेळी इंग्रजांशी मित्रत्वाचे संबंध ठेवले. पंजाबमधील शांतता आश्चर्यजनक होती. पंजाबचे शीख इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले.

**१.५.२ हिंदी राजेरजवाड्यांच्या पाठिंब्यांचा अभाव :** वास्तविक इंग्रजांच्या आक्रमक व स्वार्थी धोरणाखाली हिंदूस्थानातील अनेक संस्थानिक भरडले गेले होते. कोणाचे राज्य गेले कोणाची पदवी गेली, तर कोणाचा तनखा गेला. तरीही त्यांच्यापैकी राणी लक्ष्मीबाई, नानासाहेब पेशवा, बादशहा बहादूरशहा, कुवरसिंह, बेगम हजरत महल असे काहीजण सोडल्यास बाकीचे संस्थानिक हात बांधून स्वस्थ बसले. शिंदे-होळकर हे मराठ्यांचे एकेकाळचे सरदार इंग्रजांशी एकनिष्ठ राहिले. हैद्राबादच्या निजामाचा दिवाण सालारजंग हा सुद्धा इंग्रजांशी एकनिष्ठ राहिला.

**१.५.३ बंडवाल्यांना सर्वमान्य नेता मिळू शकला नाही :** या उठावात हिंदी लोकांना विशेषतः बंडवाल्यांना सर्वमान्य नेता मिळू शकला नाही. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, कुवर सिंह यांनी शिपायांचे नेतृत्व स्विकारुन अनेक लढायात शौर्य दाखविल हे खरे तथापि त्यांच्यापैकी कोणी एकजण सर्वमान्य नेता बनू शकला नाही. बहादूरशहा, नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल यांनी आपापल्या बंडवाल्यांचे नेतृत्व केले व परस्पर सहकार्यही केले. परंतु परस्परांशी सहकार्य वेगळे व सर्वमान्य नेतृत्व वेगळे. असे नेतृत्व निर्माण होण्यासारखी त्यावेळची हिंदुस्थानची परिस्थितीही नव्हती आणि बंडवाल्यांना तेवढा अवधीही मिळालेला नव्हता. उलट इंग्रजांचा कारभार एक होता. साध्या शिपायापासून ते गर्व्हनर जनरलपर्यंत कारभार यंत्रणा बांधली गेली होती. या मुळे बंडवाल्यांचा उठाव अपयशी ठरला.

**१.५.४ सर्वमान्य ध्येयाचा व कार्यक्रमाचा अभाव :** १८५७ च्या उठावातील बंडवाल्यांच्या समोर कोणती ध्येये होती ? बंडवाले व त्यांचे नेते यांना इंग्रजांचा पराभव करुन त्यांची राजवट नष्ट करावयाची होती, असे सर्वसाधारणपणे सांगता येईल. पण इंग्रजांचा पराभव कशासाठी करावयाचा होता अथवा तो झाल्यावर बंडवाल्यांना काय हवे होते ? याचे उत्तर अगदी अस्पष्ट आहे. बादशहाला सिंहासन प्राप्त करुन जमल्यास आपल्या सत्तेचे थोडेबहुत पुनरुज्जीवन करायचे होते. नानेसाहेबांस पेशवाई मिळवून मराठी राज्याचे पुरुज्जीवन करावयाचे होते. राणी लक्ष्मीबाई, बेगम हजरत महल यांना आपली राज्ये हवी होती. आणि शिपायांना गोऱ्या अधिकाऱ्यांच्या अन्यायी व उद्दाम वृत्तीचा सूड उगवावयाचा होता. ध्येयामधील सुसूत्रता हिंदी नेत्यांत दिसून येत नाही.

तसेच सर्व बंडवाल्यांचा मिळून एक सुसूत्र कार्यक्रम, सुसूत्र योजना असे काहीच उठावात दिसत नाही अथवा त्यामागे एखादा हिकमती नेताही नव्हता. काही इतिहासकारांच्या मते बंडाची तारीख ३१ मे ठरली होती. परंतु बंडाचा स्फोट त्याआगोदर म्हणजे २९ मार्च बराकपूरच्या छावणीत घडून आला आणि बंडाचा कार्यक्रम सर्वत्र पोहचण्यापूर्वीच बंड सुरु झाले.त्यामुळे बंडाचे पूर्वनियोजन होऊ शकले नाही. यानंतर अनेक लष्करी छावण्यात शिपायांनी बंडे पुकारली पण त्यांच्या बंडाच्या हालचालीत कोणतीच सुसूत्रता राहिली नाही.

**१.५.५ हिंदी नेते लष्करी डावपेचात कमी पडले :** लढाया जिंकण्यासाठी जसे शौर्यपराक्रमादी गुण लागतात, तसे डावपेचाचेही गुणआवश्यक असतात. बंडवाल्यांनी दिल्ली काबीज केल्यावर हर प्रयत्न करुन ताब्यात ठेवणे जरुर होते. कारण दिल्ली ही हिंदुस्थानची पूर्वापार राजधानी या नात्याने तिचा सर्व हिंदुस्थानवर मानसशास्त्रीय प्रभाव होता. हा प्रभाव इंग्रजांनी ओळखला होता, म्हणून त्यांनी हर प्रयत्न करुन दिल्लीचा वेढा निकराने चालविला व ती काबीज केली. दिल्लीचा वेढा चालू असताना वेढा देऊन बसलेल्या इंग्रज फौजेला पंजाबमधून कुमक पोहचत असे. ही कुमक बंडवाल्यांना सहज बंद पाडता आली असती पण त्यांना ते सुचले नाही तसेच नानासाहेबाने कानपूर कडून चाल करुन दिल्लीच्या मदतीस जावयास हवे होते, तेही त्यांने केले नाही व तो कानपूरकडेच वावरत राहिला. हिंदी नेते डावपेचात कमी पडल्याची उठावातील अनेक उदाहरणे आहेत.

**६) साधनसामग्री, अनुभव व मनोधैर्य यात इंग्रज वरचढ :** इंग्रजांजवळ तारायंत्रे, रेल्वे, डाकसेवा या दळणवळणाच्या सोयी होत्या. स्वाभाविकच इंग्रजी लष्कराच्या हालचाली अचूक व वेळेवर होण्यासाठी त्या साधनांचा मोठा उपयोग झाला. इंग्रजांना जलद गतीने हालचाली करता आल्या. बंदुका, तोफा इत्यादी लष्करी हत्यारांच्या बाबतीतही इंग्रज वरचढ होते. बहुतेक बंडवाले पारंपारिक हत्यारांनी लढत होते. इंग्रजांची हत्यारे आधुनिक व प्रभावी होती. इंग्रज सेनानीच्या ठिकाणी असामान्य मनोधैर्य, शिस्त, आपल्या कार्यावरील अविचल निष्ठा व देशभक्ती होती. इंग्रजाकडे कॅम्पबेल, हयू रोज, नील, लॉरेन्स इत्यादी असे अनेक गुणी अधिकारी व गुणी सेनापती होते.

**१.५.६ उठावास जनतेचा पाहिजे तसा पाठिंबा मिळाला नाही :** या उठावात कांही ठिकाणी हिंदी जनतेनेही भाग घेतल्याची कांही उदाहरणे आहेत. तथापि ज्या प्रमाणात सामान्य हिंदी माणसांनी इंग्रजाविरुध्द त्वेषाने उठाव करावयास हवा होता त्या प्रमाणात तो झाला नाही दक्षिणेतील राजेरजवाडे, जहागिरदार व सामान्य जनता शांत राहिलीच, पण उत्तरेकडील सामान्य जनता तटस्थ राहिली. काही ठिकाणी प्रारंभीचे यश मिळाल्यावर बंडवाल्यांनी आपल्या ताब्यात आलेल्या प्रदेशात स्वतःच लुटालुट सुरु केली. त्यामुळे अशा ठिकाणी उठावाला असणारी सहानुभूती बंडवाले मिळवू शकले नाहीत उलट हिंदी लोकांनी इंग्रज फौजातील सैनिकांना मार्गात साहय केल्याचे इंग्रज अधिकारी मान्य करतात. ज्या प्रदेशात बंडवाल्यांनी अत्याचार केले होते तेथे इंग्रजांची सरशी होत असल्याचे पाहून स्थानिक जनतेने बंडवाल्यांना पकडून इंग्रजांच्या स्वाधीन केले अथवा परस्पर ठार मारले.

**१.५.६ बंडवाल्यांच्या नेत्यांत दुही होती :** राणी लक्ष्मीबाई व तात्या टोपे या नेत्यांमधील ऐक्यासारखे कांही अपवाद वगळल्यास बंडवाल्यांच्या नेत्यांत फारसे ऐक्य नव्हते. जेव्हा दिल्ली इंग्रज फौजांनी वेढली गेली त्यावेळी कानपूरचे शिपाई दिल्लीच्या बचावास जाण्यास उत्सुक होते. पण असे म्हणतात की, नानासाहेबांनी त्यांना दिल्लीकडे जाऊ दिले नाही, कारण नानासाहेब

बहादूरशहाचे नेतृत्व अथवा स्वामित्व मानावयास तयार नव्हता दिल्ली बचावली असती तर बहादूरशहाचा सर्वमान्य नेता म्हणून उदय झाला असता व नानासाहेबास ते नको होते.

**१.५.७ आंतरराष्ट्रीय परिस्थिती इंग्रजांना अनुकूल :** या उठावाच्या पूर्वी नुकतेच रशियाशी चालू असलेले क्रिमियन युध्द संपून इंग्लंड विजयी झाले होते. क्रिमियन युध्दातील विजयामुळे इंग्रजांची आतंरराष्ट्रीय प्रतीष्ठा व सामर्थ्य वाढले होते. इराणशी चाललेले युध्द देखील संपुष्टात आलेले होते. अजीमुल्ला व रंगो बापूजी यांनी रशिया, इजिप्त व तुर्कस्थानशी संपर्क साधला होता, पण त्यात त्यांना यश मिळू शकले नाही.

**१.५.८ भारतीयांची विश्वासघातकी वृत्ती :** तात्या टोपे यास पकडून देण्यासाठी जसा मानसिंहाने विश्वासघात केला तसा मोगल बादशहा बहादूरशहाचा नातेवाईक इलाही बख्श यानेही दिल्लीत विश्वासघात केला. त्याचप्रमाणे बख्तखानाच्या विश्वासघातमुळे हुमायुनच्या कबरीजवळ बहादुरशहा व बेगम जीनत महल या दोघांना इंग्रज पकडू शकले.

**१.५.९ सागरावर इंग्रजांचे नियंत्रण :** इंग्रजांचे समुद्रमार्गावर पूर्ण नियंत्रण होते. त्यामुळे समुद्रमार्गे युध्दसाहित्य वारसद पाठवू शकत होते प्रसंगी लष्करी हालचालीसाठी या मार्गाचा इंग्रजांना उपयोग झाला.

**१.५.१० आपली प्रगती तपासा :**

१८५७ च्या उठाव अयशस्वी का झाला ?

---

---

---

---

## १.६ १८५८ च्या उठावाचे स्वरुप :

१८५७ च्या उठावाच्या स्वरुपाविषयी इतिहासात वेगवेगळे विचार प्रवाह आहेत. काहींच्या मते, हे इंग्रजांच्या विरोधात केलेले लष्कराचे बंड आहे. हा विचार इंग्रजी व इंग्रज धार्जिण्या इतिहासकारांनी माडला आहे. काही जणांना हा उठाव महान राष्ट्रीय उठाव वाटतो.काहींना तो हिंदी स्वातंत्र्ययुध्द वाटतो. तर काहींना हिंदू-मुसलमानांचा कट वाटतो. उठावा संबंधातील मतभिन्नता विचारात घेऊन उठावाचे वास्तव स्वरुप काय होते ? हे शोधून काढणे जिकीरीचे काम आहे.१८५७ चा उठाव म्हणजे स्वातंत्र्ययुध्द होते असे विचार व्यक्त करणाऱ्या विचारवंता मध्ये आणि इतिकासकारात प्रामुख्याने खालील व्यक्तींचा समावेश होतो.

अ ] “ १८५७ चा उठाव हे भारतीय स्वातंत्र्य युद्ध होते.”

१) **संतोषकुमार रे :** १८५७ चा उठाव म्हणजे ल्ष्करी, सरंजामी अथवा धार्मिक उद्रेक याहून निश्चितपणे अधिक काहीतरी होतो. हिंदू आणि मुसलमान यांची घडवून आणलेली क्रांती होती. या क्रांतीचा प्रसार झपाट्याने झाला आणि तिने जनतेच्या बंडाचे आणि स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरुप धारण केले. खात्रीनेच हा उठाव म्हणजे केवळ शिपायांचे बंड नव्हता तर तो प्रजेचा उठाव होता. जर तो शिपायांचे बंड असता अथवा मूठभर लोकांचा उठाव असता तर त्यास युरोपातील इटालियन आणि फेंच लोकांची सहानुभूती व सदिच्छा मिळाली नसती. फ्रांन्समध्ये हिंदी उठावाचे “God’s Judgement Upon English Rule in India” असे वर्णन केले गेले.

२) **कर्नल मॉनसन :** १८५७ च्या बंडाविरुध्दच्या लष्करी मोहिमेत भाग घेणारा इंग्रज अधिकारी म्हणतो. “त्या वेळच्या परिस्थितीने मला हे दाखवून दिले आहे की, हिंदी समाजात दुष्ट व द्वेषजनक भावना निर्माण करणारी अनेकविध कारणे होती. ही भावना वैयक्तिक नसून राष्ट्रीय स्वरुपाची होती.”

३) **स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर**

आपल्या ‘अठराशे सत्तावनचे स्वातंत्र्यसमर’ या सुप्रसिध्द ग्रंथात स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, “१८५७ च्या क्रांतीची प्रमुख कारणे असलेली दिव्य तत्त्वे म्हणजे स्वधर्म व स्वराज्य ही होत. आपल्या प्राणप्रिय धर्मावर हल्ला झालेला आहे, असे यथार्थ रीतीने दिसू लागताच स्वधर्मरक्षणार्थ जी दीन दीन ही गर्जना सुरु झाली, त्या गर्जनेत व आपले निसर्गदत्त स्वातंत्र्य कपटीपणाने हिरावून घेऊन आपल्या पायात गुलामगिरीच्या शृंखला घातल्या गेल्या हे पहाताच स्वराज्यसंपादनेच्या पवित्र इच्छेने त्या दास्यशृंखलेवर केलेल्या प्रचंड आघातात त्या क्रांतीचे मूळ आहे.” हा उठाव म्हणजे हिंदी लोकांनी आपल्या धार्मिक व राजकीय स्वातंत्र्यासाठी केलेले क्रांतीयुध्द असे मत सावरकरांनी मांडले आहे.

४) **अशोक मेहता :**

‘**The Great Rebellion**’ या पुस्तकात अशोक मेहता म्हणतात, “१८५७ चे बंड हे शिपायांच्या बंडाहून अधिक होते. अनेक ऱ्हासास जाणाऱ्या शक्तींना वाट मोकळी करुन देणाऱ्या सामाजिक ज्वालामुखीचा तो स्फोट होता.” मेहतांच्या मते, “शिपायांना मायुभूमीच्या पारतंत्र्याची सतत जाणीव होती. शिपायांशिवाय लक्षावधी लोकांनी या बंडात भाग घेतला. शिपायांइतकीच प्रजाजनांची या बंडात हत्या झाली, काही ठिकाणी या बंडास जनतेचा पाठिंबा मिळाला. जे इंग्रजांच्या बाजूने गेले त्यांच्यावर हिंदी जनतेने सामाजिक बहिष्कार टाकला, इत्यादी अनेक घटना हे बंड मर्यादित प्रमाणावर का होईना पण राष्ट्रीय उठावाच्या स्वरुपाचे होते, हे सिध्द करतात.”

## ५) डॉ.एस्.एन्.सेन,

धर्मयुध्द म्हणून सुरुवात झालेल्या घटनेने शेवटी स्वातंत्र्ययुध्दाचे स्वरुप धारण केले. बंडवाल्यांना परकीय सत्ता उलथून टाकावयाची होती व मोगल बादशाहाच्या नेतृत्वाखाली जुना जमाना परत आणावायाचा होता, या विषयी शंका असण्याचे कारण नाही. आजकालच्या हिंदी अभ्यासकांना हे बंड म्हणजे परकीय वर्चस्वाविरुध्द केलेला उठाव वाटतो. जरी या उठावास सर्वच पाठिंबा मिळू शकला नाही, तरी देशाच्या काही भागातील सामान्य जनतेची सहानुभूती या उठावास होती. अवधच्या नबाबी राज्यात जनतेने जो उठाव केला तो फारसा राष्ट्रीय स्वरुपाचा होता असे म्हणत असतानाच डॉ. सेन म्हणतात की, राष्ट्रीय हा शब्द फार मर्यादित अर्थाने वापरला पाहिजे. कारण हिंदी राष्ट्रवादाची कल्पना अद्याप गर्भावस्थेत होती.

## ६) इतिहासकार आऊट्रम

इतिहासकार आऊट्रम हा या क्रांतीला फक्त शिपायांचे बंड म्हणत नाही. काडतूसांच्या घटनेनंतर या उठावाला पूर्णपणे संगठित स्वरुपाची क्रांती होय असे आऊट्रम यास म्हणावयाचे आहे.

१८५७ च्या उठावात सैनिकांव्यतिरिक्त लाखो भारतीयांनी भाग घेतला होता. या स्वातंत्र्य युध्दात जितके सैनिक मरण पावले तितक्या नागरिकांनी देखील आत्मबलिदान केलेले आहे. हे क्रांतीकारक देशभक्त या लढयात आपल्या देशाला स्वातंत्र्य करण्यासाठी सहभागी झाले होत, कष्ट दूर करण्यासाठी नव्हे. यावरुन हा उठाव म्हणजे शिपायांचे बंड नव्हे तर स्वातंत्र्ययुध्द होय हे स्पष्ट दिसत आहे. ज्या गतीने हे स्वातंत्र्ययुध्द पसरले यावरुन हे स्पष्ट होते की, यास जनतेचे प्रबळ समर्थन होते. अनेक ठिकाणी नागरिकांनी सैनिकांना पूर्ण सहाय्य दिलेले आढळून येते. ज्या लोकांनी इंग्रजांची बाजू घेतली त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला होता. जनरल हॅवलॉक यास आपल्या सैनिकांना नदी पार करण्यासाठी नौका ही उपलब्ध झाल्या नाहीत व नाविकही मिळाले नाहीत हे ऐतिहासिक सत्य दृष्टीआड करुन चालणार नाही. कानपूर येथे इंग्रजांनी मजूरांकडून काम करुन घेण्यासाठी दबाव टाकला म्हणून मजूर रात्रीच पळून गेले. अनेक ठिकाणी सर्व श्रेणीच्या भारतीयांनी इंग्रजांपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला. हा उठाव राष्ट्रीय स्वरुपाचा होता हे स्पष्ट करण्यासाठी महत्त्वाचे प्रमाण असे सांगता येईल की यात हिंदू-मुसलमान दोघांनी सांप्रदायिक एकतेच्या भावनेने खांद्याला खांदा लावून सहकार्य केलेले आढळते.

मोगल बादशहाने हिंदूना खुश करण्यासाठी संपूर्ण देशात गोहत्या बंदी केली. त्याने राजपुतान्यातील राजांना पाठविलेला पत्रात लिहीले आहे की, कोणत्याही मुल्यावर भारतातून इंग्रजांना निघतांना पाहणे ही माझी हार्दिक इच्छा आहे. संपूर्ण भारतवर्ष स्वातंत्र व्हावा ही देखील माझी प्रबळ आकांक्षा आहे. इंग्रजांना भारतातून हाकलून लावले की, मग मला राज्य करण्याची कोणतीच अभिलाषा नाही. जर आपण सारे शत्रूला देशाबाहेर घालविण्यास आपल्या तलवारी म्यानाबाहेर काढण्यास तयार असाल तर मी देखील आपल्या राज्यशक्तीला व अधिकारांना

निवडक भारतीय राजांना सोपविण्यास तयार आहे. वरील मोगल सम्राटाने लिहीलेल्या पत्रावरुन हे स्पष्ट होते की, १८५७ चा उठाव म्हणजे भारतीयांचे स्वातंत्र्ययुध्द होते. हिंदू राजांनी देखील बादशाहच्या या विनंतीचा स्विकार केला व इंग्रजांच्या विरोधात शस्त्र उपसले.

**ब) १८५७ चा उठाव शिपायांचे बंड होते ?**

१८५७ चा उठाव हा शिपायांचे बंड होते असे म्हणणाऱ्या इतिहासकारांचा व अभ्यासकांचा गट मोठा आहे. या गटात प्रामुख्याने खालील इतिहासकारांचा व विचारवंतांचा समावेश होतो.

१) **सर जॉन लॉरेन्स :** बंड सुरु झाले त्यावेळी पंजाब प्रांताचा कारभार पहाणारा सर जॉन लॉरेन्स म्हणतो, बंडाचे खरे मूळ लष्करातच होते. त्याचे मूळ कारण काडतूस प्रकरण होय.

२) **सर जॉन सिली :** हे बंड म्हणजे संपूर्णत देशाभिमानरहित स्वार्थी शिपायांचे बंड होते. त्यास एत्देशीय नेतृत्व अथवा जनतेचा पाठिंबा नव्हता.

३) **जनरल कॅम्पबेल :** प्रत्यक्ष ज्याने बंड मोडण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली तो जनरल कॅम्पबेल म्हणतो, हे निर्भेळ शिपायांचे बंड होते. ते सुध्दा बंगाल लष्करातील शिपायांचे बंड होते. कामगारानी संप करावा त्यातलाच हा लष्करी प्रकार समजावा लागतो. शिपायांचे वेळोवेळी लाड पुरविले गेल्यामुळे ते शेफारले गेले होते. त्यात चरबीदार काडतुसांची भर पडली. बंडाची तयारी गुप्तपणे झाली ही समजूत चकीची आहे. शिपायांना खरोखरच बंड करावयाचे नव्हते, तर आपले मनोगत पूर्ण करुन घ्यावयाचे होते.

४) **किशोरचंद्र मित्रा :** त्या काळातील बंगाली विचारवंत होते. त्यांनी १८५८ साली काढलेले उद्‌गार, "हे बंड मुलतः लष्करी बंडाच्या स्वरुपाचे आहे. एक लाख शिपायांचे हे बंड आहे. जनतेच्या सहभागाचा त्याच्याशी संबंध नाही."

५) **सुभाषचंद्र मुखोपाध्याय, हरिचंद्र मुखर्जी व सर सय्यद अहमद :** या विचारवंतानी अशीच मते मांडली आहे. ते म्हणतात, "१९ व्या शतकाच्या शेवट पर्यंत इंग्रजी शिक्षण घेतलेल्या हिंदी नेत्यांत व विचारवंतात १८५७ च्या उठावाबद्दल अशीच भावना हाती."

६) **प्रसिध्द इतिहासकार थॉमसन व गॅरेट** - या इतिहासकारांच्या मते, "या बंडास लष्करी बंड अथवा स्थानभ्रष्ट झालेल्या संस्थानिकांनी व जमिनदारांनी आपली गेलेली मालमत्ता व हक्क पुन्हा संपादन करण्यासाठी केलेला प्रयत्न, मोगल बादशाहीची पुनर्स्थापना करण्याचा प्रयत्न अथवा रयतांचे युध्द अशा अनेक नावानी संबोधिता येईल. पण त्याकडे कशाही दृष्टीने पाहिले तरी ते स्थानिक, मर्यादित व असंघटित होते. मध्ययुगातील एखाद्या यादवी युध्दाप्रमाणे अथवा बंगाल प्रांतातील अगदी प्रारंभाच्या मोहीमेप्रमाणे वाटते. पण १८५७ च्या उन्हाळयातील

चार महिन्यांत मात्र अशी भीती वाटत होती हे बंड खरोखरच स्वातंत्र्ययुध्द बनते की काय तसे झाले असते, तर इंग्रजांना हिंदुस्थान पुन्हा जिंकणे अशक्य होऊन बसले असते.

७) **पी. ई. रॉबर्टस** - या इंग्रज इतिहासकराच्या मते, सर्वसाधारणपणे सर जॉन लॉरेन्सच्या दृष्टीकोन सत्याच्या जवळ जाणारा आहे. आपण हे गृहीत धरावयात हरकत नाही की हा उठाव मुलतः लष्करी स्वरुपाचा होता, पण जेव्हा हिंदुस्थानात बराच राजकीय व सामाजिक असंतोष होता, तेव्हा तो घडून आला. या बंडाच्या योगाने स्वार्थी उदिष्टांची परिपूर्ती करु इच्छिणारे अनेक हितसंबंधी लोक या बंडात सामील झाले होते.

८) **प्रसिध्द हिंदी इतिहासकार डॉ. आर.सी.मुजुमदार :** यांच्या मते १८५७ चे बंड ही राष्ट्रीय चळवळ मुळीच नव्हती. बंडाचे नेते राष्ट्रीय भावनेने प्रेरित झालेले नव्हते, बहादूरशहाने शिपायांना मनः पूर्वक सहकार्य केले नाही. झाशीची राणी बंडाच्या प्रारंभी त्यात सहभागी झाली नाही. पण इंग्रजांनी तिच्यावर आरोप ठेवल्यावर ती त्यात सामील झाली.

९) **प्रसिध्द हिंदी इतिहासकार डॉ. ईश्वरीप्रसाद यांच्यामते,** या उठावात ग्रामीण व शहरी जनतेत सारख्याच प्रमाणात देशभक्तीचा उद्रेक झालेला दिसतो. अनेक ठिकाणी भारतीय स्त्रियांनी पुरुषवेष धारण करुन आपल्या ध्येयासाठी लढा दिला. तत्कालीन पुरावा असे सांगतो की, सन १८५७-५८ च्या घटना म्हणजे शिपायांच्या बंडाहून अधिक होत्या पण ते स्वातंत्र्ययुध्द होते का ?
स्वातंत्र्य संपादन करणे, हे तर या बंडाचे उद्दिष्ट होते पण हिंदुस्थानचा बराच मोठा प्रदेश तटस्थपणे शांत राहीला अगर इंग्रजांना सहाय्यक झाला, हा संघर्ष म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचे युध्द या विधानास मारक ठरते, तेव्हा या बंडाचे वर्णन कंपनीची राजवट नष्ट करण्याचे व परकीय जोखडापासून स्वातंत्र्य मिळण्याचे उद्दिष्ट असलेले उत्तरेकडील बंड असेच करणे योग्य होईल.

१८५७ चा उठाव हे शिपायांचे बंड होते या समर्थनासाठी या गटाने अनेक मुद्दे उपस्थित केलेले आहेत. पेशवा नानासाहेबांचा वकील अझीमुल्लाखान आणि छत्रपतींचे वकील रंगो बापूजी यांनी कटाची सिध्दता केली असा पुरावा मिळत नाही. इतर देशाकडूनही बंडवाल्यांना मदत मिळाल्याचे दिसत नाही उलट काही हिंदी लोकांनी इंग्रज लष्कराला मदत करुन बंडवाल्यांना इंग्रजांच्या स्वाधीन केले अथवा ठार मारले. शिवाय कोणत्याही राष्ट्रीय युध्दात राष्ट्रीय पुढाऱ्यांची आवश्यकता असते असा एकही पुढारी अस्तिवात नव्हता. नियोजनाचा अभाव होता. बहादूरशहाचे राज्य गेले. नानासाहेब पेशवे यांचे वर्षासन बंद झाल्यानंतर त्यांना गतवैभव प्राप्त करण्याची इच्छा निर्माण झाली. अनेकांच्या पदव्या व किताब काढून घेतले. झाशीचे संस्थान खालसा झाल्यामुळे राणी इंग्रजाविरुध्द असंतुष्ट झालेली होती. थोडक्यात राष्ट्राकरिता ध्येयवादाने प्रेरित होऊन इंग्रजाविरुध्द बंडाळीत सामील झालेली पुढारी मंडळी दिसत नाहीत. त्यामुळे जनता या युध्दातून तटस्थ राहिली. १८५७ च्या संघर्षात 'राष्ट्रीय'या

कल्पनेचा अभाव होता. राष्ट्रीय युध्दाला ज्या ज्या गोष्टी आवश्यक असतात त्यामध्ये अनेक गोष्टी अपूर्ण असल्याचे आपल्याला आढळून येते. भारत ही केवळ भौगोलिक संज्ञा होती. भारत च्या राष्ट्राची जाणीव त्या काळात निर्माण झालेली नव्हती. या सर्व कारणांमुळे त्याला राष्ट्रीय युध्द म्हणता येत नाही.परंतु १८५७ च्या उठावामुळे भारतीयांच्या राष्ट्रवादात वाढ झाली व पुढे याचे रुपांतर भारतीय राष्ट्रीय स्वांतत्र्य चळवळीत झाले.

**क) उठावाचे वास्तव स्वरुप :**

अशा प्रकारे अनेक देशी व विदेशी इतिहासकारांनी, नेत्यांनी व विचारवंतानी १८५७ च्या उठावाचा शोध घेण्याचा आपापल्या परीने प्रयत्न केला आहे. इंग्रज इतिहासकार व राज्यकर्ते यांच्यामते हे केवळ शिपायांचे व दुखावलेल्या संरजामी मंडळींचे बंड होते, आणि विशेष म्हणजे असेच मत१९ व्या शतकातील हिंदी विचारवंतांनी मांडल्याचे आपण पाहिले. पण नंतरच्या काळात या घटनेला हिंदुस्थानचे स्वातंत्र्य युध्द असे मानले जाऊ लागले याचे कारण २० व्या शतकात प्रारंभापासून आपल्या देशातील सशस्त्र क्रांतीकारक या लढयाच्या तेजस्वी बाजूकडे आकृष्ट झाले. हा उठाव इंग्रज सत्तेविरुध्द असल्याने त्यांनी त्यात आपल्या लढयाच्या प्रेरणा शोधण्याचा प्रयत्न केला. उठावातील नेत्यांना ते हिंदुस्थानचे स्वातंत्र्यवीर मानू लागले. त्यामध्ये ऐतिहासिक संशोधनापेक्षा देशभक्तीचाच भाग अधिक होता. १८५७ च्या उठावात धारातीर्थी पडलेल्या आपल्या लाडक्या नेत्यांबद्दल हिंदी समाजाला अभिमान वाटावा व त्यांना इंग्रजाविरुध्द संघर्ष करण्याची प्रेरणा मिळावी हा त्यांचा हेतु होता. पण आता इंग्रजी साम्राज्यही इतिहासजमा झाले आहे आणि आता इंग्रजांचे आपल्याशी शत्रुत्वाचे संबंध राहिले नाहीत. अशा स्थितीत हिंदुस्थानाच्या पारतंत्र्यामधील या महत्त्वाच्या घटनेचे मूल्यमापन आपण निःपक्षपातीपने करणे आवश्यक आहे.

प्रारंभी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिले की, बंड या शब्दाचा वाईट अर्थ या घटनेस लागू करता येणार नाही. बंड म्हणजे प्रस्थापित जुलमी राजवटीविरुध्द केलेला उठाव या अर्थाने बंड हा शब्द १८५७ चा उठाव हा केवळ शिपायांचे बंड होते असे म्हणण्यात राज्यकर्त्यांचे व इतिहासकाराचेहित होते. त्या उठावाचा स्वातंत्र्युध्द म्हणून ते का गौरव करतील ? तसे त्यानी केले असते तर हिंदी समाजाच्या स्वातंत्र्याच्या हक्काची अप्रत्यक्ष कबुली दिल्याप्रमाणे झाले असते. तसेच २०व्या शतकाच्या प्रारंभापासून आमचे क्रांतीकारक या घटनेस स्वातंत्र्ययुद्ध का म्हणू लागले याचे कारण मागे सांगितलेच आहे. त्यांना १८५७ मध्ये आपल्या प्रेरणा हव्या होत्या. इंग्रजांना विरोध केलेली प्रत्येक व्यक्ती त्यांना प्रिय व राष्ट्रीय वाटत होती व ती देशाच्या स्वातंत्र्यासाठी झगडली असे ते मानत होते.

१८५७ च्या महान उठावाचे तळाशी असणारे सत्य या दोन आत्यंतिक टोकांच्या मतांच्या मध्यभागी आहे. हा उठाव म्हणजे निव्वळ शिपायांचे बंड असे म्हणणे शंभर टक्के खरे नाही व हा उठाव म्हणजे हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा राष्ट्रीय लढा होता हे म्हणणेही शंभर टक्के बरोबर नाही.

शिपायांशिवाय हिंदी समाजातील संस्थानिकांनी, जमीनदारांनी, त्यांच्या आश्रयाखाली असणाऱ्या लक्षावधी जनतेने या उठावात सहभाग घेतला होता. काडतुसे तोंडाने तोडण्याची सक्ती गव्हर्नर जनरलने रद्द केली तरी शिपाई शांत राहिले नाहीत अवधराज्यातील सामान्य प्रजेवर काही काडतुसे तोंडाने तोडण्याची सक्ती सरकाने केली नव्हती मग ती बंडात सामील का झाले ? हिंदू व मुसलमान यांच्यात हेवेदावे असले तरी ते उठावात खांद्याला खांदा लावून लढताना दिसतात. तसेच हा उठाव म्हणजे केवळ शिपायांचे बंड असता तरी पुढे उठाव मोडल्यानंतर राणीच्या जाहीरनाम्यात हिंदुस्थानातील सर्व जनतेला शांत करण्याची व तिला अनेक प्रकारची आश्वासने देण्याची इंग्रजांना गरज नव्हती. सारांशं हे निव्वळ शिपायांचे बंड नव्हते पण त्यात समाजातील अनेकांनी सहभाग घेतला हे कबूल करावे लागेल.

पण जेव्हा आपण या उठावास स्वातंत्र्ययुध्द, राष्ट्रीय युध्द अशी विशेषणे जोडतो त्यावेळी हे शब्द जपून वापरले पाहिजेत. या उठावातील बंडवाल्यांना इंग्रजी अंमल नष्ट करावयाचा होता व आपली राज्ये पुन्हा स्वतंत्र करावयाची होती हे निर्विवाद सत्य आहे. एवढ्याच अर्थाने या उठावास स्वातंत्र्ययुध्द म्हणता येईल. पण ज्या अर्थाने २० व्या शतकात हिंदी स्वातंत्र्य म्हणजे अखिल हिंदी समाजाचे स्वातंत्र्य ही कल्पना विकसित झाली त्या अर्थाने स्वातंत्र्य १८५७ च्या उठावात दिसत नाही. बंडवाले विजयी झाले असते तर बहादूरशहा, नानासाहेब, झाशीची राणी, बेगम हजरत महल यांची राज्ये पुन्हा स्थापन झाली असती, कदाचित इंग्रजांशी एकनिष्ठ राहिलेल्या राजांशी त्यांनी युध्द सुरु केले असते, हिंदी राजे एकमेकांत यादवी लढाया खेळत बसले असते, असे होणे स्वाभाविक होते. ज्या अर्थाने अमेरिकन वसाहतवाल्यांनी आपल्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात व फ्रेंचानी आपल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्यात स्वातंत्र्य हा शब्द योजला होता त्या शब्दाच्या अर्थाची व्यापकता बंडवालंच्या नेत्यांना लक्षात येणे कठीण होते. मेईजी क्रांतीनंतर ज्याप्रमाणे जपानी सरदारांनी आपले सर्व सरंजामी हक्क राष्ट्राच्या चरणी अर्पण करुन स्वतः सामान्य नागरिकांचे स्थान स्विकारले व स्वयंभू क्रांती करुन राष्ट्र आधुनिक बनवले तसे हिंदी नेते दाखविणार होते का? तशी कांही योजना, तसा कांही विचार या काळात मांडला गेला होता का? हा सरंजामी नेत्यांनी सरंजामी हिंदी समाजाचे नेतृत्व स्विकारुन केलेला सरंजामी उठाव होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही.राष्ट्रीय या शब्दातील अर्थबदलही असेच म्हणता येईल. हिंदूस्थानचे राष्ट्रीयत्त्व यावेळी समाजाच्या गर्भात होते. त्याचा जन्म व्हायचा होता. या संदर्भात पंडित जवाहरलाल नेहरु म्हणतात, हिंदुस्थानच्याा जनतेला एकत्वाने बांधणाऱ्या राष्ट्रीय भावनेचा त्याकाळी अभाव होता, अर्वाचिन पध्दतीचे राष्ट्रीयत्व अजून जन्माला यायचे होते. राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय व विकास ही नंतरच्या काळातील घटना आहे. या राष्ट्रवादाच्या विकासाला अनेक आधुनिक हिंदी नेत्यांचा व विचारवंत यांचा हातभार लागलेला आहे, तेव्हा उठाव असे कसे म्हणता येईल. सारांश राष्ट्रवाद, स्वातंत्र्य या आधुनिक कल्पनांचा शोध १८५७ च्या उठावात घेणे इतिहासाला धरुन होणार नाही. तसे केले तर आपण आपणाला आवडणाऱ्या कल्पना इतिहासाच्या माथ्यावर मारतो असा त्याचा अर्थ होईल.

**१.६.१ आपली प्रगती तपासा :**

१८५७ च्या उठावाबद्दलचे मत प्रवाह लिहा.

## १.७ १८५७ च्या उठावाचे परिणाम :

१) **कंपनी शासनाचा शेवट व ब्रिटीश सरकारचा प्रारंभ** - १७७३ मध्ये रेग्युलेटिंग ॲक्ट हा कायदा ब्रिटीश पार्लमेंटने पारित केल्यापासून विलायत सरकारचे कंपनीच्या कारभारावरील नियंत्रण वाढतच गेले होते. ब्रिटीश सरकारने १८५८ चा कायदा पास करुन भारतात असलेल्या कंपनीच्या शासनाचा शेवट केला व ब्रिटीश सरकारच्या हाती भारतीय शासन व्यवस्थेची सूत्रे घेतली.

२) **राणीचा जाहीरनामा :** १८५७ च्या उठावातून इंग्रज राज्यकर्त्यांनी अनेक धडे घेतले. त्यामुळे त्यांनी हिंदुस्थानविषयक आपले धोरण बदलले १ नोव्हेंबर १८५८ रोजी गव्हर्नर जनरल.लॉर्ड कॅनिंगने अलाहाबाद येथे दरबार भरवून व तेथे राणीचा जाहीरनामा घोषित करुन आश्वासनांची खैरात करण्यात आली.आम्ही आता साम्राज्यविस्तार करणार नाही, देशी संस्थनिकाचे हक्क, मानमरातब आणि प्रतिष्ठा यांचा मान राखू, त्यांनी व आमच्या प्रजेने सुखा समाधानाने रहावे अशी आमची इच्छा आहे. अंतर्गत शांतता व चांगले सरकार यामुळेच हिंदुस्थानची सामाजिक प्रगती घडून येईल. देशी संस्थानिकांचे कंपनीशी जे करारमदार झाले असतील ते येथून पुढे आम्ही पाळू. संस्थानिकांना इच्छेनुसार दत्तक घेता येईल. त्यांची राज्ये खालसा केली जाणार नाहीत. धार्मिक अन्याय केला जाणार नाही. सरकार धार्मिक बाबतीत हस्तक्षेप करणार नाही. सरकारी नोकऱ्या लायकी पाहून दिल्या जातील. धर्म, वर्ग किंवा जात त्याच्या मार्गात येणार नाही. राणीच्या जाहीरनाम्यातून उदात्त भावना प्रगट झालेली आहे.

३) **प्रशासनाचे केंद्रीयकरण :** १८५७ च्या उठावानंतर ब्रिटीश सरकारने प्रशासनाचे केंद्रीयकरण करुन सत्ता आपल्या हाती घेतली. १८५८ पूर्वी असलेली भागीदार मंडळ व संचालक मंडळ बरखास्त करुन भारत मंत्री व इंडिया कैन्सिल निर्माण करण्यात आले. भारत मंत्र्याचे व्हाईसरॉयवर अधिक नियंत्रण निर्माण झाले.

**४) हिंदी लष्कराची पुनर्रचना करण्यात आली :** १८५७ चा उठाव प्रथम हिंदी लष्करातच झाला. त्यामुळे लष्कराची तातडीने पुनर्रचना करण्याचे काम हाती घेतले. लष्करांतील इंग्रज सैनिकांचे हिंदी लष्करांशी असलेले प्रमाण १:२ इतके वाढविण्यात आले. लष्करी खर्च वाढला. हिंदुस्थानातील महत्त्वाची ठिकाणे इंग्रज फौजेच्या हाती ठेवण्यात आली. शस्त्रागार व तोफखाना इंग्रज अधिकाऱ्यांच्या हाती ठेवण्यात आला. पूर्वी लष्करी तुकड्यात संमिश्र जातीचे सैनिक असत. आता लष्करी तुकड्यांची उभारणी जातवार करण्यात आली. लष्करामध्ये देशातील विविध गटांची अशी व्यवस्था करण्यात आली की, ज्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची भावना तयारच होऊ नये. आपल्या जातीजमातीच्या निष्ठा वाढीस लावल्या. जनतेपासून लष्कर दूर ठेवण्याचा हर प्रयत्न केला गेला. एवढेच नव्हे तर सैनिकांच्या हाती वर्तमानपत्रही पडणार नाही याची दक्षता घेण्यात आली. लष्करी बंड उद्‌भवले तर ते सहजासहजी चिरडून टाकण्याइतकी तयारी इंग्रजांनी हिंदी लष्कराची पुनर्रचना करुन केली.

**५) इंग्रजी राजवटीबद्दल दहशत व तिरस्कार** - बंडाचा मोड करीत असताना कंपनीच्या लष्करी अधिकाऱ्यांनी शिपायांना तर ठार केलेच, शिवाय हजारो निरपराधी स्त्री - पुरुषांचीही त्यांनी कत्तल केली, त्यातून वृध्द व बालकेही सुटली नाहीत. जवळजवळ एक लाख माणसांना फाशी देण्यात आली त्यांची प्रेते कित्येक दिवस झाडावर टांगून ठेवण्यात आली. ज्याला फाशी द्यावयाची त्याला इंग्रज प्रथम चोपून काढत, नंतर त्यांच्या शरीरावरील केस उपटत, जवळच कत्तल केलेल्या लोकांचे रक्त सांडलेले असे, ते रक्त त्यास जिभेने चाटावयास भाग पाडत व इतकी विटंबना केल्यावर मग त्यास फासावर लटकविले जाई. त्यांचे वागणे पशूप्रमाणे झाले होते. याचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर झाला. त्यांनी इंग्रजांबद्दल दहशत घेतली. हिंदी लोकांनी भविष्यात असे बंड करु नये, हे इंग्रजांचे उद्दिष्ट त्यांच्या क्रुर कृत्याने कदाचित साध्य झाले असेल, पण त्यांच्या हिंदूस्थानातील राजवटीला कलंक लागला. हिंदी लोकांच्या मनात तिरस्कार निर्माण झाला, १८५७ च्या कौर्याचे व्रण ते विसरले नाहीत. त्यांच्यातूनच पुढे इंग्रजी राजवट उलथून पाडू इच्छिणाऱ्या सशस्त्र क्रांतीकारकांच्या संघटनांचा जन्म झाला. या क्रांतीकारकांनी इंग्रजाबद्दल द्वेष, शत्रुत्व व स्वदेशाबद्दल प्रेम निर्माण करण्याचा मोठा प्रयत्न केला.

**६) उठावापासून हिंदी लोकांनी घेतलेला धडा :** या उठावापासून इंग्रजांनी जसे काही धडे घेतले तसे ते हिंदी लोकांनीही घेतले. सरंजामी पध्दतीचा उठाव करुन व पारंपारिक हत्यारांनी लढून आता इंग्रजी राज्य नष्ट करता येणार नाही याची त्यांना जाणीव झाली. नानासाहेब अथवा झाशीची राणी आपले नेतृत्व करु शकणार नाही. तो जमाना आता इतिहासजमा झाला. नवा जमाना सुरु झाला असून नव्या जमान्यात इंग्रज साम्रज्यवाद्यांशी लढण्याची नवी हत्यारे, नवी साधने आपण शोधून काढली पाहिजेत, याची जाणीव हिंदी विचारवंताना झाली. शस्त्राच्या बळाने इंग्रजांचे राज्य नष्ट करण्याच्या भरीला न पडता, त्यांची विद्या संपादन करुन आपण त्यांच्यासारखे होऊनच आपली प्रगती साधता येईल हा धडा हिंदी लोकांनी या उठावातून घेतला. आपण राजेशाही अथवा संरजामशाही यांच्या पुनरुज्जीवनासाठी

न धडपडता स्वातंत्र्य, लोकशाही व व्यक्तीस्वातंत्र्य या नव्या युगाच्या हक्कांसाठी संघर्ष केला पाहिजे. या नव्या जाणिवेतून पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली.

७) **हिंदू-मुसलमानांतील दरी वाढत गेली :** इतिहासात कधीही असे न दिसलेले ऐक्य हिंदू व मुसलमान या दोन धर्मात १८५७ च्या उठावाने घडवून आणले. या दोन्हीही जाती खांद्याला खांदा लावून लढल्या. पण हे ऐक्य पुढे टिकले नाही. पुढे असे ऐक्य होऊ नये म्हणून इंग्रजांनी प्रयत्न केलेले दिसून येतात. बंडामध्ये हिंदूपेक्षा मुसलमान अधिक त्वेषाने लढले होते. स्वाभाविकच इंग्रजांचा राग त्यांच्यावर अधिक होता. बंडाचा मोड करताना इंग्रजांनी त्यांच्यावर अधिक दहशत बसविली. इंग्रजांनी राज्यकारभारत मुसलमानांपेक्षा हिंदूना अधिक जवळ करण्यास सुरवात केली. परिणामी हिंदू व मुसलमान यांच्यातील मतभेदाची दरी रुंदावत गेली.

८) **हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण इंग्रज ठरवू लागले :** नव्या राजवटीने एक अत्यंत महत्त्वाचा बदल घडवून आणला. तो म्हणजे हिंदुस्थानचे परराष्ट्रीय धोरण, त्यांचे भवितव्य, इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणाशी जखडण्यात आले. इंग्लंडचा शत्रू तो हिंदूस्थानचाही शत्रू आहे असे राज्यकर्ते हिंदी लोकांना सांगू लागले. पुढे पहिल्या व दुसऱ्या महायुध्दात हिंदूस्थान इंग्लडच्या बाजूने युध्दात ओढला गेला.

९) **इंग्रजांची हिंदुस्थानवरील पकड घट्ट झाली :** उठावातील हिंदी लोकांच्या पाडावामुळे इंग्लंडची हिंदुस्थानवरील पकड घट्ट झाली. आता हिंदुस्थानात सशस्त्र उठाव झाला तरी तो मोडून टाकण्याची सर्व व्यवस्था इंग्रजांनी केली. शिवाय देशी संस्थानिकांशी उदार धोरण ठेवून त्यांना त्यांनी आपल्या पूर्ण नियंत्रणाखाली आणले. इंग्रजांना सशस्त्र विरोध करण्याचे सामर्थ्य कोणाही हिंदी राजाजवळ आता राहिले नव्हते व विरोध करावयाचे कारणही उरले नव्हते. हिंदी समाजाचे नेतृत्व सुशिक्षितांकडे जाऊ पहात होते व हे सुशिक्षित तर इंग्रज साम्राज्याशी एकनिष्ठ राहु इच्छिणारे व त्यांच्या न्यायबुध्दीवर विश्वास ठेवणारे होते. इंग्रज साम्राज्याला आता हिंदुस्थानात कोणताही मोठा धोका उरला नव्हता.

**१.७.१ आपली प्रगती तपासा :**

१८५७ च्या उठावाची परिणाम सांगा.

---

---

---

---

---

## १.८ सांराश

१८५७ चा राष्ट्रीय उठाव हा भारतीय राजकारणातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या उठावाचे परिणाम हे केवळ भारतीयांवरच नाही तर ब्रिटीशांवर सुध्दा झाले. त्यामुळे त्यांनीही आपल्या धोरणांमध्ये बदल केल्याचे दिसून येते. या उठावामध्ये जरी भारतीयांना उपयश आले असेल तरी या उठावापासून प्रेरणा घेऊन भारतीयांमध्ये राष्ट्रवादाची भावना जोपासली गेली आणि त्याचा परिणाम भारतीय राष्ट्रीय चळवळीच्या उभारणीत झाला व भारतीयांनीही लढाईच्या जोरावर ब्रिटीशांचे साम्राज्य नष्ट करता येणार नाही म्हणून राष्ट्रीयऐक्य चळवळीला सुरुवात केली त्याचाच एक भाग म्हणून सामाजिक प्रबोधनाला सुरुवात झाली. म्हणून १८५७ च्या उठावाचे महत्व भारतीय इतिहासामध्ये अनन्यसाधाराण आहे.

## १.९ प्रश्न

१) १८५७ च्या उठावाची विविध कारणमिमांसा करा.

२) १८५७ च्या उठावाचे नेमके स्वरुप काय होते ते स्पष्ट करा.

३) १८५७ च्या उठावाच्या परिणामाची चर्चा करा.

४) टीपा द्या.

अ) लॉर्ड डलहौसीचे खालसा धोरण.

ब) नानासाहेब पेशवा.

क) राणी लक्ष्मीबाई.

ड) काडतुस प्रकरण.

इ) राणीचा जाहीरनामा.

❖❖❖❖

# २

# भारतीय राष्ट्रवादाचा उदय - १
## सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ व आर्थिक राष्ट्रवाद

**प्रकरण रुपरेषा**

२.० उद्दिष्टये
२.१ प्रस्तावना
२.२ सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी : पार्श्वभूमी
२.३ ब्राम्हो समाज व राजा राममोहन रॉय
२.४ प्रार्थना समाज व न्या.रानडे
२.५ आर्य समाज व स्वामी दयांनद सरस्वती
२.६ रामकृष्ण मिशन व स्वामी विवेकानंद
२.७ थिऑसॉफीकल सोसायटी व डॉ. ॲनी बेझंट
२.८ इतर सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी
२.९ सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे परिणाम
२.१० आर्थिक राष्ट्रवाद
२.११ सारांश
२.१२ प्रश्न

## २.० उद्दीष्ट्ये :

१) भारतीय राष्ट्रवादाची जाणीव निर्माण करुन देणे.
२) विविध सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीची माहिती समजून घेणे.
३) सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे परिणाम समजून घेणे.
४) आर्थिक राष्ट्रवादाचे स्वरुप समजून घेणे.
५) दादाभाई नौरोजी व न्या.रानडे यांचे योगदान अभ्यासेणे.

## २.१ प्रस्तावना

एकोणीसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा आधुनिक भारताच्या इतिहासातील धार्मिक, सामाजिक व राजकीय पुनरुज्जीवनाचा उष:काल मानला जातो. ज्या विचारप्रवाहांनी सोळाव्या शतकात युरोपीय राष्ट्रांना प्रबोधनाची प्रेरणा दिली, ते आधुनिक विचार प्रवाह भारतात

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापासून वाहू लागले इ.स. १८५७ साली हिंदी लोकांनी उठाव करुन इंग्रजांची अन्यायी व अत्याचारी राजवट उलथून टाकण्याचा प्रयत्न केला हा प्रयत्न उत्तर हिंदुस्थानातील कांही प्रदेशांपुरता व कांही राजेरजवाडे, जीमनदार व शिपाई यांच्यापुरता मर्यादित असला आणि तो जरी उपयशी ठरला, तरी तो हिंदुस्थानच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. आपल्या स्वातंत्र्यासाठी जुने नेतृत्व व जुन्या प्रेरणा उपयोगी पडणार नाहीत याची खात्री हिंदी लोकांना झाली. पाश्चात्य शिक्षणाने सुजाण झालेला एक सुशिक्षित वर्ग समाजात उदयास आलेला होता. येथून पुढे याच वर्गाने आपल्या समाजाचे नेतृत्व केले व कालांतराने स्वातंत्र्याची चळवळ उभारली. हिंदुस्थानातील सर्व जाती-धर्माचे लोक या देशाचे नागरिक आहेत ही राष्ट्रवादाची भूमिका हळूहळू तयार झाली.

ब्रिटीशांचे भारतात आगमन झाले. त्यांनी भारतात व्यापाराबरोबरच राजकारण व धर्मकारण करुन ते हिंदुस्थानचे सत्ताधीश बनले. या बद्दलची भारतीय समाजाने दखल घेतली नाही. भारतीय समाज निद्रीस्त होता. बुध्दिस्वातंत्र्य पूर्णपणे लयाला जाऊन त्याची जागा परंपरावादाने घेतली होती. भारतीय समाज अज्ञान, अंधश्रध्दा, रुढी व परंपरांच्या जाळयात अडकलेला होता. शास्त्रीय दृष्टीकोनाचा अभाव होता. तर्कनिष्ठा नाहीशी होऊन परंपरेला चिकटून बसण्याची वृत्ती बळावली होती. समाजाचे सातत्य व अस्तित्व टिकविणारी धर्मतत्वे व नैतिक मूल्ये यांचा ऱ्हास होऊन समाज अधोगतीच्या दिशेने वाटचाल करीत होता. अवडंबर वाढले होते, कर्मकांड हाच खरा धर्म अशी भ्रामक समजूत करुन घेतल्याने विकासाचा मार्ग खुंटला होता. मूर्तीपुजा, अस्पृश्यता, बाल विवाह, जरठ-कुमारी विवाह, सतीप्रथा, भृणहत्या, इत्यादी समाज विघातक चालीरीती अस्तिवात होत्या. त्यामुळे समाज अभंग न राहता दुभंगलेला होता. जो समाज शेकडो वर्षे ब्रिटीश राजवटीच्याकाळात गुलामगीरीचे जिणे जगत होता तो समाज एकसंघ होणार कसा? विवेक, चिकित्सक वृत्ती, मानवता मागे पडून स्वार्थी कूपमंडूक वृत्ती वाढीस लागली होती. ज्ञानसंपादनाची लालसा लुप्त झाली होती. यामुळे समाजातील गतिशीलता, विकसनशीलता, सृजनशीलता नाहीशी होऊन समाज जीवनावर अज्ञानाची, गतिहीनतेची, हतबलपणाची छाया पसरली होती.

## २.२ सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी : पार्श्वभूमी

प्रबोधन ही एक सतत चालणारी प्रक्रिया असल्यामुळे अशी चळवळ फक्त भारतातच घडून आली असे नाही तर पंधराव्या व सोळाव्या शतकात प्रबोधनाची चळवळ युरोपखंडात सुरु झाली आणि संपूर्ण युरोपचा कायापलट घडून आला. युरोपप्रमाणेच १९ व्या शतकात कांही प्रमाणात भारतीय समाजाचे झाले. सुरुवातीला ही एक बौद्धिक चळवळ होती त्यातूनच पुढे अनेक सामाजिक व धार्मिक सुधारणा घडून आल्या. एवढेच नव्हे तर या चळवळीने राजकीय चळवळीला स्फूर्ती देण्याचे कार्य केले.

योगायोग असा की, अंध:कारात चाचपडणाऱ्या, कालबाह्य जीवन निष्टांना कवटाळून बसलेल्या भारतीय समाजाला पुरोगामी विचार व आक्रमक पश्चिमात्य संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या ब्रिटीश सत्तेशी सामना करावा लागला. यांचे संमिश्र परिणाम देशावर झाले. आधुनिक सामर्थ्यशाली शक्तीपुढे भारत हतबल ठरला आणि गुलामगिरीत अडकून पडला तर त्याच आधुनिक शक्तीच्या संपर्काने आधुनिकतेचे वारे देशात वाहू लागले. जगाच्या इतिहासातील प्रभावी राष्ट्रीय चळवळीचा अभ्यास केल्यास अशा चळवळी एकाएकी सुरु झाल्या नाहीत तर अशा चळवळींची बीजे त्या त्या राष्ट्राच्या जीवनात खोलवर रुजलेली आढळतात. इंग्रजांचे आगमन, त्यांचा साम्राज्यविस्तार, त्यांनी केलेल्या सुधारणा त्यांनी केलेले कायदे, त्यांचे व्यापारी धोरण, एकसंघ शासन, न्यायव्यवस्था, शिक्षण व्यवस्था, इंग्रजी भाषा, शांतता व सुव्यवस्था इ. अनेक घटकांचा प्रभाव चळवळीवर पडलेला दिसून येतो.

याच काळात विल्यम जोन्स, कोलब्रुक, मॅक्समुल्लर यासारख्या पाश्चात्य संशोधकांनी भारतीय संस्कृतीचा अभ्यास करुन ती जगातील श्रेष्ठ व प्राचीन संस्कृती असल्याचे दाखवून दिले. त्यामुळे भारतीयांच्या मनात संस्कृतीबद्दल आदर वाढला. पाश्चात्य विद्या, वाङ्‌मय, कला, विज्ञान, भाषा यांचा प्रादुर्भाव हिंदी समाजात होऊ लागल्याने हळूहळू अज्ञानी व अंधश्रध्दाळू समाज झोपेतून जागा होऊ लागला व त्यातूनच सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ आकार घेऊ लागली. पाश्चात्य शिक्षणाने प्रभावीत झालेल्या भारतीय तरुणांनीच खऱ्या अर्थाने सुधारणा चळवळीला सुरुवात केली.

## २.३ राजा राममोहन रॉय : (१७७४-१८३३)

राजा राममोहन रॉय यांचा जन्म इ.स. १७७४ मध्ये बंगालमध्ये झाला. बालपणापासून राजा राममोहन रॉय यांची मते क्रांतीकारक होती. वयाच्या १५ व्या वर्षी मुर्तिपूजेला धर्मात स्थान नाही असा एका पत्राद्वारे त्यांनी प्रचार केला. त्यामुळे त्यांना घरातून हाकलून देण्यात आले. ठिकठिकाणी प्रवास करुन अनुभव आणि विद्वता संपादन केली. त्यांना इंग्रजी, फ्रेंच, लॅटिन, संस्कृत, अरेबिक, पर्शियन इत्यादी भाषा अवगत होत्या. इतर धर्माचा तौलनिक अभ्यास करुन त्यांनी विश्वधर्माची कल्पना मांडली. इ.स. १८०५ मध्ये राजा राममोहन रॉय यांनी ईस्ट इंडिया कंपनीत नोकरी पत्करली. इ.स. १८१४ मध्ये ते नोकरीतून निवृत्त झाले आणि नंतरचा काळ लोकसेवेत व्यतीत केला. राजा राममोहन रॉयने धर्मसुधारणेकडे प्रामुख्याने लक्ष दिले. सामाजिक क्षेत्रात त्यांनी हिंदू धर्मातील सतीप्रथा,बहुपत्नीत्व, जातीप्रथा इत्यादिना विरोध केला. विधवापुन र्विवाहाचे समर्थन केले. अशा प्रकारे पूर्व आणि पश्चिम ह्यांच्या विचारात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्यांना आधुनिक भारताचे (जनक) आणि मार्गदर्शक मानले जाते.

**ब्राह्मोसमाज :**

धार्मिक प्रबोधनाच्या हेतूने प्रस्थापित झालेली भारतीय आद्य संस्था म्हणजे बंगाल ब्राह्मोसमाज ही होय चिकित्सक शास्त्रीय दृष्टीने हिंदू धर्मग्रंथांचा अभ्यास करुन अधंश्रध्देच्या

आहारी गेलेल्या भारतीयांना खऱ्या धर्मतत्वांची ओळख पटवून द्यावी ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी हिंदूधर्माविरुध्द चालविलेल्या खोडसाळ प्रचाराला बळी पडू नये म्हणून खरी धर्मतत्वे लोकांपर्यंत पोहचावी या दृष्टीने २० ऑगस्ट १८२८ साली राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. वेदप्रणित धर्म हाच खरा धर्म आहे ही या संस्थेची मूळ शिकवण निरंतर एकेश्वरवादाचा प्रचार, विश्वधर्माची ओढ आणि मूर्तिपूजेला विरोध ही त्यांची वैशिष्टे होती. ब्राह्मोसमाजाच्या संदर्भात वेदातील महत्त्वाच्या उताऱ्यांचे वाचन रॉय स्वतः करीत. समाजाच्या इमारतीत प्रतिमा, पुतळा, शिल्प, चित्र इत्यादींना स्थान नव्हते. तसेच ब्राह्मोसमाजात धर्मगुरु, यज्ञ इ. प्रकारांनाही स्थान नव्हते. चारित्र्य, सदगुण, नैतिकता, समन्वयावर भर दिला जात होता. राजा राममोहन रॉयचा नवीन धर्म स्थापन करण्याचा उद्देश नव्हता. त्यांना हिंदू धर्मातील दोष दूर करावयाचे होते. ब्राह्मोसमाजाच्या तत्वांनी शहरात राहणाऱ्या बुध्दिमान व सुशिक्षितांना मार्यादित स्वरुपात प्रभावित केले. ब्राह्मोसमाजाला विरोध करण्यासाठी कर्मठ हिंदूनी राधाकांत देव यांच्या नेतृत्वाखाली एक धर्मसभा बोलाविली. इ.स. १८३१ मध्ये राजा राममोहन रॉय हे मोगल बादशहातर्फे खास वकिली करण्याकरिता इंग्लडला गेले. २७ सप्टेंबर १८३३ मध्ये ब्रिस्टल या ठिकाणी त्यांचा मृत्यू झाला.

**ब्राह्मो समाजाचे कार्य :**

आपल्या मताचा प्रचार करण्याकरिता राजा राममोहन रॉय यांनी आत्मीय सभा स्थापना केली व नंतर तिचेच ब्राह्मो समाजात रुपांतर केले. हिंदू धर्मातील व समाजातील अनिष्ठ रुढी परंपरांना विरोध करुन स्त्रियांचा निकृष्ठ दर्जा, जातपात आणि धर्मभेद यांच्याविरुध्द राजा राममोहन रॉय यांनी बंडाचा झेंडा उभारला. विधवापुनर्विवाहाचा पुरस्कार केला. राजकीय क्षेत्रात राजा राम मोहन रॉय यांनी भारतीय लोक स्वशासनासाठी सर्वस्वी लायक आहेत म्हणून त्यांना संसदीय राज्यपध्दती प्राप्त झाली पाहिजे असे सांगितले. ते पुढील काळाचे भविष्यवेत्ते ठरले. कारण त्यांनी केलेल्या कार्यामुळेच पुढे भारतात भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. शिक्षण क्षेत्रातही राजा राममोहन रॉय यांनी भारतीयांना पाश्चात्य शिक्षण प्राप्त झाले पाहिजे असा आग्रह धरला. पाश्चात्य विज्ञान, वाङःमय आणि इंग्रजी भाषा यांच्या सहाय्यानेच भारताचा उध्दार होऊ शकेल अशी त्यांची श्रध्दा होती. इ.स. १८१७ मध्ये कलकत्त्याला त्यांनी हिंदू कॉलेज व इंग्रजी शिक्षण देणारे विद्यालय सुरु केले. १८२६ मध्ये कलकत्ता येथे वेदांत कॉलेज सुरु केले. राजा राममोहन रॉय यांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याचा मोठा पुरस्कार केला. बंगाली भाषेत ते स्वतः ‘संवादकौमुदी’ नावाचे वर्तमानपत्र चालवित होते. १८२३ च्या वृत्तपत्र कायद्याविरुध्द त्यांनी राजाकडे आणि सुप्रीम कोर्टाकडे धाव घेतली. त्यांच्या प्रयत्नामुळे इ.स. १८३५ मध्ये वृत्तपत्रांना स्वातंत्र्य प्राप्त झाले. सतीच्या चालीविरुध्द त्यांनी फार मोठी चळवळ केली. यामुळेच १८२९ मध्ये गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिकच्या सहाय्याने सतीबंदीचा कायदा पास केला. इंग्लंडला गेल्यानंतर हिंदुस्थानातील ब्रिटीश राज्ययंत्रणा सुधारण्याची त्यांनी चळवळ आरंभिली. भारतीय लष्करात जास्त भारतीयांची भरती करणे, ज्युरी पध्दती, मुलकी व फौजेदारी कायदा तयार करणे. न्यायाधीश आणि मॅजिस्ट्रेट ही दोन पदे वेगळी करणे, न्यायालयात पर्शियन भाषेऐवजी इंग्रजी भाषेची प्रतिष्ठापना करणे, नवीन कायदे करण्यापूर्वी भारतीय पुढाऱ्यांशी सल्लामसलत

करणे इत्यादी सुधारणांबाबत आपल्याला राजा राममोहन रॉय यांनाच श्रेय द्यावे लागेल. शेतकऱ्यांचा त्यांना अतिशय कळवळा होता. कायमधारा पध्दतीमुळे जमीनदार श्रीमंत झाले म्हणून शेतसारा कमी केला पाहिजे अशी चळवळ त्यांनी सुरु केली. ब्रिटीश सरकारने ज्यांचा राज्यकारभारात सल्ला घेतला असे राजा राममोहन रॉय हे पहिले भारतीय होते.

१८३३ मध्ये राजा राममोहन रॉयच्या मृत्यूनंतर ब्राह्मो समाजाचे कार्य द्वारकानाथ टागोर यांनी आर्थिक मदत देऊन सुरु केले. इ.स. १८३२ देवेंद्रनाथ टागोर यांनी प्रवेश करुन 'तत्वबोधिनी पत्रिका' नावाचे मासिक सुरु केले. 'तत्वबोधिनी सभा' स्थापनकरुन प्रचारक देशभर पाठविले. पण देवेंद्रनाथ पुराणमतवादी सामाजिक सुधारणांना विरोध करणारे असल्याने संस्थेतील तरुणांशी मतभेद झाले व केशवचंद्र सेन यांचा उदय झाला. १८५७ मध्ये केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजाची धुरा समर्थपणे सांभाळली. आक्रमक सामाजिक सुधारणा करण्यास सुरवात केली. सामाजिक सुधारणांच्या १४४ शाखा उघडल्या. विधवा पुनर्विवाहाचा व आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार करुन तसे विवाह घडवून आणले. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा मंजूर झाला. सेन यांच्या या सुधारणा पुराणमतवादी देवेंद्रनाथ टागोरांना आवडल्या नाहीत म्हणून दोघांत मतभेद होऊन केशवचंद्र सेन यांनी १८६६ मध्ये भारतीय ब्राह्मो समाजाची स्थापना केली तर टागोरांच्या संस्थेला आदी ब्राह्मो समाज असे नाव पडले. केशवचंद्र सेन यांच्या प्रयत्नाने १८७२ मध्ये सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास होऊन वधू-वराचे विवाहाचे वय अनुक्रमे १४ व १८ वर्षे ठरविण्यात आले. पण पुढील काळात सेन आपल्या सुधारणांबाबत मवाळवादी बनल्याने अनुयायांशी मतभेद झाले. त्यातच १८७८ मध्ये आपल्या १३ वर्षे वयाच्या मुलीचा विवाह १६ वर्षाच्या कुचबिहारच्या महाराजांशी लावल्यामुळे केशवचंद्राबाबत लोकमत बिघडून गेले. असंतुष्टांचे पुढारी श्री शिवनाथशास्त्री व आनंदमोहनबोस यांनी ब्राह्मोसमाजातून बाहेर पडून साधारण ब्राह्मोसमाजाची स्थापना केली व सामाजिक कार्य चालू ठेवले म्हणूनच सामाजिक व धार्मिक सुधारणांमध्ये ब्राह्मोसमाजाची कामगिरी महत्त्वाची मानली जाते.

### २.३.१ आपली प्रगती तपासा :

१. सामाजिक व धार्मिक चळवळीतील राजा राममोहन रॉयच्या भूमिकेचे थोडक्यात वर्णन करा.

## २.४ प्रार्थना समाज

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाचे कार्य करणारी महत्त्वाची संस्था म्हणजे प्रार्थना समाज होय. इ.स. १८६७ साली मुंबईत या संस्थेची स्थापना झाली. डॉ. भांडारकर, न्या रानडे, डॉ. आत्माराम पांडुरंग ही मंडळी तिच्या संस्थापनात आघाडीला होती. एका ईश्वराची डोळस भक्ती व सामाजिक सुधारणा ही दोन ध्येये प्रार्थना समाजाने आपल्यासमोर ठेवलेली होती. प्रार्थना समाजाने विश्वासापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर जास्त भर दिला. मानवसेवा हीच खरी ईश्वराची सेवा असे प्रार्थना समाजाचे मत होते. कर्मठ हिंदूशी संघर्ष न करता त्यांना शिक्षणाद्वारे समजूत घालण्याचा मार्ग स्विकारला शब्दप्रामाण्य व भटभिक्षुकांचे स्तोम त्यांना मान्य नव्हते.

महाराष्ट्रात प्रार्थना समाजाच्या लोकांनी आपण कांही नवीन धर्माची स्थापना करीत आहोत, असा कोणताही अंहकार बाळगला नाही. उलट ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम आणि रामदास यांची शिकवण आम्ही महाराष्ट्रात देत आहोत अशी या व्यक्तींची श्रध्दा होती. स्त्रियांच्या शिक्षणसंस्था, कामगाराकरिता रात्रीच्या शाळा, पंढरपूरला अनाथालय, हरिजनाकरिता मदत देणारी संस्था इ संस्था स्थापन केल्या. शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठी डेक्कन एज्यूकेशन सोसायटीची स्थापना करण्यात न्या रानडे यांनी पुढाकार घेतला. केशवचंद्र सेन प्रमाणेच या मंडळीनींही केवळ धर्मसुधारणेवर भर न देता सामाजिक सुधारणांचे कार्य हाती घेतले. विधवा विवाह, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्याचे, संकटग्रस्त विधवांना मदत करण्याचे कार्यही प्रार्थना समाजाने केले. समाजसुधारणेच्या बाबतीत प्रार्थना समाजाने आपल्या समोर चार उद्दिष्टे ठेवलेली होती. जातीयपध्दतीचा विरोध, विधवा विवाह, स्त्रीशिक्षण, स्त्री व पुरुषांचे विवाहाचे वय वाढविणे. ही सर्व उद्दिष्ट्ये प्रार्थना समाजाने जिद्दीने पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. प्रार्थना समाजाला न्यायमूर्ती म.गो. रानडे (१८४२-१९०१), एन्.जी. चंदावरकर (१८५५-१९२३), आर.जी. भांडारकर, (१८३७-१९२५) या सारख्या थोर पुढाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले. प्रार्थना समाजाच्या नेतृत्वाखाली फार मोठ्या समाज सुधारणा घडून आल्या.

## २.५ आर्य समाज

बंगालमध्ये व महाराष्ट्रात चालू असलेल्या धार्मिक व सामाजिक जागरण कार्याच्या धर्तीवर उत्तर भारतात या कार्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे श्रेय स्वामी दयानंद सरस्वती यांना दिले जाते. त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाची पोळेमुळे पंजाब, राजपुताना, गुजरात, संयुक्त प्रांत येथे खोलवर रुजली.

आर्य समाजाचे संस्थापक मूळशंकर यांचा जन्म १८२४ मध्ये गुजरातमधील मोरवी संस्थानात झाला. पित्याने त्यांना वेदवाङ्‌मय, न्याय, दर्शन इत्यादीचे शिक्षण दिले. लौकिक

जीवनात रममाण न होता वयाच्या पंधराव्या वर्षीच वेदांचा अर्थ समजून घेतला आणि सरस्वती संप्रदायाकडून संन्यासाची दीक्षा घेतली. खऱ्या गुरुच्या शोधात भटकू लागले. त्यांनी वेदांचे व इतर हिंदू धर्मग्रंथाचे अध्ययन केले.केवळ आत्मोन्नतीसाठी एकाकी न राहता खऱ्या धर्म प्रसारासाठी व समाजोन्नतीसाठी त्यांनी प्रारंभ केला. मूळ शंकर आता स्वामी दयानंद सरस्वती या नावाने ओळखले जाऊ लागले. सुरुवातीला ब्राह्मोसमाजाच्या सहकार्याने त्यांनी धर्मसुधारणेचे कार्य केले व त्यानंतर इ.स. १८७५ साली मुंबई येथे आर्यसमाजाची स्थापना केली. 'वेदांकडे परत चला' ही दयानंदाची घोषणा होती. हिंदू धर्मात शिरलेल्या दुष्ट, प्रथा, खोट्या अंधश्रध्दा दूर करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. १८७७ मध्ये लाहोर येथे आर्य समाजाची दुसरी शाखा उघडली. धार्मिक, सामाजिक व राष्ट्रीय ऐक्य असलेला भारत त्यांच्या डोळयासमोर होता.

धार्मिक बाबतीत अवडंबर माजविणाऱ्या मूर्तीपूजा, बहुदेववाद, पशूबळी, श्राध्दकर्म अवतारकल्पना, यंत्र तंत्र मंत्र इ. गोष्टी त्यांना मान्य नव्हत्या वेद आणि उपनिषदांवर त्यांची श्रध्दा होती. वेद हे ईश्वरी ज्ञान असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. इतर साहित्याला विशेषतः पुराणांना स्वामी दयानंद काल्पनिक कथा मानीत. ते संस्कृतचे प्रकांड पंडीत होते. जागोजागी जाऊन कर्मठांशी वादविवाद करुन अनिष्ठ प्रथांना वेदामध्ये कोणताही आधार नाही हे सिध्द केले. जग म्हणजे माया होय. आत्मा ईश्वराचा अंश आहे. जीवनमुक्ती हेच जीवनाचे उद्दिष्ठ या तत्वज्ञानाला दयानंदानी विरोध केला. त्यांच्या मते, प्रकृती, आत्मा आणि ईश्वर अनादि व अनंत आहेत. प्रत्येकाने मानव धर्माचे आचरण करुन मोक्ष मिळवावा अशाप्रकारे दयानंदानी नियती ऐवजी कर्मावर भर दिला. नियतीच्या हातचे बाहुले न बनता कर्माद्वारे मानव स्वतःचे भाग्य घडवू शकतो असे त्यांचे सांगणे होते. हिंदूंमध्ये ब्राह्मण पुरोहितांना सर्वश्रेष्ठ स्थान देण्याच्या कल्पनेला दयानंदानी आव्हान दिले. ईश्वर आणि इतर मानव यांच्या मधील दुवा या कल्पनेलाही हास्यास्पद ठरविले. प्रत्येक व्यक्तीला वेद अध्ययनाचा व आपल्या श्रध्देनुसार जगण्याचा अधिकार आहे असे ते सांगत. समाजातील जातीपध्दती, अस्पृश्यता, बालविवाह अशा वाईट चालीरीतींवर जोरदार प्रहार केले. बालविवाह, पडदा पध्दती, बहुपत्नीत्व, कायम वैधव्य, विधवांना हीन मानणे, देवदासी प्रथा अशा सामाजिक दुष्टप्रवृत्तीवर कठोर प्रहार केले. वर्णव्यवस्थेचा आधार जन्म नसून कर्म आहे त्यामुळे सर्व वर्ण समान आहेत असे त्यांचे मत होते. दयानंदाच्या उपदेशाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी पाश्चात्य तत्त्वज्ञान, शिक्षण व समाजाकडून कांहीच उचलले नाही. त्यांचे प्रतिपादन एवढेच की, वेद आणि उपनिषदांपेक्षा श्रेष्ठ कांहीच नाही आणि ज्या प्रथा कर्मकांड, सामाजिक दुष्प्रवृत्ती वेदांना मान्य नाहीत त्या सर्व चूकीच्या आहेत.

दयानंदांनी इतर धर्मप्रचारकांच्या धर्मातील दोष दाखवून दिले व जागोजागी वादविवाद,चर्चा करुन इतर धर्माच्या प्रचारकांना व कर्मठांना पराभूत केले. त्यांचा परिणाम हिंदू धर्माच्या अनुयायांमध्ये आत्मविश्वासाची, आत्मपरीक्षणाची व आत्मशुध्दीची भावना जागृत झाली. आर्य समाजाच्या कार्याचा सर्वात जास्त प्रभाव शिक्षण, सामाजिक सुधारणा क्षेत्रात पडलेला आढळतो. आर्य समाजाच्या सामाजिक विचारामध्ये इतर गोष्टीबरोबरच ईश्वराचे व्यापकत्व, बंधूभाव, स्त्रीपुरुष समानता,न्याय, प्रेम, व दानाची भावना यावरही भर दिलेला होता. राष्ट्रीय

शिक्षणाचे महत्त्व ओळखून या समाजाने अनेक शाळा व महाविद्यालये सुरु केली. दयानंद ॲग्लो वैदिक संस्थेची स्थापना करुन शिक्षणाचा प्रसार केला. लाला हंसराज यांनी दयानंद ॲग्लो वैदिक कॉलेज स्थापन केले. दयानंदाचे शिष्य रुढीवादी किंवा प्रतिगामी नव्हते. त्यांनी इंग्रजी भाषा व ज्ञान आत्मसात केले. पाश्चात्य व पौर्वात्य ज्ञानाचा समन्वय आर्य सामाजाच्या अनुयांयामध्ये झालेला होता. १८९२ च्या सुमारास आर्य समाजाचे विभाजन झाले. हिंदू धर्मातून इतर धर्मात गेलेल्यांना पुनः हिंदूधर्मात आणण्याकरिता आर्य समाजाने शुध्दी आंदोलन सुरु केले व आपल्या मूळ हिंदूधर्मात परतण्याची संधी दिली. स्वामी दयानंदांच्या आर्थिक विचारांमध्ये स्वदेशीला अत्यंत महत्त्व होते. त्यामुळेच आर्य समाज राष्ट्रवादी आंदोलनात अग्रेसर होते. आर्य समाजाच्या मुख्य कार्यकर्त्यांमध्ये लाला हंसराज, पं.गुरुदत्त, लाला लजपतराय, स्वामी श्रध्दानंद यांच्या सारखे मान्यवर होते. आर्य समाजाचा प्रचार प्रामुख्याने पंजाब, उत्तरप्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान व बिहार येथे झाला. भारताच्या इतिहासात हिंदूधर्म व समाजात इतके मुलभूत चिंतन व कार्य करणारा, दूरदृष्टी ठेवणारा, व्यापक भूमिका बाळगणारा आणि प्रभावशाली सुधारक आजपर्यंत झालेला नाही. भगिनी निवेदितांनी आर्य समाजाचे वर्णन 'लढाऊ हिंदू धर्म' या शब्दात केले आहे. इ.स. १८८३ रोजी त्याचे निधन झाले.

### २.५.१ आपली प्रगती तपासा :

१. आर्यसमाजावर थोडक्यात टिप लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.६ रामकृष्ण मिशन

बाह्मो समाजाच्या तत्त्वांनी बंगालमधील बुध्दिवंतांना प्रभावित केले पण सर्व सामान्यांना ईश्वराची भक्ती करण्यात मानसिक समाधान मिळत होते. वाढत्या पश्चिमात्यीकरणात व आधुनिकीकरणाच्या वातावरणात रामकृष्ण मिशनने दिलेली शिकवण प्राचीन व परंपरागत कल्पनांवर आधारित होती. रामकृष्ण मिशनची स्थापना स्वामी विवेकानंदानी १८९७ मध्ये केली.

### अ) रामकृष्ण परमहंस (१८३४-१८८६)

बंगालमध्ये होऊन गेलेल्या सत्पुरुषांपैकी रामकृष्ण परमहंस हे एक होते. त्यांचे मूळ नाव गदाधर चटोपाध्याय होते. शिक्षण बेताचेच पण बालपणापासून ईश्वरभक्तीचे वेड होते. इ.स.

१८५५ मध्ये कलकत्याजवळ दक्षिणेश्वर काली मंदिराचे पुजारी बनले. इ.स. १८६४ मध्ये तोतापुरी या संन्याशाकडून संन्यास दिक्षा व वेदांताची साधना घेतली. त्यांचे मत होते की कृष्ण, हरी, राम, रहिम, ख्रिस्त, अल्ला ही एकाच देवाची भिन्न नावे आहेत. केवळ हिंदू धर्मग्रंथाचाच नाही तर इतर धर्मांचाही त्यांचा अभ्यास होता. त्यांची गाढ अध्यात्मनिष्ठा आणि गुढवाद यांमुळे अनेक जिज्ञासू बंगाली लोकांचीच नव्हे तर मॅक्स मुलर सारख्या पाश्चात्य पंडितांची मनेही त्यांनी प्रभावित केली होती. आत्मिक उन्नतीसाठी त्या सर्वशक्तीमान ईश्वराची मूर्तीरुपात पूजा करण्याचे ते समर्थन करीत.मात्र कर्मकांडाऐवजी पूजे मागील श्रध्देला महत्त्व देत. नि:स्वार्थ भावनेने ईश्वराची पूजा करावी असे रामकृष्णांचे म्हणणे होत. ऐकणाऱ्यांच्या मनावर त्यांच्या विचारांची छाप पडत असे आणि ते लोक रामकृष्णाचे शिष्य बनत होते. रामकृष्णांनी कोणताही संप्रदाय किवा मठ स्थापन केले नाहीत. ज्ञानापेक्षा चारित्र्य निर्मितीवर त्यांचा अधिक विश्वास होता. निवडक शिष्यांनाच संन्यास धर्माचे ज्ञान दिले त्यापैकी स्वामी विवेकानंद एक होते.

### ब) स्वामी विवेकानंद (१८६३-१९०२)

गुरु रामकृष्ण परमहंसाच्या नव्या हिंदू धर्माचे प्रचारकार्य नरेंद्र दत्त उर्फ स्वामी विवेकानंद यांनी आपल्या शिरावर घेतले. नरेंद्राचा जन्म इ.स. १८६३ मध्ये कलकत्यातील एका श्रीमंत कुटुंबात झाला १८८४ साली ते पदवीधर झाले. इ.स. १८८१ मध्ये रामकृष्ण परमहंस यांच्याशी संबंध आला. बुध्दिप्रमाण्य व अनुभवप्रामाण्य मानणाऱ्या नरेंद्राचे पाश्चात्य तत्वज्ञानाच्या अध्ययनाने आत्मिक समाधान होत नव्हते. या शोधात ते रामकृष्णांकडे वळले. त्यांच्या सहवासात धर्म मानवी जीवनाचे बाहयांग नसून, उपचार नसून, ती अमृता साक्षात्काराची बाब आहे आणि असा साक्षात्कार भिन्न साधना मार्गानी होऊ शकतो. तसेचजगात प्रचलित असलेले भिन्नधर्म हे एकाच मूळ धर्माची वेगवेगळी रुपे आहेत, अध्दैत तत्वज्ञान हेच मूळ वक्र आहे ही त्यांची निष्ठा बनली. त्यांनी शिक्षण व लौकिक जीवनाचा त्याग करुन संन्यास व साधनेचा मार्ग पत्कारला. रामकृष्णांचा अध्यात्मिक संदेश प्रस्तूत करण्याच्या उद्देशाने इ.स. १८८७ रोजी कलकत्याच्या वराहनगर भागातील एका पडक्या घरात विवेकांनदानी रामकृष्ण मठाची सापना केली.

स्वामी विवेकानंदांनी जातीप्रथा आणि अस्पृश्यतेवर जोरदार प्रहार केले. हिंदू धर्मातील भोगवादी व चंगळवादी प्रवृत्तीबद्दल नाराजी व्यक्त केली. श्रीमंताकडून गरिबांच्या होत असलेल्या पिळवणूकीबाबत हिंदू धर्माने मौन राखणे याबाबतही खेद व्यक्त केला. उपाशीमाणसाला धर्माचे ज्ञान शिकविणे हा देवाचा व मानवतेचा अपमान आहे असे त्यांचे प्रतिपादन होते. एकदा विवेकानंद म्हणाले, मी त्याला महात्मा समजेन ज्यांचे हृदय गरिबांसाठी आहेत. जोपर्यंत लक्षावधी लोक अज्ञान व उपाशी अवस्थेत जीवन जगत आहेत तोपर्यंत त्यांच्या जीवावर विद्या व ज्ञान प्राप्त केलेल्या आणि त्यांच्याकडे अजिबात लक्ष न देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मी देशद्रोही समजेन. मानवसेवा हीचखरी ईश्वरसेवा समजून विवेकानंदानी हिंदूधर्माला एक नवा सामाजिक आशय प्राप्त करुन दिला. राजकीय दृष्टीने विवेकांनदानी कोणताही संदेश दिला नाही. मात्र आपल्या लेखां मधून व भाषणांद्वारा त्यांनी नव्या पिढीत आपल्या भूतकाळाबाबत आत्मसन्मानाची भावना निर्माण केली. भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाबत एक नवीन विश्वास निर्माण केला. भावी भारत

बाबत एक नवा आत्मविश्वास उत्पन्न केला. १८९३ मध्ये शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत भाग घेऊन हिंदूधर्म व संस्कृतीचे महत्त्व जगाला पटवून दिले. युरोपात अनेक शिष्य मिळाले. अमेरिकेत वेदांत सोसायटी स्थापन केली.

स्वामी विवेकानंदानी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनने समाजसुधारणा व समाजसेवेचेही व्रत घेतले. अनेक सेवाभावी संस्था स्थापन केल्या. अनेक बालिकाश्रम, धर्मार्थ औषधालय, दवाखाने, विद्यालये या क्षेत्रात काम करतानाच राष्ट्रीय आपत्तीच्या काळात उदा. दुष्काळ, भूकंप, पूर, रोगराई, मिशनच्या कार्यकत्यांनी बहूमोल कार्य केले. स्वाभिमान, राष्ट्रीय भावना व सेवाभावी वृत्ती ही तत्वे या संस्थेत जोपासली जातात. भारतात जवळ जवळ ९० व पाश्चात्य देशात ३० पेक्षा अधिक शाखा कार्यरत आहेत. रामकृष्ण मिशनची १३ सुसज्ज रुग्णालये, १०० हून अधिक छोटी रुग्णालये, १०० वसतिगृहातून १० हजार मुले व १ हजारावर मुलींची सोय आहे. १९५४ साली स्त्रियांसाठी स्वतंत्र संन्यासिनीचा शारदा मठ स्थापन केला. विवेकानंदानी १९०२ मध्ये समाधी घेतली. त्यानंतर संघाचे कार्य ब्रह्मानंद, शिवानंद, अखंडनंद यांनी केले व आजतागायत हे अखंडपणे चालू आहे.

**२.६.१ आपली प्रगती तपासा :**

१. रामकृष्ण मिशन व स्वामी विविकानंदने केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घ्या.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## २.७ थिऑसॉफिकल सोसायटी व डॉ. ॲनी बेझंट

भारतीय संस्कृती आणि विचारसरणी यांचा प्रभाव पडलेल्या पाश्चात्य विदवानांनी थिऑसॉफिकल सोसायटी सुरु केली. इ.स. १८७५ मध्ये एच.पी.ब्लाव्हाटस्की या जर्मन-रशियन वंशाच्या महिलेने अमेरिकेत स्थापना केली. त्यानंतर कर्नल एम्.एस्. ऑलकॉट त्यात सहभागी झाले. त्यांनी १८८२ मध्ये थिऑसफिकल सोसायटीची शाखा भारतात मद्रासजवळील अडयार येथे उघडली. आध्यात्मिक उन्नती व अंतर्ज्ञानाद्वारे ईश्वरी ज्ञान प्राप्त करणे सोसायटीच्या अनुयायांचे उद्दिष्ट होते. कर्मवाद आणि पुर्नजन्म यावर त्यांचा विश्वास होता. उपनिषद व दर्शनातून ते प्रेरणा घेत. आध्यात्मिक बंधुभाव निर्माण करणे हे ध्येय होते.भारतात सोसायटीला जे यश प्राप्त झाले ते मिसेस ॲनी बेझंटमुळे झाले. इ.स. १८८९ मध्ये त्यांनी सोसायटीचे सदस्यत्व स्किारले. इ.स. १८९३ मध्ये त्या हिंदुस्थानात आल्या सोसायटीचे कार्य हिंदूंच्या पुनरुत्थानाचा एक भाग बनले. इ.स. १९०७ मध्ये कर्नल ऑलकॉटच्या निधनानंतर

सोसायटीचे अध्यक्षपद ॲनी बेझंट (१८४७-१९३३) यांचेकडे आले प्रारंभापासूनच ॲनी बेझंटचा ख्रिश्चन धर्मावर विश्वास नव्हता. अखेर ख्रिश्चन धर्मप्रचारक असलेल्या पतीशी घटस्फोट घेऊन सोसायटीच्या कार्याला वाहून घेतले. त्यांचा भारतीय विचार आणि संस्कृतीशी निकट संबंध होता. हिंदुस्थानातील प्राचीन धर्माचा उध्दार करणे आणि भारतीय जीवनात आत्मविश्वास निर्माण करणे हे ध्येय बेझंटनी आपल्यासमोर ठेवलेले होते. भगवतगीतेच्या त्यांनी केलेल्या अनुवादावरुन त्यांचा वेदांतावर विश्वास होता हे दिसून येते. मॅडम ब्लाव्हाटस्की आध्यात्मकतेपेक्षा अलौकिकवादावर जास्त भर देत. ॲनी बेझंटला प्रकृती आणि मन जोडणारा दुवा मिळाला. त्या विचार, पोशाख, भोजन, चालिरीती यादृष्टीने हिंदू बनल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली थिऑसॉफिकल सोसायटी भारतात हिंदूच्या पुनर्जागरणाची एक चळवळ बनली. भारतीयांच्या मनात आत्मविश्वास व राष्ट्रवादाची भावना निर्माण केली. १८९८ मध्ये त्यांनी बनारस येथे सेंट्रल हिंदू कॉलेज सुरु केले. तेथे हिंदू धर्म व पाश्चात्य विज्ञान शिकविले जाई. पुढे १९१६ मध्ये त्याचेच रुपांतर बनारस हिंदू विश्वविद्यालयात झाले. आयर्लंडमधील होमरुल लिग प्रमाणे त्यांनी भारतात होमरुल लीग चळवळ सुरु केली. लोकमान्य टिळकांनी होमरुल लीग आंदोलनात सक्रिय भाग घेतला. शिवाय या सोसायटीने प्राचीन व दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखिते यांच्या संग्रहाच्या प्रकाशनाचे फार मोलाचे काम केले. बेझंट राष्ट्रीय चळवळीकडे वळल्यामुळे या सोसायटीचे कार्य थंडावले पण त्यांनी केलेले राजकीय, सामाजिक आणि धार्मिक कार्य खरोखरच कौतुकास्पद होते.

## सत्यशोधक समाज

सत्यशोधक समाजाचे संस्थापक महात्मा ज्योतीराव फुले यांचा जन्म पुणे येथे इ.स. १८२७ मध्ये झाला. वयाच्या सातव्या वर्षापासून शिक्षणाला प्रारंभ झाला पण पुढे कांही कारणाने खंड पडला. १३ व्या वर्षी सावित्रीबाईशी विवाह झाल्यावर पुन्हा स्कॉटिश मिशनरी शाळेत शिक्षणाला सुरुवात केली. ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाचा व थॉमस पेनच्या राईट्स ऑफ मेन या ग्रंथाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर समाजाच्या उन्नतीचे कार्य संघटितरीत्या करण्याच्या हेतूने १८७३ साली ज्योतीबांनी पुण्यात सत्यशोधक समाजाची पायाभरणी केली. भारतीय समाजातील दलित व दुर्लक्षित गटाच्या उन्नतीचे कार्य १८५१ पासूनच सुरु केले होते. हिंदू समाजात अस्पृश्य, शुद्र मानले गेलेले, ब्राह्मणेत्तर वर्ग, स्त्रिया, शेतकरी हे ज्योतिबांच्या दृष्टीने दलित वर्ग होते कारण हिंदू समाजाने शतकानुशतके या वर्गाची उपेक्षा केली होती. त्यांच्या मते हिंदू समाज भिन्न गटात विभागला जाण्यास आणि समाजात आर्थिक व सामाजिक विषमता निर्माण होण्यास ब्राह्मणी धर्म कारणीभूत होता. या ब्राह्मणी धर्माचे मूळ त्यांच्या मते श्रुती, स्मृति, पुराणे या हिंदूच्या धर्मग्रंथात होते आणि म्हणून धर्माच्या नावावर कर्मकांडाचे स्तोम माजवून समाजाची दिशाभूल आणि पिळवणूक करणाऱ्या कर्मठ धर्ममार्तंडांवर, भटभिक्षुकांवर, पुरोहितांवर त्यांनी कडाडून हल्ला चढविला. भारतीय समाजाची खरी उन्नती व्हावयाची असेल तर या बहुसंख्य वर्गाची व स्त्रियांची मानसिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करुन त्यांच्या विकासाचा मार्ग खुला करुन दिला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. हेच कार्य करण्याच्या हेतूने सत्यशोधक समाजाची त्यांनी स्थापना केली.याच

समाजाच्या माध्यामातून त्यांनी जुन्या चालीरीतीवर हल्ला केला. स्त्रियांसाठी व मुलींसाठी शाळा काढल्या.

महात्मा फुल्यांनी मुलींसाठी १८४८ मध्ये पहिली शाळा काढली व शतकानुशतके जी शिक्षणाची दारे त्यांच्यासाठी बंद होती ती त्यांनी खुली केली. त्यांच्या या कार्यात त्यांना सावित्रीबाई फुले यांनी मदत केली व शाळेतील मुंलींना शिकवण्याची जबाबदारी स्विकारली. पुढे महात्मा फुल्यांनी अस्पृश्यासाठी शाळा काढली.

ज्योतिबांनी सामाजिक विषमतेवर जबरदस्त आघात केले. वेद हे अपौरुषेय नाहीत. धर्माच्या आधारे करण्यात आलेली ही जातीव्यवस्थेची चौकट ब्राह्मणांचे वर्चस्व समाजात कायम ठेवण्याच्या दृष्टीने निर्माण केलेली आहे. मनुस्मृतीने शूद्रांना गुलाम बनविले आहे. ही गुलामगिरीची बंधने तोडून टाकण्यासाठी त्या वर्गाला जागृत करणे, खेडोपाडी जाऊन प्रचार करणे, त्यांना शिक्षित करणे, त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देणे यासाठी आवश्यक असलेले व्यासपीठ ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेने निर्माण केले. दलितांच्या मुलांसाठी व स्त्रियांसाठी शिक्षणसंस्था काढल्या. विधवा विवाहाला प्राधान्य दिले, बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. सार्वजनिक जागा महारमांगाना खुल्या व्हाव्यात, शासनात कनिष्ठ वर्गाला जागा मिळाव्यात अशी मागणी केली. दलित वर्गावर पसरलेले दैववादाचे, निराशेचे धुके दूर करुन त्याला आत्मोध्दाराचा मार्ग दाखविणारा, त्याच वर्गातून पुढे आलेला समाजसुधारक म्हणून ज्योतिबांचे स्थान अनन्यसाधारण आहे. बहुजन समाजात जागृती घडवून आणण्याचे श्रेय सत्यशोधक समाजाला दयावे लागेल. त्यांचा लढा ब्राह्मणांविरुध्द नसून ब्राम्हणवाद तसेच तो धार्मिक, आर्थिक व सामाजिक गुलामगिरी विरुध्दही होता. ज्योतिबा फुले हे एकेश्वरवादी होते. मूर्तीपूजा व अवतारकल्पना त्यांना मान्य नव्हत्या. समतेवर आधारलेल्या मानवधर्माचा सत्यशोधक समाजाने पुरस्कार केला. ज्योतिबांचे कार्य सत्यशोधक समाजाने पुढे चालविले खरे, परंतु कालांतराने त्या समाजाच्या प्रचार कार्यात एकांगीपणा येत गेला व त्यामुळे महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीत फुट पडू लागली आणि त्याचे भांडवल करुन भेदनिती कुशल इंग्रजांनी हिंदू समाज विघटित करण्याचा प्रयत्न केला. ज्योतिबांनी केलेल्या कार्याचे महत्त्व लक्षात घेऊन महात्मा गांधीनी त्यांना 'महात्म्यांचा महात्मा' ही पदवी दिली. इ.स. १८९० मध्ये या थोर समाजक्रातीकारकांचे निधन झाले.

### २.७.१ आपली प्रगती तपासा :

१. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील सत्याशोधक समाजाच्या कार्याचे वर्णन करा.

## २.८ सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी

### १. मुसलमानामधील सुधारणा चळवळी

### अ) वहाबी आंदोलन

पाश्चात्य प्रभावाविरुध्द मुसलमानांची झालेली सर्वप्रथम प्रतिक्रिया वहाबी आदोलन किंवा वलीउल्हाह आंदोलन या नावाने ओळखली जाते. खरे तर हे पुनर्जागरणाचे आंदोलन होते. शाह वलीउल्हाह (१७०२-१७६२) हे १८ व्या शतकातील मुसलमानांचे नेते होते. ज्यांनी भारतीय मुसलमानांच्या वर्तनाबद्दल चिंता व्यक्त केली. मुसलमानांमध्ये असलेल्या दृष्ठ प्रथाकडे, चालीरितीकडे त्यांनी लक्ष वेधले. मुसलमान समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी भरीव कार्य केले ते दोन प्रकारचे होते. (१) ज्यामुळे भारतीय मुसलमान आपसात विभाजित झाले त्या इस्लाम धर्मातील ४ कायदाप्रणालीत परस्पर सामंजस्य निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. (२) धार्मिक बाबतीत वैयक्तिक अंत:प्रेरणेवर भर द्यावा असे सांगितले. जेथे कुराण व हदीसच्या शब्दांची परस्परविरोधी व्याख्या केली जाते तेव्हा व्यक्तींने आपल्या विवेकानुसार व अंत:प्रेरणेनुसार निर्णय घ्यावा असे त्यांचे प्रतिपादन होते.

शाह वलीउल्लाहांचे हे विचार प्राथमिक अवस्थेत सुधारणावादी होते. वलीउल्लाहच्या विचारांना मौलवी अब्दूल अजीज व बरेलीच सर सय्यद अहमद खान (१७८६-१८३१) यांनी पाठिंबा दिला. मौलवी अब्दूल अजीजने फतवा जारी करुन भारतासारख्या काफिरांच्या देशाला इस्लाम देश बनविण्याची आवश्यकता असल्याचे जाहीर केले. सुरुवातीला हे आंदोलन पंजाबमध्ये शीख शासन विरुध्द होते पण १८४९ मध्ये पंजाब इंग्रज साम्राज्यात विलीन झाल्यावर आंदोलनाने इंग्रजांविरोधी वळण घेतले. हे आंदोलन १८७० पर्यंत चालू होते व अखेर लष्करी बळावर त्याचे दमन केले गेले.

### ब) सर सय्यद अहमद खान व अलिगढ मुस्लिम चळवळ :-

१८५७ च्या उठावानंतर मुस्लीम समाजात धार्मिक व सामाजिक सुधारणांचे विचार रुजवण्यास सुरुवात झाली. एकोणिसाव्या शतकातील मुलमान सुधारकांमध्ये सर सय्यद अहमद खान यांचे नाव महत्त्वाचे आहे. दिल्लीतील एका मुस्लिम कुटुंबात इ.स. १८२७ मध्ये त्यांचा जन्म झाला. वयाच्या २० च्या वर्षी ते इंग्रजांच्या नोकरीत दाखल झाले. १८५७ च्या उठावाच्या वेळी इंग्रजांना मदत केल्यामुळे त्यांनी इंग्रजांची मर्जी संपादन केली. त्यांनी मुसलमानांना आधुनिक दृष्टिकोन देण्याचे प्रयत्न केले. इंग्रजी राज्य ही वस्तुस्थिती आहे आणि ती मान्य करुन मुसलमानांनी त्यांची नोकरी करावी असे त्यांचे मत होते. कुराणावर श्रध्दा असल्याने त्यांनी बुध्दिवाद व विज्ञानाच्या आधारे कुराणाची व्याख्या केली. धार्मिक जीवनातील परंपरा, अंधानुकरण, साचेबंद चालिरिती, इस्लाममधील दुष्प्रवृत्ती नष्ठ करुन इस्लामधर्मीय तरुणांना सहिष्णुता स्विकारण्याचेही आवाहन केले.

सर सय्यद अहमद खान हे हिंदू-मुस्लीम एकतेचे व सहिष्णुतेचे पुरस्कर्ते होते. मुस्लीम समाजातील पडदापध्दती, बहुविवाहपध्दती, व तलाकपध्दत यांवर टीका केली. आधुनिक शिक्षणाला प्राधान्य देऊन ठिकठिकाणी त्यांनी इस्लामी समाजाच्या शिक्षणांसाठी शाळा सुरु केल्या. स्त्रियांना शिक्षण द्यावे असे पुरोगामी विचार मांडले. १८६४ रोजी गाझीपूर येथे मुस्लीमांसाठी इंग्रजी शाळा उघडली. १८६५ मध्ये इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद उर्दुमध्ये करण्यासाठी सायंटिफीक सोसायटीची स्थापना केली. १८७५ मध्ये अलीगढ येथे मुस्लिम अॅंग्लो-ओरियंटल शाळा सुरु केली. पाश्चात्य शिक्षणांबरोबर मुस्लीम धर्माचेही शिक्षण दिले जात होते. लवकरच अलीगढ मुस्लीमांच्या धार्मिक व सांस्कृतिक पुनरुत्थानाचे केंद्र बनले. त्याच शाळेचे रुपांतर १९२० मध्ये अलीगढ मुस्लिम विद्यापीठामध्ये झाले. मुस्लीम समाजात राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी सर सय्यद अहमद खान यांनी मुस्लीम शैक्षणिक परिषदेची स्थापना केली. सर सय्यद अहमदखान यांनी गुलामांची प्रथा इस्लाम विरोधी असल्याचे सांगून आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी 'तहजीब-उल-अखलाक' या पत्रिकेतून केला. अलीगढ चळवळीने शिक्षण, सामाजिक सुधारणा, आर्थिक प्रगती व आधुनिकीकरणाच्या दृष्टीने फार मोठी कामगिरी केली. त्यामूळेच सर सय्यद अहमद खान यांचे कार्य खूप महत्त्वाचे आहे.

### क) देवबंद चळवळ

परंपरागत मुस्लिम शिक्षणाचे पुरस्कर्ते असलेल्या उलेमांनी देवबंद चळवळ चालविली. या चळवळीचे दोन मुख्य उद्देश होते (१) मुसलमानामध्ये कुराण आणि हदीस यांचे शुध्द शिक्षणाचा प्रसार करणे. (२) परकीय शासकांविरुध्द जिहाद ची भावना कायम ठेवणे. इंग्रजी शिक्षण व संस्कृतीला विरोध करुन इस्लामच्या आदेशाप्रमाणे शिक्षण देण्याकरिता, महंमद कासिम ननौत्वी (१८३२-८०) आणि रशिद अहमद गंगोही (१९२८-१९०५) यांच्या नेतृत्वाखाली उत्तर प्रदेशातील सहारनपूर जिल्हयातील देवबंद येथे एक विद्यालय सुरु केले. पाश्चात्य शिक्षण व इंग्रज सरकारच्या सहाय्याने मुसलमानांचे कल्याण करु पहाणाऱ्या अलीगढ चळवळीच्या पूर्ण विरोधात देवबंद चळवळ होती. सांसारिक सुखासाठी किंवा चळवळीच्या पूर्ण विरोधात देवबंद चळवळ होती. सांसारिक सुखासाठी किंवा सरकारी नोकरीसाठी न शिकता इस्लाम धर्माच्या प्रसारासाठी शिक्षण देत होती.

राजकीयदृष्टया देवबंद चळवळीने १८८५ रोजी स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसचे स्वागत केले. १८८८ मध्ये देवबंदच्या उलेमांनी फतवा काढून सर सय्यद अहमदखानाला विरोध केला. देवबंद चळवळीचा नवा नेता महमूद उलाहसन (१८५१-१९२०) यांनी या चळवळीला राजकीय व बौध्दिक रुप देण्याचा प्रयत्न केला. त्यांनी राष्ट्रीय आकांक्षा व मुस्लिम निष्ठा यांच्यात समन्वय प्रस्थापित केला. हसनच्या या विचाराचे अनुकरण करुन जमाल-उल-उलेमाने भारताचे ऐक्य व राष्ट्रीय उद्देश समोर ठेऊन धर्मरक्षण आणि मुसलमानांचे राजकीय अधिकार यासाठी कार्य केले.

मुसलमान समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी इतरही समाज सुधारकांचे कार्य महत्त्वाचे ठरते. यापैकी मौलवी चिरागअली (१८४४-९५), पूर्वबंगालमध्ये पाश्चिमात्य विचार व शिक्षणाला प्रोत्साहन देण्याकरिता शेख कसत अली यांनी बरेच कार्य केले. १९१४ मध्ये अखिल भारतीय मुस्लिम महिला परिषदेने हपतिवाला व बुरखापध्दतीला जोरदार विरोध केला. नंतरच्या काळात महमद इक्बाल, सय्यद अकबर हुसेन इ. समाज सुधारकांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात बरेच भरीव कार्य केले. परंतू एकूणच मुसलमान समाजाची प्रगती होऊ शकली नाही याचे कारण मुस्लीम समाजाने त्यांच्या नेत्यांना बळी पडून पश्चिमात्य विचार स्विकारले नाहीत आणि येथील बहुसंख्य समाजाबरोबर तो समरस झाला नाही.

## २. पारशी धर्मसुधारणा चळवळ

नवीन सुधारणांच्या लाटेपासून पारशी समाज स्वतःला अलिप्त ठेवू शकला नाही. १८५१ मध्ये इंग्रजी शिक्षण घेतलेल्या कांही पारशांनी रहनुमायी भाजदयासन सभा स्थापन केली. प्रामुख्याने पारशी समाजाच्या सामाजिक स्थितीचा पुनरुध्दार करणे तसेच झोरोष्ट्रियन धर्माची शुध्द स्वरुपात मांडणी करणे हा या चळवळीचा उद्देश होता. या चळवळीचे नेतृत्व नौरोजी फरदोनजी, दादाभाई नौरोजी, के.आर, कामा यांचेकडे होते. क्रांतीकारक विचार समाजापर्यंत पोहचविण्यासाठी 'रास्त गोफतार 'नावाचे वृत्तपत्र काढण्यात आले. पारशी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यात आली तसेच धर्माचे नियम स्पष्ट करण्यात आले. विवाहाचे वय वाढविण्यात सुधारणा करण्यात आली. पडदा पध्दत नष्ट करण्यात आली. विवाहाचे वय वाढविण्यात आले. स्त्री-शिक्षणावर भर देण्यात आले. राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात सुध्दा पारशी नेत्यांनी महत्त्वाचे योगदान दिल्याचे आढळून येते. याशिवाय एस्.एस्. बंगाली, श्री.बी.एम्. मलबारी, फिरोजशहा मेहता, दिनशा वाच्छा यांची कामगिरी कोण विसरु शकेल ? जमशेटजी टाटा यांनी टाटानगरला पोलाद कारखाना काढून देशाचे नाव जगाच्या नकाशावर आणले. देशाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक विकासात पारशी समाजाचे योगदान महत्त्वाचे ठरते.

## ३ शिख सुधारणा चळवळ

पाश्चात्यांच्या तर्कशुध्द व पुरोगामी विचारांनी शीख संप्रदायालाही प्रेरित केले. शीख समाजाचे दृढीकरण व सुधारणा करण्याच्या हेतूने चीफ खालसा दिवाण या केंद्रीय संस्थेची स्थापना केली तर स्थानिक पातळीवर सिंग सभा निर्माण करण्यात आली. चीफ खालसा दिवाण संस्थेने पंजाबमध्ये अनेक गुरुद्वारे स्थापन केले तसेच शाळा व महाविद्यालये सुरु केली, सिंग सेभेने अकाली चळवळ सुरु केली. ही चळवळ गुरुद्वारांना आपली खाजगी मालमत्ता मानणाऱ्या भ्रष्ट महंतांविरुध्द होती या महंताना शासनाचे समर्थन होते. १९२१ मध्ये अकालींनी गुरुदवारांच्या उध्दारांसाठी महंताविरुध्द अहिंसात्मक असहकार सत्याग्रह चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पण अखेर जनमताच्या रेटयापुढे झुकून १९२२ मध्ये शिख गुरुद्वारा कायदा संमत केला. शीख समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून १८९० मध्ये अमृतसर येथे खालसा कॉलेज स्थापन केले व इतर अनेक ठिकाणी शाळा महाविद्यालये स्थापन करण्यात आली.

**२.८.१**

**आपली प्रगती तपासा :**

१. मुस्लिमांमधील सुधारणा चळवळीचा आढावा घ्या.

## २.९ सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे परिणाम

१९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत सामाजिक आणि धार्मिक चळवळ भारताच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहचली. भारतातील विविध धर्मात चळवळी होऊन समाजसुधारकांची मांदियाळी निर्माण झाली. सुशिक्षित भारतीयांमध्ये सुधारणा चळवळींनी आत्मविश्वास निर्माण करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य केले. सुधारणा चळवळींमुळे प्राचीन धर्म व सांस्कृतिक ठेव्याची महानता भारतीयांच्या नजरेस आली. भारतीयांना आपल्या जुन्या, टाकाऊ, खोट्या प्रथा-परंपराचा त्याग करण्याची संधी मिळाली. नव्या विज्ञानाधिष्ठित आणि तर्कसंगत विचारांच्या वातावरणांत आपल्या धार्मिक श्रध्दा, विचार यांना जुळवून घेण्यास मदत झाली. राष्ट्रवादी विचारांना व धर्म-निरपेक्ष दृष्टीकोनास चालना मिळाली. आधुनिक विचारांना प्राधान्य मिळाले. धार्मिक प्रबोधनाला गती मिळाली.

या चळवळींनी समाजातील सतीप्रथा, विधवाविवाह, बहुपत्नीत्व, पडदापध्दत, अस्पृश्यता, हुंडाप्रथा, जातीप्रथा, बालहत्या, भृणहत्या, देवदासी, प्रथा, अंधश्रध्दा इ.अनिष्ट प्रथा-परंपरांना लढा दिला. प्रत्येक समाजसुधारकांने अनेक ग्रंथ व वर्तमानपत्रे सुरु केल्याने साहित्य निर्मितीला व भाषा विकासाला गती मिळाली. सुधारणा चळवळीच्या काळात पाश्चात्य साहित्याचे वाचन व भाषांतरे मोठ्या प्रमाणात होऊन लोकजागृती घडून आली. भारतात राजा राममोहन रॉयनी महत्व दिल्याने प्रमुख शहरात इंग्रजी शिक्षणाची केंद्रे उघडली. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होऊन अस्पृश्यांसाठी व स्त्रियांसाठी अनेक शाळा उघडल्या. शिक्षणाला प्राधान्य दिल्याने भारतात अनेक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे सुरु झाली. इंग्रजी शिक्षणांमुळेच लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, राष्ट्रवाद, उदारमतवाद या कल्पनांची जाणीव झाल्याने राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागून आधुनिक दृष्टीकोनात वाढ झाली शिक्षणांमुळे हिंदी सुशिक्षित वर्गात वाढ झाली.

सामाजिक आणि धार्मिक सुधारणा चळवळींमुळे भारतातील सामाजिक व धार्मिक ऐक्याला चालना मिळून राष्ट्रवादाचा उदय झाला. १९ व्या शतकातील चळवळींनी आधुनिक

दृष्टीकोनात वाढ झाली लोकशाही, स्वातंत्र्य, समता या तत्वांची ओळख झाल्याने गुलामगिरीची जाणीव झाली. अनेक समाज सुधारकांनी समाज व धर्मसुधारणेबरोबरच राष्ट्रीय कार्य देखील केले. स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, न्या रानडे, आगरकर, लो. टिळक, लाला लजपतराय, म. गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी सुधारकांनी स्वतःला राष्ट्रीय चळवळीत झोकून दिले. राष्ट्रवादाचा शेवट स्वातंत्र्य प्राप्तीने होतो या जाणीवेमुळेच पुढील काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सुरुवात झाली.

## २.१० आर्थिक राष्ट्रवाद

पाश्चात्य शिक्षणामुळे आधुनिक शास्त्रीय दृष्टीकोनाची वाढ झाल्याने कांही सुशिक्षित भारतीय जसे आत्मपरीक्षणाकडे वळले तसे काही सुशिक्षित ब्रिटीश शासनाच्या परिणामांचे विश्लेषण करु लागले. ब्रिटीशांच्या आमगनापूर्वी अतिशय संपन्न साम्राज्य पसरले होते. ब्रिटीशांच्या आर्थिक नीतीचे दुष्परिणाम त्यांच्या लक्षात येऊ लागले. ग्रामीण भागातील वाढत्या आर्थिक हलाखीचे, कर्जबाजारीपणाचे मूळ ब्रिटिशांनी लादलेल्या अवास्तव शेतसाऱ्यात, त्यांनी सुरु केलेल्या कायमधारा, रयतवारी व महलवारी पध्दतीत आहे हे जाणवू लागले. १७ व्या शतकापर्यंत कलाकुसरीच्या कारागिरीसाठी व हस्तव्यवसायांसाठी जगात प्रसिध्द असलेला व शतकानुशतके भरभराटलेला व्यापार उदीम चालवणारा देश एका शतकात दारिद्र्याच्या गर्तेत लोटला जाण्यास ब्रिटिशांचे आर्थिक शोषणाचे व्यापारी धोरण कारणीभूत असल्याची खात्री झाली. देशातील अमाप संपत्ती नानाविध मार्गानी लुटून इंग्लंडला जात आहे. भारतीय हस्तोद्योग, व्यापार उद्दीम हेतुपुरस्सर दडपले जात असून भारतीय कच्चा मालाचा ओघ इंग्लंडकडे वळवून तेथील पक्का माल भारतावर लादला जात आहे, भारताला हुकमी व हक्काची बाजारपेठ बनवून, स्वयंपूर्ण अर्थरचना नष्ट करुन ब्रिटीशांनी भारताला आर्थिक वसाहतवादाचे लक्ष्य बनविल्याची जाणीव सुशिक्षित भारतीयांना होऊ लागली. भारताचे औद्योगिकरण मंदगतीने झाले. सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली.

कार्ल मार्क्सने १८५३ साली भारतासंबंधी लिहिलेल्या लेखात ब्रिटीश वसाहतवादामुळे भारतावर झालेल्या अनिष्ट परिणामांचे चिकित्सक व विश्लेषण केले होते आणि या औद्यागिक साम्राज्यावादी शोषणातच तिच्या विनाशाची बीजे पेरली जात आहेत असे भविष्यही वर्तविले होते. मुंबईच्या रामकृष्ण विश्वानाथांनी १८४३ सालीच एका निबंधात मुस्लीम राज्यकर्त्यांपेक्षा इंग्रजांची आर्थिक पिळवणूक घातक असल्याचे सोदाहरण दाखवून दिले. डॉ. आत्माराम पांडुरंग यांनी यावर आर्थिक स्वावलंबनाचा तोडगा सुचविला होता. निरनिराळ्या मार्गांनी भारतीय प्रजेची लूट करुन ब्रिटीशांनी भारताचे शोषण चालवले आहे. त्यामुळे स्वराज्य स्थापन झाल्याशिवाय हे शोषण थांबणार नाही ही जाणीव वाढू लागली आणि या जाणिवेलाच आर्थिक राष्ट्रवाद असे म्हटले जाते भारतात राष्ट्रवादाचा प्रसार करण्याचे कार्य दादाभाई नौरोजी, लोकहितवादी, न्या रानडे, गोपाळ गणेश आगरकर इत्यादी सुधारकांनी केले.

### २.१०.१ आर्थिक नि:सारणाचा सिध्दांत :

दादाभाई नौरोजींचा जन्म मुंबईतील एका पारशी कुटुंबात १८२५ मध्ये झाला. विद्यार्थीदशेत बुध्दिमान विद्यार्थी म्हणून त्यांनी लौकीक संपादन केला. इ.स. १८५० साली मुंबईच्या एल्फीन्स्टन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून नोकरी स्विकारली. १८५१ मध्ये 'रास्तगोप्तार' हे गुजराती साप्ताहिक सुरु करुन समाजजागृती घडवून आणली. मुंबईत अनेक सामाजिक व राजकीय स्वरुपाच्या चळवळी सुरु केल्या. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक उच्च पदे भुषविली. इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेत ॲलन हूयमप्रमाणे दादाभाईंचा सिंहाचा वाटात होता. राष्ट्रसभेचे तीन  वेळा अध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. १९०६ च्या कॉंग्रेस अधिवेशनात त्यांनी स्वराज्य हे ध्येय घोषीत केले. त्यांचा त्यांच्या कार्याबद्दल 'आधुनिक भारताचे पितामह'म्हणून गौरव केला जातो. ३० जून १९१७ रोजी या महान व्यक्तीचे देहावसान झाले.

दादाभाईंना ब्रिटीश भारताचे आर्थिक शोषण कोणत्या मार्गाने करीत आहेत याची जाणीव झाली व हे आर्थिक शोषण थांबल्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही याची खुणगांठ पक्की झाली.त्यांसाठी त्यांनी 'भारतीय दारिद्र्य आणि भारतातील अब्रिटीश राज्य'नावाचा ग्रंथ लिहून (१९०१) त्यात आपले विचार सविस्तर मांडले. १९०५ मध्ये दादाभाईनी जे.टी. संडरलॅडला लिहिलेल्या पत्रात म्हटले,"भारताची स्थिती अतिशय शोचनिय बनली आहे. त्याची सतत लूट होत आहे. प्राचीन काळातही लुटेरे येत व लुटमार करुन निघून जात. भारत अल्पावाधीत आपले झालेले नुकसान भरुन काढत असे. पण आता तो सातत्याने अधिकाधिक गरीब बनत चालला आहे. लुटीपासून श्वास घेण्यासही भारताला संधी मिळत नाही. ब्रिटिशांचे प्रशासन, सैन्य, न्यायव्यवस्था, व्यापार, अधिकाऱ्यांचे पगार, कर, साम्राज्यविस्तारासाठी केलेली युध्दे, इंग्लंडमधील अधिकारी वर्गाचा खर्च भारतीय तिजोरीतूनच केला जातो. भारतातून नेलेला पैसा भांडवल रुपाने भारतात आणून त्यावरील व्याज व नफा ब्रिटीश मायदेशी नेतात व सर्व बाजूनी भारतीयांची आर्थिक लुट केली जाते "असे दादाभाईनी स्पष्ट केले. आर्थिक शोषण थांबविण्यासाठी भारतीयांनी आपले भांडवल गुंतवून उद्योगधंदे उभारावेत असा सल्ला त्यांनी भारतीयांना दिला. भारतीयांनी मांडलेल्या या अर्थशोषणाच्या सिध्दांताला काही ब्रिटीश मुत्सद्यांच्या वक्तव्याने पुष्टी मिळाली. हेन्री कॉटन, विलीयम हंटर, लॉर्ड सॅलसबरी, ग्लॅडस्टोन इत्यादींनी ब्रिटिशांच्या फक्त शंभर वर्षाच्या राजवटीत भारत द्रारिद्र्याच्या गर्तेत फेकल्याची कबुली दिली.

### २.१०.२ न्या. महादेव गोविंद रानडे व आर्थिक राष्ट्रवाद (१८४२-१९०१)

महाराष्ट्राच्या प्रबोधन काळातील कळकळीचे समाजसुधारक, सर्वांगीण सुधारणेचे प्रणेते, सनदशीर राजकारणाचे प्रवर्तक म्हणून रानडे यांचे स्थान अनन्य साधारण आहे. अर्थकारण, राजकारण, तत्वज्ञान याबरोबरच रानडे यांचा इतिहासाचाही व्यासंग होता. विद्यार्थीदशेपासूनच ते सुधारणा चळवळीकडे आकर्षित झाले होते. १८६५ साली पुण्यात विधवाविवाहोत्तेजक मंडळ व १८७० मध्ये सार्वजनिक सभा स्थापन करण्यात रानडे मुख्य

आधारस्तंभ होते. इ.स. १८९३ मध्ये मुंबई हायकोर्टात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. सरकारी नोकरीच्या बंधनामुळे त्यांना राजकारणांत सक्रिय सहभागी होता येत नव्हते म्हणूनच या क्षेत्रात मार्गदर्शक व सल्लागाराची भूमिका त्यांनी बजावली. ॲलन हयुम, ना.गोखले त्यांना गुरुस्थानी मानत यावरुन त्यांचे स्थान किती उच्च दर्जाचे होते हे दिसून येते.

न्या. रानडे यांचा पिंड सुधारकाचा होता. त्यांनी आपल्या सार्वजनिक कार्याला प्रारंभ धार्मिक व सामाजिक सुधारणा कार्याने केला. न्या. रानडे यांची मूळ प्रवृत्ती समन्वयवादी व रचनात्मक होती. राजकीय बाबतीत न्या. रानडे यांची मते मवाळ असली तरी, इंग्रजांबद्दल त्यांना निष्ठा आणि आदर वाटत असला, ब्रिटीश शासनव्यवस्थेची मूलभूत तत्वे आदर्शस्वरुपाची वाटत असली तरी याचा अर्थ ब्रिटिश सत्तेचे शोषक स्वरुप ते ओळखत नव्हते असे नव्हते. ब्रिटिश राजवटीत उद्योगधंद्याच्या झालेल्या ऱ्हासावर प्रकाशझोत टाकणारी व त्यावर उपाययोजना सुचविणारी अभ्यासपूर्ण भाषणे त्यांनी सार्वजनिक सभेच्या व्यासपीठावरुन दिली. भारताची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी स्वदेशीचा मंत्र दिला. सामाईक भांडवलाच्या आधारे मंडळे स्थापून कारखाने सुरु करण्याचा सल्ला त्यांनी भारतीयांना दिला. तसेच भारतीय उद्योगांना संरक्षण मिळावे म्हणून सरकारकडे संरक्षक जकातीची मागणी केली. ब्रिटिशांनी स्विकारलेल्या मुक्त व्यापाराच्या धोरणामुळे भारतीयांच्या अर्थव्यवस्थेत होणाऱ्या विघातक परिणामांची त्याना जाणीव होती आणि म्हणून राजकीय बाबतीत उदारमतवादी परकीयांचे औद्योगिक प्रभुत्व प्रस्थापित होऊन देश विकला जात आहे, असे त्यांचे मत होते. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या वेतनाच्या व निवृत्तिवेतनाच्या रुपाने भारताचे द्रव्यापहरण होते असे ते म्हणत. तसेच ब्रिटीश भांडवल देशात गुंतविल्याने सर्व नफा देशाबाहेर जातो म्हणून परकीय भांडवलाची देशातील गुंतवणूक दादाभाईंना अनर्थकारी वाटे तर न्या. रानडे ही भांडवलाची गुंतवणूक योग्य नाही हे पटत असले तरी भारतीयांत भांडवल गुंतविण्याची क्षमता नसल्यास, भारताचा औद्योगिक विकास होणे आवश्यक असल्याने परकीय भांडवलाची गुंतवणूक ते फारशी आक्षेपार्ह मानीत नसत. तसेच देशाचे वाढते दारिद्रय हा केवळ ब्रिटिश सत्तेने चालविलेल्या द्रव्यापहरणाचा परिणाम नाही तर त्याला कांही अशी भारतीय जबाबदार आहेत असे त्यांचे मत होते.

न्या. रानडेंच्या आर्थिक विचाराचा प्रभाव भारतीय समाजावर पडला. त्यांच्या विचारांनी वासुदेव बळवंत फडके सारख्या क्रांतीकारकावर प्रभाव पडलेला होता. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, फिरोजशहा मेहता, लो. टिळक इ. नेत्यांनी वेळोवेळी इंग्रजाच्या आर्थिक पिळवणूकीबाबत जनजागृती केली. या आर्थिक राष्ट्रवादाचा प्रभाव स्वातंत्र्य आंदोलनावर पडला. आर्थिक राष्ट्रवादातूनच स्वदेशी व बहिष्कार ही दोन अस्त्रे राष्ट्रीय काँग्रेसला मिळाल्याने ब्रिटिश शासनाला धक्के बसू लागले. यांचा उपयोग पुढे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीला झाला.याच काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'प्रॉब्लेम ऑफ रुपी' व 'इवोल्यूशन ऑफ प्रोविन्सीयल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या ग्रंथात बिटिश सरकार भारतीय लोकांचे कशाप्रकारे आर्थिक शोषण करतेय ते सोदाहरण त्यांना दाखवून दिले. त्यामूळे ब्रिटिश साम्राज्याचा पाया तो आर्थिक धोरणावर टिकून होता तो हळूहळू ढासळू लागला. यामूळेच भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचा प्रसार स्वातंत्र्य चळवळीच्या काळात मोठ्या प्रमाणात झाला.

**२.१०.३ आपली प्रगती तपासा :**

१. भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे स्वरुप सांगा.

## २.११ सारांश

१९ व्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमुळे भारतीयामध्ये नवचैतन्य निर्माण झाले.भारतीयांमध्ये जिज्ञासुवृती, वैज्ञानिक दृष्टीकोन व जगाकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टीकोन या चळवळीमुळे विकसित झाला. यातून खऱ्या अर्थाने भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचा उदय झाला. याचा फायदा पुढे राष्ट्रीय चळवळीस झाला. या काळातील समाजसुधारकांनी सामाजिक व धार्मिक चळवळीत आपले मोलाचे योगदान तर दिलेच त्याचप्रमाणे त्यांनी ब्रिटिशांकडून भारतीयांचे होणारे आर्थिक शोषण सप्रमाण सिध्द् केले. त्यामध्ये मुख्यत्वे : दादाभाई नौरोजी,न्या. रानडे, डॉ.आंबेडकर यांचा समावेश होतो. त्यांचा आर्थिक नि:सारणाच्या सिध्दांताचा फायदा स्वातंत्र्य चळवळीस झाला व ब्रिटिशविरोधी वातावरण भारतामध्ये निर्माण झाले.

## २.१२ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न

१) सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीतील राजाराममोहन रॉय यांच्या भूमिकेचे मूल्यामापन करा.

२) महात्मा फुले व त्यांच्या सत्याशोधक समाजाच्या कार्यावर सविस्तर टिप लिहा.

३) १९ व्या शतकातील सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचे महत्त्व स्पष्ट करा.

४) भारतीय आर्थिक राष्ट्रवादाचे स्वरुप स्पष्ट करा.

५) टीपा लिहा :-

   १) ब्राम्हो समाज

   २) आर्य समाज

   ३) रामकृष्ण मिशन

   ४) सत्यशोधक समाज

   ५) सर सय्यद अहमद खान

   ६) दादाभाई नौरोजी

   ७) आर्थिक शोषणाचा सिध्दांत

❖❖❖❖

# ३

# भारतीय राष्ट्रवादाचा उदय -२

## राजकीय संघटनांचा विकास आणि राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना.

**प्रकरण रुपरेषा**

३.० उद्दिष्टये
३.१ भारतीय राष्ट्रवादाचा उदय
३.२ भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे /काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी
३.३ राजकीय संघटनाचा उदय
३.४ राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
३.५ राष्ट्रीय काँग्रेसची ध्येयधोरणे
३.६ सारांश
३.७ प्रश्न

## ३.० उद्दिष्टे

१) राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे/पार्श्वभूमी समजून घेणे.
२) विविध राजकीय संघटनाच्या कार्याचा अभ्यास करणे.
३) राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी व तिच्या ध्येय धोरणांचा अभ्यास करणे.

## ३.१ भारतीय राष्ट्रवादाचा उदय

इ.स. १८५७ साली हिंदी लोकांनी उठाव करून इंग्रजांची अन्यायी व अत्याचारी राजवट उलथून पाडण्याचा प्रयत्न केला. हा उठाव जरी उत्तर हिंदूस्थानातील कांही प्रदेशांपुरता व कांही राजेरजवाडे, जमीनदार व शिपाई यांच्यापुरता मर्यादीत असला आणि तो जरी अपयशी ठरला, तरी हिंदुस्थानच्या इतिहासातील तो एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आपल्या स्वातंत्र्यासाठी जुने नेतृत्त्व व जुन्या प्रेरणा उपयोगी पडणार नाहीत याची खात्री लोकांना झाली. पाश्चात्य शिक्षणाने सुजाण झालेला एक सुशिक्षित वर्ग समाजात उदयास आलेला होता. याच वर्गाने पुढे आपल्या समाजाचे नेतृत्त्व केले व कालांतराने स्वातंत्र्याची चळवळ उभारली. स्वातंत्र्याच्या चळवळीचा उदय होण्यापूर्वी प्रथम राष्ट्रवादाचा उदय झाला. गुजराती, पंजाबी, मराठे, जाट,

बंगाली, मद्रासी व इतर अनेक प्रांतातील लोक अथवा हिंदू, मुसलमान, बौद्ध, जैन, पारसी इ. विविध धर्माचे लोक हे सर्वच जण ह्या हिंदूस्थान देशाचे नागरिक आहोत, ही राष्ट्रवादाची भूमिका हळूहळू तयार झाली. या राष्ट्रवादाच्या पार्श्वभूमीवरच पुढे १८८५ साली देशातील प्रमुख विचारवंतानी "राष्ट्रीय कॉंग्रेस " या राजकीय संघटनेची स्थापना केली. भारतीयांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या राष्ट्रीय संघटनेने जनतेत राष्ट्रीयत्त्वाची जाणीव निर्माण करून राजकीय जागृती घडवून आणण्याचे, सुसंघटीत राष्ट्रीय वाचा फोडून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्याचे आणि स्वातंत्र्य प्राप्तीचे उद्दीष्ट सफल होईपर्यंत राजकीय अधिकारांसाठी सातत्याने व प्रभावीपणे लढा देण्याचे मौलिक कार्य केले. तेव्हा आपण या राष्ट्रवादाच्या उदयाची व त्यातून उदयास आलेल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेची कारणे तपासून पाहूया.

## ३.२ राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे/कॉंग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी

**१. पाश्चिमात्य शिक्षण :** इंग्रजी शिक्षण ही इंग्रज राजवटीची भारताला मिळालेली फार मोठी देणगी होती. १८३५ मेकॉलेच्या खलित्यानुसार बेंटिकच्या कारकिर्दीत इंग्रजी शिक्षण देण्याचे धोरण जाहीर झाल्यानंतर अनेक शिक्षण संस्था सरकारने व समाजसुधारकांनी सुरू केल्या. या संस्थांमधून पाश्चात्यांची संस्कृती, विद्या, वाङमय, कला, सामाजिक व भौतिकशास्त्र, त्यांचा इतिहास इत्यादींचे ज्ञान हिंदी लोकांना होऊ लागले. बायरनेचे स्वातंत्र्याविषयीचे विचार, वर्डसवर्थचे मानवजातीच्या अस्मितेचे विचार, धर्ममार्तंडाविरूद्धचे बंडखोर विचार, राष्ट्रवाद, लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधूता, स्वराज्य या संबंधीचे मेकॉले, ब्रुक, लॉक, मिल, स्पेन्सर या इंग्रज विचारवंतांचे विचार हिंदी लोकांना समजू लागला. अमेरिकन राज्यक्रांती, फ्रेंच राज्यक्रांती, इटालियनांचा ऑस्ट्रियन साम्राज्यवाद्यांविरूद्धचा लढा याची जागा कारणमिमांसा व न्याय यांनी घेतली. चमत्काराऐवजी लोक विज्ञानाकडे वळले. धर्म व नितीमुल्ये यांच्याबाबत लोक नवीन दृष्टीकोनातून विचार करू लागले. थोडक्यात शिक्षण म्हणजे "वाघीणीचे दुध" ठरले.

**२. धर्मसुधारणा चळवळी व समाजसुधारकांचे प्रयत्न :** १९व्या शतकात भारतात राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद इत्यादी महापुरूषांनी केवळ धर्मजागृतीच नव्हे तर समाज-जागृतीही घडवून आणली. हिंदू समाज देवा-धर्माच्या, जात-पातीच्या, रूढी-परंपरांच्या जाळ्यात अडकून पडला होता. पाश्चात्य शिक्षण व सतीबंदी या विषयी राजा राममोहन रॉय यांनी केलेली चळवळ, अंधश्रद्धा निवारण, अस्पृश्यता निवारण, जातीभेद निवारण या साठी स्वामी दयानंद-विवेकानंदाचे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. बंगालमध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर, शशिपाद बॅनर्जी, महाराष्ट्रात महात्मा फुले, रानडे, आगरकर, लोकहितवादी, दक्षिणेत रघुनाथराव, वीरशलिंगम पंतुलू, पंजाबमध्ये स्वामी श्रद्धानंद इत्यादी समाजसुधारक समाजातील अस्पृश्यता, मूर्तीपुजा, विधवांचा छळ, बालविवाह, जातीयता, जातीभेद, भृणहत्या, जरठकुमारी विवाह, अंधश्रद्धा, कर्मकांडे या समाजातील रूढीपरंपरावर वैचारिक आघात करीत होते.ब्राह्मो समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, प्रार्थना समाज, थिऑसॉफीकल सोसायटी इत्यादी धर्मसंघ, धर्मसुधारणा व समाजसुधारणांसाठी प्रयत्नशील

होत्या. जगातील प्राचीन ज्ञान हिंदूस्थानजवळ आहे व ते सर्व जगाला देऊन मार्गदर्शन करण्याची कुवत हिंदुस्थानाजवळ असल्याची कबुली थोर ॲनी बेझंट यांनी दिली. हिंदी लोकांचा आत्मविश्वास वाढला व स्वाभिमान जागृत झाला.

**३. वृत्तपत्रांची कामगिरी :** प्रबोधनाच्या काळात वर्तमानपत्रांनी जो प्रचार केला आणि जाग घडवून आणली त्याला इतिहासात तोड नाही. सरकारच्या दडपशाहीची पर्वा न करता प्रखर देशभक्ती व प्रखर राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करून ब्रिटीशांच्या ढोंगीपणाचे वाभाडे काढले. ब्रिटीश साम्राज्यशाहीचे खरे स्वरुप जनतेसमोर मांडले. प्रारंभीची वृत्तपत्रे इंग्रजांनी सुरु केलेली होती त्यामुळे ती वृत्तपत्रे सरकारी धोरणाची तरफदारी करत होती. पुढे हिंदी विचारवंतांनी या क्षेत्रात प्रवेश केला आणि इंग्रजी व देशी भाषातील अनेक वृत्तपत्रे उदयास आली. सरकारच्या ध्येय धोरणावर ताशेरे ओढण्याचे व हिंदी बांधवांना जागे करण्याचे काम हिंदी वृत्तपत्रांनाच करावे लागले.

प्रारंभिच्या कालखंडात "द इंडीयन मिरर" (कलकत्ता) "बॉम्बे समाचार" व "इंदुप्रकाश" (मुंबई), "दि हिंदू " (मद्रास), "ट्रीब्यून" (लाहोर) इ. वृत्तपत्रे कार्यरत होती. राष्ट्रीय जागृती जसजशी वाढू लागली तसतशी हिंदी नेत्यांच्या व विचारवंतांच्या वृत्तपत्रांची संख्या वाढू लागली. वृत्तपत्रे हे जनजागृतीचे व राजकीय असंतोषाच्या निर्मितीचे फार मोठे साधन आहे. हे हिंदी लोकांच्या लक्षात आल्यामुळे प्रत्येक हिंदी नेत्याने स्वतःचे वृत्तपत्र काढले होते. उदा. राजा राममोहन रॉय यांचे "संवाद कौमुदी", देवेंद्रनाथाचे "तत्त्वबोधिनी पत्रिका", श्री अरविंद बाबूंचे "वंदे मातरम्", सुरेंद्र नाथांचे "बंगाली", लाला लजपतरायांचे "दि पिपल", लोकमान्यांचे "मराठा व केसरी" इ. याशिवाय देशाच्या विविध भागात विविध भाषांमध्ये ही वृत्तपत्रे बाणेदारपणे ब्रिटीशांच्या अन्यायाविरुद्ध आग ओकीत होती. हिंदू, पेटिअर, अमृतबझार पत्रिका, ज्ञानप्रकाश, काळ, खानदेश वैभव, महाराष्ट्र मित्र, शिवाजी, स्वतंत्रता या वृत्तपत्रांनी राजकीय कार्याला समर्थपणे हातभार लावला.

**४. भारतीय साहित्याची कामगिरी :** १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात केवळ राजकारण व धर्मकारण या क्षेत्रामध्येच प्रबोधनाची चळवळ सुरू झाली असे नाहीतर देशी भाषांच्या क्षेत्रातही सुरु झाली. याच कालखंडात देशी भाषांचा झपाट्याने विकास झाल्याने साहित्याच्या क्षेत्रात नामवंत लेखक व कवी उदयास आले.

बंगालीमध्ये बंकिमचंद्र चॅटर्जी, मधुसुदन दत्त, दीनबंधू मित्र, नविनचंद्र सेन, रवींद्रनाथ टागोर, अक्षयकुमार दत्त, ईश्वरचंद्र विद्यासागर इत्यादी लेखकांनी व कवींनी आपल्या मातृभाषेला आधुनिक व प्रागतिक बनवली. बंकिमचंद्राच्या 'आनंदमठ' व 'दुर्गेश नंदिनी' या कलाकृती विशेष गाजल्या. आनंदमठ या कादबंरीतील वंदे मातरम् हे गीत तर स्वातंत्र्य लढ्याच्या काळातील घोषगीत बनले. या गीताने प्रत्येक हिंदी माणसाचे हृदय त्यावेळी व आजही काबीज केले आहे. हिंदीमध्ये भारतेंदु हरिशचंद्र, तामीळमध्ये सुब्रमण्यम् भारती, मराठीत लोकहितवादी, विष्णुशास्त्री

चिपळूणकर, महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, शि.म. परांजपे, राजवाडे, खरे, पारसनीस इत्यादी साहित्यिक व इतिहासकारांनी आपल्या प्रभावी विचारांनी राष्ट्रवादाच्या प्रसाराचे भौतिक कार्य साहित्याच्या माध्यमाद्वारे समर्थपणे केले.

**५. हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृतीचे पाश्चात्य संशोधक व त्यांचे कार्य :** इंग्रजांचे साम्राज्य हिंदुस्थानात स्थापन झाल्यानंतर अनेक पाश्चात्य संशोधकांनी हिंदुस्थानच्या प्राचीन साहित्याचा व इतिहासाचा अभ्यास व संशोधन सुरू केले. विशेषतः विल्यम जोन्स याने १७८४ रोजी बंगालमध्ये आशियाटीक सोसायटी स्थापन करून संशोधनाला सुरूवात केली. त्यांच्या प्रयत्नामागे ज्ञानाबद्दलची तळमळ होती. त्यांनी अनेक अडचणीवर मात करून चिकाटीने हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहास, त्याची कामगिरी जगाच्या समोर मांडली. अशा पाश्चात्य संशोधकामध्ये कोलब्रूक, विल्सन, मॅक्स मुलर, मोनिअर विल्यमस् इत्यादी संशोधक प्रमुख होते. हिंदुस्थानातही राजा राममोहन रॉय, राजा नरेंद्र लाल, डॉ. पंडू सेन, डॉ. भांडारकर यांचे या क्षेत्रातील प्रमुख हिंदी संस्कृतीची माहिती वाढविण्यास कारणीभूत झाले. जेव्हा पाश्चात्य संशोधक प्राचीन हिंदू लोकांच्या संस्कृतीची स्तुती करू लागले तेव्हा हिंदी जनतेला आपल्या प्राचीन ठेव्याचा अभिमान वाटू लागला. सर्व देशाचा हा प्राचीन सांस्कृतिक वारसा आहे अशी अस्मिता त्याच्या ठायी उत्पन्न झाली.

**६. हिंदी एकात्मतेस इंग्रजी भाषेचे सहाय्य :** इंग्रजी भाषेच्या अभ्यासामुळे पाश्चात्य ज्ञानाचा हिंदी लोकांना परिचय झाला ही फार मोठी फायद्याची गोष्ट झाली पण या भाषेने आणखी एक मोठी कामगिरी केली आहे ती म्हणजे तिने हिंदुस्थानच्या विविध प्रांतात राहणाऱ्या व राष्ट्राच्या कल्याणाचा विचार करणाऱ्या विचारवंताना एकत्र आणण्यास मदत केली आहे. मद्रासी, कानडी, बंगाली, मराठी, काश्मिरी, पंजाबी, गुजराती अशी विविध भाषिक मंडळी प्रथम जेव्हां एकत्र आली तेव्हा त्यांनी इंग्रजीतूनच विचारविनिमय केला. मद्राशाला इंग्रजी येत नसते तर बंगाल्यांशी बोलताना त्यास प्रथम बंगाली शिकावे लागले असते. हिंदी नेत्यांचे विचारविनिमयाचे माध्यम इंग्रजी असल्याने राष्ट्रवादाची झपाट्याने वाढ होऊ शकली व राष्ट्रीय एकात्मतेच्या चळवळीस गती आली. राष्ट्रसभेच्या स्थापनेच्या वेळी विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी इंग्रजीचाच वापर करण्यात आला.

**७. प्रशासन व्यवस्थेचा विकास :** इंग्रजांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत व सिंधपासून आसामपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला. १८५७ च्या उठावानंतर त्यांनी हिंदुस्थानातील संस्थांना जीवदान दिले. तरी त्यांच्यावर इंग्रजी साम्राज्य सत्तेचे पूर्ण प्रभुत्व प्रस्थापित झाले होते. संस्थानी हिंदूस्थानात त्या त्या संस्थानिकांच्या राज्यकारभारपद्धती भिन्न भिन्न असल्या तरी उरलेल्या मोठ्या प्रदेशांवर इंग्रजांची एकत्रच राजवट निर्माण झाली होती. या राजवटीत केंद्र बलवान होते. प्रांताच्या कारभार संबंधी कोणताही कायदा केंद्र सरकार करु शकत होते. एका अर्थाने प्रांतीय सरकारे केंद्र सरकारची हस्तके म्हणूनच काम पहात होती. केंद्र सरकार अखिल हिंदुस्थान नजरे समोर ठेऊन धोरण ठरवित असे. केंद्र सरकारचे आय.सी.एस्

अधिकारी देशात कोठेही बदली करुन पाठविले जात. इंग्रजी राजवटीत समान कायदेसंहिता समाजाला मिळाली. कायद्या पुढे सर्व समान हे तत्व घोषित करण्यात आहे एकाच प्रकारची न्यायसंस्था स्थापन झाली. सरकार एक, त्याचे लष्कर एक, त्यांची राज्यकारभार पद्धती सर्वत्र सारखा या सारख्या गोष्टींनी भारत झपाट्याने एक होऊ लागला. राष्ट्रीय एकात्मता वाढविण्याच्या कामी या घटकांचा अप्रत्यक्ष उपयोग झाला.

८. **दळणवळण व संचार साधनांचा जलद विकास :** १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजांनी हिंदुस्थानात रेल्वे, मोठे रस्ते, तारायंत्रे, पोष्ट इत्यादी भौतिक सुधारणा केल्या. जलद गतीच्या दळणवळणाच्या साधनांची निर्मिती करण्यामागे प्रशासकीय सोय, लष्करी संरक्षण व वहन, आर्थिक व व्यापारी शोषण इ. उद्दीष्टये होती. पक्के रस्ते बांधण्यात येऊन एक प्रांत दुसऱ्या प्रांताला व ग्रामीण भाग मोठमोठ्या शहरांना जोडण्यात आले. इ.स. १८५३ नंतर देशात रेल्वेमार्गाचे जाळे विणण्यात आले आणि १८८० पर्यंत जवळजवळ २५०० मैल लांब आणि १९०० पर्यंत २५,००० मैल लांब रुळ टाकण्यात आले. रेल्वेमुळे मिळालेल्या अनेक फायद्यांबरोबर महत्त्वाचा फायदा म्हणजे राष्ट्रीय ऐक्याची भावना वाढीस लागली.

इ.स. १८५० नंतर सुरू झालेल्या डाक व्यवस्था व तारायंत्राने संपूर्ण देश जवळ आला. देशांतर्गत पत्र पाठविण्यासाठी सर्वत्र २ पैशाचे एकच तिकीट आणि वृत्तपत्रे व पार्सल पाठविण्यासाठी यापेक्षाही कमी दर यामुळे देशाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व बौद्धिक जीवनात बदल घडून आले. पोष्टामुळे राष्ट्रीय साहित्य देशाच्या कानाकोपऱ्यात कोठेही पाठविता येत होते. तारायंत्रांनी शीघ्र संदेश पाठविण्याच्या कार्यात क्रांती घडवून आणली. आधुनिक संपर्क साधनांनी भारताच्या विभिन्न भागात राहणाऱ्या जनतेचा परस्पर संबंध ठेवण्यात मदत झाली. परिणामी राष्ट्रवादाला चालना मिळाली. रेल्वे, मोटर, डाक व तारायंत्रासारख्या शीघ्र संपर्क साधनांनी उपलब्ध सोईसवलती दिल्या नसत्या तर कॉंग्रेस, अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेस, अखिल भारतीय किसान सभा, मुस्लिम लीग यांची स्थापना झाली नसती.

९. **आर्थिक शोषण :** इंग्रजांचे साम्राज्य हे व्यापारी साम्राज्य होते. आर्थिक पिळवणूक हा त्या साम्राज्याचा पाया होता. त्यासाठीच त्यांनी रेल्वे, बंदरे, रस्ते इ. वाहतूक व दळणवळण व्यवस्था निर्माण केली. सरकार त्यांचे असल्याने मुक्त व्यापार पद्धती स्विकारली. संरक्षक जकातीचे धोरण स्विकारले. इंग्लडमधून आयात होणाऱ्या मालावरील जकात उठवली. इंग्लडमध्ये यंत्रावर तयार होणारा माल येथे स्वस्त भावाने विकू लागला. देशातील उद्योगधंदे बुडाले. कामगार बेकार झाला व तो खेडेगावातील शेतीकडे वळला. पूर्वी खेड्यात शेती व हस्तव्यवसाय यांची सांगड होती. नव्या राजवटीत हस्त व्यवसाय नष्ट झाले. सर्वजण शेतीच्या मागे लागले पूर्वी खेडे स्वंयपूर्ण होते आता ते तसे राहिले नाही. हिंदुस्थान ही इंग्रजांचा पक्का माल विकत घेणारी एक मोठी बाजारपेठ बनली व सर्व इंग्रजी व्यवस्था उदयास आली. बंगाल, बिहार, आसाम या प्रांतात चहा व नीळ यांचे मळे ब्रिटीश मालकांच्या हाती होते. मळ्यावर काम करणाऱ्या मजुरांना

गुलामाप्रमाणे वागविले जात असे. शक्य होईल तेवढ्या सर्व बाजूंनी हिंदी लोकांचे आर्थिक शोषण चालले होते.

**१०. इंग्रजांचा वंशश्रेष्ठत्वाचा अहंकार व उर्मठपणा :** काही अपवाद वगळता इंग्रज अधिकारी हिंदी जनतेशी सहानुभूतिशून्य रीतीने वागत असत. एवढेच नव्हे तर हिंदी लोक दगडाची व जनावरांची पूजा करणारे रानटी लोक असल्याची हेटाळणी करीत. अगदी उच्च वर्गातील इंग्रजांची हीच भावना होती. हिंदी लोकांना श्लाकीज, डार्कीज अशा शेलक्या शिव्या इंग्रज मळेवाले अधिकारी देत. त्यांनी हिंदूवर केलेल्या अन्यायाची दाद घेतली जात नसे. हिंदी माणसाच्या जीविताची किंमत कमी लेखली जाई. खुनी युरोपीयन गुन्हेगार निर्दोष सुटत अथवा थोडीफार शिक्षा ठोठावली जाई. इंग्रजी वृत्तपत्रे गोऱ्यांच्या बाजूने उभी राहत. गोऱ्यांचा खटला गोरे न्यायाधीश चालवत. रेल्वेच्या वरच्या डब्यातून प्रवास करणे ही गोऱ्यांची मक्तेदारी होती. अनेक युरोपियन क्लबांच्या प्रवेशद्वारावर "भारतीय आणि कुत्र्यांना प्रवेश निषिद्ध" अशा पाट्या लावलेल्या असत. या वेदनांचा व अपमानाचा बदला घेण्यासाठी हिंदी विचारवंतानी एकत्र येणे व त्यांची संघटना स्थापन होणे आवश्यक होते.

**११. लॉर्ड लिटनची दडपशाही : (१८७६-१८८०):** लॉर्ड लिटन हा कट्टर साम्राज्यवादी होता. त्याने अनेक दडपशाही स्वरुपाचे कायदे केले. १८७७ मध्ये दुष्काळ पडलेला असताना दिल्ली येथे दरबार भरवून लाखो रुपयाची उधळपट्टी केली. १८७८ साली देशी वृत्तपत्रांवर कडक निर्बंध टाकणारा कायदा करुन वृत्तपत्रांची गळचेपी केली याच सुमारास हत्यारांसंबंधीचा कायदा पास करुन हिंदी लोकांच्या हत्यारे बाळगण्यावर कडक निर्बंध लादले. हे निर्बंध मोडणाऱ्यांना सक्तमजुरीच्या शिक्षा कायद्याने देण्यात आल्या. हे कायदे उघडउघड पक्षपाती होते. अफगाणिस्तानबरोबर निष्कारण युद्ध उकरुन काढले. या युद्धात हजारो हिंदी सैनिक मारले गेले. हिंदुस्थानचे लक्षावधी रूपये खर्च झाले. आयात कर रद्द केल्याने हिंदी उद्योगधंद्यांना जबरदस्त तडाखा बसला. हिंदी लोकांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न केला त्यामुळे असंतोष वाढत गेला. परिणामी राष्ट्रसभेच्या निर्मितीची पार्श्वभूमी तयार झाली.

**१२. इलबर्ट बील :** न्यायालयीन क्षेत्रातील काळा-गोरा भेद नष्ट करण्यासाठी लॉर्ड रिपनने आपल्या मंडळात आणलेले "इलबर्ट बील" हिंदी राष्ट्रवादाच्या इतिहासात महत्वाचे मानले जाते. या बिलाला हिंदुस्थानातील इंग्रज समाजाने मोठा विरोध केला. खुद व्हाईसरॉय विरुद्ध आंदोलन उभारुन त्यास तडजोड करण्यास भाग पाडले. हिंदुस्थानात इंग्रज समाज आपणांस कधीच न्यायाची वागणूक देणार नाहीत तरी आपले आपण संघटित होऊन आंदोलन करुन सरकार पासून अधिकार हिसकावून घेतले पाहिजेत. हा धडा हिंदी विचारवंतानी या प्रकरणांतून घेतला. संघटित झालेल्या इंग्रजाचे सामर्थ्य त्यांच्या लक्षात आल्यावर आपणही आपल्यावरील अन्यायास वाचा फोडण्यासाठी संघटना उभारली पाहिजे असे त्यांना वाटू लागले.

### ३.२.१ आपली प्रगती तपासा :

१. भारतात राष्ट्रवादाच्या उदयास जबाबदार ठ़रलेली कारणे सांगा.

## ३.३ राजकिय सघंटनांचा उदय :-

भारतातील पाश्चात्य प्रभुत्वाने अशा कांही तत्वांना जन्म दिला ज्यांनी अखेर त्याच पाश्चात्य साम्राज्यावादाला आव्हान दिले. विविध घटकांच्या प्रभावामुळे राष्ट्रवादाचा उदय झाला. युरोपात घडलेल्या राष्ट्रवादी व लोकशाही चळवळीचा इतिहास भारतातील सुशिक्षित लोकांच्या मनात घर करुन बसला. या चळवळीमधील संघटनाशक्तीचे महत्त्व भारतीयांनी ओळखले. भारतीय जनतेमधील ऐक्याच्या अभावामुळे १८५७ च्या उठावात भारतीयांना पराभव स्विकारावा लागला याची जाणीव भारतीयांना झाली. हिंदुस्थानच्या विविध भागांमध्ये राहणाऱ्या सुशिक्षितांनी पुढाकार घेऊन संघटन करण्याची कामगिरी बजावली. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची गरज असते. प्रथम लहान लहान संघटना अस्तित्वात येतात व नंतर त्यांच्या एकत्रीकरणांतून विशाल अशी संघटना जन्मास येते. भारतही याला अपवाद नाही. इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली पण तिच्या आगोदर अनेक लहान मोठ्या संघटना निर्माण झाल्या होत्या. या संघटनांनी भारताच्या विविध प्रांतात मोठ्या प्रमाणात राजकीय जागृती घडवून आणली.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी हिंदुस्थानात एखादी राजकीय संघटना असावी अशा दृष्टीने बरेच प्रयत्न चालू होते. विशेषतः बंगाल, मुंबई, मद्रास, पुणे इ. प्रांतात राजकीय संघटना कार्यरत होत्या. इ.स. १८३७ मध्ये बंगाल प्रांतात "जमीनदारांची एक संघटना " स्थापन झाली. सरकारने जमीनदारांच्या अधिकारांवर आक्रमण करु नये म्हणून ही संस्था स्थापन केलेली होती. भारतीयांचा हा पहिलाच प्रयत्न असल्यामुळे बंगालच्या जमीनदारांच्या संस्थेला एक वेगळे महत्व प्राप्त झाले. २६ ऑगस्ट १८५२ रोजी मुंबईतील प्रमुख हिंदू, मुसलमान, पोर्तुगीज, पारशी आणि ज्यू यांचे पुढारी एकत्र येऊन आणि लोकांच्या मागण्या सरकारसमोर मांडण्याकरिता आणि त्या मागण्या इंग्लडमधील सरकारपर्यंत पोहचविण्याकरिता "बॉम्बे असोसिएशन" नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेमध्ये दादाभाई नौरौजी, व्ही.एन. मंडलिक आणि नवरोजी फर्दुनजी यासारखे पुढारी सामील झाले. या संस्थेला फार मोठे यश प्राप्त झाले. या संस्थेने ब्रिटीश पार्लमेंट कडील अर्जात जनतेला कमी त्रासदायक होईल अशा प्रकारची सरकारी यंत्रणा निर्माण झाली पाहिजे असा आग्रह धरला. अर्जामध्ये म्हटले होते की जरी ब्रिटीश राज्य हे भारतीय जनतेला सध्या फायदेशीर असले तरी ते फायदे ब्रिटीशांच्या एकूण

उच्च बुद्धीमत्तेमुळे होत आहेत. परंतु त्यामागे सरकारची काही विशेष योजना असलेली आपल्याला आढळून येत नाही. युरोपियन अधिकाऱ्यांना जो लठ्ठ पगार दिला जात होता त्याचाही निषेध या असोसिएशनने केला. भारतीय लोकांना प्रशासनामध्ये किंवा निरनिराळ्या सरकारी संस्थांमध्ये वरच्या जागा मिळत नव्हत्या याविरूद्ध आवाज उठविला. ब्रिटीश राजकारणांत बॉम्बे असोसिएशनने मोठी खळबळ निर्माण केली हे गोष्ट नमूद केली पाहिजे.

इ.स. १८६६ मध्ये दादाभाई नौरोजी यांनी लंडनला "ईस्ट इंडिया असोसिएशन" ही संस्था स्थापन केली. इंग्लंडमध्ये राहून भारतीय प्रश्नांची चर्चा करावयाची आणि ब्रिटिश पार्लमेंटचे लक्ष भारतीय प्रश्नांकडे वळवायाचे हे संस्थेचे ध्येय निश्चित केले. दादाभाईनी इंग्लडमध्ये राहून अनेक बैठका, चर्चा, सभा घेऊन सुशिक्षित इंग्रजांवर प्रभाव पाडला. १८६९ मध्ये दादाभाई भारतात परत आले आणि त्यांनी सर्व भारतीयांनी आपल्या डोळ्यासमोर भारतानेच पार्लमेंट स्थापन करण्याचे ध्येय ठेवावे असे सांगितले.

इ.स. १८६७ मध्ये पुण्याला "पुना असोसिएशन" नावाची संस्था स्थापन झाली. पुढे १८७० मध्ये रानडे, ग.वा. जोशी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी सहभाग घेऊन पुना असोसिएशनचेच नामकरण "पुना सार्वजनिक सभा" असे करण्यात आले. ग.वा. जोशी उर्फ सार्वजनिक काका हे या संस्थेची प्रेरणाशक्ती होते. त्यांचे कार्य जवळ जवळ ३० वर्षापर्यंत चालले होते. या संस्थेच्या सदस्यांना राजकीय चर्चेत विलक्षण आस्था आणि रस वाटत होता. पुढील काळात न्या. रानडे यांच्या प्रेरणेने सार्वजनिक सभेमार्फत सामाजिक व राजकीय जागृतीचे कार्य सुरु झाले. पश्चिम महाराष्ट्रात सनदशीर राजकीय चळवळीचा पाया घालून आर्थिक उन्नतीसाठी औद्योगीकरणाचा व स्वदेशीचा मंत्र या संस्थेने दिला. सार्वजनिक काकांनी ठिकठिकाणी स्वदेशी मालाची दुकाने उघडली. स्वदेशीला उत्तेजन देऊन राजकीय जागृती करण्यास उत्तेजन दिले. १८७७ साली महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्तांना सरकारवर दबाव आणून मदत मिळवून दिली. अविरत व निस्वार्थी कार्यामुळे सार्वजनिक सभेच्या शाखा वाई, सातारा, नाशिक, सोलापूर येथेही स्थापन झाल्या. १८९६ रोजी या सभेची सुत्रे टिळकांच्या जहाल गटाकडे गेली. या संस्थेचा राजकीय जागृतीसाठी उपयोग करुन घेतला.

अमृतबझार पत्रिकेचे संपादक शिशिरकुमार बोस यांच्या प्रेरणेने इ.स. १८५७ मध्ये "इंडिया लीगची" स्थापना झाली. बंगालमध्ये राजकीय जागृती घडवून आणणे हा इंडिया लीगचा हेतु होता. कालांतराने सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि आनंद मोहन बोस यांनी २६ जुलै १८७६ रोजी "इंडियन असोसिएशन" या संस्थेची स्थापना केली या संस्थेचा हेतू पुढीलप्रमाणे होता देशामध्ये लोकमत जागृत आणि संघटित करणे, भारतातील विविध जाती, धर्माच्या व वंशाच्या लोकांची एकजूट घडवून आणणे. हिंदू आणि मुसलमान यांच्यात मित्रत्वाची भावना निर्माण करणे आणि देशातील राजकीय चळवळीत बहुसंख्य जनतेला सामील करुन घेणे. इ.स. १८७७ मध्ये सिव्हिल सर्व्हिस परीक्षेचे वय २१ वरुन १९ वर्षे केले म्हणून या असोसिएशनने त्याचा निषेध केला. बॅनर्जीनी सर्व देशाचा दौरा करुन, सरकारच्या धोरणावर कडाडून टीका करुन लोकमत

जागृत केले. राजकीय जागृतीसाठी माध्यम म्हणून १८७९ रोजी “बंगाली” हे वृत्तपत्र या संस्थेने सुरु केले. अफगाण युद्धावर भारतीय पैशाची उधळपट्टी, दुष्काळाबाबत सरकारची उदासिनता या विषयांवर लोकमत जागृत केले. लॉर्ड रिपनच्या पुरोगामी धोरणांना या संस्थेने पाठिंबा दिला. या संस्थेमार्फत राष्ट्रीय स्तरावर भारतात व भारताबाहेर सनदशीर चळवळ इतिहासात इंडियन असोसिएशनला महत्वपूर्ण स्थान आहे. राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेची ही पहिली पायरी होती.

इ.स. १८८४ साली सी. सुब्रमण्य अय्यर, आनंद चार्लू व इतर कांही नेत्यांनी “मद्रास महाजन सभेची” स्थापना केली. मुंबईला जानेवारी १८८५ मध्ये फिरोजशाह मेहता, के.टी. तेलंग, बदरुद्दिन तय्यबजी व इतर पुढाऱ्यांनी, “बॉम्बे प्रेसिडन्सी असोसिएशन” संस्थेची स्थापन केली. सार्वजनिक सभांतून भारतीयांच्या प्रश्नांची चर्चा करुन राजकीय दृष्टया लोकमत जागृत करणे, जनतेच्या मागण्यांचे निवेदन सरकारला सादर करणे ही कामे या संस्थेने केली. याच संस्थेचे रुपांतर, “भारतीय राष्ट्रीय सभेमध्ये” घडून आले. अशा परिस्थितीत “भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस” ची स्थापना होण्यापूर्वी हिंदुस्थानात विविध भागांमध्ये, जागृतीचे, संघटनेचे प्रयत्न चालू होते परंतू या प्रयत्नांना आखिल भारतीय स्वरुप अद्याप आलेले नव्हते.

## ३.४ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना :

इंग्रज राज्यकर्त्यांकडून होणाऱ्या अन्यायाची दाद मागणे, वैचारिक जागृती व भावनात्मक ऐक्य घडवून आणणे, राष्ट्रवादाचा विकास घडवून आणणे ही व उद्दीष्टये राष्ट्रसभेच्या पूर्वीच्या संघटनांची होती. विविध प्रांतात सुशिक्षितांनी अनेक संघटना स्थापन केल्या होत्या. अखिल भारतीय पातळीवरील राजकीय संघटनेचा अभाव होता. ती स्थापन करण्याच्या कल्पनेचा मान सेवानिवृत्त इंग्रज आय्.सी.एस. अधिकारी ॲलन ऑक्टोव्हियन ह्यूम यांना दिला जातो. ह्यूम सरांना, विल्यम वेडरबर्न व सर हेन्री कॉटन या दुसऱ्या दोन सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळाले, हे इंग्रज अधिकारी इंग्रज साम्राज्याशी एकनिष्ट होते. तथापि, हिंदी लोकांची दु:खे, त्यांची पिळवणूक व त्यातून निर्माण होणारी हालाखी, त्यांचा असंतोष यांचे बारकाईने निरीक्षण केले होते. हिंदी लोकांचा धुमसणारा असंतोष इंग्रज राज्यकर्त्याविषयी दिसून येणारा वाढता तिरस्कार व त्यातून उद्‌भवणारी राष्ट्रवादी भावना यांची त्यांना जाणीव झाली होती. या असंतोषाला दडपून न टाकता त्यास विधायक वळण देण्याची व त्यासाठी “अखिल भारतीय व्यासपीठ” स्थापन करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती.

ॲलन ह्यूम हे सेवानिवृत्त सनदी नोकर असल्याने १८५७ मध्ये इटावा जिल्ह्यात मॅजिस्ट्रेट म्हणून कार्यरत होते. १८५७ चे हिंदी लोकांचे बंड जवळून पाहिले होते. वेडरबर्न याने तर वासुदेव बळवंताचे बंड प्रत्यक्ष बघितले होते. हिंदुस्थानातील असंतोष असाच वाढत राहिला तर त्यातून अनेक वासुदेव बळवंत उदयास येतील असे त्यांचे मत बनले होते. थोडक्यात लष्करी बळावर उभे असलेले इंग्रजी साम्राज्य हिंदुस्थानातील असंतोष दडपून टाकू शकत नाही,

त्यासाठी विधायक चळवळीची आवश्यकता आहे असे या इंग्रज अधिकाऱ्यांना वाटत होते. ह्यूमनी या कामी पुढाकार घेऊन कलकत्ता विद्यापिठाच्या पदवीधरांना एक परिपत्रक पाठविले. या पत्रकात त्याने "हिंदुस्थानी लोकांची मानसिक, नैतिक, सामाजिक व राजकीय प्रगती साधण्यासाठी एक देशव्यापी संघटना स्थापन करण्याचे" आवाहन केले होते. आव्हानाला योग्य प्रतिसाद मिळाल्याने ह्यूमने प्रथम डिसेंबर १८८४ मध्ये इंडियन नॅशनल युनियनची स्थापना केली. एका वर्षात बनारस, अलाहाबाद, कराची, सुरत, अहमदाबाद, मुंबई इ. ठिकाणी तिच्या शाखा स्थापन झाल्या. दरम्यान ह्युमने इंग्लंडला जाऊन नॉर्थब्रुक, रिपन, जॉन ब्राईट या विचारवंतांची अशा संघटनेला सहानुभूती मिळवली होती. स्वतः सेवानिवृत्त अधिकारी असल्याने सरकार-दरबारची त्यास आडकाठी आली नाही. भारतात परतल्यावर त्यावेळचा व्हॉईसरॉय लॉर्ड डफरीन यांच्या कानावर ही गोष्ट घातली. लॉर्ड डफरीनने असा सल्ला दिला की, इंग्लडच्या पार्लमेंटमध्ये जसा विरोधी पक्षकार्य करतो तशा पद्धतीचे कार्य या भावी संघटनेने करावे, या संघटनेने सरकारच्या कारभारातील दोष उघडकीस आणावेत, संघटनेने ते दुरुस्त करण्यासाठी सूचना कराव्यात, तसेच लोकांची राजकीय भावना सरकारच्या कानावर घालावी. ह्यूमला व त्यानंतर इतर हिंदी नेत्यांना हा विचार पटला.

डफरीनने हिरवा कंदील दाखविल्यानंतर ह्यूमने भारतीय पुढाऱ्यांशी वाटाघाटी करुन १८८५ च्या अखेर पुण्यात राष्ट्रीय सभेचे अधिवेशन घेण्याचे निश्चित केले. सर्व प्रांतातील संघटनांना आपले प्रतिनिधी पाठविण्याचे अवाहन करण्यात आले. अधिवेशनाची तयारी सुरु असताना तेथे कॉलऱ्याची साथ पसरली त्यामुळे हे अधिवेशन मुंबईला घेण्याचे ठरले. हिंदुस्थानातील प्रमुख नेते मुंबईस जमले. सर्व हिंदुस्थानातून ७२ प्रतिनिधी राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनाला हजर होते. २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत कॉलेजच्या सभागृहात अधिवेशन भरले. अध्यक्षस्थानी कलकत्त्याचे थोर कायदेपंडित व विचारवंत व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते. याच अधिवेशनात "भारतीय राष्ट्रसभेची" घोषणा करण्यात आली. या अधिवेशनाला दादाभाई नौरोजी, न्या. तेलंग, फिरोजशाह मेहता, दिनशा वाच्छा, नरेंद्रनाथ सेन, गिरिजाभूषण मुखर्जी, न्या. रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर, लो. टिळक, रंगय्या नायडू, जी. सुब्रमण्यम अय्यर, वरी राधवाचार्य, आनंदा चार्लू, गंगा प्रसाद वर्मा इ. भारतीय तर सर विल्यम वेडरबर्न, हेन्री कॉटन, नार्टन हे युरोपियन उपस्थित होते.

## ३.५ राष्ट्रीय काँग्रेसची ध्येयधोरणे :

राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनाचे उमेशचंद्र बॅनर्जी आपल्या अध्यक्षीय भाषणात राष्ट्रसभेच्या ध्येयधोरणाची रुपरेषा सांगितली आहे. ती खालीलप्रमाणेः

१) देशाच्या भिन्न प्रदेशात राहणाऱ्या व देशसेवा करु इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये जवळीक व मैत्री निर्माण करणे.

२) सर्व देशप्रेमी लोकांमधील धर्मभेद, पंथभेद, वंशभेद व संकुचित भावना नष्ट करण्याचा प्रयत्न करणे.

३) राष्ट्रामध्ये ऐक्य व संघटनेची भावना वाढीस लावणे.

४) देशातील सुशिक्षित वर्गाच्या मतांचा सामाजिक प्रश्नांसंदर्भात मागोवा घेणे.

५) पुढील वर्षाच्या काळात हिंदी नेत्यांनी हाती घ्यावयाच्या कार्यक्रमाची दिशा ठरविणे.

वरील मुद्यावरुन लक्षात येते की, राष्ट्रसभेची अगदी सुरुवातीची धोरणे हिंदी जनतेत देशभक्तीची व राष्ट्रऐक्याची वाढ करु इच्छिणारी संधी होती. काळाच्या ओघात राष्ट्रसभा अधिक प्रभावी बनू लागली व तिच्या दर वर्षीच्या अधिवेशनात विविध ठराव मंजूर केले. १८८५ ते १९०५ या काळातील अधिवेशनात जे विविध ठराव राष्ट्रसभेने मंजूर केले त्यावरुन राष्ट्रसभेच्या ध्येयधोरणाची कल्पना येऊ शकते. राष्ट्रसभेने सरकारकडे पुढील मागण्या केल्या. १) व्हाईसरॉय व गव्हर्नर यांच्या कार्यकारी मंडळाची वाढ करुन त्यामध्ये हिंदी सभासदांची नियुक्ती निवडणूक तत्वानुसार व्हावी. २) भारतमंत्री व त्याचे मंडळ बरखास्त करण्यात यावे. ३) स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार व स्वायतत्ता मिळावी. ४) लष्करी खर्च कमी करावा व लष्करांत इंग्रज अधिकाऱ्यांच्या जागी हिंदी अधिकाऱ्यांच्या नेमणुका कराव्यात. ५) हिंदी कापड उद्योगांचे पुनरुज्जीवन करावे. नविन उद्योगधंद्याना चालना देऊन सरकारने बेकारी - निवारण करावे. ६) आय.सी.एस. परीक्षा हिंदुस्थानात घ्याव्यात. ७) कमी दराने शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणाऱ्या ग्रामीण बँका स्थापन कराव्यात. ८) जमीन-महसूल कमी करावा. ९) वृत्तपत्रांना अधिक स्वातंत्र्य मिळावे. १०) प्रशासनांत वरच्या जागांवर हिंदी लोकांना घेतले जावे. ११) न्यायसंस्था सरकारी दबावापासून दूर व्हावी. १२) हिंदी लोकांच्या तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाची सोय करावी. १३) हिंदुस्थानबाहेर स्थायिक झालेल्या हिंदी लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण व्हावे. १४) जमीनदारांच्या जुलमापासून रयतेचे संरक्षण व्हावे इत्यादी.

थोडक्यात, प्रारंभीच्या दहा वर्षाच्या काळातील मागण्यावरुन हे स्पष्ट होते की, राष्ट्रसभेला हिंदुस्थानातील इंग्रजी सत्ता उलथून पाडावयाची नव्हती. राष्ट्रसभेचे म्हणणे असे होते की, इंग्रजांनी हिंदी लोकांच्या कल्याणासाठी कारभार केला पाहिजे. हिंदी लोकांवर अन्याय करु नये. हळूहळू हिंदी लोकांना राज्यकारभाराचे शिक्षण द्यावे व आपल्या देशाचा कारभार करण्यास समर्थ करावे. कॉंग्रेसच्या अधिवेशनात वरील ठराव मांडले गेले असले तरी ते ठराव इंग्रजांनी पास करावे असा आग्रह मोठ्या प्रमाणात धरला गेला नाही कारण कॉंग्रेसची स्थापना ही ब्रिटीशांच्या सहकार्याने झालेली असल्याने कोणीही नेता सुरुवातीला आक्रमक भूमिका घेण्यास तयार नव्हता अधिवेशनाच्या चर्चासत्रात भाषण करणाऱ्या प्रत्येक नेत्याने ब्रिटीश शासनावरील निष्ठा वारंवार व्यक्त केल्या, कॉंग्रेसचे धोरण इंग्रजनिष्ठ असणे स्वाभाविकच होते. भारतीयांच्या मागण्यांचा सरकार सहानुभूतीने विचार करील अशी अपेक्षाही व्यक्त केली. पण पुढील काळात इंग्रज राजवटीला धक्के देऊन स्वातंत्र्य आंदोलनाची सुरुवात केली.

**३.५.१ आपली प्रगती तपासा :**

१. राष्ट्रीय सभेच्या स्थापने अगोदरची राजकीय पार्श्वभूमी स्पष्ट करा.

## ३.६ सारांश

१८५७ च्या उठावानंतर खऱ्या अर्थाने भारतात राष्ट्रवादाची वाढ होण्यास सुरुवात झाली व संपूर्ण भारतातील जनता विविध संघटनाच्या माध्यमातून एकत्र येऊ लागले. या संघटना सुरुवातीला प्रादेशिक स्वरुपाच्या होत्या. नंतरच्या काळात या सर्व संघटनांनी एकत्र येऊन भारतीय राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून स्वातंत्र्य चळवळ सुरु केली. राष्ट्रीय सभेने जनमानसांत प्रबोधन करुन लोकजागृती केली व पुढे याचा कायदा स्वांतत्र्य चळवळीत झाला.

## ३.७ प्रश्न

१) भारतातील राष्ट्रवादाच्या उदयाची कारणमिमांसा करा.

२) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस स्थापन होण्यापूर्वी तशा प्रकारची संघटना स्थापन करण्याच्या प्रयत्नांचा आढावा घ्या.

३) भारतीय राष्ट्रसभेच्या स्थापनेस कारणीभूत झालेल्या परिस्थितीची माहिती द्या.

४) भारतीय राष्ट्रसभेच्या स्थापनेस कोणती कारणे कारणीभूत होती ते लिहा.

❖❖❖❖

# ४

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ - १

## भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसचा विकास

**प्रकरण रुपरेषा :**

४.० उद्दिष्टे
४.१ भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस व तिचे कार्यक्रम
४.२ मवाळ युग
४.३ जहाल युग
४.४ मोर्लेमिंटो सुधारणा कायदा
४.५ होमरुल चळवळ
४.६ मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा
४.७ सारांश
४.८ प्रश्न

## ४.० उद्दिष्टे :

१) राष्ट्रीय कॉँग्रेसच्या वेगवगळ्या टप्प्यांचा अभ्यास करणे.
२) राष्ट्रीय चळवळीतील जहाल, मवाळ युगातील महत्त्वाच्या घडामोडींचा अभ्यास करणे.
३) मोर्लेमिंटो सुधारणा कायद्यातील तरतुदींचा अभ्यास करणे.
४) होमरुल चळवळीचे कार्य व योगदान समजून घेणे.
५) मार्टेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदयातील तरतुदीचा अभ्यास करणे.

## ४.१ भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस व तिचे कार्यक्रम १८८५ ते १९२०

२८ डिसेंबर १८८५ रोजी भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसची स्थापना होऊन भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचे नेतृत्व करणाऱ्या राष्ट्रीय संघटनेचा जन्म झाला. संपूर्ण हिंदुस्थान एक देश आहे आणि भारतीय लोकांना स्वशासनाचा हक्क आहे या दोन तत्वावर हिंदुस्थानात जागृती घडून आली. युरोपात व्यक्तिस्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद यांची १९ व्या शतकात जी लाट निर्माण झाली होती, तिचे पडसाद हिंदुस्थानात उमटू लागले होते. ब्रिटीशांनी सुद्धा आपल्या उदार धोरणाला अनुसरुन १८९३ च्या चार्टर ॲक्टमध्ये "ब्रिटीश भारतात राहणाऱ्या भारतीयांचे लोक कल्याण

साधणे" हे ब्रिटीश सरकारचे ध्येय राहील, असे जाहीर केले होते. १८५८ च्या कायद्यात सुद्धा ब्रिटीशांनी हे धोरण जाहीर केले होते. ब्रिटीश राज्यकर्ते आपल्या उदारमतवादी घोषणांप्रमाणे वर्तन करतील असे भारतीयांना वाटत होते. अधिवेशन संपवून परत निघालेले नेते एक नवी राजकीय जाणीव, एक नवीन स्फूर्ती बरोबर घेऊन आपापल्या प्रांतात गेले.भारतीय वृत्तपत्रांकडूनही अपेक्षेपेक्षा अधिक प्रतिसाद मिळाला. भारतीयांच्या राजकीय विचारांचे व मागण्यांचे राष्ट्रीय व्यासपीठ म्हणून काँग्रेसचे उत्साहाने स्वागत केले. सुरुवातीला काँग्रेस बाल्यावस्थेत होती. या काळात ब्रिटीशांचे बोट धरुन त्यांच्या सहकार्याने आणि सौजन्याने तिची वाटचाल सुरु होती. लवकरच इंग्रजांचा हात सोडून स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा तिने प्रयत्न केला. त्यातूनच ती कृतीशील बनत गेली. राष्ट्रीय काँग्रेसचा इतिहास लक्षात घेत असताना "भारतीय राष्ट्रीय काँग्रेस " ज्या अवस्थांमधून गेली त्या अवस्थांचा अभ्यास करावा लागतो.

## ४.२ मवाळांचा कालखंड १८८५-१९०५ (मवाळ काँग्रेस)

या कालखंडातील काँग्रेसच्या राजकारणावर दादाभाई नौरोजी, फिरोजशाह मेहता, दिनशॉ वाच्छा, व्योमेशचंद्र बॅनर्जी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्यासारख्या नेत्यांचा प्रभाव होता. हे नेते उदारमतवादी व सनदशीर राजकारणावर विश्वास ठेवणारे होते. त्यांच्या विचारसरणीवरुन आणि कार्यपद्धतीवरुन त्या गटाला मवाळवादी किंवा नेमस्तवादी असे म्हटले जाते. ते इंग्रज शासनाशी एकनिष्ठ होते. इंग्रजांशिवाय हिंदुस्थानचा विकास अशक्य आहे व इंग्रज राजवट वरदान आहे, अशी त्यांची भावना होती. ब्रिटीशांच्या उदारमतवादावर, न्यायप्रियतेवर त्यांचा विश्वास होता. इंग्लंड ही लोकशाहीची मातृभूमी आहे असे त्यांचे मत होते. ब्रिटीश शासन उलथून पाडण्याचा विचारही त्यांच्या मनात डोकावत नव्हता.

ब्रिटीशांच्या सौजन्याने भारतीयांना मूलभूत अधिकार, स्वयंशासनाचे अधिकार, हिंदूना शासनात सहभाग, आर्थिक प्रगती, भौतिक सुधारणा, आधुनिक शिक्षणाचा प्रसार, दारिद्र्याचे निर्मूलन, मानवामधील समानता, कायद्यासमोर समानता, प्रातिनिधीक संस्थांचा विकास अशा प्रकारची उद्दीष्टये काँग्रेसच्या या उदारमतवादी व मवाळ नेत्यासमोर होती. त्यांच्या कार्यपद्धतीबाबत न्यायमूर्ती रानडेनी लिहिले होते, "मवाळ याचा अर्थ अप्राप्य गोष्टीची खोटी आशा धरु नये आणि जे मिळण्यासारखे आहे ते मिळविण्यासाठी चांगल्या व समझोत्याच्या मार्गाने समोर जावे". अशाप्रकारे मवाळ नेते घटनात्मक मार्गावर आणि टप्प्याटप्प्याने जाण्यावर विश्वास ठेवीत होते. राज्यकर्त्यांकडून राजकीय अधिकार मिळविण्यासाठी शांततापूर्ण व सनदशीर मार्ग त्यांना योग्य वाटत होता. सशस्त्र क्रांती, चळवळ, उठाव या मार्गावर त्यांचा विश्वास नव्हता.

मवाळांनी आपल्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी अर्ज, विनंत्या, ठराव, चर्चा या मार्गाचा अवलंब केला. अर्जातून मागण्या मांडल्या जात असत. ब्रिटीश उदारमतवादावर त्यांची निष्ठा असल्यामुळे, ब्रिटीश जनतेला भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव करुन दिल्यास ब्रिटीश लोकमताचे दडपण राज्यकर्त्यावर येईल अशी त्यांची धारणा होती. म्हणून भारताप्रमाणेच

इंग्लंडमध्येही काँग्रेसच्या ध्येय धोरणाचा प्रसार या गटाने सुरु केला. काँग्रेसची एक शाखा लंडनमध्ये स्थापन करण्यात आली. या काळातील काँग्रेस वकील, डॉक्टर, इंजिनिअर, साहित्यिक, पत्रकार अशा समृद्ध मध्यमवर्गीयांच्या ताब्यात होती. या मध्यमवर्गीयांचे विचार आणि कार्यप्रणाली तत्कालीन राष्ट्रीय संघर्षाची मुख्य कार्यप्रणाली होती. या मंडळींना मोठमोठी पदे आणि पदव्यांचे आकर्षण होते. काँग्रेसमध्ये येणारे प्रतिनिधी मोठमोठ्या शहरातून येत असल्याने सर्वसामान्य जनतेशी त्यांचा कोणताही संपर्क नव्हता तरी त्यांच्या समस्यांची जाणीव त्यांना होती. वैचारिकदृष्टया ते राज्यकर्त्यांना जवळचे असले तरी त्यांनी स्वतः भोवती एक सीमारेषा आखून घेतली होती. जाती-धर्मांची बंधने त्यांना मान्य नव्हती. ब्रिटीशांनी त्यांच्या मागण्या धुडकावून लावल्या तरी त्यांना वाईट वाटत नव्हते. ब्रिटिशांबद्दल कधीही चीड, संताप त्यांनी व्यक्त केला नाही. वाटाघाटी व सनदशीर मार्गावर त्यांची श्रद्धा होती.

### ४.२.१ काँग्रेसची अधिवेशने (१८८५-१९०५)

१) २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईत काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले. व्योमेशचंद्र बॅनर्जी राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनापासून मवाळ नेत्यांचे कार्य सुरु झाले. या अधिवेशनास संपूर्ण देशातून ७२ प्रतिनिधी आले होते.

२) इ.स. १८८६ मध्ये राष्ट्रसभेचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे दादाभाई नौरोजींच्या अध्यक्षतेखाली भरले. इंग्रज सतेच्या फायद्याचे विस्तृत वर्णन केले आणि उपस्थितांनी जोरजोराने टाळ्या वाजवून दाद दिली. ह्यूमच्या म्हणण्यानुसार अधिवेशनात राणी व्हिक्टोरियाचा तीन वेळा जयजयकार करुन तिच्या दीर्घायुसाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी सुरेंद्रनाथ बॅनर्जींनी निस्वार्थी दृष्टीकोनातून आपली नॅशनल कॉन्फरन्स ही संघटना स्थापली होती. अधिवेशनात सर्व देशातून जवळ जवळ ४२६ प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनात सामान्य जनतेच्या समस्यांवर मतप्रदर्शन करण्यात आले. स्वतः अध्यक्षांनी समस्या सोडविण्यावर व देशाच्या आर्थिक उन्नतीवर आपल्या भाषणात भर दिला. महत्त्वाचे ठराव पास करुन सरकारकडे पाठविण्यात आले. पहिल्या अधिवेशनाप्रमाणे यावेळीही इंग्रज सरकारवर निष्ठा व्यक्त करण्यात आली. पहिल्या अधिवेशनापेक्षा आपल्या मागण्या अधिक आग्रही स्वरुपात मांडल्या होत्या.

३) इ.स. १८८७ मध्ये मद्रास येथे तिसरे अधिवेशन भरले. या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रसिद्ध कायदेतज्ञ बद्रदुद्दीन तैयबजीं होते. मद्रासच्या गव्हर्नरने सभेच्या सदस्यांना चहा-पान करुन त्यांचा सन्मान केला. दिवसेंदिवस सदस्यांची संख्या वाढत होती. या अधिवेशनला सहाशेपेक्षा जादा प्रतिनिधी हजर होते. बद्रुद्दीन तैयबजींनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मुस्लीम जनतेला आवाहन करुन राष्ट्रीय संघटनेत सामील होण्याचे व राष्ट्रीय प्रवाहात एकरुप होऊन कार्य करण्याची विनंती केली. या अधिवेशनानंतर काँग्रेसची लोकप्रियता अफाट वाढली. तरुणांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढला. परदेशातील हिंदी लोकांकडून काँग्रेसला देणग्या व पाठींबा मिळू लागला.

४) राष्ट्रीय काँग्रेसचे चौथे अधिवेशन इ.स. १८८८ रोजी अलाहाबादला भरले. या अधिवेशनात अनेक अडचणी निर्माण झाल्या होत्या. प्रत्येक अधिवेशनागणिक काँग्रेसमध्ये सुशिक्षितांचा वाढता सहभाग, वाढती लोकप्रियता इंग्रजांच्या डोळ्यात खुपत होती. काही सदस्य शासनावर निर्भिड टीका करु लागल्याने ब्रिटीश सरकार अस्वस्थ होऊ लागले. राष्ट्रसभेचा सुत्रधार ह्यूम याने राष्ट्रसभेच्या कार्यक्रमाविषयी घेतलेली आक्रमकता ब्रिटीशांना सलत होती. आपल्या परिपत्रकातून व भाषणांतून त्याने हिंदी लोकांना "अँटी कॉर्न लॉ लीग" च्या धर्तीवर चळवळ उभारण्याचा आदेश दिला. ह्यूम म्हणतो, "राष्ट्रसभेच्या प्रतिनिधींनी आजपर्यंत सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे, पण सरकारने जागे होण्याचे नाकारले आहे. सर्व अनियंत्रित सरकारांप्रमाणे आमचे सरकारही बोध घेण्याचे नाकारत आहे. आता आपण राष्ट्राला जागे केले पाहिजे. आपल्या हक्कासाठी जो लढा आम्ही सुरु केला आहे, त्यात या भारतमातेच्या पवित्र्य जपणारा प्रत्येक हिंदी मनुष्य आमचा सहकारी, आमचा बंधू व गरज पडल्यास आमचा सैनिक बनला पाहिजे."

ह्युमच्या धोरणाबद्दल ब्रिटीश नोकरशाही खवळली होती. नोव्हेंबर १८८८ रोजी केलेल्या भाषणांत गवर्नर.जनरल लॉर्ड डफरीनने काँग्रेसवर रोष व्यक्त करुन ह्यूम व इतर काँग्रेस नेत्यांच्या कार्याविषयी नापसंती व्यक्त केली. सरकारी नोकरांनी राष्ट्रीय काँग्रेसशी संबंध ठेवू नयेत असा इशारा दिला. दरम्यान ऑगस्ट १८८८ मध्ये सर सय्यद अहमदखान व वाराणसीच्या राजा शिवप्रसाद यांनी काँग्रेसला विरोध करणारी अलिगढ येथे एक संघटना उभारली व मुस्लिमांनी काँग्रेस अधिवेशनात भाग घेऊ नये असे पत्रक काढले. अखेर या अडचणीवर मात करुन काँग्रेसचे अधिवेशन सुरु झाले. कलकत्याचे उदारमतवादी ब्रिटीश व्यापारी डेव्हीड युल यांना अध्यक्षपद देण्यात आले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानावरुन त्यांनी हिंदूस्थानमध्ये प्रतिनिधिक राज्यपद्धतीचा पुरस्कार करुन "राष्ट्रसभेची चळवळ पार्लमेंटच्या व महाराणीच्या हेतूंना धरुन होत आहे" असे मत व्यक्त केले. सनदशीर मार्गाने कार्य करणाऱ्या संघटनेत सहभागी होणे हा राष्ट्रद्रोह नाही असे सांगितले. अधिवेशनातील सदस्यसंख्या तर वाढलीच पण अहमद खानाचा सल्ला धुडकावून २२१ मुस्लीम सदस्य अधिवेशनाला उपस्थित होते. १८८९ मध्ये काँग्रेसची कायम स्वरुपी शाखा लंडनमध्ये स्थापन केली.

५) राष्ट्रीय काँग्रेसचे पाचवे अधिवेशन मुंबईला भरले. या अधिवेशनाची सदस्य संख्या १८८९ होती. या अधिवेशनाचे अध्यक्षपद सेवानिवृत्त ब्रिटीश अधिकारी सर विल्यम वेडरबर्न यांना दिले होते. त्यांनी ब्रिटीश पार्लमेंटमध्ये हिंदी प्रश्नांना वाचा फोडून त्यासाठी संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे ब्रिटीश संसदेतील हिंदुस्थानचा सभासद म्हणून त्यांना ओळखले जाते. त्यांच्या प्रयत्नामुळे १८९२ चा सुधारणा कायदा पास झाला.

६) फिरोजशहा मेहता यांच्या अध्यक्षतेखाली इ.स. १८९० मध्ये कोलकत्ता येथे काँग्रेसच सहावे अधिवेशन भरले. सातवे १८९१ मध्ये नागपुरला तर आठवे अधिवेशन १८९२ मध्ये अलाहाबादला भरले. अशाप्रकारे दरवर्षी काँग्रेसचे अधिवेशन बोलावून त्यामध्ये गरजेप्रमाणे विविध ठराव मंजूर केले जात होते.

### ४.२.२ मवाळांची कामगिरी (१८८५-१९०५)

**१) सरकारविरुद्ध आक्रमक पवित्रा :** इंग्रजाशी एकनिष्ठ असलेली काँग्रेस पहिल्या दोन-तीन अधिवेशनानंतर आपल्या मागण्यांबद्दल आक्रमक बनू लागली. चौथ्या अधिवेशनाच्या वेळी इंग्रजांनी अनेक अडचणी निर्माण केल्या. हिंदी लोकांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करुन दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब केला. लॉर्ड कर्झनची जुलमी राजवट, त्याने केलेली बंगालची फाळणी, जुलमी कायदे, हिंदूचा द्वेष, राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांकडून सद्वर्तनासंबंधी जामीन मागणे, राष्ट्रभाषेच्या अधिवेशनांसाठी सरकारी नोकरांना बंदी इ. जुलमी कृत्यामुळे सरकारविरुद्ध आक्रमक पवित्रा धारण केला.

**२) हिंदी लोकात उत्साह व जनजागृती :** राष्ट्रसभेने सुरु केलेली चळवळ दडपून टाकण्याचा सरकार जसजसा प्रयत्न करु लागले. तसतशी तिची लोकप्रियता वाढू लागली. ह्यूमच्या परिपत्रकातून व आवेशयुक्त, भावपूर्ण भाषणातून हिंदी जनतेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. राजकीय प्रश्नांसाठी जाती-धर्म-प्रांत यासारखे मतभेद विसरुन लोकांना एकीचे महत्त्व पटवून दिले. सभा, ठराव, लेख, परिपत्रके याद्वारे जनजागृती घडवून आणली. दादाभाई नौरोजींनी म्हटले होते की, "मी अर्ज विनंत्या करुन थकलो आहे, तरुण असतो तर इंग्रजांविरुद्ध बंड केले असते". या जनजागृतीमुळे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढला. ॲलन ह्यूमच्या मते, "राष्ट्रसभेची कल्पना आज लोकांत इतकी रुजली आहे की कोणतीही ऐहिक शक्ती तिला दडपून टाकू शकणार नाही. "

**३) युरोपियन नेत्यांचे सहकार्य :** ब्रिटीश पार्लमेंटमध्ये हिंदी जनतेच्या हक्कांबद्दल सहानुभूती बाळगणारे कांही उदारमतवादी सभासद होते. त्यामध्ये चार्लस ब्रॅडला हा स्वातंत्र्यप्रिय सभासद प्रमुख होता. त्याला राष्ट्रसभेच्या नेत्यांनी आपल्या कार्यासाठी वश केले आणि त्याच्याकरवी ब्रिटीश पार्लमेंटमध्ये हिंदी कायदेमंडळाच्या सुधारणासंबंधीचे बील मांडण्याची योजना केली. त्याच्या सहकार्याने राष्ट्रसभेच्या नेत्यांशी चर्चा करुन पार्लमेंटमध्ये मांडावयाचे बील तयार केले. इ.स. १८९४ च्या राष्ट्रसभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद अल्फ्रेड वेब या पार्लमेंटच्या आयरिश सभासदास दिले होते. एवढेच नव्हे तर सर विल्यम वेडरबर्न, केन यासारख्या हिंदी लोकांविषयी सहानुभूती वाटणाऱ्या सभासद मित्रांची दादाभाईनी "इंडियन पार्लमेंटरी कमिटी" स्थापन केली. या समितीत कांही मजूरपक्षीय व स्वतंत्र सभासदांचा पाठिंबा मिळविला व तिच्यामार्फत हिंदी लोकांच्या प्रश्नांवर पार्लमेंटमध्ये चर्चा घडवून आणली. राष्ट्रसभेच्या कार्याविषयी इंग्रज पुढाऱ्यांत सहानुभूती निर्माण करण्याचे काम ह्यूम व दादाभाईंनी प्रभावीपणे केले. इंग्रज मित्रांच्या सहकार्याने दादाभाईंनी इंग्लंडमध्ये १८८७ रोजी "इंडियन रिफॉर्म असोसिएशन" नावाची संस्था स्थापन केली. पुढे त्यांनी १८९२ मधील पार्लमेंटची निवडणूक लढवून हिंदी लोकांची गाऱ्हाणी पार्लमेंटच्या व्यासपीठावर मांडली. इंग्रज राजवटीकडून होणारी पिळवणूक व हिंदुस्थानची सत्य परिस्थिती युरोपियन नेत्यांच्या व मित्रांच्या सहकार्याने पार्लमेंटला देऊ शकले व हिंदी प्रश्नांसंबंधी सहानुभूती निर्माण करु शकले.

**४) राष्ट्रसभेच्या ब्रिटीश समितीचे कार्य :** हिंदुस्थानातील नोकरशहांशी राष्ट्रसभेचे बिनसल्यामुळे व त्यांच्याकडून हिंदी लोकांवर होणाऱ्या अन्यायाचे परिमार्जन होण्याच्या आशा मावळल्यामुळे राष्ट्रसभेच्या ह्यूम वगैरे नेत्यांनी इंग्लंडमध्ये हिंदी लोकांच्या हक्कांच्या प्रश्नाबद्दल सहानुभूती निर्माण करण्यासाठी इ.स. १८९० साली राष्ट्रसभेची एक ब्रिटीश समिती स्थापन केली. या समितीमध्ये ह्यूम, यूल, ॲडम्स, नॉर्टन व हॉवर्ड अशा पाच इंग्रज विद्वानांचा समावेश होता. या समितीने इंग्लंडमध्ये हिंदी प्रश्नासंबंधी ठिकठिकाणी सभा घेऊन, परिपत्रके वाटून, लेख लिहून इंग्रज नागरिकांना हिंदी लोकांच्या मागण्या समजावून सांगण्याचा, सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या समितीने “इंडिया” नावाचे एक मासिकही चालू केले होते. या मासिकातून हिंदी जनतेचे प्रश्न, सत्य चित्रण इंग्रज समाजापुढे मांडले जात होते.

**५) सरकारविरुद्धचा विजय :** मद्रास अधिवेशनानंतर सरकार व राष्ट्रसभा यांचे संबंध बिघडू लागले. राष्ट्रसभेला अडचणीत आणण्याचे प्रयत्न सरकार करु लागले. इ.स. १८८८ च्या अलाहाबाद अधिवेशनाला ब्रिटीशांनी जागाही मिळू दिली नाही. इ.स. १८९० साली सरकारने आदेश काढून कोणत्याही सरकारी नोकरास राष्ट्रसभेच्या अधिवेशनाला हजर राहता येणार नाही असे जाहीर केले. न्या. रानडे यांच्यासारख्या सरकारी नोकर असणाऱ्या नेत्यांची कुंचबणा होऊ लागली. इ.स. १८९४ साली वकील मंडळींच्या राजकारणात भाग घेण्याच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा सरकार विचार करु लागले तेव्हा राष्ट्रसभेने सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध लोकमत जागृत करुन १८९० चा आदेश रद्द करावयास सरकारला भाग पाडले. जागृत लोकमताच्या दबावाखाली सरकार वकील मंडळींच्या स्वातंत्र्यावरही बंधने घालू शकले नाही.

**६) राष्ट्रवादी भावनेची वाढ :** राष्ट्रसभेची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे तिने घडवून आणलेला राष्ट्रवादाचा विकास ही होय. राष्ट्रसभेच्या पूर्वीच राष्ट्रवादाचा अंकुर फुटला होता. पण राष्ट्रसभेच्या स्थापनेने या अंकुरास जोम प्राप्त झाला. ह्यूम, दादाभाई, फिरोजशहा मेहता, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, गोखले, रानडे इ. नेत्यांनी हिंदी जनतेच्या दुःखांना वाचा फोडून सरकारच्या अन्यायी धोरणास विरोध करण्यासाठी लोकजागृतीची गरज प्रतिपादन केली. राष्ट्रसभेचे लोकजागृतीचे कार्यक्रम व तिचे सरकारवर टीका करण्याचे धोरण यापुढे तिचे सरकारशी असलेले संबंध मित्रत्वाचे राहिले नाहीत. आपल्या न्याय मागण्यांचा सरकार सहानुभूतीने विचार न करता दुर्लक्ष करते, म्हणून अधिक प्रभावी यंत्रणा उभी करुन आक्रमक धोरण स्विकारण्याचे राष्ट्रसभेने ठरविले. त्यानुसार इंग्लंडमध्ये शिष्टमंडळ पाठवून, तेथे राष्ट्रसभेची शाखा काढून, युरोपियन नेत्यांचे सहकार्य मिळवून इंग्रज लोकामध्ये हिंदी प्रश्नांवर सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या संपूर्ण काळात (१८८५-१९०५) राष्ट्रसभेने हिंसात्मक मार्ग स्विकारला नाही उलट सनदशीर मार्गाचाच अवलंब केला. राष्ट्रसभेच्या नेत्यांचा इंग्रज नोकरशहांवरील विश्वास नष्ट झाला असला तरी विलायतेमधील इंग्रज राज्यकर्त्यांच्या व इंग्रज प्रजेच्या उदारमतवादावर, स्वातंत्र्यप्रियतेवर व न्यायीपणावर त्यांचा गाढा विश्वास होता. राष्ट्रसभेची रचना व कार्य अखिल भारतीय असल्याने तिच्या अधिवेशनाला सर्व देशातून प्रतिनिधी जमू लागले, अडीअडचणींचा विचार करु लागले. त्यांच्या एकत्र येण्यामुळे आपण सर्व एकाच देशाचे नागरिक आहोत व

आपल्या सर्वांच्या स्वातंत्र्यासाठी ऐक्य व जागृती निर्माण केली पाहिजे ही राष्ट्रवादी भावना वाढीस लागली.

२०व्या शतकाच्या प्रारंभी जहालांनी मवाळांच्या धोरणावर व त्यांच्या कामगिरीवर टीका केली. त्यांनी जुन्या नेत्यांच्या धोरणाला "राजकीय भिक्षावृत्ती" असे नाव दिले. लाला लजपतराय यांनी त्यास "संधीसाधू चळवळ" असे म्हटले, आणि पुस्ती जोडली की, "ह्यामुळे ढोंगीपणाला व देशद्रोहाला जास्तीजास्त चालना मिळाली. कांही लोकांना तर देशभक्तीचा व्यापार करण्याची संधी मिळाली." मवाळांविरुद्धचा ब्रिटीश राजपदाशी एकनिष्ठ असणे हा सर्वात मोठा आरोप होता. मवाळांनी केलेल्या कामगिरीचा एकांगी विचार न करता हे लोक समकालीन भारतीय समाजातील सर्वात प्रगतशील आणि खरे देशभक्त होते हे मान्य करावे लागते. त्यांनी भारतीय समाजाला सुधारण्यासाठी खूप प्रयत्न केले. मवाळ नेत्यांनी १८८६ मध्ये "लोकसेवा आयोग" नियुक्त करवून घेतला. आय.सी.एस. परीक्षा एकाचवेळी इंग्लंड व भारतात व्हावी अशी मागणी केली. भारतीय जमाखर्चाची तपासणी करण्यासाठी मवाळ नेत्यांच्या विनंतीनुसार सरकारने वेल्बी मंडळ नियुक्त केले. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रात भारताची सर्वांगीण प्रगती व्हावी, भारताचे आधुनिकीकरण व्हावे अशी मवाळ नेत्यांची इच्छा असल्याने त्यासाठी त्यांनी कठोर परिश्रम केले. ब्रिटीशांच्या धोरणातील कठोरता कमी करण्यासाठी विनंती मार्गाचा केलेला अवलंब त्यांच्या राजकीय परिपक्वतेचे द्योतक होते. मवाळ गटाचे सर्वात मोठे देशसेवेचे कार्य म्हणजे त्यांनी ब्रिटीश साम्राज्याच्या भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणामांचे विश्लेषण करुन भारताच्या दारिद्र्याकडे सर्वांचे लक्ष आकर्षित करुन घेतले. "निःसारण सिद्धांत" मांडून इंग्रजांच्या भारतातील आर्थिक धोरणांवर टीका केली. पुढील काळात जहालांनी या सिद्धांताचा पुरेपुर वापर केला.

### ४.२.३ आपली प्रगती तपासा :

१. १८८५ ते १९०५या कालखंडातील मवाळ गटाची कामगिरी थोडक्यात स्पष्ट करा . .

## ४.३ जहालांचा कालखंड (१९०५-१९२०) :

१९ व्या शतकाच्या शेवटी आणि २० व्या शतकाच्या प्रारंभी काँग्रेसमध्ये एक तरुण गट उदयास आला. तो जुन्या नेत्यांच्या आदर्शाचा व मार्गाचा टीकाकार होता. १८९३ पासूनच काँग्रेसमध्ये जहाल विचारसरणीची सुरवात झाली होती. काँग्रेसच्या स्थापनेनंतर पहिल्या ७-८ वर्षात मवाळांचे कार्य संथपणे व ठराविक चाकोरीतून होते. ह्यूमचा आक्रमक चळवळ सुरु

करण्याचा सल्ला मवाळांना पटला नाही. अद्याप त्यांची इंग्रजनिष्ठा कमी झालेली नव्हती. सरकारकडून काँग्रेसच्या मागण्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची जाणीव काँग्रेस सदस्यांना होऊ लागली. परिणामी तरुणांच्या मनात काँग्रेस नेतृत्वाखाली अविश्वासाची भावना वाढीस लागली. १८९१च्या नागपूर अधिवेशनात पंजाबचा प्रतिनिधी मुरलीधरने इंग्रजांवर व इंग्रजनिष्ठ भारतीय नेत्यांवर टीका केली. त्याच्या मते, “इंग्लंडमध्ये उत्पादित होणाऱ्या चैनीच्या वस्तु विकत घेऊन सधन सुशिक्षित भारतीय लोक आपल्या लक्षावधी देशबांधवाचे रक्त शोषण करीत आहोत” काँग्रेसचे तीन दिवसांचे वार्षिक अधिवेशन म्हणजे केवळ तमाशा आहे, यातून कांहीही साध्य होत नाही असे जहाल उद्‌गार अश्विनी कुमार दत्त यांनी काढले. हिंडमन या प्रसिद्ध समाजवादी नेत्यानेही दादाभाईना लिहिलेल्या पत्रात उल्लेख केला की, “आपल्या समोरील प्रश्नांचा गंभीरपणे विचार करण्याऐवजी हिंदी लोक राणीच्या अभिनंदनाचे मुर्खपणाचे ठराव पास करीत असल्याचे पाहिले की मला त्यांच्याबद्दल तिरस्कार वाटतो.” अशाप्रकारे काँग्रेसने आता आक्रमक बनावे असे अनेकांना वाटत होते. काँग्रेसला प्रभावी बनवायचे असेल तर ती मुठभर उच्च मध्यमवर्गीयापूरती मर्यादित न ठेवता सर्वसामान्य जनतेला यात सहभागी करुन घेतले पाहिजे असे बहुसंख्य तरुणांना वाटु लागले. काँग्रेस अधिवेशनातून काँग्रेसच्या ध्येय धोरणांवर टीका होऊ लागली. वृत्तपत्रांतून तसे विचार मांडले जाऊ लागले. इ.स. १८९३ नंतर लो. बाळ गंगाधर टिळक, अरविंद घोष, बिपीनचंद्रपाल, लाला लजपतराय यांनी जहाल विचारांचा प्रसार करण्यास सुरुवात केली. याशिवाय भारतात जहालवादी विचार फोफावण्यास इतरही काही कारणे कारणीभूत आहेत.

### ४.३.१ जहाल विचारसरणीच्या उदयाची कारणे.

#### १. आतंरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव :

इ.स. १८९१साली ॲबेसिनियनांनी इटालियनांचा पराभव केला तर सन १९०५ मध्ये जपानने रशियाचा पराभव केला. या घटना युरोपियन संस्कृतीला जबरदस्त धक्का देणाऱ्या ठरल्या. युरोपियन राष्ट्रे अजिंक्य आहेत. त्यांचा पराभव अन्य खंडातील लोक करु शकणार नाहीत ही भावना आशियायी लोकांमधून नष्ट झाली. जपानने पाश्चात्यांचे अनुकरण करुन जी नेत्रदिपक प्रगती केली त्यामुळे जपान हे सर्व आशियातील राष्ट्रांना आदर्श ठरले. १९०५ साली जपानला रशियावर मिळालेल्या विजयाने हिंदी नेत्यात आत्मविश्वास वाढला. हिंदी समाजही युरोपियनांवर मात करु शकेल अशी भावना वाढीस लागली. इजिप्त, इराण, तुर्कस्थान, जर्मनी, इटली इ. देशात चाललेल्या नवसमाज निर्मितीच्या जन चळवळींचे वृत्तांत हिंदी लोकांच्या वाचण्यात येत. मॅझिनी, गॅरिबाल्डी व काव्हूर यांच्या देशभक्तीने हिंदी जनतेला वेड लावले. मॅझिनीचे चरित्र अनेक भाषात प्रसिद्ध होऊन ते सर्वत्र अभ्यासले गेले.

#### २. ब्रिटिशांची आर्थिक पिळवणूक :

इंग्रजांचे साम्राज्य आर्थिकसाम्राज्यातून निर्माण झालेले होते. ब्रिटिश राज्यकर्ते व्यापाराच्या व कराच्या रुपाने करोडो रुपयांची संपत्ती इंग्लंडला नेत असल्याचे दादाभाई नौरोजी व न्या. रानडे या नेत्यांनी आकडेवारी देऊन सिद्ध केले. संरक्षक जकात धोरणामुळे भारतीय उद्योगधंद्यांना संरक्षण मिळालेले नाही. उद्योगधंदे नष्ट झाले. कारागीर बेकार झाले. शेतकऱ्यांवर

कराचा बोझा दिवसेंदिवस वाढत असल्याने ग्रामीण भागातील दुरावस्था वाढून शेतकरी कर्जबाजारी बनला. सरकारच्या या आर्थिक पिळवणुकीच्या धोरणाला प्रत्युत्तर म्हणून हिंदी लोकांनी स्वदेशी मालाचा पुरस्कार करावा व परदेशी मालावर बहिष्कार टाकावा अशी जहाल विचारसरणी हिंदूस्थानात निर्माण झाली.

**३. सरकारची उदासीनता :**

इ.स. १८८५-१९०५ याकाळात राष्ट्रीय सभेने सनदशीर मार्गाने आपल्या मागण्या मांडल्या, अर्ज, विनंत्या केल्या पण सरकारने जाणूनबुजून दुर्लक्ष केले. त्यामुळे इंग्रजांच्या उदारमतवादावरील हिंदी जनतेचा विश्वास नाहीसा झाला. ग.ज. एल्गीनने, "हिंदुस्थान हा शस्त्रबळाने जिंकला आहे आणि शस्त्रबळानेच ताब्यात ठेवला जाईल" असे म्हटल्याने अनेकांना धक्का बसला. १८९२ रोजी सरकारने इंडियन कौन्सिल ॲक्ट पास करुन भारतीयांच्या काही मागण्या मान्य केल्या असल्या तरी त्या फारशा समाधानकारक नव्हत्या. ब्रिटिश सरकारच्या उदासिन धोरणाला आपले मवाळ धोरण कारणीभूत असल्याची जाणीव झाली. सरकारच्या दृष्टीने काँग्रेसची किंमत शून्य होती. ही भावना बळावत गेली.

**४. राज्यकर्त्यांची अन्यायी कृत्ये :**

हिंदुस्थानातील जहालवादाच्या उदयाला इंग्रज राजकर्त्यांच्या अन्यायी व दडपशाही कृत्यांनी मोठा हातभार लावला. लॉर्ड लॅन्सडाऊन (१८८८-९४), लॉर्ड एल्जिन (१८९४-९८) व लॉर्ड कर्झन (१८९९-१९०५) या राजकर्त्यांनी अनेक अन्यायी व दडपशाहीचे कायदे केले. हिंदुस्थानातील प्रजा दुष्काळात तडफडत असताना दरबार भरवून कोट्यावधी रुपये खर्च केले. १९०३ च्या मद्रास अधिवेशनाच्या अध्यक्ष पदावरुन लाल मोहन घोष यांनी सरकारला धारेवर धरुन त्यांच्या प्रवृत्तीचे, अरेरावीचे दर्शन घडविले.

राजकर्त्यांच्या दडपशाही धोरणाचा परमोच्च बिंदू लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीत गाठला गेला. लॉर्ड कर्झन पक्का साम्राज्यवादी होता. त्याची कारकीर्द कट्टर दडपशाहीची व साम्राज्यवादी समजली जाते. त्याचा हिंदी व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर विश्वास नव्हता. इंग्रज वंशाने श्रेष्ठ असून दुसऱ्यावर राज्य करण्यासाठीच पृथ्वीवर जन्माला आले आहेत. हे हिंदी त्यांची बरोबरी करु शकणार नाहीत. हिंदी संस्कृतीत वाढलेल्या माणसांना लोकशाहीचे हक्क देण्यात अर्थ नाही अशी त्याची विचारसरणी होती. युरोपियन संस्कृतीचा त्याला गर्व होता. अशा घमेंडखोर वक्तव्यांनी तरुण सुशिक्षित हिंदूची माथी भडकल्याशिवाय राहणार नव्हती. लॉर्ड कर्झन येथेच थांबला नाही तर कार्यालयीन गुप्तता कायदा, कलकत्ता कार्पोरेशन ॲक्ट, भारतीय विद्यापीठ कायदा यासारख्या कायद्यांनी कारभार सुधारणेच्या नावाखाली त्याने हिंदी समाजाचे हक्क हिरावून घेतले. हिंदी जनतेच्या व नेत्यांच्या मनातून तो उतरला.

**५. नैसर्गिक आपत्तीसंबंधी राज्यकर्त्यांची धोरणे :**

१९ व्या शतकाच्या शेवटी हिंदी जनतेला भयंकर दुष्काळ व प्लेगच्या साथी या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले. १८९६-९७ साली पडलेल्या भीषण दुष्काळात हजारो लोकांचे

भूकबळी पडले. या दुष्काळाचा तडाखा दोन कोटी लोकांना बसला. सरकारला जनतेबद्दल सहानुभूती नव्हती. दुष्काळ निवारण यंत्रणा कार्यक्षमरीत्या राबवली नाही. सरकारने हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याने सामान्य जनतेतही सरकारबद्दल द्वेषाची भावना निर्माण झाली.

याचवेळी महाराष्ट्रात विशेषत:पुण्यात प्लेगने धुमाकूळ घातला. साथीचे निवारण करण्यासाठी सरकारने रँड या ब्रिटिश अधिकाऱ्याची कमिशनर म्हणून नियुक्ती केली. रँडसाहेबाने प्लेग निवारण्याच्या नावाखाली महाराष्ट्रीयन जनतेवर अत्याचार केले. सरकारी लोक किंवा शिपाई बेधडक घरात शिरत व घरातील मालमत्ता रस्त्यावर आणून पेटवून देत. प्लेगची केस असलेल्या घरांना आग लावीत, मालमत्ता किंवा कपडेलत्ता जाळल्यावर सरकार त्या कुटुंबाला कसलेच साहाय्य करीत नव्हते. एवढेच नव्हे तर गोरे स्त्रियांच्या खोल्यात किंवा देवघरात प्रवेश करुन तेथील वस्तूंची नासधूस करीत. लो. टिळकांनी या अत्याचाराविरुद्ध लेखणी चालवून सरकारवर कडाडून हल्ला चढविला. महाराष्ट्रीय तरुणांची डोकी दडपशाहीच्या धोरणाने भडकून गेली. रँडच्या अत्याचाराचा सूड म्हणून त्याचा दोन तरुणांनी खून केला. सरकारी अत्याचार व दडपशाही अधिकच वाढली. लो. टिळकांनी सरकारवर केलेल्या जहरी टिकेमुळे त्यांना १८ महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. या शिक्षेच्या वार्तेने सर्व देश संतप्त झाला. सरकारविरोधी असंतोषाची लाट उसळली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी सारख्या जुन्या पिढीच्या नेत्यांनी सुद्धा टिळकांबद्दल सहानुभूतीने उद्‌गार काढले. राज्यकर्त्यांची ही अन्यायी धोरणे जहालवादाच्या उदयास जबाबदार होती.

### ६. बंगालची फाळणी :(१९०५)

आधुनिक हिंदुस्थानच्या इतिहासात "बंगालची फाळणी" ही जहालवादास उधाण आणणारी एक महत्त्वपूर्ण घटना होती. या घटनेमुळे हिंदी राष्ट्रवाद जहाल व आक्रमक बनला. बंगाल प्रांतात बिहार, ओरिसा व छोटा नागपूर या प्रदेशाचा समावेश असल्याने राज्यकारभाराच्या सोयीसाठी फाळणी झाली असती तर हिंदी जनतेचा विरोध झाला नसता. तथापि ही फाळणी करीत असतांना मुस्लिम बहुसंख्याक असलेला पूर्व बंगालचा प्रदेश बाजूला काढून मुस्लिमांना फुटीरतेचे कारण द्यायचे हा कर्झनचा डाव होता. कर्झनने काढलेल्या दौऱ्यात त्याने स्पष्ट केले की, मुस्लिमांचे हितसंबंध सुरक्षित रहावेत व हिंदूना शिक्षा करावी म्हणून सरकारने ही फाळणी केली आहे. कर्झनच्या या कृत्याने हिंदुस्थानात संतापाची लाट उसळली. हिंदु-मुस्लिम या दोन समाजात फुट पाडण्यासाठी सरकारने जाणूनबुजून हे पाऊल उचलले आहे अशी जनतेची खात्री झाली. सुरेंद्रनाथ बॅनर्जी व गोपाळ कृष्ण गोखले सारख्या जुन्या मवाळ नेत्यांनी या घटनेचा विरोध करुन निषेध नोंदविला. "वंदे मातरम्" चा घोष करीत बंगालमध्ये व प्रांतात सरकारचा निषेध करणाऱ्या सभा होऊ लागल्या. सरकारने दडपशाही सुरु केली. जनतेनेही स्वदेशीचा पुरस्कार व परदेशी मालाची होळी ही साधने हाती घेतली. काही हिंदी तरुण दहशतवादाच्या साधनाकडे वळले. देशभर धरपकडीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले. सारांश, बंगालच्या फाळणीने जहाल राष्ट्रवादाला चांगलेच खतपाणी मिळाले.

## ७) हिंदू धर्म व संस्कृती यांच्या पुनरुज्जीवनाची चळवळ :

हिंदुस्थानात इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराने आंग्लविद्याविभूषीत अशी नवीन पिढी निर्माण झाली होती. पं. मालवीय, ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी इत्यादी व्यक्ती या पिढीचे हिंदी राजकारणात नेतृत्त्व करीत होत्या. या मंडळींचा इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. या नेत्यांच्या मते, इंग्रज राजवट ही परमेश्वरी इच्छा असून तिने हिंदी समाजास अनेक फायदे मिळवून दिले आहेत. ही मंडळी पाश्चात्य संस्कृतीची उपासक होती. तथापि या मंडळीच्या उदयाबरोबर हिंदुस्थानात सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचीही चळवळ उदयास आलेली होती हे लक्षात घेतले पाहिजे. या सांस्कृतिक चळवळीचे नेतृत्व स्वामी दयानंद सरस्वती, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, ॲनी बेझंट, लो. टिळक इत्यादी व्यक्तींनी केले होते. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, थिऑसफिकल सोसायटी, सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी इत्यादी संस्थांनी सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीस गती आणली होती. विद्या, वाङमय, कला आणि विज्ञान अशा जीवनाच्या अनेक क्षेत्रात हिंदी माणसे चमकू लागली होती. उदा. साहित्याच्या क्षेत्रात बंकिमचंद्र, रविंद्रनाथ टागोर सारखे साहित्यिक निर्माण झाले होते. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीने हिंदी जनतेला आपल्या पूर्वीच्या संस्कृतीच्या भव्य कामगिरीचे यथार्थ दर्शन होऊन त्यांची अस्मिता जागृत केल्याचे प्रतिपादन ॲनी बेझंटसारख्या युरोपीयन विदुषीने केल्याने हिंदू लोकांची अस्मिता व स्वाभिमान जागृत झाला.

धर्माने समाजाची अस्मिता जागृत होते. मरगळ व नामर्दपण नष्ट करण्यासाठी हिंदू धर्मसुधारकांनी हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व आपल्या व्याख्यानातून आणि ग्रंथातून विशद केले. बंगालमध्ये काहींच्या उपासनेचे पुनरुज्जीवन झाले. महाराष्ट्र, बंगाल आणि पंजाबमध्ये शस्त्राची उपासना होऊ लागली. महाराणा प्रताप, शिवाजी महाराज, महाराणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे ही स्वातंत्र्यवीरांची दैवते बनू लागली. हिंदी तरुण हिंदुस्थानच्या इतिहासात प्रेरणा शोधु लागले. हिंदुस्थानच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीत स्वामी विवेकानंदानी इ.स. १८९३ साली शिकागो येथे भरलेल्या विश्व धर्मपरिषदेत हिंदू धर्माचे श्रेष्ठ अमर तत्वज्ञान जगापुढे आणले. विवेकानंदासारख्या धर्मपंडीतालाही हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय हिंदी जनतेची सर्वांगीण प्रगती होऊ शकणार नाही असे वाटत होते. त्यांच्या शिकवणूकीने व कार्याने हिंदुस्थानातील राष्ट्रवादी चळवळीस आशीर्वाद मिळाला.

## ८) हिंदी सुशिक्षितांची बेकारी :

इ.स. १८५८ रोजी इंग्रज राज्यकर्त्यांनी राणीच्या जाहीरनाम्याद्वारे हिंदी जनतेला समतेचे आश्वासन देऊन प्रशासनात जागा भरताना वंशभेद केला जाणार नाही, लायकी आणि पात्रतेप्रमाणे प्रशासनात सामावून घेण्याचे आश्वासन दिले होते. पण लॉर्ड कर्झनने इंग्रज लोक हे हिंदी लोकांपेक्षा हुशार, कार्यक्षम व उच्च संस्कृतीचे असल्याने अधिकाराच्या जागा त्यांनाच दिल्या पाहिजेत अशी योजना केली होती. परिणामी लायकी आणि पात्रता असूनही उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या हिंदी तरुणांना अधिकाराच्या जागा मिळत नव्हत्या. अशा तरुणात जहालवादाचा प्रसार होणे स्वाभाविक होते.

### १)	लाल-बाल-पाल या त्रयींचे नेतृत्व :

वरील सर्व कारणांमुळे हिंदुस्थानात असंतोष निर्माण होऊन जहालवादी विचारसरणी वाढीस लागली होती. तिचा जोरदार पुरस्कार करुन जहालवादी लोकांचे राजकीय क्षेत्रात नेतृत्व करण्याची जबाबदारी लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक व बिपिनचंद्र पाल या तीन नेत्यांनी स्विकारली. अर्ज-विनंत्या करुन राजकीय हक्क मिळू शकणार नाहीत, त्यासाठी मातृभूमीवरील प्रेमाने निर्भयपणे व निःस्वार्थपणे क्रांतीकारी चळवळी हाती घेतल्या पाहिजेत, त्यासाठी वाटेल तो त्याग सोसण्याची व कष्ट उपसण्याची हिंदी जनतेने तयारी केली पाहिजे, ही शिकवणूक हिंदी समाजाला दिली. या तीन नेत्यांनी राष्ट्रीय सभेला बंडखोर बनविले. सनदशीर चळवळीच्या व अर्ज विनंत्याच्या मार्गावरुन तिला अधिक गतिमान व क्रांतीकारी मार्गावर आणले.

वरील सर्व  कारणांवरुन हिंदुस्थानात फार मोठा असंतोष निर्माण झाला. ब्रिटिश सरकार जहाल उपाययोजना केल्याशिवाय वठणीवर येणार नाही याची खात्री तरुण वर्गाला पटली आणि यातूनच जहाल गटाचा उदय झाला.

### ४.३.२  आपली प्रगती तपासा :

१. भारतातील जहालवादाचा उदय होण्यास कोणते घटक कारणीभूत होते.

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

__________________________________________________

### ४.३.३  जहालवाद्यांचे तत्वज्ञान व कार्यक्रम:

१)	जगातील कोणतीही साम्राज्यवादी सत्ता कल्याणकारी असूच शकत नाही. शोषण करणे हे त्यांचे मुख्य सूत्र असते हे शोषण स्वराज्य मिळाल्यानेच थांबू शकेल.

२)	राजकीय चळवळ परिणामकारक बनविण्यासाठी त्यात बहुजन समाज सामील होणे आवश्यक आहे. केवळ मुठभर लोकांचे नव्हे तर जनतेच्या चळवळीचे सरकारवर दडपण येऊ शकेल.

३)	जनतेला राजकीय चळवळीत सहभागी करुन घेण्यासाठी त्यांच्यात प्रखर राष्ट्राभिमान निर्माण करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी भारतीय इतिहासातील महान व्यक्तीना जनतेची स्फुर्तीस्थाने बनवली पाहिजेत. भारतीयांची अस्मिता जागृत करुन त्यांना अन्यायाच्या प्रतिकारासाठी सज्ज केले पाहिजे.

४) लोकसंघटन व जागृतीसाठी मातृभाषेचा वापर केला पाहिजे. पाश्चात्य शिक्षण पद्धतीवर भर न देता राष्ट्रीयत्वाची भावना रुजविणारा अभ्यासक्रम शैक्षणिक संस्थातून आखला जावा असा अभ्यासक्रम सरकारी शाळा सुरु करु शकत नसल्याने भारतीयांनी स्वतःच्या शिक्षणसंस्था सुरु कराव्यात.

५) देशाची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी परकीय मालावर बहिष्कार घालून देशी उद्योग वाढविणे म्हणजेच आर्थिक स्वावलंबनाचा अवलंब करणे महत्वाचे आहे.

६) देश परकीय सत्तेखाली भरडला जात असतांना सामाजिक सुधारणांवर जनतेचे लक्ष केंद्रीत करण्याऐवजी राजकीय चळवळीला महत्व देणे अगत्याचे आहे. स्वातंत्र्यानंतर समाजसुधारणेला वेळ लागणार नाही.

७) अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सक्रीय पण कायदेशीर व सनदशीर मार्गाचा अवलंब करावा. राष्ट्रकार्यासाठी कष्ट करण्याची तयारी व इच्छा असणे महत्वाचे आहे.

जहालवादी नेत्यांनी आपले ध्येय साध्य करण्याकरिता ज्या साधनांचा अवलंब केला त्या साधनांचाही उल्लेख केला पाहिजे. विदेशी मालावर बहिष्कार, स्वदेशीचा पुरस्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या साधनांनी आपण आपले ध्येय साध्य करु शकू अशी जहालांची श्रद्धा होती.

विदेशी मालावर बहिष्कार आणि स्वदेशी मालाचा वापर यामुळे भारतीय उद्योगांना प्रोत्साहन, भारतीयांना काम करण्याची संधी होती. लाला लजपतरायच्या मते, स्वदेशीच्या वापरामुळे इंग्रजांचे आर्थिक नुकसान होईल आणि त्यामुळे बंगालची फाळणी रद्द करण्याविरुद्ध दबाव टाकता येईल. स्वदेशी हे विदेशी शोषणाविरुद्ध तसेच राजकीय चळवळीसाठी उत्तम शस्त्र असल्याची जाणीव झाली. स्वदेशीच्या वापरामुळे चांगला फायदा मिळणारे भारतीय उद्योगपती काँग्रेसला पैसा देतील अशीही अपेक्षा होती. जहाल पक्षाचा कार्यक्रम नुसता नकारात्मक नव्हता तर विधायक स्वरुपाचाही होता. त्यांनी विदेशी कपड्यावर, सरकारी नोकऱ्यांवर, सरकारी कार्यक्रम, सरकारी पदव्यांवर, शाळा-कॉलेजावर बहिष्कार घातला तसेच राष्ट्रीय शिक्षणावरही जोर दिलेला होता. सरकारी शिक्षणसंस्था ऐवजी एक राष्ट्रीय शिक्षण योजना बनविण्यात आली. विद्यार्थ्यांना देशसेवेत आणणे जहालांचा उद्देश होता. राष्ट्रीय चळवळीत, भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांविरुद्ध शिस्तभंगाच्या कारवाईची धमकी दिली तेव्हा विद्यार्थ्यांना अशा शिक्षणसंस्था सोडून देण्याचे आवाहन करण्यात आले. गुरूदास बॅनर्जीनी बंगाल राष्ट्रीय शिक्षण परिषद स्थापन केली. मद्रासमध्ये पचैप्पा राष्ट्रीय महाविद्यालय उघडण्यात आले. पंजाबमध्ये डी.ए.व्ही. चळवळीने जोर धरला.

लो. टिळकांनी असहकाराचा मार्ग सुचविला. प्रशासन चांगल्या रितीने चालण्यास आपणच मदत करतो असे त्यांचे प्रतिपादन होते. १९०५ मधील बंगालच्या फाळणीने अस्वस्थ झालेले मवाळ नेते गोपाळ कृष्ण गोखल्यांनी लॉर्ड कर्झनची तुलना औरंगजेबाबरोबर केली. त्याचबरोबर जहालांचे अस्त्र असलेल्या स्वदेशी आणि बहिष्काराला मान्यता दिली. १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनांचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनी बंगालच्या फाळणीचा निषेध केला. यापुढे जहाल व

मवाळ अशा दोन भिन्न विचारसरणी स्पष्टपणे दिसून येऊ लागल्या. १९०७ च्या सुरत काँग्रेस अधिवेशनात परस्परांतील मतभेद मिटविण्याचे लो. टिळकांनी प्रयत्न करुनही काँग्रेस जहालवाद्यांच्या हाती जाऊ द्यावयाची नाही असे मवाळांनी पक्के ठरविल्याने सुरत काँग्रेसनंतर काँग्रेसचा ताबा मवाळांकडे राहिला तरी त्यानंतर राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्व जहाल गटाकडे म्हणजे लोकमान्य टिळकांकडे होते. राष्ट्रीय चळवळीचे ध्येय कोणते असावे ? ही गोष्ट प्रथमतः जहालगटाने स्पष्ट केली. निराश तरुण मनांमध्ये नवीन आशा निर्माण केली. सर्वसामान्य लोकांमध्ये जहालांनी आत्मविश्वास निर्माण केला. आतापर्यंत राष्ट्रीय चळवळीचा पाया फक्त सुशिक्षितांपुरताच मर्यादित होता. परंतु जहालांनी या चळवळीचा पाया व्यापक बनविला. या चळवळीत कनिष्ठ मध्यम वर्ग, विद्यार्थी, तरुण वर्ग आणि स्त्रियाही सामील झाल्या. मुख्य म्हणजे १९११ रोजी बंगालची फाळणी रद्द करण्यास भाग पाडून सरकारला आपली ताकद दर्शवून एक हादरा दिला. देशातील भय घालविण्याचे आणि तरुणांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य जहाल पक्षाने केले. अद्याप काँग्रेसची चळवळ जनतेपर्यंत जाऊन पोहोचली नव्हती. ती गांधीजींच्या काळात जनतेपर्यंत जाऊन पोहचली. परंतू ज्या काळात "वंदे मातरम्" म्हणणे हा सार्वजनिक गुन्हा होता त्या काळात निर्भयता निर्माण करण्याचे कार्य जहालांनी केले. जहालांनी सहकारी संस्थांना चालना दिली. ग्रामसभा, मेळावे भरविणे यासाठी स्वयंसेवी संस्था स्थापन करण्यात आल्या. दिवाणी खटले व भांडणे सोडविण्यासाठी पंच मंडळे बनविण्यात आली. लोकजागृती, लोकसंग्रह व लोकसंघटन ही जहालांनी आपल्या राजकीय कार्याची दिशा ठरविलेली होती.

### ४.३.४ राष्ट्रीय चळवळीला लोकमान्य टिळकांचे योगदान :

लोकमान्य टिळक हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील जहालवादी गटाचे प्रमुख नेते होते. आपल्या भाषणांतून आणि लेखनातून राष्ट्रीय चळवळीला नवचैतन्य देण्याचे काम लो. टिळकांनी केले. हिंदी राष्ट्रवादाचे कट्टर पुरस्कर्ते आणि "भारतीय असंतोषाचे जनक" म्हणूनही ओळखले जातात. लो. टिळकांप्रमाणेच बंगालमध्ये जहालवादाचा प्रसार करण्याचे काम अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल तर पंजाबमध्ये लाला लजपत राय यांनी केले.

लो. टिळकांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे झाला. त्यांचे मूळ नाव "केशव" असे होते पण "बाळ" हे टोपणनावच कायम झाले. वडील प्राथमिक शिक्षक होते. पुढे ते शिक्षणनिरीक्षक बनले. टिळक दहा वर्षांचे असताना वडिलांची पुणे येथे बदली झाली. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून १८७७ मध्ये बी.ए. झाले. १८७९ मध्ये कायद्याचे पदवीधर झाले. १८८० मध्ये आगरकर व चिपळूणकर यांच्या मदतीने "न्यू इंग्लिश स्कूल" ची स्थापना केली. या शाळेतील सदस्यांशी मतभेद झाल्याने १८९० मध्ये राजीनामा देऊन देशकार्यास वाहून घेतले.

२८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबई येथे भरलेल्या पहिल्या अधिवेशनास टिळक उपस्थित होते. पण काही वर्षानंतर मवाळांच्या ध्येयधोरणांवर व अपयशावर कडक टिका करुन काँग्रेसमध्येच मवाळांना विरोध करणारा जहाल गट सक्रिय झाला. जहालांनी आपली उद्दीष्टे साध्य करण्यासाठी निःशस्त्र क्रांतीचा मार्ग स्विकारुन बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि

स्वराज्य हा कार्यक्रम जनतेपुढे ठेवला. लो. टिळकांनी आपले जहालवादी विचार प्रकट करतांना ते म्हणत असत की, माझ्या घराची किल्ली माझ्या ताब्यात हवी. स्वराज्य हे आमचे ध्येय आहे. इंग्रज मुठभर असूनही वंश श्रेष्ठत्वाच्या आधारे आम्ही प्रबळ असल्याचे सांगून भारतीयांची फसवणूक केली. स्वतंत्र होण्याची इच्छा असेल तर मार्ग दिसेल अन्यथा तुमचा अध:पात होईल तुमच्याकडे कोणतीही शस्त्रे नसली तरी बहिष्काराचे अस्त्र तुमच्या हातात आहे. संघटितपणे प्रयत्नांनी यश संपादन करता येईल. या उद्‌गारावरुन त्यांच्या जहालवादाची कल्पना किती धारदार होती याची कल्पना येते.

**४.३.५ लो. टिळकांचे राजकिय कार्य :**

महाराष्ट्रातील आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके यांनी स्थापन केलेल्या व्यायाम शाळेत लो. टिळकांनी आपले शरीर कमावले होते. शरीराप्रमाणेच त्यांच्या मनावर वासुदेव बळवंताच्या बंडाचा व देशभक्तीचा प्रभाव होता. टिळकांनी मवाळ काँग्रेसला बंडखोर आणि कृतीप्रवण बनविण्याचे बरेच प्रयत्न केले. राजकारण हा फावल्या वेळेतील करमणुकीचा कार्यक्रम नसून दैनंदिन कर्तव्याचा भाग असल्याचे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले.

इ.स. १८९५ मध्ये मवाळांच्या ताब्यातील सार्वजनिक सभा टिळकांच्या हाती आली तेव्हापासून या संस्थेचा उपयोग एक राजकीय व्यासपीठ म्हणून केला. या संस्थेमार्फत दुष्काळग्रस्तांना मदतीचा हात दिला. सरकारच्या शेती संबंधीच्या धोरणाबद्दल शेतकऱ्यांमध्ये जागृती घडवून आणली. या कार्यामुळे सार्वजनिक सभेवर इंग्रज नाराज होते. न्या.रानडेनी काँग्रेसमध्ये सामाजिक सुधारणा परिषद स्थापन केली पण लो. टिळकांनी तिला कडाडून विरोध केला.मवाळ आणि जहालांमध्ये सुधारणा की, स्वराज्य हाच खरा कळीच मुद्दा होता. लो. टिळकांच्या मते, सामाजिक सुधारणा करुन लोकांसाठी लाचार होऊन सुधारणासाठी कायदे करा असे ब्रिटिशांकडे विनंती करणे स्वाभिमानाला तिलांजली देण्यासारखे आहे. तेव्हा सामाजिक सुधारणांपेक्षा राजकीय सुधारणा त्यांना हव्या होत्या म्हणून त्यांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच" अशी घोषणा केली. स्वराज्य मिळाले की, हव्या तशा सुधारणा आपण करु शकू असे त्यांना वाटत होते. स्वातंत्र्य चळवळीत निर्भयपणे परिणामांची पर्वा न करता लो. टिळकांनी स्वत:ला झोकून दिले. १८९३ मध्ये महाराष्ट्रात हिंदू-मुस्लिम दंगे झाले. ते ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या चिथावणीमुळे झाले असा उघड आरोप करण्यास ते कचरले नाहीत. गैर मार्गानी सरकार करीत असलेल्या आर्थिक शोषणाची माहिती त्यांनी जनतेला दिली. त्याला आळा घालण्यासाठी स्वदेशी व बहिष्काराचा कानमंत्र दिला. १८९३-९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ आली. साथीच्या नावाखाली इंग्रज अधिकाऱ्यांनी व शिपायांनी पुण्यातील जनतेवर दडपशाही करुन अनन्वित अत्याचार केले. हे अत्याचार पाहून लो. टिळकांनी आपल्या "केसरी" व "मराठा" या दोन वर्तमानपत्रातून कडक शब्दात लेख लिहून सरकारची कान उघाडणी केली. चाफेकर बंधुनी अत्याचार करणाऱ्या रँडसाहेबाची १८९७ रोजी हत्या केली तेव्हा टिळकांनी हत्येचे समर्थन करण्याचे धैर्य दाखविले त्यामुळे सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेऊन १८ महिन्यांची कारावासाची शिक्षा ठोठावली. तरीही टिळकांनी आपले जहाल लेखन चालू ठेवले. पुन्हा १९०८ मध्ये ६ वर्षाची हद्दपारीची शिक्षा होऊन त्यांना ब्रह्मदेशातील

मंडाले येथे तुरुंगात ठेवले. पण मनाची शांती ढळू न देता तेथे त्यांनी "गीतारहस्य" नावाचा भगवद्गीतेवरील उत्कृष्ट टीकाग्रंथ लिहीला व कर्मयोगाचा एक नवा अर्थ सांगितला. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. त्याचवेळी त्यांची कैदेतून सुटका झाली. जहालवाद वाढीस लागला.

लो. टिळकांनी राजकीय कार्याबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्य करुन तरुण पिढीमध्ये स्वाभिमान, आत्मविश्वास, जनजागृती, एकराष्ट्रीयत्वाची भावना, कष्ट करण्याची तयारी, इत्यादी सद्‌गुंणाची जोपासना केली.

### ४.३.६ लोकमान्य. टिळकांची राष्ट्रीयत्वाची कल्पना :-

हिंदुस्थान सारख्या विविधतेने नटलेल्या देशात एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणे ही खरोखरच कठीण बाब होती. वांशिक, भाषिक, धार्मिक एकता आणि समान राजकीय आकांक्षा यातून राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी हिंदु समाजातील सण, उत्सव व यात्रा यांचा उपयोग करुन घेतला. इ.स. १८९३ साली गणपती उत्सव व १८९५ साली शिवजयंती उत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. गणपती उत्सवाच्या मागे धार्मिक हेतु नसून राजकीय होता. गजासुराचा वध करुन दुष्टांचे निर्दालन करणारा नेता या अर्थाने गणपतीची आराधना शिकवली. तसेच छ. शिवाजी महाराज हिंदुधर्मप्रति पालक होते म्हणुन नव्हे तर परकिय सत्तेविरुद्ध लढा देणारे वीरपुरूष होते असा आदर्श जनतेसमोर ठेवण्यासाठी शिवजयंती सुरु केली.

राष्ट्रकार्यासाठी तरुण पिढी सशक्त व बलवान असावी यासाठी व्यायाम शाळा सुरु केल्या, व्यायामाबरोबरच, लढाया व तलवारी चालविणे, पोहणे, मुष्टीयुद्ध यांचे शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यात प्रखर राष्ट्रीयत्व रुजवले. केसरी व मराठा या वृत्तपत्रातून सरकारविरुद्ध जनमत तयार केले. राष्ट्रीयत्वाच्या चळवळीत टिळकांनी जनतेला बहिष्कार, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतु:सुत्री दिली. आपल्या चळवळीसाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग न स्विकारता वरील चार शस्त्रांनिशी लढा दिला. इंग्रजांविरुद्ध संपूर्ण भारतात असंतोष निर्माण करण्यात ते यशस्वी झाले म्हणून त्यांना व्हॅलेटाईन चिरोल यांनी'भारतात असंतोषचे जनक' असे म्हटले आहे.

### ४.३.७ सूरत अधिवेशन व काँग्रेसमध्ये फूट :

इ.स. १९०६ च्या कलकत्ता अधिवेशनात दादाभाई नौरोजीच्या अध्यक्षतेखाली जहालांचे चतु:सुत्रीसंबंधीचे चार महत्वाचे ठराव पास झाल्याने जहालवादी गटाचा प्रभाव वाढलेला होता. परंतु मवाळ गटातील फिरोजशहा मेहतासारख्या नेत्यांना कोणत्याही परिस्थितीत जहाल मार्गावर जाऊ देण्याची इच्छा नव्हती. या उलट जहाल नेत्यांना मवाळांशी तडजोड मान्य नव्हती. लो. टिळक, लाला लजपतराय, ना. गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांना मात्र काँग्रेस दुभंगू नये अशी इच्छा होती.

१९०७ चे अधिवेशन नागपूरला भरणार होते. त्याप्रमाणे तयारी सुद्धा होती पण नागपूर जहालांचा बालेकिल्ला. मवाळांनी सुरतला अधिवेशन घेण्याची घोषणा केली. या अधिवेशनात अध्यक्षपदावरुन वाद सुरु झाला. जहालांचा लाला लजपतरायना पाठिंबा होता तसेच मवाळांना ते मान्य नव्हते व त्यांनी रासबिहारी घोष यांना अध्यक्षपद देण्याचे ठरविले तसेच आपल्या कार्यक्रमपत्रिकेत कलकत्ता अधिवेशनात पास झालेले ठराव खोडून काढले होते. त्यामुळे जहालगट अस्वस्थ होता. लो. टिळकांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी भेट घेऊन कलकत्ता अधिवेशनात पास झालेल्या ठरावांना मान्यता दिल्यास मवाळांचे सर्व निर्णय मान्य करण्याचे आश्वासन दिले. पण मवाळ गटाने लो. टिळकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले.

१६ डिसेंबर १९०७ रोजी दुपारी २:३० वाजता सुरत येथे राष्ट्रसभेचे अधिवेशन सुरु झाले. १६०० प्रतिनिधी उपस्थित होते. स्वागताध्यक्ष मदनमोहन मालवीय यांचे भाषण झाल्यावर डॉ. रासबिहारी घोष यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले गेले. अनुमोदन देण्यासाठी सुरेंद्रनाथ बॅनर्जी उठले. यावेळी जहालांनी या नावाला विरोध करुन गोंधळ घातला. सभा स्थगित करावी लागली. दुसऱ्या दिवशीही लो. टिळकांनी स्वागताध्यक्षांकडे चिठ्ठी पाठवूनही मवाळांनी लक्ष न देता घाईघाईत घोष यांच्या नावाची घोषणा केली. लो. टिळक व्यासपीठावर चढले. गोंधळ वाढला, खुर्च्या, जोडे फेकले जाऊ लागले. कांही स्वयंसेवकांनी टिळकांना ढकलण्याचा प्रयत्न करताच टिळकांचे अनुयायी चिडले. गोंधळात फेकलेला जोडा फिरोजशहांना लागला. अधिवेशन तहकूब करावे लागले.

लो. टिळकांनी सामोपचाराने संघर्ष मिटवण्याचा प्रयत्न केला. पण मवाळवादी जिद्दीला पेटल्याने त्यांनी स्वतंत्र बैठक घेऊन जहालवाद्यांना कॉंग्रेसमधून हाकलून देण्याचा निर्णय घेतला. एप्रिल १९०८ मध्ये अलाहाबाद बैठक घेऊन मवाळ नेत्यांनी कॉंग्रेसच्या घटनेचा नवा मसुदा तयार केला. अशाप्रकारे सुरत अधिवेशनात जहाल-मवाळ गटातील मतभेद पराकोटीला पोहचून कॉंग्रेस दुभंगली. जहालगट कॉंग्रेसबाहेर फेकला गेला. राष्ट्रीय ऐक्यावर मोठा आघात होता. ब्रिटिशांचे राजकीय डावपेच यशस्वी झाल्याने या फुटीचा सर्वात जास्त आनंद ब्रिटिशांना झाला. १९०६ मध्ये भारतमंत्री मोर्ले व ना. गोखले यांच्या भेटीत बहिष्काराची चळवळ मागे घेतल्यास जास्तीत जास्त राजकीय सुधारणा देऊ असे गुप्त आश्वासन दिले होते. सुरत फुटीमुळे मात्र मवाळांची लोकप्रियता घटली व जहालवादी गट अधिकच प्रभावी बनू लागला.

## ४.४ मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा :

हिंदुस्थानातील जहालवादाला व वाढत्या असंतोषला दडपून टाकण्यासाठी १९०७ ते १९१० या काळात सरकारने पाच अन्यायी कायदे केले. या कायद्यांनी हिंदी लोकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर अनेक बंधने येऊन ते जवळ जवळ नष्टप्राय झाले. ११ मे १९०७ रोजी सभाबंदीचा वटहुकूम काढून त्यानुसार सभेसाठी सरकारला सात दिवस आगोदर कळविण्याचे बंधन घातले. शिवाय आवश्यकता भासल्यास सभेच्या कामकाजाचे निरीक्षण करण्यासाठी सरकार पोलीस पाठवू शकत होते. त्याचवर्षी सभाबंदीचा आणखी एक कायदा करुन २०

माणसांपेक्षा अधिक लोकांची सभा घेणाऱ्यांना सरकारला तीन दिवस आगोदर नोटीस देणे बंधनकारक होते. सभेला परवानगी देणे अगर न देणे एवढेच नव्हे तर तेथे कोणी बोलावे हे सरकार ठरवू शकेल अशा तरतुदी करण्यात आल्या.

स्फोटक दारुगोळा जवळ बाळगणे, तो तयार करण्याची साधनसामग्री जवळ बाळगणे, दारुगोळा तयार करण्यास मदत करणे या गुन्हयांबद्दल १४ वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा व स्फोट घडवून आणणाऱ्यांना जीवितहानी होवो अगर न होवो, गुन्हेगारांना काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावणारा कायदा इ.स. १९०८ साली तयार करण्यात आला. याच वर्षी सरकारने फौजदारी कायद्यात हवे तसे बदल केले. मॅजिस्ट्रेट एकतर्फी चौकशी करुन आरोपीला हायकोर्टाच्या स्पेशल बेंचसमोर पाठवू शकत असे. शांतता आणि सुव्यवस्थेत बाधा आणू शकेल अशा कोणत्याही संघटनेला बेकायदेशीर ठरविण्याचा अधिकार सरकारने जाहीर केला. १९०८ साली हिंदी वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याची गळचेपीच नव्हे तर ते नष्ट करण्याचे अधिकार सरकारला देणारे कायदे तयार केले गेले. या कायद्याने डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट कोणतेही वृत्तपत्र, ते देशात हिंसेचे वातावरण निर्माण करत आहे या आरोपावरुन बंद पाडू शकत होता. एवढेच नव्हे तर ज्या छापखान्यात छापले तो छापखाना जप्त करु शकत होता. प्रारंभी या कायद्यात अपीलाची तरतूद नव्हती. पण पुढे सरकारच्या कृतीनंतर १५ दिवसांच्या आत हाय कोर्टात अपील करण्याची तरतूद त्या कायद्यात करण्यात आली. १९०९ साली वर्तमान पत्रासंबंधीचा आणखी एक जुलमी कायदा केला. या कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या वृत्तपत्राच्या प्रकाशकांकडून आणि मुद्रकांकडून ५०० ते ५००० रु. पर्यंत व नव्या वृत्तपत्राच्या प्रकाशकांकडून व मुद्रकांकडून ५०० रु ते २००० रुपयापर्यंतची रक्कम जामीन म्हणून जिल्हा मॅजिस्ट्रेट घेऊ शकत होता. राजद्रोही लिखाण प्रसिद्ध झाले तरी ती रक्कम सरकारजमा होत असे आक्षेपार्ह वाटणाऱ्या कोणत्याही प्रकारचे छापील साहित्य जप्त केले जात असे. सरकारची निंदा नालस्ती करणारे, हिंसेला प्रोत्साहन देणारे, लष्कराला चिथावणी देणाऱ्या लिखाणांवर बंदी घालण्यात आली. परिणामी ८-९ वर्षात २०० छापखाने बंद पडले. १३० वर्तमानपत्रांच्या व ३५० छापखान्याच्या अनामत रकमा जप्त झाल्या. सरकारने अनेकांवर राजद्रोहाचे खटले भरुन जबरदस्त शिक्षा केल्या.

मोर्ले-मिंटो राज्यकर्त्यांचे हिंदुस्थानविषयकचे धोरण मागे सांगितल्याप्रमाणे दुहेरी स्वरुपाचे होते. एका बाजूने दडपशाही करावयाची व दुसऱ्या बाजूने काही राजकीय सुधारणा देऊन लोकमत शांत करण्याचा व मवाळ नेत्यांना समाधानी ठेवण्याचा प्रयत्न करावयाचा. तथापि मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा पास करण्यास खालील परिस्थिती कारणीभूत होती.

इ.स. १८९२ च्या सुधारणा कायद्याने भारतीयांचे समाधान झाले नाही. कायदेमंडळात अप्रत्यक्ष निवडणुकीचे तत्त्व स्विकारल्याने तेथे नियुक्त केलेले सभासद खऱ्या अर्थाने जनतेचे प्रतिनिधित्व करु शकत नव्हते. हिंदी सभासदांना प्रश्न विचारण्याची परवानगी दिली असली तरी त्यांना उपप्रश्न विचारता येत नव्हता. अंदाजपत्रकावर त्यांना चर्चा करण्याचा अधिकार मिळाला तरी त्यातील एखादी तरतूद वगळण्याचा अधिकार नव्हता. अशाप्रकारे या कायद्याने दिलेल्या

सुधारणा अपुऱ्या वाटत होत्या. शिवाय कायदे मंडळात सरकारी सभासदांचे बहुमत असल्याने सरकारवर कोणत्याही प्रकारचा दबाव निर्माण करता येत नव्हता. इ.स. १८९९-१९०५ या काळात लॉर्ड कर्झनने दडपशाहीचा कळस गाठला. ना. गोखल्यांनी लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दीस औरंगजेबाच्या कारकीर्दीची उपमा दिली होती व ती योग्य होती. त्याने बंगालची फाळणी करुन भारतीयांच्या भावना दुखावल्या. त्याच्या या धोरणामुळे राष्ट्रवादी चळवळीला चालना मिळून जहालवादी विचारसरणी वाढीस लागली. राष्ट्रसभेत जहालवादी गट अल्पमतात असला तरी जहाल नेत्यांनी देशातील वातावरण आपल्या लेखणीने व भाषणांनी सतंप्त करुन सोडले होते. काही हिंदी तरुण सरकारच्या कृत्यांनी क्रांतीकडे आकृष्ट होऊन त्यांनी क्रांतीकारी संघटना स्थापन केल्या होत्या. १९०५ सालानंतर सरकारी अधिकाऱ्यांचे खून करुन जनतेच्या असंतोषाला वाचा फोडली होती. पार्लमेंटमध्येही राज्यकर्त्यांच्या दडपशाही धोरणावर टीका करणारे सभासद होते. त्यांची तोंडे सुधारणांच्या घोषणांनी बंद होतील असे भारतमंत्री मोर्लेना वाटत होते. शिवाय हिंदू व मुसलमान यांच्यातील दरी रुंद व्हावी, राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून राष्ट्रीय चळवळीत मुसलमानांनी भाग घेऊ नये व राष्ट्रीय चळवळीस खीळ बसावी यासाठीच मुसलमानांना भावी राजकीय सुधारणांचे आश्वासन दिले गेले. एकंदर अशा प्रकारच्या सामाजिक असंतोषावर फुंकर घालण्यासाठी राज्यकर्त्यांकडील सुधारणेची भेट उपयोगी पडेल असे इंग्लंडमधील मुत्सद्यांना वाटत होते. यामुळे ब्रिटिश सरकारने १९०९ चा सुधारणा कायदा मंजूर केला. हा कायदा गव्हर्नर जनरल मिंटो व भारतमंत्री मोर्ले यांच्या प्रयत्नाने झाला असल्याने त्याला मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा म्हणून ओळखले जात. कायद्यांतील तरतुदी खालीलप्रमाणेः

१) केंद्रीय कायदेमंडळाची सदस्य संख्या वाढवून ६८ करण्यात आली. जादा सदस्यात २८ सरकारी व ३२ बिनसरकारी सदस्य होते. बिनसरकारी सदस्यात ५ गव्हर्नर नेमलेले व २७ सदस्य निरनिराळ्या मतदार संघातून निवडलेले होते.

२) प्रांतीय कायदेमंडळाची सदस्य संख्याही वाढविण्यात आली. बंगाल, बिहार, ओरिसा, मुंबई, मद्रास, उत्तरप्रदेश या प्रांतातील सदस्यसंख्या ५० केली तर ब्रह्मदेश, पंजाब, आसाम येथील सदस्यसंख्या ३० करण्यात आली.

३) या कायद्यानुसार जातीय मतदारसंघ निर्माण करण्यात आले. मुस्लिमांना वेगळे प्रतिनिधीत्व दिले. जमीनदार, व्यापारी, कारखानदार, विद्यापीठे, स्थानिक स्वराज्य संस्था यांनाही प्रतिनिधित्व दिले.

४) कायदेमंडळाचे अधिकार वाढविण्यात येऊन अंदाजपत्रक तपशीलाबाबत ठराव मांडण्याचा, अंदाजपत्रकात काटछाट सुचविण्याचा, स्थानिक स्वराज्य संस्थासाठी जादा पैसा मागण्याचा अधिकार कायदेमंडळाला मिळाला. अंदाजपत्रकावर चर्चा करण्यासाठी सभासदांना प्रस्ताव सादर करण्याचा अधिकार होता. परंतु कर्जावरील व्याज, धर्मावरील खर्च, रेल्वे या विषयावर चर्चा करण्याचा अधिकार नव्हता.

५) राज्यकारभारासंबंधी प्रश्न, उपप्रश्न विचारण्याचा व आवश्यक माहिती मिळविण्याचे अधिकार सदस्यांना देण्यात आले. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दिलेच पाहिजे हे बंधन सरकारवर नव्हते.

६) राज्यकारभारासंबंधी ठराव मांडण्याचा अधिकार सदस्यांना होता पण तो ठराव निंदायुक्त, टीकायुक्त असू नये.

७) मुंबई व मद्रास प्रांतातील गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळाची सदस्य संख्या ३ ऐवजी ४ करण्यात आली. गव्हर्नर जनरल व त्यांच्या परिषदेला अन्य प्रांतात देखील कार्यकारिणी परिषदांची स्थापना करण्याचा अधिकार प्रांतीय गव्हर्नरांना देण्यात आले.

या कायद्याचे परिक्षण केल्यास असे लक्षात येते की, हा कायदा म्हणजे भारतीय जनतेच्या डोळ्यात धूळफेक होती. या कायद्याने भारतीयांचे समाधान झाले नाही. भारतमंत्री मोर्लेनेच हा कायदा कुचकामी असून हिंदुस्थानला जबाबदार राज्यपद्धती देण्याचा उद्देश नसल्याचे प्रतिपादन केले. केंद्रीय मंडळात सरकारी सदस्यांचे बहुमत असल्याने व त्यांना मुस्लिम सदस्यांचा पाठिंबा असल्याने हिंदी जनतेच्या मागण्यांचे ठराव मंजूर होऊ शकत नव्हते. हिंदी सदस्यांना टीकेशिवाय कांहीही अधिकार नव्हता. मुस्लिमांना स्वतंत्र जातीय मतदारसंघ मिळाल्याने जातीयवादाला प्रोत्साहन मिळाले. केवळ नेमस्तांना खूश करण्यासाठी उचललेले पाऊल असे या कायद्याचे वर्णन करता येईल. या कायद्याने जातीविरुद्ध जात, वर्गाविरुद्ध वर्ग उभा केला. जमीनदार व व्यापारी वर्ग सरकारवर टीका करणार नाहीत म्हणून त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधित्व दिले.

**४.४.१ लखनौ करार :**

इ.स. १९०७ मध्ये भरलेल्या सूरत अधिवेशनात जहाल-मवाळ यांच्यात संघर्ष होऊन राष्ट्रसभेची दोन शकले पडली. राष्ट्रीय कॉंग्रेसमधील या फूटीचा फायदा घेऊन सरकारने जहालवादी चळवळ मोडून काढली. जहालांचे पुढारी लो. टिळकांना १९०८ मध्ये ६ वर्षासाठी मंडालेच्या कैदेत पाठविले. इतर अनेक जहाल नेत्यांना हद्दपार केले. त्यामुळे कॉंग्रेसमध्ये मवाळांचे वर्चस्व निर्माण होऊन राष्ट्रीय चळवळीचा वेग कमी झाला.

इ.स. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरु झाले. याचवेळी टिळकांचीही सुटका करण्यात आली. इंग्लंड अडचणीत सापडल्याने त्यांनी भारतीय जनतेला मदतीचे अवाहन केले. युद्धानंतर भारतीय जनतेला स्वातंत्र्य देण्याचे आश्वासन ब्रिटिशांनी दिले. डॉ. ॲनी बेझंट यांना जहाल-मवाळ एकत्र यावेत असे वाटत असल्याने जहाल-मवाळ ऐक्यांचे प्रयत्न सुरु केले. इतरांनाही कॉंग्रेस ऐक्याची अपेक्षा होती. इ.स. १९१५ च्या मुंबई अधिवेशनात जहालांना कॉंग्रेसमध्ये प्रवेश देण्याची घटना दुरुस्ती केली. ८ वर्षानंतर पहिल्यांदा दोन्ही कॉंग्रेसमध्ये एकजूट झाली. संपूर्ण स्वराज्य हे टिळकांचे ध्येय होते. त्यासाठी संपूर्ण भारतात ऐक्याची गरज होती. मोठी संख्या असलेला मुस्लिम समाज लीगच्या माध्यमातून कॉंग्रेसपासून दूर गेला होता. राष्ट्रकार्यात त्यांना सामील करुन घेणे लो. टिळकांना आवश्यक वाटत होते.

लो.टिळक व कॉंग्रेसच्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना घडली. इंग्रज धार्जिणी मुस्लिम लीग इंग्रजांच्या विरोधात गेली. त्यासाठी काही घटना कारणीभूत ठरल्या. इ.स. १९११ मध्ये ब्रिटिशांनी मुस्लिमांना विश्वासात न घेता बंगालची फाळणी रद्द केली, मुस्लिमांचे फायदे रद्द

झाले. १९१४ मध्ये सुरु झालेल्या महायुद्धात इंग्लंडने तुर्कस्थानच्या सुलतानाचा केलेला पराभव मुस्लिमांच्या जिव्हारी झोंबला कारण तुर्कस्थानचा सुलतान हा सर्व जगातील मुस्लिमांचा खलिफा होता. त्यामुळे मुस्लिमांच्या मनात इंग्रजाबद्दल कटू भावना निर्माण झाली. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून काही राष्ट्रवादी मुस्लीम नेत्यांनी मुस्लिम समाजातील संकूचित, धार्मिक व अलगतावादी दृष्टीकोन बदलून त्यांच्यात राष्ट्रवादी भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मौलाना महमद अली, शौकत अली, मौलाना अब्दुल कलाम आझाद इत्यादी राष्ट्रवादी नेते सामंजस्यासाठी प्रयत्नशील होते. या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे १९१६ रोजी लखनौ अधिवेशनात काँग्रेस व मुस्लिम लीग एकाच व्यासपीठावर एकत्र आले.उभयंतामध्ये जो करार झाला त्याला लखनौ करार म्हणतात. या करारात पुढील अटी मान्य करण्यात आल्या.

१) लंडनमधील इंडिया कौन्सील बरखास्त करण्यात यावे.

२) गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळातील निम्मे सदस्य भारतीय असावेत व ते केंद्रीय कायदेमंडळाने निर्वाचित केलेले असावे.

३) प्रांताना स्वायत्त शासनाचे अधिकार असावे, प्रांतीक सरकारवर केंद्र सरकारचा नव्हे तर प्रांतीय विधीमंडळाचा ताबा असावा.

४) संरक्षण व परराष्ट्र धोरण सोडून इतर सर्व बाबतीत केंद्रीय शासनावर केंद्रीय कायदेमंडळाचा ताबा असावा.

५) जातीय प्रतिनिधित्व व स्वतंत्र मतदारसंघ मान्य करण्यात आले.

६) मुस्लिम अल्पसंख्यांक प्रांतातून केंद्रीय व प्रांतीय विधीमंडळासाठी मुस्लिम संख्येच्या प्रमाणापेक्षा जादा प्रतिनिधित्व द्यावे.

७) भारतीयांना वसाहतीचे स्वराज्य द्यावे.

या करारातील अटींचे परीक्षण केल्यास मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ व प्रमाणापेक्षा जादा प्रतिनिधित्व या अटी वादग्रस्त ठरल्या. १९०९ च्या मोर्ले-मिंटो कायद्यातील मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या तरतुदीला ज्या काँग्रेसने विरोध केला त्याच काँग्रेसने लखनौ करारात ही अट मान्य केली. अनेक विचारवंतांच्या मते काँग्रेसने जातीयवादाला मान्यता देऊन राजकीय फायदा केलेला नव्हता ही गोष्ट तितकीच महत्त्वाची होती. राजकीय ऐक्याच्या दृष्टीने लो.टिळकांनी प्राप्त परिस्थितीत हा निर्णय घेतला असावा. लखनौ करारामुळे इंग्रजांना धक्का बसून काँग्रेसची ताकद वाढली.कारण या कारणामुळे काँग्रेसमधील दोन गट एकत्र आले. तसेच हिंदू व मुस्लिम या दोन ताकती एकत्र येऊन पुढे खिलाफत चळवळ सुरु झाली.

### ४.४.२ आपली प्रगती तपासा :

१. जहालवादी कालखंडाची धोरणे थोडक्यात सांगा.

---

---

---

---

## ४.५ होमरूळ चळवळ :

**१) डॉ. ॲनी बेझंट-** डॉ. ॲनी बेझंट या जन्माने आयरिश. त्यांचा जन्म १ ऑक्टोबर १८३३ रोजी इंग्लंडमध्ये झाला. १८६७ मध्ये फ्रँक बेझंट यांच्याशी त्यांचा विवाह झाला. पण कौटुंबिक तणावामुळे १८७३ मध्ये घटस्फोट झाला. १८९३ च्या शिकागो धर्मपरिषदेने स्वामी विवेकानंदाच्या विचारांचा प्रभाव पडल्याने हिंदुस्थान ही कर्मभूमी मानली. भारतीय राजकारणात येण्यापूर्वी त्या थिऑसॉफिकल सोसायटीमार्फत धार्मिक व शैक्षणिक कार्य करीत होत्या. हिंदू धर्म व संस्कृतीचा आदर बाळगून त्यांनी हिंदू तत्वज्ञानाचा गाढा अभ्यास केला. पण धार्मिक व शैक्षणिक सुधारणां भारतीयांना मिळाल्या पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. हिंदी राजकरणात डॉ. बेझंट यांचा प्रभाव १९१४ पासून प्रकर्षाने जाणवू लागला. जनजागृतीसाठी त्यांनी " कॉमनवील" नावाचे साप्ताहिक सुरु केले, तसेच "न्यू इंडिया" नावाचे दैनिकही सुरु केले. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळवणे हे या वृत्तपत्रांच्या कार्याचे उद्दिष्टे असल्याचे घोषित करण्यात आले. हिंदुस्थानच्या प्रश्नांवर इंग्रज लोकमताची सहानुभूती मिळविण्यासाठी त्या इंग्लंडला गेल्या. "हिंदुस्थानची एकनिष्ठा जर तुम्हाला हवी असेल तर तुम्ही हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिले पाहिजे" असे ठणकावून सांगण्यास त्या कचरल्या नाहीत. भारतातील २० वर्षाच्या वास्तव्यात त्यांनी सर्व क्षेत्रात कामगिरी करुन प्रचंड लोकप्रियता मिळविली.

**२) होमरुल लीगची स्थापना :** होमरुल म्हणजेच 'स्वशासन' व ते मिळविण्याची चळवळ म्हणजे होमरुलची चळवळ. डॉ. बेझंट यांनी १९१५ च्या मुंबई अधिवेशनात होमरुल चळवळीला काँग्रेसचा पाठींबा मिळविण्यासाठी ठराव मांडला पण मवाळांनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने सप्टेंबर १९१६ मध्ये "होमरुल लीग" या स्वतंत्र संघटनेची घोषणा केली. मुंबई, अहमदाबाद, कानपूर, कलकत्ता, मद्रास इ. मोठ्या शहरांमध्ये लीगच्या शाखा स्थापन झाल्या. देशाच्या निरनिराळ्या भागात दौरे करुन, ठिकाठिकाणी सभा घेऊन होमरुलची मागणी सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. वृत्तपत्रांच्या माध्यमातून त्यांनी तडाखेबंद प्रचार चालविला. डॉ. बेझंटबाईंची विद्वत्ता, त्यांचा हिंदू संस्कृतीचा अभ्यास व हिंदू तत्वज्ञानाबद्दलचे प्रेम यामुळे देशातील हजारो सुशिक्षितांच्या मनात त्यांच्याबद्दल आदर वाटत होता. स्वाभाविक जेव्हा डॉ.बेझंटबाईंनी हिंदी स्वराज्याचा प्रश्न आपल्या हाती घेऊन हिंदी लोकांना स्वराज्याचे हक्क मिळवण्यासाठी चळवळ चालवली तेव्हा त्यांना देशातून हजारो अनुयायी मिळाले. पहिल्या महायुद्धात अडकलेल्या इंग्लंडला कोंडीत पकडून भारतीयांशी स्वशासनाचे अधिकार मागुन घ्यावेत असा जहाल प्रचार केला.

**३) लोकमान्य टिळक व होमरुल चळवळ :** हिंदुस्थानासाठी स्वराज्य मागणे व त्यासाठी चळवळ उभारणे ही त्यावेळच्या राजकारणातील जहाल विचारसरणी होती. अशा चळवळीचा लोकमान्य टिळकांनी पुरस्कार करणे अगदी स्वाभाविक होते. लो. टिळकांच्या दृष्टीने हिंदी राष्ट्रीय चळवळीसाठी ही सुवर्ण संधी होती. म्हणून होमरुल सारखी तीव्र चळवळ उभारली पाहिजे असे लो. टिळकांना वाटत होते. डॉ. ॲनी बेझंट राष्ट्रसभेत होत्या पण अद्यापी लो. टिळकांचा राष्ट्रसभेतपुर्न प्रवेश झालेला नव्हता. तेव्हा होमरुल चळवळ सुरु करण्यास जशी बेझंटबाईंना

राष्ट्रसभेची संमती मिळविणे आवश्यक वाटत होते तसे लो. टिळकांना वाटत नव्हते. त्यामुळे बेझंटबाईंच्या अगोदर २८ एप्रिल १९१६ रोजी त्यांनी महाराष्ट्रात होमरुल लीग या संघटनेची स्थापना केली. बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा हे होमरुल लीगचे अध्यक्ष होते तर न.चि. केळकर हे सचिव होते. याशिवाय खापर्डे, मुंजे व करंदीकर हे लोकमान्यांचे इतर तीन सहकारी संस्थापक सदस्य होते.

होमरुल चळवळीसंबंधी लो. टिळकांची भूमिका स्पष्ट होती. राष्ट्रसभेसारख्या राष्ट्रव्यापी संघटनेला अशा प्रकारची चळवळ अचानक सुरु करणे कठीण असल्याने पुढील मार्ग सुखकर व्हावा म्हणून अशा प्रकारच्या चळवळीची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. होमरुल चळवळ राष्ट्रसभेच्या विरुद्ध नसून ती तिला पुरकच आहे असे स्पष्ट बजावले होते.

ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वशासीत राज्याचा दर्जा सनदशीर मार्गाने मिळविणे त्यासाठी जनजागृती व संघटन करणे हे उद्दिष्ट त्यांनी घोषित केले. लो. टिळकांनी केसरी व मराठा वृत्तपत्रातून आपल्या चळवळीचा झंझावाती प्रचार सुरु केला. एवढेच नव्हे तर १९१६ च्या मध्यावर देशव्यापी दौरे व ठिकठिकाणी सभा घेऊन चळवळीची भूमिका व उद्दिष्टये लोकांना सांगून या चळवळीने लोकप्रियता मिळवून दिली. डॉ. बेझंटबाई व लो. टिळक यांच्या होमरुल लीगच्या दोन संघटना असल्या तरी त्यांची चळवळ एकच होती व या दोन्ही संघटनांत परस्परात सहकार्य व सामंजस्य होते. लो. टिळकांनी महाराष्ट्र व मध्य प्रांत येथे व हे दोन प्रदेश सोडून सर्व देशभर बेझंटबाईंनी चळवळ चालवावी असे उभयतांत ठरले होते. एका वर्षात टिळकांच्या संघटनेत १४ हजार सदस्य सामील झाले. १६ हजार रुपये निधी गोळा झाला. लोकप्रियतेत होमरुल लीगने काँग्रेसलाही मागे टाकले. राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्त्व लो. टिळक व डॉ. बेझंट यांच्याकडे आले.

**४) होमरुल चळवळीचे परिणाम :** या दोन नेत्यांच्या व होमरुल लीग चळवळीच्या लोकप्रियतेचा प्रत्यय १९१६ च्या लखनौ अधिवेशनात आला. या वेळी राष्ट्रसभेतील मवाळ-जहाल तर एक झालेच शिवाय मुस्लिम लीग व राष्ट्रसभा यांचे स्वराज्याच्या मागणीसंबंधी एकमत झाले व त्यातून लखनौ करार पुढे आला. स्वराज्याची मागणी एकमुखाने करण्यात आली. मवाळ व तटस्थवृत्ती धारण करणारे लोक या चळवळीत आपणहून सामील झाले. होमरुल चळवळीचे वैशिष्टय म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रथमच हिंदी स्त्रिया सामील झाल्याचे दृश्य दिसून आले. धास्तावलेल्या इंग्रजांनी टिळक व बेझंटबाईची नाकेबंदी करण्याचा निर्णय घेतला. जुलै १९१६ मध्ये प्रक्षोभक भाषणाचा आरोप ठेऊन खटला भरला पण उच्च न्यायालयात टिळक निर्दोष सुटले. मद्रास सरकारने ॲनी बेझंटला स्थानबद्ध केले. अनेक कार्यकर्त्यांची धरपकड करुन ही चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. पण या दडपशाहीला भीक न घालता काँग्रेसने १९१७ च्या अधिवेशनांचे अध्यक्षपद ॲनी बेझंटला दिले. मद्रास सरकारने बेझंटविरुद्ध घेतलेला निर्णय बदलण्यासाठी मोठे जनआंदोलन उभारले गेले "ॲनी बेझंट यांना स्थानबद्ध करुन भारत सरकारने अनेक बेझंट निर्माण केले आहेत" अशी प्रतिक्रीया लॉर्ड मॉटेग्यू यांनी व्यक्त केली.

**५) होमरुलचे परदेशातील कार्य :**हिंदुस्थानातील होमरुल चळवळीचे पडसाद परदेशातही उमटले. इंग्लंड व अमेरिकेतील वृत्तपत्रांनीही तिची दखल घेतली. अमेरिकेसारख्या लोकशाहीवादी राष्ट्राची सहानुभूती हिंदी स्वराज्याच्या प्रश्नाला मिळत होती. अमेरिकन कामगार-वर्गाने हिंदुस्थानला कॅनडासारखे वसाहतीचे स्वराज्य देण्यात यावे म्हणून मागणी केली. अमेरिकेत न्यूयॉर्क शहरी होमरुल लीगची स्थापना करण्यात आली. अमेरिकेचा पाठिंबा मिळविण्यासाठी लीगच्या वतीने लाला लजपत राय, एस.एस. हार्डीकर व के.डी. शास्त्री यांना अमेरिकेत पाठविले. मद्रास हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायाधीश सर सुब्रह्मण्य अय्यर हे मद्रास प्रांतातील होमरुल लीगचे अध्यक्ष होते. त्यांनी १९१७ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन यांना पत्र लिहून हिंदुस्थानच्या स्वराज्य चळवळीस सहाय्य करण्याची विनंती केली. विल्सनने जाहीर केलेल्या युध्दध्येयांच्या घोषणेत लोकशाहीचे संरक्षण व स्वयंनिर्णयाचे तत्व यांचा समावेश होता. होमरुल चळवळीचा प्रभाव इतका जबरदस्त होता की ब्रिटिश साम्राज्याला भारतासाठी सुधारणा जाहीर कराव्या लागल्या.

### ४.५.१ आपली प्रगती तपासा :

१. भारतीय स्वांतत्र्य चळवळीतील होमरुल व टिळक यांचा संबंध स्पष्ट करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## ४.६ मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा :

१९०९च्या मोर्ले-मिंटो सुधारणा कायद्याने भारतीयांचे समाधान झाले नाही. केवळ लोकशाहीच्या हक्कांचा देखावा निर्माण करणाऱ्या सुधारणा असल्यामुळे नेत्यांचाही अपेक्षाभंग झाला होता. साहजिकच इंग्रजांविरुद्ध राष्ट्रीय चळवळ वाढत गेली. एका बाजूला क्रांतीकारी चळवळ वाढत होती तर दुसऱ्या बाजूला क्रांतीकारकांना दडपण्यासाठी १९०८ पासून अनेक जुलमी कायदे केले होते. स्वातंत्र्य चळवळ दडपण्यासाठी ब्रिटिशांनी 'फोडा व झोडा' नितीचा अवलंब करुन हिंदू व मुस्लिमांना अलग पाडले होते. मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले. परंतू बंगालची फाळणी व तुर्कस्थानचा पराभव या प्रकरणांनी मुस्लिम ब्रिटिशांच्या विरोधात गेले, पण पुढे १९१६ मध्ये काँग्रेस व मुस्लिम लीग एकत्र येऊन त्यांच्यात लखनौ करार घडून आला. मवाळवादी काँग्रेसचे स्वरुप बदलून ती जहालवादी बनली दिवसेंदिवस आक्रमक बनत गेली.

१९१४ रोजी सुरु झालेल्या महायुद्धात इंग्लंडला भारतीयांच्या मदतीची आवश्यकता होती त्यातच लो. टिळक व डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरुल चळवळ तीव्र करुन इंग्रजांच्या अडचणीत भर घातली. पलीकडे दक्षिण आफ्रिकेत मोहनदास करमचंद गांधी यांनी ब्रिटिशांच्या अन्यायाविरुद्ध यशस्वी सत्याग्रह करुन भारताचे लक्ष वेधून घेतले होते. अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी युद्धानंतर पारतंत्र्यात असणाऱ्या राष्ट्रांना स्वयंनिर्णयाचे तत्त्व लागू केले जाईल असे घोषित केल्याने भारतात आनंदाची लाट उसळली.

१२ जुलै १९१७ रोजी मॉटेग्यू यांची भारतमंत्री म्हणून नियुक्ती झाली. भारतीय जनतेचा उत्साह, मागण्या आणि वाढता असंतोष त्यांच्या लक्षात आला. हिंदुस्थानात आल्यावर आपल्या कारभाराचे ध्येय हिंदी जनतेसमोर ठेवले. २० ऑगस्ट१९१७ रोजी भारतमंत्री मॉटेग्यूने 'ऑगस्ट' घोषणा केली. या घोषणेनुसार,

१) हिंदुस्थान हा ब्रिटिश साम्राज्याचा अविभाज्य भाग राहील. साम्राज्यांतर्गत स्वराज्य देणे हे इंग्रजांचे ध्येय राहील.

२) हिंदुस्थानला मिळणाऱ्या स्वराज्यात जबाबदार शासनपद्धतीचा स्वीकार केला जाईल.

३) स्वराज्याचे ध्येय प्राप्त करण्यासाठी प्रथम प्रशासनात हिंदी लोकांचे जास्तीतजास्त सहकार्य मिळवून स्थानिक स्वराज्य संस्थांची वाढ करुन प्रगती साधली जाईल.

४) हिंदी जनतेला टप्प्याटप्प्याने सुधारणा देण्यात येतील इंग्लंडचे सरकार व हिंदुस्थानातील सरकार यांनी सुधारणांचे धोरण ठरवावे. सरकारला सहकार्य करुन भारतीयांनी आपली पात्रता सिद्ध करावी.

या घोषणेनंतर मॉटेग्यूने हिंदुस्थानचा दौरा केला. अनेक पक्षांच्या व गटांच्या गाठीभेटी घेऊन विचारविनिमय केला. हिंदुस्थान सरकारशी विशेषतः व्हाइसरॉय चेमस्फर्डशी चर्चा करुन हिंदुस्थानच्या घटनात्मक सुधारणेचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानुसार ब्रिटिश पार्लमेंटमध्ये २३ डिसेंबर १९१९ रोजी हा मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदा पास झाला. या कायद्यातील कलमे खालीलप्रमाणेः

१) भारतमंत्र्याचा पगार हिंदुस्थान सरकारच्या तिजोरीतून न देता इंग्लंडच्या तिजोरीतून द्यावा.

२) इंडिया कौन्सिलच्या सभासदांची संख्या ८ ते १२ करण्यात येऊन त्यात पूर्वीच्या २ ऐवजी ३ हिंदी सभासदांची नियुक्ती करण्यात आली.

३) इंग्लंडमध्ये हायकमिशनर या स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली. भारताला लागणारे साहित्य खरेदी करणे, भारताचा व्यापार वाढविण्यासाठी प्रयत्न करणे, इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थ्यांच्या सोयी पहाणे इत्यादी कामे सोपवली. त्याची नेमणूक गव्हर्नर-जनरलने करावयाची होती.

४) या कायद्याने गव्हर्नर-जनरलचे परराष्ट्र खात्यावर प्रत्यक्ष नियंत्रण सुरु झाले.

५) गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळात ६ सभासद असतील त्यापैकी ३ हिंदी सभासद असतील.

६) या कायद्याने केंद्रीय कायदेमंडळाची दोन सभागृहे प्रस्थापित झाली. (१) कनिष्ठ सभागृह (२) वरिष्ठ सभागृह. कनिष्ठ सभागृह मुदत ३ वर्षे तर वरिष्ठ सभागृहाची मुदत ५ वर्षे करण्यात आली.

७) कनिष्ठ सभेचे १४५ सभासद व वरिष्ठ सभेचे ६० सभासद असावेत. या कायद्यान्वये उभय सभागृहांत लोकप्रतिनिधींचे बहुमत झाले.

८) कनिष्ठ सभेतील १४५ सभासदांपैकी ४१ सरकारी व बाकीचे १०४ बिनसरकारी, प्रांतातून लोकांनी निवडून दिलेले असत. लोकनियुक्तांपैकी ३० मुसलमान, ७ जमीनदार, २ शीख, ४ व्यापारी आणि ५२ सर्वसाधारण मतदारसंघातून अशी विभागणी होती.

९) वरिष्ठ सभेच्या ६० सभासदांपैकी १९ सरकारी अधिकारी, ७ सरकारनियुक्त बिनसरकारी सभासद आणि ३४ लोकप्रतिनिधी अशी रचना होती. ३४ पैकी १० मुस्लिम मतदारसंघातील मुसलमान सभासद असत.

१०) या कायद्याने मताचा अधिकार फक्त कर भरणाऱ्या व्यक्तींनाच देण्यात आला. सर्वच ठिकाणी मताधिकाराची पात्रता सारखी ठेवण्यात आली नाही. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्यांनाही मताधिकार होता.

११) केंद्रीय कायदेमंडळाचे अधिकार वाढून हिंदुस्थानसाठी कायदे करणे, जुन्या कायद्यात दुरुस्ती किंवा संपूर्ण बदल करणे हे अधिकार मिळाले पण त्यासाठी अंतीम मान्यता गव्हर्नर जनरलची लागत असे.

१२) कार्यकारी मंडळाचे सभासद कायदेमंडळाला जबाबदार नव्हते तर ते आपल्या कामाबाबत वैयक्तिकरित्या गव्हर्नर जनरलला जबाबदार असत.

१३) प्रांतीय कायदेमंडळातील सदस्य संख्या वाढविण्यात आली. जातीय व वर्गीय मतदारसंघ पाडून प्रतिनिधीत्व देण्यात आले. कायदे मंडळातील सदस्यसंख्या प्रांताचा आकारमान व लोकसंख्येवरुन ठरविली.

१४) या कायद्याने केंद्रीय व प्रांतीय या दोन विषयसुचीमध्ये खात्यांची विभागणी केली. महत्त्वाची खाती केंद्र सरकारकडे सोपविण्यात आली.

१५) या कायद्याने प्रांतात द्विदल राज्यपद्धती निर्माण केली. प्रांताच्या यादीतील विषयांची राखीव व सोपीव खाती निर्माण केली. राखीव खात्यात जास्त महत्त्वाच्या व सोपीव खात्यात कमी महत्त्वाच्या विषयांचा समावेश केला. सोपीव खाती लोकप्रतिनिधींच्या हाती देण्यात आली. प्रांताच्या गव्हर्नरना जादा अधिकार दिल्याने लोकप्रतिनिधींची गळचेपी होत असे.

१९०९ च्या कायद्यापेक्षाही हा कायदा अधिक प्रगतीवादी होता परंतू जबाबदार शासनपद्धती निर्माण होऊ शकली नाही. अल्पसंख्यांक वर्गांना स्वतंत्र मतदारसंघ दिल्याने राष्ट्रीय एकत्मतेच्या दृष्टीने या कायद्याचा हा मोठा दोष होता त्यामुळे देशात फुटीर वृत्ती पोसल्या गेल्या. सर्व नागरिकांना मताधिकार मिळालेला नव्हता.स्त्रियांचा हक्क डावलला होता. अंदाजपत्रकांवर टीका करण्याचा हक्क जरी सभासदांना मिळाला होता तरी अद्यापही अंदाजपत्रकांवर त्यांना मतदान करता येत नव्हते. द्विदल राज्यपद्धतीत अनेक दोष होते त्यामुळे भारतीय नेत्यांची घोर निराशा झाली. जनआंदोलन वाढीस लागले. चंपारण्याच्या सत्याग्रहानंतर म.गांधीनी अहमदाबाद येथील कापड गिरणी कामगारांच्या न्याय मागणीसंबंधी आंदोलन उभारुन सत्याग्रहाच्या मार्गानेच गिरणी मालकाकडून न्याय मिळवून दिला. गुजरात येथील खेडा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सहाय्य केले. खेडा जिल्ह्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती असताना सारा तहकुबी करण्याचा कायदा असताना सरकारने दडपशाहीकरुन सारा वसुलीचे काम सुरु केले. म. गांधीनी शेतकऱ्यांचे नेतृत्त्व करुन सरकारला सारा न देण्याचे व सरकारच्या दडपशाहीस अहिंसात्मक प्रतिकार करण्याचा आदेश दिला. सत्याग्रहाकडे देशाची नजर लागली होती. राष्ट्रीय मुक्ती-संग्रामात खेड्यातील शेतकरीही सामील होण्याच्या प्रक्रियेस सुरवात झाली. सरकारची दडपशाही चालू झाली परंतु शेतकऱ्यांनी माघार घेतली नाही. लाठीमार घरादारांची जप्ती, तुरुंगवास सर्व काही सहन केले. शेवटी सरकारला नमावे लागले व शेतकऱ्यांच्या मांगण्या मान्य कराव्या लागल्या. गांधीजी लोकप्रियतेच्या शिखरावर जाऊन पोहचले.

**४.६.१ आपली प्रगती तपासा :**

१. १९१९ च्या मॉटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा कायदयातील ठळक पाच तरतूदी सांगा.

---

---

---

---

## ४.७ सारांश

अशाप्रकारे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १८८५ ते १९२० या कालखंडातील दोन्ही मवाळ व जहाल गटांनी आपापली ध्येयधोरणे राबविण्याचा प्रयत्न केला. याच कालखंडात मोर्ले - मिटों सुधारणा कायदयाचा उपयोग करुन ब्रिटिशांनी विभक्त मतदारसंघाच्या माध्यमातून ‘फोडा व राज्य करा’ या तत्त्वाचा अवलंब केला. १९१९ च्या मॉंटेग्यु -चेम्सफर्ड सुधारणा कायदयाने द्विदल राज्यपध्दतीची सुरुवात झाली. पंरतु भारतामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून आल्या नाहीत व पुढे या परिस्थितीचा फायदा गांधीजीना झाला.१९२० नंतर काँग्रेसचे सर्व ध्येय धोरणे व कार्यक्रम गांधीजींच्या नेतृत्वाखाली राबविण्यास सुरुवात झाली व गांधी युगाची सुरुवात झाली.

## ४.८ प्रश्न

१ मवाळ कालखंडातील ध्येय, उद्दिष्टये व कार्यक्रमाची चर्चा करा.

२ १९०५ ते १९२० या काळातील काँग्रेसच्या कार्यक्रमाचे टिकात्मक परिक्षण करा.

३ भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील होमरुल चळवळीच्या योगदानाची चर्चा करा.

४ टिपा लिहा.

१. लोकमान्य टिळक

२. मोर्ले-मिंटो सुधारणा (१९०९)

३. माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा (१९१९)

४. होमरुल चळवळ

❖❖❖❖

# ५

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ - २
# गांधीयुग

**प्रकरण रुपरेषा**

५.० उद्दिष्टे
५.१ असहकार चळवळ (१९२०-२२).
५.२ सविनय कायदेभंग चळवळ
५.३ १९३५ चा भारत सरकारचा कायदा
५.४ दुसरे महायुद्ध व भारत (१९३९-४५)
५.५ क्रिप्स योजना, १९४२
५.६ चले जाव आंदोलन
५.७ भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील गांधीजींच्या भूमिकेचे मूल्यमापन
५.८ नेताजी सुभाषचंद्र बोस (१८९७-४५) व आझाद हिंदसेना
५.९ सारांश
५.१० प्रश्न

## ५.० उद्दिष्टे

१ गांधीजींची प्रारंभिक सत्याग्रहातील भूमिका समजून घेणे.
२ गांधीजींच्या राजकीय व सामाजिक चळवळींचा अभ्यास करणे
३ सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याचा आढावा घेणे.
४ आझद हिंद सेनेचे कार्य समजून घेणे.

## ५.१ असहकार चळवळ (१९२०-२२) :

१९१९ मधील रौलेट ॲक्टमुळे कोणालाही अटक करण्याचा व खटल्याशिवाय तुरुंगात टाकण्याचा अधिकार सरकारला मिळाला. परिणामी जालियनवाला बाग हत्याकांड घडले. शांत व नि:शस्त्र जमावावर जनरल डायरने अंदाधुंद गोळीबार करुन शेकडो लोकांना ठार व जखमी केले. या घटनांमुळे आणि खिलाफत चळवळीसंबंधी इंग्रजांच्या भूमिकेमुळे गांधी व्यथित झाले. १९२० मध्ये कॉंग्रेस अन्यायी सरकारबरोबर असहकार करण्याचा ठराव संमत केला. त्यानुसार सरकारी पदव्यांचा त्याग करणे, कायदे मंडळ, न्यायालये, शिक्षण संस्था, परकीय माल

इत्यादीवर बहिष्कार घालणे, त्यांचबरोबर शिस्त राखणे, राष्ट्रीय शिक्षण संस्थाना संरक्षण, आपसातील संघर्ष मध्यस्थीने सोडविणे, खादीचा वापर व त्यागाची भावना इ. गोष्टींचा समावेश होता. १९२१ मध्ये असहकार चळवळीत जवळजवळ ३०,००० लोक तुरुंगात गेले. परंतू उत्तरप्रदेशातील गोरखपूरजवळच्या चौरी-चौरा येथे लोकांनी एका पोलीस चौकीला आग लावली. त्यात २१ पोलीस जळून खाक झाले. या घटनेच्या निषेधार्थ १९२२ मध्ये म.गांधींनी असहकार चळवळ मागे घेतली. जनतेला रचनात्मक कार्य करण्याचा सल्ला दिला.

राष्ट्रसभेतील बहुतेक पुढाऱ्यांना म.गांधीचा हा आकस्मिक निर्णय आवडला नाही अनेकांनी त्यांच्यावर कडक टीकाही केली. सुभाषचंद्र बोस यांनी या घटनेचे वर्णन 'राष्ट्रीय संकट' असे केले. चळवळीत भाग घेणारे हजारो स्वयंसेवक व नेते म.गांधींवर रागावले. गांधींच्या धोरणाने नाराज होऊन चित्तरंजन दास आणि पंडीत मोतीलाल नेहरु यांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला. हा पक्ष कायदेमंडळाच्या कामकाजात भाग घेण्याचा समर्थक होता. या मार्गाने सरकारच्या कार्यात अडथळा आणावा असे पक्षाचे मत होते. १९२३ च्या निवडणुकांमध्ये स्वराज्य पक्षाला मध्यप्रांत व बंगालमध्ये बहुमत प्राप्त झाले. काँग्रेस व स्वराज्य पक्ष यांची उद्दिष्ट्ये सारखीच असल्याने स्वराज्य पक्षाला काँग्रेसने पाठिंबा दिला. स्वराज्य पक्षाने १९२५ पर्यंत चांगली कामगिरी केली पण पुढे स्वराज्य पक्षाची ताकद क्षीण होत गेली. १९२५ मध्ये देशबंधू चित्तरंजनदास मृत्यू पावले व या पक्षातील नेत्यांनी सरकारशी सहकार्य करण्याचे धोरण स्विकारले.

१९१९ च्या कायद्याचे निरीक्षण करण्याकरिता इंग्लंड सरकारने सायमन कमिशन नियुक्त केले. त्यात एकही भारतीय नव्हता. त्याचे स्पष्टीकरण लॉर्ड बर्कनहेडने असे दिले की,भारतातील वेगवेगळ्या राजकीय पक्षात खूप मतभेद आहेत तेव्हा त्यांने असे आवाहन केले की, सर्व पक्षांनी मिळून घटना तयार केली तर इंग्लंडची संसद त्यावर विचार करील ब्रिटिशांचे हे आवाहन स्विकारुन एका सर्वपक्षीय अधिवेशनात घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी पं. मोतीलाल नेहरुंच्या अध्यक्षेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली. या समितीने आपला अहवाल १९ मे १९२८ रोजी काँग्रेसकडे सादर केला. या अहवालास 'नेहरु रिपोर्ट' असे म्हणतात. अहवालामध्ये ब्रिटिश साम्राज्यातील स्वशासित प्रदेशांप्रमाणे एक जबाबदार सरकार असावे अशी सूचना करण्यात आली परंतु त्यावर कारवाई झाली नाही म्हणून डिसेंबर १९२९ च्या लाहोर काँग्रसने 'पूर्ण स्वातंत्र्याचा' ठराव संमत केला.

## ५.२ सविनय कायदेभंग चळवळ (१९३०-३५)

इ.स. १९२८ मध्ये गांधी पुन्हा सक्रीय झाले. ३१ डिसेंबर १९२९ पूर्वी ब्रिटीश सरकारने वसाहतीचे स्वराज्य दिल्यास काँग्रेसने ते मान्य करावे, परंतू त्याचबरोबर हि मागणी पूर्ण न झाल्यास आपण स्वतः कायदेभंगाच्या चळवळीस प्रारंभ करु अशी घोषणा गांधीनी केली. १२ मार्च १९३० रोजी गांधी साबरमती आश्रमातून आपल्या ७८ सहकाऱ्यांसह समुद्रकिनाऱ्यावरील दांडीकडे निघाले. तेथे प्रचंड जनसागर लोटला होता. सत्याग्रहींनी बेकायदेशीर मीठ बनवून

मीठाचा कायदा मोडला. या घटनेची तुलना सुभाषचंद्र बोस यांनी नेपोलियन एल्बा बेटावरुन पॅरिसकडे निघाला त्या घटनेशी केली. एका इंग्रज वार्ताहराने टिंगल करताना म्हटले की हे कृत्य बालिशपणाचे आहे. ब्रेल्सफोर्ड नावाचा दुसरा वार्ताहर म्हणतो, समुद्राचे पाणी केटलीत उकळून सम्राटाला पदभ्रष्ट करता येईल ? साम्राज्यवादाच्या समर्थकांना या चळवळीचे नैतिक सामर्थ्य जोखता आले नाही. लवकरच ६०,००० स्वयंसेवक चळवळीत सहभागी झाले. सभा, मोर्चे व निदर्शने होऊ लागली. हजारो सत्याग्रही व शेकडो नेते तुरुंगात डांबले जाऊ लागले. परदेशी मालाच्या होळ्या होऊ लागल्या. लोक सरकारी पदांचे राजीनामे देऊ लागले. जनता पोलीसांना अगर लष्कराला घाबरत नव्हती. स्वातंत्र्यासाठी हसत हसत लाठ्या खात होती. मिठाचा सत्याग्रह, सरकारी शिक्षण संस्थावर बहिष्कार, परदेशी माल, दारु, अफू विकणाऱ्या दुकांनासमोर निदर्शने, परदेशी मालाची होळी, करबंदी हे कायदेभंग चळवळीतील प्रमुख आदेश जनतेला दिले होते. ५ मे १९३० रोजी म.गांधीना पकडून येरवडयास रवाना करण्यात आले.

५ मार्च १९३१ रोजी मित्रांच्या सहकार्याने गांधी-आयर्विन करार होऊन दोघांनी ही समजुतदारपणा दाखविला. १९३० साली सुरु झालेली सविनय कायदेभंगाची चळवळ या कराराने समाप्त झाली. म.गांधीनी सरकारला सवलती दिल्या असतील, तथापि त्यांनी तत्त्वांशी तडजोड केली नाही. संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयापासून ते दूर झाले नाहीत. व्हाईसरायने अशी घोषणा केली की, भारताच्या घटनात्मक विकासाचा उद्देश भारताला वसाहतीचे स्वराज्य देणे हा आहे. भारताच्या घटनात्मक सुधारणांसाठी बोलविलेल्या १९३१ च्या दुसऱ्या गोलमेज परिषदेत म.गांधी सहभागी झाले. हिंदुस्थानची भावी घटना कशी असावी यावर परिषदेत चर्चा व्हावयाची होती. मुसलमान, ख्रिश्चन, अस्पृश्य, ॲग्लो इंडियन यांच्या प्रतिनिधींनी त्यांच्या समाजासाठी स्वतंत्र मतदासंघाची मागणी केली. गांधीजी लंडनहून निराश होऊन परतले व १९३२ मध्ये त्यांनी पुन्हा सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली. म.गांधी हिंदुस्थानात येताच काँग्रेसची चळवळ दडपून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी जय्यत तयारी केली. त्याआधीच सरकारने नेहरु, खान अब्दूल गफार खान, शेरवाणी या नेत्यांना अटक केली होती. दुसऱ्या दिवशी ४ जानेवारी १९३२ रोजी म.गांधीना अटक करुन येरवडा तुरुंगात डांबले. १ लाख २० हजार लोक तुरुंगात टाकले. सरदार वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद, डॉ. अन्सारी इतर लहान पुढाऱ्यांनाही तुरुंगात टाकले. काँग्रेस संघटना बेकायदेशीर ठरवून मॅजिस्ट्रेटला व पोलिसांना अमर्याद अधिकार दिले. मारहाण, गोळीबार करणे, मालमत्ता जप्त करणे, वृत्तपत्रां वर बंदी, संपूर्ण खेडयावर कर आकारणे अशी सरकारची दडपशाही वाढत गेली.

कायदेभंग चळवळ चालू असतांना इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १६ ऑगस्ट १९३२ रोजी 'जातीय निवाडा' जाहिर करुन अल्पसंख्याक प्रांतातील मुसलमानांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व, ख्रिश्चन, अँग्लो इंडियन आणि युरोपीयन यांनाही त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणावरुन प्रतिनिधीत्व मिळाले. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ तसेच सर्वसामान्य मतदारसंघामध्ये मतदान करण्याचा हक्कही मिळाला. म.गांधींनी जातीय निवाडयाला विरोध करुन स्वतंत्र मतदार संघाची निर्मिती हा दलितांच्या कल्याणासाठी लाभदायक मार्ग नाही या धारणेतून २० सप्टेंबर १९३२ पासून आमरण उपोषणाला बसण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रीय

पुढाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली. चुनीलाल मेहता, घनश्यामदास बिर्ला यांनी गांधीना निर्णयापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला पण कांहीही उपयोग झाला नाही. मदनमोहन मालवीयांनी पुढाकार घेऊन दलित नेत्यांशी बोलणी सुरु केली. अखेरीस सर्व नेत्यांना डॉ. आंबेडकरांचे मन वळविण्यात यश आले. डॉ. आंबेडकर स्वतंत्र मतदार संघाचा आग्रह सोडण्यास तयार झाले. त्यातूनच २४ सप्टेंबर १९३२ रोजी म.गांधीजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात 'पुणे करार' करण्यात आला. या करारानुसार जातीय निवाड्यातून दलितांच्या स्वतंत्र मतदारसंघाचे कलम रद्द करण्याचे मान्य करण्यात आले. सरकारने या कराराला मान्यता दिली. राखीव जागांचे तत्त्व स्विकारण्यात आले. १७ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर १९३२ या काळात तिसरी गोलमेज परिषद भरली. या परिषेदला काँग्रेसचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. या परिषदेत फारसे कांही निष्पन्न होऊ शकले नाही.

## ५.३ १९३५ चा भारत सरकारचा कायदा

१९१९ च्या सुधारणा कायद्याने भारतीयांचे समाधान न झाल्याने भारतात ब्रिटिशविरोधी असंतोष वाढत होता. तीन गोलमेज परिषदातून कांहीच निष्पन्न झाले नव्हते. १९३३ रोजी सरकारने श्वेतपत्रिका प्रकाशित केली. त्या आधारे १९३५ चा कायदा पास करण्यात आला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे :

१) भारतावर इंग्लंडच्या सम्राटाचे प्रभुत्व निर्माण करुन त्याच्या नावाने गव्हर्नर जनरल व प्रांतांचे गव्हर्नर राज्यकारभार करतील.

२) ब्रिटीश भारत व भारतीय संस्थाने मिळवून संघराज्य निर्माण केले जाईल पण या संघराज्यात विलीन होण्याची संस्थानिकांवर सक्ती नव्हती.

३) राज्यकारभाराची सर्व खाती केंद्रीय, प्रांतीय विषयांवर प्रांत सरकारने व समवर्ती विषयावर दोन्ही सरकारांना कायदे करण्याचा अधिकार असेल.

४) संघराज्याचे घटक विरुध्द केंद्र किंवा एक घटक विरुध्द दुसरा घटक यांच्यामधील संघर्ष मिटविण्यासाठी एका केंद्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात आली.

५) केंद्रीय व प्रांतीय कायदेमंडळावर नियंत्रण ठेवण्यासाठी गव्हर्नर जनरल व गव्हर्नराना विशेष अधिकार देण्यात आले.

६) केंद्रात दुहेरी राज्यपध्दती सुरु होऊन प्रांतातील द्विदल राज्यपध्दती मात्र बंद करण्यात आली. त्याऐवजी प्रांताना स्वायतत्ता देण्यात आली. मंत्री हे विधानसभेला जबाबदार राहतील असे ठरले.

७) भारतातील निवडणुक पध्दतीला विस्तृत करुन मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, ॲग्लो इंडियन, स्त्रियां, कामगार यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले. मताधिकार विस्तृत करुन भारतातील १०% लोकांना मतदानाचा अधिकार मिळाला.

८) भारतमंत्र्याची परिषद रद्द करुन  भारतमंत्र्यासाठी सल्लागार मंडळ नेमण्यात आले पण हा सल्ला घेणे किंवा न घेणे त्यांच्यावर अवलंबून होते.

९) ब्रह्मदेशाला भारतापासून वेगळे करण्यात आले.  सिंध व ओरिसा हे दोन प्रांत नवीन प्रांत करण्यात आले.

१०) हा कायदा बदलण्याचा अधिकार हिंदी कायदेमंडळाला नसून फक्त इंग्लंडच्या पार्लमेंटला होता.

भारत सरकारच्या १९३५ चा कायदा म्हणजे हिंदुस्थानच्या चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. राजकीयदृष्ट्या तो महत्त्वाचा होता कारण या कायद्यामुळे हिंदुस्थान स्वराज्याच्या जवळ जाऊन पोहोचला. घटनात्मक दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा होता कारण हिंदुस्थानच्या भावी राज्यघटनेचा विस्तृत पाया या कायद्याने घातला होता. पण अनेक लोकांची मागणी तो पूर्ण करु शकला नाही. पं. नेहरुनी हा कायदा म्हणजे गुलामगिरीची एक नवी सनदच असे वर्णन केले होते. बॅ.जीनांनी या कायद्याचे वर्णन संपूर्ण सडलेला मूलतः निकृष्ट आणि संपूर्णपणे अस्वीकाराह, असे केले होते. पण या प्रतिक्रिया असल्या तरीही या कायद्याला कांही जमेच्या बाजूही होत्या हे नाकारता येत नाही.

### ५.३. ११९३७ च्या निवडणुका :

१९३५ च्या कायद्यानुसार ७ जुलै  १९३७ सरकारने प्रांतिक निवडणुका घोषित केल्या. या निवडणुकीत काँग्रेसला भव्य यश मिळाले. संयुक्त प्रांत, बिहार, ओरिसा, मुंबई, मद्रास, मध्यप्रांत आणि सरहद्द प्रांतात काँग्रेस मंत्रीमंडळे सत्तारुढ झाली. इतर प्रांतात संमीश्र सरकारे निर्माण झाली. प्रांतातील एकूण जागांपैकी ८०८ जागा सर्वसामान्य मतदारसंघासाठी व उर्वरित इतर गटांसाठी होत्या. या ८०८ पैकी काँग्रेसने ७११ जागा जिंकल्या. मुस्लिम राखीव मतदारसंघात ५८ पैकी २८ जागा जिंकल्या. मुस्लिम लीगने केवळ १०९ जागा जिंकल्या.

१९३७ ते १९३९ या काळात काँग्रेस मंत्रीमंडळांनी जनकल्याणाची विधायक कामे करुन लोकप्रियता मिळविली. प्रांतात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. कारागृहातील अनेक वर्ष खितपत पडलेल्या राजकैद्यांची मुक्तता केली. शेतकऱ्यांसाठी खंडाची रक्कम कमी केली. कर्जफेडीसाठी सवलती, कुळांना लागवडीचे अधिकार, दुष्काळग्रस्तांना मदत अशी अनेक कामे केली. औद्योगिक क्षेत्रातील असंतोष कमी केला. मुंबई, कानपूर, अहमदाबाद येथील गिरणी कामगारांचे संप मिटविले. कामगार समिती स्थापन करुन कामगाराच्या कल्याणाचे कायदे पास केले. दलितांना संरक्षण देऊन मंदीर प्रवेशाचे कायदे केले. म.गांधीनी तयार केलेली मुलोद्योग शिक्षण पध्दती राबवून शिक्षण प्रसाराचे कार्य केले. व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य देऊन जीवनासाठी शिक्षण या म.गांधीच्या विचाराला चालना दिली. १९३९ रोजी दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाली. ही संधी साधून काँग्रेसने स्वातंत्र्याचा मुद्दा उपस्थित केला. १७ ऑक्टोबर १९३९ रोजी गव्हर्नर जनरलने “देशाच्या भविव्याबाबत भारतीय नेत्यांमध्ये मतभेद असल्याने इतक्यात राजकीय बदल करणे धोक्याचे आहे ”अशी घोषणा केली. काँग्रेसला विश्वासात न घेता दुसऱ्या महायुध्दात उडी घेतल्याने सरकारच्या निषेधार्थ प्रांतीय मंत्रीमंडळाने राजीनामे दिले.

## ५.४ दुसरे महायुध्द व भारत (१९३९-४५) :

१९३९ साली दुसरे महायुध्द सुरु झाले. पंडित नेहरुंनी १९३६ रोजी लखनौच्या अभिवेशनात जाहीर केल्याप्रमाणे साम्राज्यवाद्यांचे युध्द हे साम्राज्यवादासाठीच असणार. अशा युध्दात गुलामगिरीत असलेल्या हिंदुस्थानने का सहभागी व्हावे ? राष्ट्रसभेचे हेच मत होते. काँग्रेसचा व काँग्रेस नेत्यांचा नाराजीचा सुर लक्षात घेऊन गंभीर परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी ८ ऑगस्ट १९४० रोजी एक निवेदन जाहीर केले त्यालाच 'ऑगस्ट घोषणा' म्हणतात काँग्रेसची हंगामी सरकार स्थापनेची मागणी फेटाळून पुढील आश्वासने देण्यात आली.

१) हिंदुस्थानला वसाहतीचे स्वराज्य दिले जाईल.

२) ब्रिटीश भारतातील राजकीय पक्ष आणि संस्थानिकांचे प्रतिनिधी मिळून युध्द सल्लागार मंडळ बनवले जाईल.

३) युध्दसमाप्तीनंतर सर्वपक्षीय घटनासमिती स्थापन केली जाईल.

४) अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण केले जाईल.

सरकारने राष्ट्रसभा व मुस्लीम लीग या दोन संघटनांना समाधानी ठेवण्याचा प्रयत्न या निवेदनाद्वारे केला. दोन्हीही संघटनांनी निवेदन स्विकारले नाही. ब्रिटिश राज्यकर्ते युध्दसमाप्तीनंतरही भारताला स्वराज्य देण्याचे आश्वासन देत नाहीत हे पाहताच म.गांधीनी असह काराचा निर्णय घेतला. सरकारने दडपशाही सुरु केली. दुसऱ्या महायुध्दात हुकूमशाही राष्ट्रांचा विजय होऊ नये असे. म.गांधीना वाटत होते म्हणून त्यांना इंग्लंडला अडचणीत आणणारी कायदेभंग चळवळ सुरु न करता आपला इंग्रजावरील राग व्यक्त करण्यासाठी वैयक्तिक सत्याग्रहाची गांधी-नेहरुंना, इंग्लंडला आणखी संकटात नव्हते. त्यासाठी विनोबां पहिला सत्याग्रही म्हणून निवड केली. वैयक्तिक सत्याग्रह ही प्रतिकात्मक बाब होती. या चळवळीचा अर्थ सर्वांनी एकदम कायदा न मोडता म.गांधी सांगतील त्या व्यक्तीनेच कायदा मोडून सरकारशी असहकार पुकारायचा. विनोबांनी भाषण बंदीचा कायदा मोडला त्यामुळे त्यांना ६ महिन्याची शिक्षा झाली. पंडित जवाहरलाल नेहरु यांनाही ४ वर्षाची सक्तमजूरीची शिक्षा ठोठावण्यात आली. डिसेंबर १९४१ पर्यंत चाललेल्या या आंदोलनात २६ हजारापेक्षा जादा सत्याग्रंहीना अटक झाली.लोकमत तयार होऊन जनतेची राष्ट्रीय भावना प्रज्वलित करण्यास मदत झाली. काँग्रेस निष्क्रीय झाल्याचा समज नष्ट होऊन कार्यकर्ते अधिक उत्साही बनले.

## ५.५ क्रिप्स योजना (१९४२)

दुसऱ्या महायुध्दाची व्याप्ती झपाट्याने वाढत होती, तर दुसऱ्या बाजूला वैयक्तिक सत्याग्रह चळवळ सुरु होती. राष्ट्रसभेच्या स्थापनेपासून अर्ज-विनंत्या करुन हिंदी लोकांच्या न्याय हक्कांसाठी राष्ट्रसभा झगडत होती जसा काळ जाऊ लागला तसतसे तिने आक्रमक स्वरुप धारण केले होते. जर्मनी व जपान या शत्रूंची सर्वत्र विजयी घौडदौड सुरु होती.

अमेरिकेचे अध्यक्ष रुझवेल्टनी लोकशाहीचे संरक्षण हे आपले युध्दध्येय जाहीर केले तेव्हांपासून अमेरिकेला हिंदूस्थानच्या चळवळीबद्दल आस्था वाटत होती. दुसरे महायुध्द सुरु होताच इंग्लंड-अमेरिका युती होऊन अटलांटिक सनदेनुसार स्वातंत्र्य, लोकशाही, स्वयंनिर्णय इ. तत्त्वांचा उद्घोष केला. प्रत्येक राष्ट्रास त्याचे भवितव्य ठरविण्यांचा अधिकार मान्य करण्यात आला, पण सप्टेंबर १९४१ मध्ये चर्चिलने जाहीर केले की, अटलांटिक सनद हिंदूस्थानला लागू नाही. इंग्लंडचा हा कट्टर साम्राज्यवाद अमेरिकेला पसंत नव्हता. परंतू पूर्वेकडील जपानविरुध्द युध्द जिंकण्यासाठी हिंदूस्थानचे सहकार्य हवे होते. चीनचे सर सेनापती चॅग-कै-शेक व ऑस्ट्रिलियाचे परराष्ट्र मंत्री इव्हॅट या दोन नेत्यांनी हिंदी लोकांच्या न्याय मागण्या सरकारने लवकर पुऱ्या कराव्या सभासदांनी हिंदी जनतेच्या गाऱ्हयाण्याकडे लक्ष द्यावे म्हणून आपली मते स्पष्टपणे मांडण्यास सुरुवात केली. जपानने ७ डिसेंबर १९४१ रोजी अमेरिकेच्या ताब्यातील पर्ल हार्बरवर हल्ला करुन युध्दात प्रवेश केला. आपल्या जोरदार मुसंडीने इंडोचायना, इंडोनेशिया, मलाया इ. प्रदेश जिंकून घेतले. प्रत्यक्ष ८ मार्च १९४२ इंग्रजांच्या ताब्यातील ब्रह्मदेशावर हल्ला करुन राजधानी रंगून काबीज केली. जपान हिंदूस्थानचे दरवाजे ठोठावू लागला. हिंदी जनतेच्या सहानुभूतींशिवाय व सहकार्याशिवाय हिंदुस्थानी साम्राज्याचे आपणांस संरक्षण करता येणार नाही याची खात्री पटल्याने चर्चिलसाहेबांनी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स यांना भारतात पाठविण्याचा निर्णय घेतला.

क्रिप्सला भारतीयांबद्दल सहानभूती वाटत होती. म.गांधी व पंडित नेहरु यांचे ते खास मित्र होते. यापूर्वी त्यांनी दोन वेळा हिंदुस्थानला भेट दिली होती. ते समाजवादी नेते तसेच मुत्सदी म्हणून प्रसिध्द होते. भारतीयांच्या अपेक्षा वाढून आल्या. भारतातील सर्व गटांशी त्यांनी चर्चा केली. त्यांनी २९ मार्च १९४२ रोजी योजना जाहीर केली. योजनेतील तरतुदी पुढीलप्रमाणे

१) हिंदुस्थानमध्ये संघराज्य स्थापन करुन त्याला वसाहतीचा दर्जा देण्यात येईल. या संघराज्याला ब्रिटिश राष्ट्रकुलात राहण्याचे अगर न राहण्याचे स्वातंत्र्य राहील.

२) महायुध्द समाप्तीनंतर भारतातील राज्यघटना बनविण्यासाठी घटनासमिती स्थापन करण्यात येईल. या घटनासमितीमध्ये भारतातील व संस्थानिकांचे प्रतिनिधी असतील.

३) एखाद्या प्रांताला ही घटना मान्य नसल्यास त्यांना वेगळी घटना बनवण्याचा अधिकार असेल तसाच अधिकार संस्थानांनाही असेल.

४) अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करण्याची व्यवस्था केली जाईल.

ही योजना म्हणजे निव्वळ धूळफेक होती. कॉंग्रेसने या योजनेला विरोध केला. कारण त्यात भारताला पूर्ण स्वातंत्र्य देण्याचे आश्वासन नव्हते. शिवाय भारताचे तुकडे होतील अशीच व्यवस्था ब्रिटिशांनी करुन ठेवली. प्रातांना व संस्थानांना वेगळे अधिकार असल्याने फुटीरवादाला चालना मिळणार होती. हिंदु महासभेने ही योजना फेटाळली. प्रांतांना संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार असल्याने पंजाब स्वतंत्र मुस्लिम राज्यात जाण्याचा धोका असल्याने शीखांनी या योजनेला विरोध केला. मुस्लिमांना स्वतंत्र पाकिस्तानचे आश्वासन न मिळाल्याने मुस्लीम लीगनेही विरोध केला. क्रिप्स योजनेबद्दल बोलतांना गांधीजी म्हणाले होते की, 'पुढची तारीख टाकलेला हा चेक आहे. तो सुध्दा अशा बँकेचा की जिचे दिवाळे निघणार आहे.'

## ५.६ चलेजाव आंदोलन, १९४२

क्रिप्स योजना अपयशी ठरल्याने देशात निराशेचे वातावरण पसरले. जपान केव्हांही भारतावर आक्रमण करण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. म.गांधीनी जपानचे शत्रुत्व भारताशी नसून ब्रिटीशांशी आहे त्यामुळे ब्रिटिशांनी भारत सोडल्यास जपानी आक्रमणाचा धोका आपोआप टळेल असे स्पष्ट केले. क्रिप्स योजनेच्या वाटाघाटीत गांधीजी काँग्रेसच्या नेतृत्वापासून थोडे बाजूस होत. आता त्यांनी परत राष्ट्रसभेचे नेतृत्व स्विकारुन भावी लढयाची तयारी मनात चालविली. एप्रिल १९४२ पासून 'हरिजन' या पत्रकातून या संबंधीची मते मांडावयास सुरवात केली.

आमचे काहीही होवो, ब्रिटिशांनी भारत सोडून शांतपणे जावे, त्यात भारत आणि ब्रिटन या दोघांचेही भले आहे. केवळ 'छोडो भारत' असे म्हणून इंग्रज भारत सोडणार नव्हते. म.गांधीचे हे विचार राष्ट्रसभेच्या इतर नेत्याना चटकन समजू शकले नाहीत. त्यासाठी योजना आखणे जरुर होते. चळवळ उभारणे आवश्यक होते. तसे नियोजन म.गांधी करणार होते. त्यांच्यावर राष्ट्रसभेच्या नेत्यांची श्रध्दा होती. सर्वांनी म.गांधीच्या नेतृत्वाखाली हे उघड बंड सुरु करण्याचे मान्य केले. हिंदुस्थानच्या पूर्व सिमेवर जपानी संकट उभे असताना व युरोपात इंग्लंड अडचणीत असता राष्ट्रसभेचे हे बंड ब्रिटिश सरकार सहन करु शकणार नाही. शिवाय ब्रिटीश संकटात सापडल्याने आपली चळवळ ते क्रुरपणे दडपून टाकणार नाहीत त्यांना राष्ट्रसभेसमोर नमते घ्यावे लागेल असा म.गांधीचा कयास होता. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीत इतिहास प्रसिध्द चले जाव ठराव एकमताने पास झाला. युध्दकार्यासाठी भारत इंग्लंडला मदत करेल असेही ठरविण्यात आले. काँग्रेसच्या निर्णयाचे सुभाषचंद्र बोसच्या फॉरवर्ड ब्लॉकने स्वागत केले परंतू मुस्लिम लीग, हिंदु महासभा व दलीत गटाने निषेध दर्शविला ७ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई अधिवेशनात नेहरुंनी भारत छोडोचा ठराव मांडला. ८ ऑगस्ट रोजी म.गांधीनी जनतेला मंत्रमुग्ध करणारे भाषण केले. ते म्हणाले अहिंसा हा माझा धर्म आहे. पण तुम्ही लोकांनी तिचा धोरण म्हणून पुरस्कार करावा तुम्ही जेव्हा आंदोलन सुरु कराल तेव्हा तुम्ही अहिंसा सोडता कामा नये. मी तुम्हाला छोटा मंत्र देतो. हा मंत्र असा : "आम्ही करु अथवा मरु, आमचे हे बंड नि:शस्त्र, अल्पकालीन व गतीमान असेल" .

### ५.६.१ सरकारची दडपशाही :

म.गांधीच्या नेतृत्वाखाली ही चले जाव चळवळ सुरु होणार होती व ते प्रथम व्हॉइसरायशी पत्रव्यवहार करुन या प्रश्नाची सोडवणूक होते, का हे पाहणार होते यासाठी दोन आठवड्यांचा अवधी जाणार होता. ८ ऑगस्ट रोजी गांधीजीनी चले जावची घोषणा देताच नेत्यांना आंदोलनात सहभागी होता येऊ नये म्हणून सरकारने ८ ऑगस्टच्या रात्रीच म.गांधी, जवाहरलाल नेहरु, मौलाना आझाद, आचार्य कृपलानी, असफ अली, गोविंद वल्लभपंत, डॉ. राजेंद्रप्रसाद ही सर्व मंडळी १५ जून १९४५ पर्यंत तुरुंगात डांबली होती. म.गांधीना पुण्याच्या आगाखान पॅलेसमध्ये, राजेंद्र प्रसादांना पाटणा कैदेत तर इतरांना अहमदनगरच्या तुरुंगात ठेवले होते. ही नेते मंडळी कोठे आहेत, याचा सरकारने जनतेला सुगावा लागू दिला नव्हता.

चळवळीची पाळेमुळे खणून काढण्यासाठी शेकडो लहान मोठ्या नेत्यांना बिनाचौकशी तुरुंगात टाकण्यात आले. राष्ट्रसभा बेकायदेशीर ठरवून, संघटनेची बॅकेतील खाती सरकार-जमा करण्यात आली.

राष्ट्रसभेच्या या चळवळीला मुस्लिम लीगने पाठिंबा न देता सरकारशी हातमिळवणी केली. हिंदुमहासभा उदासीन राहिली. कम्युनिस्टांनी सरकारला अनुकुल धोरण स्विकारले. फक्त समाजवादी पक्षाये. या चळवळीस आपला पाठिंबा दिला पुढे या पक्षाच्या लोकांनी भूमिगत राहून चळवळ चालू ठेवली.

**५.६.२ जनता चळवळ :**

सरकारने सर्वच नेते तुरुंगात टाकल्यामुळे देशातील जनता नेतृत्वहीन बनली. जनतेला मार्गदर्शन करण्यात नेत्यांना उसंत मिळाली नव्हती. जनता दिशाहीन होऊन चळवळ कशी करावी हे जनतेला समजत नव्हते सरकारशी मरेपर्यंत संघर्ष करायचा होता, पण तो कसा, कोणत्या पध्दतीने याविषयीचे मार्गदर्शन जनतेला मिळत नव्हते. त्यामुळे प्रत्येकाने आपापल्या परीने अर्थ लावून चळवळ सुरु केली. एरवी शांततेच्या मार्गाने आंदोलन करणारी जनता याचवेळी हिंसात्मक व आक्रमक बनली. ही चळवळ देशभर सुरु होती या चळवळीत विद्यार्थीवर्ग मोठ्या प्रमाणात सहभागी झाला होता. देशातील अनेक विद्यापीठे बंद पडली. शिक्षणसंस्था ओस पडल्या कामगारांनीही आपली भूमिका चोखपणे बजावली. मुंबई, जमशेदपूर, अहमदाबाद येथील गिरणी कामगारांनी संप व हरताळ केले. ही चळवळ शहरापेक्षा ग्रामीण भागात अधिक तीव्र होती.

रस्त्याच्या कडेची झाडे तोडून ती रस्त्यावर टाकून वाहतूक अडवणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, रेल्वेच्या फिशप्लेट काढून रेल्वेगाड्या उलथून टाकणे, रेल्वेवर हल्ले करणे, रेल्वे स्टेशन, पोस्ट ऑफिसे, तहसिलदार कचेऱ्या इतर सरकारी कार्यालये इत्यादीवर हल्ले करुन ती जाळणे, सरकारी खजिन्यावर, शस्त्रगारावर हल्ले करुन ती लुटणे व पैशाच्या सहाय्याने प्रतिसरकार स्थापण्याचा प्रयत्न करणे यासारखी धाडशी कृत्ये हाती घेतली. सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील, बंगालमध्ये मिदनापूर जिल्ह्यात, मद्रास इलाक्यात बालिया व बस्ती जिल्ह्यातही प्रतिसरकारे स्थापन करण्यात यश मिळाले होते पण ब्रिटिशांच्या सामर्थ्यासमोर प्रतिसरकारे टिकाव धरु शकली नाहीत.

सरकारने ही चळवळ दडपून टाकण्यात कोणतीच कसर केली नाही. शांततामय सभा-मोर्चांवरही लाठी हल्ले व बंदुका चालवल्या गेल्या. काही ठिकाणी जमावांना पांगविण्यासाठी विमानांतून मशिनगन्स चालवून कत्तली केल्या. पोलिस व लष्कराने निःशस्त्र लोकांवर अत्याचार केले. स्त्रियांची अब्रु लुटण्यात आली. अनेकांना उपाशी पोटी कैदेत ठेवण्यात येई. या चळवळीत गोळीबारीने १०२८ लोक मेले व ३२०० जखमी झाले असे सरकारने जाहीर केले. पण पंडित नेहरुंच्या मते चळवळीत मेलेल्यांची व जखमींची संख्या १०,००० असावी, तर कारागृहात मेलेल्यांची संख्या सरकारी आंकडेवारीनुसार ६०,००० होती. जनतेनेया चळवळीत एकूण ३१८ रेल्वे स्टेशने आळली. १२ हजार ठिकाणी टेलिफोनच्या तारा तोडल्या. ६० पोस्ट ऑफिसे

उध्वस्त केली. शेकडो पोस्ट ऑफिसांवर हल्ले केले. ५९ रेल्वे उलथून पाडल्या. या चळवळीत ४४ लाख रुपयाची संपत्ती नष्ट झाली.

**५.६.३ आंदोलनाचे महत्त्व :**

ब्रिटिशांनी दडपशाही करुन ही चळवळ दडपून टाकली तरी त्यामुळे या आंदोलनाचे महत्त्व कमी होत नाही. आधुनिक भारताच्या इतिहासातील क्रांतीकारक आणि प्रेरणादायी घटना मानली जाते. या चळवळीत भूमिगत राहून काम करणारे ज्येष्ठ नेते जयप्रकाश नाराण म्हणतात की, फ्रान्समध्ये जसे फ्रेंच राज्यक्रांतीचे स्थान आहे, रशियात जसे रशियन राज्यक्रांतीचे आहे, तसे १९४२ च्या क्रांतीचे भारताच्या इतिहासात स्थान आहे. जगातील कोणत्याही क्रांतीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेने भाग घेतलेला नाही. ही चळवळ नेत्याशिवाय जनतेने चालविलेली जनता चळवळ होती. या चळवळीनंतर अवघ्या ४-५ वर्षांत देशाला स्वातंत्र्य मिळाले. या स्वातंत्र्याची पार्श्वभूमी या चळवळीने निर्माण केली. या आंदोलनामुळे ब्रिटिश राज्यकर्ते आपला आत्मविश्वास गमावून बसले. खुद्द लष्करातील हिंदी सैनिकात व अधिकाऱ्यांत राष्ट्रीय चळवळीबद्दल आस्था व प्रेम वाढीस लागले. प्रतिसरकारांमुळे भारतीय लोक उत्तम शासक होऊ शकतात हे सिध्द झाले. जनतेला तुरुंग, लाठीमार, गोळीबार याची भिती उरली नाही. मुस्लिम लीगने विरोध करुनही, बिहार व संयुक्त प्रांतात अनेक मुस्लीम चळवळीत सहभागी झाले. या चळवळीत दलित वर्ग ही सामील झाला होता. या चळवळीचे वैशिष्ट्य म्हणजे या चळवळीत महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.

९ फेब्रुवारी १९४३ रोजी सरकारच्या दडपशाहीविरुध्द गांधीजीनी तुरुंगात उपोषण सुरु केले. प्रकृती बिघडल्याने ६ मे १९४४ रोजी सरकारने त्यांची सुटका केली जून १९४५ मध्ये इतर नेत्यांचीही सुटका केली. चले जाव आंदोलन थांबलेले असले तरी भारताचा स्वातंत्र्यसूर्य फार दूर नव्हता.

**५.६.४ आपली प्रगती तपासा :-**

१. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील छोडो भारत आंदोलनाचे महत्व विषद करा.

## ५.७ भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील गांधीजीच्या भूमिकेचे मूल्यमापन

भारताच्या राजकारणात म.गांधी १९१९ मध्ये प्रेषितासारखे उदयोन्मुख झाले आणि सातत्याने १९४७ पर्यंत त्यांचा प्रभाव कायम राहिला. त्यांचा प्रभाव किती जास्त होता हे पंडित नेहरुंनी त्यांच्या केलेल्या मूल्यमापनावरुन दिसून येते, इ.स. १९४५ मध्ये नेहरु म्हणतात, "गांधीजींचा प्रभाव" त्यांच्याशी सहमत असणाऱ्यांपुरता किंवा त्यांना राष्ट्रनेता मानणाऱ्यांपुरताच

मर्यादित नाही तर त्यांच्याशी असहमत असणाऱ्यांवर व त्यांच्यावर टिका करणाऱ्यांवरही दिसून येतो. भारतातील असंख्य लोक त्यांना स्वातंत्र्याच्या इच्छेचे व राष्ट्रवादाचे प्रतिक मानतात.कोणत्याही गर्विष्ठ सत्तेपुढे ते झुकत नाहीत किंवा देशाचा अपमान होईल असे आदेश पाळत नाहीत. भारतातील हजारो लोक त्यांच्याशी सहमत नसतीलही पण भारताच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नात मात्र सर्वच त्यांच्याकडे पहातात व त्यांना आपला नेता मानतात.

जहाल आणि मवाळ या दोन्ही राजकीय विचारसणीचे वारस होते. त्यांनी वरील दोन्ही मार्गामध्ये समन्वय प्रस्थापित केला व त्याला अधिक गतिमान व व्यावहारिक वळण दिले. जहाल आणि मवाळांच्या सामाजिक व राजकीय कार्यात असलेल्या विरोधाभासाची म.गांधीना कधीच चिंता वाटली नाही. कारण त्यांच्या मते, राजकारण म्हणजे सामाजिक परिवर्तनाचे एक माध्यम आहे. त्यांची स्वराज्याची कल्पना म्हणजे रामराज्य अशी होती ज्यात जनसामान्यांच्या हिताचा विचार केला जाईल. म.गांधीची अशी भूमिका होती की, कॉंग्रेस गरीब, निर्धन, उपाशी अशा जनतेची प्रतिनिधी आहे. म.गांधी फक्त घोषणा करुन थांबले नाही तर त्यांनी प्रत्यक्ष, कार्य केले. हिंदु-मुस्लिम ऐक्य, अस्पृश्यता निर्मूलन, ग्रामोद्योग, गोरक्षण, मुलभूत शिक्षण, खादी प्रचार या आणि अशा प्रकारच्या अनेक प्रयत्नांतून व प्रकल्पांतून गरीब जनतेची, खेडयातील लोकांची आर्थिक व सामाजिक उन्नती करण्याचा म.गांधीचा प्रयत्न होता.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक शिपाई म्हणून म.गांधी अतुलनीय आहेत. ते संत-राजकारणी होते आणि राजकीय साध्यासाठी नैतिक साधनेच वापरीत होते. पाशवी सत्तेलाही ते आत्मिक बळाने जिंकीत. त्यांनी चळवळीच्या आधारे भारताची स्वातंत्र्याची मागणी न्यायसंगत असल्याचे ब्रिटीश सरकारला दाखवून दिले. म.गांधीनी नैतिकतेचा व सत्याचा मार्ग कधीच सोडला नाही. त्यांनी प्रत्येक भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याबद्दल प्रेम आणि गुलामगिरीबद्दल तिरस्कार उत्पन्न केला. भारतीयांमध्ये धर्मनिरपेक्षतेची व राष्ट्रवादाची भावना जागृत होऊन जमातवाद व जातीयवाद त्या तुलनेत कमी झाला. भारतीय गणतंत्राने धर्मनिरपेक्ष राहण्याचा जो निश्चय केला त्याचे बरेच श्रेय म.गांधीना आहे. म.गांधी वैशिष्ट्यपूर्ण राष्ट्रीय व्यक्तीमत्व होते. ते भविष्यवेत्ता, धर्म सुधारक, समाजसुधारक होते. मानवते करिता त्यांनी अहिंसेचा संदेश दिला, हिंदू धर्मातील कर्मठपणा व अंधःश्रध्दांना त्यांनी दूर ठेवले, अहिंसेच्या मार्गाने, देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. समाजामध्ये त्यागाची व सेवेची भावना रुजविला कोट्यावधी गरिब व पददलितांचे उत्थान घडवून आणले, जगाला शांतीचा व विश्वबंधुत्वाचा संदेश देऊन अहिंसा व सत्याचा मार्ग दाखविला. म्हणूनच खऱ्या अर्थाने ते महात्मा झाले. त्यांनी केलेल्या या कार्यामुळे त्यांना भारताचे पितामह म्हटले जाते. लुई फिशर या विचारवंताच्या मते, "गांधीजी यासाठी थोर होते की, त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढा दिला. पण भारतात स्वतःची सत्ता चालविण्याची कोणतीच इच्छा नव्हती". अखेर या महान नेत्याची ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे या माथेफिरुने गोळ्या झाडून हत्या केली.

**५.७.१ आपली प्रगती तपासा :-**

१. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील गांधीजींचे वेगवेगळया सत्याग्रहातील भूमिकेचे वर्णन करा.

## ५.८ नेताजी सुभाषचंद्र बोस (१८९७-१९४५) व आझाद हिंद सेनाः

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी मध्यमवर्गीय बंगाली कुटुंबात झाला. पुढे त्यांनी कलकत्ता विद्यापिठाची पदवी घेतल्यानंतर १९२० मध्ये ते भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा (I.C.S.) उत्तीर्ण झाले व नोकरीवर रुजू झाले. पण पुढल्याच वर्षी नोकरीचे त्यागपत्र देऊन त्यांनी काँग्रेसचे सदस्यत्व स्विकारले. यावेळी भारतात असहकार चळवळ जोमात सुरु असल्याने सुभाषचंद्र बोस स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

नेताजी सुभाषचंद्राचा पिंडच मुळात क्रांतीकारी होता. ते शक्तीचे उपासक होते. थोडक्यात ते जहाल राजकारणी होते त्यामुळे त्यांचे विचार म.गांधीच्या विचाराशी जुळणारे नव्हते. १९२३ मध्ये स्वराज्य पक्ष स्थापन झाल्यावर ते स्वराज्य पक्षात सामील झाले. कलकत्ता कॉर्पोरेशनच्या निवडणुका जिंकून ते कार्पोरेशनचे मुख्यकार्यकारी बनले. नेताजी अधिकारी असले तरी त्याचे बंगाली क्रांतीकारकांशी संबंध आहेत हे लक्षात येताच सरकारने त्यांना पकडून मंडाले तुरुंगात डांबले. १९२७ साली त्यांची सुटका झाली. त्याचवेळी सायमन कमिशन भारतात आले होते त्याविरुध्द नेताजीनी बंगालमध्ये प्रचार मोहिम काढून वातावरण ढवळून काढले. नेताजींनी कतृत्वाच्या जोरावर काँग्रेसमधील तरुण गटाचे नेतृत्व आपल्याकडे खेचून आणले. पुढे १९३८ व १९३९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशनाचे अध्यक्षपद नेताजींनी भूषविले. म.गांधी व नेताजी यांचे वैचारिक दृष्ट्या कधी पटलेच नाही. नेताजी म.गांधीच्या विचारांवर नेहमी हल्ला चढवित असत. परिणामी १९३९ मध्ये त्यांना राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.

**५.८.१ जर्मनीकडे प्रयाण :** १९३९ साली दुसरे महायुध्द सुरु झाले. ब्रिटीश सरकारने स्वातंत्र्य लढा तीव्र करु पहाणाऱ्या व युध्द प्रयत्नात अडथळा आणू पाहणाऱ्या अनेक क्रांतीकारक व काँग्रेसी नेत्यांनी भारत सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यास सुरुवात केली. नेताजींनी फॉरवर्ड ब्लॉक या नव्या पक्षाची स्थापना करुन ब्रिटिश साम्राज्य वाद्यांविरुध्द लढा तीव्र करण्याचे आवाहन देशबांधवाना केले. सरकारने नेताजींना जुलै १९४० मध्ये अटक करुन तुरुंगात डांबले. पण त्यांनी तुरुंगात आमरण उपोषण सुरु केल्याने त्यांची प्रकृती खालावली. सरकारने

त्यांची सुटका करुन त्यांच्या घरावर कडक पोलीस पहारा बसविला असे असले तरी नेताजी १७ जानेवारी १९४१ रोजी झियाउद्दिन हे नाव धारण करुन अफगानिस्तान-मास्को मार्गे विमानाने २८ मार्च १९४७ रोजी बर्लीनला पोहचले. तेथे त्यांनी जर्मनीने कैद केलेल्या सैन्याची एक फौज जर जर्मनीमधील इतर भारतीय लोकांची एक अशा दोन पलटणी उभारल्या. याचवेळी जपानमध्ये आलेले क्रांतीकारक रासबिहारी बोस यांनी नेताजींना निमंत्रण पाठविले.

रासबिहारी बोस यांनी जपानमध्ये भारतीय लोकांची एक संघटना स्थापन केली होती. ती भारतीय स्वातंत्र्य संघटना या नावाने ओळखली जाते. पुढे काही दिवसातच पूर्वेकडे राहणाऱ्या भारतीय लोकांच्या प्रतिनिधींनी बैठक टोकियो याठिकाणी घेऊन मार्च १९४२ मध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना केली. कॅप्टन मोहनसिंग हे या सभेचे सेनापती होते. जून १९४२ च्या बँकॉक परिषदेचे आमंत्रण नेताजींना मिळालेच होते त्यानुसार नेताजी एका जर्मन पाणबुडीतून केप ऑफ गुडहोपपर्यंत व तेथून जपानी पाणबुडीतून जपानला पोहोचले. जपानी पंतप्रधान टोजो यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. ४ जुलै १९४३ रोजी त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संघटनेची सुत्रे हाती घेतली आणि ऑगस्ट १९४३ रोजी आझाद हिंद फौजेची पहाणी करुन रासबिहारी बोसकडून सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली. आझाद हिंद सेनेची पुर्नरचना करुन ए.सी. चटर्जीकंडे वित्त, एस.ए.अय्यर यांच्याकडे प्रचार तर लक्ष्मी स्वामीनाथन यांच्याकडे राणी ऑफ झाशी रेजिमेंटचे कार्य सोपविले. सैनिक कुशलता नसतानाही आपले अमोघ वक्तृत्व, अपूर्व व्यक्तिमत्व आणि संघटना क्षमतेच्या जोरावर त्यांना आझाद हिंद सेनेच्या सैनिकांकडून शौर्यपूर्ण कार्य करुन घेतले. आझाद हिंद सेनेत नवचैतन्य निर्माण करण्यासाठी 'चलो दिल्ली' व 'तुम्ही मला रक्त द्या मी तुम्हाला स्वातंत्र्य मिळवून देतो' या दोन प्रसिध्द घोषण केल्या. नेताजींनी सिंगापूर येथे २१ ऑक्टोबर १९४३ रोजी हंगामी सरकाची स्थापना केली. या हंगामी सरकारला जपान, जर्मनी, इटली राष्ट्रासह १३ राष्ट्रांनी रेडिओवरुन मान्यत दिली.

### ५.८.२ आझाद हिंद फौजेची कामगिरी :

युध्द आघाडीवर जलदगतीने व योग्यप्रकारे हालचाली करता याव्यात म्हणून आझाद हिंद सरकारचे कार्यालय ७ जानेवारी १९४४ रोजी सिंगापूरहून रंगून येथे हलविण्यात आले. आझाद हिंद फौजेच्या ४ पैकी सुभाष ब्रिगेडने शत्रूच्या हवाई हल्ल्यांना तोंड देऊन कलादन खोऱ्यात प्रवेश केला. पुढे जपानी लष्कर व हिंद फौजांनी हिंदुस्थानच्या सरहद्दीतील माऊडॉक हे ठाणे काबीज केले. भारतीय भूमीवर आझाद हिंद सेनेचे पाऊल पडताच आनंदाने बेहोष होऊन भूमातेचे चुंबन घेऊन तिरंगा फडकविला. लवकरच भावी संकटाची चाहूल लागल्यावर जपानी फौजांनी माघार घेतली परंतू आझाद हिंद सेनेचे शूर शिपाई कॅप्टन सूरजलमलच्या नेतृत्वाखाली तेथेच राहिले. त्यांनी सतत ४-५ महिने ब्रिटिशांचे हवाई हल्ले परतवून आपला पराक्रम सिध्द केला.

जपानी लष्कारानेही भारतीय प्रदेशात प्रवेश करुन अंदमान, निकोबार बेटे जिंकून घेऊन आझाद हिद सरकारच्या हाती सोपविली. नेताजीनी त्या बेटांना अनुक्रमे 'शहीद' व 'स्वराज्य' ही नावे देऊन तेथेही तिरंगा फडकविला. पुढे आझाद हिंद सेनेने ब्रह्मदेश सरहद्दीकडे हल्ले

चढवून भारतीय सरहद्दीत १५० मैलापर्यंत धडक मारली. पॅसिफिक महासागरात अमेरिकन सैन्याने आक्रमक पवित्रा घेतल्याने जपानी विमाने व साधन सामुग्रीचा ओघ तिकडे वळला. परिणामी ब्रह्मदेशातील जपानी आघाडी कमकुवत बनली. शेवटी मे १९४५ मध्ये पराभवामुळे व जंगल भागातून शस्त्रास्त्रे, अन्नपाणी, वस्त्रे, औषधे यांची रसद पुरविणे अवघड झाल्यामुळे तसेच ब्रिटिशांच्या हवाई हल्ल्यामुळे आझाद हिंद सेनेचे कंबरडे मोडले. शेवटी आझाद हिंद सेनेला इम्फाळ घेता घेताच आत्मसमर्पण करावे लागले.

प्रथम आझाद हिंद फौजेच्या पराक्रमाबद्दल शंका व्यक्त करणाऱ्या जपानी लष्करी अधिकारी तेरॉची याने सुभाष ब्रिगेडच्या शौर्याची व देशभक्तीची स्तुती केली. अत्यंत तोकडी शस्त्रास्त्रे अपुरे अन्नधान्य व औषधी पुरवठा शिवाय साथीला घनदाट जंगल, दलदलीचा प्रदेश, सततचा पाऊस या सर्व प्रतिकूल परिस्थितीचा सामना करीत आझाद हिंद सरकारने भारताच्या अंतर्गत भागात १५० मैलपर्यंत धडक मारली. शेकडो शिपाई कामास आले. त्यांच्या बलिदानाने निराश झालेल्या अनेक राष्ट्रवाद्यांना प्रोत्साहन मिळाले. ब्रिटीश सरकारने आझाद हिंद फौजेतील सैनिकांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावल्या. अखेर लोकमताच्या दडपणाखाली सरकारला शिक्षा रद्द कराव्या लागल्या. यावरुन आझाद हिंद फौजेच्या लोकप्रियतेची कल्पना येते. सर्व भारतीयांसमोर दुर्दम्य साहस व देशभक्तीची प्रेरणादायक मशाल म्हणून आझाद हिंद सेना सदैव तेवत राहील.

### ५.८.३ नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन :

इ.स. मे १९४५ ला रंगून ब्रिटिशांच्या हाती पडल्यावर नेताजीनी आझाद हिंद सरकारचे केंद्र प्रथम बँकॉक व नंतर सिंगापूरला हलविले. परंतु १५ ऑगस्ट १९४५ रोजी सिंगापुर पडल्यानंतर १८ ऑगस्ट १९४५ रोजी जपानी बॉम्बर विमानातून सायगावहून टोकीओकडे जाताना फोर्मोसा बेटामधील तैपेई विमान तळावर त्यांच्या विमानास अपघात होऊन नेताजींचे निधन झाले असा जपानी सरकारचा वृत्तांत आहे. परंतू राजनारायण सिन्हा यांनी चौकशी केली असता त्या दिवशी विमान अपघात झाल्याची नोंदच नाही. तेव्हा नेताजींचा मृत्यू हे अजूनही न उलगडलेले कोडे आहे. मृत्यूच्या बाबत शंका असली तरीही त्यांचे जे महत्त्वाचे योगदान त्यांनी स्वांतत्र्य चळवळीमध्ये दिलेले आहे ते अनन्यसधारण आहे.

### ५.८.४ आपली प्रगती तपासा :

१. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सुभाषचंद्र बोस व त्यांच्या आझाद हिंद सेनेच्या कामगिरीचे वर्णन थोडक्यात करा.

## ५.९ सारांश

१९२० च्या नंतर खऱ्या अर्थाने भारतीय राष्ट्रीय सभेची सर्व सूत्रे गांधीजींकडे आली व त्यानंतर त्यांनी लोकांना एकत्र करुन भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्यांनी असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आंदोलन व छोडो भारत चळवळीच्या माध्यमातून ब्रिटिशांना भारत सोडून जाण्यास भाग पाडले. याच कालखंडात सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेनेने भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली म्हणून त्यांचेही योगदान नाकारता येत नाही. अशाप्रकारे भारतीय स्वातंत्र्य चळवळ जोमाने भारतात सुरु होती व शेवटी तिचे पर्यावसन भारताच्या स्वातंत्र्यात १९४७ मध्ये झाले.

## ५.१० प्रश्न

१) असहकार आंदोलनाची सविस्तर चर्चा करा.
२) गांधीजींच्या सविनय कायदेभंग आंदेलनाचा विस्तृत परामर्श घ्या.
३) चले जाव आंदोलनाचे मूल्यमापन करा.
४) नेताजी सुभाषचंद्र बोस व आझाद हिंद सेना यांच्या कार्यावर योग्य प्रकाश टाका.
५) टीपा.
   १) असहकार कार्यक्रम
   २) मिठाचा सत्याग्रह
   ३) १९३५चा कायदा
   ४) क्रिप्स योजना
   ५) नेताजी सुभाषचंद्र बोस.

❖❖❖❖

# ६

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ - ३
# क्रांतीकारी राष्ट्रवादी चळवळ

**प्रकरण रुपरेषा**

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ क्रांतिकारी चळवळीची पार्श्वभूमी
६.३ गुरु रामसिंगची कुका चळवळ
६.४ वासुदेव बळवंत फडके यांचे बंड
६.५ महाराष्ट्रातील क्रांतीकारक
६.६ बंगालमधील क्रांतीकारक
६.७ पंजाबमधील क्रांतीकारक
६.८ भारताबाहेरी क्रांतीकारक कार्य
६.९ क्रांतीकारी चळवळीचे मुल्यमापन
६.१० सारंश
६.११ प्रश्न

## ६.० उद्दिष्टे :-

१) स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतीकारी चळवळीचे सविस्तर विवेचन करणे.
२) क्रांतीकारीचळवळीतील वेगवेगळ्या क्रांतीकारक संघटना व क्रांतीकारकांच्या कार्याचा अभ्यास करणे.
३) भारतीय व भारताबाहेरील क्रांतीकारी संघटनांचा अभ्यास करणे.

## ६.१ प्रस्तावना :

इ.स. १८५७ चा भारतीयांचा महान सशस्त्र उठाव ब्रिटिशांनी आपल्या पोलादी मुठीने अमानुषपणे चिरडून टाकल्यामुळे ब्रिटिशांच्या बलाढय लष्करी सत्तेला शस्त्राने उत्तर दिले पाहिजे यांची जाणीव भारतीयांना झाली. उठावाच्या अपयशाने देशभर पसरलेली नैराश्येची लाट कांहीशी ओसरते न ओसरते तोच कांही प्रांतातून बऱ्याच व्यापक प्रमाणावर संघटीत सशस्त्र उठाव झाले.

यापैकी महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांच्या नेतृत्वाखालील उठाव व पंजाबमधील रामसिंह कुका व त्यांच्या अनुयायांचा उठाव हे विशेष उल्लेखनीय आहेत. मात्र हे उठाव एका व्यक्तीने प्रेरित केलेले असल्यामुळे त्या व्यक्तीचा निःपात करुन हे उठाव ब्रिटिशांनी सहजपणे चिरडून टाकले. १९ व्या शतकाच्या अखेरपासून मात्र व्यक्तिनिष्ठ उठावांची जागा संघटीत क्रांतिकारी चळवळीने घेतली. ही चळवळ स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंत या ना त्या रुपाने अखंड चालू राहिली. ती कधी मंदावली, कधी काही काळ दडपली गेली, पण पूर्णपणे थांबली नाही. उलट क्रांतीकारी चळवळ भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे एक अविभाज्य अंग बनली. शोषक साम्राज्यवादी ब्रिटिश सत्तेच्या दडपणापासून भारतीयांची सुटका करण्याचे कार्य विभिन्न राष्ट्रभक्तांनी निरनिराळ्या मार्गांनी आपापल्या कुवतीप्रमाणे व वैचारिक धारणेप्रमाणे केले. मवाळवादी, जहालवादी, व अहिंसावादी या तीनही चळवळीत एका बाबतीत साम्य हाते आणि ते म्हणजे या तिघांनी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. त्यामुळे क्रांतीकारी चळवळ ही पूर्णतः वेगळी होती.

## ६.२ क्रांतीकारी चळवळीची पाश्र्वभूमी :

ब्रिटिशांच्या दडपशाही व साम्राज्यवादी धोरणापुढे राष्ट्रीय सभेच्या मवाळ वृत्तीचा उघड उघड पराभव होत होता. हिंदी जनतेच्या साध्या-साध्या मागण्यांही मान्य न होता, बंगालची फाळणी सारखे आणि विद्यापीठ कायदा व कलकत्ता कार्पोरेशन कायद्यासारखे कायदे करुन सरकार आपल्या कट्टर साम्राज्यवादी वृत्तीचे प्रदर्शन करीत होते. दुष्काळाने व प्लेगने लाखो लोक मृत्युमुखी पडत असताना सरकार आपल्या वैभवाचा व मगरुरीचा बाजार भरवीत होते. मगरुर, जुलमी व अन्यायी सरकारची मस्ती अर्ज विनंत्या अगर शांततामय चळवळींनी नष्ट कशी होणार? अन्यायी सरकारचे हृदयपरिवर्तन विनंत्यांनी व निदर्शनांनी कसे होणार? अशा प्रश्नांचे काहूर अनेक हिंदी तरुणांच्या मनात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून सुरु झाले होते.

हे हिंदी तरुण कट्टर राष्ट्रवादी होते. गुलामगिरीपेक्षा त्यांना मरण प्रिय होते. देशाच्या स्वातंत्र्यासाठी दहशतवाद आणि क्रांतीकारी साधने यांची मदत घेतल्याशिवाय तरणोपाय नाही असे त्यांना वाटत होते. जुलमी राज्यकर्त्यांची हिंसा करणे पाप नसून ते मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तिच्या पुत्राने केलेले एक पवित्र कर्तव्य होय, अशी त्यांची श्रध्दा होती. समाजात अस्थिरता अगर गोंधळ निर्माण व्हावा, हिंदी समाजात इंग्रजांविषयी किती असंतोष निर्माण झालेला आहे याची जाणीव राज्यकर्त्यांना व जगाला व्हावी हे त्यांचे उद्देश होते. राजकीय स्वातंत्र्य व अर्थिक समता ही त्यांची उदात्त ध्येये होती. इंग्रज त्यांना चोर, दरोडेखोर आणि खुनी म्हणून संबोधत. तथापि सर्व हिंदी जनतेच्या अभिमानाची ती स्थाने होती. क्रांतिकारकांचे जीवन म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशी खेळ होता. गुप्त संघटना उभारणे, शस्त्रास्त्रे तयार करणे, परदेशात जाऊन शस्त्रांची आयात करणे,लष्करात व समाजात आपल्या लिखाणाने व प्रचाराने असंतोष निर्माण करणे, सरकारी ऑफिसे, तिजोऱ्या, रेल्वे इत्यादींवर हल्ले चढविणे, जुलमी अधिकाऱ्यांचे

खून करणे, या गोष्टी करणे म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूशीच सामना होता. या गोष्टी करीत असतांना परिणामांची त्यांना जाणीव होती. इंग्रजांकडून पकडले गेले असता ते हसतमुखाने फासावर चढत आणि पुन्हा एकदा हिंदुस्थानात जन्म घ्यावा व मातृभूमीसाठी जीवन समर्पण करण्याची संधी मिळावी ही प्रार्थना त्यांच्या ओठावर असे. हिंदुस्थानातील क्रांतिकारकाच्या दहशतवादी चळवळीत १९०५ सालानंतरच खरी गती मिळाली असली तरी तत्पूर्वी दहशतवादी चळवळी झाल्या नाहीतच असे नाही. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील पंजाबमधील शिखांची चळवळ व महाराष्ट्रातील वासुदेव बळवंत फडके यांचे बंड त्यापैकीच होते. केवळ भारतातच नव्हे तर परदेशात देखील या क्रांतिकारकांनी फार मोठे कार्य केले. या चळवळीला भारतात अपयश आले असले तरी स्वातंत्र्य मिळविण्यात त्यांचाही काही प्रमाणात वाटा होता हे नाकारता येत नाही.

## ६.३ गुरु रामसिंगाची कुका चळवळ :

इ.स. १८८४ रोजी ब्रिटिशांनी पंजाबचे राज्य खालसा केले. गुलामगिरीचे पाश स्वातंत्र्यप्रिय पंजाबी प्रजेच्या गळयाभोवती आवळू लागले. गुरु रामसिंग या शूर पंजाबी पुरुषाने इंग्रजांना आव्हान देणारी नामधारी शिख चळवळ ऊर्फ कुका चळवळ उभारली. प्रारंभी धर्म सुधारणा व समाजसुधारणा असे चळवळीचे स्वरुप पंचायत पध्दतीचे पुनरुज्जीवन, स्वदेशी टपाल व्यवस्था व न्यायदान पध्दती इत्यादी पंजाबची विभागणी २१ प्रातांत करुन प्रत्येक प्रांतावर एक अधिकारी नेमला होता आणि स्वतंत्र कारभार-यंत्रणा उभी केली होती. इंग्रजाविरुध्द द्वेष पसरविण्याचे काम ही यंत्रणा करीत होती.

ब्रिटीशांनी अनेक कुकांना तुरुंगात टाकले होते. काही कुका नेत्यांनी मलैरकोटलावर आक्रमण केले व तेथे सत्ता प्रस्थापित केली. त्यामुळे ब्रिटीश शासन खवळले. अनेक जणांना तोफेच्या तोंडी देण्यात आले. त्यांच्या हौतात्म्यानेच पंजाबमधील स्वातंत्र्याची चळवळ अधिक पेटवली गेली. दहशतीने ही चळवळ दडपणे हा सरकारचा इरादा होता. इ.स. १८७८ साली कुकांनी रशियाच्या झारशी संगनमत केल्याचा आरोप इंग्रजांनी जाहीर केला. गुरु रामसिंगास कैद करुन ब्रह्मदेशात पाठविण्यात आले तेथेच त्याचा १८८५ साली मृत्यू झाला. राजकीय स्वातंत्र्य हा धर्माचा एक अविभाज्य भाग आहे अशा सरकारशी असहकार हे हत्यार त्यांनी वापरात आणले अशा शब्दांत राष्ट्रपती डॉ. राजेंद्रपसाद यांनी गुरु रामसिंगाचा गौरव केलेला आहे. ते राज्यकर्त्यांच्या कृपेसाठी लाचार झाले नाहीत किंवा त्यांच्या मानसन्मानांचाही स्वीकार केला नाही.

## ६.४ वासुदेव बळवंत फडके यांचे बंड (१८४५-१८८३)

भारताच्या इतिहासातील महाराष्ट्राचे आद्य क्रांतिकारक म्हणून वासुदेव बळवंत फडके यांचे स्थान सर्वमान्य आहे. कुलाबा जिल्ह्यातील शिरढोण गावी एका मध्यम कुटुंबात इ.स.

१८४५ रोजी जन्माला आले. अल्प इंग्रजी शिक्षण घेतलेल्या वासुदेवाला रेल्वे खात्यात लिपिक म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर ते लष्करी खात्यात नोकरी करु लागले. ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून मिळणाऱ्या अपमानकारक वागणुकीमुळे त्यांच्यात राष्ट्रीय भावना जागृत झाली. महाराष्ट्र फिरुन सरकारविरुध्द जागृती करण्यास प्रारंभ केला. न्या. रानडे यांचे आर्थिक विचार पटल्यामुळे ते स्वदेशीचा प्रचार करु लागले पण ब्रिटिश राजवट ही भारतीयांसाठी ईश्वरी वरदान असल्याचा न्या. रानडयांचा दावा मात्र त्यांना पटला नाही. इ.स. १८७१ साली त्यांची आई मृत्युशय्येवर पडली असल्याची बातमी कळल्यामुळे त्यांनी रजा मागितली. पण ती नाकारली गेल्याने आईची भेट होऊ शकली नाही. या घटनेचा त्यांच्या मनावर जबरदस्त आघात आला. अशा या अमानुष परकीय सत्तेची ताबेदारी न करण्याचा निर्णय घेतला.

इ .स. १८७६ साली महाराष्ट्रात दुष्काळ पडला. लोक भुकेने मरु लागले. तथापि सरकारचे करांचे ओझे दिवसेंदिवस वाढत होतेच, दुष्काळाच्या खाईत सापडलेलया प्रजेबद्दल सरकार तटस्थ होते. सरकारची दुष्काळ निवारण यंत्रणा नामधारी होती. दुष्काळामुळे होत असलेल्या हालअपेष्टांच्या बातम्या वृत्तपत्रातून झळकू लागल्या. त्या वाचून वासुदेवाच्या डोक्यात विचारमंथन सुरु झाले. १८५७ सालच्या उठावाच्या चित्तथरारक हकीकती त्यांनी ऐकल्या होत्या. तात्या टोपे, मोगल बादशहा बहादूरशहा व झाशीची राणी लक्ष्मीबाई ही त्यांची स्फुर्तिस्थाने होती. चिपळूणकरांच्या धारदार विचारांचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता. शहरा शहरांतून ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुध्द भाषणे देऊन सुशिक्षितांना कृतिशील बनवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. परंतू सरकारी धोरणावर शाब्दिक टीका करण्यापलीकडै सुशिक्षित भारतीयांची मजल जात नाही असे दिसताच त्यांनी आपला स्वतंत्र मार्ग आखला.

पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागाचा वासुदेव बळवंत यांनी दौरा केला. रामोशी मंडळीत निर्माण झालेला प्रखर ब्रिटिशविरोध त्यांच्या लक्षात आला आणि त्यांच्यातील शौर्य, निष्ठा आणि स्वातंत्र्याप्रियता यांचा उपयोग ब्रिटिशविरोधी उठावासाठी करुन घेण्याचा त्यांनी निर्णय घेतला. राज्यकर्त्यांविरुध्द बंड पुकारुन ते यशस्वी करण्याची जिद्द त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली. अन्यायी इंग्रज अधिकाऱ्यांचे वध करण्यासाठी त्यांना शस्त्रे हवी होती. त्यासाठी त्यांनी शेठ सावकारांच्या घरावर दरोडे घालून संपत्ती जमवली व शस्त्राचे साठे केले. अशा प्रकारे शस्त्रास्त्रे गोळा करुन आणि रामोशांसारख्या जमातींना हाताशी धरुन त्यांनी महाराष्ट्राच्या सात जिल्ह्यांत मोठी खळबळ माजवून टाकली. आपले सहकारी पाठवून तेथे सशस्त्र क्रांतिकारकांचे लहान गट आयोजित केले. या गटांनी आपपाल्या क्षेत्रातील दळवळणाचे मार्ग उध्वस्त करायचे, संदेशवाहक तारा तोडायच्या, कारागृहाची दारे खुली करुन क्रांतिकारकांना (बंदिस्तांना) मुक्त करावयाचे व ब्रिटिशविरोधी उठावात सामील करुन घ्यायचे अशी त्यांची योजना होती. जबर इंग्रज यंत्रणेला वासुदेव बळवंतानी मोठे आव्हान दिले. १८७९ साली बंडाची तुतारी फुंकली.

पश्चिम महाराष्ट्रातील सात जिल्ह्यातील त्यांच्या ब्रिटिशविरोधी कार्यवाहीला आवर घालणे सरकारला दुरापास्त होऊ लागले. पश्चिम महाराष्ट्रात त्यांचा इतका दरारा निर्माण झाला

की त्या भागात जाण्यास ब्रिटिश अधिकारी कचरु लागले. धनिकांच्या घरावर दरोडे घालून हाती आलेले धान्य, वस्तू व पैसा वासुदेव बळवंत दुष्काळग्रस्त भागातील गोरगरिबांना वाटू लागले त्यामुळे दरिद्री जनता त्यांना परमेश्वर मानू लागली. सामान्य जनतेत वाढू लागलेला त्यांचा प्रभाव पाहून सरकार धास्तावले. अधिक बक्षिस दिले जाईल अशी वासुदेव बळवंतांच्या सहीची पत्रके पुण्यात व जवळपासच्या गावात लावण्यात आली. १३ मे १८७९ रोजी पुण्यातील दोन सरकारी कार्यालयांना आग लागली तेव्हा ते कृत्य वासुदेव बळवंतांचेच असून ते पुण्यात असावेत असे गृहीत धरुन पुण्याच्या सार्वजनिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक पुढाऱ्यांच्या घरांच्या झडत्या घेण्याचा सपाटा सुरु केला. या प्रकरणात न्या.रानडे यांच्यावरही सरकारचा रोष ओढवला. दहशतीमुळे दबून अगर प्रलोभनाला बळी पडून कोणीही वासुदेव बळवंतांचा ठावठिकाणा सांगत नाही हे पाहून अखेरीस मुंबई सरकारने त्यांना पकडण्यासाठी मेजर डॅनिअर या अधिकाऱ्याची नेमणूक केली. २० जुलै १८७९ रोजी गाणगापूर नजीक एका मंदिरात तापाने फणफणलेल्या बेशुध्दावस्थेत वासुदेव बळवंत डॅनिअलच्या हाती पडले. पुण्याच्या न्यायालयात व पुढे उच्च न्यायलयात खटल्याच्या सुनावणीच्या वेळी सरकारच्या रोषाची तमा न बाळगता सार्वजनिक काका (ग.वा.जोशी) व हरी नारायण आपट्यांचे चुलते महादेव चिमणाची आपटे यांनी काम पाहिले. अखेर कोर्टात त्यांना जन्मपेठेची शिक्षा झाली. त्याची एडनला रवानगी करण्यात आली. तेथे त्यांनी १९८० साली सुटकेचा प्रयत्न केला. तुरुंगातून ते १७ मैल दूर पळाले होते तथापि शेवटी ते पकडले. तुरुंगात त्यांचा छळ होऊ लागला व त्यातच फेब्रुवारी १८८३ साली मृत्यू पावले.

### ६.४.१ आपली प्रगती तपासा :-

१. भारतातील क्रांतिकारी चळवळीतील कुकासिंग यांच्या बंडाचे मूल्यमापन करा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६.५ महाराष्ट्रातील क्रांतिकारक : रॅण्डची हत्या

लो.टिळकांच्या केसरीची सिंहगर्जना महाराष्ट्रात घरोघरी ऐकू येत होती. गणपती व शिवजयंतीच्या उत्सवामुळे तरुण पिढीत नवचैतन्य निर्माण झाले होते. ब्रिटिश शासनाचे शोषक स्वरुप वृत्तपत्रांतून प्रकाशित होत होते. तरुण पिढी जुलमी सत्तेला टक्कर देण्यास तयार होती. मग्रुर इंग्रज बंदुकीच्या गोळयांशिवाय वठणीवर येणार नाहीत याची तरुणांना खात्री होती. १८९६ साली पुणे येथे प्लेगची साथ सुरु झाली. प्लेग कमिशनर म्हणून रॅण्डची नेमणूक करण्यात आली.

रॅण्डसाहेबाने आपल्या हाती असलेल्या अधिकाराचा गैरवापर करुन पुण्यातील नागरिकांवर अत्याचार सुरु केले. पुण्याला लष्करी छावणीचे स्वरुप आले. प्लेग प्रतिबंधाच्या नावाखाली लोकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. जनतेवर अन्याय करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या कृत्यांचा बदला घेण्यासाठी तरुण रक्त सळसळत होते.

१७ फेब्रुवारी १८९७ रोजी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हीरक महोत्सवाचा दिवस होता. या दिवसाचे औचित्य साधून पुण्यात रॅण्डच्या हत्येचा कट शिजला. राणीच्या राज्यारोहण महोत्सवाच्या समारंभाहून परत जात असताना बग्गीतून जाणाऱ्या रॅण्ड व आयर्स्ट यांच्यावर गणेश खिंडीनजीक गोळया झाडून हत्या केली. आनंदोत्सवाच्या दिवशी शहरात सर्वत्र कडक पहारा असताना ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या व्हावी ही ब्रिटीश सत्तेला हादरवून सोडणारी घटना होती. सरकारी दमनचक्र तात्काळ सुरु झाले. पुण्यात घरोघरी झडत्या होऊ लागल्या. परंतू कित्येक दिवस मारेकऱ्यांचा सुगावा सरकारला लागला नाही. शेवटी पंचमस्तंभी द्रविड बंधूंनी या कटाची बातमी सरकारला दिली. दामोदर व बाळकृष्ण हे चाफेकर बंधू या कटाचे सूत्रधार असल्याचे सांगितले. ही बातमी कळताच वासुदेव चाफेकरानी द्रविड बंधूंना कंठस्तान घातले. पुढे दामोदर, बाळकृष्ण हे बंधू व त्यांचे सहकारी यांना सरकारने फासावर चढविले. लो.टिळकांनी रॅण्डच्या वधाला अफजलखानाच्या वधाची उपमा देऊन या कृत्याचे समर्थन केसरीतून केले. यामुळे टिळकांसारखे नेतेही या कटात गुंतल्याचा समज झाल्याने सरकारने त्यांच्यावरही बडगा उचलला. चाफेकर बंधूंच्या हौतात्माने महाराष्ट्रच नव्हे तर सारा देश हळहळला. अनेक तरुणांना त्यामुळे स्फुर्ती मिळाली.

### ६.५.१विनायक दामोदर सावरकर (१८८३-१९६६)

स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनीही महान कामगिरी बजावली. विनायक दामोदर सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. त्यांचे शिक्षण भगूर, नाशिक व पुणे येथे झाले.बालपणापासूनच त्यांच्या मनावर क्रांतीकारी विचारांचा प्रभाव होता. हिंदू धर्माचा व संस्कृतीचा त्यांना अभिमान होता. चाफेकर बंधूच्या आत्मबलिदाना पासून प्रेरणा घेऊन सावरकरांनी १९०० साली नाशिकला 'मित्रमेळा' नावाचे मंडळ स्थापन केले. सशस्त्र प्रतिकाराशिवाय स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्दिष्टे साध्य होणार नाही अशी त्यांची पक्की धारणा बनली, म्हणून समविचारी तरुणांना या मंडळात एकत्र आणून त्यांना आत्मयज्ञासाठी तयार करणे हा त्यांचा उद्देश होता. इटालियन क्रांतिकारक जोसेफ मझिनी, तसेच आयरिश क्रांतिकारकांची जीवनचरित्रे येथे अभ्यासली जात व त्यांनी अवलंबिलेल्या मार्गावर चर्चा होई. शस्त्रास्त्रे खरेदी करुन त्यांच्या वापराचे शिक्षणही गुप्तपणे दिले जाई. १९०४ साली या मंडळाचे मित्रमेळा हे नाव बदलून ते 'अभिनव भारत' असे ठेवण्यात आले.

इ.स. १९०६ साली शिष्यवृत्ती घेऊन विनायक दामोदर सावरकर पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले परंतु अभिनव भारतचे कार्य थंडावले नाही. बंधू गणेश सावरकर यांनी हे कार्य जोमाने पुढे चालविले. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी अभिनवच्या शाखा स्थापन करण्यात आल्या.

औध, सातारा, कौल्हापूर, यवतमाळ, अमरावती येथील क्रांतिकारी मंडळांशीही या संस्थेने संपर्क साधला. महाराष्ट्राबाहेर बडोदा, ग्वाल्हेर, म्हैसूर येथेही अभिनव भारताचे कार्यकर्ते पोहचले. मुंबई व पुणे येथील महाविद्यालयीन धडाडीच्या तरुणांना आकृष्ट करुन, प्रशिक्षण देऊन निरनिराळ्या शहरी पाठविले जाई. विनायक दामोदर सावरकर लंडनहून आपल्या कांही विश्‍वस्त मंडळीबरोबर पिस्तुले व काडतुसे नाशिकला पाठविण्याचा प्रयत्न करीत. अभिनव भारत तर्फे पांडुरंग महादेव बापट यांना बॉम्ब तयार करण्याच्या प्रशिक्षणासाठी पॅरिसला पाठविण्यात आले. तेथे त्यांनी हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास या भारतीय क्रांतिकारकांबरोबर राहून बॉम्ब तयार करण्याच्या पध्दतीची माहिती देणारे एक रशियन पत्रक इंग्रजीत अनुवादित करुन घेतले व त्याच्या अनेक प्रती काढून भारतातील निरनिराळ्या क्रांतिकारी केंद्रांना पाठविण्याची व्यवस्था केली. सावरकरांचे बंधू गणेश सावरकरांनी इंग्रज द्वेषाच्या व स्वातंत्र्यप्रेमाच्या कांही कविता प्रसिध्द केल्यावरुन त्यांना नाशिकच्या जॅक्सन या कलेक्टरांकडून जन्मठेपेची शिक्षा झाली. इंग्लंडमधील भारतीय क्रांतिकारकांच्या ‘इंडिया हाऊस’ वर पाळत ठेऊन असलेला सर विल्यम कर्झन वायली हाही इंग्रज अधिकारी या शिक्षा करण्याच्या प्रकारापाठीमागे होता. कडक शिक्षा केल्यास दहशत निर्माण होईल असे त्यांना वाटत होते, तथापि त्याचा परिणाम उलटा झाला. अभिनव भारत व इंडिया हाऊस येथील क्रांतिकारकांनी या अन्यायाचा सूड घेण्याचे ठरविले.

‘इंडिया हाऊस’ हे भारतीय क्रांतिकारकांचे इंग्लडमधील केंद्र होते. हाऊसकडूनच हिंदुस्थानात गुप्तपणे पिस्तुल व बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान धाडण्यात आले होते. इंडिया हाऊसमध्ये तरुण क्रांतिकारकांना पिस्तुल चालविण्याचे व बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात येत असे. लवकरच इंडिया हाऊस मधील तरुण क्रांतिकारक मदनलाल धिंग्रा याने जुलै १९०२ मध्ये कर्झन वायलीला गोळी घालून ठार केले तर इकडे नाशिकमध्ये अनंत कान्हेरे या तरुणाने डिसेंबर १९०९ मध्ये जॅक्सनला ठार केले. क्रांतिकारकांची चळवळ दडपून टाकणाऱ्या जुलमी अधिकाऱ्यांचा असा सूड घेतला गेला. स्वदेशाबद्दल त्यांच्यामध्ये प्रखर अभिमान होता. ही तरुण मंडळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केवळ हा जन्मच नव्हे, तर यापुढचेही जन्म घेण्यास तयार होतील. मदनलाल धिंग्रा व अनंत कान्हेरे यांना फासावर लटकविण्यात आले. अभिनव भारताच्या आणखी ३ सदस्यांना फाशीची शिक्षा झाली इतर ३४ जणांना वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षा झाल्या. अभिनव भारतामध्ये एक संस्थाद्रोही व देशद्रोही सभासद निघाल्यामुळे क्रांतिकारकांचे हे नेते पकडले गेले. सावरकर यावेळी पॅरिसमध्ये होते. आपल्या सहकाऱ्यांना कठोर शिक्षा झाल्या असता आपण गप्प बसणे त्यांच्या क्रांतिकारी मनाला पटेना. इंग्लंडला परतून तेथे क्रांतिकारी हालचाली करण्याचे ठरिविले. इंग्लंडमध्ये येताच त्यांना विलायत सरकारने कैद केले. कांही साधने व कागदपत्रे जप्त करुन त्यांच्यावर जॅक्सनच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला. त्यांच्यावर खटला चालविण्यासाठी त्यांना भारतात आणण्यात आले. मोरिआ नावाची बोट फ्रान्सच्या किनाऱ्यावर असलेल्या मार्सेलिस बंदरात पोहचताच सावरकरांनी बोटीवरुन समुद्रात उडी मारुन पळून जाण्याचा विलक्षण धाडशी प्रयोग केला पण तो फसला. नाशिकात सेशन कोर्टमध्ये सावरकरांवर खटला चालला. २२ मार्च १९११ रोजी त्यांना ५० वर्षांची सजा फर्माविण्यात आली. यावेळी तंचे वय २८ वर्षाचे होते. सावरकरांची रवानगी अंदमानच्या तुरुंगात करण्यात आली. १९२४ साली त्यांना हिंदुस्थानात आणून रत्नागिरीच्या तुरुंगात डांबण्यात

आले. पुढे १९३७ साली प्रांतात काँग्रेस सरकार सत्तेवर आल्यावर त्यांची सुटकाकरण्यात आली. त्याच वर्षी ते हिंदू महासभेचे अध्यक्ष निवडले गेले. पुढील काळात हिंदूंचे संघटन करण्याच्या कार्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केले.

जाज्वल्य राष्ट्रनिष्ठा असलेल्या या थोर क्रांतीकारकास भारताच्या स्वातंत्र्यलढयात बजावलेल्या महान कामगिरीबद्दल 'स्वातंत्र्यवीर' म्हणून गौरविले जाते. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी या महान देशभक्ताचा मृत्यू झाला.

**६.५.२ आपली प्रगती तपासा :**

१. महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीवर थोडक्यात टिप लिहा.

---

---

---

---

## ६.६ बंगालमधील क्रांतीकारक :

२० व्या शतकाच्या आरंभी बंगालमध्ये जहाल क्रांतिकारक संघटित होऊ लागले. लॉर्ड कर्झनचा साम्राज्यवाद आणि बंगालची फाळणी या कृत्यांनी सर्व बंगाल पेटून उठला. तरुण बंगाली माणसांचे रक्त सळसळत होते. मित्रा नावाच्या एका वकीलाने 'अनुशीलन समिती' नावाची गुप्त संघटना ढाका येथे स्थापन केली. अशीच एक संघटना जतीन्द्रनाथ बॅनर्जी यांनी कलकत्यात स्थापन केली. साधारणपणे १७ ते २५ वर्षे वयोगटातील विद्यार्थी त्यामध्ये असत. त्यांना लाठया व तलवारी चालविणे, मुष्टियुध्द करणे इत्यादींचे प्रशिक्षण दिले जाई. बिपिनचंद्र पाल, गुरुदास बॅनर्जी, रविंद्रनाथ टागोर इत्यादी राष्ट्रीय नेत्यांची भाषणे आयोजित करुन या तरुणांना राष्ट्रभक्तीचे धडे दिले जात. कालीमाता हे क्रांतिकारकांचे शक्तीस्थान होते योगी अरविंद यांचे बंधू वीरेंद्रकुमार घोष आणि स्वामी विवेकानंद यांचे बंधू भुपेंद्रनाथ दत्त हे बंगालमधील क्रांतिकारकांचे अग्रणी होते. सन १९०६ मध्ये या दोन क्रांतिकारकांनी 'युगांतर' हे वृत्तपत्र सुरु करुन सरकारला सशस्त्र प्रतिकार करण्याच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार होऊ लागला. कलकत्ता व ढाका येथील केंद्रांद्वारा बंगालमध्ये इतरत्रही अनुशील समितीच्या ५०० शाखा उघडण्यात आल्या. रशियामध्ये बॉम्बचे प्रशिक्षण घेण्यासाठी गेलेला हेमचंद्र दास हा या क्रांतिकारकांपैकीच होता. 'युगांतर' शिवाय अरविंद्र घोषाचे 'वंदे मातरम्,' बिपिनचंद्र पाल यांचे 'न्यू इंडिया' इत्यादी वृत्तपत्रांनी बंगाली जनतेची स्वातंत्र्य भावना चेतविली.

सरकारी गोटात दहशत निर्माण करण्यासाठी व सरकारी अधिकाऱ्यांच्या अन्यायी कृत्यांचा जाब विचारण्यासाठी बंगाली क्रांतिकारकांनी अनेक संघटना स्थापन केल्या होत्या. त्यात अनुशील समिती प्रमुख होती. या संघटना भिन्न नावाने कार्य करीत होत्या. बारीसालची बांधव समिती, मैनमनसिंगची सुह्रद समिती व फरीदपूरची ब्रती समिती या सर्व अनुशीलन समितीच्या शाखा होत्या. सर्व हिंदी लोकांनी एकाच वेळी उठाव केला तर इंग्रजी राज्य एका दिवसात नष्ट होईल हे क्रांतिकरकांत बिंबवले गेले दहशत निर्माण करण्याचा सरकार प्रयत्न करीत असताना क्रांतिकारकांनी सरकारला त्यांच्या नाण्यात किंमत देण्यास सुरवात केली. क्रांतिकारकांना अन्यायी शिक्षा करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांचे व मॅजिस्ट्रेटचे मुडदे पडू लागले. ५ डिसेंबर १९०७ रोजी बंगालच्या गव्हर्नरांना घेऊन जाणारी आगगाडी उलथून टाकण्यात आली, तर २३ डिसेंबरला ॲलन या ढाक्याच्या मॅजिस्ट्रेटला क्रांतिकारकांच्या गोळ्यांना फरीदपूर स्टेशनवर बळी पडावे लागले. कलकत्त्याचा मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड जो क्रांतिकारकांचा हाडवैरी होता, त्याला जगातून नष्ट करण्याचा क्रांतिवीर खुदीराम बोस आणि प्रफुल्लचंद्र चाकी यांचा प्रयत्न फसला व त्यांच्या ऐवजी चुकून दोन इंग्रज महिला मारल्या गेल्या. प्रफुल्लचंद्रानी स्वतःवर गोळ्या झाडून हाराकिरी केली, तर खुदीराम सापडले. त्यांना फाशी देण्यात आले.

कलकत्त्यामधील क्रांतिकारकांच्या बॉम्ब फॅक्टरीचा पोलिसांना सुगावा लागून त्यांनी तिच्यावर छापा घातला. अरविंद घोष, वीरेंद्रमुमार घोष, उल्हास दत्त, हेमचंद्र दास, उपेंद्रनाथ बॅनर्जी आणि इतर मंडळी यांना सरकारने अटक करुन खटले चालविले व त्यांना शिक्षा केल्या. हिंदी समाजातील स्वातंत्र्यप्रेम जागृत ठेवण्यासाठी हे क्रांतिकारक आपल्या प्राणांच्या आहुती देत होते. लवकरच या खटल्याचा निकाल लागून कन्हैयालाल दत्त व एस्.एन्.बोस या दोघांना फासावर लटकवण्यात आले. ३६ क्रांतिकारकांना कठोर कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. या खटल्यात माफीचे साक्षीदार झालेले, सरकारच्या बाजूने खटल्याचा तपास करणारे पोलिस अधिकारी व खटला चालवणारे सरकारी वकील या सर्वांचे खून क्रांतिकारकांनी केले. क्रांतिकारकांच्या दृष्टीने सरकारला सहाय्य करणारे सर्वजण देशद्रोही होते. शासकीय अहवालानुसार १९०७ ते १९१७ च्या दरम्यान ढाका अनुशिलन समितीने धनिकांच्या घरावर ११२ डाके घातले, सुमारे ७ लक्ष रक्कम गोळा केली, सुमारे ६४ लहान मोठ्या अधिकाऱ्यांच्या हत्या केल्या, १२ बॉम्ब हल्ले केले, ३ वेळा आगगाड्या उडविण्याचा प्रयत्न केला. या संघटनांमार्फत इराण, अफगाणिस्तान, तुर्कस्थान सारख्या राष्ट्रांतून शस्त्रास्त्रे गुप्तपणे देशात आणली जात. अनेकदा ही सामुग्री समुद्रामार्गेही येई. ढाका व हावरा खटल्याने क्रांतिकारक घटना घडतच राहिल्या.

## ६.७ पंजाबमधील क्रांतीकारक :

भारतातील क्रांतिकारी चळवळीत महाराष्ट्र, बंगाल व पंजाब हे तीन प्रांत आघाडीवर होते. पहिल्या महायुध्दात इंग्लंडला सहकार्य दिले परंतू महायुध्द संपताच इंग्रजांनी हिंदी जनतेला

सहकार्य न करता ठेचण्यास सुरुवात केली. १९१९ मध्ये रौलेट ॲक्टसारखे जुलमी कायदे करुन व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रयत्न केला याच सुमारास १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरला जालियनवाला बागेत २० हजार लोक रौलेट कायद्याचा निषेध करण्यास जमले असता जनरल डायर या पाशवी इंग्रज अधिकाऱ्याने १६०० फैरी उडविल्यानंतर दुर्दैवाने गोळ्या संपल्यामुळे फैरी उडविणे बंद झाले. यामध्ये शेकडो माणसे मारली गेली व शेकडोंनी जखमी झाले. 'माझ्याजवळ आणखी दारुगोळा असता, तर मी अधिक लोक मारले असते' अशी पुढे डायरने आपल्या साक्षीत हळहळ व्यक्त केली. जनरल डायरच्या हुकमाने पंजाबमध्ये इंग्रजांनी जुलमाचे व दडपशाहीचे थैमान घातले. पंजाब्यांचा अमानुष छळ होऊ लागला. जालियनवाला हत्याकांडाची चौकशी करण्यासाठी हंटर कमिशन नियुक्त केले. तथापि १९२० च्या कमिशनच्या अहवालात जनरल डायरच्या कृतीचे समर्थन केले पण डायरवर अविचार व पाशवी वृत्तीचा ठपका ठेवला. १९२१ मध्ये जनरल डायरला सेवानिवृत्त करुन पेन्शन दिली.

या पंजाबमधील सहारनपूर येथे एक गुप्त क्रांतिकारी संघटना १९०४ साली स्थापन होऊन कार्यरत होती. या संघटनेत लाला हरदयाळ, अजितसिंग, अंबाप्रसाद ही मंडळी सामील होती. सरकारच्या जुलमी कृत्यांचा प्रतिकार म्हणून म.गांधीनी अहिंसेवर आधारीत अहसकाराची चळवळ सुरु केली होती पण जुलमी सरकार म.गांधीजींच्या या साधनांनी वठत नाही हे पाहताच क्रांतिकारकांनी इ.स. १९२० मध्ये सचिंद्रनाथ सेन यांच्या नेतृत्वाखाली कंबर कसली. सचिंद्रनाथ सेन लवकरच म्हणजे १९२२ रोजी मरण पावले. त्यांच्या सहकाऱ्यांनी हा लढा चालू ठेवण्याची शपथ घेतली. शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी मृत्यूचा सूड घेण्याचे ठरविले. क्रांतिकारकांना पैसा हवा होता. त्यासाठी राम प्रसाद बिस्मिल यांच्या नेतृत्वाखाली काकोरी स्टेशनजवळ रेल्वेवर हल्ला करुन ऑगस्ट १९२५ रोजी सरकारी तिजोरी पळविण्यात आली. रामप्रसाद, बिस्मिल, रोशनसिंग, राजेंद्र लाहिरी, अशफाक उल्ला यांना या खटल्यात फाशीची शिक्षा झाली. इतरांना वेगवेगळया मुदतीच्या शिक्षा झाल्या. अशफाक उल्ला हा जातीने मुसलमान पण हा मातृभूमीच्या स्वातंत्र्याने भारलेला होता.

खटल्यात सिध्द झाल्याप्रमाणे मी खुनी नाही.हिंदी स्वातंत्र्य-देवतेच्या वेदीवर बलिदान करणारा पहिला मुसलमान म्हणून मला माझा अभिमान वाटतो हे अशफाक उल्लाचे उद्‌गार हिंदू-मुस्लिम ऐक्याचे प्रतिक ठरतात.

सायमन कमिशनमध्ये एकही हिंदी सभासद नसल्याने भारतीय प्रजा समाजवादी पक्षाने कमिशनचा निषेध केला. निषेध मोर्चाचे नेतृत्व लाला लजपतराय रॉय करीत होते. उद्दाम ब्रिटीश पोलिस अधिकाऱ्यांनी त्या मोर्चावर हल्ला केला. सॉंडर्स या अधिकाऱ्याने लालाजींच्या छातीवर लाठ्या मारल्या. लालाजींवरील हल्ल्याचे वृत्त कळताच सर्व राष्ट्राची अस्मिता दुखावली. महिन्याभरात लालाजींचा मृत्यू झाला. १७ फेब्रुवारी १९२८ रोजी भगतसिंग व राजगुरु यांनी सॉडर्सचा खून केला परंतू सरकार क्रांतिकारकांना अटक करण्यात यश मिळवू शकले नाही. ८ एप्रिल १९३० रोजी दिल्लीच्या कायदेमंडळ सरदार भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी घडवून

आणलेला बॉम्बस्फोट सरकारच्या दडपशाहीला जबरदस्त चपराक होती. भारतीय असंतोषाकडे दुर्लक्ष करुन अविवेकाने पुढे जाणाऱ्या राज्यकर्त्यांना धोक्याची सुचना या बॉम्बस्फोटने दिली. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव यांना लाहोर येथे फाशी देण्यात आले. चंद्रशेखर आझाद, यशपालसिंग, सुरेंद्र पांडे यांनी २७ फेब्रुवारी १९३१रोजी एकत्र येऊन आपला लढा चालू ठेवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पोलिसांनी पाळत ठेऊन अलाहाबादमध्ये एका बागेत क्रांतिकारकांची वाट पहात बसलेल्या आझादांस  ठार केले. १३ मार्च १९४० रोजी पंजाबचा भूतपूर्व ले.गव्हर्नर ओडवायर याचा लंडनमध्ये खून करुन क्रांतीवीर सरदार उधमसिंगाने बदला घेतला. उधमसिंग १९१९ पासून संधीची वाट पहात होते.

मद्रास प्रांतात दहशतवादी चळवळीचा उदय बंगालच्या फाळणीनंतर म्हणजे १९०५ नंतर झालेला होता. एप्रिल १९०७ मध्ये जहालवादी नेते बिपिनचंद्र पाल यांनी मद्रास प्रांताचा दौरा काढून, सर्वत्र सभा घेऊन राष्ट्रीय चळवळ तीव्र करण्याचे व त्यासाठी बहिष्कार व स्वदेशी यांचा पुरस्कार करण्याचे आवाहन लोकांना केले होते. मद्रास प्रांतातील लोकांवर त्यांचा मोठा प्रभाव निर्माण झाला होता. पुढे अरविंद घोष यांच्यावरील खटल्यात त्यांच्याविरुध्द साक्ष देण्यास नकार दिल्याबद्दल बिपिनचंद्रांना ६ महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली. देशभर संतापाची लाट उसळली. पुढे जेव्हा ९ मार्च १९०८ रोजी बिपिनचंद्रांची कारावासातून सुटका झाली, तेव्हा तो दिवस साजरा करण्याचे मद्रासमधील सुब्रमण्यम शिव व चिदंबरम् पिलाई या दोन क्रांतिकारकांनी ठरविले. त्यांनी सभा घेऊन स्वदेशी व बहिष्कार या साधनांचा स्विकार करण्याचे आवाहन आपल्या बांधवाना केले. मद्रास सरकार अशा जहालवादी चळवळी दडपून टाकण्यासाठी फार जागरुक होते. सरकारने या दोन क्रांतिकारकांना ताबडतोब अटक केली. ही वार्ता लोकांपर्यंत पोहचताच सर्वत्र दंगल सुरु झाली. तिन्नुवेली शहरातील सर्व सरकारी कचेऱ्यांवर हल्ले होऊन त्या नष्ट करण्यात आल्या. पुढे खटला उभा राहिला व सरकारविरोधी दंगल केल्याच्या आरोपावरुन २७ जणांना कठोर कारावासाच्या शिक्षा झाल्या.

पुढे मद्रास प्रांतात क्रांतिकारी चळवळीने चांगला जोर धरला. सरकारने चिडून जाऊन वृत्तपत्रांचे संपादक व सभा जिंकणाऱ्या नेत्यांवर खटले भरले व शिक्षा केल्या. त्यामुळे ही चळवळ अधिकच फोफावू लागली. या चळवळीला तिरुमाल आचार्य व व्ही.व्ही.एस. अय्यर या दोन क्रांतिकारी नेत्यांचे नेतृत्व लाभले. या दोन्ही क्रांतिकारकांचे लंडनमधील इंडिया हाऊस व पॅरिसमधील दहशतवादी केंद्राशी संबंध होते. अय्यर तर सावरकरांसोबत इंडिया हाऊस मध्ये कांही काळ होते. भारतात आल्यावर त्यांनी पाँडेचरी येथे येऊन क्रांतिकारकांची संघटना उभारली. पाँडेचरीच्या केंद्रात पिस्तुल चालविण्याचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली होती.याच केंद्रात शिकून तयार झालेल्या वांची अय्यर या तरुण क्रांतिकारकानेच तिन्नुवेल्लीचा कलेक्टर मि.अ‍ॅश याचा ११ जून १९११ रोजी गोळ्या घालून खून केला. वांचीवर खटला दाखल होऊन त्यास सरकारने फाशी दिले व इतर ९ क्रांतिकारकांना निरनिराळ्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा झाल्या.

**क्रांतिकार्यात तरुणींचा सहभाग :**

तरुणींचा सहभाग हे नव्या  दहशतवादी चळवळीचे एक आगळे वैशिष्ट्य होते. सूर्य सेन यांच्या नेतृत्वाखाली या तरुणींनी क्रांतिकारकांना आश्रय दिला. गुप्तपणे संदेश पोहचविणे, शस्त्रास्त्रे सांभाळणे आणि प्रसंगी हाती बंदुका घेऊन सरकारशी दोन हात करणे इत्यांदी कामे स्त्रिया करीत होत्या. प्रीतिलता वड्डेदार एका हल्ल्यात मृत्यूमुखी पडल्या. कल्पना दत्त यांना अटक झाली. सेन यांच्याबरोबरीने त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. डिसेंबर १९३१ मध्ये कोमिल्ला येथील शांती घोष व सुनीता चौधरी या शाळकरी विद्यार्थिनी जिल्हादंडाधिकाऱ्यावर गोळ्या झाडून त्यांची हत्या केली. फेब्रुवारी १९३२ मध्ये बीना दास यांनी पदवीदान समारंभात गव्हर्नरकडून पदवी प्रमाणपत्र स्वीकारत असताना त्यांच्यावर अगदी जवळून गोळ्या झाडल्या.

## ६.८ भारताबाहेरील क्रांतिकारी कार्य :

भारतीय क्रांतिकारकांनी आपले कार्य देशाच्या चतु:सीमेपुरते मर्यादित ठेवले नाही, देशाबाहेर कार्य करण्याचे फायदे ते ओळखून होते. म्हणून परदेशात स्थायिक झालेल्या राष्ट्रनिष्ठा भारतीयांकडून आणि भारताविषयी सहानुभूती असलेल्या परकीयांकडून आर्थिक सहाय्य मिळवून, ब्रिटिश दमनचक्राच्या बाहेर राहून काही भारतीय क्रांतिकारकांनी १९ व्या शतकाच्या अखेरीस या कार्याला आरंभ केला.

### ६.८.१ इंग्लंडमधील क्रांतिकार्य :

इंग्लंडमधील क्रांतिकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवण्यात शामजी कृष्ण वर्मा हे अग्रेसर होते. १८९७ मध्ये लंडनमध्ये स्थायिक झाल्यानंतर परदेशी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या होतकरु भारतीय तरुणांना दरसाल सहा शिष्यवृत्या देऊ केल्या. या शिष्यवृत्तींसाठी प्रखर राष्ट्रवादी तरुणांची काटेकोरपणे निवड केली जाई. या मार्गाने त्यांनी लंडनला क्रांतिकारी तरुणांचा गट गोळा केला. 'इंडिया हाऊस' म्हणून प्रसिध्दिला आलेले शामजींचे घर त्यांच्या कार्याचे केंद्रस्थान बनले. १९०५ साली त्यांनी 'इंडियन होमरुल सोसायटीची' स्थापना करुन क्रांतिकार्याच्या प्रसारासाठी 'इंडियन सोशॉलॉजिस्ट' हे पत्रक सुरु केले. पूर्ण स्वराज्य हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते व त्याच्या पूर्ततेसाठी असहकार व नि:शस्त्र प्रतिकाराचा मार्ग ते पुरस्कृत करीत होते. शामजींच्या लिखाणाचा सूर कडक होऊ लागताच त्यांच्या कार्यावर निर्बंध घालण्याची मागणी टाईम्ससारखी वृत्तपत्रके करु लागली. तेव्हां शामजींनी लंडन सोडून आपले कार्यकेंद्र पॅरिसला हलविण्यात आले. शामजींच्या पश्चात्त इंडिया हाऊसची जबाबदारी सावरकरांनी शिरावर घेतली. मॅझिनींचे चरित्र क्रांतिकारकांचे स्फूर्तीस्थान होते. १८५७ च्या महान घटनेला सावरकरांनी 'शिपायांचे बंड' 'न म्हणता भारतीयांचे पहिले स्वातंत्र्य युध्द' असे ठामपणे प्रतिपादित केले. झाशीची राणी, तात्या टोपे हे क्रांतिकारकांचे आदर्श होते. इंडिया हाऊसमध्ये युरोपातून येणाऱ्या तरुणांबरोबर युरोपातील क्रांतिकारी चळवळीच्या इतिहासाचे सामूहिक वाचन सुरु केले. विदेशी क्रांतिकारकांचा भारतीय तरुणांना परिचय करुन दिला. पिस्तुलाचा वापर करण्याचे शिक्षणही ते गुप्तपणे देऊ लागले. अशाच तरुणांपैकी मदनलाल धिंग्रा याने कर्झनवायलीची हत्या केली. बलशाली ब्रिटीश साम्राजाच्या केंद्रस्थानी एका बड्या ब्रिटिश अधिकाऱ्याची हत्या करण्याचा

धाडशी प्रयत्न एका भारतीय तरुणाने करुन मातृभूमीसाठी आत्मबलिदान केलेले पाहून ब्रिटिश राजसिंहासनही हादरले.

धिंग्रा प्रकरणामुळे इंडिया हाऊसशी संबंधित असलेल्या भारतीयांवर ब्रिटिशांच्या दमननीतींचा वरवंटा फिरु लागला. शामजींची विद्यापीठाची पदवी रद्द करण्यात आली. सावरकरांना नाशिक खटल्यात गोवून त्यांना अटक करण्यात आली लंडनप्रमाणेच पॅरिस येथेही सरदार सिंग राणा यांनी क्रांतिकारकांसाठी एक केंद्र उघडले. पुढे श्रीमती कामा लवकरच या गटात सामील झाल्या. १९०२ रोजी भारत सोडल्यानंतर त्यांनी युरोपात सतत प्रचारकार्य केले. पॅरिसमध्ये त्या 'वंदे मातरम्' या पत्रकाचे संपादन करु लागल्या. १९०७ च्या इंटरनॅशनल सोशालिस्ट काँग्रेसमध्ये कामा व राणा यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. या आंतरराष्ट्रीय सभेत कामांनी स्वत:तयार केलेला तिरंगी ध्वज स्वतंत्र भारताचा ध्वज म्हणून फडकविला व त्याद्वारा भारतीयांची स्वातंत्र्याची आकांक्षा जगापुढे मांडली. हयातभर बाहेरच्या जगात त्या भारतीयांच्या आशा आकांक्षांना व सरकारच्या अन्यायाला सतत वाचा फोडीत राहिल्या.

### ६.८.२ अमेरिकेतील क्रांतिकार्य गदर चळवळ :

शामजी कृष्ण वर्मा, विनायक दामोदर सावरकर, श्रीमती कामा ही मंडळी युरोपात जे कार्य करीत होती तशाच प्रकारचे कार्य अमेरिकेत भारताच्या वतीने लाला हरदयाळ करीत होते. २० व्या शतकाच्या प्रारंभी अमेरिकेत स्थायिक झालेल्या कांही श्रीमंत भारतीयांनी राष्ट्रवादी चळवळीला हातभार लावला. शिष्यवृत्या देऊन शिक्षणाच्या निमित्ताने भारतीय तरुणांना अमेरिकेत आणण्यासाठी फंड गोळा करु लागले. वंगभंगाविरोधी चळवळीचे पडसाद तेथेही उमटले. १९०८ साली तारकानाथ दासांनी तेथे 'फ्रि हिंदुस्थान' हे पत्रक काढले. अमेरिकेत क्रांतिकारी सैन्याचे आयोजन डॉ. खानखोजे व विष्णू पिंगळे यांच्याकडे सोपविण्यात आले. लाला हरदयाळ शिष्यवृत्ती घेऊन शिक्षणांसाठी लंडनला गेले होते पण भारतातील ब्रिटिश शासनाच्या शोषक स्वरुपाची माहिती होताच शिष्यवृत्ती सोडून भारतात आले. कांही काळ लाहोरला तरुण क्रांतीकारकांसाठी कार्य केले. परंतु ब्रिटिशांची तीक्षण नजर चुकवून तेथे हे कार्य करणे शक्य नसल्याचे ध्यानात येताच लाला हरदयाळ यांनी १९११ मध्ये पलायन केले. अमेरिकेत तेथील समविचारी भारतीयांना संघटीत करुन १९१३ मध्ये 'हिंदी असोसिएशन ऑफ अमेरिका' नावाची संघटना स्थापन करुन गदर नावाचे साप्ताहिक सुरु केले. असोसिएशनचा सहानुभूती व अमेरिकन लोकमत जागृत करण्याचा प्रयत्न होता. गदर नावाच्या साप्ताहिकावरुन हा क्रांतीकारी गट 'गदर पक्ष' म्हणून ओळखला जाऊ लागला. गदर पक्षाची सदस्य संख्या ५००० च्या वर गेली. अमेरिका व कॅनडा मिळून ६२ शाखा स्थापन झाल्या. ब्रिटिशनिष्ठ अधिकाऱ्यांची हत्या करणे, शस्त्रास्त्रांची खरेदी करणे, बॉम्ब तयार करण्याचे ज्ञान अवगत करुन घेणे, सरकारी खजिने लुटणे, इंग्लंडच्या शत्रूशी मैत्री करणे, भारतीय लष्करात विद्रोहाची भावना चेतविणे इत्यादी कामे गदर पक्ष करीत असे. लाला हरदयाळांच्या कार्यावर ब्रिटिशांची नजर होती. हरदयाळांना अटक करावी म्हणून ब्रिटिश सरकारने अमेरिकन सरकारवर दडपण आणून अटक केली. अमेरिकन न्यायाधिशाने हरदयाळांची जामीनावर सुटका केली. हरदयाळ स्वित्झर्लंडला निघून गेले. त्यांच्या अनुपस्थित गदर पक्षाचे कार्य त्यांच्या अनुयायांनी चालविले. १९२३ पर्यंत

अमेरिकेत गदरपक्ष कार्यरत असल्याचा पुरावा सापडतो. कॅनडामध्ये क्रांतिकारी चळवळ संयोजित करण्याच्या बाबतीत गुरुदत्तसिंग या क्रांतिकारकाच्या प्रयत्नाची माहिती १९१४ सालच्या 'कामागाटामारु' प्रकरणाने उघडकीस आली.

### ६.८.३ जर्मनीमधील क्रांतीकार्य :

पहिले महायुध्द सुरु होताच भारतातील ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याच्या हेतूने जर्मन सरकारची मदत मिळविण्याची खटपट कांही भारतीय क्रांतिकारक करु लागले. वीरेंद्र चटोपाध्यायसारख्या कांही क्रांतिकारकांचा ब्रिटिश विरोधी उपयोग करुन घेता येईल अशी जर्मन सरकारची कल्पना होती. म्हणून जर्मन सरकारने भारतीय क्रांतिकारकांना मदतीचे आश्‍वासन दिले. १९१४ मध्ये धीरेन सरकार यांच्या नेतृत्वाखाली तेथे एक समिती स्थापन केली. समितीच्या माध्यमातून अमेरिकेतील गदर नेत्यांशी भारतीय क्रांतिकारकांशी संपर्क प्रस्थापित केला. त्यांनी बर्लिन येथे 'इंडियन इंडिपेंडंस' समिती स्थापन केली जर्मनीप्रमाणेच तुर्कस्तान व इजिप्तच्या अधिकाऱ्यांशी या समितीने संबंध प्रस्थापित केले. भारताच्या पूर्व व पश्‍चिम किनाऱ्यावर जर्मनीने एकाचवेळी हल्ला करावा. त्याचवेळी भारतीय क्रांतिकारकांनी देशाच्या निरनिराळ्या भागात सशस्त्र उठाव करावेत, लष्करी छावण्यांतून सैनिकांनी बंडाचे निशाण उभारावे व या उठावात संस्थानिकांनी सामील व्हावे अशी धाडशी योजना आखण्यात आली. ठरल्याप्रमाणे जर्मन बोटी भारताच्या रोखाने निघाल्या. परंतु कडक बंदोबस्तामुळे त्या भारताच्या किनाऱ्यापर्यंत येऊ शकल्या नाहीत. युध्दाकाळात जर्मनीच्या मदतीने रंगून, सिंगापूर मलाया येथील भारतीय सैनिकांला विद्रोहाचे आवाहन करण्यात आले. आव्हानाप्रमाणे सिंगापूरच्या लष्कराने बंड केले पण ते मोडून काढले गेले. क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण देण्यास बँकॉक येथे एक केंद्र स्थापन करण्यात आले व या कामासाठी जर्मन अधिकारी नेमले गेले.

### ६.८.४ अफगाणिस्तानमधील क्रांतिकार्य :

तुर्कस्थान इंग्लंडविरुध्द पहिल्या महायुध्दात प्रविष्ट होताच काही भारतीय क्रांतिकारकांनी अफगाणिस्तानात तळ ठोकून तुर्कस्थानची मदत मिळविण्याचा खटाटोप सुरु केला. या कटात मुस्लिम क्रांतिकारक आघाडीवर होते. १९११ रोजी ब्रिटिशांनी बंगालची फाळणी रद्द करुन भारतीय मुस्लिमांना धक्का दिला. पहिल्या महायुध्दात तुर्कस्थानच्या सुलतानाचा केलेला पराभव यामुळे भारतीय मुस्लिम समाजात ब्रिटिशाविरोधी भावना भडकू लागली. बरेच मुस्लिम तरुण सीमेपलीकडील पठाणांच्या प्रदेशात जाऊन पठाणी प्रदेशात स्थायिक झालेल्या भारतीय वहाबी नेत्यांशी संपर्क साधावा व त्यांच्या मदतीने वायव्यसीमेवर हल्ला चढवावा आणि त्याच वेळी भारतीय मुस्लिमांनी देशात ठिकठिकाणी उठाव करावे अशी योजना आखण्यात आली. या कटाचे सूत्रधार मौलवी अबीदुल्ला हे काबूलला गेले. तेथे राजा महेंद्र व बरकतउल्ला हे दोन क्रांतिकारक त्यांना येऊन मिळाले. त्यांनी तुर्कस्थान व भारतीय मुस्लिम समाजात ब्रिटिशाविरोधी भावना भडकू लागली. बरेच मुस्लिम तरुण सीमेपलीकडील पठाणांच्या प्रदेशात जाऊन पठाणी प्रदेशात स्थायिक झालेल्या भारतीय वहावी नेत्यांशी संपर्क साधावा व त्यांच्या मदतीने वायव्यसीमेवर हल्ला चढवावा आणि त्याच वेळी भारतीय मुस्लिमांनी देशात ठिकठिकाणी उठाव करावे अशी योजना आखण्यात आली. या कटाचे सूत्रधार मौलवी अबीदुल्ला हे काबूलला गेले. तेथे राजा महेंद्र व बरकतउल्ला हे दोन क्रांतिकारक त्यांना येऊन

मिळाले. त्यांनी तुर्कस्थान व जर्मनीकडून मदतीचे आश्वासन मिळविले व अफगाणिस्तानच्या अमीराने त्यांना आश्रय दिला. डिसेंबर १९१५ मध्ये काबूल येथे क्रांतिकारकांनी स्वतंत्र भारताचे हंगामी सरकार स्थापन केले. रशियन सरकारकडे मदतीची मागणी केली परंतु त्यांच्या प्रयत्नांना फळ आले. हल्ला करण्याची योजना त्यांना सोडून द्यावी लागली. १९१७ मध्ये रशियात ऑक्टोबर क्रांती झाल्यानंतर काबूलमधील भारताच्या अस्थायी सरकारचे प्रतिनिधी म्हणून बरकतउल्ला, आचार्य व अब्दूल रब उपस्थित होते. त्यांनी लेनिनची भेट घेतली. वीरेंद्र चट्टोपाध्याय, मानवेंद्र रॉय हेही सोविएट सरकारकडे वळले. रशियात काही क्रांतिकारक भारतात परतले व क्रांतिकारक गटास मिसळले.

## ६.९ क्रांतिकारी चळवळीचे मूल्यमापन :

भारतीय क्रांतिकारकांच्या कार्यावर ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आणि साम्राज्यवादी इतिहासकारांनी टीका केलेली आढळते हे स्वाभाविक आहे. परंतु भारतीय क्रांतिकारकांच्या कार्यावर त्यांच्या काही समकालीन राजधुरीणांनी, विशेष म्हणजे मवाळ गटाने कठोर टीकास्त्र सोडले. म.गांधीनीही क्रांतिकारकांनी स्विकारलेला हिंसेचा मार्ग केवळ अव्यवहार्य नव्हे तर अनैतिक आहे अशा शब्दात क्रांतिकारी चळवळीचे मूल्यमापन केलेले दिसून येते.

बलशाली जुलमी सत्तांच्या पायाखाली चिरडल्या जाणाऱ्या राष्ट्रांत क्रांतिकारी चळवळीचा प्रादुर्भाव झाल्याची अनेक उदाहरणे जगाच्या इतिहासात आढळतात. जेव्हां न्याय मिळविण्यास सनदशीर विधायक मार्ग कुचकामी ठरतात, तेव्हां हिंसक मार्गाचा अवलंब अपरिहार्य ठरतो. फ्रान्स, रशिया, इटली, आयर्लंड इत्यादी युरोपीय राष्ट्रांतही आधुनिक काळात अशा चळवळी जन्माला आल्या व तेथील विचारवंतानी त्या चळवळीचे समर्थन केले. भारतात मात्र क्रांतिकारकांच्या पदरी निराशा पडली. क्रांतिकारकांची उद्दिष्टे व त्यांची तात्विक भूमिका समजून घेतल्यास त्यांचे कार्य निषेध करण्याजोगे नव्हते असे दिसते. हिंसेचा मार्ग जरी निंदाजनक वाटला तरी राष्ट्रकल्याणासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवून स्वातंत्र्याच्या वेदीवर आत्माहुती देणाऱ्या तरुणांची स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळात जाहीरपणे निर्भत्सना करणे उचित नव्हते. असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. मवाळ गटाप्रमाणेच जहाल गटालाही हिंसक मार्गाचा अवलंब योग्य वाटत नव्हता. क्रांतिकारकांना त्यांचा मार्ग घातक व अव्यवहार्य असल्याचे सांगून त्या मार्गापासून त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला परंतु जीवनाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या होतकरु व कोवळ्या मुलांच्या त्यागाच्या माहितीची जाणीव त्यांना होती आणि म्हणून साधनशुचितेचे स्तोम माजवून क्रांतिकारकांचा जाहिर निषेध कधीही केला नाही.

क्रांतिकारकांना आपल्या मर्यादेची जाणीव होती. क्रांतीकार्यावर घेण्यात येणाऱ्या अव्यवहार्यतेच्या आक्षेपात कांही तथ्व असल्याची जाणीव होती. एकट्यादुकट्या ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करुन स्वातंत्र्य मिळेल असा भ्रम त्यांनीही उराशी बाळगलेला नव्हता फक्त देशकार्यासाठी निर्भीडपण मृत्यूला सामोरे जाण्याचा आदर्श लोकांपुढे ठेवण्यासाठी, तसेच जनमानसातील प्रक्षोभ परकीय सरकारच्या नजरेस आणून भारतीयांना राजकीय अधिकार देण्याची गरज सरकारच्या मनावर बिंबवण्यासाठी आपल्या कृतीचे समर्थन केलेले आढळते.

क्रांतिकारकाच्या आत्मबलिदानाने देशात नवे स्फुरण निर्माण केले. राजकीय जागृतीला हातभार लावला. परंतु त्यांच्या कार्याला व्यापक राष्ट्रीय स्वरुप कधी आले नाही. त्यामुळे उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने व्हावी तितकी ही चळवळ परिणामकारक ठरली नाही.

## ६.१० सारांश

क्रांतिकारकांचा एकतर हा खडतर मार्ग सामान्य माणसांना झेपणारा नव्हता. त्याचा अबलंब मूठभर धाडशी तरुणच फक्त करु शकले. अशा चळवळी सर्वत्र सीमित राहतात. दुसरे म्हणजे लष्करी शक्तीच्या सहकार्याशिवाय सशस्त्र क्रांती यशस्वी झाल्याची उदाहरणे जगाच्या इतिहासात क्वचितच आढळतात. क्रांतिकारकांनी भारतीय लष्करात ब्रिटिशविरोधी भावनेचा प्रचार केलाही. परंतु त्यांना १९४२ पर्यंत फारसे यश आले नाही. क्रांतिकारकांच्या प्रत्येक प्रांतात कार्य करणाऱ्या संघटना होत्या परंतु त्यांची एककेंद्री संघटना नसल्यामुळे भारतासारख्या अवाढव्य देशात गुप्तपणे कार्य करीत निरनिराळ्या संघटनांच्या कार्यात समन्वय राखणे दुरापास्त होते. तसेच शस्त्रास्त्रे, पैसा व मनुष्यबळ यांचा अभाव ही त्यांच्या मार्गातील मोठी अडचण होती. जनशक्तीचे पाठबळ क्रांतिकारकांना कधी मिळाले नाही. क्रांतिकारकांच्या स्वार्थत्यागाच्या व बलिदानाच्या प्रमाणात त्यांचे कार्य फलदायी ठरले नाही. तरीही क्रांतिकारकाच्या कार्याचे महत्त्व कमी होत नाही.

### ६.१०.१ आपली प्रगती तपासा :

१. अफगाणिस्तानातील क्रांतिकारी चळवळावर टीप लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## ६.११ प्रश्न

१ भारतातील क्रांतिकारी चळवळीचा आढावा घ्या.

२ भारताबाहेरील क्रांतीकारक चळवळीचे मूल्यमापन करा.

❖❖❖❖

# ७

# भारतीय स्वातंत्र्य चळवळ - ४
# स्वातंत्र्य आणि फाळणी

**प्रकरण रुपरेषा**

७.० उद्दिष्ट्ये
७.१ प्रस्तावना
७.२ हिंदु-मुस्लिम ऐक्याला बाधा आणणारे घटंक
७.३ १९३७ च्या निवडणूका व दुसरे महायुध्द
७.४ पाकिस्तानच्या कल्पनेचा उदय
७.५ द्विराष्ट्रवादाचा सिध्दांत
७.६ प्रत्यक्ष कृती दिन
७.७ पाकिस्तानची निर्मिती.
७.८ सारांश

## ७.० उद्दिष्ट्ये

१) भारतीय स्वातंत्र्य आणि फाळणीचा अभ्यास करणे
२) हिंदू मुस्लिम ऐक्याला बाधा आणणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे
३) दुसऱ्या महायुध्दातील भारताच्या भूमिकेचे मूल्यमापन करणे
४) बॅ. जीनांच्या पाकिस्तान निर्मितीच्या धोरणांचे परीक्षण करणे.

## ७.१ प्रस्तावना :

एकोणिसाव्या शतकात भारतात मुस्लिम संप्रदायवादाचा झालेला उद्‌भव ही भारताच्या इतिहासातील एक अत्यंत खेदजनक व दूरगामी परिणाम करणारी घटना ठरली. त्याचीच परिणती शेवटी १९४७ मध्ये भारताचे दोन तुकडे होण्यात झाली. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे आज भारताच्याच नव्हे तर संपूर्ण आशिया खंडाच्या राजकारणात एक गंभीर गुंतागुंत निर्माण झाली आहे.

इ.स. ७१२ मध्ये मुहम्मद बीन कासीमने भारतावर आक्रमण करुन सिंध प्रांत काबीज केला. तेव्हांपासून विशेषतः तेराव्या शतकात दिल्लीवर मुसलमानांची अधिसत्ता प्रस्थापित झाली. भारतात मोठ्या संख्येने मुसलमानांची आवक सुरु झाली. भारतात स्थायिक झालेल्या या मुसलमानातही अरब, इराणी, अफगाण, तुर्क असे वंशभेद होते. परंतु राज्यकर्ते असल्याचा अभिमान व धार्मिक ऐक्य यामुळे येथील बहुसंख्य हिंदूच्या विरोधात तो वंशभेद बाजूला पडून त्यांच्यात आपुलकीची भावना दृढ झाली. शतकानुशतके भारतात राहूनही भारतीय रीती, रुढी, परंपरा, धर्म इत्यादी बाबतीतील हिंदू व मुसलमान यांमध्ये विविधता आढळते. असे जरी असले तरी काळाच्या ओघात हिंदू व मुस्लीम संस्कृतीची कांही क्षेत्रात का होईना देवाण-घेवाण होऊन भारतीय संस्कृती संमीश्र प्रकारची बनत गेली. उदाहरणार्थ, भारतीय भाषांतून निर्माण झालेल्या त्या दोहोंच्या साहित्यात मनोभूमिका व दृष्टीकोन यात साधर्म्य निर्माण झाले. एवढेच नव्हे तर भाषा, आचार, विचार, रुढी, परंपरा इत्यादी बाबतीत परस्परांचा परस्परांवर प्रभाव पडला हिंदु-मुस्लीम समाजातील धार्मिक व सांस्कृतिक भेदावर भर देणारा असे परस्पर विरोधी गटही त्यांच्यात होते.

मोगल काळात बाबरापासून औरंगजेबापर्यंत इस्लामी सत्ता संपूर्ण हिंदुस्थानात पसरली. या सत्तेला हुसकावून लावण्याचा रजपूतांनी अयशस्वी प्रयत्न केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करुन अत्याचारी मुस्लिम सत्तांना आव्हान दिले. पुढील काळात मराठे प्रबळ झाले पण हिंदुस्थानातील बादशाही कायम होती. अनेक ठिकाणी मुस्लिमांच्या स्वतंत्र सत्ता राज्य करीत होत्या. इंग्रजांच्या आगमनाने ही परिस्थिती बदलली. शेकडो वर्षे राज्य करीत असलेल्या मुस्लिम सत्ता नष्ट करुन साम्राज्य वाढविण्याचा सपाटा इंग्रजांनी लावला. उत्तर हिंदुस्थानात मुस्लिम नबाबांच्या सत्ता ब्रिटिशांनी हिरावून घेतल्या. दक्षिणेत निजाम इंग्रजांच्या आधीन बनला. म्हैसूरमध्ये टिपू सुलतान नष्ट झाला. इंग्रजांच्या या साम्राज्य विस्तारामुळे मुस्लिम लोक दुखावले व ते इंग्रज विरोधी बनले. इ.स. १८५६ पर्यंत इंग्रजांनी हिंदुंप्रमाणेच मुस्लिमांच्याही धार्मिक व सांस्कृतिक भावना पायदळी तुडविल्याने १८५७ च्या उठावात प्रथमच हिंदु व मुस्लिम एकत्रितपणे इंग्रजांच्या विरुध्द उभे राहीले. आपली हिंदुस्थानातील सत्ता इंग्रजांनी नष्ट केली या जाणीवेने मुस्लिमांनी बहादुरशाह जफरला पुन्हा सम्राट बनविण्याचा प्रयत्न केला. वहाबी आंदोलनाने ती अधिकच तीव्र बनली. उठावाच्या समाप्तीनंतर इंग्रजांचा राग हिंदुपेक्षा मुस्लिमांवर अधिक होता. या सूडबुध्दीने इंग्रजांनी मुस्लिमांना सर्व सोई सवलती नाकारल्या त्यांच्यावर प्रचंड अत्याचार केले हे करीत असताना हेतुपुरस्पर हिंदुंना जवळ केले. मुस्लिमांनी आपल्या कट्टर धर्मभावनेमुळे इंग्रजी ज्ञान- विज्ञानाला विरोध केला त्यामुळे ब्रिटिश राजवटीत त्यांची प्रगती होऊ शकली नाही. हिंदूंमध्ये जसजशी राजकीय जागृती निर्माण झाली तशी त्यांनी राजकीय अधिकारांची मागणी सुरु केली.

हिंदुनी इंग्रजी शिक्षणाला प्राधान्य दिल्याने त्यांची प्रगती झाली. अनेक प्रशासकीय नोकऱ्या हिंदुंनाच मिळू लागल्या. त्यामानाने मुस्लिम समाज मागासच राहिला. १८५७ च्या उठावानंतर हिंदु व मुस्लिम यांची एकी पुन्हा कधीही होऊ नये यासाठी इंग्रजांनी 'फोडा व राज्य करा' या राजनितीचा अवलंब करुन त्यांच्यामध्ये शत्रुत्व वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

## ७.२ हिंदु-मुस्लिम ऐक्याला बाधा ठरणारे घटक :

१) **सर सय्यद अहमद खान व अलीगढ चळवळ :** प्रारंभीच्या काळात हिंदु-मुस्लिम ऐक्याचे कट्टर समर्थक असलेले सर सय्यद अहमद खान काळाच्या ओघात कॉंग्रेसचे विरोधक व ब्रिटिश साम्राज्याचे समर्थक बनले. सुरुवातीच्या काळात त्यांनी हिंदू व मुसलमानांना 'सुंदर वधूचे दोन डोळे' अशी उपमा दिली होती.

पण काळाच्याओघात त्यांच्या विचारात बदल होऊन प्रखर राष्ट्रवादी असलेले सर सय्यद अहमद खान प्रखर जातियवादी बनले. मुस्लिमांच्या जिहादला विरोध करुन मुस्लिमांमध्ये जागृती व प्रगती घडवून आणण्यासाठी ब्रिटिशांना पाठिंबा दिला. मुस्लिम समाजात आत्मविश्वास वाढवून त्यांच्यासाठी अनेक सुधारणा घडवून आणल्या. हिंदुच्या वाढत्या प्रभावामुळे इंग्रजांना मुस्लिमांशी मैत्री करण्याची गरज भासू लागली. त्यासाठी सर सय्यद अहमद खान यांना आपल्या जाळ्यात ओढून घेतले. खान यांच्या अनेक मागण्या ब्रिटिशांनी पूर्ण केल्या. एवढेच नव्हे तर १८७८ मध्ये व्हॉइसरॉयच्या कायदेमंडळातील सदस्य म्हणून त्यांची नेमणूक केली. १८८८ मध्ये त्यांना 'सर' ही पदवी बहाल केली. मुस्लिमांना शिक्षण देण्यासाठी १८७५ मध्ये अलीगढ येथे 'मोहम्मदन अँग्लो ओरिएंटल स्कुलची'स्थापना केली याच संस्थेचे रुपांतर पुढे अलीगढ महाविद्यालय व विश्वविद्यालयात झाले. १८८३ ते १८९९ या काळात महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून थिओडोर बेक यांची नेमणूक झाली. हा इंग्रज गृहस्थ धूर्त होता. हिंदुस्थानात इंग्रज साम्राज्य टिकविण्यासाठी हिंदु-मुस्लिमांची युती होऊ नये असे त्याचे मत होते. त्यानेच खान यांच्या मनात जातीयवादाचे बिज पेरले त्यामुळे खान पक्के हिंदुविरोधी बनले. अलिगढ महाविद्यालय हिंदुस्थानातील मुस्लिम राजकारणाचा व नीतीचां अड्डा बनला. ते मुस्लिम चळवळीचे केंद्र बनले. १८८५ रोजी कॉंग्रेसची स्थापना होऊन स्वातंत्र्य चळवळीला प्रारंभ झाला. परंतु खान यांनी राष्ट्रसभेला विरोध करुन 'हिंदुची संघटना' म्हणून हिणवले.

२) **बंगालची फाळणी :** प्रशासनाच्या सोईच्या दृष्टीने बंगालची फाळणी आवश्यक असल्याचे कारण सांगून लॉर्ड कर्झनने ३ डिसेंबर १८०३ मध्ये बंगालच्या फाळणीचा ठराव मांडला. पण फाळणीमागे जरी प्रशासनाचे कारण सांगितले असले तरी ब्रिटिशांचा डाव वेगळा होता. या फाळणीमागे हिंदु-मुस्लिम ऐक्य नष्ट करणे, राष्ट्रवादी चळवळीला पायबंद घालणे हे महत्त्वाचे उद्देश होते. पूर्व-बंगालच्या दौऱ्यात लॉर्ड कर्झन साहेबानी ही फाळणी मुसलमानांच्या हिताची असल्याचे वारंवार सांगितले. बंगालपासून पूर्व बंगाल व आसाम या मुस्लिम बहुसंख्याकांचा वेगळा प्रांत केल्यामुळे या प्रांतात अधिकाराच्या जागा मुस्लिमांना मोठ्या प्रमाणात मिळतील असा जहरी प्रचार लॉर्ड कर्झनने केल्यामुळे जातीयवादाला खतपाणी मिळाले.

'स्टेटस्मन' या इंग्रजी वृत्तपत्रात बंगालच्या फाळणीमुळे मुसलमानांचा प्रभाव वाढून हिंदु जमातीच्या वर्चस्वाला पायबंद घालता येईल असे म्हटले. १९०५ मध्ये प्रत्यक्ष फाळणी मंजूर करताना फाळणीविरुध्द देशभर आंदोलन सुरु झाले याचा फायदा घेऊन इंग्रजांनी कॉंग्रेस व हिंदू

हे मुस्लिमांचे हितशत्रु असल्याचा प्रचार केला. त्यामुळे इंग्रजी राज्यात आपण अधिक सुरक्षित असल्याची भावना मुस्लिमांना वाटू लागली.

३) **मुस्लिम लीगची स्थापना :** इंग्रज सरकारने हिंदुस्थानला दिलेल्या १८९२ च्या सुधारणा समाधानकारक नव्हत्या. कॉंग्रेसमध्ये जहालवादी गट प्रभावी बनून राजकीय मागण्यांची वाढ होत गेली. दुसरीकडे क्रांतिकारी चळवळही वाढत गेली. या प्रवाहात मुस्लिमांनी सामील होऊ नये यासाठी इंग्रजांनी प्रयत्न सुरु केले. लॉर्ड कर्झननंतर आलेल्या व्हॉईसरॉय लॉर्ड मिंटोने मुस्लिमांची स्वतंत्र संघटना असावी या विचाराला चालना दिली. शिवाय आपल्या अधिकाऱ्याकडून मुस्लिम शिष्टमंडळाला आपली भेट घेऊन राजकीय मागण्या सादर करण्याचा सल्ला दिला. त्यानुसार १ ऑक्टोबर १९०६ रोजी मुस्लिम शिष्ट मंडळ सिमला येथे लॉर्ड मिंटोला भेटले. अलिगढ कॉलेजचे नवीन प्राचार्य आर्चबल यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. शिष्टमंडळाने व्हाईसरॉयकडे आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. निवेदनात मुसलमानांसाठी स्वतंत्र मतदारसंघ असावेत शिवाय इतर मतदार संघातून त्यांना संख्येपेक्षा अधिक जागा असाव्यात, उच्च पदावर स्पर्धा परीक्षेशिवाय मुस्लिमांच्या नेमणुका व्हाव्यात, नगरपालिका ते विधीमंडळापर्यंत मुसलमानांना खास प्रतिनिधीत्व द्यावे या प्रमुख मागण्या होत्या.

या भेटीच्या वेळी व्हॉसरॉयने मुस्लिम शिष्टमंडळाचे जंगी स्वागत केले. मुस्लिम नेत्यांनी खास गार्डन पार्टी दिली. मुस्लिमांच्या ब्रिटिश निष्ठेचे आणि अलिगढ चळवळीचे कौतुक करुन स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला पाठिंबा दिला. मुस्लिमांना हाताशी धरुन त्यांना हिंदु समाजापासून वेगळे करण्याचे यशस्वी राजकारण लॉर्ड मिंटोने केले. म्हणून काही इतिहासकार लॉड मिंटोला 'पाकिस्तानचा जनक' मानतात.

व्हॉईसरॉयच्या चिथावणीमुळे मुस्लिम नेत्यांचा व समाजाचा आत्मविश्वास वाढला. अलीगढ विद्यापीठांतून तयार झालेली तरुण-पिढी देशभर प्रचारकाचे काम करु लागली. त्यांनी अखिल भारतीय मुस्लिम संघटना स्थापना करण्याचे प्रयत्न चालविले. हिंदुना विरोध करुन मुस्लिम हितसंबंध जोपासण्यासाठी ढाक्क्याचे नबाव सलिमुल्लाखान यांनी ऑल इंडिया मुस्लिम कॉन्फरन्स स्थापन करण्याचे ठरविले. सर्व प्रांतीय मुस्लिम संघटनांची बैठक ३० डिसेंबर १९०६ रोजी ढाक्का येथे बोलावली. या वेळी झालेल्या चर्चेनुसार मुस्लिम लीगच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली. मुस्लिम समाजात इंग्रज राज्याविषयी एकनिष्ठा निर्माण करणे, मुस्लिमांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करणे, मुस्लिमांच्या मागण्या सरकारकडे मांडणे, सरकारी धोरणविषयीचे गैरसमज दूर करणे, आपल्या हितसंबंधाना धोका पोहचत नसेल तरच इतर जमातींशी संबंध ठेवणे ही उद्दिष्टे लीगने ठरविली. मुस्लिम लीग स्थापन झाली असली तरी तिच्या जातीय राजकारणाला अनेक राष्ट्रवादी मुस्लिम नेत्यांनी विरोध केला. त्यामध्ये मौलाना अबूल कलाम आझाद, सय्यद हुसेन, बॅ.जिना, हसन इनाम, हकीम अझमल खान ही मंडळी होती. असे जरी असले तरी पुढील राजकारणात कॉंग्रेसला कायम विरोध करणारी मुस्लिम संघटना उदयास आली होती. याच संघटनेने पुढिल काळात भारताची फाळणी घडवून आणली.

**४) भारतीय इतिहास लेखनातील जमातवाद :** भारताचा इतिहास लिहिणाऱ्या काही इंग्रज लेखकांनी, इतिकासकारांनी हिंदू-मुसलमान प्रश्न डोळयासमोर ठेवून भारतीय संस्कृतीच्या विकासाचा घटनाक्रम लिहिला आणि अप्रत्यक्षरित्या साम्राज्यवादाला चालना दिली. उदा.प्राचीन भारताच्या इतिहासाला 'हिंदु युग' आणि मध्यकालीन इतिहासाला 'मुस्लिम युग' असे संबोधून ऐतिहासिक कालखंडाचा आधार धर्म ठरविला. आपल्या राजकीय व आर्थिक उद्दिष्टपूर्तीसाठी राजा आणि प्रजा दोघांनीही धर्माचा आधार घेतला हे खरे आहे. परंतू सर्व मुसलमान शासक होते आणि हिंदू शासित असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होय. मुस्लिम सत्तेच्या काळात हिंदुचे शोषण झाले तसे व तेवढे नसले तरी सामान्य मुसलमानांचेही शोषण झाले. शासक मुस्लिम असले तरी सर्वसाधारण मुसलमान गरीब होते. पण अशा प्रकारच्या सत्यांकडे पाठ फिरवून केवळ जातीय दृष्टीकोनातून लिहिल्या गेलेल्या इतिहासामुळे १९ व्या शतकाचा शेवटचा कालखंड आणि २० व्या शतकाच्या पूर्वार्धात भारतीय राजकारणाला प्रभावित केले.

**५) धर्मसुधारणा चळवळींचा जातियवादावर अप्रत्यक्ष परिणाम :** १० व्या शतकात झालेल्या हिंदु व मुसलमान धार्मिक सुधारणा चळवळीत काही परस्पर विरोधी तत्वे होती. आपापल्या धर्मातील जुन्या टाकावू व प्रथापरंपरा बाजूला सारुन धर्माला उजाळा देणे हा चळवळीचा उद्देश होता. पण त्यातून काही अनिष्ट तत्वे निर्माण झाली. सर्व बिगरमुस्लिम जनतेप्रती जिहाद पुकारणे आणि देशाला दार-उल-इस्लाम बनविण्याचे स्वप्न पहाणे हिंदुसाठी अमान्य अशी गोष्ट होती. त्याच न्यायाने या देशाला आर्यावर्त बनविण्याचा काही हिंदु सुधारकांचा प्रयत्न आणि शुध्दी आंदोलनाध्दारे मुसलमानांना हिंदू धर्मात परत येण्याचे आवाहन करणे मुसलमानांना अमान्य होते. स्वामी विवेकानंदांनी प्राचीन भारताच्या गौरवशाली परंपरेचा उल्लेख केल्यामुळे काही मुसलमान नाराज होते आणि ते आपल्या परंपरांसाठी पश्चिम आशियाच्या इतिहासांकडे पाहू लागले.

**६) नवीन वीरगाथा व जातियवाद :** २० शतकाच्या प्रारंभी जहालवाद्यांनी महाराणा प्रतापसिंह, छत्रपती शिवाजी महाराज व गुरु गोविंदसिंह यांना राष्ट्रपुरुष मानून त्यांच्या वीरगाथा जनतेपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न केले. मरगळ आलेल्या हिंदू समाजात देशभक्तीने भारुन टाकणे, इंग्रजांविरुध्द लढा देण्यास तयार करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविणे यासाठी वरील आदर्श समोर ठेवण्यात आले. दृष्टी राष्ट्रवादी होती पण असे करताना जाणते आजाणतेपणे बादशहा अकबर, बादशहा शहाजहान,बादशहा औरंगजेब इ. मुस्लिम सम्राटांना परकीय संबोधिल्यामुळे मुसलमान अस्वस्थ झाले. त्यास खतपाणी घालण्याचे कार्य मुसलमान पुढाऱ्यांनी केले व त्यातून जातीयवाद बोकाळला.

लो. टिळक, लाला लजपराय, अरविंद घोष व नंतरच्या काळात म.गांधी हे सर्व हिंदु-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. आपल्या भाषांतून जनतेला प्रबोधित करताना त्यांना समजण्यासाठी कांही उदाहरणे देत. स्वाभाविकच ती हिंदू संस्कृती, परपरांशी निगडीत अशी होती. आदर्श राज्याची कल्पना करतांना गांधीनी रामराज्य शब्दाचा वापर केला. ते एक उदाहरण होते, लोककल्याणकारी शासनाचे प्रतिनिधीक रुप होते. वास्तविक त्यात जातीयता औषधालाही

नव्हती. परंतु इंग्रजांनी राईचा पर्वत केला आणि त्याला जातीयवादाचा रंग दिला. परिणामी 'रामराज्य' हा शब्दही मुसलमानांना खटकू लागला. जातियवादाचे विष हळूहळू पसरु लागले. एक वेळ अशी आली कि तिरंगी झेंडयासमोर नतमस्तक होण्यास मुस्लिम लिगने आक्षेप घेतला.

**७) हिंदु-मुस्लिम ऐक्य पण काही...... काळासाठी :** इ.स. १९०५ मध्ये केलेली फाळणी वाढत्या राष्ट्रीय आंदोलनामुळे सरकारने १९११ मध्ये रद्द केली. त्यामुळे मुस्लिम नेते इंग्रजांवर नाराज झाले. त्यांचा ब्रिटिश शासनावरील विश्वास उडाला. १९१४ मध्ये पहिले महायुध्द सुरु होऊन जागतिक राजकारणात बदल घडून आले. तुर्कस्थान हे मुस्लिम राष्ट्र इंग्लंडच्या विरोधात व जर्मनीच्याबाजूने उभे राहिले. याचाही परिणाम भारतीय मुस्लिमांवर झाला होता. ब्रिटिशनिष्ठ मुस्लिम लीग १९११ नंतर इंग्रजापासून दूर जाऊ लागली होती.

इ.स. १९१४ लो. टिळकांची मंडालेच्या तुरुंगातून सुटका झाल्यावर राष्ट्रीय चळवळीचे पुनरुज्जीवन झाले. ॲनी बेझंट यांनी मध्यस्थी करुन जहालांना पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश देण्याचा व मुस्लिम लीगसोबत सलोखा निर्माण करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यातून १९१६ च्या लखनौ अधिवेशनात क्राँग्रेस व लीग यांच्यात 'लखनौ करारा‌द्वारे' ऐक्य घडुन आले. या करारातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लिमांनी काँग्रेसच्या स्वयंशासनाच्या निर्णयाला पाठिंबा दिला व काँग्रेसेने लीगच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या मागणीला मान्यता दिली. लीगची ही मागणी मान्य करण्यामागे ब्रिटिशांवर दडपण वाढवण्याचा काँग्रेसचा उद्देश असला तरी मुस्लिमांच्या फुटीरवृत्तीला खतपाणी घातले गेले. काँग्रेस ही सर्व भारतीयांची प्रतिनिधित्व करणारी संघटना आहे ही भूमिका मागे पडली.

१९१५ मध्ये भारतीय राजकारणात म.गांधीचा उदय झाला. यावेळी तुर्कस्थानच्या खलिफाला इंग्लंडपासून धोका निर्माण झालेला होता. भारतात हिंदु-मुस्लिम ऐक्य घडवून आणण्यासाठी गांधीना खिलाफतीचा प्रश्न महत्त्वाचा वाटू लागला. भारताशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसलेल्या प्रश्नावरुन खिलापत चळवळ ब्रिटिशांच्या विरोधात भारतात सुरु झाली होती. २० मार्च १९१९ रोजी मुंबईत भरलेल्या मुस्लिमांच्या जाहीर सभेत खिलाफत समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने ब्रिटिशांकडे पॅरिस शांतता परिषदेत मुस्लिम प्रतिनिधीना भाग घेऊ द्यावा अशी मागणी केली पण ब्रिटिशांनी त्याकडे दुर्लक्ष केले. दरम्यान गांधीजींनी असहकार आंदोलनाची घोषणा केली व खिलाफत चळवळीच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिमांना राष्ट्रीय आंदोलनात सहभागी करुन घेण्याचे महत्वाचे कार्य गांधीजींनी पार पाडले. पण खिलाफत चळवळीला खुद्द मुस्लिम राष्ट्रां मधून विरोध असताना गांधीजीनी तिला पाठिंबा दिल्याने मुस्लिमांच्या जातीयवादाला खतपाणी मिळाले.

लखनौ करार व अहसकार आंदोलनात हिंदु-मुस्लिम ऐक्य निर्माण झाले असले तरी ते फार काळ टिकले नाही. १९२१ मध्ये मलबारमधील मोपला मुसलमानांनी हिंदुच्या कत्तली, अत्याचार, बलात्कार करुन दंगली माजविल्या. १९२२ मध्ये असहकार चळवळ समाप्त झाली. गांधीजींनी चळवळ बंद केल्याने गांधीनी आपला विश्वासघात केला असे मुस्लिमांना वाटू लागले.

यापुढे हिंदू व मुस्लिमांमधील ऐक्य केवळ नष्टच झाले नाही तर दोघांमध्ये फार मोठी दरी निर्माण झाली.

८) **बॅ.जीनांचे चौदा मुद्दे :** सायमन कमिशनचे कार्य चालू असतानांच भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांच्या आवाहनावरुन भारतातील सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन पंडित मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली १९२८ रोजी नेहरु अहवाल प्रसिध्द केला. या अहवालामध्ये राष्ट्राच्या हितासाठी स्वतंत्र मतदारसंघाची आवश्यकता नसल्याचे सांगून अल्पसंख्याकांच्या हितासाठी राखीव जागा असाव्यात अशी सूचना केली तसचे सिंध प्रांत स्वतंत्र करावा असे म्हटले. बॅ.जीनांनी या अहवालात काही उपसूचना जोडण्याचा प्रयत्न केला पण त्यांना नकार देण्यात आल्याने बॅ.जीनांनी नेहरु अहवाल फेटाळून स्वतःचे १४ मुद्दे मांडले. त्याप्रमाणे हिंदी राज्यघटना संघराज्यात्मक असावी, केंद्रीय कायदेमंडळात मुस्लिमांना १/३ प्रतिनिधित्व मिळावे, स्वतंत्र मतदारसंघ रद्द करु नयेत, पंजाब-बंगाल व वायव्य सरहद्द प्रातांची पुनर्रचना करतांना तेथील मुस्लिमांचे मताधिकार नष्ट होता कामा नये हे प्रमुख मुद्दे म्हणजे जातीयवादाला चिथावणी देणारे तत्वज्ञानच होते.

९) **हिंदू महासभा :** भारतात जातीय समजल्या गेलेल्या संस्था निर्माण व विकसित होण्यासाठी ब्रिटिशांचे साम्राज्यवादी धोरण कारणीभूत ठरले. विशिष्ट जमातीच्या हितरक्षणासाठी स्थापना झालेल्या अशा संस्था वैयक्तिकरित्या त्यांच्या नेत्यांची आकांक्षापूर्ती करीत असताना अप्रत्यक्षपणे ब्रिटिश साम्राज्याला सहाय्यभूत ठरत होत्या. हिंदू महासभा, मुस्लिम लीग, अकाली दल त्याला अपवाद नव्हत्या.

१९१० मध्ये अलाहाबादच्या प्रमुख हिंदूनी अखिल भारतीय हिंदू महासभा स्थापन करण्याचा निश्चय केला. १९११ मध्ये पंजाब हिंदू महासभेने अमृतसर येथे हिंदू अधिवेशन आयोजित केले. हिंदू महासभेचे कार्यालय हरिद्वार येथे ठेवण्यात आले आणि महत्वाच्या प्रसंगी हिंदूंचे अधिवेशन घ्यावे असे ठरविण्यात आले. १९२२ रोजी असहकार चळवळ मागे घेतल्यानंतर मलबार आणि मुलतानमध्ये व्यापक प्रमाणावर जातीय दंगली होऊन मोठ्या प्रमाणावर हिंदू जिविताचे व मालमत्तेचे नुकसान झाले. हिंदूंना स्वसंरक्षणासाठी संघटित करण्याचे प्रयत्न सुरु झाले. हिंदू महासभेची स्थापना करताना त्याचे महत्त्व प्रतिपादित करीत पंडित मदनमोहन मालविय म्हणाले, “मुसलमान आणि ख्रिचन अनेक शतकांपासून आपल्या धर्मप्रसाराचे कार्य करीत आहेत. भारतातील बहुसंख्य मुसलमान धर्मपरिवर्तीत हिंदू आहेत. हे थांबविण्यासाठी एक हिंदू संघटना स्थापना करणे आवश्यक आहे.” मुस्लिम लीगला विरोध करण्यासाठी हिंदू संघटनेचे महत्त्व मालवियांनी स्पष्ट केले. शुध्दी व संघटन ही हिंदू महासभेची उद्दिष्टे होती. कॉंग्रेस राजकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने सामाजिक, सांस्कृतिक आणि बिगर राजकीय क्षेत्रात फारसे कार्य नव्हते म्हणून हिंदू समाजातील अनिष्ट प्रथा दूर करण्यासाठी हिंदू महासभेचे संघटन करण्यात आल्याचे पं. मदन मोहन मालवियांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, हिंदू महासभा कॉंग्रेसची प्रतिस्पर्धी नसून कॉंग्रेसच्या कार्याला पूरक ठरेल व कॉंग्रेस सुदृढ बनेल

इतर जातियवादी संघटनांप्रमाणेच हिंदू महासभा ही जातियवादी संघटना असून तिचा सामजिक व सांस्कृतिक उत्थानाचा दावा पोकळ असल्याची धारणा होती. १९३८ मध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदू महासभेचे अध्यक्ष निवडले गेले. ते त्या पदावर अनेक वर्षे राहिले. त्यांच्य नेतृत्वाखाली सभेने एक राजकीय कार्यक्रम तयार केला होता. कॉंग्रेसच्या मुस्लिम धार्जिण्या धोरणामुळे नाराज झालेल्या सावरकारांनी हिंदू राष्ट्राची गर्जना केली. सावरकरानंतर श्यामाप्रसाद मुखर्जी हिंदू महासभेचे अध्यक्ष बनले. त्यांनी सभेला व्यापक दृष्टी दिली. मात्र मुसलमानामध्ये मुस्लिम लिग लोकप्रिय झाली तशी हिंदूमध्ये हिंदू महासभा लोकप्रिय होऊ शकली नाही. त्याला कारणही तसेच होते. हिंदु महासभेच्या कितीतरी आधीपासून कॉंग्रेसने भारतातील सर्वच जनजातीचे नेतृत्व केले व स्वतंत्र चळवळ चालविली. हिंदूमध्ये एक स्वाभाविक भावना होती की, एक संघटना कशाला ? शिवाय मुस्लिम लिगने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी केल्याने देशातील बहुसंख्य मुसलमान लिगचे समर्थक बनले. लिगने केलेल्या पाकिस्तानच्या मागणीला प्रतिरोध म्हणून अखंड हिंदस्थान चा नारा देऊन ही तेवढी लोकप्रियता हिंदू महासभेच्या वाटयाला आली नाही. हिंदू महासभेने हिंदू राष्ट्राची केलेली मागणी पाहून मुस्लिम लिगची पाकिस्तानची मागणी अधिक जोर धरु लागली.

**७.२.१आपली प्रगती तपासा :**

१. स्वातंत्र्यापूर्वी हिंदू - ऐक्य मुस्लिम बाधा ठरवणारे घटक कोणते होते ?.

---

---

---

---

## ७.३ १९३७ च्या निवडणुका व दुसरे महायुध्द

१९३५ च्या कायद्यानुसार १९३७ मध्ये प्रांतीय कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. या निवडणुकीत कॉंग्रेसप्रमाणे मुस्लीम लीगनेही भाग घेतला या निवडणुकीत ५८५ जागांपैकी लीगला फक्त १०४ जागाच मिळाल्या. कॉंग्रेसने ८ प्रांतात आपली मंत्रीमंडळे स्थापन केली पण त्यात लीगचा समावेश न केल्याने लीगने कॉंग्रेस ही संघटना मुस्लिमविरोधी आहे असा प्रचार केला. राष्ट्रसभा हिंदुंची आहे, त्यांना हिंदी राष्ट्रभाषा करुन मुसलमानांची उर्दु भाषा नष्ट करायची आहे. वंदे मातरम् गीत इस्लामविरोधी आहे असा खोटा प्रचार सुरु केला. या प्रचारास अनेक मुस्लिम बळी पडले. लीगने ज्या राष्ट्रसभेची मंत्रीमंडळे सत्तेवर होती तेथे त्यांनी त्यांच्या राज्यकारभाराची चौकशी करणाऱ्या चौकश्या समित्या नेमल्या व त्यांच्या अहवालात राष्ट्रसभा मुस्लिमांवर अन्याय करीत असल्याचे चित्र उभे केले.

१९३९ रोजी दुसरे महायुध्द सुरु झाले. ब्रिटिशांनी भारतीयांचे सहकार्य मिळविण्यासाठी काँग्रेसबरोबर मुस्लिम लीगलाही आमंत्रित करुन लीगला एकप्रकारे महत्त्व दिले. जुलै १९४० मध्ये बॅ.जीनांनी मुस्लिमांना मान्य नसलेली घटना सरकारने मान्य करु नये, व्हॉईसरॉयच्या कार्यकारी मंडळात व युध्द मंडळात हिंदुंइतकेच मुसलमानांना प्रतिनिधित्व मिळावे या मागण्या व्हॉईसरॉयकडे केल्या. लाहोर अधिवेशनात लीगने मुस्लिम बहुसंख्यांक प्रदेशाची स्वतंत्र राज्य बनवण्याची मागणी करणारा ठराव मंजूर केला. या ठरावाला म.गांधींनी विरोध केला.

## ७.४ पाकिस्तानच्या कल्पनेचा उदय :

सुप्रसिध्द मुस्लिम कवी डॉ. महंमद इकबाल, ज्यांनी 'सारे जहॉसे अच्छा हिंदोस्ता हमारा' हे गीत रचले. तेच पुढे जातीयवादी बनून मुस्लिम लिगमध्ये सामील झाले. त्यांनीच वेगळ्या मुस्लिम राज्याची कल्पना मांडली. १९३० च्या लीगच्या अधिवेशनात त्यांनी पंजाब, वायव्य सरहद्दप्रांत, सिंध व बलुचिस्तान यांचे एकत्रीकरण करुन एक स्वतंत्र राज्य झाल्याचे मला आवडेल असे म्हटले, मुस्लिमांचा स्वतंत्र राज्याची स्थापना झाल्याशिवाय हिंदुस्थानातील मुसलमानांच्या भाकरीची व शांततेची समस्या सुटणार नाही असे तत्वज्ञान त्यांनी मांडले.

याचवेळी १९३३मध्ये केंब्रिज विद्यापीठातील रहमत अली चौधरी या मुस्लिम विद्यार्थ्याने नाऊ आर नेव्हर (Now or Never) ही पुस्तिका प्रसिध्द केली. त्यामध्ये पंजाब, अफगाणिस्तान, काश्मिर, इराण, सिंध यांच्या आद्याक्षरांवरुन (PAKSTAN) व बलूचिस्तानच्या शेवटच्या शब्दावरुन 'पाकिस्तान' हा शब्द तयार केला. १९३८ मध्ये जीनांना पाकिस्तानच्या नावाची कल्पना पसंत पडली. येथूनच पाकिस्तान या स्वतंत्र देशाच्या मागणीचा जोर वाढत गेला.

## ७.५ द्विराष्ट्रवादाचा सिध्दांत आणि पाकिस्तान चळवळ

पाकिस्तानचे शिल्पकार म्हणून बॅ.जिनांना ओळखले जाते. म.गांधीचे विचार त्यांना मान्य होणारे नव्हते. १९१६ रोजी मुंबई प्रांत परिषदेची अध्यक्षपदावरुन हिंदू-मुस्लीम ऐक्याचा प्रसारही केला. परंतू याचवेळी त्यांनी मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची आवश्यकता प्रतिपादन केली. गांधीनी पाठिंबा दिलेल्या खिलापत चळवळीबद्दल जिनांना आस्था नव्हती. 'म.गांधींची धोरणे देशाला गर्तेत ढकलणारी आहेत' असे त्यांचे मत होते.

१९२० नंतर जिनांच्या विचारांना वेगळे वळण मिळाले. काँग्रेसमध्ये आपला जम बसविणे जिनांना अवघड दिसू लागले व मुस्लिम लीगवरील जिनांचा प्रभाव काही काळ कमी झाला होता. त्याचे पुनरुज्जीवन करण्याचा त्यांनी निश्चय केला.१९३७ साली निवडणुकीनंतर बहुमत काँग्रेसला मिळाल्यामुळे लीगची गरज संपली त्यामुळे बॅ.जिना दुखावले व काँग्रेसपासून दूर गेले. येथूनच त्यांनी धर्माचा मोठ्या कुशलतेने वापर केला. १९४० च्या लीगच्या अधिवेशनात 'द्विराष्ट्रवादाचा' विचार मांडून पाकिस्तानचा पाया घातला. पाकिस्तानसाठी जिनांच्या

नेतृत्वाखाली भारतीय मुसलमान मोठ्या प्रमाणात उभे राहिले. ब्रिटिशांची नितीही त्यास कारणीभूत ठरली व शेवटी पाकिस्तानचा उदय झाला.

१९४७ च्या लाहोर अधिवेशनात जिनांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम लीगने पाकिस्तानचा ठराव संमत केला. स्वतंत्र इस्लामी राष्ट्राची मागणी त्यांनी उघडपणे मांडण्यास सुरुवात केली. त्यासाठी कोणत्याही मार्गाने जाण्याची तयारी दर्शवली. हिंदू व मुस्लिम ही दोन वेगळी राष्ट्रे आहेत. या द्विराष्ट्रवादाचे जोरदार समर्थन करण्याचा प्रयत्न जिनांनी केला. हिंदू व मुसलमानात तीव्र मतभेद आहेत आणि ते कधीही नष्ट होणारे नाहीत हे भेद फारच खोलवर रुजलेले आहेत. त्यांचे स्वरुप धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय स्वरुपाचे आहे. हे मतभेद कधीही नष्ट होणार नाहीत. ब्रिटिशांना जर या उपखंडात खरोखर स्थैर्य नांदावे असे वाटत असेल तर त्यांनी सरळसरळ भारताची फाळणी करावी व मुसलमानांचे स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्यास मदत करावी. अशी राष्ट्रे परस्परांशी नंतरच प्रेमाने वागू लागतील व या भागातील प्रश्न खऱ्या अर्थाने सुटतील. जिनांच्या मते, हिंदू व मुस्लिम या दोन्ही परस्परविरोधी समाजव्यवस्था आहेत. या दोन्हीचे एक राष्ट्र असूच शकत नाही. एक राष्ट्र राहिल्यास त्यातून अनेक समस्या निर्माण होतील. हिंदू व मुस्लिमांचा धर्म, सामाजिक रुढी, तत्वज्ञान, संस्कृती या सर्वच बाबतीत भिन्नता आहे. त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार नाही, जे सर्वस्वी भिन्न आहेत, अशांना एकाच राज्याखाली एकत्र आणणे धोक्याचे होईल. त्यासाठी स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती झाली पाहिजे. फाळणीच्या विचारांनी जिना एवढे झपाटले होते की त्यांनी पूर्वीच्या उदारमतवादी व लोकशाहीवादी आपल्याच तत्वांना तिलांजली दिली.

## ७.६ प्रत्यक्ष कृती दिन

क्रिप्स योजना अपयशी ठरताच गांधीजीनी १९४२ चले जाव आंदोलन सुरु केले. इंग्रजांनी काँग्रेसच्या सर्व नेत्यांना अटक केली. पण या आंदोलनाला मुस्लिम लीगने विरोध केला. लीगच्या मते, हिंदुस्थानातील मुसलमानांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लीगला बरोबर घेतल्याशिवाय ब्रिटीश हिंदुस्थान सोडू शकत नाहीत व राष्ट्रसभाही स्वराज्य मिळवू शकत नाही त्यामुळे राष्ट्रसभेने स्वतंत्र पाकिस्तानची मागणी मान्य करावी असे लीगने घोषित केले.

१९४४ मध्ये म.गांधींच्या संमतीने चक्रवर्ती राजगोपालाचारी यांनी लीगची स्वतंत्र राज्याची मागणी मान्य करणारी योजना जीनांपुढे मांडली. परंतु जीनानां या योजनेमध्ये भाग घेता येऊ नये या मागणीवर ते अडून बसल्याने राजाजी योजना अपयशी ठरली. त्याचप्रमाणे भुलाभाई देसाई-लियाकत अली योजना, आंबेडकर योजना जीनांनी फेटाळल्या. महायुध्द समाप्तीनंतर इंग्लंडमध्ये ॲटली पंतप्रधान बनले. त्यांच्या घोषणेनुसार हिंदुस्थानात निवडणुका झाल्या. यावेळी स्वतंत्र पाकिस्तानच्या मागणीवर निवडणुका लढविणाऱ्या लीगला केंद्रीय विधि मंडळातील सर्व ३७ जागा व प्रांतीय विधि मंडळात ४८२ पैकी ४२७ जागा जिंकता आल्या. काँग्रेसने आठ प्रांतात व लीगने दोन प्रांतात मंत्रीमंडळे बनविली. इंग्लंडहून आलेल्या कॅबिनेट मिशनने लीगच्या स्वतंत्र राष्ट्राच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्याने लीगने ही योजना फेटाळली. भारतातील हा राजकीय

पेचप्रसंग सोडविण्यासाठी इंग्रज सरकारने अनेक योजना मांडल्या. पण जीनांनी स्वतंत्र पाकिस्तान मिळेपर्यंत इतर कोणत्याही गोष्टी मान्य केल्या जाणार नाहीत असा आग्रह धरला.

## ७.७ पाकिस्तानची निर्मिती

इंग्रजांकडून व  कॉंग्रेसकडून स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राचे स्पष्ट आश्वासन मिळत नाही हे पाहून जीनांनी लीगमध्ये प्रत्यक्ष कृतीचा ठराव पास केला. आमच्या हाती पिस्तोल आहे व ते आम्ही वापरणार आहोत अशी दर्पोक्ती जीनांनी केली. जीनांच्या १६ ऑगस्ट १९४६ या दिवशी प्रत्यक्ष कृती करण्याच्या आवाहानाला प्रतिसाद देऊन मुस्लिमांनी प्रचंड दंगली सुरु केल्या. संपूर्ण देशात अभूतपूर्व रक्तपात घडुन आला. बहुसंख्यांक मुस्लिम प्रांतात ठरवून हिंदुच्या कत्तली झाल्या. बंगालचे मुख्यमंत्री सुऱ्हावर्दी यांनी मुस्लिम गुंडाना मोकाट सोडले. या दंगली ब्रिटीश सरकार लष्कराच्या मदतीने आटोक्यात आणू शकले असते पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. या दंगली थांबविण्यासाठी गांधीजींनी दंगलग्रस्त नौखाली भागाचा दौरा केला. ते तिथे जाताच दंगली थांबत पण पाठ वळताच पुन्हा दंगली सुरु होत. एका बाजूला या दंगली सुरु असतांना ब्रिटिश सरकारने हंगामी सरकार स्थापन करुन पंडित नेहरुंना पंतप्रधान केले. सुरुवातीला सरकारमध्ये सामील न झालेली लीग सरकारला मदत करण्यासाठी नव्हे तर त्यांची अडवणूक करण्यासाठी सरकारमध्ये सामील झाली. लीग व कॉंग्रेस संघर्ष वाढतच गेला. देशातील दंगलीही वाढत होत्या. व्हॉईसरॉय लॉर्ड माऊंटबॅटन यांनी मार्च १९४७ रोजी पदाचा कार्यभार स्विकारला. हिंदुस्थानात आल्यानंतर फाळणीशिवाय अन्य पर्याय आता उरलेलाच नाही हे त्यांना कळून आले. राष्ट्रसभेचे नेते नेहरु-पटेल यांनाही फाळणी अपरिहार्य वाटू लागली होती पण गांधीजींचा मात्र फाळणीला विरोध होता. अखेर राष्ट्रसभा व लीग यांच्या नेत्यांशी वाटाघाटी करुन दोन्ही बाजूंच्या नेत्यांना पसंत असणारी फाळणीची योजना जून १९४७ मध्ये प्रसिध्द झाली. १४ ऑगस्ट१९४७ रोजी पाकिस्तानची निर्मिती झाली व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले पण फाळणीमुळे भारताची अखंडता नष्ट होऊन मुस्लिम जातीयवादाचा मोठा विजय झाला.

### ७.७.१ आपली प्रगती तपासा :

१. पाकिस्तानच्या निर्मितीतील प्रमुख घटनांची यादी करा.

## ७.८ सारांश

अशाप्रकारे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान या दोन दोशांना स्वातंत्र्य मिळाले व दोन स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती झाली. स्वतंत्र भारताचे जवाहरलाल नेहरु हे पहिले पंतप्रधान झाले व त्यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळ यशस्वी केली. यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व काँग्रेसच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी चळवळ यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केली.भारतीय स्वातंत्र्य मिळ्यानंतर खऱ्या अर्थाने भारताच्या विकासासाठी प्रयत्न सुरु झाले. नवीन समस्या,नवीन जबाबदाऱ्या आ वासून उभ्या होत्या त्यामूळे काँग्रेस व राज्यातील सरकारांनी विकासाच्या योजना राबवायला सुरुवात केल्या. भारताच्या फाळणीने भारताचे कधीही न भरुन येणारे नुकसान झाले. भारतातील जमातवादामध्ये वाढ झाली. तसेच संस्थानाचे प्रश्न निर्माण झाले. हे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र भारतातील सरकार सज्ज झाले. त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळात या सर्व समस्या सकारात्मक पध्दतीने सोडविल्या व प्रभावशाली भारताची निर्मिती केली.

## ७.९ प्रश्न

१) पाकिस्तानच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२) पाकिस्तानच्या निर्मिती प्रक्रीयेवर चर्चा करा.

❖❖❖❖

# ८

# नेहरु युग-१
# (१९४७ - १९६४)-१
## भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये, संस्थानाचे विलिनीकरण व भाषावार प्रांतरचना

**प्रकरण रुपरेषा :**

८.० उद्दिष्टे
८.१ प्रस्तावना
८.२ भारतीय संविधान निर्मिती प्रक्रिया
८.३ भारतीय संविधानाचे महत्व
८.४ भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये
८.५ भारतीय संस्थानांचे विलिनिकरण
८.६ सरदार वल्लभभाई पटेल यांची संस्थानांचे विलिनीकरण विषयक कामगिरी
८.७ घटक राज्यांची पुर्नरचना
८.८ सारांश
८.९ प्रश्न

## ८.० उद्दिष्टे

१) भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये समजून घेणे.
२) भारतीय संस्थानाचे विलिनिकरण प्रक्रिया समजणे.
३) राज्यांच्या पुनर्रचना प्रक्रियेचा अभ्यास करणे.

## ८.१ प्रस्तावना

ब्रिटीशांनी भारताला एकसंघ स्वातंत्र्य न देता देशाची फाळणी करुन भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे निर्माण केली. १५ ऑगस्ट १९४७ला भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशासमोर काही आव्हाने होती. त्यामध्ये संविधानाची निर्मिती, संस्थानांचे विलिनीकरण, निर्वासितांचा प्रश्न इ. या आव्हानाला अत्यंत समर्थपणे तोंड देणे पंतप्रधान पं.

नेहरु यांनी आपल्या दूरदृष्टीचा विचार करुन संपूर्ण देशामध्ये ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना एका धाग्यात बांधता येईल अशी स्वतंत्र राज्यघटना तयार करण्याची जबाबदारी मसुदासमितीचे प्रमुख या नात्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविली.

तसेच निर्वासितांचे पुनर्वसन करण्यासाठी वेगवेगळ्या घटकराज्याच्या मदतीने मोठ्याप्रमाणावर पुनर्वसन केले त्याचप्रमाणे सरदार वल्लभभाई यांच्यावर संस्थानांच्या विलिनीकरण विषयीची जबाबदारी सोपविली. तसेच भाषावार प्रांतरचनेनुसार घटक राज्याची निर्मिती करुन मोठा पेच सोडविला. पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी आपल्या कल्पकतेने एक-एक प्रश्न सोडवून देशाला स्वावलंबी बनविण्यासाठी आपल्या कार्यकाळात जे प्रयत्न केले त्याची माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे.

## ८.२ भारतीय संविधान निर्मिती प्रक्रीया

आपल्या देशातील संविधानात्मक विकास पाहायचा झाल्यास तो मोर्लेमिंटो सुधारणा (१९०९), मॉंटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा (१९१९) आणि भारतीय स्वातंत्र्य कायदा, १९३५ असा झालेला आढळतो. इ.स.१९४६ च्या कॅबिनेट मिशनने भारतीय संविधान तयार करण्यासाठी घटना समितीच्या निर्मितीची शिफारस केली. त्यासाठी सभासद म्हणून प्रंतिक विधी मंडळांनी आपले निर्वाचित प्रतिनिधी पाठवावेत असे ठरले. त्यासाठी तीन प्रकारच्या मतदार संघांतून- अ) सामान्य ब) मुस्लिम आणि क) शीख - प्रतिनिधी संविधान सभेवर (घटना समिती) पाठविले गेले. त्याच बरोबर अल्पसंख्याक आणि वंचित वर्ग यांचे प्रतिनिधीसुद्धा पाठवले गेले. त्यामध्ये पारशी, भारतीय ख्रिश्चन, आँग्ल-भारतीय आदिम जमाती आणि स्त्री प्रतिनिधींचा समावेश होता. हे सर्व सदस्य प्रतिष्ठीत व समाजा प्रती आस्था बाळगणारे होते. घटना समितीवर एकूण ३८९ सदस्य निवडले गेले होते. त्यांपैकी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस २०८, मुस्लिम लिगचे ७३ आणि उर्वरित इतर वर्गांचे होते. त्यामध्ये सुद्धा संस्थानी राजांचे एकूण ९३ प्रतिनिधी तर २९६ हे उर्वरित ब्रिटीश भारतातील होते. मुस्लिम लीगने संविधान सभेवर आपले प्रतिनिधी पाठवण्यास नकार दिला.

घटना समितीचे प्रथम सत्र हंगामी अध्यक्ष सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली ९ डिसेंबर १९४६ रोजी चालू झाले. या सत्रामध्ये एकूण २०७ सदस्य हजर होते. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची 'घटना समितीचे' अध्यक्ष म्हणून अधिकृतपणे निवड करण्यात आली.

घटना समितीचे संविधनाचा मसुदा (आराखडा) तयार करण्याबाबतीत काही नियमावली स्थापित केली. त्यासाठी मसुदा समितीची निर्मिती केली गेली आणि १९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीच्या (Drafting Committee) अध्यक्षपदी सर्वानूमते नेमणूक करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक महान कायदेपंडित व घटना तज्ज्ञ होते. त्यांचा अनेक देशांच्या घटनांचा गाढा अभ्यास होता. म्हणून कॉंग्रेसला 'जळते

घर' म्हणणाऱ्या डॉ. बाबासाहेबांची केवळ त्यांच्या विद्वत्तेमुळेच नेमणूक केली गेली व देशाचे संविधान तयार करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.

२६ जानेवारी १९४७ रोजी भारतीय संविधनाचा मसुदा पूर्ण करण्यात आला आणि घटना सिमतीपुढे २१ फेब्रुवारीपासून जवळ-जवळ आठ महिने चर्चेसाठी व वैधानिक सूचनासाठी, दुरुस्तीसाठी ठेवण्यात आला. जनतेकडूनही त्यासाठी सूचना मागविण्यात आल्या. प्रत्येक कलम घटना समितीपुढे चर्चेसाठी खुले असे. या काळात बाबासाहेब आजारी असत. परंतु त्याची पर्वा न करता त्यांनी हे काम पूर्तीस नेले. संविधान निर्मितीसाठी एकूण २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस (९ डिसेंबर १९४६ ते २६ नोव्हेंबर १९४९) एवढा कालावधी लागला. २६ जानेवारी १९५० पासून हे संविधान भारतीय जनतेला अर्पण करण्यात येऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आली व भारत खऱ्या अर्थाने 'प्रजासत्ताक राष्ट्र' बनले.

### ८.२.१ मसुदा समितीचे सदस्य

| | | | |
|---|---|---|---|
| १) | डॉ.बी.आर. आंबेदकर | : | अध्यक्ष |
| २) | अल्लादी कृष्णस्वामी अय्यर | : | सदस्य |
| ३) | एन. गोपालस्वामी अय्यंगार | : | सदस्य |
| ४) | डॉ. के. एम. मुन्शी | : | सदस्य |
| ५) | सय्यद मोहम्मद सादुल्ला | : | सदस्य |
| ६) | बी.एल मित्तर (त्यांच्याजागी एन. माधवराव आले) | : | सदस्य |
| ७) | डी.पी. खेतान (त्यांच्या जागी टी.टी. कृष्णम्माचारी आले) | : | सदस्य |

### ८.२.२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटनेचे खरे शिल्पकार :

वरील सदस्याना सविंधान निर्मितीच्या प्रक्रीयेत आपले योगदान देता आले नाही. त्यामुळे संविधान तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिरा - खांद्यावर आली व ती त्यांनी समर्थपणे पेलून दाखवली. संविधानाच्या मसुद्यावर घटना समितीमध्ये चर्चा, वादविवाद चालू असताना त्यांच्या या कार्याची नोंद मोठया आदराने घेण्यात आली आहे व त्याचे दस्तऐवज आजसुध्दा एतिहासिकदृष्ट्या (Constituent Assembly Debates) म्हणून उपलब्ध आहेत.

मसुदा समितीचे (Drafting Committee) एक सदस्य टी.टी. कृष्णम्माचारी यांनी ५ नोव्हेंबर १९४८ रोजी घटना समितीपुढे निःसंशयपणे आपले मत मांडले व त्याची नोंद सदर दस्तऐवजामध्ये आहे. त्यांनी संविधाननिर्मितीचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देताना म्हटले आहे.

''अध्यक्ष महोदय....

या सभागृहात याची जाणीव असेल की, याच सभागृहाने मसुदा समितिवर ज्या सात सदस्यांची नियुक्ती केली होती त्यापैकी एकाने या सभागृहाचा राजीनामा दिला म्हणून त्यांच्या जागी दुसऱ्यांना नियुक्त करण्यात आले. एका सदस्याचा मृत्यू झाला आणि ती जागा रिकामीच राहीली. एक सदस्य दूर अमेरिकेत निघून गेले आणि त्यांचीही जागा भरली गेली नाही. दुसरे एक सदस्य राज्याच्या राजकारणात व्यस्त होते, गुंतलेले होते आणि त्याप्रमाणात पोकळी निर्माण झाली होती. एक किंवा दोन सदस्य दिल्लीपासून फार दूर होते आणि कदाचित प्रकृती अस्वास्थ्याच्या कारणास्वत त्यांनी बैठकीत भाग घेतलाच नाही. याचा अंतिम परिणाम असा झाला की, या संविधानाचा मसुदा तयार करण्याची संपूर्ण जबाबदारी डॉ. आंबेडकर यांच्यावर आली आणि त्यांनी हे महत्वपूर्ण कार्य नि:संशय, अत्यंत समर्थपणे पूर्ण केले यात तिळमात्र शंका नाही. याकरिता आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत. ''

त्यावेळी घटना संमितीच्या इतर सदस्यांनी सदर विधानाशी ससंगतपणे संविधान निर्मितीचे श्रेय डॉ. आंबेडकरांना दिलेले आहे. परंतु आजही काही कृतघ्न लोक दांभिकपणे संविधान निर्मितीचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाणूनबुजून देत नाहीत किंवा अनुल्लेखाने देण्याचे टाळतात. परंतु इतिहास त्याला साक्ष आहे.

## ८.३ भारतीय संविधानाचे महत्त्व

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरुंनी जबाबदारी स्विकारली. स्वतंत्र भारतासमोर अनेक समस्या आ वासून उभ्या होत्या. हिंदु-मुस्लिमांच्या दंगली, निर्वासितांचे लोंढे, दारिंद्रय, बेकारी निरक्षरता, आर्थिक आणि सामाजिक विषमता आणि संविधानाची निर्मिती इत्यादी समस्यांना नेहरुंनी अतिशय धीरोदत्तपणे तोंड दिले.

भारताचे संविधान म्हणजे भारताची राज्य घटना. संविधान हे शासनाच्या कांही सिध्दांतावर आधारित असते. प्रत्येक देशातील संविधानाचे एक आगळे महत्त्व असते. ते महत्त्व प्रस्तावनेत दर्शविलेले असते. संविधानाची प्रस्तावना उत्तम असून ती संविधानाची आधारशिला आहे. संविधानाद्वारे भारतीय लोकांच्या आशा आकांक्षा स्पष्ट झाल्या आहेत. प्रस्तावनेत माणसातील उच्च-कनिष्ट भेदभाव नष्ट करुन सर्वांना समान पातळीवर आणण्याचे उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आले. राज्य व्यवस्थेची रुपरेषा त्यामध्ये समाविष्ट करण्यात आली. त्यानुसार भारताला सर्वाभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष व प्रजासत्ताक गणराज्याचा दर्जा देण्यात आला. भांडवलशाही व साम्यवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्याचे ध्येय स्विकारले गेले. स्वातंत्र्याची व व्यक्तिमत्व विकासाची सर्वांना समान संधी मिळेल अशा अनेक गोष्टी प्रस्तावनेत नमूद करुन संविधनाचे ध्येय स्पष्ट केले गेले.

## ८.४ भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये

**१) सार्वभौम लोकसत्ताक गणराज्य :** भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत भारतीय सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे उदिष्ट स्पष्ट केलेले आहे. वरील शब्दांनी भारताच्या राज्याचे स्वरुप कळून येते. सार्वभौम या शब्दाने भारत हे स्वतंत्र आणि सार्वभौम असल्याचे नमूद केल्यामुळे भारतावर इतर कोणत्याही सत्तेचे नियंत्रण नाही हे सुचविले आहे. भारतीय जनता हीच अंतिम सत्ताधारी आहे. प्रजासत्ताक किंवा लोकसत्ताक या शब्दाने अंतिम सत्ता जनतेची आहे व शासन पध्दतीही लोकशाही स्वरुपाची असेल असे सांगितले आहे. गणराज्य हा शब्द महत्त्वाचा असून त्यामुळे देशाची सत्ता एका व्यक्तीच्या हातात वंशपरंपरेने जाणार नाही हे स्पष्ट केलेले आहे. गणराज्यात कार्यकारी प्रमुख जनतेकडून निवडला जातो व लोकशाही व्यवस्था असते.

**२) जगातील सर्वात विशाल व विस्तृत संविधान :**

भारताचे संविधान हे जगातील देशांच्या संविधानापेक्षा सर्वात विशाल व विस्तृत आहे. सुरुवातीला घटनेत २२ भाग, ३९५ कलमे व ८ परिशिष्टचे होती. नंतर त्यात ९ व्या परिशिष्टाचा समावेश केल्याने कलमांची संख्या ४०४ झाली आहे. जगातील इतर राष्ट्रांच्या घटनेशी तुलना करता अमेरिकेच्या घटनेत ९, ऑस्ट्रेलियांच्या घटनेत १२८, कॅनडाच्या घटनेत १४७ आणि दक्षिण आफ्रिकेच्या घटनेत १५३ कलमे आहेत. भारताने संघ राज्याचा स्वीकार केल्याने लिखित घटना बनवली गेली. या घटनेत केंद्र व राज्य सरकारचे स्वरुप, मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, न्यायपालीका, निर्वाचन आयोग या सर्व बाबींचा खुलासेवार तपशील दिलेला असल्याने घटनेचा आकार विस्तृत झाला आहे.

**३) मूलत:लिखित व निर्मित संविधान :** भारतीय संविधान हे मूलत:लिखित व निर्मित संविधान आहे. संविधानाची निर्मिती ही राष्ट्रीय आंदोलनातून निर्माण झालेल्या एका विशिष्ट परिस्थितीत व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विशिष्ट वेळी झालेली आहे. इंग्लंडचे संविधान हे अलिखित आहे. तरी देखील काही अलिखित परंपरा भारतात देखील रुढ होत चाललेल्या आहेत. उदाहरण द्यायचे झाले तर कोणतीही भारतीय व्यक्ती ही तीनवेळा भारताचा राष्ट्रपती होऊ शकत नाही.

**४) ताठर व लवचिकता यांचा समन्वय :** इंग्लंडचे संविधान हे अत्यंत लवचिक आहे तर अमेरिकेचे अतिशय ताठर आहे. भारताने या दोन्ही देशांच्या संविधानाचा समन्वय साधून व मध्यम मार्ग स्वीकारुन आपले स्वत:चे संविधान बनविले आहे. तसेच संविधानाच्या बाबतीत देखील लवचिकपणा आणलेला आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मते, "जरी आम्ही या संविधानाला ठोस व स्थायी संविधानाचे रूप देऊ इच्छितो, तरी संविधानात घटना-दुरुस्ती ची व्यवस्था करण्यात येईल. साधारण मुद्यांवर संसदेच्या साध्या बहुमताने घटना दुरुस्ती करण्यात येईल.काही मुद्यांच्या बाबतीत लोकसभा व राज्यसभा यातील एकूण सभासदाच्या बहुमताने व उपस्थित सभासदांच्या बहुमताने दुरुस्ती करता येईल. महत्त्वाच्या मुद्यांच्या दुरुस्तीसाठी मात्र वरील पध्दतीने बहुमत मिळाल्यानंतरही भारतील निम्म्या राज्यांची संमती मात्र अनिवार्य आहे .

**५) जनतेच्या प्रतिनिधींनी बनवलेले संविधान :** भारताचे संविधान इंग्रजांनी बनविलले नाही. तर संविधान हे जनतेच्या प्रतिनिधींनी एक घटना समिती नेमून बनविलेले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक मसुदा समिती नेमण्यात आली होती. त्यांनी हे सर्व समावेशक संविधान तयार करुन संविधानाचे अंतिम अधिकार भारतीय जनतेलाच दिलेले आहेत.

**६) स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांचा समन्वय :** अयोग्य निर्बंधांचा अभाव आणि विकासाची योग्य व समान संधी या दोन गोष्टींनी युक्त असलेले स्वातंत्र्य निर्माण करणे हे घटनेचे उद्दिष्ट आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सर्वांना समान न्याय, दर्जा, संधी मिळावी व बंधुभाव वाढावा यासाठी घटनेत प्रयत्न केले आहेत. समता म्हणजे मानवनिर्मित विषमता व भेदभाव नष्ट करुन सर्वांना संधी मिळण्याची तरतुद करणे होय. भारतात पूर्वीपासून जातीयवाद, धर्मवाद, प्रांतवाद निर्माण झाल्यामुळे राष्ट्रीय ऐक्य वाढू शकले नाही त्यासाठी घटनेत बंधुभावाचे तत्त्व स्वीकारले गेले. लोकशाहीत भेदभावांना स्थान नसते तसेच एकीची व बंधुभावाची जाणीव होण्याकरिता सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात समता निर्माण व्हावी लागते. राज्यघटनेने व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता टिकवणारी बंधुता निर्माण करण्याचे उद्दिष्ट मान्य केलेले आहे.

**७) एकात्मता व संघात्मक राज्यव्यवस्था :** भारतीय संविधानाने भारतात संघराज्यात्मक व्यवस्था सुरु केली आहे. संघात्मक राज्यपध्दतीत तीन आवश्यक लक्षणे असतात. पहिले म्हणजे लिखित संविधान, दुसरे राज्यांमध्ये अधिकारांचे विभाजन व तिसरे लक्षण म्हणजे स्वतंत्र न्यायपालिका. ही तिन्ही लक्षणे भारतीय संविधानात आहेत. त्यामुळे भारतात संघात्मक शासन असूनही केंद्र सरकारला सामर्थ्यसंपन्न बनविण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय संविधानात अशी काही तत्त्वे आढळतात की त्यामुळे ते एकात्मक राज्यव्यवस्थेकडे झुकतांना दिसते. उदाहरणार्थ, एकेरी नागरिकता, एकेरी कार्यपालिका, संसदेद्वारे राज्यांची नावे, प्रदेश व सीमा यात बदल करणे इ.वरील गोष्टींवरुन भारतीय राज्यव्यवस्था ही संघात्मक असूनही एकात्मकतेकडे झुकलेली आहे. असे म्हटले जाऊ शकते. डॉ.दुर्गादास बसू यांच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास, "भारतीय संविधान हे संघात्मकही नाही व एकात्मकही नाही, ते दोन्हींचे मिश्रण आहे. हा नवीन प्रकारचा संघ आहे .

**८) स्वतंत्र न्यायपालिका :** केंद्र व प्रांत यांच्यातील परस्पर तंट्यांचा निवाडा करण्यासाठी न्यायपालिका या स्वतंत्र व निःपक्ष असणे अत्यंत आवश्यक असते. म्हणून भारतीय संविधानाने न्यायपालिकेला तसा स्वतंत्र दर्जा दिलेला आहे. तसेच मौलिक अधिकाराच्या सुरक्षेची जबाबदारी सोपविली आहे. न्यायपालिकेच्या स्वातंत्र्यासाठी त्याच्या योग्यता, नियुक्तीची पध्दत व वेतन यासंबंधी सारे काही संविधानात निश्चित केले आहे. सरकारने किंवा संसदेने पगार कमी करण्याची धमकी देऊन न्यायपालिकेवर अनुचित दबाव टाकू नये म्हणून ही व्यवस्था करण्यात आली आहे. न्यायपालिकेचा सर्वात मोठा अधिकार अमेरिकेप्रमाणे न्यायिक पुनर्विलोकनाचा आहे. संविधानाच्या विरोधात जर संसदेने एखादा कायदा केला तर तो रद्द करण्याचा अधिकार

न्यायपालिकेला आहे. म्हणून स्वतंत्र न्यायपालिका हे भारतीय संविधानाचे एक महत्त्पूर्ण वैशिष्टये आहे. कार्यकारी मंडळाला न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचा अधिकार नाही. बडतर्फ करण्यासाठी अन्य व्यवस्था करण्यात आली आहे. संविधानाद्वारे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे. यात एक सर न्यायाधीश व सातपेक्षा जास्त न्यायाधीश असतात. प्रत्येक राज्यात एका उच्च न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली. त्यांचे या सर्व न्यायालयांवर पूर्ण नियंत्रण असते. अपवाद फक्त सैनिक न्यायालय आहे.

९) **एकेरी नागरिकत्व :** विश्वातील अन्य काही संघराज्यात दुहेरी नागरिकता आहे. उदा. अमेरिका, स्वित्झरलंड येथे केंद्र व प्रांत अशी दुहेरी नागरिकत्वाची स्थिती आहे. परंतु भारताने संघराज्याचे व घटक राज्याचे असे दुहेरी नागरिकत्वाचे तत्व मान्य केलेले नाही. भारताचा इतिहास व फुटीरपणाची वृत्ती लक्षात घेऊन एकेरी नागरिकत्वाची तरतुद केली असावी. भारतीय घटनेच्या कलम ९ प्रमाणे एखाद्या भारतीयाने परकीय राष्ट्राचे नागरिकत्व खुषीने स्विकारले असेल तर त्याचे भारतीय नागरिकत्व नष्ट होते. असे असले तरी भारतीय व्यक्ती राष्ट्रकुलातील कोणत्याही राज्याचे नागरिकत्व स्वीकारु शकते. त्यामुळे त्याचे भारतीय नागरिकत्व नष्ट होत नाही. ही तरतूद फक्त राष्ट्रकुलापुरतीच मर्यादित आहे.

१०) **प्रौढ मताधिकार :** भारताने लोकसत्ताक राज्यपध्दतीचा स्वीकार केलेला असल्यामुळे भारताच्या प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारात भाग घेण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. हे लक्षात घेऊन घटनेने प्रत्येक प्रौढ स्त्री-पुरुषाला मतदानाचा हक्क दिला. २१ वर्षे पुर्ण झालेल्या प्रत्येक स्त्री-पुरुष नागरिकाला मतदानाचा हक्क मान्य करण्यात आली ही वयोमर्यादा पुढील काळात १८ वर्षे करण्यात आली. हा हक्क देतांना स्त्री-पुरुष असा भेदभाव केला नाही. तसेच संपत्ती, करदान क्षमता किंवा शिक्षण या अटींची मर्यादाही घातली नाही.

११) **धर्मनिरपेक्षता :** धर्मनिरपेक्षता याचा अर्थ देशाला सर्व धर्म समान आहेत. देशातील वेगवेगळया धर्मांच्या लोकांबद्दल भेदभाव करण्यात येणार नाही राज्याचा आपला असा कोणताच धर्म नाही. प्रत्येक नागरिकाला आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचा हक्क आहे. धर्मनिरपेक्ष राज्य स्थापन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे सर्व नागरिकांची राजकीय, सामाजिक व आर्थिक उन्नती ही आहे.

१२) **संसदीय शासनपध्दती :** भारताच्या राज्यघटनेने संसदीय शासनपध्दतीचा स्वीकार केल्याचे दिसून येते. ही संसदीय पध्दती इंग्लंडच्या धर्तीवर निर्माण करण्यात आली. भारतामध्ये राष्ट्रपती हे सनदशीर प्रमुख असून खरी सत्ता मंत्रीमंडळाच्या हाती असल्यामुळे तसेच मंत्रीमंडळाने संयुक्त जबाबदारीचे तत्त्व मान्य केलेले असल्यामुळे व पंतप्रधानांचे एकमुखी नेतृत्व व लोकसभेचे मुदतपूर्व विसर्जन प्रत्यक्षात दिसून येते. इंग्लंडच्या संसदीय पध्दतीची सर्वच वैशिष्टये भारताच्या पद्धतीत दिसून येत नाहीत. उदा. राष्ट्रपतींना आणीबाणीच्या काळात जास्त अधिकार प्राप्त होतात तसेच भारतामध्ये सर्वोच्य न्यायालयाला कायदे घटनाबाह्य ठरविण्याचा

अधिकार देण्यात आला आहे. अमेरिकेच्या अध्यक्षीय पद्धतीची काही वैशिष्टये यात दिसून येतात.

**१३) घटक राज्यांचा दर्जा :** भारतातील घटक राज्यांचा दर्जा, आकारमान, प्रतिनिधीत्व यात समानता नाही. जम्मू व काश्मीर राज्यांना वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. भारताच्या घटक राज्यांना लोकसभेवर दिलेले प्रतिनिधीत्व समान नाही. लोकसंख्येच्या प्रमाणात हे प्रतिनिधी निवडले जातात. राज्यसभेतील प्रतिनिधी हे घटक राज्यातून आलेले असतात व ते आपल्या राज्याचे प्रतिनिधीत्व करतात. घटक राज्यांना राज्यसभेवर असमान प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. प्रत्येक राज्याला ५० लाख लोकसंख्येपर्यंत प्रत्येक १० लाखाला एक प्रतिनिधी आणि ५० लाखापेक्षा जास्त असल्यास त्यानंतरच्या प्रत्येक २० लाखाला एक प्रतिनिधी असे प्रमाण ठरविण्यात आले.

**१४) मुलभूत अधिकार :** भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या मुलभुत अधिकारांवर विशेष भर देण्यात आला आहे. शासनाकडून व्यक्ती व्यक्तीत भेदभाव होऊ नये व सामाजिक असमानता दूर व्हावी यासाठी समतेचा अधिकार देण्यात आला. धर्म,वंश,जात, लिंग, जन्मस्थान यावर आधारलेला भेद घटनाबाह्य मानण्यात आला. सरकारी नोकरीत कोणाही नागरिकाला धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यावरुन अपात्र ठरविले जाणार नाही. कायद्यासमोर सर्व समान असतील व अस्पृश्यता पाळणे हा फौजदारी गुन्हा ठरविला गेला.

घटनेने नागरिकांना समतेप्रमाणे स्वातंत्र्याचाही अधिकार दिला आहे. व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासासाठी भाषण स्वातंत्र्य, सभास्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य, देशात कोठेही निवास करण्याचे स्वातंत्र्य घटनेने दिले आहे पण या स्वातंत्र्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी काही निर्बंध घातले आहेत. शोषणविरहीत समाज निर्माण होण्यासाठी घटनेने पिळवणुकी विरुद्ध अधिकार दिले आहेत. प्रत्येक नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले. सर्वांना शिक्षण घेण्याचा, आपली संस्कृती पाळण्याचा, मालमत्ता रक्षणाचा असे अनेक अधिकार घटनेने जनतेला दिले. या सर्व मुलभूत हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार नागरिकांना बहाल करण्यात आला.

**१५) मार्गदर्शक तत्वे :** देशाचे शासन जास्तीत जास्त कल्याणकारी स्वरुपाचे असावे या हेतूने काही मार्गदर्शक तत्वे घटनेत नमूद करण्यात आली आहेत. ही तत्वे निश्चित करतांना आयर्लंडची घटना प्रामुख्याने घटनाकारांसमोर होती. मुलभूत अधिकारांना जसा कायद्याचा पाठिंबा आहे तसा तो मार्गदर्शक तत्वांना नाही. परंतू शासकीय कामकाज चालवितांना मार्गदर्शक तत्वांना नाही. परंतु शासकीय कामकाज चालविताना मार्गदर्शक तत्वे साकार करण्याचा प्रयत्न व्हावा अशी अपेक्षा आहे. या तत्वांच्या पाठीशी जनमताची शक्ती असल्याने कोणत्याही पक्षाचे सरकार सत्तेवर असले तरी त्याला मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणे सहजासहजी शक्य होत नाही. या मार्गदर्शक तत्वांमध्ये अप्रत्यक्षरित्या लोककल्याणकारी राज्याची जबाबदारी भारताने स्वीकारली आहे हे स्पष्ट केलेले आहे.

**१६) मागास जाती-जमाती व वन्य जमातींना संरक्षण :** भारताच्या घटनेने विशिष्ट वर्गासाठी व विशिष्ट मुदतीकरिता खास तरतुदी केलेल्या आहेत. समता व न्याय प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने आणि मागासलेल्या जाती-जमाती ह्यांची सुधारणा घडवून आणून इतरांच्या बरोबरीने त्यांना स्थान मिळवून देण्याच्या हेतूनेच तात्पुरत्या काळासाठी या तरतुदी केल्या. अँग्लो इंडियन या अल्पसंख्यांक समाजाला ब्रिटिश काळात विशेष सवलती होत्या. त्या एकदम काढून न घेता त्यांच्या दोन प्रतिनिधींची लोकसभेवर नियुक्ती व नोकऱ्यांत राखीव जागा देण्यात आल्या. अनुसूचीत जाती व जमातींना खास प्रतिनिधीत्व, नौकरीत सवलती, कल्याणकारी योजना देण्यात आल्या. भारतातील विशिष्ट परिस्थितीमुळे या खास तरतुदी केल्या गेल्या.

जो दलित वर्ग व अल्पसंख्यांक वर्ग आपली प्रगती करु शकत नाही त्यांना संरक्षण देऊन त्यांच्या विकासासाठी नोकरी, शिक्षण, लोकसभा-विधानसभेत व अन्य कांही क्षेत्रात संरक्षण देण्यात आले आहे. त्याचबरोबर दलितवर्गांना व अल्पसंख्याकांना आपली भाषा, लिपी व संस्कृती ही कायम ठेवण्यासाठी आपल्या इच्छेप्रमाणे शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व अन्य प्रकारचा अधिकार देण्यात आला आहे.

**१७) आणीबाणीत एकात्म राज्यात रुपांतर :** भारताच्या संघराज्यात केंद्र सरकारला जास्त अधिकार देण्यात आलेले असून केंद्र सरकारचे वर्चस्व मान्य करण्यात आले आहे. एकात्म राज्याचे विकेंद्रीकरण करुन संघराज्य निर्माण केले असल्यास केंद्रसत्ता जास्त बळकट करुन केंद्राचे घटक राज्यांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याची आवश्यकता भासत असते. भारताच्या राज्य घटनेनुसार शांततेच्या काळात संघराज्य असलेल्या भारताचे आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली तर त्या राज्यात राष्ट्रपतीचा अंमल सुरु करण्याची तरतुद घटनेने केलेली आहे.

वरील वैशिष्टयांनुसार भारतीय राज्यघटनेचा विचार केला असता असे आढळून येते की, भारताची परंपरा आणि परिस्थिती लक्षात घेऊन राज्यघटना आदर्श व्हावी असा प्रयत्न भारताची राज्यघटना तयार करणाऱ्यांनी केलेला आहे. शक्य तर आदर्श घटनेचे गुणविशेष आपल्या राज्यघटनेत यावेत हे लक्षात ठेवून घटनेची निर्मिती केलेली आहे. मुलभूत हक्क, न्यायालयाचे स्वातंत्र्य, अल्पसंख्यांकांना संरक्षण, समता, न्याय यांची हमी, लवचिकपणा, प्रौढ मतदान इ. अनेक वैशिष्टये काही दोषही आहेत. परंतु ते सावधगिरी बाळगल्यामुळे प्रगती होण्यास अडथळे येणार नाहीत झाली तर मदतच होईल असे मत घटनापरिषदेत व्यक्त केलेले आढळून येते. डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी स्पष्ट केले की, “एकंदरीने पाहता, आपल्या राष्ट्राच्या चांगल्या रितीने उपयोगी पडेल अशी ही घटना तयार करण्यात आली आहे.” डॉ. आंबेडकर यांच्या मते, “घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी ती अंमलात आणणारे जर नालायक व निरुपयोगी असतील तर ती घटना वाईट ठरेल त्याचप्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल.”

**८.४.१ आपली प्रगती तपासा :**

१. भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये सांगा.

## ८.५ भारतीय संस्थानांचे विलीनीकरण

शेकडो वर्षापासून आपला देश अनेक राज्यांत विभागला होता. प्राचीन व मध्ययुगीन काळात काही मोठी साम्राज्ये निर्माण झाली हे बरोबर आहे. पण ज्याला आपण राष्ट्र म्हणतो असे हिंदी अथवा भारतीय राष्ट्र निर्माण होऊ शकले नव्हते. अनेक राज्ये, अनेक जाती, पंथ, धर्म अशा वैविध्याने परिपूर्ण असणाऱ्या या देशात कधी काळी राष्ट्र निर्माण होईल असे वाटत नव्हते. इंग्रजांच्या आगमनाबरोबर पाश्चात्य लोकशाही, मानवी हक्क, राष्ट्रवाद, स्वातंत्र्य, समता, उदारमतवाद या संकल्पना हिंदुस्थानात रुजू लागल्या व त्यातूनच हिंदी सुशिक्षितांच्या मनात एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली.

इ.स. १८८५ रोजी राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊन हिंदी जनतेच्या स्वातंत्र्याची चळवळ आकार घेऊ लागली. ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालील प्रदेशातील जनतेने जोमाने चालविलेली ही चळवळ होती. ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालील प्रदेश 'ब्रिटिश हिंदुस्थान' या नावाने ओळखला जात होता. हिंदुस्थानचा दुसरा भाग हा 'हिंदी हिंदुस्थान' (संस्थानांचा हिंदुस्थान) या नावाने ओळखला जात होता. इ.स. १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा या संस्थांनी प्रदेशात काही ठिकाणी स्वातंत्र्यवादी चळवळ नुकतीच सुरु झाली होती, काही ठिकाणी तिचे वारेही शिरले नव्हते.

आपल्या देशात एकाच वेळी दोन हिंदुस्थान नांदत होते. ब्रिटिशांच्या ताब्यात असणारा हिंदुस्थान व संस्थानिकांच्या ताब्यात असणारा दुसरा हिंदुस्थान असे त्याचे स्वरुप होते. संस्थानांची संख्या जवळ जवळ ५६३ होती. म्हणजे अक्षरशः शेकडोंच्या संख्येने होती. काही मोठी, तर काही अगदीच छोटी होती. काही संस्थांनानी आपल्या प्रजेस मर्यादित का होईना पण लोकशाहीचे हक्क बहाल केले होते. काही संस्थानिक आपल्या प्रजेस गुलामांप्रमाणे वागवित होते. बडोद्यासारख्या संस्थानात आर्वाचिन सुधारणा घडून आल्या होत्या तर जुनागड सारख्या संस्थानाचे अधिपती कुत्रा-कुत्रींचे लग्नसमारंभ थाटामाटाने घडवून आणण्यात धन्यता मानत होते.

हिंदुस्थान जिंकून घेण्यासाठी ब्रिटिशांनी १७५७ च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटिश सत्तेचा पाया घातला व पुढील १०० वर्षात इंग्रजांनी साम, दाम, दंड, भेद नीतीचा अवलंब करुन

या देशातील अनेक राज्ये जिंकून घेतली. वॉरन हेस्टिंग्ज, कॉर्नवालीस, लॉर्ड वेलस्ली, लॉर्ड डलहौसी यांनी आक्रमक साम्राज्यवादाचा पुरस्कार करुन संस्थानिकांचे स्वातंत्र्य नष्ट करण्यास सुरुवात केली. गव्हर्नर. जनरल लॉर्ड डलहौसीने १८४८-१८५६ या काळात कोणत्या तरी कारणांनी अनेक संस्थाने बरखास्त करुन ब्रिटिश साम्राज्यात विलीन करुन टाकली. पण त्यांच्या साम्राज्यवादी वरवंट्याखालून जी काही संस्थाने वाचली त्यांना १८५७ च्या उठावाने व त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या १८५७ च्या राणीच्या जाहीरनाम्याने जीवदान मिळाले. येथून पुढे काही तरी कुरापती काढून इंग्रज सरकार हिंदी संस्थाने खालसा करणार नव्हते, ही गोष्ट संस्थानिकांना दिलासा देणारी होती. पण याचा अर्थ संस्थानिकांना मन मानेल तसा राज्यकारभार करण्याचे, आणि परराष्ट्रीय धोरण ठरविण्याचे अथवा इंग्रजांची हिंदुस्थानातील साम्राज्य सत्ताच अमान्य करण्याचे हक्क नव्हते.कराराचा भंग अथवा गैरकारभार या सबबीखाली हिंदुस्थानातील इंग्रज सरकार कोणत्याही संस्थानाच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करु शकत होते. तसेच संस्थानाच्या कारभारावर सर्वसाधारण देखरेख करु शकत होते. ब्रिटिशांच्या या अधिकारास साम्राज्यसत्तेची अधिसत्ता असे म्हटले जात असे.

### ८.५.१ संस्थानांच्या समस्या :

दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे हिंदुस्थानचे स्वातंत्र्य दृष्टीपथात आले. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याच्या दृष्टीने अधिक गतीने हालचाली होऊ लागल्या. आंतरराष्ट्रीय जनमत व दबावामुळे इंग्रज हिंदुस्थान सोडून जाणार हे निश्चित झाले होते. पण त्यांच्यासमोर दोन मोठया समस्या होत्या त्यापैकी एक म्हणजे मुस्लिम लीगची पाकिस्तानची मागणी आणि दुसरी म्हणजे हिंदी संस्थानांचा प्रश्न. ब्रिटिशांनी 'फोडा आणि झोडा' या नीतीचा अवलंब करुन बॅरीस्टर जीना व संस्थानिकांचा सतत अनुनय केल्याने भारताची फाळणी करुन पाकिस्तानची निर्मिती केली होती व आता १५ ऑगस्ट १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्य कायद्यानुसार भारताचे असंख्य तुकडे पाडण्याचा डाव रचला. या कायद्यानुसार संस्थानांसमोर तीन पर्याय ठेवण्यात आले. स्वहित लक्षात घेऊन संस्थानांनी भारतात किंवा पाकिस्तानात सामील व्हावे किंवा संस्थानांनी आपले वेगळे स्वतंत्र सार्वभौम राज्य निर्माण करावे. खरोखरच संस्थाने जर स्वतंत्र राहिली तर भारताच्या अखंडतेवर मोठा प्रहार झाला असता. इंग्रज सरकारनेही आपली हिंदुस्थानवरील साम्राज्यसत्ता व अधिसत्ता बरखास्त करीत असताना फारच कायदेशीर व घटनात्मक भूमिका घेतली होती. इंग्रज हा देश सोडून जातील तेव्हा त्यांच्या ताब्यातील ब्रिटिश भारत हा स्वतंत्र होणारच पण त्याचबरोबर ज्यांच्यावर त्यांची अधीसत्ता होती अशी शेकडो हिंदी संस्थाने देखील स्वतंत्र होणार. अशाप्रकारे दैन्यास व हीनावस्थेस पारावार राहिला नसता. स्वातंत्र्य मिळूनही ते मातीमोल झाले असते. आपापसांत झगडून पुन्हा पारतंत्र्य ओढवून घेतले असते. परिस्थितीने निर्माण केलेले राष्ट्रीय नेत्यांसमोर हे मोठे बिकट आव्हान होते. २० फेब्रुवारी १९४७ रोजी मि. ॲटली यांनी आपल्या घोषणेत हिंदी संस्थानिकांनी आपल्या मागून सत्तेवर येणाऱ्या नव्या सरकारशी आपले संबंध जुळवून घेण्याचा सल्ला दिला होता. या आव्हानावर संस्थाने कशी मात करतात याकडे सर्व जगाचे लक्ष लागून राहिले होते. भोपाळचे नबाब व सर कॉरफिल्ड ह्यांनी संस्थानिकांना फूस लावली होती.

ब्रिटिश निघून जाताच आपण स्वतंत्र, सार्वभौम सत्ताधीश होणार या कल्पनेचा अनेक संस्थानिकांना मोठा आनंद झाला. १९२१ रोजी इंग्रज सरकारच्या पुढाकाराने संस्थानिकांचे एक 'नरेंद्र मंडळ' निर्माण केले होते. व्हॉईसरॉय हा या मंडळाचा अध्यक्ष होता. त्याने विचारलेल्या प्रश्नावर त्यास सल्लामसलत देणे, हे या मंडळाचे काम असे, संस्थानिकांपैकीच एकाची नरेंद्र मंडळाचा चॅन्सलर म्हणून नियुक्ती केली गेली. भोपाळचे नबाब हे चॅन्सलर होते. नबाब हे मुस्लिम लीगचे सहानुभूतीदार व काँग्रेसचे पक्के विरोधक होते. संस्थानांनी आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवावे, ही सुवर्ण संधी वाया घालवू नये, या मताचे ते होते. एवढेच नव्हे तर इंग्रज सरकारने संस्थानिकांना सहकार्य करावे असेही त्यांना वाटत होते.

संस्थानिक आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवू शकणार नाहीत याची जाणीव इंग्रजांना होती म्हणून संस्थानांनी आपले संबंध नव्या सरकारशी जुळवून घ्यावेत असा सल्ला दिल्याने नबाबसाहेबांची निराशा झाली. इंग्रज प्रशासनातील प्रमुख मुलकी अधिकारी सर कॉन्रॅड कॉरफिल्ड नबाबसाहेबांच्या मदतीला धावून आले, हिंदुस्थानातून इंग्रजांची सत्ता जाता कामा नये, आणि आता अगदी नाईलाजच झाला आहे, तर जातांना हिंदुस्थानचे जेवढे म्हणून नुकसान करता येईल तेवढे करावे अशा वृत्तीचे सर कॉरफिल्ड होते व त्यांनी तिसरी सत्ता उदयास येऊन नव्या सरकारलाही ती दबावाखाली ठेवू शकेल, असा विचार नबाबसाहेबांच्या डोक्यात भरून दिला आणि त्यादृष्टीने डावपेच चालू झाले होते. काँग्रेसच्या नव्या सरकारने संस्थानांना आपले प्रतिनिधी दिल्लीस घटना समितीत भाग घेण्यासाठी पाठवावेत व लोकशाही व राष्ट्रवाद यांच्या पायावर नवा भारत घडवावा असे आवाहन केले होते. पण या आवाहनास प्रतिसाद न देता 'थांबा आणि पहा' असे धोरण संस्थानिकांनी स्वीकारावे असा फतवा नबाबसाहेबांनी काढला. संघराज्याच्या एकात्मतेवर घाव घालण्याचा कुटील डाव नबाबसाहेब खेळत होते. पंडित नेहरुंच्या नेतृत्वाखालील सरकारपुढे हा मोठा पेचप्रसंग होता.

### ८.५.२ काही संस्थानिकांची राष्ट्रनिष्ठेची व देशभक्तीची भूमिका :

नबाबसाहेबांचे कूटील डावपेच यशस्वी होण्याच्या मार्गावर असतांना बिकानेर व पतियाला या संस्थानांच्या संस्थानिकांनी अत्यंत राष्ट्रवादी भूमिका घेतली. इंग्रजी सत्ता निघून गेल्यावर तिची जागा घेणाऱ्या नव्या सरकारला सहकार्य करणे, घटना परिषदेच्या कामकाजात सहभागी होणे हे संस्थानातील व देशातील एकूण जनतेच्या हिताचे असल्याचे जाहीर करुन नबाबसाहेबांच्या भूमिकेचा स्पष्ट शब्दांत निषेध केला. आपले प्रतिनिधी दिल्लीस घटनासमितीत सहभागी होण्यासाठी पाठवूनही दिले. याचा परिणाम २८ एप्रिल १९४७ पर्यंत बिकानेर, पतियाला, कोचीन, बडोदा, उदयपूर, जयपूर, जोधपूर व रेवा या मोठ्या संस्थानांचे प्रतिनिधी घटना समितीत दाखल झाले. नबाबसाहेबांचा डाव उधळला गेला. लवकरच देशातील अनेक संस्थानिकांनी आपले प्रतिनिधी दिल्लीस पाठवून राष्ट्रनिष्ठेचे दर्शन घडविले.

हिंदुस्थानच्या राजकारणात फूटीरवादाला चालना देऊन संस्थानिकांची एक नवी शक्ती निर्माण करण्याचा डाव विफल होताच नबाबसाहेबांनी चॅन्सलरपदाचा राजीनामा दिला आणि इंग्रज निघून जाताच आपण आपले राज्य स्वतंत्र झाल्याचे घोषित करणार असे जाहीर केले. त्यानंतर

लवकरच ११ जून १९४७ रोजी त्रावणकोरचे दिवाण सर सी.पी. रामस्वामी अय्यर यांनी जाहीर केले की, आपलेही संस्थान अशाच प्रकारचे स्वातंत्र्य घोषित करेल. दुसऱ्या दिवशी हैद्राबादच्या निजामानेही अशीच घोषणा केली. या मोठ्या संस्थानांच्या पावलावर पाऊल टाकण्यास अनेक लहान मोठी संस्थाने तयार झाली. तसेच इंग्रज सरकारचे रेल्वे, पोष्ट कस्टम इ. संदर्भात संस्थानिकांशी जे संबंध होते ते रद्द करुन टाकण्याच्या उद्योगास कॉरफिल्ड लागले. शिवाय संस्थानांना आतून चिथावणी देणे चालूच होते. इंग्रज सरकारच्या ज्या लष्करी छावण्या ठिकठिकाणी होत्या त्या संस्थानिकांकडे देण्याचा डावही त्यांनी टाकला. असे घडले असते तर हिंदुस्थानात अंतर्गत लष्करी यादवी सुरु झाली असती, देश संकटात सापडला असता. सुदैवाने पंडित नेहरुनी ही बाब गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंट बॅटन यांच्या निदर्शनास या धोकादायक गोष्टी आणल्या आणि कॉरफिल्डचा हाही डाव उधळला गेला. पण जाताना आपल्या ताब्यात असणारी अनेक महत्त्वाची कागदपत्रे जाळून ती नष्ट करण्यात कॉरफिल्ड यशस्वी झाले.

## ८.५ सरदार वल्लभभाई पटेल यांची संस्थानाचे विलिनीकरण विषयक कामगिरी

भारताच्या सुदैवाने  अशा खडतर कठीण प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या सारख्या दूरदर्शी, मुत्सदी व्यक्तीचे खंबीर नेतृत्व देशाला मिळाले. पंडित नेहरुंच्या मंत्रीमंडळात सरदार पटेलांची गृहमंत्री म्हणून नेमणूक झाली. त्यांच्याच काळांत नव्यानेच संस्थान खाते तयार केले गेले व त्याचे प्रमुखपद पटेलांनी आपल्याकडे घेऊन श्री. व्ही.पी. मेनन यांची सचिवपदी नियुक्ती केली. सरदार पटेल श्री. व्ही.पी. मेनन व लॉर्ड माऊंट बॅटन या तीन मुत्सद्यांना व संस्थानिकांपैकी बिकानेर व पातियाळा यांच्या नरेशांना संस्थानांच्या विलीनीकरणाचे मोठे श्रेय जाते. अनेक संस्थानिकांजवळ स्वतःच्या इतमामासाठी ठेवलेल्या फौजा होत्या. तेव्हां त्यांना शहाणपण सुचले नसते तर देशात फाळणीच्या रक्तपाताबरोबर हा दुसरा रक्तपात घडून आला असता. १९४७ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार संस्थानांना भारतात किंवा पाकिस्तानात सामील होण्याचे किंवा स्वतंत्र राहण्याचे स्वातंत्र्य मिळाले होते हे स्वतंत्र भारताच्या दृष्टीने धोक्याचे होते. भारतातील सर्व संस्थानांना एकत्र आणणे कठीण काम होते पण सरदार पटेलांनी हे आव्हान स्विकारले.

हैद्राबाद, भोपाळ व त्रावणकोर या तीन संस्थानांनी आपला स्वतंत्र होण्याचा मनोदय जाहीर करताच कॉंग्रेसने संस्थानांसंबंधीचे आपले धोरण जाहीर केले. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीने १५ जून १९४७ रोजी सर्व संस्थानांना उद्देशून ठराव पास केला की, घटना समितीच्या कार्यात संस्थानिकांनी सामील व्हावे. त्यांना इतर प्रांताप्रमाणे स्वायतत्ता दिली जाईल. त्याचप्रमाणे सत्तांतरानंतर स्वतंत्र होण्याचा कोणत्याही संस्थानाचा हक्क कॉंग्रेस मान्य करीत नाही. सरदार पटेल यांनी संस्थान खात्याचा कारभार हाती घेताच हिंदी संस्थानिकांना उद्देशून एक भावनात्मक अवाहन केले. संस्थानांना गोडीगुलाबीने भारतात सामील करण्याचे पाऊल उचलले. भारतीय संस्थानांना मान्य होईल असे प्रवेशपत्र तयार करण्यात आले. या पत्रावर सही करुन संस्थानांनी भारतात सामील व्हायचे होते. त्यासाठी संस्थानांनी संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व दळणवळण ही तीन अखिल भारतीय महत्त्वाची खाती हिंदी संघराज्याकडे सोपविणे आवश्यक होते. लॉर्ड

माऊंट बॅटन यांनीही सरदार पटेलांच्या मताला दुजोरा दिला. संस्थानांनी भारत अथवा पाकिस्तान या राष्ट्रात सामील व्हावे कारण त्यांना स्वतंत्र ठेवणे कठीण आहे, शिवाय संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व दळणवळण ही खाती संस्थानांना पेलण्यासारखी नाहीतच तेव्हां ती मध्यवर्ती सत्तेकडे देऊन देशाच्या भवितव्याचा विचार करुन संघराज्यात सामील होण्याची निकड संस्थानिकांना पटवून दिली. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार व दळणवळण या खात्याखेरीज संस्थानांना राज्यकारभारात स्वायतत्ता मिळणार होती. तसे आश्वासन सरदरांनी विलीनीकरणाच्या जाहीरनाम्यात दिले होते. संस्थानांचे स्वतंत्र अस्तित्व ही मोठी कठीण बाब आहे. संस्थाने मध्यवर्ती सत्तेशिवाय स्वतंत्र ठेवणे ही मोठी कठीण बाब आहे व संस्थाने मध्यवर्ती सत्तेशिवाय स्वतंत्र राहू शकणार नाहीत हे सत्य हळूहळू संस्थानिकांना पटू लागले. १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी जवळजवळ सर्व संस्थाने भारत अथवा पाकिस्तान या राष्ट्रात सामील झाली, फक्त काश्मीर, जुनागड आणि हैद्राबाद या तीन संस्थानांनी विलीनीकरणात भाग घेतला नाही.

संस्थानांचे विलीनीकरण करताना सरदार पटेलांनी तीन मार्गांचा अवलंब केला.

१) पहिला मार्ग म्हणजे संस्थानांचा त्यांच्या जवळच्या प्रांतात विलीन करणे. सर्व संस्थानांचे भारतात एकत्रीकरण करतानां संस्थानिकांची मने दुखावली जाऊ नये याची खबरदारी पटेलांनी घेतली. एकत्रीकरण करतांना लोकशाहीकरण व आधुनिकीकरण आपोआप होणार असल्याने सरदारांनी ओरिसातील व छत्तीसगडमधील लहान संस्थानिकांना स्पष्टपणे बजावले की जर प्रजेने लोकशाहीसाठी आंदोलन केले तर संस्थानांना पदच्युत व्हावे लागेल. सरदारांच्या सल्ल्यानुसार ओरिसातील संस्थाने ओरिसात विलीन झाली, यानंतर दक्षिणेकडील १७ राज्यांचे विलीनीकरण मार्च १९४८ मध्ये मुंबई प्रांतात केले गेले. काठेवाडमधील २८९ संस्थाने, कोल्हापूर व बडोदा ही संस्थाने मुंबई प्रांतात विलीन झाली. सरदारांच्या मुत्सद्धेगिरीमुळे पंजाब, मद्रास, कूचबिहार, बंगाल, आसाम, बनारस, रामपूर या संस्थानांना त्यांच्याजवळील प्रांतात विलीन करण्यात आले.

२) दुसऱ्या भागात प्रादेशिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया संबंधीत असलेल्या संस्थानांना एकत्र करण्याचा मार्ग स्वीकारला गेला. त्यानुसार सौराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. माळवा, ग्वाल्हेर व इंदौर ही संस्थाने मिळून मध्यभारत अस्तित्वात आला. पूर्व पंजाबमधील ८ संस्थाने एकत्र करुन 'पेपसू'(**PEPSU**) प्रदेशाची निर्मिती करण्यात आली. राजपुतान्यातील मेवाड, जयपूर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेर व अन्य लहान मोठी संस्थाने एकत्र करुन राजस्थानची १५ मे १९४९ रोजी निर्मिती झाली. १ जुलै रोजी त्रावणकोर-कोचीन यांचा संघ तयार झाला.

३) तिसऱ्या टप्प्यात मागासलेल्या लहान संस्थानांना एकत्र करुन त्यांना केंद्रशासित प्रदेशांचा दर्जा देण्यात आला. या प्रदेशाचा विकास लवकर होण्यासाठी तेथे जबाबदार शासन न देता प्रशासनाची सूत्रे केंद्र सरकारच्या हाती ठेवण्यात आली. पूर्व पंजाबमधील २१ संस्थानांचे एकत्रीकरण करुन हिमाचल प्रदेश हा केंद्रशासीत प्रांत निर्माण करण्यात आला. बुंदेलखंड व बघेलखंड येथील ३५ संस्थानांचा विध्यंप्रदेश तयार झाला.

वरील तीन मार्गांचा अवलंब करुन सरदार पटेलांनी अत्यंत शांतपणे संस्थानांचे भारतात यशस्वीपणे विलिनीकरण केले. संस्थानिकांनीही समंजसपणा दाखवून भारत सरकारला मदत केली. विलिनीकरणाच्यावेळी संस्थानिकांचे तनखे, त्यांच्या पदव्या, विशेषाधिकार, खाजगी मालमत्ता, वारसा हक्क यांची तरतुद घटनेच्या २९१ व्या कलमात करुन देण्यात आली. विलिनीकरणामुळे ५० हजार चौ. मैलाचा प्रदेश भारतात सामील झाला. सरकारला कोट्यावधी रुपयाचा आर्थिक लाभ झाला.

### ८.६.१ विलीनीकरणास विरोध करणारे संस्थानिक :

आधुनिक भारताच्या इतिहासात सरदार वल्लभभाई पटेलांची कामगिरी प्रशंसनीय ठरली. शेकडो स्वतंत्र संस्थाने भारतात सामील करुन भारताची अखंडता कायम ठेवण्याचे काम पटेलांनी केले. सरदार पटेलांच्या नेतृत्वापुढे अनेक संस्थानिक नतमस्तक झाले. संस्थानिकांना योग्य तो मान-सन्मान दिल्याने त्यांच्या मनातील सर्व संशय दूर झाला. परंतू भारतातील काही प्रबळ संस्थानिक आपले स्वातंत्र्य नष्ट करुन घेण्यास तयार नव्हते. त्यांनी लोकशाहीकरणाला विरोध करुन भारत सरकारला एक प्रकारे आव्हान दिले विशेषतः जुनागड, हैद्राबाद, काश्मीर ही संस्थाने प्रमुख होती. सरदार पटेलांनी या संस्थानिकांचा विरोध नष्ट करुन त्यांचा संघराज्यात समावेश कसा केला त्याचाच इतिहास आपण पहाणार आहोत.

### ८.६.२ जुनागड :

जुनागड हे काठेवाडमधील मुस्लिम राज्यकर्ता असलेले संस्थान होते. हे संस्थान भौगोलिक स्थिती पहाता पाकिस्तानापासून बरेच दूर होते. त्याच्या दक्षिणेला अरबी समुद्र व इतर सर्व दिशांना भारतात सामील झालेली संस्थाने होती. सामील झालेल्या संस्थानांचा काही प्रदेश असा होता की, तिकडे जाण्यास जुनागड प्रदेशातूनच मार्ग होता. या संस्थानाचे क्षेत्रफळ ३०३७ मैल असून १९४१ मध्ये तेथील लोकसंख्या ६ लाख, ७० हजार, ७१९ एवढी होती. या प्रजेपैकी ८० टक्के हिंदू व २० टक्के मुसलमान होते. या संस्थानात हिंदूंची व जैनांची मंदिरे ठिकठिकाणी होती. तसेच समुद्रमार्गे जुनागडमधील वरावळ बंदर ते कराची हे अंतर सुमारे ३०० मैलांचे होते. जुनागडचा नबाब हा विलासी, चैनी व कुत्र्यांचा मोठा शोकीन होता. थोडक्यात जुनागड हे संस्थान धार्मिक, सांस्कृतिक व भौगोलिकदृष्टया भारताशी पूर्णतःजोडलेले होते.

विलिनीकरणाचा प्रश्न आलाच तर नबाब पाकिस्तानच्या बाजूने झुकणार हे उघड होते. परंतु नबाबने १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत काहीच निर्णय जाहीर केला नाही. १५ ऑगस्टला मात्र आपले संस्थान पाकिस्तानात विलीन केल्याचे त्याने जाहीर केले पण तसे हिंदुस्थान सरकारला मात्र त्याने कळविले नाही. संस्थानातील ८०टक्के हिंदी प्रजेची इच्छा भारतात सामील होण्याची होती. तरीसुद्धा पाकिस्तान सरकारने हे विलीनीकरण स्विकारले. खरे म्हणजे जुनागडच्या सर्व बाजुंनी हिंदू संस्थाने असून त्या सर्वांनी विलीनीकरण स्विकारले होते. म्हणजे पाकिस्तानशी जुनागडला जमीनमार्गे संबंध जोडता येणार नव्हता. पण समुद्रावरुन संबंध ठेवता येईल असे नबाब म्हणत होता.

तथापि जुनागड संस्थानातील परिस्थिती दिवसेंदिवस बिघडत गेली. कायदा व सुव्यवस्था नष्ट होऊन हजारो हिंदू निर्वासित झाले. अशा अस्थिर परिस्थितीत आपले आसन बळकट नाही, जुनागडमधील वास्तव्य नबाबाला धोकादायक वाटू लागले. जुनागडचा दिवाण शहानवाज भुत्तो याने सर्व सत्तासुत्रे हाती घेऊन परिस्थिती काबूत ठेवण्याचा प्रयत्न केला. तथापि निर्माण झालेल्या आर्थिक, राजकीय व लष्करी कोंडीपुढे त्याचाही नाईलाज झाला व शेवटी त्याने हिंदी लष्करी अधिकारी सरसेनापती गुरु दयाळसिंग यांच्या हाती कारभार सोपविला. भारत सरकारने लवकरच सार्वमत घेऊन जुनागडचे भारतात विलीनीकरण घडवून आणले. फक्त ३९ लोकांनी जुनागड पाकिस्तानात जावे म्हणून मते दिली.

**८.६.३हैद्राबाद :**

हिंदुस्थानात हैद्राबादच्या संस्थानचे स्थान मध्यवर्ती असल्याने त्याचे भारतात विलीन होणे महत्वाचे होते. हिंदुस्थानांतील ते फार मोठ्या संस्थानापैकी एक संस्थान होते. त्याचे क्षेत्रफळ ८२ हजार, ३१३ वर्गमैल असून लोकसंख्या १.८६ कोटी होती. यात हिंदूंची संख्या ८५ टक्के होती. हैद्राबादचा शासक नबाब मीर उस्मान अलीखान उर्फ निजाम हा मुस्लिम असल्याने संस्थानातील हिंदुंवर त्याने प्रचंड अत्याचार केले. निजामी कारभारातील जवळजवळ सर्व जागांवर मुसलमानांची भरती होत असे. हिंदूंना राज्यकारभारातही स्थान नव्हतेच. सैन्यात ७५ टक्के व पोलिस विभागात ९० टक्के जागा फक्त मुस्लिमांना दिल्या. बहुसंख्य प्रजा हिंदू असूनही त्यांच्यावर उर्दू भाषेची सक्ती केली. हिंदू जनता ही कानडी, तेलगू व मराठी अशा तीन भागात विभागली गेली असून त्यांच्यात एकी नव्हती. निजामाचे दररोजचे उत्पन्न ४ लाख रुपये असूनही जनकल्याणाकडे त्याने दुर्लक्ष केले. इंग्रज सरकारच्या ३ जून १९४७ च्या घोषणेनंतर घोषणा केली की, सत्तांतरानंतर हैद्राबाद राज्य स्वतंत्र व सार्वभौम राहील. ते पाकिस्तान अगर भारत या राज्यात विलीन होणार नाही.

निजामाच्या वाढत्या अत्याचाराला विरोध करण्यासाठी व जनतेत प्रबोधन घडवून आणण्यासाठी हैद्राबादमध्ये काही संघटना प्रयत्नशील होत्या. १९२० नंतर आर्य समाजाने तेथे प्रबोधन घडवून आणले. १९३८ मध्ये गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबाद स्टेट काँग्रेसने भारतात सामील होण्यास नकार दिला. ११ जुलै १९४७ रोजी व्हाइसरॉयकडे निजामाने शिष्टमंडळ पाठवून आपली भूमिका स्पष्ट केली. ब्रिटिश सरकारच्या ताब्यातील वऱ्हाड प्रांत हैद्राबादला परत मिळावा हैद्राबादला स्वायत्त राज्य म्हणून मान्यता मिळावी व कोठेही सामील न होता भारताशी जैसे थे करार करण्याची परवानगी मिळावी या मागण्या केल्या. पण या मागण्या भारत सरकारला मंजूर नव्हत्या. व्हाइसरॉयनी तसे न करता भारतात विलीन होण्याचा सल्ला दिला. निजामाने हा सल्ला मानला नाही. त्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ पूर्वी हैद्राबाद भारतात विलीन होऊ शकले नाही. निजामाशी वाटाघाटी करुन अनुकूल निर्णयास त्याला आणण्याचे काम व्हाइसरॉयकडे सोपविण्यात आले.

रेल्वे, लष्कर इत्यादी अखिल भारतीय महत्त्वाच्या बाबतीत निजाम भारत सरकारशी सहकार्याचा करार करावयास तयार होता परंतू सरदार पटेल त्यास तयार नव्हते. इतर

संस्थानिकांशी केलेल्या करारापेक्षा वेगळ्या स्वरुपाचा करार करावयास ते तयार नव्हते. सरदार वल्लभभाई पटेल व व्हाइसरॉय यांनी निजामाने हैद्राबाद राज्यात सार्वमत घेऊन हा प्रश्न सोडवावा असे सांगितले. पण निजाम सार्वमताला तयार नव्हता. बॅ. जिनांबरोबर अंतस्थ पत्रव्यवहार चालला होता. हैद्राबाद पाकिस्तानात विलीन करण्यासाठी बॅ. जिना प्रयत्न करीत होते.

धर्मांध रझाकारांचा नेता कासीम रिझवी हा निजामाचा मुख्य सल्लागार होता. तो सारखा निजामाच्या मनावर बिंबवीत होता की, भारत सरकार काश्मीर प्रश्नात गुंतले असून हैद्राबादने स्वातंत्र्य पुकारले तर त्याच्याकडे लक्ष द्यायला भारताजवळ वेळही नाही व लष्करी बळही नाही. हैद्राबादचे लष्कर व रझाकार हैद्राबादचे सरंक्षण करतील. निजामाची शिष्टमंडळे सारखी दिल्लीच्या वाऱ्या करीत होती. व्हाइसरॉयने निजामाचा भ्रम दुर करण्याचा खूप प्रयत्न केला व भारत सरकार वाटते तेवढे कमजोर नाही उलट हैद्राबाद राज्यालाच शेवटी पश्चाताप होईल अशी वस्तुस्थितीही कथन केली. पुन्हा वाटाघाटीला सुरुवात झाली. निजामाने दुसरे शिष्टमंडळ दिल्लीला पाठविले. सरदार पटेलांनी या वेळी कासीम रिझवीलाही बोलाविले. त्यानंतर झालेल्या बैठकीत रिझवीने, “हैद्राबाद हे मुस्लिम राष्ट्र आहे. त्यावर आक्रमण झाल्यास संपूर्ण भारतातील मुसलमान सशस्त्र लढा देतील व हैद्राबादमध्ये एकही हिंदू जिवंत राहणार नाही,” अशी धमकी देऊन रझाकारांनी हिंदूवर अत्याचार करण्यास सुरुवात केली. भारताने सार्वमताचा आग्रह धरला तर “शेवटी तलवारीला तलवार भिडेल” अशी गर्वोक्ती त्याने सरदार पटेलांपुढे केली. माऊंट बॅटनच्या सल्ल्यानुसार भारताने निजामशहाशी २६ नोव्हेंबरला एक वर्ष मुदतीचा जैसे थे करार केला पण पटेलांना मनापासून हा करार मंजूर नव्हता.

अशा परिस्थितीत हैद्राबादशी “जैसे थे” करार करण्यात भारत सरकारला यश आले. निजामाला कधी तरी आपल्या हिताची जाणीव होईल व तो स्वतःहून भारतात सामील होईल असे व्हाइसरॉय माऊंट बॅटन, पंडीत नेहरु व पटेलांना समजावून सांगत असतानाच मिळणाऱ्या वेळामध्ये भारत विरोधी सामर्थ्य गोळा करण्याच्या उद्योगास निजाम लागला. ऑगस्ट १९४८ पर्यंत रझाकारांची संख्या तिप्पट वाढली. त्यांनी प्रचंड लुटालूट, जाळपोळ, कत्तली सुरु करुन हिंदूना हैद्राबादमधून हाकलून देण्यास सुरुवात केली. निजामाने इराक, इराण व पाकिस्तानकडून शस्त्रास्त्रे मिळविली. वायुदल, बॉम्बफेकी विमाने यासाठी ब्रिटिश कंपन्यांशी संधान साधले. हैद्राबादेतून निर्यात होणाऱ्या मालावर त्याने निर्बंध घातले. हिंदी चलन रद्द करुन टाकले आणि पाकिस्तानला २० कोटी रुपयांचे कर्ज देऊ केले. बॅ. जिनांनी निजामला पाकिस्तानात सामील होण्यास उत्तेजन दिले.

हैद्राबाद राज्यात रझाकारांनी धुमाकुळ घालावयास सुरुवात केली. शेजारच्या मुंबई, मद्रास व मध्य प्रांतातील प्रदेशांतही घुसून लुटमार करु लागले. कासीम रिझवी बेतालपणे बडबडत होता. “इस्लामचे वर्चस्व प्रस्थापित झाल्याशिवाय आम्ही तलवार म्यान करणार नाही. एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तलवार घेऊन शत्रुचा निःपात करा.” प्रकरण एवढ्यावर थांबले नव्हते. हिंदुवर भयंकर अत्याचार चालविले. हिंदुंच्या बायका भ्रष्ट करणे, हिंदुंचे डोळे

फोडणे, त्यांच्या कत्तली करणे, घरेदारे लुटणे याला सीमा राहिली नाही. २२ मे १९४८ रोजी हैद्राबादच्या हद्दीतून मद्रासकडून मुंबईकडे जाणाऱ्या रेल्वेवर सशस्त्र गुंडांनी हल्ला केला. या घटनेमुळे भारत सरकारने हैद्राबादची आर्थिक नाकेबंदी करण्याचे ठरविले. पण माऊंट बॅटनने त्याला विरोध करुन निजाम व भारत सरकार यांच्यात कराराचा नवा मसुदा तयार केला. पटेलांनी नाईलाजाने त्याला संमती दिली पण हा करार निजामाने धुडकावल्याने राजकीय पेचप्रसंग गंभीर बनला. हा अत्याचार सहनशीलतेच्या पलीकडे गेल्याने भारत सरकारने लष्करी कारवाई करण्याचे ठरविले.

केवळ माऊंट बॅटनच्या मध्यस्थीमुळेच अद्याप निजाम टिकून होता. २१ जून १९४८ रोजी माऊंट बॅटन यांनी राजीनामा दिला व ते इंग्लंडला निघून गेले. संतापलेल्या सरदार पटेलांना हैद्राबादवर कारवाई करण्याची योग्य संधी मिळाली. रझाकारांच्या अत्याचारात बेसुमार वाढ झाली. त्यांनी भारताच्या सीमेत शिरुन हल्ले सुरु केले. भारत सरकारने निजामाची आर्थिक नाकेबंदी केली पण त्याचा फारसा परिणाम न झाल्याने ९ सप्टेंबर १९४८ रोजी लष्करी कारवाईचा निर्णय घेतला. पंडित नेहरु इंग्लंडला गेल्यामुळे सरदार पटेल हे उपपंतप्रधान बनले होते. त्यांनी वेळकाढूपणाचे धोरण सोडून देऊन १३ सप्टेंबर १९४८ रोजी मेजर जनरल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबादविरुद्ध सैनिकी कारवाई सुरु केली. दोन दिवसातच निजामाच्या सैन्याचा व रझाकारांचा विरोध मोडून पडला. १७ सप्टेंबरला हैद्राबादच्या लष्कराने शरणागती स्वीकारली. १०८ तासात ही कारवाई आटोपली होती. भारताविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या कासीम रिझवी व वझीर मीर लायक अली यांना अटक करण्यात आली. काही काळ तेथे मेजर जनरल चौधरींची राजवट होती. निजामाने भारताशी एकनिष्ट राहण्याचे पटेलांना आश्वासन दिले. १९५० साली तेथे काँग्रेसचे मंत्रीमंडळ स्थापन करण्यात आले. १९५२ साली निवडणुका होऊन लोकशाही पद्धतीचे सरकार निर्माण झाले.

### ८.६.४ काश्मीर :

काश्मीरची भौगोलिक स्थिती व स्थान भारतातील इतर संस्थानांहून वेगळी आहे. भारताच्या अगदी उत्तरेच्या टोकावर असलेल्या या राज्याच्या सीमा आंतरराष्ट्रीय सीमांना स्पर्श करतात. पूर्वेला तिबेट, पश्चिमेला पाकिस्तान म्हणून त्याच्या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय महत्व येणे स्वाभाविक होते. रशियाची सरहद्द काश्मीरपासून दूर नाही. खुद्द काश्मीर खोऱ्यात हिंदू व मुसलमान आणि जम्मूत हिंदु लोक बहुसंख्येत होते. काश्मीरचे क्षेत्रफळ ८४४७१ वर्गमैल होते. येथील लोकसंख्या ४४ लाख होती. त्यामध्ये ७५ टक्के मुसलमान तर २५ टक्क्यात हिंदू व बौद्ध होते. काश्मीर संस्थांन १८४६ मध्ये पंजाबच्या गुलाब सिंहाने १ कोटी रुपये देऊन इंग्रजांकडून विकत घेतले होते. त्याच्याच वंशातील राजा हरिसिंह इ.स. १९२५ मध्ये काश्मीरच्या गादीवर बसला. काश्मीरमध्ये बहुसंख्य प्रजा मुस्लिम असली तरी राजा मात्र हिंदुधर्मीय होता पण अनेक वर्षे या संस्थानात कोणतीही समस्या निर्माण झाली नाही. भारताच्या सरहद्दीवर असलेला प्रांत १९४७ पासून धगधगता ज्वालामुखी बनला.

१५ ऑगस्ट १९४७ पर्यंत हैद्राबादप्रमाणेच काश्मीरच्या संस्थानिकांनेही विलीनीकरणाबाबत भारताला कोणताही प्रतिसाद दिलेला नव्हता. काश्मीर संस्थानाच्या सीमा भारत व पाकिस्तान या दोन्ही देशांना भिडलेल्या होत्या. तसेच संस्थानात बहुसंख्य प्रजा मुस्लिम असल्यामुळे राजा हरिसिंगाला कोठे सामील व्हायचे हा निर्णय घेणे अवघड वाटत होते. त्यामुळे त्याने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. १५ ऑगस्ट पूर्वी म. गांधी व लॉर्ड माऊंट बॅटन यांनी हरिसिंगाशी बोलणी करुन स्वतंत्र राहणे त्याच्या हिताचे ठरणार नाही हे त्याला पटवून देण्याचा प्रयत्न केला. भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काश्मीरचे भारतात सामीलीकरण अगत्याचे आहे अशी भारत सरकारची धारणा होती. बॅ.जीना हे देखील काश्मीरला पाकिस्तानात ओढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होते.

शेवटी काश्मीरच्या महाराजांनी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांशी "जैसे थे" करार करण्याचा मानस जाहीर केला भारत सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. पाकिस्तानने मात्र लगेच करार केला. तथापि असा करार करुनही पाकिस्तानचे काश्मीर संबंधीचे वर्तन मात्र शत्रुत्वाचे राहिले. काश्मीरकडे जाणारे सर्व रस्ते बॅ.जीनांनी अडवून धरुन मालाची नाकेबंदी केली. काश्मीरवर लष्करी दडपण आणण्याचा त्यांचा प्रयत्न सुरु झाला. मुसलमान प्रजेला बंडाची चिथावणी देण्यास सुरुवात झाली. अशा नाजुक परिस्थितीत काश्मीरच्या महाराजांनी न्या. मेहरचंद महाजन यांना आपले प्रधानमंत्री म्हणून नियुक्त केले. न्या. महाजनांनी ब्रिटिश पंतप्रधानांशी पत्रव्यवहार करुन पाकिस्तानवर करार पाळण्याचे दडपण आणावे म्हणून विनंती केली. तथापि त्याचा काहीही उपयोग झाला नाही.

२२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तान सरकारच्या चिथावणीने मुस्लिम टोळयांनी काश्मीरवर आक्रमण सुरु केले. या टोळ्यांचे नेतृत्व पाकिस्तानी फौजी अधिकारी करीत होते. काश्मीरी फौजांचा प्रतिकार दुबळा पडत होता. कारण फौजेतील मुसलमान सैनिक शत्रूला भराभर मिळत होते. मुसलमानी टोळयांनी बारामुल्लापर्यंत धडक मारली. श्रीनगर टोळीवाल्यांच्या कब्जात जाण्याचा गंभीर धोका निर्माण झाला. आता काश्मीरच्या महाराजांनी मदतीसाठी भारत सरकारकडे विनंती केली. परंतु या विनंतीकडे लक्ष द्यावयास पंतप्रधान पंडित नेहरु तयार नव्हते. शेवटी महाराजांनी काश्मीर भारतात विलीन करण्याचा निर्णय कळविला व तसा करार दिल्लीला पाठविल्यावर २७ ऑक्टोबर रोजी हवाई मार्गाने श्रीनगरला सैन्य पाठविण्यात आले. या सैन्यानेच त्या दिवशी श्रीनगर वाचविले. भारतीय सेनेला यावयास थोडा जरी उशीर झाला असता तर श्रीनगर मुसलमानांनी नष्ट करुन टाकले असते. या ठिकाणी आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. इ.स. १९३२ मध्ये शेख अब्दुल्लांच्या नेतृत्वाखाली नॅशनल कॉन्फरन्सचा उदय होऊन त्यांनी काश्मीर भारतात सामील व्हावे यासाठी १९४६ पासून काश्मीर छोडो ही नॅशनल कॉन्फरन्सनेही चळवळ सुरु केली होती. पंडित नेहरुंचाही त्यांना पाठिंबा होता. टोळीवाल्यांच्या हल्ल्यापासून काश्मीर वाचवण्याची विनंती भारत सरकारला केली होती. नॅशनल कॉन्फरन्स हा काश्मीरमधील बहुसंख्य लोकांचे प्रतिनिधीत्व करणारा पक्ष होता.

भारतीय सेनेचे काश्मीरमधील आगमन बॅ. जीनांना समजताच जीनांना संताप अनावर झाला. आपल्या सेनेला काश्मीरवर हल्ला करण्याचा हुकूमही दिला. परंतु पाकिस्तानी लष्करप्रमुख फिल्डमार्शल आचिनलेक यांनी जिनांना सांगितले की, भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध सुरु झाले तर आपणांस पाकिस्तानी फौजेतील सर्व इंग्रज अधिकाऱ्यांना परत बोलवावे लागेल. लष्करप्रमुखाचा हा पवित्रा पहातच बॅ.जीनांनी आपला हुकूम परत घेतला. तथापि काश्मीरचे विलिनीकरण हे भ्रष्टाचार व हिंसाचार यांनी घडवून आणल्याने आपण त्यास मान्यता देणार नाही असे बॅ. जीनांनी जाहीर केले. पाकिस्तानी प्रधानमंत्री लियाकत अली खान यांनी काश्मीरवर आक्रमण केल्याचा भारतावर आरोप केला. आता टोळीवाल्यांना मागे, रेटण्याचे काम भारतीय लष्कराने हाती घेतले. लेह व लडाख खोऱ्यातून व पूंछ प्रदेशातून त्यांना हाकलून लावण्यात आहे. बारामुल्ला परत जिंकण्यात आला. बारामुल्लाच्या १४ हजार स्त्रियांपैकी १३ हजार स्त्रिया टोळीवाल्यांनी पळवून नेल्या होत्या. भारत सरकारने सेना पाठविली नसती तर काश्मीरच्या हिंदूवर, त्यांच्या स्त्रियांवर किती अत्याचार झाला असता याची कल्पनाही करवत नाही.

लॉर्ड माऊंट बॅटन यांनी काश्मीर प्रश्नाबाबत भारत आणि पाकिस्तान यांच्यात समझोता घडवून आणण्याचा असफल प्रयत्न केला. लॉर्ड माऊंट बॅटन यांच्या सांगण्यावरुनच भारताने हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेला. १ जानेवारी, १९४९ पासून काश्मीरमध्ये युद्धविराम झाला. दोन्ही देशांच्या फौजा जेथे होत्या तेथेच युद्धविराम रेषा आखण्यात आली. काश्मीर प्रश्नाचे घोंगडे अजुनही युनोत भिजत पडले आहे आणि ते लवकर सुटेल असे वाटत नाही. दरम्यान पाकिस्तानने लष्करी आक्रमणाच्या बळावर काश्मीर ताब्यात घेण्याचे अनेक प्रयत्न केले. पण प्रत्येक प्रयत्नात त्यांच्या पदरी अपयशच पडले आहे. पाकिस्तानने वेळोवेळी काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याचा आग्रह धरला. सतत प्रशिक्षित अतिरेक्यांना काश्मीरमध्ये पाठवून तेथे अशांतता निर्माण केली. काश्मीर प्रश्नावरुन भारत व पाकिस्तान यांच्यात प्रचंड तनाव वाढला. त्यातूनच १९६५, १९७१ मध्ये दोन मोठी युद्धेही झाली. कालपर्वाच्या कारगील युद्धापर्यंत संघर्षमय स्थिती दिसून येत होती. १९९५ नंतर भारत सरकारने पाकिस्तानशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण करण्याचे विशेष प्रयत्न सुरु केले पण अद्याप काश्मीरचा गुंता मात्र सुटू शकलेला नाही.

**८.६.५सरदार पटेलांच्या कार्याचे महत्व :**

भारतीय संस्थानांचे विलीनीकरण हा भारताच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी १६२ संस्थानांच्या विलिनीकरणाची कठीण समस्या भारत सरकारपुढे होती. भोपाळचे नबाब, इंग्रज मुलकी अधिकारी कॉरफिल्ड यांनी गुप्त पत्रव्यवहार करुन अनेक संस्थानिकांना आपल्या जाळ्यात ओढण्याच्या प्रयत्नात होते. घुसखोरी करुन भारताच्या प्रदेशात अराजकता निर्माण करीत होते. १५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्य कायद्याने संस्थानिकांचे सार्वभौमत्व मान्य करण्यात आले होते. ही बाब भारतीय संघ राज्याच्या दृष्टीने बाधक व मारक होती. ही संस्थाने स्वतंत्र रहाणे किंवा त्यांनी शेजारच्या राष्ट्रांशी हातमिळवणी करणे म्हणजे भारताचे विघटन झाल्यासारखेच होते. या कठीण परिस्थितीतून भारताचे गृहमंत्री असलेल्या सरदार पटेलांनी संस्थानिकांशी वाटाघाटी करुन, त्यांच्याकडून

फारसा प्रतिकार होणार नाही याची दक्षता घेऊन, कोणत्याही प्रकारचा कडवटपणा निर्माण होऊ न देता अतिशय समंजसपणे सर्व संस्थाने भारतात विलिन करुन घेतली. त्यामुळे भारताचे ऐक्य घडून आले. ज्या संस्थानिकांनी विलिनीकरणास विरोध केला त्या संस्थानिकांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊन त्यांना पाकिस्तानमध्ये जाण्यास रोखले. या सर्वाचे श्रेय सरदार पटेलांना दिले जाते.

सरदार वल्लभभाई पटेल हे एक प्रभावी, खंबीर व कार्यक्षम व्यक्तिमत्व होते. पंडीत नेहरु व सरदार पटेल यांचे स्वभाव, तत्वे, विचार पूर्णपणे भिन्न होते. त्यामुळे त्यांच्यात अनेकवेळा वैचारिक खटके उडत. असे असले तरी निःस्वार्थ राष्ट्रभक्ती, राष्ट्रकल्याणाची तळमळ त्यासाठी कोणताही त्याग व कष्ट सोसण्याची तयारी या दोघांमध्ये सारखीच होती. त्यामुळे भारताच्या राजकारणात २५ वर्षांहून अधिक काळ राष्ट्रकल्याणासाठी दोघांनी परस्परांना सहकार्य केले. गृहमंत्री म्हणून १९४७-४८ या वर्षात केलेले कार्य अतुलनीय होते. लंडनच्या 'द लंडन टाइम्स' या वृत्तपत्राने सरदार पटेलांची जर्मनीचे एकीकरण घडवून आणणाऱ्या 'बिस्मार्क' बरोबर तुलना करुन त्यांना बिस्मार्कपेक्षा दहा पटीने श्रेष्ठ ठरविले. १५ डिंसेबर १९५० रोजी पटेलांचे देहावसान झाले. मुंबईला निघालेल्या सहा मैल लांबीच्या अंत्ययात्रेत लाखो लोक सामील झाले होते. लो. टिळकांच्या नंतर एवढी मोठी अंत्ययात्रा लोकांना प्रथमच दिसली. राष्ट्राचे प्रादेशिक ऐक्य साधुन स्वतंत्र भारताचा पाया मजबुत करणारे सरदार पटेल हे खरोखरच भारताचे 'पोलादी पुरुष' म्हणून ओळखले जाते.

### ८.६.६ फ्रेंच वसाहतींचे विलीनीकरण :

सरदार पटेलांचा मृत्यु झाला त्यावेळी जवळजवळ सर्व लहान-मोठी संस्थाने भारतात विलिन झाली होती. भारताचे एकीकरण झाले होते. असे जरी असले तरी भारताच्या स्वातंत्र्याला काहीच अर्थ नव्हता. कारण भारतातील काही प्रदेश फ्रेंचांच्या व पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. आंतरराष्ट्रीय संबंध चांगले रहावेत म्हणून ब्रिटिशांनी हे प्रांत आपल्या अधिपत्याखाली आणले नाहीत. पंडीत नेहरुंना मात्र स्वातंत्र्यानंतर परकीय अंमलाखालील हे प्रदेश भारतात विलिन झाले पाहीजेत असे वाटत होते. त्यादृष्टीने फ्रान्सशी वाटाघाटी सुरु केल्या. फ्रान्सनेही फारसे आढेवेढे न घेता भारत सरकारला सहकार्य केले.

जून १९४९ मध्ये बंगालमधील चंद्रनगर फ्रेंचांच्या ताब्यात होते. तेथे सार्वजनिक मतदान घेण्यात आले. जनतेने भारताच्या बाजुने कौल दिला. मे १९५० मध्ये चंद्रनगर भारतात विलिन करण्यात आले. ऑक्टोंबर १९५४ मध्ये भारत फ्रान्स यांच्यात करार होऊन कारिकल, माहे, यानाम, पाँडेचेरी हे प्रदेश भारताच्या ताब्यात आले. फ्रेंचांच्या ताब्यातील हे प्रदेश भारताला जोडल्याने १९६ चौरस मैलांचा प्रदेश भारतीय संघराज्यात विलिन झाला.

### ८.६.७ गोवा, दीव- दमण यांचे भारतात विलीनीकरण :

फ्रान्सने जो मनाचा मोठेपणा दाखवला व भारतीय प्रदेशावरील हक्क सोडले तसा मोठेपणा दाखविण्यास पोर्तुगाल तयार नव्हते. त्यामुळे स्वतंत्र भारतासमोर पुन्हा एक मोठा पेचप्रसंग निर्माण

झाला. इ.स. १४९८ मध्ये वास्को-द-गामाच्या रुपाने आलेल्या पोर्तुगीजांनी भारतातील गोवा, दीव, दमण, साष्टी, मुंबई, वसई हे किनारपट्टीवरील प्रदेश बळकावले. सत्ता विस्ताराच्या स्पर्धेत पोर्तुगीजांच्या हातून बरेच प्रदेश निसटले असले तरी गोवा, दीव, दमण, दादरा व नगरहवेली अखेर पर्यंत पोर्तुगीजांच्या ताब्यात होते. सरदार पटेलांच्या मृत्युनंतर नेहरु मंत्रीमंडळाला पोर्तुगीजांच्या विरोधाला मोठे तोंड द्यावे लागले. गोव्याचे क्षेत्रफळ १३१४ चौ.मैल असून लोकसंख्या ६ लक्ष होती. दीवचे क्षेत्रफळ २० चौ.मैल व दमणचे क्षेत्रफळ १४८ चौ.मैल होते. पोर्तुगालचा शासक अन्तोनिओ सालाझार याने १९५१ मध्ये गोवा, दीव, दमण हे पोर्तुगालचे अविभाज्य प्रांत असल्याचे घोषित केले. भारत सरकारची पळापळ सुरु झाली. प्रथम भारताने पोर्तुगीज सरकारशी राजनैतिक प्रयत्नातून वाटाघाटी करण्यासाठी लिस्बन येथे वकीलात उघडली. पण पोर्तुगाल शासनाने दाद न दिल्याने १९५३ मध्ये ती बंद पडली.

गोवा, दादरा व नगरहवेली येथील जनतेने पोर्तुगीज राजवटीविरुद्ध आंदोलने सुरु केली होती. गोव्यातील जनता भारतात सामील होण्यासाठी उत्सुक होती. या काळात मुंबईतही हजारो गोवेकर रहात होते. त्यांनी व गोव्यातील राष्ट्रवाद्यांनी मिळून जुलै १९५४ मध्ये पोर्तुगीज वर्चस्वाखाली दादरा व नगरहवेली या प्रदेशांवर चाल करुन ते मुक्त केले. पंतप्रधान पंडीत नेहरुंचा या आंदोलनाला पाठींबा होता ते प्रदेश भारतात विलिन करुन घेतले. पोर्तुगीजांनी भारत सरकारविरुद्ध आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे धाव घेतली पण त्याचा कांहीही उपयोग झाला नाही. दादरा व नगरहवेली या आंदोलनात राष्ट्रवाद्यांना यश मिळाल्याने पोर्तुगीजांविरुद्धचे आंदोलन वाढत गेले. १५ ऑगस्ट १९५४ रोजी गोवा मुक्त करण्यासाठी हजारो स्वयंसेवक गोव्यात शिरले पण पोर्तुगीज सरकारने अनेकांना अटक करुन आंदोलन दडपून टाकले. १५ ऑगस्ट १९५५ रोजी पुन्हा दोन हजार सत्याग्रहींनी गोव्यात प्रवेश केला. झालेल्या संघर्षात २० सत्याग्रही मारले गेले व अनेक जखमी झाले. पोर्तुगीज लष्करासमोर सत्याग्रहींना माघार घ्यावी लागली. गोव्याचा प्रश्न राष्ट्रीय न राहता तो आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चीला जाऊ लागला.

अमेरिका व इंग्लंड या देशांबरोबर पोर्तुगालचे मैत्रीचे संबंध असल्याने या देशांचा भारताला पाठिंबा मिळणार नाही हे उघड होते. १९५५ रोजी भारतभेटीवर आलेल्या रशियन नेते क्रुश्चेव्ह व बुलगानीन यांनी गोवा प्रश्नांबाबत भारताला पूर्ण सहकार्य असल्याचे जाहीर केले. गोवा पोर्तुगीजांच्या ताब्यातून मुक्त व्हावा अशी नेहरुंची इच्छा होती. १९५७ रोजी संरक्षणमंत्री व्ही.के.मेनन यांनी गोवा मुक्तीसाठी लष्करी कारवाई करावी असा सल्ला सरकारला दिला. आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रांचा भारताला पाठिंबा असून पोर्तुगीजांच्या वसाहतवादाला विरोध होता. अखेर नेहरुंनी लष्करी तयारीला सुरुवात करुन भारताच्या हद्दीत लष्करी कवायती सुरु केल्या. पोर्तुगीजांवर मात्र याचा काहीही परिणाम झाला नाही. १५ डिसेंबर १९६० रोजी युनोने गोवा, दीव-दमण हे पोर्तुगालचे प्रांत नसून पोर्तुगालच्या वसाहती आहेत असा निर्णय दिला. या निर्णयामुळे भारताच्या भूमिकेला काही प्रमाणात पाठींबा मिळाला. भारताने गोवामुक्तीसाठी लष्कर प्रमुख म्हणून मेजर जनरल कॅंडेय यांची नेमणूक करुन १७ डिसेंबर १९६१ रोजी लष्करी कारवाई करण्याचे ठरविले पण अमेरिका व युनोने भारताला लष्करी कारवाई न करण्याचा सल्ला दिला व वाटाघाटी करण्याचे सुचविले पण मुळातच पोर्तुगीज

सरकार वाटाघाटीसाठी तयार नसल्याने नेहरुंनी लष्करी कारवाईचे आदेश दिले. भारतीय सैनिकांनी तीन दिवसात गोवा, दीव-दमण यांना वेढा घातला. १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगीज लष्कर शरण आले. झालेल्या लढाईत १७ पोर्तुगीज व २२ भारतीय मारले गेले. माघार घेता घेता पोर्तुगीजांनी मालमत्तेची नासधुस केली. गोव्यात भारतीय लष्कराचे जंगी स्वागत करण्यात आले.

गोव्यातील लष्करी कारवाईचे आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठे पडसाद उमटले. पश्चिमात्य राष्ट्रांनी भारताच्या या कृतीचा निषेध केला. परंतु साम्यवादी राष्ट्रे, आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रांनी भारताचे जोरदार समर्थन केले. १८ डिसेंबर १९६१ रोजी युनोच्या सुरक्षा समितीत पोर्तुगालने भारताविरुद्ध तक्रार केली. दोन्ही बाजूंनी आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडण्यात आल्या. भारताची बाजू सी.एस.झा. यांनी प्रभावीपणे मांडली. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर झालेल्या चर्चेत अमेरिकेने भारताला आक्रमक ठरवून भारताने गोव्यातून माघार घेऊन शांततापुर्वक पोर्तुगीजांशी वाटाघाटी कराव्यात असा ठराव मंजूर केला पण रशियाने सुरक्षा समितीत नकाराधिकार वापरुन तो ठराव फेटाळला त्यामुळे भारताची बाजू मजबूत झाली. गोवा, दीव-दमण भारतात सामील झाले. ६ जून १९६२ रोजी गोव्यातील लष्करी अंमल नष्ट करण्यात आला.

इंग्रजांनी भारतात प्रचंड साम्राज्यविस्तार करुन १८५७ पर्यंत संपूर्ण भारत आपल्या वर्चस्वाखाली आणला. त्यांनी आपल्या सोयीसाठी वेगवेगळ्या प्रांतांची व राज्यांची निर्मिती केली. पण ही राज्ये एकभाषी नसून एकाच भाषेचे लोक विविध राज्यांत विभागले गेले होते. स्वातंत्र्य चळवळीच्या कालावधीत एका राज्यातील बहुसंख्य लोकांची एकच भाषा असावी अशी कॉंग्रेसने मागणी केली होती. १९२८ च्या नेहरु अहवालामध्येही तसे नमूद करण्यात आले पण स्वातंत्र्य मिळेपर्यंत यात कोणताही बदल होऊ शकला नाही.

### ८.६.८ आपली प्रगती तपासा :

१. जुनागडच्या विलीनीकरणावर थोडक्यात टीप लिहा.

## ८.७ घटक राज्यांची पुनर्रचना

स्वातंत्र्यानंतर मात्र भारतात भाषावर प्रांतरचना निर्माण करण्याबाबत पंडित नेहरु व सरदार पटेलांचे मत बदलले कारण पाकिस्तानच्या निर्मितीमुळे देशाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले होते. स्वातंत्र्याआधी भाषावर प्रांताचा निर्णय कॉंग्रेसने घेतला होता असे असतांना आता सत्तेत असलेल्या कॉंग्रेसने भाषावर प्रांत-रचना करावी असा त्यांचा आग्रह होता. भाषावर

प्रांतरचना योग्य की अयोग्य हे ठरविण्यासाठी पंडित नेहरुंनी जून मध्ये दार समिती नियुक्त केली या समितीने संपूर्ण देशाचा विचार करुन वर्तमान आणिबाणीच्या परिस्थितीत भाषावर प्रांतरचना केली तर प्रादेशिक निष्ठा बळावतील व राष्ट्रनिष्ठेला तडा जाईल असे मत व्यक्त केले. त्यामुळे हा निर्णय राष्ट्राच्या दृष्टीने विघातक ठरेल अशी शिफारस सरकारकडे केली. सरकारचे समाधान झाले असले तरी अनेकांना हा अहवाल पटला नाही. भाषावर प्रांताची मागणी व आंदोलने वाढत गेली.

### ८.७.१ आंध्र राज्याची निर्मिती व भाषिक आंदोलने :

मद्रास राज्यात तेलगू व तामीळ भाषिक लोक एकत्र रहात होते. तामीळींची संख्या अधिक असल्याने त्यांच्याकडून तेलगु भाषिकांवर अन्याय होत असल्याची तक्रार होऊ लागली. १९५१ नंतर तेलगु भाषिकांचे स्वतंत्र राज्य व्हावे या मागणीने जोर पकडला. पंडित नेहरुंनी या मागणीला विरोध दर्शविला व दार समितीचा निर्णय मान्य करावा असे सांगितले. नेहरुंनी वारंवार भाषिक राज्याचे तत्व राष्ट्रीय एकात्मतेला बाधक ठरेल या गोष्टीचा प्रचार केला. हा निर्णय घेतल्यास राष्ट्रीय विकासाची गती मंद होऊन जनकल्याणाच्या योजना मागे पडतील असे जनतेला पटविण्याचा प्रयत्न केला. पंडित नेहरुंच्या आवाहनाचा अपेक्षित परिणाम तेलगु भाषिकांवर होत नव्हता. अखेर तेलगु राज्याच्या मागणीला पाठींबा दिल्याने सरकारला दखल घेणे भाग पडले, परंतु याबाबत काही निर्णय घेण्या अगोदरच ५८ दिवसांच्या उपोषणानंतर पोट्टी श्रीरामुलु यांचे निधन झाले. वातावरण प्रक्षुब्ध होऊन हिंसक आंदोलन सुरु झाले. स्फोटक परिस्थिती निर्माण झालेली पाहून पंडित नेहरुंनी ‘वांछु समिती’ स्थापन केली. या समितीने तेलगु भाषिकांचे वेगळे राज्य निर्माण करण्याची शिफारस करताच ऑक्टोबर १९५३ मध्ये तेलगु भाषिकांचे वेगळे प्रांत बनविण्याची त्यांनी मागणी सुरु केली. भाषिक प्रांत आंदोलनाचा वणवा देशभर पसरु लागला. नेहरुंचा भाषावार प्रांतरचनेला विरोध होता पण स्वजनाच्या व जनआंदोलनाच्या दबावापुढे मान झुकवावी लागली.

### ८.७.२ फाजल अली समिती :

२२ डिसेंबर १९५३ रोजी पंडित नेहरुंनी भाषावार प्रांतरचनेच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी समिती नेमण्याची संसदेत घोषणा केली. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली अशी समिती निर्माण केली. प. ह्यदयनाथ कुंझरु व सरदार पणीक्कर हे इतर दोन सदस्य समितीत होते. सरकारने समितीला एक भाषा असलेल्या राज्याच्या निर्मितीबद्दल लोकांच्या मागणीचा विचार करीत असतांना भाषा व संस्कृती याचाही विचार करावा तसेच भारताची एकता देखील सुरक्षित राखण्याची काळजी घ्यावी अशी सूचना केली. जनमत जाणून घेण्यासाठी समितीने देशभर दौरे काढले. ९ हजार प्रमुख व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. या समितीकडे दीड लाखापेक्षा जास्त निवेदन जमा झाली. या सर्वांचा अभ्यास करुन समितीने २६७ पानांचा अहवाल ३० सप्टेंबर १९५५ रोजी सरकारला सादर केला. समितीने भारताच्या वर्तमान २७ राज्यांऐवजी भाषावार प्रांतरचनेच्या आधारे नव्या १६ राज्यांची निर्मिती करण्याचे सुचविले. समितीच्या अहवालात मद्रास, केरळ, कर्नाटक, हैद्राबाद, आंध्र, मुंबई, विदर्भ, मध्यप्रदेश, राजस्थान, पंजाब, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, ओरिसा, जम्मु व काश्मीर या १६ राज्यांची

शिफारस केली होती. वरील प्रांतरचना निर्माण करण्याबरोबरच समितीने आपल्या अहवालात संस्थानिकांचे राजप्रमुख हे पद रद्द करावे, भाषेच्या दृष्टीने अल्पसंख्यांक असणाऱ्यास विशेष संरक्षण द्यावे, प्राथमिक शिक्षण मातृभाषेत घेता येईल, आखिल भारतीय सेवांमध्ये प्रवेश घेणाऱ्यांसाठी ५० टक्के जागा राज्याबाहेरील व्यक्तीसाठी राखून ठेवाव्यात, राष्ट्रभाषा व अन्य प्रादेशिक भाषा शिकवण्यास प्रोत्साहन द्यावे, विद्यापीठांमध्ये इंग्रजी भाषेचा वापर करावा इ. सूचना सरकारला दिल्या.

फाजल अली समितीने केलेल्या शिफारसींच्या आधारे ३१ ऑगस्ट १९५६ रोजी राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने राज्य पुर्नरचना कायदा अस्तित्वात आला. या कायद्यामुळे पूर्वीची सर्व संस्थाने जवळच्या भाषिक राज्यात विलीन झाली व इतर राज्यातही बदल झाला. या कायद्यामुळे १४ राज्यांची व ६ केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करण्यात आली. या १४ राज्यांमध्ये आंध्र, आसाम, ओरिसा, बिहार, मध्यप्रदेश, मुंबई, मद्रास, म्हैसुर, उत्तरप्रदेश, केरळ, पंजाब, राजस्थान व पश्चिम बंगाल या १३ राज्यांना समान दर्जा तर जम्मु-काश्मीरला विशेष दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. इतर ६ केंद्रशासित प्रदेशांमध्ये दिल्ली, हिमाचल प्रदेश, मणिपूर, त्रिपुरा, अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप मिनीकॉय, अमीनदीवी बेटे यांचा समावेश केला गेला. भारताची राष्ट्रीय एकात्मता टिकवण्यासाठी पाच विभागीय मंडळे निर्माण करुन त्यात सर्व राज्यांना समाविष्ट केले गेले.पूर्व विभागीय मंडळे निर्माण करुन त्यात त्या सर्व राज्यांना समाविष्ट केले गेले. पूर्व विभागीय मंडळात पश्चिम बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम, मणिपुर व त्रिपुरा, पश्चिम विभागात मुंबई व म्हैसुर, उत्तर विभागात पंजाब, राजस्थान, दिल्ली, हिमाचल प्रदेश, दक्षिण विभागात आंध्र, मद्रास, केरळ आणि मध्य विभागात उत्तरप्रदेश व मध्य प्रदेश यांचा समावेश करण्यात आला. प्रत्येक विभागीय मंडळात राष्ट्रपतींनी नियुक्त केलेला एक केंद्रीय मंत्री, प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री व राज्यपालांनी नियुक्त केलेले दोन मंत्री असतील तर केंद्रशासित प्रदेशात राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले प्रतिनिधी व सल्लागार असतील. विभागीय मंडळाचे कामकाज चालविण्यासाठी संबंधीत राज्यात त्या विभागीय मंडळाचे कायमस्वरुपी कार्यालय स्थापन केले जावे व त्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे वेतन, कामकाजाचा खर्च केंद्र सरकारने घ्यावा अशी तरतूद करण्यात आली.

**८.७.३ राष्ट्रहिताला धोका :**

१९५६ च्या राज्य पुर्नरचना कायद्यामुळे प्रादेशिक विकासाला गती मिळाली. हे जरी खरे असले तरी जेवढे चांगले परिणाम व्हायला पाहिजे होते तेवढे झाले नाहीत. कारण या रचनेमुळे राष्ट्रीय निष्ठा वाढण्याऐवजी संकुचित प्रादेशिक निष्ठा वाढीस लागली. भाषिक व प्रादेशिक दुराभिमान वाढला. कांही राज्यात सरहद्दीवरुन भानगडी झाल्या तर कांही ठिकाणी पाणी वाटपासाठी प्रखर मतभेद निर्माण झाले. काही राज्यात मतभेदांनी हिंसक स्वरुप धारण केले. राज्याराज्यातील विवाद्य प्रश्न सोडविण्यात कधी-कधी विभागीय मंडळे अपयशी ठरली. त्यामुळे या वादांनी रौद्र स्वरुप धारण केले. राष्ट्रहितापेक्षा प्रादेशिक हिताला प्राधान्य देणाऱ्या प्रादेशिक राजकीय पक्षांची वाढ झाली. स्थानिक लाभ मिळविण्याच्या हेतुने प्रेरित झालेले प्रादेशिक नेते राजकीय क्षितीजांवर दिसू लागले.

### ८.७.४ महाराष्ट्र व गुजरात राज्याची निर्मिती :

राज्य पुर्नरचना कायद्यानुसार मराठी व गुजराती भाषिकांचे मुंबई हे राज्य निर्माण करण्यात आले. या निर्णयाला दोन्ही भाषिकांनी विरोध करुन आंदोलन सुरु केले. अनेक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन 'संयुक्त महाराष्ट्र समिती' स्थापन केली व मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्राची मागणी केली. संपूर्ण महाराष्ट्रात दौरे, मिरवणुका, सभा, मोर्चे सुरु झाले. केंद्र सरकारने बळाच्या जोरावर हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केल्याने जनतेमधील प्रक्षोभ अधिकच वाढला. या जनआंदोलनाला महाराष्ट्रातील काँग्रेस सदस्यांचा, केंद्रातील महाराष्ट्रांच्या प्रतिनिधींचा व मुंबईच्या मुख्यमंत्र्याचाही पाठिंबा होता. नेहरुंच्या पक्षपाती धोरणाविरुद्ध डॉ.सी.डी. देशमुखांनी केंद्रातील मंत्रीपदाचा राजीनामा दिला. आचार्य अत्रे यांनी आपल्या लेखणीने महाराष्ट्र पिंजून काढला. १९५७ च्या निवडणुकीत संयुक्त महाराष्ट्र समितीने काँग्रेसचा दणदणीत पराभव केला. यावरुन मराठी जनता संयुक्त महाराष्ट्रासाठी किती उतावीळ झाली होती हे दिसून येते.

मराठी जनतेचे एका बाजूला आंदोलन सुरु असतांना दुसऱ्या बाजूला सौराष्ट्रातील गुजराती भाषिकांनी 'महागुजरात समिती' स्थापन करुन मुंबईसह स्वतंत्र गुजरातची मागणी केली. या दोन्ही आंदोलनांमुळे महाराष्ट्र व सौराष्ट्रातील हिंसाचार व तणाव वाढला. शेवटी नेहरुंनी आपला हट्ट सोडला. २५ एप्रिल १९६० रोजी मुंबई पुर्नरचना कायदा पास करण्यात आला. त्यानुसार मुंबई राज्याचे विभाजन करुन मराठी भाषिक महाराष्ट्र व गुजराती भाषिक गुजरात राज्याची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई महाराष्ट्रात असावी व गुजरातची राजधानी दुसऱ्या शहरात ठेवावी असे ठरवले गेले.संयुक्त महाराष्ट्र समितीने बेळगाव, निपाणी व कारवार प्रांत महाराष्ट्रात समाविष्ट करण्याची मागणी केली होती. पण या कायद्यात ती अमान्य झाली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तसेच गुजरात राज्याचीही निर्मिती झाली.

### ८.७.५ पंजाबची निर्मिती :

स्वतंत्र पंजाबसाठी शिखांनी आंदोलन सुरु करताच सरकारने न्यायमूर्ती शहा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने मे १९६६ मध्ये आपला अहवाल दिला. त्यामध्ये पंजाबमधील काही डोंगराळ भाग हिमाचल प्रदेशात समाविष्ट करावा, पंजाबमधील हरियाणा प्रांत वेगळा करावा, चंदीगड प्रदेश हरियाणाला द्यावा अशा शिफारसी केल्या. त्यामुळे सरकारने १९६६ मध्ये पंजाब पुर्नरचना कायदा पास करुन पंजाब व हरियाणा ही दोन राज्ये निर्माण केली. चंदीगडला केंद्रशासित दर्जा देण्यात आला तसेच पंजाब, हरियाणा व चंदीगड यांना मिळून एक उच्च न्यायालय असावे या तरतूदी करण्यात आल्या.

शिखांना पंजाब हवा होता म्हणून त्यांनी प्रखर आंदोलनाला सुरुवात केली. केंद्र सरकारने शिखांशी वाटाघाटी करुन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. या प्रश्नावर श्री. पेरुमल यांनी प्राणांतिक उपोषण केले व त्यातच त्यांचा मृत्यु झाल्याने पंजाबमधील तणाव अधिकच वाढला. संत फत्तेसिंग २६ जानेवारी १९७० पासून उपोषण करण्याची व फेब्रुवारी रोजी आत्मदहन

करण्याची धमकी दिली व उपोषणाला प्रारंभही केला. इंदीरा गांधीनी या प्रश्नांची दखल घेऊन चंदीगड पंजाबला देण्याची व हरियाणाला २० कोटी रुपये देऊन नवीन राजधानी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. परंतु पाच वर्षे चंदीगड हीच दोन्ही राज्यांची राजधानी राहील, त्यानंतर चंदीगडचे पंजाबमध्ये हस्तांतरण होईल असे सांगितले. या निर्णयामुळे शीखांचे काही प्रमाणात समाधान झाले परंतु आजही चंदीगड एक केंद्र शासित प्रदेश असून पंजाब व हरयाणा या दोन राज्यांची राजधानीसुद्धा आहे.

### ८.७.६ सिक्कीमची समस्या :

हिमालयात नेपाळ व भूतान यांच्यामध्ये असलेले सिक्कीमचे राज्य ब्रिटिशांचे संरक्षित राज्य होते. भारतातील ब्रिटिशांचे राज्य संपुष्टात आल्यानंतर सिक्कीमच्या राजाने चीनच्या प्रोत्साहनाने भारताचा प्रभाव झुगारुन देण्याचा प्रयत्न सुरु केला. हा प्रकार भारताच्या दृष्टीने धोक्याचा होता. याचवेळी सिक्कीममधील लोकांनी लोकशाही राज्यव्यवस्थेसाठी चळवळ सुरु केली. त्यामुळे सिक्कीमच्या राजाने लोकशाही सुधारणा देण्याचे व भारताशी राजकीय - आर्थिक संबंध प्रस्थापित करण्याचे ठरविले. त्यामुळे १९७४ रोजी सिक्कीमला भारताच्या सहवर्ती राज्याचा दर्जा दिला गेला. सिक्कीममध्ये लोकप्रतिनिधीगृहाची निर्मिती झाली. पण सिक्कीमच्या राजाने दडपशाही सुरु केल्याने तेथील वातावरण तंग झाले. सिक्कीमला मे १९७५ मध्ये घटकराज्याचा दर्जा देऊन भारतात सामील केले. वरील राज्यांव्यतिरिक्त १९६० मध्ये नागालँडचे राज्य तेथील जनआंदोलनाच्या दबावामुळे निर्माण करावे लागले. १९६२ मध्ये गोवा, दीव, दमण पोर्तुगीजांच्या अंमलातून मुक्त झाले व १९६६ मध्ये कायदा करुन तेथे मतदान घेऊन त्यांचा वेगळा प्रदेश निर्माण केला गेला.

१ मे १९६० महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली असली तरी तेथील सरकारने म्हैसूर राज्यातील महाराष्ट्राच्या सीमेलगतचा मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्राकडे देण्याची मागणी केल्याने वाद निर्माण झाला. हा वाद मिटविण्यासाठी इ.स. १९६६ मध्ये महाजन आयोगाची स्थापना केली पण आयोगाच्या शिफारसी महाराष्ट्राला मान्य न झाल्याने या सीमावादाचा प्रश्न तसाच रेंगाळत राहिला. १९७१ मध्ये मेघालयाला स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला. त्रिपुरा, मणीपुर व हिमाचल प्रदेशालाही राज्याचा दर्जा देण्यात आला. १९७३ मध्ये म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक ठेवण्यात आले. तसेच लक्षद्वीप, अमीन दीव, मिनीकॉय या बेटासमूहाचे नामकरण लक्षद्वीप असे करण्यात आले.

### ८.७.७ आपली प्रगती तपासा :-

१. भारतातील भाषावर प्रांत रचनेमध्ये पंजाबची निर्मिती कशी झाली ?

_______________

_______________

_______________

_______________

## ८.८ सारांश

भारतात विविध प्रकारे राज्य पुर्नरचना पार पडली असली तरी अजूनही अनेक समस्या तशाच आहेत व त्या सुटू शकलेल्या नाहीत. त्यातून अनेकवेळा कटकटी निर्माण होतात. नुकतेच पंजाबने शेजारील राज्यांना नद्यांचे पाणी देण्यास नकार दिल्याने तणाव वाढला. पावसाळ्यामध्ये अलमट्टी धरणाचे पाणी सोडण्यावरुन महाराष्ट्र-कर्नाटक यांच्यातील संबंध ताणले जातात. ही उदाहरणे या समस्येचे प्रतिनिधीत्व करतात असे म्हणावे लागेल.

## ८.९ प्रश्न

१. भारतीय संविधान निर्मितीवर प्रकाश टाकून तिची ठळक वैशिष्टये स्पष्ट करा.
२. भारतीय जुनागड, हैद्राबाद व काश्मीर च्या विलीनीकरणाचा आढावा घ्या .
३. भारतीय संस्थानांच्या विलीनीकरणामध्ये सरदार पटेलांचे योगदान यावर भाष्य करा.
४. स्वातंत्र्योत्तर भारतातील भाषावर प्रांतरचनेचे विश्लेषण करा.
५. टीपा लिहा.
    १. न्यायिक पुनर्विलोकन
    २. काश्मीरचे विलीनीकरण
    ३. गोवा मूक्ती आंदोलन
    ४. महाराष्ट्र निर्मिती, १ मे १९६०

❖❖❖❖

# १

# नेहरु युग -२

## सामाजिक व आर्थिक सुधारणा

**प्रकरण रुपरेषा**


९.० उद्दिष्टये

९.१ प्रस्तावना

९.२ भारतासमोरील आर्थिक समस्या

९.३ आर्थिक सुधारणा

९.४ पहिली पंचवार्षिक योजना

९.५ दुसरी पंचवार्षिक योजना

९.६ तिसरी पंचवार्षिक योजना

९.७ शेती विषयकसुधारणा

९.८ नेहरु कालखंडातील सामाजिक सुधारणा

 ९.८.१ भूदान चळवळ

 ९.८.२ समाजविकास

 ९.८.३ शैक्षणिक क्षेत्राचा विकास

 ९.८.४ विज्ञान व तंत्रज्ञान

 ९.८.५ अस्पृश्यता निवारण

 ९.८.६ स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा

९.९ सारांश

९.१० प्रश्न


## ९.० उद्दिष्टये

१. नेहरु कालखंडातील सामाजिक सुधारणांचा अभ्यास करणे.

२. नेहरुंच्या पंचवार्षिक योजनांचा मागोबा घेणे.

३. नेहरु कालखंडातील आर्थिक सुधारणांचा आढावा घेणे.

## ९.१ प्रस्तावना

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरु यांनी मोलाचे योगदान दिले आहे. म. गांधीच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या भारतीय स्वातंत्र्याच्या राष्ट्रीय आंदोलनात महात्मा गांधींच्या नंतर नेहरुंचे स्थान होते. प्रभावी व्यक्तीमत्व व अंगभूत गुणांमुळे ते अल्पावधीत लोकप्रिय नेते बनले. म. गांधी व पंडित नेहरु यांनी कधीही एकमेकांची साथ सोडलेली नव्हती तरी त्यांच्यात काही बाबतीत मूलभूत मतभेद होते. म. गांधीचे आर्थिक सिद्धांत व नेहरुंचे आर्थिक सिद्धांत यात फरक होता. म. गांधीना ग्रामोद्योगांवर भर देऊन खेड्यातील सामान्य माणसाचा विकास करावयाचा होता तर नेहरुंच्या मते पाश्चात्याप्रमाणे मोठमोठे उद्योगधंदे उभारुन भारताचा विकास घडवून आणायचा होता. उभय नेत्यांमध्ये कितीही मतभेद असले तरी म. गांधीनी त्यांना आपला राजकीय वारस म्हणून घोषित केले. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान झाल्यावर नेहरुंवर अनेक जबाबदाऱ्या येऊन पडल्या. ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाच्या धोरणांमुळे आर्थिक विस्कळीतपणा निर्माण झाला होता. इंग्रजामुळे दरिद्री बनलेल्या भारताला विकासाच्या मार्गावर आणून ठेवणे ही महत्वाची जबाबदारी होती. फाळणीमुळे निर्माण झालेल्या निर्वासितांचे प्रश्न, हिंदु-मुस्लिमांच्या दंगली, संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न, घटना निर्मितीचा प्रश्न, भाषिक राज्य पुर्नरचनेचा प्रश्न, काश्मीरचा प्रश्न अशा अनेक प्रश्नांना नेहरु सरकारला प्रखरपणे तोंड द्यावे लागले. जिद्दीने व चिकाटीने प्रयत्न करुन आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी या प्रश्नांवर मात केली.

पंडित जवाहरलाल नेहरु लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. केंब्रिज विद्यापीठात विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच तेथील लोकशाहीचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. त्यामुळे भारतातही लोकशाहीच्या मार्गाने वाटचाल करुन आपला विकास साधावा असे त्यांचे मत होते. या काळात त्यांच्यावर कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या विचारांचाही प्रभाव पडलेला होता. पंतप्रधान या नात्याने त्यांनी रशियाला भेट दिली तेव्हां तेथील साम्यवादी शासनव्यवस्थेचा अभ्यास करुन त्यांनी भारतात पंचवार्षिक योजना सुरु केल्या. नेहरु कालखंडातील सामाजिक व आर्थिक प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

## ९.२ भारतासमोरील आर्थिक समस्या

ब्रिटिशांनी जवळ जवळ २०० वर्षे भारताची लूट केली. भारतीय जनता ब्रिटिशांच्या आर्थिक साम्राज्यवादाखाली भरडली जात होती. दिवसेंदिवस दु:ख, दैन्य, दारिद्र्यात वाढ होत होती. यातच देशाचे विभाजन झाल्याने अर्थव्यवस्था इतकी डबघाईला आलेली होती की ती सुधारणे सहजा सहजी लवकर शक्य नव्हते. फाळणीमुळे उसळलेल्या दंगलींमुळे मोठ्या प्रमाणात जिवीत व वित्तहानी झाली. निर्वासितांचे लोंढे भारतात येत होते. त्यांच्या पुनर्वसनाचा आर्थिक बोजा सरकारवर येऊन पडला. फाळणीनंतर एकूण लागवडीखाली असलेल्या भूमीचा ५१ टक्के भाग भारताकडे आला पण त्यापैकी केवळ १८ टक्के भाग सिंचनाखाली होता. पंजाब, बंगाल व सिंधच्या फाळणीमुळे एकूण भारतातील कापड गिरण्यांना कच्च्या मालाकरिता पाकिस्तानवर

अवलंबून राहण्याची वेळ आली. भारताच्या फाळणीचा भारतीय अर्थकारणावर विशेषतः कृषी उत्पादने व अन्नधान्य ह्या क्षेत्रावर वाईट परिणाम झाला. अविभाजित भारतातील ६८ टक्के सिंचाई क्षेत्र पाकिस्तानात गेल्यामुळे गहू व तांदुळ या धान्यांच्या बाबतीत पश्चिम पाकिस्तान समृद्ध होता. लोकसंख्येचे प्रमाण पाकिस्तानपेक्षा भारतात जास्त असल्याने स्वाभाविकच अविभक्त भारताच्या तुलनेत आता भारताला अन्नधान्याचा तुटवडा जाणवू लागला. गुरांच्याही बाबतीत हीच स्थिती होती कारण भारतातील जास्त दुध उत्पादक गुरे सिंध व पश्चिम पंजाबमध्ये होती. याशिवाय अस्ताव्यस्त भूमीव्यवस्था, अनिश्चित भूमीकिराया, शेतीच्या अपुऱ्या पद्धती, एकरी कमी उत्पादन, जमिनीचे लहान लहान तुकडे, सावकाराची कर्जे, शेतात भांडवल गुंतविण्याची साशंकता, सदैव पडणारे दुष्काळ, औद्योगिक क्षेत्राची भयानक स्थिती, कमी उत्पादनाचे मार्ग, मजूरांची वाईट स्थिती, भांडवलावर इंग्रजी नियंत्रण इ. अनेक प्रश्न सरकारला भेडसावित होते.

## ९.३ आर्थिक सुधारणा / नियोजन

इ.स. १९५० मध्ये पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. या नियोजन मंडळात महत्वाचे मंत्री त्यांचे सदस्य होते. नियोजनाची उद्‌दिष्टये समाजवादी तत्वांवर आधारित होती आणि संविधानातील राज्यांची मार्गदर्शक तत्वे त्यादृष्टीने प्रेरक होती. नियोजनकर्त्यांनी पुढील उद्‌दिष्टये समोर ठेवली होती.

१. राष्ट्रांचे दरडोई उत्पन्न वाढविणे.
२. सर्वांना रोजगार उपलब्ध करुन देणे
३. संपत्ती व उत्पन्न यामधील विषमता कमी करणे
४. समता व न्यायावर आधारित समाजवादी समाजाची उभारणी करणे आणि शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण करणे.

आर्थिक नियोजनाची उद्‌दिष्टये मिश्र अर्थव्यवस्थेच्या माध्यमातून गाठावयाची होती. जेथे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रांची परस्पर सहकार्याने काम करावयाचे तसेच काही उद्योगांची मालकी व व्यवस्थापन राज्याने व खाजगी क्षेत्राने मिळून चालवावयाचे, तेलउद्योग व त्यावर आधारित उत्पादने, यंत्रनिर्मिती, विद्युतकार्य, विमाने, जहाजबांधणी यांचा समावेश सार्वजनिक क्षेत्रात होता तर खाजगी क्षेत्रात कापड उद्योग, अभियांत्रिकी, मोटार निर्मिती, सिमेंट इत्यादींचा समावेश होता.

## ९.४ पहिली पंचवार्षिक योजना (८ एप्रिल १९५१ ते मार्च १९५६) :

नियोजन मंडळाने पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार केला. या योजनेचे स्वरुप पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) दुसरे महायुद्ध व फाळणीमुळे अर्थव्यवस्थेत निर्माण झालेला विस्कळीतपणा नष्ट करणे तसेच देशाचा जलद व संतुलित विकास साधण्यासाठी अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे ही उद्दिष्टये ठरवली गेली.

२) भारतात निर्माण झालेली अन्नधान्याची टंचाई व भाववाढ या समस्या दूर करण्यासाठी या योजनेत कृषीविकासावर भर देण्यात आला. २३७८ कोटी रुपयांची ही योजना होती. या खर्चात कृषी, सामुदायिक विकास जल सिंचन, उर्जा प्रकल्प, उद्योग व खनिजे यांचा विकास, आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, वाहतुक, दळणवळण, कामगार कल्याण, मागासवर्गाचे कल्याण, यावर भर देण्यात आला. कर आकारणी, रेल्वेचे होणारे जास्तीचे उत्पन्न, देशांतर्गत कर्जे, अल्पबचत योजना या मार्गांनी ९० टक्के पैसा उभारण्यात आला. अमेरिकेकडूनही तांत्रिक स्वरुपात मदत मिळाली.

३) या पंचवार्षिक योजनेच्या काळात मान्सूनने साथ दिल्याने १९५१ मध्ये ५० दशलक्ष टन असलेले अन्नधान्य उत्पन्न १९५५ मध्ये ६४.९ दशलक्ष टन झाले. कापूस, ताग यांचेही उत्पादन वाढले. १९५५-५६ मध्ये सुमारे ३ दशलक्ष टन अधिक धान्य उत्पादन झाले.

४) कृषीप्रमाणे औद्योगिक उत्पादनही ४० टक्क्यांनी वाढले. कापड, ताग, साखर, वनस्पती, तूप, पोलाद उत्पादन, सिमेंट उत्पादन, डिझेल इंजिनचे उत्पादन, मोटारींचे उत्पादन, ॲल्युमिनियम, सायकली, शिवणयंत्रे, कागद, विजचे दिवे या सर्वांच्या उत्पादनात चांगली वृद्धी घडून आली. अनेक औद्योगिक वस्तूंचे उत्पादन भारतात होऊ लागले. तेल शुद्धीकरण, जहाजबांधणी, विमाने, रेल्वेचे डबे, पेनिसिलिन, डी.डी.टी. यांचे उत्पादन उभारले गेले.

५) कृषीविकासाला चालना देऊन या योजनेत सुमारे १६ दशलक्ष एकर जमीन सिंचनाखाली आणली. याच काळात सतलज नदीवर हिमालय खोऱ्यातील रुपारजवळ भाक्रा नांगल धरणाचे काम सुरु झाले. दामोदर खोरे योजना आणि हिराकुंड खोरे प्रकल्प असे मोठमोठे विद्युत व सिंचन प्रकल्प हाती घेण्यात आले. युद्धकाळात नादुरुस्त झालेल्या ४३० मैल लांबीचे रेल्वेमार्ग दुरुस्त करण्यात आले व ३८० मैल लांबीचे नवीन रेल्वेमार्ग टाकण्यात आले. ६२३ मैल लांबीचे राष्ट्रीय महामार्ग व ३० मोठे पूल तयार करण्यात आले. शाळा, दवाखाने, महाविद्यालये यांची संख्या वाढविण्यात आली.

६) योजनेत काही दोषही होते. राष्ट्रीय उत्पन्नात अपेक्षेप्रमाणे वृद्धी झाली नाही. योजनेच्या अंमलबजावणीत काही अडचणी निर्माण झाल्या. या काळात वाढलेल्या बेकारीचा फटका सरकारला बसला. योजनेतून जास्त रोजगार निर्मिती होऊ शकली नाही. भाववाढीवर नियंत्रण ठेवण्यास सरकारला अपयश आले. असे असले तरी ही योजना भारताच्या दृष्टीने महत्वाची होती व सरकारला या योजनेत बऱ्यापैकी यश मिळाले.

## ९.५ दुसरी पंचवार्षिक योजना (एप्रिल १९५६ ते मार्च १९६१) :

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत नियोजन मंडळाने औद्योगिकरणावर भर देण्याचे ठरवले. योजनेच्या उद्दिष्टानुसार सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग वाढवून समाजवादी समाजरचना निर्माण

करणे, अवजड उद्योगांचा विकास करणे, उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढवणे, कृषीउत्पादनक्षमता वाढविणे व भूसुधारणा करणे, गरिबांना निवारा, शिक्षण, आरोग्यसेवा निर्माण करुन देणे, बेकारीचे निर्मुलन करणे अशी उद्दिष्टये ठरविण्यात आली.

१) या योजनेत लोखंड व पोलाद उद्योगांच्या स्थापनेवर व विस्तारावर भर देण्यात आला. या योजनेत भिलाई, रुरकेला, दुर्गापुर येथे लोखंड व पोलाद उद्योगांचा विकास होण्याकडे लक्ष दिले. शिवाय वाहतूक व दळणवळण क्षेत्रात महत्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या. रेल्वेच्या विकासात ९०० कोटी व रस्त्यांच्या विकासात १४६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

२) या योजनाकाळात जलसिंचनाखालील क्षेत्र ५६.२ दशलक्ष एकरावरुन ७० दशलक्ष एकर एवढे वाढले. यांत्रिक उत्पादन करणाऱ्या कारखान्यांची वेगाने वाढ झाली. बॉयलर्स, ट्रक्टर्स, सायकली यांचे उत्पादन भारतात होऊ लागले. पोलाद-१०० टक्के, कोळसा-४० टक्के, सिमेंट-३० टक्के, विद्युत-७० टक्के, खत-१६६ टक्के, अशी या उत्पादनात वृद्धी झाली. कापड, साखर उद्योगांचीही प्रगती झाली. दामोदर व्हॅली, भाक्रानांगल, तुंगभद्रा, हिराकुंड या चार योजनांचा नदीघाटी योजनेत समावेश करण्यात आला. तसेच चंबळ, रिहांद, कोयना, नागार्जुन सागर या योजनांचा आरंभ करण्यात आला. वैज्ञानिक-तांत्रिक शिक्षण, संशोधन संस्था, आरोग्यसेवा सोयी वाढविण्यात आल्या.

३) या योजनेच्या सुरुवातीलाच अवर्षण, प्रतिकुल हवामान, साठेबाजी, काळाबाजार, भाववाढ, अन्नधान्य टंचाई, साधनसामग्रीचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे अडचणी निर्माण झाल्या या योजनेच्या काळात वाढत्या किंमतीचा फायदा उद्योजकांना व व्यापाऱ्यांनी घेतला. शेतकरी व गोरगरिबांना काहीही लाभ मिळू शकला नाही. काळाबाजार व भ्रष्टाचारामुळे देशातील संपत्ती काही लोकांच्या हाती केंद्रीत होऊ लागल्याने सरकारवर विरोधकांचा दबाव वाढला. ग्रामीण व शहरी विभागात बेकारी वाढली. तरीही या योजनेमुळे औद्योगिक विकासाचा पाया मजबूत झाला.

## ९.६ तिसरी पंचवार्षिक योजना (एप्रिल १९६१ ते १९६६)

१९६१ मध्ये सुरु झालेल्या या योजनेचे उद्दीष्ट प्रामुख्याने पहिल्या व दुसऱ्या योजनेतील उद्दीष्ट गाठण्यासाठी कार्याची अमंलबजावणी करणे हे होते. राष्ट्रीय उत्पन्नात दरवर्षी ५ टक्के वाढ करणे, अन्नधान्याबाबत स्वयंपूर्णता गाठणे, औद्योगिकरणासाठी पोलाद, उर्जा उद्योगांचा विस्तार करणे, रोजगार निर्मिती करणे ही या योजनेची उद्दीष्टये होती.

१) तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही. या काळात अनंत अडचणी आल्या. प्रतिकूल परदेश व्यापार, १९६२ चे चीनचे आक्रमण १९६४-६५ मधील अवर्षण व दुष्काळी परिस्थिती, विद्युतनिर्मितीवर झालेला विपरित परिणाम, औद्योगिक क्षेत्राला अपुरा वीजपुरवठा, प्रचंड भाववाढ, १९६५ मधील पाकिस्तानशी युद्ध, अमेरिकन मदत येणे बंद इत्यादी अडचणीमुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले.

२) या योजनेत ७५०० कोटी रुपये सार्वजनिक क्षेत्रात व ४१०० कोटी रुपये खाजगी क्षेत्रात गुंतवण्याचे ठरले होते पण चीन विरुद्धच्या युद्धामुळे संरक्षणाकडे लक्ष द्यावे लागले व युद्धसाहित्यावरील खर्च वाढवावा लागला. १९६७ मध्ये संरक्षणावर ९०० कोटी रुपये खर्च करण्यात आले. या खर्चामुळे भाववाढ मोठ्या प्रमाणात झाली.

३) कृषी जलसिंचन, उर्जा, संघटीत उद्योग या विकासाच्या क्षेत्रात ठरवून दिलेली लक्ष्ये गाठली गेली नाहीत. कृषीउत्पादनात अवर्षण व प्रतिकूल हवामानामुळे घट झाली. मात्र ६ दशलक्ष एकर जास्तीची जमिन ओलिताखाली आणली गेली.

४) औद्योगिक क्षेत्रात आशादायक प्रगती घडून आली. औद्योगिक उत्पादनाचा दर प्रत्येक वर्षी स्पेस ७ ते ८ टक्क्यापर्यंत वाढला. सिमेंट, लोखंड, कोळसा या उद्योगात अपेक्षित लक्ष्य गाठता आले नाही. वहातूक व दळणवळण क्षेत्रात रस्ते, जलवाहतूक, बंदरे, वायुसेवा, पोष्ट, टेलिफोन, या सोईची क्षमता वाढली. ॲल्युमिनियम, विद्युत उपकरणे, सुती कापडयंत्रे, विजेवर चालणारे पंप, साखर या उद्योगांची प्रगती झाली.

## ९.७ शेती विषयकसुधारणा :

भारताच्या अर्थव्यवस्थेत शेतीक्षेत्राला पूर्वीपासून महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिशांच्या काळात भारतीय शेतकऱ्यांची वाताहत झाली. व्यापारी पिकांमुळे शेतकरी दरिद्री बनले. भारतात जमिनदारी पद्धतीमुळे कृषीक्षेत्रात प्रचंड विषमता होती. स्वातंत्र्यानंतर नेहरु सरकारने शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शेतीतून अन्नधान्याचे जास्तीत जास्त उत्पादन वाढविण्याचे धोरण निश्चित केले.शेतीविषयक सुधारणा करतांना जमिनीच्या मालकी हक्काचा प्रश्न सोडविणे व लागवडीच्या सुधारणेवर भर देणे या गोष्टी मान्य करण्यात आल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेत राष्ट्रीय स्तरावरील जमिनीविषयक धोरण जाहीर केले. शेतीसुधारणा घडवून आणणारे विविध कायदे पास केले. त्यानुसार शेतीक्षेत्रात पुढील सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्यात आले. जमिनदारी पद्धतीचा नाश, कुळांना जमिनीचे मालकी अधिकार देण्यासंबंधीचा कायदा, सहकार शेतीला प्राधान्य, शेतीला पाणीपुरवठा करणाऱ्या जलसिंचनाच्या नवनवीन प्रकल्पांना मंजूरी देऊन पाणीपुरवठ्याच्या योजनांवर भर देण्यात आला. कमाल जमिन धारणा कायदा पास करुन अतिरिक्त जमिनीचे वितरण व सहकारी शेतीला प्रोत्साहन देणे ही उद्दीष्टे या कायद्यामागे होती.

थोडक्यात पंडित नेहरुंनी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाच्या औद्योगिकरणाला व अर्थकारणाला चालना देऊन देशाचा आर्थिक विकास घडवून आणला. लघु व कुटीर उद्योगाची वाढ करण्यात आली. तंत्रज्ञ व कुशल कामगार वर्ग निर्माण करण्यासाठी कामगारांच्या प्रशिक्षणांवर व सुखसुविधांवर लक्ष देण्यात आले. भारतीय अर्थव्यवस्थेला हानीकारक ठरणार नाही. अशी विदेशी भांडवल गुंतवणूक मान्य करुन पडिंत नेहरुंनी आर्थिक सुधारणा घडवून आणल्या.

### १.७.१ आपली प्रगती तपासा :-

१. नेहरु युगातील आर्थिक सुधारणांचा यादी बनवा.

## १.८ नेहरु कालखंडातील सामाजिक सुधारणा

पंतप्रधान पंडित नेहरुंनी देशाच्या सर्वांगीण विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून चालना दिली. औद्योगिक विकासाबरोबरच सामाजिक विकासाकडेही लक्ष दिले. सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी विविध सामाजिक सुधारणा घडवुन आणल्या.

### १.८.१ भुदान चळवळ :

पंडित नेहरुंनी कृषी विकासाला चालना दिली. शेतीसंबंधी अनेक योजना कार्यान्वित केल्या. सिंचन प्रकल्प सुरु केल, गरिब व भूमिहीन शेतकऱ्यांना हक्काची जमिन मिळवून देण्याची चळवळ म्हणजे भुदान चळवळ. म. गांधीचे अनुयायी आचार्य विनोबा भावे यांनी १९५१ मध्ये ही चळवळ सुरु केली. प्रमाणापेक्षा अधिक जमीन बाळगणाऱ्या लोकांनी आपली काही जमिन भूमिहीन शेतकऱ्यांना स्वयंस्फूर्तीने दान करावी असे आवाहन आचार्य विनोबा भावेनीं केले त्यासाठी देशात अनेक भागात पदयात्रा काढल्या. त्यांच्या पदयात्रांना चांगला प्रतिसाद मिळाला. १९५६ पर्यंत भुदानात ४३,८१,८७१ एकर जमिन मिळाली. अनेक भूमिहीनांना नवीन जमिनी मिळाल्या.

भूदान चळवळीचे रुपांतर हळूहळू ग्रामदान चळवळीत झाले. एखाद दुसऱ्या भूमिहीनाला जमीन देण्याऐवजी ती संपूर्ण खेड्याला देण्याची पद्धती सुरु करण्यात आली. खेड्यातील सर्व लोकांनी या जमिनीवर मेहनत करावी आणि येणारे पीक सम प्रमाणात आपसात वाटून घ्यावे अशी अपेक्षा होती. अशा पद्धतीने १९५६ पर्यंत १२,८४० खेडी मोठमोठ्या भूधारकांनी ग्रामदानात अर्पण केली.

### १.८.२ सामुदायिक विकास :

२ ऑक्टोबर १९५२ रोजी भारत सरकारने समुदाय विकासाचा कार्यक्रम घोषित केला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्रत्येक खेड्याचा सर्वांगीण योजनाबद्ध विकास घडवून आणणे हा होता. या कार्यक्रमासाठी ५५ विभाग पाडण्यात आले. प्रत्येक विभागाच्या अंतर्गत १०० खेड्यांचा समावेश होता. प्रत्येक खेडयाचा विकास व देखरेख करण्यासाठी ग्रामसेवक नेमला होता. प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त होते. या कार्यक्रमाला काही प्रमाणात यश मिळाले. शेतमालाच्या उत्पादनात वाढ, पक्क्या रस्त्यांची बांधणी व दळणवळण वाढ, ग्रामीण उद्योगांना

उत्तेजन, शिक्षणाचा प्रसार, आरोग्य सेवेचा विस्तार, गृह बांधणी कार्यक्रम यांचा विकास घडून आला.

१९५७ मध्ये सरकारने बलवंतराय मेहता समिती नेमली. या समितीने ग्रामीण व जिल्हा पातळीवर प्रगती करण्यासाठी लोकशाही पद्धतीचे प्रगती करण्यावर भर दिला. गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली. समुदाय विकास कार्यक्रम या तीन संस्थांशी जोडण्यात आला. हजारो सहकारी संस्था ग्रामीण भागाशी जोडल्या गेल्या.

### ९.८.३ शैक्षणिक क्षेत्राचा विकास :

स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने साक्षरतेची मोहीम व्यापक करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण हा विषय राज्य सरकारांच्या हाती देण्यात आला. राष्ट्रीय प्रतिष्ठेची शिक्षण केंद्रे उदा. बनारस हिंदू विद्यापीठ, अलीगढ मुस्लिम विद्यापीठ वगैरे केंद्र सरकारच्या ताब्यात असावी असे ठरले. या निर्णयामुळे प्रत्येक राज्याला आपले शैक्षणिक धोरण स्वतंत्रपणे ठरविण्यात आले.

१९४७ रोजी भारतात साक्षरतेचे प्रमाण केवळ १४ टक्के होते. त्यामुळे सरकारने १४ वर्षे वयापर्यंतच्या मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा निर्णय घेतला. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ५० टक्के प्राथमिक शाळा या मुलभूत शिक्षण योजनेच्या धर्तीवर स्थापन करण्यात आल्या. शिवणकाम, सुतकताई, लोहारकाम, सुतारकाम सारख्या व्यावसायिक शिक्षणावर, प्राथमिक शिक्षणावर भर देण्यात आला. १९५० ते १९६० या दरम्यान शिक्षणाबरोबर सरकारने माध्यमिक शिक्षणाकडे ही लक्ष दिले. १९५२ मध्ये मद्रास विद्यापीठाचे कुलगुरु व शिक्षणतज्ञ डॉ. ए.एल. मुदलीयार यांच्या अध्यक्षतेखाली एक माध्यमिक शिक्षण आयोग नेमला. १९५३ मध्ये या आयोगाने आपला अहवाल जाहीर करुन शाळांमधून दिले जाणारे शिक्षण हे जीवनापासून विभक्त करणारे व विद्यार्थ्यांचा व्यक्तीमत्व विकास न घडवणारे आहे असे नमूद करुन कांही शिफारशी सुचविल्या. या शिफारशीमुळे शिक्षकांचे प्रशिक्षण, पुरेसे वेतन, मातृभाषाबरोबर राष्ट्रभेषेचे व इंग्रजीचे शिक्षण, उत्तम पाठ्यपुस्तके, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण, दृक-श्राव्य साधनांचा वापर अशा सूचना केल्या.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सरकारने या शिफारशींचा अवलंब केला. त्यातूनच १९६१ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, ( N.C.E.R.T ) या संस्थेची स्थापना झाली. भारत सरकारने उच्च शिक्षणाचा विचार करण्यासाठी १९४८ मध्ये डॉ, सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने केलेल्या शिफारशीवरुन १९५३ मध्ये विद्यापीठ अनुदान मंडळाची (U.G.C.) निर्मिती करण्यात आली. पदवी नंतरचे शिक्षण व संशोधन यांना प्रोत्साहन व मदत देण्याचे कार्य या मंडळाकडे सोपविण्यात आले. कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालये सुरु करण्यात आली. १९५०-५१ मध्ये विद्यापीठांची संख्या २७ व महाविद्यालय यांची ४२ होती. ती १९६५-६६ मध्ये अनुक्रमे ६४ व १७८८ एवढी वाढली. १९५८ मध्ये ग्रामीण क्षेत्रात उच्चशिक्षणाचा विकास होण्यासाठी राष्ट्रीय कौन्सिलची स्थापना करण्यात आली. या कौन्सिलने ग्रामीण भागात १३ संस्था विकासाकरिता निवडल्या. देशाच्या अनेक भागात कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आली.

### ९.८.४ विज्ञान व तंत्रज्ञान :

राष्ट्रांच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारने विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, कृषी, वैद्यक या महत्वाच्या ज्ञानशाखांवर लक्ष केंद्रीत केले. त्यासाठी १९५८ मध्ये एक ठराव केला. या ठरावानुसार देशाच्या भिन्न भागात इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स व इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्था स्थापन करण्यात आल्या. पंडित नेहरुंनी संपन्न व बलशाली भारताचे स्वप्न पाहिले. १९४८ मध्ये अणुशक्ती आयोगाची स्थापना करुन डॉ. होमी भाभा यांची अध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच केंद्रशासनात अणुशक्ती खातेही निर्माण करण्यात आले. मुंबईनजीक ट्रॉम्बे येथे अणुभट्टी केंद्र निर्माण केले. जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, धातुशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स या ज्ञानशाखांत मुलभूत संशोधनाची व्यवस्था करण्यात आली. महत्वाच्या औषधांबाबतही संशोधन होऊ लागले. कर्क रोगासारख्या असाध्य रोगावर संशोधन होऊ लागले. तारापूर, कल्पकम येथे अणु संशोधन संस्था अस्तित्वात आल्या. अणुशक्तीचा वापर विनाशकारी कार्यासाठी न करता शांततापूर्ण विकासासाठी केला जाईल असे नेहरुंनी जाहीर केले.

### ९.८.५ अस्पृश्यता निवारण :

भारतीय समाजात जातीयता हा समाजाला लागलेला कलंक मानला जातो. कठोर जाती व्यवस्थेचा फटका कनिष्ठ जातींना मोठ्या प्रमाणात बसला होता. हजारो वर्षापासून हा वर्ग अन्याय व अत्याचार सहन करीत होता. अस्पृश्यतेच्या नावाखाली समाज दुभंगला होता. समाजातील स्पृश्य-अस्पृश्यता जीवघेणी बनली होती. ब्रिटिश काळात इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे या प्रश्नाला वाचा फुटली. १९ व्या शतकात अनेक समाजसुधारकांनी पुढाकार घेऊन या प्रथेविरुद्ध आंदोलने केली. अस्पृश्यतेविरुद्ध मोठ्या प्रमाणात प्रबोधन घडून आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून अस्पृश्यता पाळणे कायदयाने गुन्हा मानून त्याच्या विरुध्द कडक नियम केले.. डॉ. आंबेडकरांनी समता निर्माण करण्यासाठी अस्पृश्यता नष्ट करण्याचे घटनेद्वारे प्रयत्न केले. १९५५ मध्ये 'अत्याचार प्रतिबंधक कायदा' पास करण्यात आला. हिंदुची मंदीरे, सार्वजनिक संस्था व स्थळे अस्पृश्यांना खुली करण्यात आली. तसेच अस्पृश्यता पाळणे व अस्पृश्यतेला प्रोत्साहन देणे हा गुन्हा ठरवला गेला. त्यासाठी कारावास व दंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली.

### ९.८.६ स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा :

पंडित नेहरु सामाजिक सुधारणेचे खंदे समर्थक होते. स्वातंत्र्यानंतर समाजातील स्त्रियांचा दर्जा सुधारण्यासाठी महत्वाचा कायदा तयार करण्याचे काम तत्कालिन कायदेमंत्री डॉ. आंबेडकरांनी केले. डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणारे हिंदू कोड बील घटना समितीपुढे मांडले पण या काँग्रेसमधील सनातनी मंडळीनी कठोर विरोध केला. नेहरुंवरही दडपण आल्याने त्यांनी या बिलाला समंती दिली नाही. डॉ. आंबेडकर नाराज झाले व त्यांच्या निषेधार्थ त्यांनी कायदे मंत्री पदाचा राजीनामा दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा वरील प्रयत्न मात्र वाया गेला नाही कारण सनातनी वर्गाचा जोर कमी होताच पंडित नेहरुंनी महिलांसाठी विविध कायदे पास करुन घेतले. १९५४ साली "स्पेशल मॅरेज ॲक्ट" पास होऊन भिन्न धर्मीय स्त्री- पुरुषांना आपला धर्म न सोडता विवाह करण्याची तरतुद करण्यात आली. १९५५ मध्ये हिंदू विवाह कायदा, १९५६ मध्ये हिंदू वारसा कायदा व हिंदू दत्तक कयदा हे कायदे पास झाले. नवीन कायद्यानुसार वारसासंबंधी मालमत्तेच्या

वाटणीसंबंधी स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार मिळाले. घटस्फोटीत स्त्रिला पोटगीचा व दत्तक घेण्याचा हक्क मिळाला. १९५६ च्या एका कायद्याने स्त्रियांच्या अनैतिक व्यापाराला बंदी घातली. १९६१ साली हुंडा प्रतिबंधक कायदा पास करण्यात आला. या कायद्यामुळे स्त्रियांच्या स्थितीत पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात बदल घडून आले.

### ९.८.७ आपली प्रगती तपासा :-

१. नेहरु कालखंडातील सामाजिक सुधारणांचा वृत्तांत दया.

## ९.९ सारांश

भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित नेहरूंची कामगिरी सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय होती. नेहरुंनी अंतर्गत व परराष्ट्र धोरण अत्यंत प्रभावीपणे राबविले. रशियाबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर एक चांगला मित्र मिळवला. त्यांच्याच धर्तीवर पंचवार्षिक योजना राबवून सामाजिक, आर्थिक, औद्योगिक क्षेत्रात मोठी प्रगती गाठली. अनेक समस्यांना तोंड देत देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत प्रकल्पाची उभारणी नेहरुंच्या कार्यकाळात झाली होती. म्हणून नेहरु युग सर्वार्थाने उल्लेखनीय होते.

## ९.१० प्रश्न

१) नेहरु कालखंडातील आर्थिक प्रगतीचा मागोवा घ्या.

२) नेहरु कालखंडातील सामाजिक सुधारणां विषयी विश्लेषण करा.

❖❖❖❖

# १०

# नेहरु युगानंतरचा भारत - १

## देशांतर्गक विकास,बँकांचे राष्ट्रीयीकरण व हरितक्रांती

**प्रकरण रुपरेषा :**

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ देशांर्तगत विकास
१०.३ लाल बहादूर शास्त्री यांची कारकीर्द (१९६४-६६)
१०.४ शास्त्रींचे अंतर्गत धोरण
१०.५ शास्त्रींचे परराष्ट्र धोरण
१०.६ इंदिरा गांधीचा उदय (१९७७-१९८४)
१०.७ इंदिरा गांधींचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण
१०.८ संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द
१०.९ बँकांचे राष्ट्रीयीकरण
१०.१० हरितक्रांती
१०.११ सारांश
१०.१२ प्रश्न

## १०.० उद्दिष्टे

१) देशांतर्गत विकासाचा आढावा घेणे.
२) लाल बहादूर शास्त्री यांच्या कारकिर्दीचा अभ्यास करणे.
३) इंदिरा गांधी यांच्या प्रशासनाचे विवेचन करणे.
४) बँका / उद्योग धंद्यांच्या राष्ट्रीयकरणा विषयीचे विश्लेषण करणे.
५) हरितक्रांती व त्याचे परिणाम समजून घेणे.

## १०.१ प्रस्तावना

२७ मे १९६४ मध्ये पंडित जवाहरलाल नेहरुंचे निधन झाले व त्यानंतर लालबहादूर शास्त्री यांनी १९६४ ते १९६६ पर्यंत पंतप्रधानाचा पदभार सांभाळून भारताचा विकास केला. त्यांच्याच काळात भारत व पकिस्तानमध्ये १९६५ ला युध्द झाले व युध्दात भारताचा विजय

त्यांच्या मुळेच झाला. त्यांच्या मृत्यूनंतर (१९६६) इंदिरा गांधीजी पंतप्रधान बनल्या. त्या १९६६ ते १९७७ पर्यंत पदावर होत्या. त्यांच्या कारकीर्दित चांगले व वाईट दोन्ही बदल झालेले दिसून येतात. त्यांनी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले व संस्थानिकांचे तनखे व हक्क रद्द केले. त्याच्या प्रमाणे त्यांनी शेतीक्षेत्रात हरितक्रांतीच्या माध्यमातून क्रांती घडवून आणली व भारत अन्नधान्याच्या दृष्टिकोनातून स्वावलंबी बनला. परंतु त्यांचे नंतर खूप विरोधक निर्माण झाले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांनी अंतर्गत आणिबाणी जाहीर केली. आणीबाणीमूळे इंदिरा गांधीची लोकप्रियता कमी झाली व १९७७ च्या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव झाला.

## १०.२ देशांतर्गत विकास

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु एक प्रभावी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी केलेल्या सर्वांगीण प्रगतीमुळेच शक्तीशाली भारताचे स्वप्न पूर्ण झाले. स्वतंत्र भारतातील विविध समस्यांवर अतिशय संयमान मात करुन जगाच्या राजकारणात नाव लौकिक संपादन केला. पंडित नेहरुंच्या जीवनातील अखेरची दोन - तीन वर्षे अत्यंत खडतर व प्रकृतीच्या अस्वस्थाची गेली. नेहरुंच्या आजारपणाच्या काळात काँग्रेसमध्ये नेहरु नंतर कोण ? या प्रश्नांची चर्चा सुरु झाली. इ.स. १९६२ च्या चीन आक्रमणामुळे पंडित नेहरु मानसिक व शारीरिकदृष्ट्या थकलेले होते. ८ जानेवारी १९६४ रोजी त्यांना पक्षघाताचा सौम्य झटका आला. त्यामुळे मंत्रीमंडळातील गुलझारीलाल नंदा, कृष्णमाचारी, यशवंतराव चव्हाण, स्वर्णसिंग यांची एक 'इमर्जन्सी कमिटी' स्थापन केली. २२ जानेवारी १९६४ रोजी लाल-बहादूर शास्त्री यांची बिनखात्याचे मंत्री म्हणून नियुक्ती केली.

पंडित नेहरु नंतर देशाची सूत्रे कोणाकडे द्यावी, हे नेहरुंनी स्वतःच घोषीत करावे असे काँग्रेस पक्षातील अनेक ज्येष्ठ नेत्यांना वाटत होते. नेहरुंनी आपला वारस घोषित करण्याचे प्रकर्षाने टाळले. २७ मे १९६४ रोजी नेहरुंची प्राणज्योत मालवली आणि संपूर्ण देश शोकसागरात बुडाला. नेहरुंच्या निधनाने राजकीय पोकळी निर्माण झाली. विशेषतः काँग्रेस पक्षामध्ये पोकळी निर्माण झाली. १९४७ ते १९६४ या प्रदीर्घ कालखंडात नेहरुंनी पंतप्रधानपद अत्यंत मुत्सद्दीपणे सांभाळले. त्यांच्या सारखा नेता पक्षात पुन्हा निर्माण होऊ शकला नाही. नेहरुंच्या व्यक्तीमत्त्वामुळे त्यांच्या हयातीत त्यांना अंतर्गत विरोधकही निर्माण झाले नाहीत. नेहरुंच्या निधनानंतर भारतातील लोकशाही नष्ट होईल असे पाश्चात्यांना वाटत होते. पण नेहरुंनी लोकशाहीचा पाया बळकट बनवला असल्याने त्यांच्यावरील इमारत कायम टिकून राहिली.

## १०.३ पंतप्रधान लालबहादूर शास्त्री (२ ऑक्टोबर १९६४-१० जानेवारी १९६६)

पंडित जवाहरलाल नेहरुंच्या मृत्यूनंतर पंतप्रधान पदाच्या शर्यतीत काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांच्या नावाची चर्चा होती. इच्छुकांच्या यादीत प्रामुख्याने मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, गुलझारीलाल नंदा, इंदिरा गांधी, तामिळनाडूचे माजी मुख्यमंत्री कामराज नाडर इत्यादींच्या नावांचा समावेश होता. मोरारजी देसाई यांना बडे भांडवलदार, बडे शेतकरी व श्रीमंत वर्गाचा

पाठिंबा होता. ते काँग्रेसमधील ज्येष्ठ व अनुभवी व्यक्तीमत्व होते. कार्यक्षम प्रशासक आणि प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून त्यांची लोकप्रियता होती. त्यांनी उतावीळपणे आपली उमेद्वारी जाहीर करुन टाकली. परंतू विक्षिप्त, असहिष्णू आणि अहंकारी स्वभावाच्या मोरारजींना अनेकांचा विरोध होता. त्यात कामराज आघाडीवर होते. काँग्रेसमधील डाव्या विचारसरणीच्या लोकांना भूतपुर्व प्रधानमंत्री पंडित नेहरुंची कन्या इंदिरा गांधीनी पंतप्रधान बनावे असे वाटत होते. पण ते शक्य झाले नाही. तिसरे महत्वाचे उमेद्वार लालबहादूर शास्त्री मृद– मितभाषी, सर्वांना बरोबर घेऊन जाणारे व आदरणीय व्यक्तीमत्व होते. कामराजच्या शब्दाला वजन होते. काँग्रेसमधील एका प्रभावी गटाचे म्हणजेच 'सिंडीकेटचे' ते नेते होते व १९६३ मध्ये ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. सिंडीकेटचा पाठिंबा ज्या उमेदवाराला मिळेल,तो पंतप्रधान म्हणून सत्तेवर येणार, ही काळया दगडावरची रेघ होती. सिंडीकेटचे नेते व अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष कामराज नाडर यांच्या प्रयत्नामुळे लालबहादूर शास्त्रींचे पारडे जड झाले. देशातील अनेक खासदारांचा, मुख्यमंत्र्यांचा शास्त्रींना पाठिंबा मिळाला. पश्चिम बंगालचे-अतुल्य घोष, आंध्र प्रदेशचे-निलम संजीव रेड्डी, मोरारजी देसाई, इंदिरा गांधी यांना मंत्रिमंडळात प्रवेश दिला. लालबहादूर शास्त्री हे मृदू स्वभावाचे व म.गांधींचे एकनिष्ठ अनुयायी होते. त्यांना गांधीजींचा मार्ग पसंत होता. नेहरुंची जागा आपण भरुन काढू शकत नाही, याची त्यांना जाणीव होती. अत्यंत सावधपणे त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली.

## १०.४ लालबहादूर शास्त्रींचे अंतर्गत धोरण

पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना शास्त्री म्हणाले, वाढती महागाई, संरक्षण, गरिबी आणि बेराजगारी, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय संपत्तीचे समान वितरण आणि शांततेच्या मार्गाने नवी समाजव्यवस्था निर्माण करणे, इत्यादी गोष्टींना अग्रकम देण्यात येईल.

### १) शास्त्री सच्चे गांधीवादी :

आचार व विचारांनी लालबहादूर शास्त्री हे सच्चे गांधीवादी होते. खेड्यांची स्वयंपूर्णता आणि कठोर परिश्रम यावर त्यांचा भर असल्याने त्यांचा मोठमोठ्या यांत्रिक प्रकल्पांना विरोध होता. मोठ्या यांत्रिक प्रकल्पात गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर लागते. त्यात मनुष्यबळाचा वापर अत्यल्प असून अशा प्रकल्पातून मिळणारे लाभ हे दूरगामी असतात, असे शास्त्रींचे मत होते. कॅबिनेट मंत्र्यांच्या पहिल्याच बैठकीत ते म्हणाले, मी लहान माणूस आहे आणि माझा लहान प्रकल्पावर, त्यावर होणाऱ्या अल्प खर्चावर व त्यातून मिळणाऱ्या झटपट परिणामांवर विश्वास आहे.

### २) अन्नधान्याची समस्या :

लालबहादूर शास्त्रींच्या काळात देशात अन्नधान्याचा भयंकर तुटवडा निर्माण झाला. देशाची अर्थव्यवस्था चांगली नव्हती. प्रारंभीच्या काळातच अन्नधान्याचा प्रचंड दुष्काळ पडला. धान्य करिता दंगली होऊ लागल्या. किमंती झपाट्याने वाढल्या. साठेबाजी, काळाबाजार,

भ्रष्टाचार यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली. सगळीकडे स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. विरोधी पक्षांनी सरकारला धारेवर धरले. तर वृत्तपत्रात रोज टीकेची झोड सुरु झाली. पंतप्रधान मोठ्या अडचणीत सापडले. या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी प्रथम दिल्ली येथे मुख्यमंत्र्यांची बैठक बोलवली. बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले. मोठ्या शहरातून रेशनिंग व्यवस्था सुरु करावी, अधिक भावाने धान्य विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशा सूचना केल्या. ५ नोव्हेंबर १९६४ रोजी एक वटहूकूम काढून अन्नधान्याचा साठा व पुरवठा याबाबतच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांवर खटले भरण्यात येतील, असे जाहीर केले.

अन्नधान्याबाबत अमेरिकेची मदत मिळावी यासाठी रेल्वेमंत्री स.का.पाटील यांना अमेरिकेत पाठविले. त्यांनी केलेल्या विनंतीमुळे अमेरिकेने ४ लाख टन गहू व ३ लाख टन तांदूळ ताबडतोब भारतात पाठविला. देशातील मुख्यमंत्र्यांनी मात्र शास्त्रींना फारसे सहकार्य केले नाही. यावरुन नेहरुंच्या काळातील पंतप्रधानाचा दबदबा कमी झाला, हे दिसून येते.

## ३) आर्थिक परिस्थिती :

लालबहादूर शास्त्रींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली, तेव्हा भारताची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नव्हती. १९६१-६२ आणि १९६३-६४ या वर्षात राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग हा लोकसंख्या वाढीच्या वेगापेक्षा कितीतरी कमी होता. १९६१ ते ६४ या काळात वस्तूंच्या किंमतीत ४९ टक्क्यांनी वाढ झाली होती. कमी उत्पन्न गटातील लोकांना अन्नधान्याच्या बाबतीत ३० टक्के सूट होती. काही विशाल नद्यांच्या खोऱ्यातील प्रकल्प अपेक्षेपेक्षा कितीतरी कमी परिणाम देत होते.

लालबहादूर शास्त्रींना नेहरुंचा मार्ग टाळायचा नव्हता. परंतु त्यांना चाकोरीबध्द वाटही मान्य नव्हती. १९ सप्टेंबर १९६४ रोजी संसदेपुढे बोलताना ते म्हणतात, खरा नेता कधीही मळलेली वाट चोखाळत नाही, कारण परिस्थिती सतत बदलत असते. बदलत्या परिस्थितीनुसार नेत्यानेही बदलायला हवे.

## ४) लालबहादूर शास्त्री आणि योजना आयोग :

लालबहादूर शास्त्री नेहरु मंत्रीमंडळात वाणिज्य मंत्री असले, तरी ही मंत्रीमंडळावर नेहरुंचा इतका प्रभाव होता की, शास्त्रींना स्वतंत्रपणे करण्यासारखे काहीही नव्हते. त्यामुळे आर्थिक निर्णय घेण्याबाबत त्यांचा अनुभव तोकडा होता. शास्त्री प्रामाणिक असल्याने त्यांनी ही बाब लपवून ठेवली नाही. जेव्हा चतुर्थ पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला तेव्हा शास्त्रींनी नेहरुंच्याच मार्गदर्शक तत्वांचा पाठपुरवठा केला. परंतु उद्योगधंद्यापेक्षा त्यांनी कृषिक्षेत्रातील गुंतवणुकीला अग्रक्रम दिला. म.गांधीचा हवाला देऊन शास्त्री म्हणत, परमेश्वराला भारतात प्रकट व्हायचेच असेल तर तो भाकरीच्या तुकड्याच्या रुपातच प्रकट होईल. योजना आयोगाने तयार केलेल्या चतुर्थ पंचवार्षिक योजनेच्या व्यापक आराखड्याबाबत योजना आयोगाला खडसावताना शास्त्री म्हणाले, "आपण आपल्या जवळील कपड्याची लांबी-रुंदी लक्षात घेऊन त्यानुसार कोट शिवला पाहिजे . शास्त्रींच्या मते 'योजना आयोग म्हणजे

बोलघेवड्या बुध्दिवंतांचे दुकान होते'. परिषद संपन्न झाली. भारताचे प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान लालबहादूर शास्त्री सदर परिषदेला उपस्थित होते. कैरो परिषदेत शास्त्रींच्या साध्या राहणीचे खूप कौतुक झाले. कैरोच्या ज्या हिल्टन हॉटेलात शास्त्री मुक्कामाला होते. त्या हॉटेलच्या खोलीत त्यांचे शुध्द शाकाहारी जेवण ते तयार करत. यामुळे हिल्टन हॉटेलने त्यांच्या जेवणाच्या बिलाऐवजी खोलीच्या रंगरंगोटीचे बिल सादर केले. चीनने अणुबॉम्बची चाचणी घेऊ नये, असा आग्रह शास्त्रींनी या परिषदेत धरला. त्यासाठी पेकिंगला शिष्टमंडळ पाठविण्याची योजनाही त्यांनी मांडली. परंतु त्यांच्या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही.

## १०.५ शास्त्रींचे परराष्ट्र धोरण

शेजारी राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्यासाठी पंतप्रधान शास्त्रींनी परराष्ट्रमंत्री सरदार स्वर्णसिंग यांना नेपाळ, श्रीलंका व आग्नेय आशियातील राष्ट्रांच्या दौऱ्यावर पाठविले. शास्त्री स्वतः कोलंबोला गेले व त्यांनी श्रीलंकास्थित भारतीय मूळ असलेल्या नागरिकांच्या प्रश्नास हात घातला. या प्रश्नी दोन्ही देशात करार होऊन श्रीलंकेतील ९,७५,००० भारतीय मूळ असलेल्या नागरिकांपैकी ५,२५,००० नागरिकांची जबाबदारी भारताने पत्करली. श्रीलंकेने ३ लाख नागरिकांना श्रीलंकेचे पूर्ण नागरिकत्व देण्याचे मान्य केले.

### १) पाकिस्तानचा कच्छ रणातील प्रदेशावर ताबा :

३ मार्च १९६५ रोजी लोकसभेत परराष्ट्रमंत्र्याने कथन केले की, २५ जानेवारी १९६५ पासून भारताच्या कच्छ प्रदेशात पाकिस्तानची घुसखोरी सुरु आहे. याच दिवशी परराष्ट्रखात्याच्या राज्यमंत्र्यांनी राज्यसभेत सांगितले की, भारताचा या भागातील तीन हजार एकर भूभाग पाकिस्तानच्या ताब्यात आहे. कांजरकोट भागात पाकिस्तानने दोन ते चार चौरस किलोमीटर तर बारबेट भागात पन्नास ते पंचाहत्तर चौरस किलोमीटर भूप्रदेश पाकिस्तानने बळकावला होता. भारताने या प्रदेशाची मागणी केली असता पाकिस्तानने ९ एप्रिल १९६५ रोजी भारतात अधिक घुसखोरी करुन भारताच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. शास्त्रींना शेजारी पाकिस्तानशी युध्द नको होते. यावेळी इंग्लंडने सिंध-कच्छ सीमाप्रश्नी मध्यस्थीची तयारी दर्शवली व लॉर्ड माऊंटबॅटनला भारतात पाठवले.

कच्छचा वाद सोडविण्यासाठी एक त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली. या समितीत एक भारतीय, एक पाकिस्तानी व एक युनो सेक्रेटरी जनरल यांचा समावेश होता. लवादाचे कामकाज सुरु झाल्यानंतर या कामकाजाच्या प्रगतीची सविस्तर माहिती भारतीय प्रतिनिधी युगोस्लव्हियाचे अलेस बेबलर भारत सरकारला वेळोवळी देत असत. लवादाचे कामकाज अंतीम टप्प्यात आले असताना भारतीय प्रतिनिधीने भारत सरकारला कळविले की, लवादाचे अध्यक्ष स्वीडनचे गुन्नर ला-(जर्मनी) हे पाकिस्तानचे प्रतिनिधी इराणचे नासरुहा इंतेझीमकडे झुकत आहेत. इंतेझीमने पाकिस्तानच्या ८,७५,००० चौरस किलोमीटर भूप्रदेशाच्या मागणीला संपूर्ण पाठिंबा दिला होता. लवादाच्या प्रत्यक्ष निर्णयानुसार कच्छमधील कांजरकोट भागातील ८०० चौरस किलोमीटर भूप्रदेश पाकिस्तानला देऊ करण्यात आला होता.

कच्छच्या वादातून पाकिस्तान हा विश्वासांर्ह नाही, हे शास्त्रींच्या लक्षात आले. त्यांच्या हेही लक्षात आले की, कच्छ विवाद ही पुढील आक्रमणाची नांदी आहे. ज्यादिवशी पाकिस्तानी प्रतिनिधी कच्छ करारावर स्वाक्षरी करणार,त्याच दिवशी पाकिस्तान काश्मीरवर आक्रमण करणार आहे, हेही शास्त्रींच्या लक्षात आले.

## २) भारत-पाकिस्तान युध्द : १९६५

लालबहादूर शास्त्रींनी आपल्या परराष्ट्र धोरणात नेहरुंचेच तटस्थेचे धोरण राबवले. शेजारील राष्ट्रांशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. परंतु पाकिस्तानने या प्रयत्नांना फारसा प्रतिसाद दिला नाही. २५ जानेवारी १९६५ पासून पाकचे घुसखोर भारतात जबरदस्तीने घुसत असल्याची माहिती सरकारला समजली. पाकने ३ हजार एकरांचा भारतीय मुलुख बळकावला. शास्त्रींनी पाकला युध्दबंदी करार करण्याचे आवाहन केले. पण पाकने त्याला प्रतिसाद दिला नाही. इंग्लंडच्या सूचनेनुसार हा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयात नेण्यात आला. न्यायलयाने मात्र कच्छमधील कांजरकोटचा ८०० चौ.कि.मी. चा प्रदेश पाकिस्तानला द्यावा, असा निर्णय दिला. त्यामुळे शास्त्री व्यथीत झाले. या घटना घडत असतानाही पाकिस्तानने काश्मीरमध्ये हजारो घुसखोर घुसवून आक्रमण सुरु केले. घुसखोरांचे वर्णन झुल्फिकार अली भुत्तो यांनी (मुजाहिद) मुक्तता करणारे असे केले. पाकिस्तानच्या या कृतीत शास्त्रींनी जशास तसे उत्तर दिले. भारतीय फौजांनी पाकिस्तानवर तीन बाजूंनी हल्ला केला. त्यामुळे युध्दाचा भडका उडाला. युध्द थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सुरक्षा समितीने केलेली विनंतीही धुडकावून लावली. पाकिस्तानची जास्तीत जास्त भूमी व्यापण्याचा त्यांचा इरादा होता. शास्त्रींच्या मते, हे युध्द पाकने प्रथम सुरु केले हे त्यांनी कबूल करायला हवे. आपले सैन्य व घुसखोर मागे घेतले पाहिजेत व पुन्हा भारतावर आक्रमण करणार नाही याची हमी द्यावी, तेव्हाच हे युध्द थांबवले जाईल. आपला जास्तीत-जास्त प्रदेश व्यापण्याचा हेतू साध्य होईपर्यंत शास्त्रींनी संयुक्त राष्ट्रसंघटनेचे महासचिव युं थाँट यांना मात्र ‘लवकरच युद्धबंदी केली जाईल’ असे सांगितले. आपला हेतू साध्य होताच २४ सप्टेंबर १९६५ रोजी युध्दबंदी स्वीकारली. वाटाघाटीच्या गुऱ्हाळात भारताची बाजू पाकिस्तानपेक्षा मजबूत होती. ब्रिटिश पंतप्रधानांनी रावळपिंडीच्या सुरात सूर मिसळून भारताने आंतरराष्ट्रीय सीमेचा भंग करुन पाकिस्तानच्या पंजाब प्रदेशावर हल्ला केला, असे वक्तव्य ६ सप्टेंबर १९६५ रोजी केले व त्याबदल नाराजी प्रगट केली. लालबहादूर शास्त्रींनी पंतप्रधानाच्या या वक्तव्याचा खाजगीरीत्या निषेध केला. परंतु श्रीमती इंदिरा गांधी इंग्लंडला खडसावताना जाहीरपणे म्हणाल्या की, लोकशाही व स्वातंत्र्याची बांधीलकी असलेल्या राष्ट्रांनी हुकुमशाही राष्ट्रांची री ओढावी हा दैवदुर्विलास आहे.

शास्त्रींच्या कणखर धोरणामुळे भारताला दणदणीत विजय मिळाला. २० सप्टेंबर १९६५ रोजी सुरक्षा समितीने भारत व पाकिस्तान दोघांनाही स्वतःच्या फौजा १९६५ पूर्वीच्या स्थितीपर्यंत मागे घेण्यास सांगितले. अमेरिका व रशिया या दोघांनीही सुरक्षा समितीचा मुद्दा उचलून धरला. अखेर रशियाच्या मध्यस्थीने मध्य आशियातील ताश्कंद येथे शांतता परिषद आयोजित केली. ४ जानेवारी १९६६ रोजी लालबहादूर शास्त्री आणि पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल आयुबखान यांच्यात ताश्कंद येथे वाटाघाटी होऊन ताश्कंद करारावर सह्या झाल्या.

युध्द चालू असताना जो मुलुख आपण ताब्यात घेतला तो सोडून द्यावयाचा, हे दोन्ही राष्ट्रांनी मान्य केले.

### ३) शास्त्रींचा मृत्यू (१० जानेवारी १९६६) :-

आपल्या अतीमृदू धोरणांमुळे कायम टीकेला पात्र ठरलेले लालबहादूर शास्त्रींचे कणखर धोरण भारतीयांना पाकविरुध्द युध्दात पहावयास मिळाले. ताश्कंद वाटाघाटीत शास्त्रींनी आपल्या बुध्दिमत्तेची झलक व कणखर व्यक्तीमत्वाचे दर्शन घडविले. भविष्यकाळात पाकिस्तानने भारताविरुध्द बळाचा वापर करु नये, असे वचन शास्त्रींनी वदवून घेतले. ताश्कंद करार हा शास्त्रींचा वैयक्तिक विजय होता. पाकिस्तानवरील विजयाने भारत व शास्त्रींना नवे बळ मिळाले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात शास्त्रींना वजन प्राप्त झाले. याच काळात शास्त्रींनी 'जय जवान, जय किसान' घोषणा करुन देशात नवचैतन्य निर्माण केले. सारा भारत या लाडक्या नेत्याला डोक्यावर घेऊन नाचू लागला. लालबहादूर शास्त्री देशाचे हिरो ठरले. ताश्कंद करारानंतर काही तासांच्या आतच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. १० जानेवारी १९६६ रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने देश दुःखसागरात बुडून गेला. त्यांच्या १९ महिन्यांच्या कारकिर्दीतील १६ महिने त्यांना देशांतर्गत समस्यांमुळे दडपणाखली राहावे लागले. पण त्यानंतर पाकिस्तानवर मिळालेल्या विजयाने त्यांचा आत्मविश्वास वाढला असताना, त्यांची लोकप्रियता वाढली असतांनाच त्यांचे आकस्मिक निधन झाले.

## १०.६ इंदिरा गांधींचा उदय (१९७७-१९८४)

इंदिरा गांधी यांचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद येथे झाला. पंडित जवाहरलाल नेहरु व कमला नेहरु यांच्या त्या कन्या होत. त्यांचे शिक्षण अलाहाबाद, पुणे, मुंबई इत्यादी ठिकाणी झाले. उच्च शिक्षणासाठी त्या इंग्लंडला गेल्या होत्या. इंदिराजींचे संपूर्ण घराणे स्वातंत्र्य आंदोलनाशी संबंधित असल्याने त्यांच्यावर बालपणापासूनच राष्ट्रभक्तीचे संस्कार झाले होते. इंदिरा गांधीचा लहानपणापासूनच स्वातंत्र्य चळवळीशी संबंध आला होता. १९३० मधील सविनय कायदेभंगाच्या चळवळीच्या वेळी काँग्रेसच्या स्वयंसेवकांना मदत करण्यासाठी त्यांनी लहान मुलांची 'वानरसेना' स्थापन केली होती. त्या 'बाल चरखा संघात' ही सहभागी झाल्या होत्या. १९४२ च्या चले जाव आंदोलनात त्यांनी भाग घेतला होता. त्याबदल त्यांना तुरुंगावासाची शिक्षाही झाली होती. १९४२ मध्ये त्यांचा फिरोझ गांधी यांच्याशी विवाह झाला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर फाळणीतून निर्माण झालेल्या समस्या, जातीय दंगली, औद्योगिक कलह यांसारखे अनेक गंभीर प्रश्न देशापुढे उभे होते. या काळात इंदिरा गांधीनी आपद्ग्रस्त यांच्यासाठी सुरु केलेल्या मदत कार्यात भाग घेऊन लोकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला होता. स्वातंत्र्योत्तर काळात त्या काँग्रेसच्या सक्रिय कार्यकर्त्या बनल्या. लवकरच त्यांनी भारतीय राजकारणात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. १९५५ मध्ये काँग्रेस कार्यकारिणीच्या त्या सदस्या बनल्या. १९५९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. पंडित जवाहरलाल नेहरुंना अनेक बाबतीत त्यांचे वेळोवेळी साहाय्य होत असे. पंडित

नेहरुंच्या मृत्यूनंतर ९ जून १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री हे भारताचे पंतप्रधान बनले. त्यांच्या मंत्रिमंडळात इंदिराजींनी माहिती व नभोवाणी खात्याच्या मंत्री म्हणून काम पाहिले होते.

## १) पंतप्रधान इंदिरा गांधी :

लालबहादूर शास्त्रींचा मृत्यू इतका आकस्मिक होता की शास्त्रींनंतर कोण हा प्रश्नही कुणाच्या मनात येणे शक्य नव्हते. म्हणूनच नेहरुंनंतर कोण या प्रश्नापेक्षाही शास्त्रींनंतर कोण हा प्रश्न अधिक जटिल ठरला.

इंदिरा गांधी पंतप्रधान होतील असे कोणालाही वाटत नव्हते. कारण पित्याच्या निधनानंतर इंदिरा गांधीना राजकारणात फारसा रस राहिलेला नव्हता. पण केवळ शास्त्रींच्या विनंतीवरुन त्यांनी मंत्रीपद स्वीकारले होते. शास्त्रींनी आपल्या राजकारणात सत्तेचे दुसरे केंद्र निर्माण होणार नाही, याची नेहमी काळजी घेतली. १९६५ मध्ये भारत पाकिस्तान युध्द होऊन लालबहादूर शास्त्री संपूर्ण देशाचे नायक बनले. ते देशाचे नेतृत्व खंबीरपणे सांभाळतील असे वाटत असतानाच १९६६ मध्ये त्यांचे आकस्मिक निधन घडून आले. त्यानंतर भारताच्या राजकारणात अतिशय वेगाने महत्वाच्या घटना घडून आल्या. नव्या नेत्याची निवड होईपर्यंत हंगामी पंतप्रधान म्हणून गुलझारीलाल नंदा यांची निवड झाली.कॉंग्रेसमध्ये यावेळी महत्वाच्या नेत्यांची सिंडीकेट संस्था प्रभावी होती. पंतप्रधान पदासाठी कॉंग्रेसमधील दिग्गज नेते मोरारजी देसाई, गुलझारीलाल नंदा, इंदिरा गांधी, जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण यांच्यामध्ये खरी चुरस होती. पंतप्रधान कुणीही होवो पण पंतप्रधान एकमताने व्हावा, ही साऱ्याच कॉंग्रेसजनांची इच्छा होती. हा प्रश्न सोडविण्यासाठी सिंडीकेट नेते व कॉंग्रेसचे अध्यक्ष कामराज नाडर यांनी पुढाकार घेतला. त्यांना पंतप्रधानपदासाठी इंदिरा गांधी योग्य वाटत होत्या. सिंडीकेटने इंदिरा गांधीना समर्थन दिले. सिंडीकेटलाही इंदिराजी स्त्री असल्यामुळे आपल्या वर्चस्वाखाली राहतील असे वाटत होते. शिवाय सार्वत्रिक निवडणुका १३ महिन्यांवर येऊन ठेपल्या होत्या. इंदिरा गांधींना सिंडीकेटचे समर्थन मिळाल्याने या स्पर्धेतून बाकीच्या स्पर्धकांनी माघार घेतली असली तरी मोरारजी देसाई मात्र माघार घेण्यास तयार नव्हते. अखेर मोरारजी देसाई यांच्या हट्टामुळे १९ जानेवारी १९६६ रोजी पार्लमेंटच्या मध्यवर्ती सभागृहात प्रधानमंत्री निवडण्यासाठी मतदान झाले. इंदिरा गांधीना ३५५ मते तर मोरारजी देसाईंना १६९ मते पडली. २४ जानेवारी १९६६ रोजी इंदिरा गांधीनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली आणि भारतातील पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या. कॉंग्रेस सांसदीय पक्षाच्या इतिहासात नेतृत्वासाठी प्रथमच स्पर्धा झाली.

बहुमत इंदिरा गांधींच्या बाजूला असले तरी शास्त्रींच्या अल्पकारकीर्दीचा अपवाद वगळता देशाच्या राजकारणात नेहरु परंपरा सुरु राहणार हे स्पष्ट झाले. भारताचे लाडके नेते पंडित जवाहरलाल नेहरु यांची कन्या देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्याने भारतीय जनतेने त्यांच्या निवडीचे मनापासून स्वागत केले. पंतप्रधानपदी निवड झाल्यानंतर श्रीमती गांधींना विचारण्यात आले की, आपण डाव्या विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणार काय? इंदिरा गांधी उत्तरल्या, "मी अखिल भारताची प्रतिनिधी असून सर्व भारतीय विचारधारांचे मी प्रतिनिधित्व

करेन . श्रीमती गांधी या नेहरूंच्या विचारसणीपासून किंचीत हटलेल्या भारताला पुन्हा नेहरू पथावर आणण्यासाठी कटिबध्द झाल्या.

श्रीमती गांधींनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवादाप्रती आपण वचनबध्द असल्याचे तसेच म.गांधी, पं.नेहरु व शास्त्री यांनी आखून दिलेल्या मार्गाचे अनुकरण करणार असल्याचे जाहीर केले. श्रीमती गांधींनी देशाचा कारभार हाती घेताच त्यांना काही गंभीर समस्यांना सामोरे जावे लागले.

## १०.७ इंदिरा गांधींचे अंतर्गत व परराष्ट्र धोरण

### १) गोव्याचे भवितव्य आणि पंजाबी सुभ्याची मागणी

१९६१ मध्ये पोर्तुगिजांच्या तावडीतून गोवा मुक्त झाल्यावर गोवा महाराष्ट्रात विलीन व्हावा की केंद्रशासित प्रदेश म्हणून राहावे यासाठी इंदिरा गांधींनी १९६७ मध्ये जनमताचा कौल घेतला. जनमताच्या कौलानुसार गोव्यातील जनतेने महाराष्ट्रात विलीन होण्याऐवजी केंद्रशासित म्हणून स्वायत्त राहण्याचा निर्णय बहुमताने घेतला. पोर्तुगीज शासनकाळात गोव्याचे अंग असलेल्या दीव आणि दमणनेही गोव्यातच राहण्याचा निर्णय घेतला.

भाषावार प्रांतरचनेला सरकारने मान्यता दिल्याने महाराष्ट्र, गुजरात, नागालँड इत्यादी राज्यांची निर्मिती झाली. हे पाहून पंजाबी भाषिक लोकांनी ज्यात प्रामुख्याने शिखांचा भरणा होता, अशा स्वतंत्र शीख राज्याची मागणी केली. या मागणीनुसार पंजाबचे विभाजन करण्यात येऊन पंजाबी भाषिकांसाठी पंजाब व हिंदी भाषिकांसाठी हरियाणा या दोन घटक राज्यांची निर्मिती करण्यात येऊन चंदीगढ ही दोन्ही राज्यांची राजधानी करण्यात आली.

चंदीगढला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. पंजाबी भाषिकांसाठी पंजाबी सुभ्याची शिखांची मागणी अशाप्रकारे पूर्ण करण्यात आली.

### २) इंदिरा गांधींची अमेरिका भेट

डिसेंबर १९६४ मध्ये पंतप्रधान शास्त्रींची अमेरिका भेट अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन यांनी शेवटच्या क्षणी रद्द केल्याने भारत दुखावला होता. त्यावर मलमपट्टी करणे तसेच श्रीमती गांधींच्या मताचा कानोसा घेणे या दुहेरी हेतूने जॉन्सनने इंदिरा गांधीना अमेरिका भेटीचे निमंत्रण दिले. ही भेट कल्पनातीत यशस्वी ठरली. इंदिरा गांधींनी ५ जून १९६६ रोजी रुपयाचे ३५ टक्क्यांनी अवमुल्यन करण्याचे व अमेरिकेची 'इंडो अमेरिकन एज्युकेशन फाऊंडेशन' ही संस्था भारतात स्थापन करण्याचे मान्य करताच वॉशिंग्टन इंदिरा गांधीच्या स्वागतासाठी सज्ज झाले. राजकीय संकेत बाजूला ठेऊन राष्ट्राध्यक्ष जॉन्सन वॉशिंग्टनमधील भारतीय वकिलातीने श्रीमती गांधींसाठी आयोजित केलेल्या भोजनांसाठी उपस्थित राहिले. याच सुमारास भारतात प.बंगाल व केरळमध्ये अन्नधान्याचा प्रचंड दुष्काळ पडून अन्नासाठी दंगली माजल्या होत्या. अमेरिकेकडे अन्नधान्याची मदत मागताच जॉन्सननी भारतास ३.५ मे.टन धान्याची तातडीने मदत दिली.

इतर राष्ट्रांनीही भारताला अन्नधान्याची मदत करावी म्हणून त्या राष्ट्रांकडे आग्रह धरला. भारताच्या दीर्घकालीन योजनांसाठी अमेरिकेने ९०० दशलक्ष डॉलर्सची मदत जाहीर केली. जागतिक बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड भारताला सुलभ हप्त्याने करता यावी म्हणून जागतिक बँकेने कर्जवाटप धोरणात बदल करावा असा आग्रह जॉन्सनने जागतिक बँकेकडे धरला. अमेरिकन उद्योगपतींनी भारतात मोठ्या प्रमाणावर भांडवल गुंतविण्याची तयारी दर्शविली. तसेच भारतीय उद्योगधंद्यांसाठी आवश्यक तो कच्चामाल व यंत्राचे सुटे भाग भारताला पुरविण्याचे आश्वासन अमेरिकेने दिले. कबूल केल्याप्रमाणे मात्र अमेरिकेने मदत केली नाही. त्यामुळे इंदिरा गांधी अडचणीत सापडल्या. अमेरिकेने देऊ केलेल्या मदतीमुळे भारत समाजवादापासून दूर जाईल, असे डाव्या पक्षांना वाटू लागले. परंतु विदेशी मदतीअभावी सामान्य भारतीय होरपळून निघेल, तसेच परकीय मदत स्वीकारल्याने समाजवादाचे अवमूल्यन होत नाही असे समर्थन श्रीमती गांधींनी दिले.

## ३) इंदिरा गांधींची सोव्हिएट रशिया भेट

सोव्हिएट रशियाचा दौरा करण्यापूर्वी श्रीमती गांधींनी जुलै १९६६ मध्ये दिल्ली येथे आयोजित भारत, युगोस्लाव्हिया व युनायटेड अरब रिपब्लिक यांच्या त्रिपक्षीय शिखर परिषदेत भाग घेतला. या परिषदेत श्रीमती गांधींनी भारताच्या अलिप्ततावादी धोरणाचा पुनरुच्चार केला. जुलै १९६६ मध्ये इंदिरा गांधी मॉस्कोला आल्या असताना रशियन नेत्यांनी धोरणीपणा दाखवून काश्मीर प्रश्न, भारतीय रुपयाचे अवमूल्यन आणि वॉशिंग्टनचे इंदिरा गांधींवरील दडपण यांचा उल्लेख टाळला. श्रीमती गांधी अलिप्ततावादाची कास सोडणार नाहीत, याची खात्री पटल्याने रशियन पंतप्रधान अलेक्सी कोसिजिन यांनी श्रीमती गांधींना संपूर्ण समर्थन जाहीर केले.परिणामी भारत व सोव्हिएट रशियाने सम्राज्यवादी राष्ट्र व प्रतिक्रियावादी शक्तींचा, व्हिएतनाममधील आक्रमक कारवायांचा निषध केला. भारताच्या या कृतीबद्दल अमेरिकेने नाराजी व्यक्त केली आणि राष्ट्राध्यक्ष जॉन्सनने भारताला देऊ केलेली अन्नधान्याची मदत रोखून धरली.

## ४) चतुर्थ सार्वत्रिक निवडणुका (१९६७)

इंदिरा गांधींना पंतप्रधानपद मिळाले असले तरी त्यांच्यासमोर अनेक संकटे निर्माण झालेली होती. काँग्रेसमध्ये सिंडीकेटचा असलेला प्रभाव हा सर्वात मोठा अडथळा होता. कारण त्यांच्याशी चर्चा केल्याशिवाय कोणताही निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य इंदिराजींना नव्हते. देशाची अंतर्गत स्थितीही फारशी समाधानकारक नव्हती. देश आर्थिक अडचणीत सापडलेला होता. दोन वर्षाच्या अंतराने झालेली चीन व पाकिस्तानशी युध्दे व दीड वर्षाच्या काळात दोनदा नेतृत्व बदल या गोष्टी देशाच्या दृष्टीने अपायकारक ठरल्या. अनेक भागातील दुष्काळामुळे धान्यटंचाई व महागाई वाढली. अन्नधान्यावरुन बंगाल व केरळमध्ये दंगली झाल्या. पंजाबमध्ये एक भाषिक राज्याच्या मागणीवरुन अस्थिरता निर्माण झाली. म्हैसूर-महाराष्ट्र सीमावाद उफाळून वर आला. आंतरराष्ट्रीय परिस्थितीही भारतासाठी चांगली नव्हती. चीनने केलेल्या पराभवामुळे (१९६२) देशाची प्रतिमा मलीन झाली. शेजारच्या पाकिस्तानच्या कारवाया अमेरिकेच्या मदतीमुळे वाढल्या होत्या. व्हिएतनाम प्रश्नावरुन भारत-अमेरिका मतभेद निर्माण झाले. कबूल केल्याप्रमाणे अमेरिकेने मदतीचा हात अखडता घेतल्याने इंदिरा गांधी अडचणीत सापडल्या.

अशा अस्थिर वातावरणात देशाची चतुर्थ निवडणूक घोषित झाली. उमेदवाराची निवड करण्यावर सिंडीकेटचाच प्रभाव होता. या निवडणुकांचे निकाल काँग्रेससाठी धक्कादायक असे होते. स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या चतुर्थ सार्वजनिक निवडणुकात काँग्रेस पक्षाची पिछेहाट झाली. लोकसभेच्या ५२० जागांपैकी काँग्रेसला २९१ जागा मिळाल्या. या निवडणुकीत कामराज नाडर, सी.सुब्रम्हण्यम्, स.का. पाटील, अतुल्य घोष हे दिग्गज नेते पराभूत झाले. सिंडीकेटचे नीलम संजीव रेड्डी हे एकमेव नेते निवडून आले. जेष्ठांपैकी मोरारजी देसाई निवडून आले. या निवडणुकीत विरोधी पक्षांना चांगले यश मिळाले लोकसभेत त्यांची संख्या १०० पर्यंत वाढली. विरोधी नेत्यांपैकी अटलबिहारी वायपेयी, बलराज मधोक, एस.ए.डांगे, इंद्रजीत गुप्ता, जॉर्ज फर्नांडीस, मधु लिमये, राम लिमये, राम मनोहर लोहिया, प्रकाशवीर शास्त्री हे निवडून आले. जवळ-जवळ ९ राज्यातील काँग्रेस सत्ता नष्ट झाली. देशातील शांतता व सुव्यवस्था नष्ट झाली होती. मोरारजी देसाई यांनी सांसदीय पक्षनेतृत्वासाठी निवडणुक लढविण्याचे ठरविले. परंतु लोकसभेत काँग्रेसला निसटते बहुमत असताना अशा निवडणुकीमुळे पक्षात अधिकच फूट पडेल या समंजस भूमिकेतून उत्तरप्रदेशाचे चंद्रभान गुप्ता व मध्यप्रदेशाचे द्वारकाप्रसाद मिश्र यांनी पुढाकार घेऊन मोरारजींना पक्षीय निवडणुकीपासून परावृत्त केले. या मोबदल्यात उपप्रधानमंत्रिपद देण्यात आले. मोरारजींनी गृहखाते मिळावे म्हणून आग्रह धरला होता. परंतु शेवटी अर्थखात्यावर त्यांचे समाधान झाले. नीलम संजीव रेड्डी यांना लोकसभेचे सभापती करण्यात आले.

## ५) इंदिरा गांधी व सिंडीकेट संघर्ष

१९६७ च्या निवडणुकीत जरी काँग्रेसची पिछेहाट झाली तरी काठावरचे बहुमत काँग्रेसकडे होते. त्यामुळे इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान होणार हे स्पष्टच होते. परंतु सिंडीकेटला इंदिरा गांधी शक्तीशाली बनू नयेत, त्यांच्यावर आपले नियंत्रण असावे, असे वाटत असल्याने ज्या मोरारजी देसाईंना त्यांनी कायम दूर ढकलेले त्यांनाच जवळ करुन इंदिरा गांधींनी शह देण्याचा प्रयत्न सुरु केला. काँग्रेस नेत्यांच्या दबावामुळे इंदिरा गांधीनी मोरारजींना उपपंतप्रधानपद व वित्तमंत्रीपद दिले. १३ मार्च १९६७ रोजी त्या पुन्हा पंतप्रधान बनल्या.

सिंडीकेट नेत्यांच्या राजकारणामुळे इंदिरा गांधी कंटाळल्या होत्या. पण हा अंतर्गत संघर्ष वाढतच गेला. राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या पदाची मुदत संपत आल्याने इंदिरा गांधीनी राष्ट्रपती पदासाठी डॉ.झाकीर हुसेन यांचे नाव सुचविले. त्यांना हे पद दिल्यास अल्पसंख्यांक गटाचे समाधान होईल, असे स्पष्टीकरण दिले. सिंडीकेट नेत्यांनी इंदिरा गांधीची सूचना फेटाळून लावली. विरोधी पक्षातर्फे सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश के.सुब्बाराव यांना उमेदवारी दिली. अखेर इंदिरा गांधीनी आपल्या प्रभावी राजकारणाने झाकीर हुसेन यांच्या उमेदवारीला सिंडीकेटचा पाठिंबा मिळवला. झालेल्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत डॉ.झाकीर हुसेन बहुमताने निवडून आले. हा इंदिरा गांधींचा वैयक्तिक विजय मानला गेला.

देशातील आर्थिक विकास कार्यक्रमांतर्गत १२ मे १९६७ मध्ये दिल्ली येथे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक भरली. या बैठकीत इंदिरा गांधीनी सर्व प्रमुख बँकाचे

राष्ट्रीयीकरण, विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण या गोष्टी आर्थिक कार्यक्रमात सुचविल्या. पण या गोष्टींना मोरारजींनी कडवा विरोध केला. मतभेद वाढू नयेत म्हणून इंदिरा गांधींनी बँकाच्या राष्ट्रीयीकरणाबाबत माघार घेतली. संस्थानिकांच्या तनखे व भत्ते बंद करण्याच्या गांधींच्या निर्णयालाही सिंडीकेटने विरोध केला होता. या बैठकीत सर्वांना मान्य होईल, अशी दहा कलमी योजना तयार केली गेली. इंदिरा गांधींच्या आर्थिक कार्यक्रमाला सिंडीकेटने विरोध केल्याने मतभेद वाढू लागले.

१९६९ मध्ये इंदिरा गांधी व  सिंडीकेट यांच्यात पुन्हा संघर्षाची ठिणगी पडली आणि हा संघर्ष होता काँग्रेस अध्यक्षांच्या निवडीचा अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष कामराज नाडर यांची मुदत संपल्याने इंदिरा गांधींनी सिंडीकेटचे नेते निजलिंगप्पा यांना अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. असे केल्याने आपसांतील संघर्ष नष्ट होईल, असे त्यांना वाटत होते. निजलिंगप्पांनी संमती दिली. पण कामराजशी बोलल्याशिवाय ही बातमी प्रसिध्द करु नये अशी अट घातली. तरीही ही बातमी वृत्तपत्रात झळकल्याने ते नाराज झाले. काँग्रेसमध्ये उभी फूट पडली होती. मार्च १९६९ मध्ये श्री. चंद्रशेखर यांनी मोरारजीचे पुत्र कांतीभाईवर भ्रष्टाचाराचे आरोप केले. यामागे इंदिरा गांधीचा हात असावा असा संशय मोरारजींना आला. एप्रिल १९६९ च्या फरिदाबाद येथील काँग्रेस अधिवेशनात अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी इंदिरा गांधीच्या आर्थिक धोरणावर कडाडून टीका केली. काँग्रेसमधील दोन गटातील संघर्ष कमी होण्याऐवजी वाढतच चालला होता. ३ मे १९६९ रोजी राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे आकस्मिक निधन झाले. यावेळी सिंडीकेटने आपल्या गटाचा राष्ट्रपती निवडून त्याच्यामार्फत इंदिराजींना पदभ्रष्ट करण्याची योजना आखली व नीलम संजीव रेड्डी यांचे नाव पुढे केले. इंदिरा गांधींनी राष्ट्रपतीपदासाठी जगजीवन राम यांचे नाव सुचविले. सिंडिकेटने त्यांना विरोध केल्याने इंदिरा गांधींनी उपराष्ट्रपती व्ही.व्ही.गिरी यांचे नाव पुढे केले पण या नावालाही मोरारजींनी विरोध केल्याने इंदिरा गांधी संतप्त झाल्या. गिरी हे राष्ट्रपतीपदासाठी स्वतंत्र उमेदवार म्हणून उभे राहिले. आश्चर्य म्हणजे २० ऑगस्ट १९७० रोजी काँग्रेस उमेदवाराचा पराभव करुन गिरी निवडून आले. त्यामुळे यावेळीही इंदिरा गांधीच्या राजकारणाचा विजय झाला. काँग्रेसचे बहुमत असूनही राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवाराचा झालेला पराभव सिंडीकेटच्या जिव्हारी झोंबला. काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी गिरी यांना मतदान करणाऱ्यांवर पक्षभंगाचा आरोप ठेवून कारवाई करण्याचे ठरविले. काँग्रेस पक्षांतर्गत लढा आता अंतिम टप्प्यात आला होता. रेड्डींना मतदान न करणाऱ्या काँग्रेसजनांना काँग्रेस पक्षातून काढून टाकण्यात येईल, असा कडक इशारा सिंडीकेटने काँग्रेस सदस्यांना दिला. इंदिरा गांधी, जगजीवन राम, फक्रुद्दीन अली अहमद यांच्याकडे स्पष्टीकरणही मागितले. २५ ऑगस्ट १९६९ च्या काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी दोन गटांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

श्रीमती गांधींना काँग्रेसमधील जुन्या पुढाऱ्यांचा राजकीय अस्त घडवायचा होता. तर जुन्या पुढाऱ्यांना काँग्रेस पक्षातून इंदिरा गांधींची हकालपट्टी करावयाची होती. काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी काँग्रेसमध्ये घराणेशाहीला प्राधान्य, असे सांगून तामिळनाडूचे काँग्रेस अध्यक्ष सी.सुब्रम्हण्यम् यांचा राजीनामा घेतला. याचा बदला घेण्यासाठी इंदिरा गांधींनी सिंडीकेटबद्दल

सहानुभूती असणाऱ्या ४ मंत्र्याना मंत्रीमंडळातून काढून टाकले. ३१ ऑक्टोबर १९६९ रोजी निजलिंगप्पा यांनी सी.सुब्रम्हण्याम् व श्री. फक्रुद्दीन अली अहमद यांना काँग्रेस वर्कींग कमिटीतून काढून टाकले. अशा प्रकारे दोन्ही गट एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करीत होते. इंदिरा गांधींचा गट, आमंत्रित गट व निजलिंगप्पांचा गट 'संघटना काँग्रेस' म्हणून ओळखला जाऊ लागला. दोन्ही काँग्रेसची अधिवेधनेही वेगवेगळी भरु लागली. या अंतर्गत भांडणाचा फायदा विरोधी पक्षांना मिळाला. लोकसभेतील ५५ काँग्रेस सदस्य विरोधी पक्षाला जाऊन मिळाल्याने इंदिरा गांधींचे सरकार अल्पमतात आले. इंदिरा गांधींनी प्रादेशिक पक्षांचा आधार घेऊन सरकार टिकवले. त्यांना तामिळनाडू द्रमुक, पंजाबमधील अकाली दल, भारतीय क्रांती दल या पक्षांनी मदत केली.

### ६) १९७१ च्या निवडणुका

काँग्रेस पक्षांतर्गत संघर्षाच्या पाश्र्वभूमीवर इंदिरा गांधींनी आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनीमय करुन देशात नवीन निवडणुका घोषित करण्याची विनंती केली. त्यानुसार राष्ट्रपतींनी २७ डिसेंबर १९७० रोजी लोकसभा विसर्जित केली.

या निवडणुकीचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व विरोधी राजकीय पक्षांनी एकत्र येऊन इंदिरा गांधीविरुध्द स्वतंत्र आघाडी स्थापन केली. या निवडणुकीत जनसंघ, स्वतंत्र पार्टी व जुने काँग्रेसवाले एकत्र आले. इंदिरा गांधींनी मात्र प्रचाराचा झंझावात निर्माण केला. त्यांची 'गरीबी हटाव' ही घोषणा अतिशय लोकप्रिय ठरली. या घोषणेपुढे विरोधकांची 'इंदिरा हटाव' ही घोषणा कुचकामी ठरली. काँग्रेसमधील संघर्षात जनतेची सहानुभूती इंदिरा गांधींना होती. काँग्रेसचे जुने पुढारी भ्रष्टाचाराचे प्रतिनिधी मानले जात होते. या निवडणुकीत इंदिरा गांधींना प्रचंड विजय मिळाला.संसदेत बहुमत पक्षाला मिळाले. लोकसभेच्या ५१८ जागांपैकी काँग्रेसला ३५२ जागा मिळाल्या. या विजयामुळे जुना काँग्रेस गट पूर्णपणे निष्प्रभ ठरला. देशातील प्रमुख राजकीय व्यक्तीमत्व म्हणून त्यांना जनाधार मिळाला.

## १०.८ संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द

भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल आणि त्यांचे सचिव व्ही.पी.मेनन यांनी १९४९ पर्यंत अनेक संस्थानांचे विलीनीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले.या कार्यात अडथळा न आणता संस्थानिकांनीसुद्ध समंजसपणे भारत सरकारला मदत केली. सरदार पटेलांनी संस्थानिकांची प्रशंसा करुन हार्दिक आभार मानले. विलीनीकरणाच्या वेळी त्यांना दिलेली आश्वासने ही तंतोतंत पाळली. संस्थानिकांनी देशहित लक्षात घेऊन जो त्याग दाखविला, त्याचा पुरेपूर मोबदला त्यांना देण्यात आला. संस्थानिकांचे तनखे ठरवून दिले आणि त्यांच्या उपाधी, खाजगी मालमत्ता, तनखे, विशेषाधिकार, वारसा इत्यादी हक्कांची कायदेशीर तरतूद घटनेतील २९१ व ३६२ कलमात करुन देण्यात आली. संस्थानिकांचे तनखे ठरविताना त्यांच्या पूर्वीच्या उत्पन्नाच्या आधारे निश्चित करण्यात आले. काही संस्थानिकांचे तनखे उदा. म्हैसूरचे महाराजा यांना वार्षिक सव्वीस लाख रुपये, बडोद्याचे संस्थानिक यांना वार्षिक साडे सव्वीस लाख रुपये

तर ग्वाल्हेरच्या संस्थानिकांस पंचवीस लाख रुपये होते. सुमारे बावीस संस्थानिकांचे वार्षिक तनखे वार्षिक ७०० रुपयांपेक्षाही कमी होते.

सरदार पटेलांनी संस्थानिकांचे हितसंबंध सुरक्षित ठेवून संस्थानिकांना दिलेल्या सोई-सवलतीवरुन संसदेत गदारोळही झाला. अनेक सदस्यांनी या सवलतींना विरोध केला. संस्थानिकांच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाचे समर्थन करताना काही सवलतींच्या मोबदल्यात मोठा भूभाग सरकारच्या ताब्यात येत असल्यास त्यात वावगे वाटण्याची गरज नाही असे आपल्या निर्णयाचे समर्थन केले. नेहरु कालखंडात संस्थानिकांच्या या सवलती रद्द करण्याबाबत कधीही निर्णय झाला नाही. असे असले तरी भारत सरकारच्या तिजोरीवर या खर्चाचा प्रचंड भार पडत होता. सरकारच्या तिजोरीतून दरवर्षी ५ ते ६ कोटी रुपये संस्थानिकांचे तनखे, विशेष सोई सवलती व विशेष हक्कांवर खर्च होत होते. संस्थानिकांना आपली मालमत्ता वाढविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. अनेक सरकारी करातून त्यांना सवलत मिळत होती. त्यामुळे अनेक संस्थानिक काहीही मेहनत न करता विलासी जीवन जगत होते. पण त्यांची संख्या फार कमी होती. उदा. भोपाळचे नबाब पतौडी यांनी क्रीडा क्षेत्रात विशेषतः क्रिकेट क्षेत्रात नावलौकिक मिळवला होता. काश्मीरचे महाराज डॉ. करणसिंग यांनी राजकारणात प्रवेश करुन उदारमतवादी तत्वप्रणालीचा स्विकार करुन त्यांचा नेहमी इंदिरा गांधींना पाठिंबा असे. काही संस्थांनिकपुत्र पोलो खेळण्यात, काही संस्थानिक दुर्मिळ पोष्टाची तिकिटे, नाण्यांचे संग्रह करण्यात गुंतले होते. प्राविण्य मिळवून देशाच्या नावलौकिकात भर घालण्याचा प्रयत्न करीत होते. भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे व सवलती संस्थानिकांवर करण्यात आलेली मेहरनजर नसून भारत सरकारचा कारभार सुव्यस्थित सुरु रहावा म्हणून करण्यात आलेली ती एक व्यवस्था होती. कायदा आपल्या बाजूने असला तरी त्यात बदल संभवू शकतो, याची भूतपूर्व संस्थानिकांना जाणीव होती.

### ८) इंदिरा गांधीचा दृष्टीकोन

इंदिरा गांधींना संस्थानिकांच्या तनख्यावर, विशेष हक्कांवर केला जाणारा सरकारी खर्च भारतासारख्या देशाला परवडणारा नसून अनाठायी वाटत होता. भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेला बोजा होता. हा आर्थिक भार सामान्य जनतेला सहन करावा लागत होता. तर संस्थानिक मात्र चैनी, विलासी जीवन जगत होते. संस्थानिकांना जर पैशाची गरज असेल तर त्यांनी काहीतरी उद्योग करुन आपली गरज भागवावी. तसेच ते आता राज्यकर्ते नसल्यामुळे त्यांनी पदाचा त्याग करावा, असे त्यांना वाटत होते. याच काळात पश्चिम बंगाल व आंध्रप्रदेशात नक्षलवादी चळवळ वाढली होती. त्यातून पोलिसांवर व जमीनदारांवर हल्ले होत होते. तसेच सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानिकांच्या विशेष हक्क व तनख्यांबद्दल केलेल्या तरतूदीत पित्याच्या मृत्यूनंतर नवा संस्थानिक गादीवर येण्याच्या वेळी त्याच्या तनख्याच्या रक्कमेत कपात केली जाण्याची सूचना होती. जहालमत वाद्यांनी या विशेष हक्कांवर टीका सुरु केली. संस्थानिकांचे तनखे व विशेषधिकार रद्द करण्यात यावेत, अशी मागणी पुढे येऊ लागली. या सर्व गोष्टींचा विचार करुन गरीब देशाची आर्थिक संकटातून मुक्तता करण्यासाठी इंदिरा गांधी प्रयत्न करु लागल्या. त्यातून संस्थानिकांचे विशेष हक्क रद्द करण्याचे त्यांनी ठरविले. १२ मे

१९६७ रोजी काँग्रेस कमिटीचे अधिवेशन भरले. हे अधिवेशन समाप्तीच्या वेळी महाराष्ट्राचे तरुण समाजवादी नेते मोहन धारिया यांनी संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्याबाबतचा ठराव कमिटीपुढे मांडला. पण या वेळपर्यंत इंदिरा गांधी, मोरारजी देसाई हे प्रमुख नेते निघून गेले होते. तरीही मोहन धारिया यांनी मांडलेला ठराव १७ विरुध्द ४ मतांनी पास झाला. काँग्रेसचा अधिकृत ठराव म्हणून तो मान्य ठरला. या ठरावाने स.का.पाटील संतप्त झाले. मोरारजी देसाईही या ठरावामुळे नाराज झाले. सरकार आणि संस्थानिक यांच्यातील कराराचा भंग करणे, हे नैतिकतेला धरुन नाही. तनखे बंद करणे म्हणजे संस्थानिकांचा विश्वासघात करणे होय अशी कठोर टीका त्यांनी केली.

संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करण्यासंबंधी संस्थानिकांच्या संघटनेशी वाटाघाटी करुन तो प्रश्न निकालात काढावा, या हेतूने इंदिरा गांधींनी संस्थानिकांशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. ३ नोव्हेंबर १९६७ ते ८ जानेवारी १९७० या काळात संस्थानिकांच्या प्रतिनिधीसोबत भारतीय गृहखात्याने ६ बैठका घेतल्या. पण त्यातून काहीही निष्पन्न होऊ शकले नाही. सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर घटनेत आवश्यक तो बदल करुन हे उद्दिष्ट साध्य करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. २ सप्टेंबर १९७० रोजी २४ व्या घटनादुरुस्तीचे बील लोकसभेत मांडण्यात आले. हे बील ३३२ विरुध्द १५४ मतांनी पास झाले, पण राज्यसभेत हे बील मात्र १ मताने फेटाळले गेले. सरकारची ही नामुष्की होती.

### १) संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द : राष्ट्रपतींचा वटहुकूम

राज्यसभेत घटनादुरुस्ती बील फेटाळल्याने विरोधक आनंद सोहळा साजरा करीत होते. काँग्रेसच्या गटात निराशेचे वातावरण पसरले होते. इंदिरा गांधी मात्र संतापल्या होत्या. इंदिरा गांधींनी त्याच दिवशी तातडीने मंत्रीमंडळाची बैठक बोलावून सल्लामसलत केली आणि राष्ट्रपतींकडून संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करणारा वटहुकुम जारी करवून घेतला. ६ सप्टेंबर १९७० रोजी राष्ट्रपतींच्या विशेष वटहुकूमाद्वारे संस्थानिकांना सरकारने दिलेले तनखे व विशेषाधिकार काढून घेण्यात आले. दि. ७ सप्टेंबर १९७० रोजी राज्यसभेत अर्थमंत्र्यांनी निवेदन केले की, राष्ट्रपतींच्या अधिकाराला आव्हान देता येणार नाही. राष्ट्रपतीच्या वटहुकुमाला इंदिरा गांधीच्या विरोधकांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. विरोधकांनी संस्थानिकांची बाजू घेऊन त्यांचे पूर्वीचे तनखे आणि विशेषाधिकार भारत सरकारकडे पूर्वीप्रमाणेच चालू ठेवावेत असा आग्रह धरला. अखेर १५ डिसेंबर १९७० रोजी राष्ट्रपतींचा वटहुकुम घटनाबाह्य असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हिदायतुल्ला यांनी दिला. श्रीमती इंदिरा गांधीनी न्यायालयाचे आव्हान स्वीकारले. राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी यांना लोकसभा विसर्जित करुन नवीन निवडणूका घेण्याचा आदेश देण्याची विनंती केली. पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार २७ डिसेंबर १९७० रोजी लोकसभेत विसर्जित करुन फेब्रुवारी १९७१ मध्ये निवडणुकीची घोषणा करण्यात आली.

१९७१ च्या निवडणुकांत श्रीमती इंदिरा गांधींना प्रचंड यश मिळाले. बहुमतापेक्षाही जास्त जागा त्यांच्या पक्षाला मिळाल्या. ५१८ जागांपैकी ३५२ जागा जिंकून लोकसभेत २/३ बहुमत

मिळाले. संसदेतील बहुमताच्या जोरावर घटनेच्या मुलभूत हक्कांत बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे असे निश्चित करणारी २६ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. या घटना दुरुस्तीनुसार भूतपूर्व संस्थानिकांना तनखे आणि सवलती देणारी अनुक्रमे २९१ व ३६२ ही कलमे घटनेतून काढून टाकण्यात आली व त्याऐवजी संस्थानिकांना तनखे व सवलती नाकारणारे कलम ३६३ अ घटनेत अंतर्भूत करण्यात आले. दुसऱ्या घटनादुरुस्तीनुसार सार्वजनिक कल्याणाकरिता कोणत्याही व्यक्तीला मालमत्तेपैकी काही भाग सरकारकडे घेण्याची गरज भागल्यास त्याकरीता त्या व्यक्तीला द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम सर्वोच्च न्यायालय नव्हे तर संसद ठरविल असे निश्चित करण्यात आले. या घटनादुरुस्तीच्या आधारावर इंदिरा गांधींनी संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार कायमचे संपुष्टात आणले. यासंबंधीचे बील लोकसभा व राज्यसभेतही बहुमताने पास होऊन ३१ डिसेंबर १९७१ पासून संस्थानिकांचे हक्क, विशेषाधिकार व तनखे नष्ट झाले.

### १०.८.१ आपली प्रगती तपासा :-

१. इंदिरा गांधीनी संस्थाानिकांचे तनखे व विशेषाधिकार का रद्द केले ?

## १०.९ बँकाचे राष्ट्रीयीकरण

### १०.९.१ भारतीय बँक व्यवसायाची पार्श्वभूमी :-

पूर्वीपासून असलेले सावकार, सराफी, पेढ्या हेच बँक व्यवसायाचे पूर्वज आहेत. भारतीय सावकार राजेरजवाडे व संस्थानिकांनाही कर्ज देत असत. या सावकारी व्यवसायात प्रामुख्याने जैन, मारवाडी, पठाण, रोहिले या जमातीचे वर्चस्व होते. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती असे. या सावकारी पध्दतीत अनेक दोष होते. कर्जदाराची मालमत्ता हडप करण्याची प्रवृत्ती जास्त असल्याने सावकार बदनाम झाले. ग्रामीण भागात जमीनदार सावकारीचा व्यवसाय करुन लहान शेतकऱ्यांच्या जमिनी हडप करत. सावकाराशिवाय लहान मोठ्या शहरातून सराफी पेढ्यादेखील बँकाचे कार्य करीत. पण त्यांचे व्याजदर अधिक व कर्ज परतफेडीच्या अटी गैरसोईच्या असत. भारतावर ब्रिटिशांनी जवळ जवळ दीडशे वर्षे राज्य केले. त्यामुळे इतर क्षेत्राप्रमाणेच भारताच्या आधुनिक बँकक्षेत्रावर ब्रिटिश बँक व्यवसायाची छाप पडल्याचे दिसून येते. ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाऱ्यांना भारतीय पतपेढ्या व सावकारांचे व्यवहार न पटल्याने त्यांनी स्वतःची दलालीगृहे स्थापन केली. पुढे १८२९ ते १८३२ या काळात आर्थिक संकटामुळे अनेक दलालीगृहे बंद पडली व त्यांची जागा निवडक परकीय बँकानी घेतली. काही बँका ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रेरणेने स्थापन झाल्या. त्यात बँक ऑफ बंगाल (१८०९), बँक ऑफ बॉम्बे (१८४०)

व बँक ऑफ मद्रास (१८४३) या तीन प्रेसीडेन्सी बँका महत्त्वाच्या होत्या. या ३ बँकाचे एकत्रीकरण करुन 'इंपिरिअल बँक ऑफ इंडिया' नावाची एक मोठी बँक स्थापन केली. स्वातंत्र्य आंदोलनात स्वदेशी चळवळ वाढुन परकीय बँकाच्या विरोधातून पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया इत्यादी बँकांची १८८५ ते १९११ या कालखंडात स्थापना झाली. यानंतर बऱ्याच प्रमाणात खाजगी बँकांची वाढ झाली. परंतु भारतीय बँकांत अनेक दोष निर्माण झाल्याने बँका बुडू लागल्या. तेव्हा ते टाळण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२० मध्ये इंपिरियल बँकेची निर्मिती केली.

**१०.९.२ रिझर्व्ह बँकेची स्थापना :**

भारतात लहान बँका बुडण्याची लाट सुरु झाल्यामुळे त्यांच्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी एका स्वतंत्र मध्यवर्ती बँकेची शिफारस चलनविषयक समितीने केली. या समितीच्या शिफारसीनुसार १९३५ मध्ये भारताची मध्यवर्ती बँक म्हणून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने मध्यवर्ती बँक सरकारच्या मालकीची असावी, अशी सूचना केल्याने १९४९ मध्ये रिर्झव्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. ही बँक कागदी चलन छापणे, 'सरकारची बँक' व 'बँकांची बँक' म्हणून काम करणे, देशातील बँकव्यवसायाच्या कारभारावर नियंत्रण ठेवणे ही कार्ये करते. भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्टे स्वीकारल्याने बँकांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक सत्तेवर समाजाचे प्रभावी नियंत्रण असावे ही भूमिका आरंभापासूनच स्वीकारली होती. त्यानुसार वेळोवेळी रिझर्व्ह बँकेच्या अधिकारात वाढ करुन खाजगी बँकांवरील नियंत्रणात वाढ केली. १९५५ मध्ये इंपिरिअल बँकेचे राष्ट्रीयीकरण करुन तिचे नामकरण 'स्टेट बँक ऑफ इंडिया' असे केले.

**१०.९.३ चौदा व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण :**

भारताने स्वातंत्र्यानंतर लोकशाहीतून समाजवादाकडे जाण्यासाठी समाजवादी समाज रचनेचा पुरस्कार केला. हे ध्येय साध्य करण्यासाठी, देशाच्या आर्थिक उन्नतीसाठी खाजगी व सार्वजनिक क्षेत्रामध्ये स्वतंत्रपणे विभाजन करण्यात आले. सार्वजनिक (सरकारी) क्षेत्र पूर्णपणे सरकारच्या मालकीचे व सरकारच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले तर खाजगी क्षेत्रावर नियमन ठेवण्यासाठी सरकारी परवाने, नियंत्रणे व सरकारी कायदे करण्यात आले. सार्वजनिक क्षेत्रातील विकासासाठी मोठमोठ्या उद्योगधंद्यांचे व उद्योगसंस्थांचे राष्ट्रीयीकरण घडवून आले. प्रामुख्याने मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असणाऱ्या, पोलाद, खाणव्यवसाय, विद्युत निर्मिती, शिपींग, वाहतूक व दळणवळण इत्यादी व्यवसायांचे राष्ट्रीयीकरण करण्याच्या निर्णयामुळे देशाच्या विकासाला गती मिळाली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतासमोर अनेक समस्या 'आ' वासून उभ्या होत्या. गरिबीचे प्रमाण वाढले होते. देशातील मूठभर भांडवलदारांच्या, उद्योगपतींच्या हातात संपत्तीचे केंद्रीकरण होऊन सामान्य माणसाला लहान-सहान लाभासाठी तिष्ठत बसावे लागले. सर्वसामान्य भारतीयांना फार काळ तिष्ठत ठेवणे योग्य नव्हते. त्यांच्या स्थितीत सुधारणा करुन गरिबी हटविण्याच्या हेतूने बेंगलोर येथील अखिल भारतीय कॉंग्रेस समितीच्या अधिवेशनात ३० जुलै

१९६९ रोजी इंदिरा गांधींनी एक प्रस्ताव मांडला. प्रस्तावात अनुउत्पादक खर्चावर मर्यादा सार्वजनिक वित्त संस्थांच्या कर्जपुरवठा पध्दतीत सुधारणा, नवीन उद्योग व मागास भागासाठी अतिरिक्त आर्थिक तरतूद, उपभोक्ता मालाचे उत्पादन लघुउद्योग (खाजगी) व सहकारी क्षेत्राकडे सोपविणे व या मालाचे उत्पादन करण्यास मोठ्या उद्योगधंद्यावर बंदी आणणे, सुशिक्षित युवकांसाठी रोजगार उपलब्ध करुन देणे, स्थानिक तंत्रज्ञान उपलब्ध असलेल्या व्यवसायात परेदशी गुंतवणुकीस मज्जाव करणे इ. गोष्टी सुचविण्यात आल्या. या अधिवेशनात श्रीमती गांधींनी काही बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे सूतोवाच केले. याच अधिवेशनात कूळ व भूमिहीन शेतकऱ्यांच्या दर्जात सुधारणा करण्याचेही सुचविण्यात आले. बेंगलोर अधिवेशनात श्रीमती गांधींच्या या १० कलमी कार्यक्रमाला मान्यता देण्यात आली.

इंदिरा गांधींच्या या निर्णयाला विरोधकांनी प्रखर विरोध केला असला तरी सर्वसामान्य जनतेने त्याचे प्रचंड स्वागत केले. कारण इंदिरा गांधींचा हा निर्णय समाजवाद निर्माण करणारा होता. आर्थिक विषमता नष्ट करणारा होता. राष्ट्रीयीकरणाच्या अगोदर बँकक्षेत्रात अनेक दोष निर्माण झाले होते. देशातील संपत्ती काही मुठभर लोकांच्या हातात होती. मूठभर उद्योगपती व इतर व्यवसायिकांच्या हाती संपत्तीचे केंद्रीकरण झाले होते. बहुतेक बँकाच्या बाबतीत त्यांचे संचालक व नातेवाईक बँकांचा पैसा स्वतःच्या फायद्यासाठी वापरीत. कर्जे मंजुरीसाठी संचालक मोठ्या रक्कमेची मागणी करीत, बँकातील उच्च पगाराच्या जागा आपल्याच नातेवाईकांना दिल्या जात. एका बँकेच्या संचालक मंडळाचे सदस्य दुसऱ्या किंवा अनेक बँकाचे सदस्य असत. त्यातून परस्पर हितसंबंधाची साखळी तयार झाली होती. या बॅका शेती, लघूउद्योग, निर्यात व्यापार इत्यादींना वित्तपुरवठा केला जात नसे. मध्यम आणि मोठ्या उद्योगांनाच वित्तपुरवठा करीत नसत. बँकामध्ये विशिष्ट गटाची मक्तेदारी निर्माण झाल्याने सामान्य जनतेच्या पैशाचा गैरवापर केला जात असे. बँकांनी राष्ट्रीय विकासापेक्षा स्वतःचे नफे व इतर लाभांनाच महत्त्व दिले होते. म्हणूनच इंदिरा गांधींनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेतला. मात्र विरोधकांची भूमिका ताठर होती.

### १०.९.४ चौदा व्यापारी बॅकांचे राष्ट्रीयीकरण :

इंदिरा गांधीनी घेतलेल्या अनेक निर्णयांपैकी बँकाचे राष्ट्रीयीकरण ही त्यांच्या कारकिर्दीतील महत्वाची घटना मानली जाते. २५ ऑक्टोबर १९६७ च्या कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत अर्थमंत्री मोरारजी देसाई, सत्यानारायण सिन्हा आणि चन्ना रेड्डी यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला विरोध केला. मोरारजी देसाई श्रीमती गांधींचे विरोधक असल्याने बँकांचे राष्ट्रीयीकरण होऊ देणार नाहीत हे त्यांना माहीत होते. जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण आणि स्वर्णसिंग यांनी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाला पाठिंबा दर्शविला. मोरारजी व त्यांच्या समर्थकांच्या विरोधाची खरी भीती होती. त्यामुळे इंदिराजींचे आसनही धोक्यात येण्याची शक्यता होती. तेव्हा १४ व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी त्या स्वतःची स्थिती मजबूत करण्याचा प्रयत्न करीत होत्या. म्हणूनच त्यांनी बँकाच्या व्यवहारावर नॅशनल क्रेडिट कौन्सिलच्या नियंत्रणाची मोरारजी देसाईंची सूचना मान्य केली. यानुसार कृषी, लघुउद्योग आणि निर्यात क्षेत्राला जादा वित्तपुरवठा करण्याचे मान्य करण्यात आले. याच सुमारास सिंडीकेटने राष्ट्राध्यक्ष पदासाठी निलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी घोषित केली. रेड्डींची उमेदवारी श्रीमती गांधींना मंजूर नव्हती.

अपक्ष उमेदवार व्ही.व्ही. गिरींना पाठिंबा दिल्याने सिंडीकेट-इंदिरा गांधी संबंध ताणले गेले. या संधीचा फायदा घेऊन बॅक राष्ट्रीयीकरणातील प्रमुख अडथळा दूर करण्यासाठी सर्वप्रथम मोरारजी देसाईंकडून अर्थखाते काढून घेतले व स्वतःकडे ठेवले. मोरारजी बिनखात्याचे मंत्री म्हणून राहू शकतात असे त्यांना कळविण्यात आले पण त्यांनी आपला अपमान समजून राजीनामा सादर केला.

मोरारजी देसाईंचा राजीनामा म्हणजे सिंडिकेटला जबरदस्त धक्का होता. या धक्क्यातून सावरण्याच्या आतच अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या बेंगलोर अधिवेशनानंतर ऑगस्ट १९६९ मध्ये राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने काढलेल्या वटहुकूमाने १४ प्रमुख मोठ्या व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या वटहुकूमाचे नाव ‘उपक्रमाचे संपादन आणि हस्तांतरण वटहुकू १९६९’ असे होते. ज्या बॅकेच्या ठेवी ५० कोटी रुपये किंवा जादा होत्या अशा बॅकाचे राष्ट्रीयीकरण झाले. इंदिरा गांधींच्या या निर्णयावर विरोधी पक्षांनी व सिंडिकेट नेत्यांनी कठोर टीका केली. एवढेच नव्हे, तर वटहुकूमाविरुध्द सर्वोच्या न्यायालयात याचिका दाखल केली. सर्वोच्या न्यायालयाने राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घटनाबाहय ठरविला. यावर मात करण्यासाठी इंदिरा गांधीनी बँकांच्या भागीदारी व्यवस्थेला धक्का न लावता त्या बॅकांचे संयोजन सरकारकडे घेतले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करणारा कायदा पास करुन राष्ट्रीयीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली. पुढे १४ जानेवारी १९८० रोजी श्रीमती गांधींनी सर्व संकटावर मात करुन पुन्हा पंतप्रधान झाल्या. १५ एप्रिल १९८० रोजी गांधी शासनाने आणखी ६ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करणारा कायदा पास केला. या बँकामध्ये दि आंध्र बँक, दि कार्पोरेशन बँक, दि न्यु बँक ऑफ इंडिया, दि पंजाब ॲन्ड सिंध बँक, दि विजया बँक आणि दि ओरिएन्टल बँक ऑफ कॉमर्स या प्रमुख बँका होत्या. या सर्व बॅकांतील ठेवी रुपये २०० कोटीहूंन अधिक होत्या. राष्ट्रीयीकरणाच्या या दुसऱ्या टप्प्याबरोबर देशातील ९३ टक्के बँकव्यवसाय सार्वजनिक क्षेत्रात आला.

### १०.९.५ विमा उदयोगाचे राष्ट्रीयीकरण

३ मे १९७१ रोजी एका अधिसूचनेद्वारे २,४०० दशलक्ष रुपये मालमत्ता असलेल्या १०६ जनरल इन्शुरन्स कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्यात येऊन त्यांच्या व्यवस्थापनावर भारत सरकारचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. वरील दोन व्यवसायांच्या राष्ट्रीयीकरणानंतरही राष्ट्रीय उत्पन्नाच्या दरात अपेक्षित वाढ झाली नाही.

### १०.९.६ कोळसा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण :

कोळसा खाण व्यवसायात २१४ बड्या कंपन्या गुंतल्या होत्या. ऊर्जेची वाढती गरज आणि इंधनाच्या किंमती भरमसाठ वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन राष्ट्रीय स्तरावर कोळसा व्यवसायाच्या व्यवस्थापनासाठी कोळसा उद्योगाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.

सिंडिकेट निष्प्रभ झाल्यानंतर श्रीमती गांधीनी स्वतःच्या मंत्रीमंडळात समाजवादी विचारसरणीच्या मंत्र्यांचा भरणा केला. त्यांच्या गरिबी हटाओ या घोषणेने दारिद्र्यखरेषेखालील भारतीय जनतेत नवचैतन्याचे वारे वाहू लागले. या योजनेर्तंगत कामगारांचा असलेला ४ टक्के

बोनस ८.३३ टक्के करण्यात आला. कमाल जमीन धारणा कायद्याबाबत सुधारणा करण्यात येऊन बागाईत जमिनीची कमाल मर्यादा १० ते १८ एकर व कोरडवाहू जमिनीची कमाल धारण मर्यादा ५४ एकर ठरविण्यात आली.

### १०.९.७ मूल्यमापन :-

काही प्रमुख मोठ्या बँका व व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे व्यापारी क्षेत्रात फार मोठी क्रांती घडून बँकांच्या कार्याचे एक नवीन पर्व सुरु झाले. बँकांचे कार्यक्षेत्र व्यापक आणि भौगोलिकदृष्ट्या विस्तारल्याने रिझर्व्ह बँक यांच्या कार्यपध्दतीत व इतर बँकाच्या कार्यपध्दतीत तफावत होती. राष्ट्रीयीकरणामुळे बँकांची व्यवहार पध्दती एकात्म बनली. बँकांच्या शाखाविस्तार कार्यक्रमाला गती आली. १९६९ मध्ये राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांच्या शाखांची संख्या ४,१३४ होती. ती १९७७ मध्ये १२,५४३ इतकी वाढली. या विस्तारित शाखांपैकी बहुसंख्य शाखा जेथे बँका नव्हत्या, अशा ग्रामीण भागात उघडल्या गेल्या. गरजू शेतकऱ्यांना १० ते १२ टक्के व्याजाने कर्जपुरवठा होऊ लागल्याने त्यांची सावकारी पाशातून मुक्तता झाली. राष्ट्रीयकृत बँकांवर लोकांचा विश्वास वाढल्याने त्यांच्या ठेवींत वाढ झाली. पूर्वी व्यापारी बँका काही प्राधान्य क्षेत्रांना पतपुरवठा करण्यास टाळाटाळ करीत पण राष्ट्रीयीकरण केल्याने त्यांना कर्ज मिळू लागले.

राष्ट्रीयीकरणामुळे कारखानदारांची व भांडवलदारांची मक्तेदारी नष्ट झाली. राष्ट्रीयीकरणाच्या पूर्वी बँका सामाजिक नियंत्रणाला जुमानत नव्हत्या. काही बँका कायद्यांचे व नियमांचे पालन करीत नसत. राष्ट्रीयीकरणामुळे कर्जाची हमी मिळाल्याने सर्वच क्षेत्रात विशेषतः सार्वजनिक क्षेत्रात आणि शेती क्षेत्रात विकास झाल्याचे दिसून येते. बँक व्यवसायाला स्थैर्य प्राप्त झाले. बँक व्यवसायात काम करणाऱ्यांना कामाची सुरक्षितता, हमी मिळाली. चांगले पगार मिळू लागल्याने कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढू लागली. पर्यायाने बँकांची कार्यक्षमता वाढली. राष्ट्रीय उत्पन्न वाढून रोजगार निर्मितीला चालना मिळाली. राष्ट्रीयीकरणाचे बरेच फायदे झाले असले, तर काही दोषही दिसून आले. आर्थिक विकासाच्या योजनात राष्ट्रीयकृत बँका वित्तपुरवठा करतील ही नियोजन मंडळाची आशा फोल ठरली. कारण या बँकांनी प्रत्यक्षपणे या योजनात सहभाग घेतला नाही. राष्ट्रीयकृत बँका पतपुरवठा करतांना व्यक्तीगत हमीचा आग्रह धरतात. हमीदार म्हणून संचालक मंडळातील व्यक्ती किंवा बँकेची सदस्य मान्य करतात. असे हमीदार अनेकवेळा कर्जदारांकडून गुप्त कमीशन घेताना दिसतात. या बँकांच्या कार्यात गतीहीनता, पक्षपातीपणा, विलंब हे दोष वाढलेले दिसतात. तसेच बँकांच्या कार्यात राजकीय दडपणाचाही प्रभाव जाणवतो. दिलेले कर्ज ज्या कारणासाठी दिले त्या कारणासाठीच वापरले जाते किंवा नाही यांची खात्री करुन घेण्याचा कोणताच मार्ग उपलब्ध नाही. बँक राष्ट्रीयीकरणाच्या बाबतीत बरीच उलट-सुलट चर्चा ऐकायला मिळते. काही टीकाकारांच्या मते, राष्ट्रीयीकरणामुळे परदेशात भारताच्या राजकीय प्रतिष्ठेला धक्का पोहचू शकतो, तर काहींच्या मते, परदेशातून मोठमोठ्या उद्योगधंद्यासाठी जी आर्थिक मदत मिळते व त्या मोबदल्यात संबंधीत राष्ट्राला भारतात उद्योगव्यवसायाची परवानगी दिली जाते. त्याचा विपरीत परिणाम आर्थिक मदतीवर होऊ शकतो. राष्ट्रीयीकरणामुळे अकार्यक्षमता, विलंब, भ्रष्टाचार वाढीस लागल्यामुळे ठेवीदारांकडे दुर्लक्ष होते. काही जण राष्ट्रीयीकरणाचा निर्णय केवळ राजकीय हेतुने घेतलेला असून त्याचा उत्पादकतेशी संबंध नाही, केवळ सरकारी भांडवलवाद निर्माण करण्याचा तो प्रयत्न आहे असा युक्तीवाद करतात. राष्ट्रीकरणाबद्दल जरी परस्पर विरोधी विधाने केली, तरी एक गोष्ट मान्य करावी

लागेल आणि ती म्हणजे मोठ्या कारखान्यातून आणि व्यवसायातून लाखो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. शिवाय राष्ट्रीय संपत्तीत वाढ होते. या बाबीकडे आपण दुर्लक्ष करु शकत नाही. राष्ट्रीयकृत बँकांचे वरील काही दोष दिसत असले तरी राष्ट्रीयीकरणाचा निर्णय देशाच्या प्रगतीसाठी व स्थिरतेसाठी महत्वाचा होता, हे दिसून येते.

**१०.९.८ आपली प्रगती तपासा :-**

१. इंदिरा गांधींनी केलेल्या चौदा बँकांच्या राष्ट्रीयीकरणावर थोडक्यात टिप लिहा.

## १०.१० हरित क्रांती

प्राचीन काळापासून शेती हा भारतातील प्रमुख व्यवसाय आहे. परंतु शेतीला कधीही उर्जितावस्था प्राप्त झाली नाही. प्रामुख्याने भारतातील शेती जुन्या पध्दतीने, परंपरागत साधनांच्या साहाय्याने केली जात असे. शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून जेमतेम कुटूंबाचा उदरनिर्वाह चालत असे. राज्यकर्त्यांचा शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि निसर्गाचा लहरीपणा यामुळे शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळून कुटुंबाच्या इतर गरजा शेतकरी भागवू शकत नव्हता. ब्रिटिशांच्या काळात तर वेगवेगळया जमिन महसूल पध्दती, शेतीचे व्यापारीकरण यामुळे शेतकरी द्रारिद्रय व दुखःच्या खाईत लोटला गेला. शेतकरी अडचणीत सापडल्यामुळे त्याचा फायदा जमिनदार व शेठ-सावकारांनी घेतला. शेती व्यवसायात नैराश्याची भावना पसरली.

**१०.१०.१ हरितक्रांतीचा उदय :-**

जुन्या परंपरागत शेती कसणाऱ्या पध्दतीचा त्याग करुन नवीन पध्दतीचा अवलंब करणे व त्याद्वारे शेती उत्पदनाची पातळी वाढविणे म्हणजे हरितक्रांती होय. अन्नधान्याच्या उत्पादनात अल्पकाळात प्रचंड वाढ घडवून आणणे असाही हरितक्रांतीचा अर्थ केला जातो. भारताच्या स्वातंत्र्यानंतर पंतप्रधान पंडित नेहरुंनी औद्योगिक व शेती क्षेत्राकडे लक्ष दिले. जमिनदारी पध्दतीचा नाश करुन 'कसेल त्याची जमिन' हा कायदा केला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शेती सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. भाक्रा-नांगल सारखे जलसिंचन प्रकल्प राबवून पाणीपुरवठ्याच्या सोयी वाढविल्या. नेहरु कालखंडात शेती क्षेत्रात या सुधारणा झाल्या असल्या, तरी अन्नधान्याचा वेग अपेक्षेप्रमाणे मोठ्या प्रमाणात वाढला नव्हता. भारतातील शेती क्षेत्रात १९६७-६८ च्या सुमारास क्रांती घडून आली, असे म्हटले जाते.

इ.स. १९६० मध्ये भारतात प्रकर्षित शेती जिल्हा कार्यक्रम (IADP) आखण्यात आला. भारतातील निवडक १५ जिल्ह्यात सखोल शेतीचा प्रयोग करण्यात आला. हा प्रयोग कमालीचा यशस्वी झाल्याने तो भारतात सर्वत्र राबवून हरितक्रांती घडवून आणण्यात आली. शेतीसंबंधी

नवीन धोरण स्वीकारण्यात आले. शेती उत्पादन वाढविण्यासाठी व कृषी विकासासाठी अनेक गोष्टींचा,साधनांचा वापर करण्यात आला.

### १०.१०.२ संकरित बियाणांचे तंत्रज्ञान :-

अधिक उत्पादन देणाऱ्या दर्जेदार बियाणांच्या तंत्राने व वापराने तसेच रासायनिक खते व जलसिंचनाच्या सोईने शेतजमिन वर्षातून दोन ते चार पिके घेणे शक्य झाले. कारण संकरित बियाणांमुळे पिके ६० ते ७० दिवसात तयार होतात. इ.स. १९७१ मध्ये हा कार्यक्रम १५ दशलक्ष हेक्टर्स जमिनीला लागू केला गेला. १९७४-७५ पर्यंत ७५ दशलक्ष हेक्टर जमिन या कार्यक्रमाखाली आली. संकरित बियाणांच्या वापराने भारतीय शेतीची उत्पादकता आणि विविध पिकांच्या उत्पादनात प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते. सरकारने बियाणांचा वापर करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले. अनेकवेळा हरितक्रांतीचा उल्लेख बियाणे व खतांची क्रांती असाही केला जातो. भाताच्या जमुना, रत्ना, पद्मा, तायचुंग, जया, हंस, पंकज, साबरमती, विजया, कृष्णा, कावेरी; गव्हाच्या कल्याण, सोना, हिरा, मोती; ज्वारीच्या सी.एच.ए. १ व २ जावा, अशा विविध जाती निर्माण झाल्या. इतर पिकांबरोबरच मका, बाजरी, ऊस, कापूस इत्यादी पिकांच्या बाबतही नवनवीन जाती निर्माण झाल्या. प्रामुख्याने हरितक्रांती ही गव्हाच्या पिकांच्या संदर्भात घडून आली. शेतीमधील गुंतवणूक कमी व्हावी, शेतकऱ्यांची पिळवणूक थांबावी, यासाठी नियंत्रित बाजारपेठा स्थापन करण्यात आल्या. शेतकऱ्यांना योग्य किंमत मिळेपर्यंत माल साठविण्यासाठी सरकारी गोदामांची व्यवस्था करण्यात आली. हरितक्रांतीचा वेग वाढल्याने पुढील काळात अनेक नवनवीन सुधारणा होत गेल्या. शेतमालाची प्रतवारी व प्रमाणीकरण करण्याची व्यवस्था करण्यात आली. यासाठी ॲगमार्क हे चिन्ह देण्यात आले. यासाठी देशाच्या विविध भागात ९ प्रयोगशाळा स्थापन केल्या.

### १०.१०.३ हरितक्रांतीचे परिणाम :-

स्वातंत्र्योत्तर काळात वाढती लोकसंख्या व वाढत्या लोकसंख्येच्या पालनपोषणाची समस्या गंभीर होती. पंतप्रधान पंडित नेहरूंनी या समस्येला तोंड देण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला. जलसिंचनाच्या योजना, भूसंरक्षण, खते किटकनाशके, तृणनाशके इत्यादींचा वापर वाढवून हरितक्रांतीला चालना देण्याचा प्रयत्न झाला. पण अपेक्षित उदिष्ट गाठता आले नाही. खऱ्या अर्थाने भारतामध्ये सन १९६७-६८ मध्ये पहिली हरितक्रांती आणि १९८३-८४ मध्ये दुसरी हरितक्रांती घडून आली. इ.स. १९६७-६८ नंतर हरितक्रांतीमुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला.

हरितक्रांतीमुळे शेतकऱ्यांचा शेतीकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टीकोन बदलला. उत्पादन वाढल्याने शेतीव्यवसाय किफायतशीर असल्याची शेतकऱ्यांना जाणीव झाली. शेतकरी शेतीकडे व्यापारी दृष्टीकोनातून पाहू लागला. शेतकरी बाजाराभिमूख बनला. शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढीस लागला. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारल्याने त्यांच्या राहणीमानात बदल झाला, शिक्षणाचा प्रसार वाढला. खेडी बाजारपेठांशी जोडली गेली. दळणवळणाच्या साधनांत वाढ झाली. नवीन तंत्र, संकरित बियाणे, आधुनिक खते, सिंचनाच्या सोई, किटकनाशके, तृणनाशके यांच्यामुळे उत्पादनाबरोबरच शेतीची उत्पादकता वाढली. गहू, ज्वारी,

बाजरी, मका या अन्नधान्याबरोबर ऊस, कापूस, ताग, तेलबिया या नगदी पिकांचे उत्पादन वाढले. १९६०-६१ मध्ये ८२ दशलक्ष टन असलेले अन्नधान्याचे उत्पादन १९९४-९५ मध्ये १८५ दशलक्ष टन झाले. हरितक्रांतीमुळे वर्षातून तीन-चार पिके घेणे शक्य झाल्याने ग्रामीण भागातील बेराजगारांना शेतीमध्ये वर्षभर काम मिळू लागले. शेतीक्षेत्रातील दृश्य, अदृश्य व अर्धबेकारी नाहीशी होण्यास मदत झाली. शेती व्यवसायाला पूरक ठरणारे कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मेष पालन, वराह पालन, टॅक्टर दुरुस्ती, मोटार रिवाईडींगसारख्या व्यवसायांची वाढ झाली. रोजगार वाढला. पण त्याचबरोबरच शेतमजूरांचे वेतनही वाढले.

इंग्रज राजवटीत राज्यकर्ते या नात्याने शेतीकडे दुर्लक्ष तर केले खरे आणि देशाची विविध भागात फाळणी झाली. त्यामुळे भारताला अन्नधान्य आयात करावे लागले. पण हरितक्रांतीने भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनली. इ.स. १९७१ मध्ये अमेरिकेने राजकीय आकसापोटी पी.एल. ४८० या योजनेखाली दिली जाणारी अन्नधान्याची मदत बंद केली. पण लवकरच १९७७-७८ मध्ये भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला. शेतीच्या विकासापुढे कच्चा माल मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने औद्योगिक विकासाला चालना मिळाली. ग्रामीण भागाचा कायापालट घडून आला. देशाच्या आर्थिक विकासाला पोषक वातावरण निर्माण झाले. शेतकऱ्यांनी पारंपारिक अन्नधान्याबरोबर द्राक्षे, सफरचंद, आंबे, मोसंबी, संत्री, डाळींब, अननस या फळांचीही लागवड सुरु केली. जाई-जुई, गुलाब, शेवंती, मोगरा या फुलांचे उत्पादन सुरु केले. शेतमालाच्या निर्यातीमुळे परकीय चलन मिळू लागले. हरितक्रांतीने देशाच्या समृध्दीला हातभार लावला म्हणून भारताच्या दृष्टीने हरितक्रांती हा महत्त्वाचा टप्पा मानले जाते. याचे श्रेय प्रसिध्द भारतीय शेतीतज्ञ डॉ.एम.एस. स्वामीनाथन यांना जाते म्हणूनच त्यांना ‘भारतीय हरितक्रांतीचे जनक’ असे संबोधिले जाते.

### १०.१०.४ हरितक्रांतीचे दोष :-

हरितक्रांतीमुळे देशाचा विकास झाला हे नाकरता येणार नाही, तरी त्यातून काही समस्याही निर्माण झालेल्या दिसतात. शेतीचे आधुनिक तंत्रज्ञान लहान शेतकऱ्यांना स्वीकारता आले नाही. मोठे शेतकरी श्रीमंत बनले व त्यातून जमिनदारी पध्दतीला अप्रत्यक्ष चालना मिळाली. भांडवल कमी असल्यामुळे लहान शेतकरी शेती व्यवसायातून बाहेर फेकले गेले. बँका व सोसायट्यांमधून मिळणाऱ्या कर्जाचा फायदाही मोठ्या शेतकऱ्यांनाच झाला. हरितक्रांतीने उत्पन्नातील विषमता वाढली. मोठे शेतकरी व मध्यम शेतकरी यांच्या उत्पन्नातील तफावत ४ टक्के वाढली. तर मोठे व लहान शेतकरी यांच्या उत्पन्नातील तफावत १० टक्क्यांनी वाढली. डॉ. राव यांच्या मते, ‘हरितक्रांतीने देशाच्या अन्नधान्याच्या उत्पादनात भर घातली आहे पण तिने ग्रामीण उत्पन्नातील विषमता वाढली आहे.’

भारताच्या काही राज्यातच हरितक्रांती यशस्वी झाल्याचे दिसून येते. पंजाब, हरियाणा, गुजरात, तामिळाडू, उत्तर प्रदेश, केरळ, राजस्थान इत्यादी राज्यात ती घडून आली. अन्य राज्यात या क्रांतीचा फारसा परिणाम दिसून येत नाही. त्यामुळे प्रादेशिक विषमता वाढली. देशाच्या भौगोलिक विस्ताराच्या मानाने हरितक्रांतीचे क्षेत्र मर्यादित राहिले. अन्नधान्याच्या उत्पादनात हरितक्रांतीने वाढ झाली असली तरी तेलबिया, कापूस, ताग यांची वाढ मंद आहे.

कडधान्याचे उत्पादनही कमी आहे. सर्व राज्यांच्या पीक उत्पादनाचा वेग सारखा नव्हता. म्हणजे सर्वच पिकांच्या बाबतीत ही क्रांती यशस्वी झाली नाही. शेतीचे यांत्रिकीकरण झाल्याने शेतमजूर बेकार बनले. संकरित बियाणांचा वापर वाढला, पण त्याची गुणवत्ता कमी होती. निकृष्ट आहाराने लोकांचे आरोग्य खालावले. रासायनिक खते व किटकनाशकांचा वाढता वापर आरोग्यास अपायकारक ठरत आहे. रासायनिक खताच्या अति वापरामुळे जमिन नापिक बनते. अन्नप्रदुषणात वाढ झाली. असे अनेक दोष दाखवले असले तरी हरितक्रांती देशाच्या विकासासाठी आवश्यक व महत्त्वाची आहे. फक्त त्यातील दोष दूर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

### १०.१०.५ आपली प्रगती तपासा :-

१. हरितक्रांतीचे परिणामांची सांगा.

## १०.११ सारांश

वरील विवेचनावरुन असे दिसून येते कि, इंदिरा गांधीनी सत्तासुत्रे हातात घेतल्यावर खऱ्याअर्थाने भारतातील बँका, उदयोग धंदे व शेतीक्षेत्रात बदल घडून आलेले दिसून येतात. याचे दूरगामी परिणाम भारताच्या आर्थिक व सामाजजिवनावर झाले. या विकासामुळे इंदिरा गांधीची व काँग्रेसची लोकप्रियता वाढली, त्यामुळे भारतात एक पक्ष व एक नेता अशी स्थिती निर्माण झाली व याचे परिणाम नंतरच्या काळात दिसून आले.

## १०.१२ विद्यापीठीय स्वरुपाचे प्रश्न

१) पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींच्या (१९६४-६६) कार्यावर चर्चा करा.

२) इंदिरा गांधींचे अंतर्गत धोरण विशेषतः

अ) संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द

ब) बँकांचे राष्ट्रीकरण यांवर भाष्य करा.

३) देशातील हरितक्रांतीचे परीक्षण करा.

४) टीपा लिहा.

अ) १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण

ब) तनखे व पदव्या

क) हरितक्रांती.

❖❖❖❖

# ११

# नेहरु युगानंतरचा भारत - २

## आणिबाणी आणि भारत

**प्रकरण रुपरेषा :**

११.० उद्दिष्टये
११.१ आणिबाणीची पार्श्वभूमी किंवा कारणे
११.२ आणिबाणी काळातील प्रशासन
११.३ आणिबाणीचे परिणाम
११.४ आणिबाणी काळातील दडपशाही
११.५ आणिबाणीला विरोध
११.६ आणिबाणीचा शेवट
११.७ सारांश
११.८ प्रश्न

## ११.०उद्दिष्टये :

१) आणिबाणीची पार्श्वभूमी समजून घेणे.
२) आणिबाणी काळातील घटनांचा आढावा घेणे.
३) आणिबाणीविषयी इंदिरा गांधींची भूमिका अभ्यासणे.
४) आणिबाणीच्या परिणामांचा अभ्यास करणे.

## ११.१ आणिबाणीची पार्श्वभूमी किंवा कारणे

श्रीमती इंदिरा गांधींनी २६ जून १९७५ रोजी देशात अंतर्गत आणीबाणी लागू करुन भारतीय लोकशाहीवर आघात केला. देशाला अशा प्रकारचा हा पहिलाच अनुभव होता. जनतेचे मूलभूत अधिकार नष्ट करण्यात आले. सरकार जनतेच्या हालचाली व कृत्यावर नजर ठेवू लागले. श्रीमती इंदिरा गांधीनी आणीबाणी जाहीर करुन हुकूमशाही वृत्तीचे दर्शन घडविले. लालबहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर (१० जानेवारी १९६६) त्यांनी भारताच्या राजकारणावर आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच त्यांचा सिंडीकेटशी संघर्ष झाला.

१९६७ ते १९७२ या काळात महत्वाची राजकीय स्थित्यंतरे घडून आली. १९६७ च्या निवडणूकीने काँग्रेसच्या एकछत्री अंमलाचा काळ संपला. एकपक्षीय सरकारच्या व्यवस्थेच्या जागी अनेकपक्षीय राजकारण सुरू झाले. याच काळापासून विरोधी पक्षाची ताकद वाढत गेली. काँग्रेस बलशाली संघटना होती. पण अंतर्गत संघर्षाने पोखरली गेली होती. इंदिरा गांधींविरुद्ध सिंडीकेट संघर्ष पराकोटीला पोहचला होता. या संघर्षात जनतेची सहानुभूती मिळवून अनपेक्षीतरित्या लोकांशी मानसिक संवाद साधण्यात इंदिरा गांधीनी अभूतपूर्व यश मिळविले. १९७१ च्या लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकांमध्ये नेत्रदिपक विजय संपादन केला. विरोधकांना हे यश अनपेक्षित होते. विरोधकांना आर्श्चयाचा धक्का बसला व इंदिरा गांधींच्या या यशामागे काहीतरी काळेबेरे दडलेले आहे, असा संशय बळावला. आजही अनेकांना इंदिरा गांधीनी मिळवलेला विजय सरळ मार्गाने नव्हता, अशी खात्री वाटते.

श्रीमती इंदिरा गांधी या पंडित जवाहरलाल नेहरुं यांच्या कन्या होत्या. पित्याच्या सहवासात त्यांना राजकारणाचे बाळकडू मिळाले, पण या पिता-पुत्रीच्या स्वभावात, काम करण्याच्या पद्धतीमध्ये फरक होता. पंडित नेहरुंच्या नेतृत्वाला एक दिव्यत्वाच्या वलयाचे परिमाण होते. हे खरे, पण इंदिरा गांधीच्या हाती या सत्तासंघर्षाच्या ओघात जी सत्ता केंद्रीत झाली आणि एक पक्ष, एक नेता हे जे समीकरण देशात निर्माण झाले ती आर्श्चयकारक व नवीन गोष्ट होती. इंदिरा गांधी हुकुमशहा असल्याचे म्हणणे चुकीचे आहे. ज्या अर्थाने हिटलर, मुसोलिनी व स्टॅलीन हुकुमशहा होते, त्या अर्थाने इंदिरा गांधी हुकुमशहा नाहीत. लोकशाहीच्या मार्गाने त्या जनतेच्या सर्वोच्च नेत्याचे स्थान पटकावून बसल्या होत्या. लोकांच्या दृष्टीकोनातून इतर सर्व नेते हे त्या-त्या पक्षाचे नेते होते. तर इंदिराजी एकमेव राष्ट्रनेत्या होत्या. पंडित नेहरु हे या अर्थाने राष्ट्रनेते कधी नव्हते. पंडित नेहरु लोकांचे लाडके नेते होते. ते निवडणुकीत काँग्रेसला हमखास विजयी करीत. इंदिरा गांधी काँग्रेस पक्षाच्या नाही, तर काँग्रेस हा इंदिरा गांधींचा पक्ष होता. २४ वी व २५वी घटना दुरुस्ती करुन न्यायालयापेक्षा संसद श्रेष्ठ असल्याचे त्यांनी दाखवून दिले. त्यांना विरोध खपत नव्हता. स्वतंत्रपणे वागणारे व वैयक्तिकरित्या जे प्रामाणिक नाहीत, अशा मंत्र्यांना आणि मुख्यमंत्र्यांना त्यांनी पदावरुन काढून टाकले. विरोधकांच्या प्रत्येक हालचालींवर व कृतीवर त्यांची नजर असे. १९७१ च्या निवडणूकीनंतर इंदिरा गांधी भारताच्या निर्विवाद राज्यकर्त्या होत्या. इ.स. १९७२ पासून इंदिरा गांधींवर संकटाची मालिकाच सुरु झाली. १९७१ ते १९७७ या कालावधीत अनेक महत्त्वाचे प्रसंग घडून आले. त्यापैकी आणीबाणीचा प्रसंग अतिशय महत्वाचा व भारतीयांना एका वेगळ्या अनुभवातून नेणारा होता.

### ११.१.१ भारत पाक युद्ध (१९७१) आणि बांगलादेशचा उदय :

१९६५ च्या युद्धात जप्त केलेली पाकिस्तानी व्यापारी जहाजे पाकिस्तानला परत केली. पाकिस्तानच्या सांस्कृतिक प्रतिनिधी मंडळाला भारत भेटीसाठी पाचारण केले. तसेच भारतभेटीसाठी आवश्यक परवानापत्राच्या अटी काहीशा शिथिल केल्या. परंतु भारताने पुढे केलेल्या मैत्रीच्या हाताला पाकिस्तानकडून अनुकूल प्रतिसाद तर मिळाला नाहीच, उलट उभय देशात कोणत्याही वाटाघाटी होण्यापूर्वी काश्मीर प्रश्न सोडविण्याचा आग्रह पाकिस्तानने धरला. पाकचे अध्यक्ष आयुबखान यांच्या ताठर व नकारात्मक भूमिकेमुळे भारत-पाक संबंध तणावाचे

बनत गेले. वास्तविक पाकिस्तानशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याची भारताची प्रामाणिक इच्छा होती. त्यामुळेच सिंधु नदी पाणी कराराची मुदत ३१ मार्च १९७० रोजी संपुष्टात आल्यानंतरही भारताने बियास व रावी नदीतील अतिरिक्त पाण्याचा पुरवठा पाकिस्तानला केला होता.

भारत-पाक तणावात पाकिस्तानच्या अंतर्गत राजकीय संघर्षामुळे जास्तच भर पडली. पाकिस्तानमध्ये या काळात पूर्व पाकिस्तान विरुद्ध पश्चिम पाकिस्तान असा संघर्ष सुरु झाला. दोन्ही प्रदेशांमध्ये एक हजार मैलाचे अंतर होते. एक इस्लाम धर्म सोडला तर भाषा, संस्कृती, राहणीमान याबाबतीत दोघांमध्ये प्रचंड भिन्नता होती. पश्चिम पाकमधील राज्यकर्त्यांना पूर्व पाकवर नियंत्रण ठेवणे कठीण जात होते. १९५८ मध्ये पूर्वपाकच्या आर्थिक शोषणामुळे व राजकीय दडपणामुळे पूर्व पाकमध्ये असंतोष वाढत गेला. या अन्यायाचे निवारण करण्यासाठी शेख मुजीबूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या 'अवामी लीग' पक्षाने चळवळ सुरु केली. १९६९ मध्ये जनरल याहयाखान हे पाकिस्तानचे अध्यक्ष बनले. त्यांनी वरील संघर्ष दूर करण्यासाठी पाकिस्तानमध्ये सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली. याहयाखानने स्वतःची प्रतिमा उजळण्यासाठी राष्ट्राची प्रतिष्ठा पणाला लावण्याचे ठरविले.

डिसेंबर १९७० मध्ये पाकिस्तानात राष्ट्रीय सभेच्या ३१३ जागांसाठी निवडणुका झाल्या. पूर्व पाकिस्तानमध्ये शेख मुजीबूर रेहमान यांनी तर पश्चिम पाकिस्तानमध्ये झुल्फिकार अली भुट्टो यांनी बाजी मारली. पूर्व पाकमध्ये १६९ जागांपैकी १६७ जागा शेख मुजीबूर रेहमान यांच्या अवामी लीग पक्षाला मिळाल्या व पश्चिम पाकमध्ये १४४ जागांपैकी ८१ जागा झुल्फीकार अली भुट्टोंच्या 'पीपल्स पक्षाने' जिंकल्या. पाकिस्तानची सत्ता अवामी लीगच्या ताब्यात देण्यास अध्यक्ष याहयाखान नाखूष होते. त्यामुळे पीपल्स पार्टीचे नेते झुल्फिकार अली भुट्टोंशी संगनमत करुन अवामी लीग देशाचे तुकडे करील असा खोटा प्रचार सुरु केला. त्यांनी राष्ट्रीय सभेची बैठकही बेमुदत पुढे ढकलल्याने पूर्व पाकमध्ये संतापाची लाट उसळली. शेख मुजीबूर रेहमानने असहकार आंदोलन सुरु केले. परिस्थिती आटोक्याबाहेर जात असलेली पाहून अध्यक्ष याहयाखान यांनी मार्च १९७१ मध्ये शेख मुजीबूर रेहमान यांची भेट घेतली. पण या भेटीचा उद्देश वेगळा होता. अवामी लीगला गाफील ठेवण्याचा डाव होता. कारण २५ मार्च रोजी याहयाखान पश्चिम पाकमध्ये परततात पूर्व पाकमध्ये लष्कराने भयानक दहशतवादाला व अत्याचाराला सुरवात केली. शेख मुजीबूर रेहमान यांना कैद करण्यात आले.

अनेक नेते भूमीगत झाले. हजारो बुद्धिजीवी व निरपराध लोकांची हत्या करण्यात आली. गोळीबार, लाठीमार, अत्याचार यांना ऊत आला. रस्तोरस्ती प्रेतांचे खच दिसू लागले. अंतर्गत यादवी युद्धाने पूर्व पाकमध्ये दहशतवादाचा कळस गाठला. या सर्व गोष्टींचा भारतावर परिणाम झाला. पूर्व पाकमधील हजारो निर्वासित भारतात येऊ लागले. जवळ जवळ १० लाख निर्वासित भारतात आले. त्यांची संख्या इतकी वाढली की, त्यांना अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य इत्यादी मुलभूत सोई पुरविणे आर्थिकदृष्टया परवडणारे नव्हते. अर्थव्यवस्थेवर प्रचंड बोजा पडला. बंगालजवळ पूर्व पाकची 'मुक्तीवाहिनी सेना' व पाकचे लष्कर यांच्यात चकमकी होऊ लागल्या.

मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना पाहून इंदिरा गांधीनी संयुक्त राष्ट्रसंघाला हा रक्तपात थांबविण्यासाठी हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले. एवढेच नव्हे, तर २४ ऑक्टोबर रोजी परदेश दौरे करुन त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, अमेरिका, इत्यादी राष्ट्रांना भेटी दिल्या. अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घेऊन भारताने पाकच्या अंतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करु नये, असे म्हटले. चीननेही पाकची बाजू घेतली. अमेरिका व चीन या दोन देशांचा दबाव कमी करण्यासाठी इंदिरा गांधीनी रशियाशी मैत्री व सहकार्याचा करार केला. भारताचा आवाज ऐकण्यास कोणीही तयार नव्हता.

अध्यक्ष याहयाखानने पूर्व बंगाल प्रश्नाचा वापर भारतविरोधी केला. भारताची बदनामी करण्यात आली. एवढेच नव्हे, तर भारताला उघड धमक्या देणे सुरु केले. प्रश्न गंभीर होता. इंदिरा गांधीनी धैर्याने या प्रसंगाला तोंड दिले. यावेळी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाची व मुत्सद्देगिरीची कसोटी पणाला लागली. २३ नोव्हेंबर १९७१ रोजी अध्यक्ष याहयाखानने आणीबाणीची घोषणा केली. ३ डिसेंबर रोजी पाकच्या लष्कराने व विमानांनी पजाब व काश्मीरच्या सात मोठ्या शहरांवर हल्ला करुन प्रत्यक्ष युद्ध सुरु केले. जशास तसे उत्तर देऊन भारतानेही आपले लष्कर पूर्व पाकमध्ये घुसविले. तुंबळ युद्ध होऊन केवळ दोन आठवड्यातच पाकचा दारुण पराभव झाला. १६ डिसेंबर १९७१ रोजी पाक लष्कराने ढाक्का येथे शरणागती स्विकारली. ९० हजार पाक सैनिक युद्धकैदी बनले. युद्धाच्या अखेरच्या टप्प्यात भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने आपले सातवे नौदल बंगालच्या उपसागरात उतरविले. याला शह देण्यासाठी रशियाचे नौदल हिंदी महासागरात आले. त्यामुळे अमेरिकेची मदत पाकला मिळू शकली नाही. हा सर्व इंदिरा गांधींच्या मुत्सद्देगिरीचा विजय होता. शेख मुजीबूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली बांगला देशाची घोषणा करण्यात आली. पाकची मोठी प्रादेशिक व आर्थिक हानी झाली. बांगला देशाशी मैत्री झाल्याने पूर्व सीमा सुरक्षित झाली. भारत-पाक यांच्यात 'सिमला करार' होऊन शांतता निर्माण करण्यात आली. जगाच्या राजकारणात भारताचा आंतरराष्ट्रीय प्रभाव वाढला.

इंदिरा गांधीनी भारत-पाक युद्धात मिळविलेल्या अभूतपुर्व विजयामुळे त्या भारतीयांच्या गळ्यातील ताईत बनल्या. त्यांना 'भारतरत्न' हा किताब देऊन त्यांचा सर्वोच्च सन्मान करण्यात आला. विरोधकांनी त्यांची मुक्त कंठाने प्रशंसा केली. अटलबिहारी वायपेयींनी त्यांना युद्ध देवतेची, दुर्गादेवीची उपमा दिली.

## ११.१.२ गुजरातमधील निवडणूक (१९७२) :

भारत-पाक युद्धात मिळालेल्या विजय आणि जनतेचा पाठिंबा यामुळे इंदिरा गांधींनी मार्च १९७२ मध्य गुजरात विधानसभेच्या निवडणूकीची घोषणा केली. केंद्र व राज्य यांच्यात राजकीय समन्वय असल्याशिवाय पक्षाची ध्येय-धोरणे प्रभावीपणे राबविता येत नाहीत. शिवाय भारत-पाक युद्धातील विजयामुळे काँग्रेस पक्षाचा फायदा व्हावा, या राजकीय हुतूने या निवडणुका जाहीर केल्या. अपेक्षेप्रमाणे गुजरातमधील ७० टक्के जागा काँग्रेसने जिंकल्या. केंद्र व राज्यात काँग्रेस पक्ष सत्तेवर आल्याने इंदिरा गांधीनी प्रभावीपणे गरिबी हटाओ ही योजना कार्यान्वित करण्याचे ठरविले.

### ११.१.३ संकटांची मालिका व नगरवाला प्रकरण

इ.स. १९७१ च्या मध्यावधी निवडणूकांमध्ये इंदिरा गांधींना संसदेत बहुमत मिळाले होते. भारत-पाक युद्धसमाप्तीनंतर इंदिरा गांधींनी मार्च १९७२ मध्ये गुजरात विधानसभेच्या निवडणूका लढवल्या. युद्धात मिळालेल्या विजयाचा फायदा या निवडणूकीत झाला. काँग्रेसला प्रचंड यश मिळाले. त्यानंतर मात्र इंदिरा गांधीवर संकटांची मालिकाच सुरु झाली. ज्या वेगाने इंदिरा गांधीनी लोकप्रियतेचे शिखर गाठले किंबहुना त्यापेक्षाहीं जास्त वेगाने त्यांची लोकप्रियता घसरु लागली. त्यांच्यासमोर अनेक आर्थिक आणि सामाजिक समस्या उभ्या राहिल्या. जनतेचा सरकारवरील विश्वास ढळू लागला. देशात पडलेल्या दुष्काळांमुळे अर्थव्यवस्था संकटात सापडली. इंदिरा गांधीनी केलेल्या चांगल्या कामाकडेही जनतेने पाठ फिरविली. याचवेळी घडलेल्या 'नगरवाला प्रकरणामुळे' इंदिरा गांधी बदनाम झाल्या. रुस्तम सोहराबजी नगरवाला या बदमाशाने २४ मे १९७१ रोजी स्टेट बँकचे मुख्य रोखपाल वेदप्रकाश मल्होत्रा यांना इंदिरा गांधीच्या आवाजात फोनवरुन बँकेसमोर उभ्या असलेल्या इसमाला ६० लाख रुपये देण्याचा आदेश दिला. मल्होत्रांनी त्याप्रमाणे पैसे दिले. पण नंतर असे समजले की, इंदिरा गांधीनी असा फोन केलाच नव्हता. अखेर पोलिस कारवाई होऊन नगरवालास पकडण्यात आले. त्याला सक्तमजूरीची शिक्षा झाली. पण त्याचा तुरुंगातच मृत्यू झाला. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचा अपघातात मृत्यु झाला. विरोधकांना भांडवल मिळाले. या प्रकरणामागे इंदिरा गांधी असल्याची अफवा पसरवली. दुसरे एक प्रकरण इंदिरा गांधीना हानिकारक व त्रासदायक ठरले. पुत्र संजय गांधींना भारतात मोटारीचा कारखाना सुरु करावयाचा होता. मोटार निर्मितीचा परवाना मिळविण्यासाठी १०-१२ जणांचे अर्ज आले होते. त्यात संजय गांधींचाही अर्ज होता. अखेर हा परवाना त्यांनाच मिळाल्याने संशयाची पाल चुकचुकली. भ्रष्टाचाराचा व वशिलेबाजीचा ठपका सरकारवर ठेवण्यात आला.

### ११.१.४ जनतेमधील वाढता असंतोष :

वाढती बेकारी, वाढत्या किंमती, जीवनावश्यक वस्तूंचा अपुरा पुरवठा आणि आर्थिक मंदी यामुळे संपूर्ण देशात असंतोष व नैराश्येचे वातावरण पसरले. १९७२ आणि १९७३ या काळात देशभरात मोठ-मोठ्या उद्योग व्यवसायामध्ये संप, टाळेबंदी, मोर्चे आणि निदर्शने सुरु झाली. देशाची आर्थिक आणि औद्योगिक राजधानी मुंबई येथे एका वर्षात १२,०८९ संप घडून आले. मे १९७४ मध्ये देशव्यापी २२ दिवसांचा रेल्वेसंप घडून आला. या संपात १ लाखापेक्षाही जास्त रेल्वेकामगार सहभागी झाले होते. कामगारांना मारहाण करुन कैदेत टाकले जात असे. शांतता आणि सुव्यवस्था धोक्यात आली होती. कायदा नावालाच होता. कामगार आणि विद्यार्थी चळवळी हिंसक बनत होत्या. विद्यार्थी आंदोलनामुळे अनेक महाविद्यालये व विद्यापीठे बंद करण्यात आली. देशाच्या काही भागात काँग्रेस राजवटीविरुद्ध चळवळी करुन सरकारला अडचणीत टाकले. शिवाय केंद्रातील आणि राज्यातील सरकारी अधिकारी आणि मंत्र्यांविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले. इतकेच नव्हे, तर इंदिरा गांधींचे कुटूंबसुद्धा पुत्र संजय गांधीला मोटार निर्मितीचा परवाना दिल्याने भ्रष्टाचारातून मुक्त नव्हते.

### ११.१.५ संसद आणि वर्तमान पत्राच्या स्वातंत्र्यावर हल्ला :

याच काळात संसद आणि न्यायालय यांच्यामध्ये श्रेष्ठत्वाचा संघर्ष निर्माण झाला. घटनेतील मूलभूत हक्कात सुधारणा करण्याचा हक्क संसदेला आहे, असे इंदिरा गांधींचे मत होते. या संबंधात १९७१ मध्ये सरकारने केलेल्या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. हा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश एस.एम.सिक्री यांनी स्वतःसह १३ न्यायाधिशांचे स्वतंत्र न्यायाधिश नेमले. पैकी सहा न्यायाधिशांनी सरकारच्या बाजूने व इतर सहा न्यायाधिशांनी सरकारच्या विरोधात मत दिले. तेरावे न्यायाधीश श्री. खन्ना तटस्थ राहीले. या गुंतागुंतीच्या निर्णयावर इंदिरा गांधी समर्थक व विरोधक परस्परांवर टिका करु लागले.

या निकालानंतर न्यायाधीश सिक्री निवृत्त झाले. सेवाजेष्ठतेनुसार श्री. जे.एम. शेलाट, के.एस. हेगडे आणि ए.एन. ग्रोव्हर हे वरिष्ठ न्यायाधीश होते. न्यायाधीश सिक्रींच्या निवृत्तीनंतर त्यांच्या जागी श्री. शेलाट यांची नियुक्ती व्हायला हवी होती. परंतू संसदेपेक्षा न्यायसंस्था श्रेष्ठ आहे, असा सरकार विरोधी निकाल देणाऱ्यांपैकी ते होते. त्यामुळे इंदिरा गांधींनी त्यांच्याऐवजी मुख्य न्यायाधीश म्हणून श्री. ए.एन.रे यांची नियुक्ती केली. इंदिरा गांधींच्या या राजकारणामुळे बहुसंख्य न्यायाधीश व विरोधकांनी इंदिरा गांधी न्यायसंस्थेचा गळा घोटत असल्याचा प्रचार करु लागले. लोकशाहीचा आधारस्तंभ वर्तमानपत्रे सुद्धा इंदिरा गांधींना कडक नियंत्रणाखाली ठेवून संशयीत वर्तमान पत्रांवर कडक कारवाई करण्याचे जाहीर केले. वर्तमानपत्रांवरील ही कारवाई म्हणजे लोकशाही विरोधी घटना असून लोकशाहीतील वर्तमानपत्रांचे स्वातंत्र्य धोक्यात आले. न्यायसंस्था आणि इंदिरा गांधींविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध बनले.

### ११.१.६ आर्थिक संकट :

१९७२-७३ पासून निसर्गाची साथ न मिळाल्याने कृषी उत्पादनावर विपरीत परिणाम झाला. देशातील १८० दशलक्ष लोकांना अवर्षणाचा फटका बसला. पाकिस्तानविरुद्ध झालेल्या युद्धामुळेही आर्थिक टंचाई निर्माण झाली. बांग्लादेशातून आलेल्या १० दशलक्ष निर्वासितांना अन्नधान्य पुरवावे लागल्याने भारताची धान्याची कोठारे रिकामी झाली होती. पुढे १९७३, १९७४, १९७५ या वर्षातही वरुणराजाची कृपा फारशी न झाल्याने अर्थव्यवस्थेला जबरदस्त हादरा बसला.

चलनवाढ, अन्नधान्य टंचाई, प्रचंड महागाई यांच्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली. समाजातील प्रमुख तीन गट काँग्रेसपासून दूर जाऊ लागले. मध्यमवर्ग वाढत्या किंमती आणि प्रशासनातील भ्रष्टाचारामुळे, श्रीमंत शेतकऱ्यांना जमिन सुधारणा व त्यामुळे जमिनी जाणार याची भिती. शिवाय जे भांडवलदार, कारखानदार होते त्यांना सरकारच्या समाजवादाकडे असलेला कल, त्यातूनच झालेले बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि मक्तेदारी विरुद्धची सरकारची उपाययोजना यामुळे जनता काँग्रेसच्या विरोधात गेली. समाजातील जो अति गरीब वर्ग होता तो मात्र काँग्रेसबरोबर होता. राजकीय पक्ष १९७१ च्या लोकसभा निवडणूकीत आणि १९७२ च्या विधानसभा निवडणूकीतही पराभूत झाल्याने कोणत्याही प्रकारचा राजकीय पर्याय देण्यास ते

समर्थ नव्हते. अन्नासाठी नागपूर, मुंबई, म्हैसूर या ठिकाणी दंगली उसळल्या. केरळमध्ये धान्य वाहून नेणारे ट्रक विद्यार्थ्यांनी लुटले. इंदिरा गांधींच्या 'गरिबी हटाव' या घोषणेची टिंगल-टवाळी होऊ लागली. पाणीटंचाईमुळे जलविद्युत प्रकल्प बंद पडले. परिणामी औद्योगिक उत्पादन घटले. कॉंग्रेसचे नेते मात्र गैरमार्गाने पैसा कमावत होते.

### ११.१.७ गुजरातमधील आंदोलन (१९७४) :

आर्थिक संकटाचा फटका कॉंग्रेसला गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणात बसला. कॉंग्रेसचे निर्विवाद, बहुमताचे सरकार लोकक्षोभामुळे कोसळल्याचे पहिले उदाहरण गुजरातचे होते. गुजरात आंदोलनाची व्याप्ती मोठी होती. समाजातील निरनिराळे वर्ग त्यात सहभागी झाले होते. त्यांचे हेतू अर्थातच भिन्न होते. सामाजिक अन्याय, काळाबाजार, भ्रष्टाचार, साठेबाजी इत्यादींचा प्रतिकार अशा स्वरुपात हे व्यापक आंदोलन प्रकट होत होते. आंदोलकांच्या प्रमुख दोन मागण्या होत्या. एक म्हणजे मुख्यमंत्री चिमणभाई पटेल यांचा राजीनामा व दुसरी म्हणजे विधानसभेचे विसर्जन.

आर्थिक संकटाच्या काळात व्यापारी व साठेबाजांनी अधिक असह्य करुन सोडले होते. सरकार त्यांच्याविरुद्ध खंबीर उपाययोजना करीत नव्हते. सरकार पुरोगामी घोषणांखेरीज काहीच करीत नव्हते. काही आमदारांनी राष्ट्रपती राजवट लागू करण्याचीही मागणी केली होती. अशा स्फोटक वातावरणात विद्यार्थ्यांच्या चळवळीने त्यात ठिणगी पडली. त्यातच गुजरातमधील मोरवी गावातील बी.एल.डी. इंजिनिअरींग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी संप केला. मोडतोड केली. विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्र्याकडे दाद मागितली. पण मुख्यमंत्र्यानी टाळाटाळ केल्याने या चळवळीस पटेल विरोधी वळण लागले. विद्यार्थ्यांनी ७ जानेवारी १९७४ पासून बेमुदत बंदची घोषणा केली. त्यांना इतरांचा पाठिंबा मिळाला. अनेक तरुण त्यात सहभागी झाले. त्यांनी नवनिर्माण समिती स्थापन केली. महिन्याभरात या आंदोलनाला वणव्याचे स्वरुप आले. ९ फेब्रुवारी १९७४ रोजी चिमणभाई पटेलांनी राजीनामा दिला. विधानसभा विसर्जित करुन आमदारांना राजीनामे देण्याचे आवाहन केले. शेवटी १६ मार्च १९७४ रोजी गुजरात विधानसभा विसर्जित झाली.

### ११.१.८ बिहारमधील आंदोलन (१९७४) :

गुजरातप्रमाणे बिहारमध्येही चळवळ सुरु होती. दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्यांची संख्या बिहारमध्ये प्रचंड होती. गुजरातप्रमाणे बिहारमध्येही विद्यार्थी चळवळीतून आंदोलनाला तोंड फुटले. २१ जानेवारी १९७४ च्या बिहार बंदपासून ही चळवळ सुरु झाली. या बंदला सर्व विरोधी पक्षांचा पाठिंबा होता. छात्र नवजीवन मोर्चा व छात्र संघर्ष समिती या दोन विद्यार्थी संघटनांनी चळवळीचे रणशिंग फुंकले. विद्यार्थ्यांनी गुजरात विधानसभेवर मोर्चा नेऊन शिक्षणमंत्र्याला घेराव घातला, निदर्शने केली. शैक्षणिक मागण्याबरोबरच विद्यार्थ्यांनी चुकीचे प्रशासन, भ्रष्टाचार आणि वाढत्या किंमती विरुद्ध सरकारचा निषेध केला. सर्वच राजकीय पक्षांनी पाठिंबा दिल्यामुळे विद्यार्थी आंदोलनाला हिंसक वळण लागले. १८ मार्चला पाटण्यात दंगल उसळली. ही दंगल ४ दिवस चालू होती. सरकारी प्रशासनयंत्रणा कोलमडून पडली. पाटणा म्युनसिपल कार्पोरेशनच्या इमारतीला आग लावली. छात्र संघर्ष समितीच्या मोर्चावर पोलिसांनी

केलेल्या हल्ल्यात अनेक तरुण मृत्युमुखी पडले. गफूर सरकारने याकडे दुर्लक्ष केले. १२ एप्रिल १९७४ रोजी गया येथे सीमा सुरक्षा दल व केंद्रीय राखीव पोलिसांनी प्रचंड दडपशाही करुन ८ लोक मारले. अनेकांना अटक केली. 'सर्चलाईट', 'प्रदीप' या दैनिकांनी आंदोलनाला पाठिंबा दिला. म्हणून त्यांच्या कार्यालयाची होळी करण्यात आली. त्यांच्या जाहिराती थांबवण्यात आल्या. याच सुमारास बिहार आंदोलनाचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांच्याकडे गेले. त्यांनी अहिंसक मार्गाचा स्वीकार केला. बिहारचे सरकार टिकविणे, ही इंदिरा गांधीनी प्रतिष्ठेची बाब केली होती. विधानसभा विसर्जित न करता बंदोबस्ताच्या नावाखाली ही चळवळ दडपून टाकण्याचे त्यांनी ठरविले. लोकांचा संताप अनावर झाला.

### ११.१.९ जयप्रकाश नारायण-समग्र क्रांती :

बिहारमधील आंदोलन पूर्वनियोजित व सुसंघटित होते. त्यात उजव्या विचारसरणीच्या जनसंघाचे तरुण गट व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची लढाऊ दले आघाडीवर होती. या सर्वांना जयप्रकाश नारायण यांनी नेतृत्व दिले. जयप्रकाशजींना फक्त बिहारचेच सरकार पाडायचे होते असे नाही, तर इंदिरा गांधीनाही हटवायचे होते. इंदिरा गांधींना भ्रष्टाचारी व लोकशाहीविरोधी ठरवून त्यांच्या विरोधात त्यांनी देशभर दौरे काढले. समग्र क्रांतीचे ध्येय त्यांनी घोषित केले. 'जे.पी. लाटेने'परमोच्च बिंदू गाठला होता. जयप्रकाश नारायण अनेकांना देशाचे तारणहार वाटू लागले. राजकीय व सामाजिक पुर्ननिर्माणाचे सुंदर स्वप्न त्यांनी जनतेसमोर ठेवले. सुरुवातीला समाजवादी व नंतर गांधीवादी बनलेल्या जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय चळवळीला गांधीप्रणित सत्याग्रहाची जोड दिली. बिहारमधील आंदोलनाला दिशा देऊन व्यापक सत्याग्रह चळवळ त्यांनी उभारली. जेपींच्या मते, देशात समग्रक्रांती युवाशक्ती व जनशक्ती यांच्या संघटित प्रयत्नातून होऊ शकते. क्रांती लादता येत नाही, ती उपजावी लागते, राजकीय पक्षांना क्रांती घडवून आणता येत नाही. त्यांच्या स्वार्थामुळे व महत्वाकांक्षेमुळे ते क्रांतीनिष्ठ होऊ शकत नाहीत. सत्ताधारी विरुद्ध विरोधी पक्ष असे या संघर्षाचे स्वरुप नसून राज्यशक्तीविरुद्ध जनशक्ती असा हा संघर्ष आहे.

बिहार विधानसभेच्या विसर्जनानंतर या आंदोलनाने आपली शक्ती केंद्रीत केली. श्रमप्रतिष्ठा बिंबवणारे, साधेपणा शिकवणारे व जीवनास उपयोगी शिक्षणप्रणाली निर्माण करणे ही जेपींच्या समग्र क्रांतीचा एक भाग होता. भ्रष्टाचार निर्मुलनाबरोबरच शासनाने जनतेच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास पर्यायी जनता सरकारे स्थापन करण्याची योजना होती. या समग्र क्रांतीमध्ये पोलीस, लष्कर व अन्य सशस्त्र दले यांनाही सहभागी होण्याचे जेपींनी आवाहन केले. या आंदोलनाचा परिणाम इंदिरा गांधींच्या लोकप्रियतेवर झाला.

### ११.१.१० अनुकूल व प्रतिकूल घटना :

संपूर्ण देशात काँग्रेस आणि इंदिरा गांधी राजवटीविरुद्ध विरोधकांनी वणवा पेटवलेला असताना इंदिरा गांधीनी देशाच्या संरक्षणात भर टाकणाऱ्या महत्वाच्या गोष्टी घडवून आणल्या. १९७१ च्या भारत-पाक युद्धात इराणने पाकची बाजू घेतली होती त्याच इराणशी इंदिरा गांधीनी ऑक्टोबर १९७४ मध्ये सहकार्याचा करार घडवून आणला. तसेच १९७५ च्या सुरुवातीला

सार्वभौमत्वाचा दावा करणाऱ्या सिक्कीमला भारताशी जोडण्याची कायदेशीर कार्यवाही पूर्ण केली. विशेष म्हणजे १८ मे १९७४ रोजी राजस्थानच्या वाळवंटात पोखरण येथे जमीनीखाली अणुस्फोट करण्याची चाचणी घडवून आणली. या अणूस्फोटाने जगात भारताची मान उंचावली गेली. या अणुस्फोटामुळे अणुशक्तीचे ज्ञान असलेला भारत जगातील सहाव्या क्रमांकाचा देश बनला.

वरील काही अनुकूल घटना असताना इंदिरा गांधींना प्रतिकूल ठरणाऱ्या काही घटना घडल्याने त्या अधिक अडचणीत आल्या. ३ जानेवारी १९७५ रोजी इंदिरा गांधींचे सहकारी रेल्वेमंत्री ललीत नारायण मिश्रा यांची हत्या झाली. विरोधकांनी यामागे इंदिरा गांधीचा हात असल्याचा प्रचार केला. दुसरी घटना म्हणजे १९७४ मध्ये गुजरातमधील आंदोलनामुळे विधानसभा बरखास्त केली होती. आता विरोधक तेथे निवडणुका घेण्याची मागणी करु लागले. दुष्काळाचे संकट दूर झाल्यावर निवडणूका घेण्याचे इंदिरा गांधीनी सांगितले. पण विरोधक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. जयप्रकाश नारायण यांच्या पाठिंब्याने ७९ वर्षे वयाचे वयोवृद्ध मोरारजी देसाई उपोषणाला बसले. त्यामुळे इंदिरा गांधींनी माघार घेऊन ११ जून १९७५ रोजी निवडणूका घेतल्या. १२ जून रोजी लागलेल्या निकालात काँग्रेसचा पराभव झाल्याचे स्पष्ट झाले आणि बाबूभाई पटेल मुख्यमंत्री झाले. यामुळे गुजरातमधील काँग्रेसची सत्ता संपुष्टात आली.

### ११.१.११ अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल :

गुजरात विधानसभेचा ज्या दिवशी निकाल जाहीर झाला, त्याच दिवशी म्हणजे १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाने इंदिरा गांधीना जबरदस्त धक्का दिला. १९७१ च्या लोकसभा निवडणूकीत रायबरली मतदारसंघातून इंदिरा गांधीची निवड रद्द ठरवली जावी, अशी याचिका न्यायालयात दाखल केली होती. याचिकेमध्ये दोन महत्वाचे आरोप इंदिरा गांधीविरुद्ध केलेले होते. पहिल्या आरोपानुसार यशपाल कपूर भारत सरकारच्या नोकरीत असून त्याने या निवडणूकीत इंदिरा गांधीना मदत केली. तर दुसऱ्या आरोपात राज्य सरकारवर आरोप ठेऊन राज्य सरकारने या निवडणूकीत सर्व प्रकारची मदत पंतप्रधानाना केली. या खटल्यास सुरवात झाल्यापासून दोन न्यायाधीश निवृत्त झाले होते. न्यायाधीश जगमोहन सिन्हा यांच्यासमोर आता खटला सुरु होता. त्यांनी गुजरातचे निकाल जाहीर होत असतानाच या महत्वपूर्ण ऐतिहासिक खटल्याचा निकाल जाहीर केला. त्यानुसार रायबरेली मतदार संघातून इंदिरा गांधीची निवड अवैध ठरवली व त्याचबरोबर कोणत्याही पदाकरिता निवडणूक लढविण्यास त्यांना सहा वर्षासाठी बंदी घातली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध इंदिरा गांधीनी सर्वोच्च न्यायालयात अपील केले. हायकोर्टाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.आर. कृष्ण अय्यर यांनी स्थगिती दिली. त्यानुसार श्रीमती इंदिरा गांधी पंतप्रधानपदावर राहू शकणार होत्या. २४ जून १९७५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. त्यानुसार इंदिरा गांधी सभागृहाच्या कामकाजात सहभागी होऊ शकणार होत्या. पण खासदार म्हणून त्यांचे सर्व अधिकार

न्यायालयाने तहकूब केले. संसदीय काँग्रेस पक्षाने आपला विश्वास इंदिरा गांधीवर व्यक्त केला असला तरी देशात एक वेगळेच वादळ घोंगावू लागले.

### ११.१.१२. विरोधकांचे आंदोलन : इंदिरा गांधीच्या राजीनाम्याची मागणी

अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल जाहीर होताच जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी व विरोधकांमध्ये आनंदाची लाट पसरली. त्यांनी एकत्रित येऊन इंदिरा गांधींचा राजीनामा मागितला. विरोधकांनी या मागणीसाठी राष्ट्रपती भवनासमोर धरणेही सुरु केले. उलट काँग्रेस पक्षाने पंतप्रधानाच्या समर्थनासाठी जनता मेळाव्यांचे आयोजन करुन प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. सर्वोच्च न्यायालयात इंदिरा गांधीनी केलेल्या अपीलाचा निकाल लागेपर्यंत त्यांना पदत्याग करण्याची गरज नव्हती. तरीही इंदिरा गांधीविरुद्ध देशभर आंदोलन उभारण्याचा निर्णय विरोधकांनी घेतला. २५ जून १९७५ रोजी दिल्ली येथे भरलेल्या सभेत जयप्रकाश नारायण यांनी सरकारविरुद्ध सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु करण्याचे घोषित केले. त्यानुसार देशभर धरणे, मोर्चे, मेळावे यांना सुरुवात करण्याचे जयप्रकाशजींनी पोलिसांना व लष्करालाही बंड करण्याचे आवाहन केले. कलंकीत भ्रष्ट आणि अपात्र पंतप्रधानाच्या बेकायदेशीर आज्ञा, हुकुम पाळू नयेत असे नोकरशाहीला आवाहन करण्यात आले. राजधानी व जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यक्रमाचे नियोजन करुन मोठमोठी निदर्शने करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शाळा-महाविद्यालये बंद करुन जयप्रकाशजींच्या अवाहनाचा आदर करुन तुरुंगाचा रस्ता धरला. हे आंदोलन इतके वेगाने पसरले की इंदिरा गांधी या दडपणाखाली राजीनामा देतील, अशी अनेकांना खात्री वाटू लागली

### ११.१.१३ आणीबाणीची घोषणा :

विरोधकांच्या दडपणाला भीक न घालता त्या दडपणाखाली झुकून राजीनामा देणाऱ्यापैकी इंदिरा गांधी नव्हत्या. आलेल्या संकटाला खंबीरपणे तोंड देण्याचे प्रसंगी कठोर निर्णय घेण्याचे त्यांनी ठरवले. आपल्या विश्वासू सहकाऱ्यांशी चर्चा करुन त्यांनी अंतर्गत आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय घेतला. २५ जून १९७५ रोजी राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांची भेट घेतली. देशात अराजकता, हिंसाचार पसरु नये यासाठी घटनेच्या कलम नं.३५२ नुसार आणीबाणीचा निर्णय घेतल्याचे सांगून या निर्णयावर स्वाक्षरी करण्याची विनंती केली. क्षणाचाही विलंब न लावता राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांनी सही केली आणि २६ जून १९७५ रोजी अंतर्गत आणीबाणी जाहीर झाली. आणीबाणीच्या निर्णयावर राष्ट्रपतींची सही होण्याच्या अगोदर २५ जून १९७५ रोजी रात्री महत्वाच्या राजकीय पुढाऱ्यांना कैदेत टाकले गेले. जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई, अशोक मेहता, लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वायपेयी, चंद्रशेखर, राजनारायण, पिलू मोदी व अन्य कांहीचा त्यामध्ये समावेश होता. संभाव्य कैदेची माहिती मिळाल्याने जॉर्ज फर्नांडीससारखे नेते भूमिगत झाले. अंतर्गत सुरक्षिततेच्या कारणाखाली आणीबाणी जाहीर करण्याचा स्वतंत्र भारतातील पहिलाच प्रसंग होता. २६ जून रोजी सकाळी ६ वाजता इंदिरा गांधीनी कॅबिनेटची तातडीची बैठक बोलावली. आणीबाणीच्या घोषणेला संरक्षणमंत्री स्वर्णसिंग वगळता सर्व मंत्र्यांनी पाठींबा दिला. स्वर्णसिंगाना विरोधाची किंमत मोजावी लागली. त्यांच्या जागी संरक्षण मंत्रीपदी बन्सीलाल यांची नियुक्ती करण्यात आली.

आठवराभरात हजारो विद्यार्थी, विद्यार्थी नेते, व्यापारी संघटक आणि वर्तमानपत्रकारांना सुद्धा कैदेत टाकले. आणीबाणीच्या काळात समाजाच्या वेगवेगळ्या थरातून १०,००० लोकांना अटक करुन कैदेत डांबले. अनेक जातीयवादी व अतिरेकी संघटनांवर बंदी घातली. विशेषतः राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, आनंद मार्गी, जमाते-इ-इस्लामी, नक्षलवादी, मार्क्सवादी, लेनिनवादी आणि साम्यवादी वगैरे एकूण २६ संघटनांवर बंदी घालण्यात आली. वृत्तपत्रांवर प्रसिद्धीपूर्व सेन्सॉरशीप लागू करण्यात आली. तामीळनाडू व गुजरातमधील बिगर काँग्रेस सरकारे बरखास्त करण्यात आली. उत्तर प्रदेश आणि ओरिसाचे मुख्यमंत्री बदलून त्यांच्या जागी आपल्या मर्जीतील नेत्यांच्या नेमणुका केल्या. युथ काँग्रेसचे नेतृत्व संजय गांधींकडे देण्यात आले. २२ जुलै १९७५ रोजी आणीबाणीचे समर्थन करताना इंदिरा गांधी म्हणाल्या, "सरकारने देशात आणीबाणी लागू केल्याने देशातील लोकशाही धोक्यात आली नसून काँग्रेसविरोधी पक्षांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्गदर्शनाखाली देशात प्रत्यक्ष कृती व घातपाती कारवाया करण्याचा तसेच लष्कर, पोलिस, विद्यार्थी आणि औद्योगिक क्षेत्रातील कामगारांत असंतोष फैलावण्याचा जो कुटील डाव रचला आहे, त्यामुळे देशातील लोकशाही धोक्यात आली आहे. आज देश विनाशाच्या उंबरठ्यावर उभा आहे. तेव्हा देशाला विनाशाच्या गर्तेतून वाचविण्यासाठी व लोकशाहीचा मार्ग सुकर करण्यासाठी नाईलाजाने आणीबाणीचा मार्ग स्विकारावा लागला आहे." सर्व देश प्रत्यक्ष दिल्लीच्या नियंत्रणाखाली आला.

### ११.१.१४ आपली प्रगती तपासा :

१. नगरवाला प्रकरणावर प्रकाश टाका.

२. इंदिरा गांधींनी अंतर्गत आणिबाणी का जाहीर केली ?.

## ११.२ आणिबाणी काळातील प्रशासन

आणीबाणी जाहीर होताच देशाच्या कानाकोपऱ्यातून ऐकू येणारा इंदिरा-विरोधी सूर शांत झाला. जयप्रकाशजींनी उभारलेली चळवळ एकदम शांत झाल्यासारखी वाटली. संप, निदर्शने, धरणे, मोर्चे, हिंसाचार बंद होऊन जनजीवन सुरळीत चालू लागले. सरकारी कर्मचारी व्यवस्थित काम करु लागले. रेल्वेगाड्या वेळापत्रकाप्रमाणे धावू लागल्या. २१ जुलै १९७५ रोजी इंदिरा गांधीनी संसदेचे अधिवेशन घेण्याचे जाहीर केले. हे अधिवेशन अनेक अर्थांनी महत्वपूर्ण होते. धरपकडीमुळे सभागृहात विरोधी पक्षांच्या सभासदांची व्यक्तव्ये अप्रकाशनीय ठरविली होती. घटनादुरुस्त्या, प्रतिनिधीत्व कायद्यात आणीबाणी जाहीर करण्यायोग्य परिस्थिती आहे किंवा नाही याबद्दलचे राष्ट्रपतीचे निदान अंतीम व निर्णायक ठरविले. अलाहाबाद हायकोर्टाने इंदिरा

गांधींवरील आरोप ग्राह्य धरण्यासाठी जनप्रतिनिधित्व कायद्यातील ज्या तरतुदींचा आधार घेतला होता, त्या सर्व तरतुदी अधिवेशनात बदलण्यात आल्या.

लोकशाहीचा गळा दाबून संपूर्ण देशाला तुरुंगाचे स्वरुप प्राप्त झाल्याची टीका इंदिरा गांधीनी ऐकली होती. तेव्हा विरोधकांची, टीकाकारांची तोंडे बंद करण्यासाठी अधिवेशनाच्या अगोदर १ जुलै १९७५ पासूनच इंदिरा गांधीनी आर्थिक सुधारणांसाठी २० कलमी कार्यक्रम जाहीर केला. या कार्यक्रमात अत्यावश्यक वस्तूंच्या किंमती कमी करणे, जमिन सुधारणां कायद्याची अंमलबजावणी करणे, गरीब आणि भूमिहीनांना घरे बांधून देणे, वेठबिगारी आणि सावकारी रद्द करणे, शेतीमजूरांसाठी किमान वेतन कायदा करणे, शेतीसाठी जादा पाणीपुरवठ्याच्या सोई उपलब्ध करुन देणे, वीज उत्पादनाला चालना देणे, ग्रामीण हस्तकला व्यवसायाचा विकास, कापड व्यवसायामध्ये सुधारणा, शहरी मोकळ्या जमीनीचे सामाजिकरण, तस्करांविरुद्ध कडक उपाय योजणे, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी सोई सवलती देणे, काळाबाजार व करचुकवेगिरीला आळा घालणे, स्मगलर्सच्या मालमत्ता जप्त करणे, गुंतवणूक पद्धतीमध्ये सुधारणा, औद्योगिक क्षेत्रातील संघटीत कामगारांसाठी नवीन योजना, वाहतुकीच्या सुविधा, करसवलती, विद्यार्थ्यांना नियंत्रित दराने वस्तू, पुस्तके, वह्या व लेखन साहित्याचा पुरवठा, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना रोजगार व प्रशिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन देणे इत्यादी गोष्टींचा आर्थिक कार्यक्रमात समावेश केला. त्यानुसार अनेक वटहुकूम निघाले.

## ११.३ आणिबाणीचे परिणाम

आणिबाणींचे काही चांगले आणि वाईट परिणाम पहावयास मिळाले. वस्तूंच्या किंमती कमी झाल्या. आवश्यक वस्तूंची टंचाई कमी होऊन वस्तूंचा पुरवठा वाढला. चोरटा व्यापार, साठेबाजी आणि कर चुकवेगिरीला आळा बसला. संप आणि टाळेबंदीवर बंदी घालण्यात आली. नोकरशाहीतील बेफिकीरी आणि सुस्ती नष्ट होऊन त्यांची कार्यक्षमता वाढीस लागली. १९७५ मध्ये औद्योगिक उत्पादन ६ टक्क्यांने तर १९७६ मध्ये १० टक्क्याने वाढले. १९७६ अखेर भारताच्या निर्यात व्यापारात वाढ झाली. लोकांना शिस्तीचे महत्त्व व किंमत कळू लागली. रेल्वे वेळेत धाऊ लागल्या. पोलिसांच्या मदतीने बस थांब्यावर लोक रांगेत उभे राहू लागले. दिल्ली, मुंबई सारख्या शहरातील बेकायदेशीर बांधकामे नष्ट करण्यात आली. खून, दरोडे, चोरी, बलात्कार इत्यादी गुन्ह्याच्या प्रसंगी कठोर शिक्षेची तरतुद करण्यात आल्याने मालमत्ता व जीवन अधिक सुरक्षित बनले. कुटूंब नियोजनाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. तथापि, कुटूंब नियोजनाच्या अंमलबजावणीमध्ये अतिरेक झाल्याने कुटूंबनियोजनाचे परिणाम नष्ट झाले.

याशिवाय ग्रामीण भागातील गरिबांची उन्नती घडून आली. बेघरांना व पददलितांना ३ लाख घरे बांधून देण्यात आली. जवळ जवळ १ लाख एकर जादा जमिन भूमिहिनांना वाटून देण्यात आली. वेठबिगारी व ग्रामीण सावकारी रद्द ठरली. ग्रामीण भागात बँका निघाल्या. स्त्री-पुरूषांना समान वेतन ठरले. बोनसची सांगड उत्पादनाशी घालण्यात आली. भूमिहीन, शेतमजूर आणि लहान शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली करण्यासाठी राज्यांनी नवीन कायदे केले.

शेतमजूरांसाठी किमान वेतनामध्ये वाढ करण्यात आली. कितीही केले तरी या २० कलमी आर्थिक कार्यक्रमाचा प्रभाव केवळ जमिनदार, श्रीमंत शेतकरी आणि निष्ठुर नोकरशाहीच्या अडथळ्यामुळे ग्रामीण समाजावर पडू शकला नाही. आणिबाणीमुळे ग्रामीण भागातील गरीबांना थोडीफार मदत झाली पण ग्रामीण समाजामध्ये फार मोठा बदल घडून आला नाही.

आणिबाणीच्या सुरुवातीच्या काळात आर्थिक सुधारणांमुळे सर्व क्षेत्रात परिवर्तन होऊन फायदे झाल्याचे चित्र निर्माण झाले पण ते फार काळ टिकू शकले नाही. हळूहळू आणिबाणीबद्दल सामान्य लोकांचा भ्रमनिरास झाला. भ्रष्टाचारी प्रशासन पद्धतीमुळे आर्थिक सुधारणा कार्यक्रम प्रभावीपणे राबविता आले नाही. पूर्वीप्रमाणेच चोरटा आणि बेकायदेशीर व्यापार चालू होता. नागरी स्वातंत्र्यावर बंधने असल्यामुळे जनतेला आपली गाऱ्हाणी मांडता येत नव्हती. वर्तमान पत्रावरील नियंत्रणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात काय घडते आहे हे सरकारला कळत नव्हते. इंदिरा गांधींनी देशाची परिस्थिती पूर्वपदावर येताच आणिबाणी उठविण्याचे आश्वासन दिलेले होते. पण १९७६ मध्ये ४२ वी घटना दुरुस्ती करुन जनतेचा भ्रमनिरास केला. इंदिरा गांधी लोकशाहीचा गळा दाबून घटनेच्या मुलभूत चौकटीत बदल करीत असल्याचा विरोधकांनी प्रचार केला. साहजिकच आणिबाणीचे कायदेशीर महत्व कमी झाले.

## ११.४ आणिबाणीच्या काळातील दडपशाही आणि अतिरेक

आणिबाणीच्या काळात शासनाच्या हाती अनिर्बंध सत्ता आली. अंतर्गत सुरक्षा कायदा कडक करण्यात आला होता. सरकारी अधिकारी व पोलिसांकडून अनेक ठिकाणी अत्याचार होऊ लागले. वृत्तसंस्था सरकारच्या नियंत्रणाखाली होती. प्रसारमाध्यमेही सरकारी प्रचार यंत्रणेला जुंपली होती. देशभर ८० हजार लोकांना तुरुंगात डांबण्यात आले होते. जयप्रकाश नारायण तुरुंगात आजारी पडले असताना त्यांना विष दिले गेले, असा प्रचार झाला. जॉर्ज फर्नांडीस यांनाही अमानुष वागणूक देण्यात आल्याचा प्रचार झाला. आणिबाणीच्या काळात दडपशाही करणारे विविध कायदे पास करण्यात आले. पोलिसांना कोणालाही कारण न दाखविता पकडता येऊ लागले. ४ जुलै १९७५ रोजी २६ जातीयवादी संस्था व संघटनांवर बंदी घालण्यात आली. सरकारविरोधी निर्णय देणाऱ्या हायकोर्टाच्या १६ न्यायाधीशांच्या बदल्या करुन न्यायसंस्थेवर दबाव आणला. ज्या वकिलांनी आणिबिाणीचा निषेध केला, त्यांच्याविरुद्ध कारवाई झाली. जुन्या दिल्लीतील तीस हजारी न्यायालयातील व शहादरा येथील फौजदारी न्यायालयातील वकीलांचे चेंबर बुलडोझर आणून पाडण्यात आले. अनेक वकीलांना तुरुंगात टाकण्यात आले. काही वकील भूमिगत झाले. ३० मार्च १९७६ रोजी सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनने याविरुद्ध आंदोलन सुरु केल्याने वकिलांची सुटका करण्यात आली. आणिबाणीच्या काळात सरकारी अधिकाऱ्यांच्या दडपशाहीला सीमा राहिली नाही.

आणिबाणीच्या काळात देशात एक पक्ष व एका नेत्याचे राज्य सुरु होते. न्यायसंस्था दुर्बल झाली होती. भारत म्हणजे इंदिरा व इंदिरा म्हणजे भारत असे समीकरण तयार झाले होते. जॉर्ज फर्नांडीस भूमीगत असल्याने त्यांच्या कुटूंबीयांना पकडून त्यांचा छळ करण्यात आला तसेच

जॉर्ज फर्नांडीसशी संबंध असलेल्या कन्नड अभिनेत्री स्नेहलता यांना मिसाखाली अटक करुन वेश्या व स्त्री गुन्हेगारांच्या सहवासात ठेवण्यात आले. लोकसभेच्या सदस्या गायत्रीदेवी व त्यांचा मुलगा भवानी सिंग यांना तस्करीच्या आरोपावरुन तुरुंगात टाकण्यात आले. ग्वाल्हेरच्या राजमाता विजयाराज शिंदे यांनाही तिहारच्या तुरुंगात ठेऊन त्यांचा छळ करण्यात आला. आणिबाणीत पकडलेल्यांवर आरोपपत्र दाखल न करताच तुरुंगात छळ केला जाई. आणिबाणीतील अत्याचारामुळे इंदिरा गांधी व त्यांचे शासन बदनाम झाले होते. त्यातच त्यांचे सुपुत्र संजय गांधीने भर घातली.

इंदिरा गांधींचे पुत्र संजय यास राजकारणात आणून त्यांची प्रतिमा लोकप्रिय करण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून झाला. संजय गांधी धाडसी असले तरी आक्रमक व उतावळ्या स्वभावाचे होते. युवक काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने वृक्षारोपण, प्रौढ साक्षरता, भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन, कुटूंब नियोजन, झोपडपट्टी निर्मूलन या कलमांचा वीस कलमी योजनेत समावेश केला. संजय गांधींच्या योजना राष्ट्रहितासाठी निश्चितच चांगल्या होत्या, कल्याणकारी होत्या. परंतु या योजनांची अंमलबजावणी करताना त्यांनी अतिरेक केल्याने जनता प्रक्षुब्ध झाली. इंदिरा गांधींनीही संजयला पूर्ण स्वातंत्र्य दिल्याने नवीन समस्या निर्माण झाल्या. संजय गांधीनी कुटूंब नियोजन कार्यक्रम राबविताना नसबंदी शस्त्रक्रीयेवर अधिक भर दिला. त्यानुसार पोलिस, डॉक्टर, परिचारिका, शिक्षक, नगरपालिका अधिकारी, ग्रामसेवक अशा सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना नसबंदीसाठी लोकांना प्रवृत्त करण्याचा आदेश देऊन तशी संख्या नेमून दिली. कोटा पूर्ण केल्याशिवाय मासिक वेतन मिळणार नाही अशी सक्त ताकीद दिली. आपले उद्दीष्ट लवकर पार पाडण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांकडून नसबंदीसाठी म्हातारे, तरुण, अविवाहीत असा कोणावरही दबाव सक्ती होऊ लागली. सार्वजनिक ठिकाणाहून कोणालाही पकडून रुग्णालयात शस्त्रक्रीयेसाठी जबरदस्तीने नेले जात असल्याच्या अफवा पसरल्याने लोकांमध्ये प्रक्षोभ व दहशत निर्माण झाली.

झोपडपट्टी निर्मूलनासाठीही संजय गांधीने असेच आक्रमक धोरण राबविले. दिल्लीची जामा मशिद व तुर्कमन गेट या दरम्यान बहुसंख्या मुस्लिम संख्या असलेली झोपडपट्टी होती. एप्रिल १९७६ मध्ये त्या झोपड्या पाडण्यासाठी सरकारी यंत्रणा येताच तेथील मुस्लिमांनी विरोध केला. त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. या गोळीबारात सहा माणसे ठार झाली व काही जखमी झाली. या घटनेनंतरही संजय गांधींच्या आदेशाने संपूर्ण झोपडपट्टी भुईसपाट करण्यात आली. या घटनेमुळे संपूर्ण देशात खळबळ माजली. संजय गांधींविरुद्ध केलेल्या तक्रारी इंदिरा गांधी एकून घ्यायला तयार नव्हत्या.

## ११.५ आणिबाणीला विरोध :

२६ जून १९७५ रोजी देशभर अंतर्गत आणिबाणी जाहीर झाली. सुरवातीच्या काळात आणिबाणीविरुद्ध कोणीही प्रतिक्रीया व्यक्त केली नाही. परंतु जसा काळ पुढे गेला तसतसे लोकमत जागृत होत गेले. आणीबाणीच्या काळातील पोलिसांकडून होणाऱ्या अन्यायाच्या बातम्या गुप्तपणे लोकांपर्यंत जाऊन पोहोचल्या. जनमत खवळून उठले व आणिबाणीविरुद्ध आंदोलनाला सुरुवात झाली. परंतु अंतर्गत सुरक्षा कायद्याच्या बडग्यामुळे हे आंदोलन बहुतांशी भूमीगत नेत्यांनी वाढविले. या नेत्यांनी अनेक मार्गांचा अवलंब केला. या भूमीगत आंदोलनामध्ये

सरकारविरोधी गुप्त पत्रके, साहित्य वाटण्यासंबंधी विद्यार्थ्यांचा उपयोग करुन घेतला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे आणीबाणीविरुद्ध सत्याग्रह सुरु करण्यात आला. सर्व हिंदुस्थानातून एक लाख चाळीस हजार कार्यकर्ते पकडण्यात आले. भूमीगत चळवळ करण्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आघाडीवर होता. या कार्यकर्त्यांनी भूमीगत राहून सर्व प्रांताशी संबंध प्रस्थापित केला. हजारो पुस्तिकांचे वाटप करुन जनमत जागृत केले. अनेक छोटीछोटी निवेदने व वर्तमान पत्रे यामुळे जनमत ढवळून निघाले. देशातील सर्व स्तरातील लोकांनी आपल्या ताकदीनुसार आणीबाणीविरुद्ध आवाज उठवला. अनेक लेखक, डॉक्टर्स, वकील, विद्यार्थी, शिक्षक, पत्रकार, कवी, नाटककार इ. या आंदोलनात सहभागी होते. आणीबाणीच्या काळात वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य काढून घेऊन अनेक संपादकांना, बातमीदारांना कैदेत टाकले होते. या विरोधात देशातील संपादकांनी दिल्ली येथे एकत्र येऊन 'मदरलँडचे' संपादक के.आर. मलकानी यांच्या अटकेचा निषेध करुन आणिबाणीविरुद्ध ठराव पास केला. आणिबाणीच्या काळातही काही वृत्तपत्रांनी गुप्तपणे आपले कार्य चालू ठेवले. त्यापैकी 'जनता समाचार' हे पहिले वृत्तपत्र मानले जाते. जनता समाचारने २८ जून १९७५ पासून आणिबाणीविरुद्ध प्रचार केला. बंदिवासातील पुढारी, त्यांच्यावरील अत्याचार, जयप्रकाशजींचे भाषण यांचा प्रसार केला. सत्य समाचार या पाक्षिकाने हिंदुस्थानातील घटनांचा आढावा घेतला. याशिवाय दिल्लीतून 'जनवाणी' व 'मशाल', वाराणसीहून 'दर्पन', हैद्राबादहून 'वज्रयुग', मुंबईहून 'असली समाचार', गोहाटीवरुन 'सत्यवादी' ही पाक्षिके प्रसिद्ध होती. या गुप्तपणे प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यकर्ते बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करीत. सरकारी प्रकाशने ज्या वाहनातून पाठविली जात किंवा कुटुंब नियोजनाच्या वाङमयाबरोबर या बेकायदेशीर वाङमयाची रवानगी केली जाई. हिंदू वृत्तपत्रांचे सल्लागार श्री. रेड्डी यांनी आणीबाणीविरुद्ध चळवळीत उडी घेतली म्हणून त्यांना फर्नांडीस यांच्या बडोदा डायनामाईट केस मध्ये गुंतवण्यात आले.

आणिबाणीला विरोध करण्यामध्ये वकील मंडळीही अग्रेसर होती. अनेक राज्यातील बार कौन्सिलनी निर्भयपणे आणीबाणीला विरोध केला. भारतीय बार कौन्सिलचे अध्यक्ष राम जेठमलानी यांनी आणिबाणीच्या विरुद्ध प्रभावीपणे कार्य करता यावे, यासाठी काही काळ देश त्याग केला.जेठमलानींनी इंदिरा गांधी व आणिबाणीचा निषेध करुन भारतीय जनतेला भावनात्मक आवाहन केले. नागरी स्वातंत्र्यासाठी अनेक वकीलांनी लढा दिला. या आंदोलनामध्ये शिक्षकही मागे नव्हते. विशेषतः विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकांनी आणिबाणीला विरोध केला. मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती उषा मेहता यांनीसुद्धा आणिबाणीविरुद्ध मोठे काम केले. महाराष्ट्रातील प्रसिद्ध लेखिका आणि १९७६ मध्ये कराड या ठिकाणी भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा दुर्गा भागवत यांनीही आणिबाणीची नालस्ती केली. त्यानंतर त्यांना अटकही झाली. दुसरीकडे विनोदी लेखक आणि नाटककार यांनीही आणिबाणीविरुद्ध स्वातंत्र्यासाठी मोहीम हाती घेतली. आणिबाणीच्या विरोधातील या आंदोलनात गुजराती लेखक व कवी आघाडीवर होते.

जयप्रकाश नारायण यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांकरिता 'लोकशाही' या संस्थेने आणिबाणीच्या विरोधात महत्वाचे कार्य केले. पंजाबमध्ये अकाली दलाने आणिबाणीला विरोध

केला.  ४४ हजार शीख सत्याग्रही तुरुंगात गेले. मार्च १९७६मध्ये पोलिसांनी बडोदा शहरात रोड लिंक ऑफ इंडिया या कंपनीच्या गोदामावर छापा घातला. तेव्हा त्यांना डायनामाईट स्फोटकाचे मोठे साठे सापडले. सी.बी.आय ने केलेल्या चौकशीत या मागे जॉर्ज फर्नांडीस आहेत असे आढळून आले. इंदिरा गांधीचे  सरकार उलथून पाडण्याचा जॉर्ज फर्नांडीस व त्यांच्या सहकाऱ्यांचा कट होता असे घोषित करण्यात आले. त्यांच्यावर खटले भरुन तुरुंगात त्यांना अमानुष वागणूक देण्यात आली. एप्रिल १९७६ मध्ये लंडन येथ आणीबाणीला विरोध करुन भारतीय स्वातंत्र्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भूमिगत कार्याला मदत करणारी 'भारतीय समाजाचे मित्र' नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेची शाखा अमेरिकेतही स्थापन केली. 'लोकसंघर्ष समिती' नावाची आणखीन एक संघटना आणिबाणीच्या विरोधात कार्यरत होती. देशाच्या कानाकोपऱ्यात आणिबाणीच्या विरोधात संघटना आणि चळवळी कार्य करीत होत्या. १९७५ नंतर बिहार, महाराष्ट्र आणि कर्नाटक मध्ये लहान स्फोट घडून आले. या परिस्थितीवर मात करण्यासाठी चर्चेतून मार्ग निघेल, अशी विरोधकांमधील काही नेत्यांचे मत होते. १९७६ च्या हिवाळ्यामध्ये काही विरोधी नेत्यांची इंदिरा गांधीनी सुटका केली. त्यापैकी बिजु पटनाईक व एम. करुणानिधी होते. ते इंदिरा गांधीबरोबर चर्चा करुन सामंजस्याने मार्ग काढण्याच्या विचारांचे होते. अद्याप अनेक विरोधी नेते तुरुंगात होते. शिवाय या समझोता कराराला जयप्रकाश नारायण यांची मान्यता आवश्यक होती पण बिजु पटनाईक व एम. करुणानिधींचा चर्चेचा प्रस्ताव तुरुंगात असलेल्या ना.ग. गोरे, जॉर्ज फर्नांडीस यांना अजिबात पटला नाही. महत्वाची गोष्ट म्हणजे इंदिरा गांधीनांही तडजोड मान्य नव्हती.

## ११.६ आणिबाणीचा शेवट

संपूर्ण देशात इंदिरा गांधी आणि काँग्रेस पक्षाबद्दल संतापाची लाट पसरली होती. विरोधकांमधील ऐक्याचा अभाव, वीस कलमी कार्यक्रमाच्या दिखाऊ यशामुळे जनतेमधील त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेबद्दल आत्मविश्वास, हितचिंतकांनी, खुषमस्कऱ्यांनी आणि राजकीय संशोधन संघटनांनी दिलेली माहिती, आणिबाणीमुळे झालेली बदनामी व बेअब्रु, आणिबाणीच्या काळातील ध्येय धोरणांना कायदेशीरपणा मिळवून द्यावा, विरोधकांची तोंडे बंद करावीत यासाठी इंदिरा गांधीनी १८ जानेवारी १९७७ रोजी अचानक मार्च १९७७ च्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे घोषित केले. त्यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा मोठा धक्का बसला. भारतीय संविधानानुसार आणिबाणी असताना निवडणुका एक वर्ष पुढे ढकलण्याचा अधिकार संसदेला होता. त्यानुसार इंदिरा गांधीनी मार्च १९७६ मध्ये असलेल्या निवडणुका एक वर्ष पुढे ढकलल्या होत्या. आणिबाणीमुळे आणखी काही वर्ष निवडणुका न घेता इंदिरा गांधी सत्तेवर राहू शकत होत्या. पण लोकमत आपल्या विरुद्ध भडकल्याची जाणीव झाल्याने या संकटातून सहिसलामत सुटण्यासाठी त्यांच्यासमोर अन्य पर्याय नव्हता.

निवडणूका जाहीर होताच सर्व विरोधी पक्ष नेत्यांची मुक्तता करण्यात येऊन आणीबाणीची बंधने शिथील करण्यात आली. पण त्यांना संघटीत होण्यास, पैसा उभारण्यास, प्रचार करण्यास फार वेळ न देता झटपट निवडणूका उरकाव्यात म्हणजे निकाल काँग्रेसच्या बाजुने लागेल व

आपली सत्ता टिकून राहील असा इंदिरा गांधींचा डाव होता. आणीबाणी समाप्त झाली व देशात निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरवात झाली.

### ११.६.१ आपली प्रगती तपासा :

१. बडोदयाच्या डायनामाईट प्रकरण काय आहे ?

२. आणिबाणी कोणत्या दिवशी उठविण्यात आली ?

## ११.७ सारांश

लालबहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर इंदिरा गांधींनी पंतप्रधानाची सुत्रे हाती घेतली व प्रशासनाच्या प्रत्येक क्षेत्रात सकारात्मक बदल केले व त्यामुळेच भारताचा एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदय झाला. इंदिरा गांधींने बँकाचे राष्ट्रीयीकरण करुन संस्थानिकांचे विशेष हक्क, तनखे बंद केले. शेतीक्षेत्रातील सुधारणा करुन हरितक्रांती घडवून आणली. परंतू नंतरच्या काळात इंदिरा गांधींनी आणीबाणी जाहीर केली व त्याचे परिणाम संपूर्ण भारताला भोगावे लागले. यामूळे इंदिरा गांधींचा व कॉंग्रेसचा १९७७ च्या निवडणूकीत दारुण पराभव झाला व पहिले बिगर कॉंग्रेस सरकार सत्तेवर आले.

## ११.८ प्रश्न

१) इंदिरा गांधींनी बँकाचे राष्ट्रीयीकरण का केले याची चर्चा करा.

२) इंदिरा गांधींनी अंतर्गत आणीबाणी का जाहीर केली ? व आणीबाणीचे काय परिणाम झाले ?

३) इंदिरा गांधींनी जाहीर केलेल्या आणीबाणीची कारणे व परिणामांची चर्चा करा.

❖❖❖❖

# १२

# आणिबाणीनंतरचा राजकीय विकास

**प्रकरण रुपरेषा :**

१२.० उद्‌दिष्टे
१२.१ मार्च १९७७ च्या निवडणुका
१२.२ जनता पक्षाचे सरकार स्थापन
१२.३ जनता सरकारची कामगिरी
१२.४ जनता सरकारचे पतन
१२.५ इंदिरा गांधींचे पुनरागमन
१२.६ इंदिरा गांधींसमोरील समस्या
१२.७ इंदिरा गांधींचा शेवट
१२.८ सारांश
१२.९ प्रश्न

## १२.० उद्‌दिष्टे

१) आणिबाणीनंतरच्या राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे.
२) जनता सरकारच्या स्थापनेची पार्श्वभूमी अभ्यासणे.
३) जनता राजवटीतील घडामोडींचा अभ्यास करणे.
४) इंदिरा गांधींच्या पुनरागमन काळाचा अभ्यास करणे.

## १२.१ मार्च १९७७ च्या निवडणूका

श्रीमती इंदिरा गांधींनी आणीबाणी चालू असतांना अचानकपणे मार्च १९७७ मध्ये निवडणूका जाहीर केल्याने भारतात तर्क-वितर्कांना मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली. १९७२ पासून 'इंदिरा गांधी हुकूमशहा असून त्या लोकशाहीच्या शत्रू' असल्याची वारवांर टीका केली पण विरोधकांचा हा आरोप इंदिरा गांधींना मान्य नव्हता. पित्याप्रमाणेच त्यांची लोकशाहीवर श्रद्धा होती. आपल्यावरील आरोप निराधार व बिनबुडाचे आहेत. हे दाखविण्यासाठी निवडणूका घोषित केल्या. पाकिस्तानसारख्या हुकूमशाही राष्ट्रात निवडणूका झाल्या. श्रीलंकेत अस्थिरता असुनही निवडणूका झाल्या यांचा अप्रत्यक्ष परिणाम भारतावर झाला होता. प्रमुख विरोधी पक्षाचे नेते अनेक दिवस तुरुंगात होते. त्यांचा जनसंपर्क राहिलेला नव्हता. त्यांना निवडणूकीची तयारी करायला मिळणार नाही. वेळेवर पैसा उभा करता येणार नाही व त्याचा फायदा आपणास मिळेल

असे इंदिराजींना वाटले. त्यांना अद्याप आपल्या लोकप्रियतेची खात्री होती. त्यातच गुप्तहेर खात्याने काँग्रेसला ३५० जागा लोकसभेत मिळतील अशी माहिती त्यांना दिली. सी.बी. आयचे संचालक श्री. सेन यांनी मात्र ६ महिने निवडणूका न घेण्याचा सल्ला दिला होता. पंतप्रधानांचे खाजगी सचीव श्रीधर यांनी देशात आर्थिक अडचणी वाढत असल्याने लवकर निवडणूका घ्याव्यात असा सल्ला दिला. इंदिरा गांधींनी नवी दिल्ली येथील राजकीय धोरणाचा अभ्यास करणारी संस्था 'इन्स्टीट्युट ऑफ पॉलिसी रिसर्च' या संस्थेशी चर्चा केली. तिने इंदिरा गांधींना मार्चमध्य निवडणूका घेण्याचा सल्ला दिल्याने इंदिराजींनी आपला निर्णय कायम केला. अमेरिकेनेही अप्रत्यक्षपणे लोकशाही स्थापन करण्यासाठी दबाव आणल्याचे बोलले जाते. इंदिरा गांधींचा पुत्र संजय गांधीस राजकारणात पुढे आणून त्यांचे हात बळकट करावयाचे होते. शिवाय भारत सरकारने ३ डिसेंबर १९७१ रोजी म्हणजे बांग्लादेश युद्धाच्या वेळी घोषित केलेली आणीबाणी मागे घेतली नव्हती. ३ डिसेंबर १९७१ व २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेली आणीबाणी अनुक्रमे २१ जून १९७५ व २७ मार्च १९७७ रोजी उठविण्यात येऊन सार्वत्रिक निवडणूकाची घोषणा करण्यात आली.

### १२.१.१ जनता पक्षाची स्थापना (२० जानेवारी १९७७) :

सर्व देशातील काँग्रेस नेत्यांनी इंदिरा गांधींच्या निर्णयाचे उत्साहात स्वागत केले. त्यांनी इंदिरा गांधींची स्तुती करुन विरोधी नेत्यांवर टीकास्त्र सोडले. इंदिरा गांधींच्या निवडणूका घेण्याच्या निर्णयाचे जयप्रकाश नारायण यांनी स्वागत केले. निवडणूका घेण्यासाठी आणीबाणी उठविण्यात यावी, वृत्तपत्रांवरील नियंत्रणे दूर करण्यात यावीत, जनतेला नागरी अधिकार द्यावेत, सर्व राजकीय कैद्यांची सुटका करावी आणि निवडणूका मुक्त व निर्भय वातावरणात घेण्यात याव्यात अशा मागण्या केल्या. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन निवडणूका लढवाव्यात असे जयप्रकाशजींचे मत होते. सर्व विरोधी पक्षांच्या नेत्यांत निवडणूकांबाबत एक प्रकारची अस्वस्थता दिसत होती. कारण विरोधी पक्षाचे नेते गेले १८ महिने तुरुंगात होते. त्यांच्यासमोर बऱ्याच अडचणी होत्या. निवडणूका लढविण्यासाठी ३ महिन्यांचा कालावधी हवा होता. विरोधी परिस्थितीचे भान ठेऊन १८ जानेवारी १९७७ रोजी संघटना काँग्रेस, जनसंघ, समाजवादी पक्ष, भारतीय लोकदल या प्रमुख विरोधी पक्षांनी एकजूट करुन निवडणूकीत काँग्रेस, विरुद्ध लढा द्यावा असे निश्चित करण्यात आले. या बैठकीला मोरारजी देसाई, अशोक मेहता, मधु दंडवते, सुरेंद्र मोहन मोदी, बिजू पटनाईक, बलराज मधोक, काँग्रेस मधून फूटून निघालेले चंद्रशेखर, कृष्णकांत, श्रीमती लक्ष्मी कानतम्मा इत्यादी नेते उपस्थित होते. या नेत्यांनी चारही पक्ष परस्परांत विलीन करुन नवा बळकट पक्ष स्थापन करण्याचे ठरविले. बंगळूर येथील कारागृहातून सुटका होताच लालकृष्ण आडवाणी यांनी या युतीत जनसंघ सामील होत असल्याची घोषणा केली. २० जानेवारी १९७७ रोजी अधिकृतपणे जनता पक्षाची स्थापना करण्यात आली.

जनता पक्षाने काँग्रेसचा व इंदिरा गांधींचा पराभव करण्याचे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवले. पंजाबमध्ये अकाली दलाने जनता पार्टीशी हातमिळवणी केली. तामिळनाडूत द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाने संघटना काँग्रेसशी समझोता केला. जनता पक्षाने ९ सदस्यांची एक कमिटी स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष मोरारजी देसाई (संघटना काँग्रेस) तर उपाध्यक्ष चौधरी चरणसिंग (भारतीय

लोकदल) होते. कालांतराने या कमिटीची सदस्य संख्या २८ पर्यंत जाऊन पोहोचली. निवडणूकांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेणे, योग्य उमेदवारांच्या निवडी करणे आणि पक्षाचा निवडणूक जाहीरनामा तयार करणे ही प्रमुख कामे निवड कमिटीची होती.

निवडणुका जाहीर होताच काँग्रेसच्या गटात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण पसरले. काँग्रेसचे तिकीट मिळविण्यासाठी इच्छुकांची झुंबड उडाली होती. काँग्रेसने मध्यवर्ती कमिटीची स्थापना केली. या कमिटीमध्ये इंदिरा गांधी, देवकांत बरुआ, जगजीवन राम, यशवंतराव चव्हाण, सिद्धार्थ शंकर रे, सी. सुब्रमण्यम, स्वर्णसिंग , के मल्लाप्पा, के. ब्रम्हानंद रेड्डी आणि डॉ. शंकर दयाळ शर्मा इत्यादि जेष्ठ नेत्यांचा समावेश होता. जुन्या-नव्या नेत्यांमध्ये तिकीटांसाठी रस्सीखेच सुरु होती. अखेर अंतिम यादिमध्ये संजय गांधींच्या तरुण समर्थकांचा जास्त भरणा होता. अनेक जेष्ठ नेत्यांची तिकीटे कापली गेली.

### १२.१.२ जगजीवन राम यांचा राजीनामा व प्रचारास प्रारंभ :

काँग्रेसने निवडणुकीची जय्यत तयारी सुरु केली. उमेदवारांच्या याद्या मागवून २८ जानेवारी पर्यंत त्यावर निर्णय घेण्याचे ठरविले. मध्यवर्ती निवडणूक कमिटीने आपल्या कामाची सुरुवात केली. सर्व काही व्यवस्थित चालले आहे असे दिसत असतानाच अनपेक्षित पणे काँग्रेसला जबरदस्त धक्का बसला. २फेब्रुवारी १९७७ रोजी जगजीवन राम यांनी आणीबाणीच्या काळातील अतिरेकांबद्दल दु:ख व्यक्त करुन काँग्रेसच्या मंत्रीमंडळाचाच नव्हे तर काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा सुद्धा राजीनामा दिला. जगजीवन राम यांच्या राजीनाम्याने काँग्रेसला धक्का बसला तर विरोधकांच्या गोटात आनंदाचे वातावरण पसरले. त्या पाठोपाठ ओरिसाच्या भूतपूर्व मुख्यमंत्री नंदिनी सत्पंथी यांनीही काँग्रेस सोडली. काँग्रेसमधून फुटलेल्या जगजीवन राम, हेमवती नंदन बहुगुणा आणि नंदिनी सत्पंथी यांनी "काँग्रेस फॉर डेमॉक्रसी" हा नवीन पक्ष स्थापन करुन जनता पक्षाशी युती केली. काँग्रेसला खिंडार पडले. काँग्रेसच्या झालेल्या बैठकीत काँग्रेसच्या ३०० सदस्यांनी इंदिरा गांधींवर पूर्ण विश्वास व्यक्त केला. प्रचार मोहिमेत आणीबाणी हा प्रमुख मुद्दा होता. प्रचार मोहिमेचे नेतृत्व एकटया इंदिरा गांधी करीत होत्या. त्यामुळे इंदिरा गांधी दृढनिश्चयाने प्रचारास लागल्या. काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात आणीबाणीचे समर्थन केले व आम्हाला देशात हुकुमशाही आणायची असती तर निवडणूका घेतल्याच नसत्या असा युक्तीवाद केला. तसेच आणीबाणीत धान्याचे, औद्योगिक उत्पादन वाढले, २० कलमी कार्यक्रमच देशाची प्रगती करेल तसेच काँग्रेसच देशाला स्थैर्य व प्रगती पथावर नेईल असे आश्वासन दिले. इंदिरा गांधी रायबरेलीतून तर पुत्र संजय गांधी अमेठीतून निवडणूक लढवीत होते. आपल्या निवडणूक दौऱ्यात इंदिरा गांधींनी प्रत्येक राज्याला भेट दिली. दर दिवसाला ५ते ८ सभा घेतल्या. १० हजार किलोमीटरचा प्रवास केला. असे असले तरी लोक त्यांच्या सभेपेक्षा विरोधी नेत्यांच्या सभेला अधिक गर्दी करीत होते त्यामुळे काँग्रेस पक्षाची झोप उडाली होती.

### १२.१.३ विरोधकांचा प्रचार :

१९७७च्या निवडणूका काँग्रेससाठी व विरोधी पक्षांसाठीही महत्वाच्या होत्या. ३० जानेवारी १९७७ रोजी मोरारजी देसाईनी नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर प्रचाराचा नारळ

फोडला. या सभेला प्रचंड गर्दी ओसंडली होती. जय प्रकाश नारायण यांनी काँग्रेसला सत्तेवरुन खाली खेचण्याचे आवाहन केले. जनता पक्षाच्या प्रचार कार्यासाठी या सभेत निधी उभारण्यात आला. जनतेने सढळ हस्ते मदत केली. विरोधी पक्षांनी इंदिरा गांधींविरुद्ध एकत्र येऊन एक ध्वज, समान चिन्ह, एक व्यासपीठ आणि एकच नेता यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका लढविण्याचे ठरविले. विरोधी पक्षांनी इंदिरा गांधी, संजय गांधी आणि त्यांच्या समर्थकांना लक्ष्य करुन भयंकर प्रचार मोहिम सुरु केली. जनता पक्षाने आपल्या जाहीरनाम्यात स्वातंत्र्याचा व लोकशाहीचा पुरस्कार केला. जनता पक्ष सत्तेवर आल्यानंतर सर्व धर्माचे रक्षण करु, मूलभूत अधिकारांचे रक्षण व वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देऊ असे आश्वासन दिले. आणीबाणी आणि आणीबाणीतील रक्षण व वृत्तपत्रांना स्वातंत्र्य देऊ असे आश्वासन दिले. आणीबाणी आणि आणीबाणीतील अतिरेक हे विरोधी पक्षाचे निवडणूक प्रचारातील प्रमुख मुद्दे होते. जनता पक्षाला मत म्हणजे गुलामगिरी विरुद्ध स्वातंत्र्याला मत, हुकुमशाही विरुद्ध लोकशाहीला मत. जनता पक्षांच्या सभांना प्रचंड गर्दी होऊ लागली. गर्दी रोखण्यासाठी काँग्रेस सरकारने सभेच्या दिवशी बॉबीसारखे लोकप्रिय चित्रपट दूरदर्शनवर लावले. काँग्रेसचा हा खोडसाळपणा होता पण त्याचा फारसा परिणाम झाला नाही. जनता पक्षाच्या या प्रचार मोहिमेत अनेक दिग्गज नेते सहभागी होते. ६ फेब्रुवारी १९७७ रोजी रामलीला मैदानावर झालेल्या सभेला लक्षावधी लोक उपस्थित होते. यावेळी प्रमुख नेते जयप्रकाश नारायण व जगजीवन राम यांची भाषणे झाली. जयप्रकाश नारायण यांनी इंदिरा गांधी सत्ता सोडणार नाहीत असे सांगून 'मला तुमचे वोट व नोटही पाहिजे' असे आवाहन केले तर जगजीवन राम यांनी '१९६९ पूर्वी पाच ते सहा दादा लोक राज्य चालवित होते. त्यानंतर इंदिरा गांधी व पुत्र संजय गांधी अशा व्यक्ती चालवू लागल्या' अशी टीका केली. देशामध्ये विविध ठिकाणी झालेल्या सभेत जयप्रकाश नारायण हे प्रमुख वक्ते होते. त्यांनी केलेल्या भाषणांनी लोक मंत्रमुग्ध होत. इंदिरा गांधींची हुकुमशाही व आणीबाणीतील अत्याचार यावर प्रखर भाषणे केली. जनता पक्षाचे आधारस्तंभ व वयोवृद्ध नेते मोरारजी देसाई यांनीही इंदिरा सरकारवर कठोर टिका केली. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या भगिनी विजयालक्ष्मी पंडीत या वयोवृद्ध व राजकारणापासून दूर असूनही या काळात त्यांनी जनता पक्षाच्या बाजूने प्रचार केला. त्यांच्या मुंबई, भोपाळ, पटना, विशाखापट्टणम, अलाहाबाद, या ठिकाणी सभा झाल्या. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपल्या खास शैलीत इंदिरा गांधी व काँग्रेसचे वाभाडे काढले.

उत्तर भारतातही प्रचाराची रणधुमाळी चालू होती. उत्तर भारतातील प्रचारात कुटुंबनियोजन (नसबंदी) हा विरोधकांच्या प्रचाराचा केंद्रबिंदू बनला. या कार्यक्रमावर संजय गांधीने दिलेला भर व त्याबाबत पसरलेल्या सक्तीच्या व अन्यायाच्या खऱ्याखोट्या बातम्या काँग्रेसच्या अपयशाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरल्या. बुद्धीवाद्यांनी आणीबाणीत शांतपणे आपले कार्य बजावले होते. लेखक, कवी कलावंतानीही निवडणूकीत प्रभावी कार्य केले. महाराष्ट्रात दुर्गा भागवत या लेखिकेने निवडणूक दौरे काढले. जनतेसमोर बोलतांना त्यांनी म्हटले, "ज्या देशात अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य नाही अशा देशात मी माणूस म्हणून जगण्यापेक्षा उंदिर म्हणून जगणे पसंत करेन" महाराष्ट्रातील दुसरे विनोदी लेखक पु.ल. देशपांडे यांनीही प्रचारात भाग घेतला. जॉर्ज फर्नांडीस यांनी तुरुंगातून पत्रक काढून त्यात कामगारांना इंदिरा गांधींची हुकुमशाही नष्ट करण्यास सांगितले.

### १२.१.४ निवडणूकीचे निकाल :

२० मार्च १९७७ रोजी दुपारपासून निवडणूकीचे निकाल बाहेर येण्यास सुरुवात झाली. या निकालाने काँग्रेसला जबरदस्त धक्का बसला. देशाच्या दृष्टीने ही आश्चर्यकारक घटना होती. सायंकाळपर्यंत दिल्ली प्रदेशातील सातही निर्वाचन क्षेत्रात काँग्रेस पराभूत झाल्याचे घोषित झाले. बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला, एच.आर. गोखले या काँग्रेसमधील दिग्गज नेत्यांचा तर पराभव झालाच पण त्याचबरोबर स्वतः इंदिरा गांधी, संजय गांधींचाही पराभव झाला होता. जनता पक्षाला ५४२ पैकी २६९ जागा मिळाल्या होत्या. इतर सहकारी पक्षांच्या पाठींब्याने त्यांनी ३३० पर्यंत मजल मारुन निर्विवाद बहुमत सिद्ध केले. काँग्रेसला केवळ १५४ जागांवर विजय मिळविता आला. काँग्रेसचा मित्रपक्ष सी.पी.आर. सात आणि ए.आय.ए.डी.म.के ला २१ जागांवर समाधान मानावे लागले. उत्तर भारतात काँग्रेसचे पानीपत झाले. उत्तर भारतातील सात राज्यातील २३४ जांगापैकी २ जागा फक्त काँग्रेसला जिंकता आल्या. भारताच्या राजकीय इतिहासामध्ये विद्यमान पंतप्रधानांचा पराभव होण्याचे हे पहिलेच उदाहरण होते. देशातील सर्वात मोठे राज्य उत्तरप्रदेश परंतु उत्तरप्रदेशात काँग्रेसला एकही जागा मिळाली नाही. तथापि, दक्षिण भारतामध्ये काँग्रेसशी स्थिती बरीच सुधारली होती. १९७१ मध्ये दक्षिण भारतात २० जागा मिळाल्या होत्या. त्याऐवजी १९७७ च्या निवडणूकीत ती संख्या ९२ पर्यंत जाऊन पोहोचली. दक्षिण भारतात मात्र जनता पक्षाची पिछेहाट झाली. दक्षिणेत चार राज्यांमध्ये जनता पक्षाला केवळ सहा जागा जिंकता आल्या. दक्षिणेत काँग्रेस थोडा तग धरून राहीला पण उत्तरेत पूर्णपणे भुईसपाट झाला. एकंदर १९७७ च्या निवडणूकीचा निकाल पाहता या निवडणूकीमुळे काँग्रेसची तीस वर्षांची मक्तेदारी मोडीत निघाली. नेहरु परंपरा संपुष्टात येण्याची चिन्हे दिसू लागली. जनतेने दिलेला कौल मान्य करुन इंदिरा गांधींनी आपला राजीनामा उप राष्ट्रपती बी.डी. जत्ती यांच्याकडे सुपूर्द केला. कारण ११ फेब्रुवारी १९७७ मध्ये राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांचे निधन झालेले होते. राजीनामा देण्यापूर्वी २१ मार्च १९७७ रोजी आणीबाणी उठवल्याचीही घोषणा केली. हिंदुस्थानातील जनतेने सत्तांतर घडवून जनता पक्षाला निवडून दिले.

## १२.२ जनता पक्षाचे सरकार स्थापन

१९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षाला अपेक्षित यश मिळाले. नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी २४ मार्च १९७७ रोजी जयप्रकाश नारायण आणि आचार्य कृपलानी यांच्या नेतृत्वाखाली राजघाट या ठिकाणी म. गांधीच्या स्वप्नांची पूर्तता व जनतेची सेवा करु अशी शपथ घेतली. जनतेला साधेपणाचे व प्रामाणिकपणाचे आश्वासन दिले. जनता पक्षाचे बहुमत असल्याने उपराष्ट्रपतीने या पक्षाला सरकार बनविण्यासाठी आमंत्रित केले. यावेळी पंतप्रधान कोणी बनावे याची चर्चा सुरु झाली. या पदासाठी मोरारजी देसाई, चरणसिंग, जगजीवन राम हे प्रमुख दावेदार होते. या संदर्भात निर्णय लागत नसल्याने जयप्रकाश नारायण व आचार्य कृपलानी यांना बोलविण्यात आले. मतदान टाळून पाठिंब्याची पद्धत स्विकारुन हा प्रश्न निकालात काढण्यात आला. मोरारजी देसाईंच्या नावाला अधिक पाठिंबा असल्याचे दिसून येताच पंतप्रधान पदासाठी त्यांच्या नावाची घोषणा केली. २४ मार्च १९७७ रोजी मोरारजींचा शपथविधी पार पडला. जनता पक्षाचा निवडणूकीतील विजय आणि मोरारजी देसाईची पंतप्रधानपदी निवड पाश्चात्य राष्ट्रांना व

विशेषतः अमेरिकेला आश्चर्याचा एक सुखद धक्का देऊन गेली. कारण डाव्या विचारसरणीकडे झुकलेला भारत या निवडणुकीमुळे उजव्या विचारसरणीकडे झुकला. श्री. निलम संजीव रेड्डी यांच्या राष्ट्रपती पदी निवडीमुळे उजवी विचारसरणी अधिकच बळकट झाली. नवीन सरकारचे पंतप्रधान व राष्ट्रपती उच्च प्रतीभेचे असून त्यांचे सार्वजनिक जीवन स्वच्छ होते. पंतप्रधान मोरारजी देसाईनी मंत्रीमंडळाची रचना करताना संयुक्त सरकारमधील प्रमुख घटक पक्षांना कॅबिनेट मध्ये २ जागा देण्याचे मान्य करण्यात आले. त्यानुसार भारतीय लोकदलाचे चौधरी चरणसिंग आणि राजनारायण, जनसंघाचे अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणी, सी.एफ.डी.चे जगजीवन राम आणि हेमवंती नंदन बहुगुणा, संघटना कॉंग्रेसचे रामचंद्रन आणि सिकंदर बख्त, समाजवादी पक्षाचे जॉर्ज फर्नांडीस आणि मधु दंडवते, तरुणतुर्कचे मोहन धारीया आणि पुरुषोत्तमलाल कौशिक, अकाली दलाचे प्रकाशसिंग बादल इत्यादी नेत्यांचा कॅबिनेटमध्ये समावेश करण्यात आला. मंत्रीमंडळातील मंत्र्याची संख्या ४४ होती. यशवंतराव चव्हाण हे विरोधी पक्ष नेते बनले. १ मे १९७७ रोजी जनता पक्षातील प्रमुख घटक पक्षांच्या नेत्यांची बैठक झाली. प्रत्येक घटक पक्षाने आपले अस्तित्व विसरुन जनता पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला. ५ मे १९७७ रोजी सी.एफ.डी सुद्धा जनता पक्षात विलीन झाला.

## १२.३ जनता सरकारची कामगिरी :

जनता सरकारने शासनाची सर्व सत्तासुत्रे हाती घेतल्यानंतर आणीबाणीच्या घटना बदलण्यास सुरुवात केली. ४२व्या घटना दुरुस्तीने सिमीत केलेले न्यायपालिकेचे अधिकार न्याय पालिकेला बहाल करण्यात आले, वृत्तपत्रांवरील नियंत्रणे दूर करुन त्यांना स्वातंत्र्य दिले. आणीबाणीत बंद पडलेल्या अनेक मुद्रण संस्था पुन्हा सुरु झाल्या. बंद पडलेली प्रेस कौन्सिल पुन्हा निर्माण करण्यात आली. देशात येण्यास बंदी घालण्यात आलेल्या परकीय पत्रकारांना पुन्हा परत येण्यास आमंत्रित करण्यात आले. आणीबाणीच्या काळात काही सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या करुन त्यांची सक्तीने पदोन्नती घडवून आणलेली होती. काही अधिकाऱ्यांना सक्तीने रजेवर पाठविले होते. आणीबाणीविरुद्ध स्पष्टपणे बोलणाऱ्या अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा दिलेल्या होत्या. ज्या अधिकाऱ्यांना कोणत्याही आरोपाशिवाय नोकरीवरुन काढून टाकले होते त्या सर्वांना सरकारमध्ये व प्रशासनामध्ये त्यांच्या पूर्वीच्या जागांवर नेमण्यात आले. देशातील अंतर्गत सुरक्षिततेकरिता कोणालाही अटक करण्याचा अधिकार सरकारला देणारा ‘मिसा’ कायदा रद्द करण्यात आला. विरोधी पक्षांना देशाच्या राजकारणात कायदेशीर स्थान दिले गेले. कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांना मंत्रीमंडळाच्या मंत्र्यांचा दर्जा दिला गेला. आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसार माध्यमांचा उपयोग विरोधी पक्षांनाही करता येण्याची तरतुद करण्यात आली. आणीबाणीच्या काळात तुरुंगात डांबण्यात आलेल्या सर्व कैद्यांची मुक्तता करण्यात आली.

जनता सरकारने पंचायत राज योजनेचा अभ्यास करण्यासाठी डिसेंबर १९७७ मध्ये श्री. अशोक मेहता यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने सर्वांगीण विकासासाठी १०० शिफारसी सुचविल्या. मात्र पंतप्रधान मोरारजी देसाईनी जनतेचा अपेक्षाभंग

केला. १९७९ मध्ये प्रचंड महागाई वाढली. जनता सरकारच्या अंतर्गत भांडणामुळे जनकल्याणाचे विधायक कार्यक्रम या सरकारला राबवता आले नाही. जनता सरकारने मजुर आणि छोट्या उद्योगधंद्यांना प्राधान्य दिले. राष्ट्रीय नियोजना ऐवजी विकेंद्रीकरणाला चालना दिली. शेतीविकासासाठी श्रीमंत शेतकऱ्यांना उदारपणे सवलती दिल्या. लोकसंख्या वाढ कमी करण्यासाठी या सरकारने कोणतेही प्रयत्न केले नाहीत कारण संजय गांधी विरोधात केलेल्या प्रचारात कुटुंबनियोजनाचा मुद्दा महत्वाचा ठरला होता. जनता राजवटीत कुटुंबनियोजन कार्यक्रमाची जबरदस्त पिछेहाट झाली.

जनता राजवटीत एका वर्षाच्या आतच शेती आणि उद्योगव्यवसायामध्य मंदीचे सावट आले. १९७८ व १९७९ देशाच्या विविध भागातील अवर्षण व भयकंर पुरामुळे शेतीउत्पादनावर विपरीत परिणाम झाले. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या. आंतरराष्ट्रीय बाजारात पेट्रोलियमच्या किंमती वाढल्याने चलनवाढीला चालना मिळाली. १९७९ मध्ये तुटीचा अर्थसंकल्प राबविल्यामुळे चलनवाढीचा दर २० टक्क्याच्या पुढे गेला. देशात प्रचंड प्रमाणात असंतोष पसरला. देशातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडत चालली. ग्रामीण भागातील सामाजिक तणावाशी सरकारचा संबंध नव्हता. जनता सरकारचा पायाच मुळी मध्यम जातीतील मध्यम आणि श्रीमंत शेतकरी, उच्च जातीतील मोठमोठे जमीनदार, ग्रामीण व शहरी दुकानदार, छोटे व्यावसायिक आणि मध्यम वर्गीय इत्यादी घटकावर उभारलेला होता. अनेक राज्यात जमीनदारांनी भूमिहिनांना व गरिबांना दिलेल्या जमिनी व जागा सक्तीने परत घेतल्या. अनेक सावकारांनी आणीबाणीच्या काळात रद्द झालेली कर्जे मागण्यासाठी तगादा लावला. याचा व्यापक परिणाम म्हणजेच उत्तर प्रदेशात जातीय ताण-तणाव व जातीय दंगली घडून आल्या. जुलै १९७७ मध्ये बिहार राज्यात बेलची येथे हरिजन कुटुंबाला जिवंत जाळण्यात आले. देशाच्या विविध भागात त्याचे पडसाद उमटल्याने मोठ्या प्रमाणावर जातीय दंगली सुरु झाल्या. या घटनेने संपूर्ण देशाला धक्का बसला. जनता सरकारच्या नेत्यांनी मात्र या गावाला भेट सुद्धा दिली नाही. पण इंदिरा गांधींनी अनेक अडचणीतून भर पावसात जाऊन तेथील हरिजनांचे सांत्वन केल्याने त्या लोकप्रिय झाल्या व जनता सरकार बदनाम झाले.

पंतप्रधान मोरारजी देसाईनी संपूर्ण देशात दारुबंदीची घोषणा केली पण तिच्या अंमलबजावणीत त्यांना पूर्ण अपयश आले नाही.कारण चोरट्या दारुचे व गुन्हेगारीचे प्रमाण वाढले. सरकारचे अबकारी उत्पन्न घटले. वृत्तपत्रातून सरकारच्या कार्यपद्धतीवर टीका होऊ लागताच सरकारने इंडस्ट्रीज ॲक्टची कलमे मुद्रण व्यवसायालाही लागू केली. जनता सरकारने आणीबाणीच्या काळात कैदेत असलेल्या सर्वांची सुटका सत्तेवर येताच केली पण त्यात अनेक चोरटे व्यापारी, काळा बाजार करणारे व इतर समाजकंटक हे देखील सुटल्याने सगळीकडे कायदा व सुव्यवस्था कोलमडली. गुन्हेगारीचे प्रमाण वाढले. आणीबाणीत पोलीसांनी प्रचंड अत्याचार केल्याचा ठपका ठेवून जनता सरकारने त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरु केल्याने पोलीस दलात असंतोष वाढून संप व उठाव होऊ लागले. केंद्रातील व राज्यातील जनता सरकारांनी जलद गतीने जमीन सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला नाही. सरकारची 'सोने लिलाव' योजना फसली होती. प्रतिकुल परिणामांची सूचना मिळूनही सरकारने मोठ्या प्रमाणात सोन्याचा लिलाव केला.

जनता सरकारने संसदेमध्ये धार्मिक स्वातंत्र्यासंबंधी बिल मांडले. या बिलामुळे अल्पसंख्यांकाच्या मनात सरकारविषयी शंका आणि संशय निर्माण झाला. यामुळे केवळ जनता पक्षाची प्रतिमा डागाळली नाही तर जातीयवादी शक्ती प्रभावीत झाल्या. जातीयवादी शक्तींनी डोके वर काढले. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जनता सरकार अंतर्गत मतभेदांमुळे परस्पराच्या विरोधी हितसंबंधामुळे, परस्पर विरोधी विचारसरणीमुळे ५ वर्षाचा कालावधी पूर्ण करु शकले नाही. जनता पक्षामध्ये विविध राजकीय गट केवळ इंदिरा गांधींना विरोध करण्यासाठी एकत्र आले होते. केंद्र सरकार आणि राज्य सरकारे यांच्यातील मतभेद व संघर्षामुळे सरकार आणि प्रशासन कमकुवत बनले. ४ ऑक्टोबर १९७७ रोजी दिल्लीतील तीस हजारी न्यायालयात कोणताही आरोप सिद्ध न झाल्याने त्यांची बिनशर्त सुटका झाली होती. जनता सरकारने पुन्हा तशीच चूक केली. १९ डिसेंबर १९७८ रोजी मारुती मोटार प्रकल्पातील भ्रष्टाचाराबद्दल सरकारने इंदिरा गांधींना पुन्हा अटक केली. त्यांना तिहारच्या तुरुंगात ठेवण्यात आले. त्यामुळे जनता सरकार सूडाचे राजकारण करीत असल्याचे चित्र निर्माण झाले. या अटकेविरुद्ध जनतेने प्रचंड आंदोलन केल्याने २६ डिसेंबरला इंदिराजींची सुटका केली गेली. वरील सर्व घटना आणि प्रसंग जनता सरकारच्या अपयशाला कारणीभूत होत्या.

## १२.४ जनता सरकारचे पतन

मोरारजी देसाई पंतप्रधान झाल्यामुळे चौधरी चरणसिंग व राजनारायण हे नेते नाराज झाले होते. तेव्हांपासून चरणसिंगानी एके दिवशी या देशाचे पंतप्रधान होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. त्यांनीच पुढे जनता पक्षात दुफळी निर्माण केली. चरणसिंगांना पंतप्रधान बनण्याची घाई झाली होती. पंतप्रधान मोरारजींनी ज्यावेळी चार राज्यात राज्यपाल नेमले ते सर्व संघटना काँग्रेसचे होते. त्यावरुन चरणसिंग व मोरारजी यांच्यात मतभेद झाले. केंद्रीय मंत्रीमंडळात नेमलेल्या २४ राज्यमंत्र्यांपैकी बहुतेक भारतीय लोकदल व जनसंघाचे होते. त्यामुळे इतर पक्ष नराज झाले. समाजवादी नेते मधु लिमये यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जनता पक्ष यांच्या दुहेरी सदस्यत्वाचा प्रश्न निर्माण केला. जनता पक्षाशी संलग्न संस्थेत सामील होण्याचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला आवाहन केले. पण सरकारने याकडे दुर्लक्ष केले. चंद्रशेखर हे जनता पक्षाचे अध्यक्ष होते. पण त्यांच्या कार्यप्रणालीबाबत अटलबिहारी वाजपेयी, जगजीवन राम, हेमवती नंदन बहुगुणा हे नाराज होते.

याचवेळी १९७८ च्या सुरुवातीला मोरारजी देसाईचे पुत्र कांतीभाई देसाई यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. कांतीभाई देसाई आपल्या व्यापारात काळे धंदे करण्यासाठी पित्याच्या पदाचा गैरवापर करतात. या आरोपाने मोठे वादळ निर्माण झाले. हे वादळ निर्माण करण्यात खुद्द चरणसिंगाचा हात होता त्यामुळे मोरारजी देसाई अडचणीत सापडले.

२५ जून १९७८ रोजी राज नारायण यांनी १४४ कलमाचा भंग करुन सिमला येथे सभा घेतली व हिमाचल प्रदेशाच्या मुख्यमंत्र्यांवर टिका केली. मुख्यमंत्री शांताकुमार हे जनसंघाचे सदस्य होते. राज नारायण यांची ही कृती बेकायदेशीर असून शिस्तभंगाची होती. या

शिस्तभंगाबद्दल पंतप्रधान मोरारजींनी राज नारायण यांचा सक्तीने राजीनामा घेतला. चरणसिंगांना आयतेच कोलीत मिळाले. चरणसिंग स्वतः गृहमंत्री असूनही इंदिरा गांधींना अटक न होण्याचे खापर जनता पक्षावर फोडले. पंतप्रधान मोरारजी देसाई संतप्त झाले. या घटनेमुळे चरणसिंगांनाही मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. याविरुद्ध भारतीय लोकदलाच्या ४ राज्यमंत्र्यांनी लगेच राजीनामे दिले. हरियाणाच्या मुख्यमंत्री देवीलालने चौधरी चरणसिंगाना पाठींबा दिला. पंतप्रधान मोरारजी देसाई व चरणसिंग यांच्यातील मतभेद मिटवून तडजोडीचे प्रयत्न मधू लिमये, देशमुख, चंद्रशेखर, अटलबिहारी वाजपेयी या नेत्यांनी केले. जयप्रकाशजींनीही मध्यस्थी केली पण त्याचा उपयोग झाला नाही. २४ जुलै रोजी चौधरी चरणसिंगानी किसान मेळावा घेऊन शक्ती प्रदर्शन घडवून आणले. अखेर अनेक नेत्यांच्या प्रयत्नामुळेच २४ जानेवारी १९७९ रोजी चौधरी चरणसिंगाना मंत्रिमंडळात घेऊन उपपंतप्रधानपद व अर्थखातेही त्यांच्याकडे देण्यात आले.

ज्याप्रकारे चरणसिंगाना मंत्रीमंडळात घेऊन सन्मान केला तो सन्मान राज नारायण यांच्या वाट्याला आला नाही. राजीनामा दिलेले राजनारायण मात्र संतापलेलेच होते. त्यांनी गुप्तपणे संजय गांधीशी बोलणी करुन हातमिळवणी केली. एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेले हेमवती नंदन बहुगुणा व चौधरी चरणसिंग यांचीही युती झाली. या सर्वांनी एकत्र येऊन मोरारजींविरुद्ध मोठे राजकारण केले. कांतीभाई देसाईच्या सहाय्यकास हाताशी धरुन त्याच्या आर्थिक व्यवहाराची माहिती चौधरी चरणसिंगानी मिळवली. तसेच लोकसभेत अविश्वासाचा ठराव आणण्याची योजनाही मांडली. ३० जून १९७९ रोजी राजनारायण यांनी जनता पक्षाचा राजीनामा दिला. क़ाँग्रेस पक्षानेही सरकारवर अविश्वास ठराव आणण्याचे ठरविले. मधू लिमये, ललित नारायण मिश्रा, हेमवती नंदन बहुगुणा यांनी काँग्रेसशी गुप्त वाटाघाटी केल्या. जनता पक्षाचे अनेक सदस्य लोकसभेचा राजीनामा देत होते. राजनारायण यांनी स्वतंत्र निधार्मिक जनता पक्ष स्थापन केला. हेमवती नंदन बहुगुणा, जॉर्ज फर्नांडीस यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिले. जगजीवन राम यांनीही मोरारजींचा निषेध केला. शेवटी १५ जुलै १९७९ रोजी पंतप्रधान मोरारजी देसाईनी आपल्या मंत्रीमंडळाचा राजीनामा दिला. त्यांचे सरकार २ वर्षे २ महिने व २२ दिवस एवढा काळच टिकू शकले. आपसातल्या गटबाजी व मतभेदांमुळे जनता सरकार कोसळले. आणि इंदिरा गांधींचा काँग्रेस पक्ष पुन्हा बलशाली होऊ लागला.

### १२.४.१ औट घटकेचे पंतप्रधान :

मोरारजी देसाईंनी १५ जुलै १९७९ रोजी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. नवीन पंतप्रधान कोण याची चाचपणी सुरु झाली. राष्ट्रपतींनी विरोधी पक्ष नेते यशवंतराव चव्हाण यांना सरकार बनविण्यास पाचारण केले परंतु चार दिवसांच्या अथक परिश्रमानंतर सरकार बनविण्यास आपण असमर्थ असल्याचे चव्हाणांनी राष्ट्रपतींना कळविले. त्यामुळे राष्ट्रपतींनी मोरारजी देसाई व चौधरी चरणसिंग यांना त्यांच्या समर्थकांची यादी तयार करण्यास सांगितले. या दोघांच्या यादीत काही नावे समान होती. त्यावेळी लोकसभा सदस्यांची प्रत्यक्ष संख्या ५३८ होती. त्यापैकी ३८ सदस्यांनी दोघांपैकी कोणाचेही समर्थन न करता तटस्थता जाहीर केली. याचा अर्थ दोन्ही यादीतील समर्थक संख्या ५०० पेक्षा जास्त असणे शक्य नव्हते परंतु दोन्ही याद्यांची छाननी

केल्यानंतर त्यात ५५९ नावे आढळली. याचाच अर्थ दोन्ही यादीतील काही नावे समान होती. तेव्हा राष्ट्रपतींनी दोन्ही याद्यांची कसून छाननी केली. त्यात बहुमत चरणसिंग यांच्या बाजूचे नसले तरी त्यांच्या समर्थकांची संख्या मोरारजी देसाई समर्थकांपेक्षा जास्त असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे राष्ट्रपतींनी चरणसिंगाना सरकार बनविण्यास पाचारण करुन त्यांना लोकसभेत लवकरात लवकर विश्वासदर्शक ठराव पारित करण्यास सांगितले.

लोकसभेत विश्वासदर्शक ठराव मंजूर करुन घेण्यासाठी चरणसिंगांना तारेवरची कसरत करावी लागणार होती. चौधरी चरणसिंगांच्या नवीन संयुक्त सरकारला काँग्रेस (एस) चा आतून व काँग्रेस (आय) चा बाहेरुन पाठिंबा होता. यावेळी भारतीय राजकारणाच्या सारीपाटावर राजकीय अनिश्चितेचे सावट होते. इंदिरा काँग्रेसने या साऱ्या घडामोडीत ज्या मुत्सदीपणाचा परिचय दिला त्यामुळे हुकूमाचा एक्का पक्षनेत्या इंदिरा गांधींच्या हाती होता. चौधरी चरणसिंगांना प्रधानमंत्री होण्यास इंदिरा काँग्रेसने औपचारिक संमती दिली पण ती एका अटीवर ती म्हणजे मोरारजींनी स्थापन केलेली खास न्यायालये चरणसिंगांनी रद्द करावी. पण चरणसिंगाने ते मान्य केले नाही. लोकसभेत बहुमत मिळणे शक्य नाही असे स्पष्ट होताच २० ऑगस्ट १९७९ रोजी लोकसभेत बहुमत विश्वासदर्शक ठरावासाठी अधिवेशन सुरु होण्याआधीच चरणसिंगाने आपला राजीनामा सादर केला व लोकसभा विसर्जित करुन मध्यावधी निवडणूका घेण्याचा राष्ट्रपतींना सल्ला दिला. त्यांची शिफारस ग्राह्य धरुन राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांनी लोकसभा बरखास्त करुन जानेवारी १९८० मध्ये निवडणूका घेण्याचे घोषित केले. चौधरी चरणसिंग यांनी फक्त २३ दिवस पंतप्रधान पदाचा पदभार सांभाळला. राष्ट्रपतींचा निर्णय घटनेच्या चौकटीत बसणाराच होता. हा निर्णय गांधींना वरदान ठरला. काँग्रेसला पर्याय देण्यास जनता पक्ष अयशस्वी ठरला. या घटनेमुळे इंदिरा गांधींना पुढील मार्ग मोकळे झाले.

### १२.४.२ आपली प्रगती तपासा :

१. जनता पक्षाच्या स्थापनेची थोडक्यात माहिती लिहा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १२.५इंदिरा गांधींचे पुनरागमन

१९७७ च्या निवडणूकीतील पराभवाची नैतिक जबाबदारी इंदिरा गांधींनी स्विकारली. जनता पक्ष म्हणजे अनेक पक्षांचे कडबोळे होते. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत इंदिरा गांधी आणि काँग्रेस पक्षाचा पराभव करण्यासाठी हे पक्ष एकत्र आले असले तरी त्यांच्या धोरणात एकवाक्यता नव्हती. मार्च १९७७ च्या निवडणूकीने इंदिरा गांधींना फार मोठा धक्का दिला होता. राजकारणातून त्यांना दूर फेकले होते. सर्व देशाला इंदिरा गांधी पुन्हा कधीही राजकारणात येणार

नाहीत असे वाटत होते. काँग्रेसमधील ज्येष्ठ नेत्यांनी त्यांची भेट घेऊन काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीत उपस्थित राहण्याविषयी त्यांचे मन वळविले. या बैठकीत काँग्रेसच्या पराभवाविषयी साधक बाधक चर्चा झाली. कांही नेत्यांनी आणीबाणीच्या काळात संजय गांधींच्या अतिरेकी वर्तनावर कठोर टीका केली. एवढेच नव्हे तर काँग्रेस कार्यकारणीने ठराव पास करुन संशयास्पद वागणूकीमुळे संरक्षण मंत्री बन्सीलाल यांची काँग्रेसमधून हकालपट्टी केली. माहिती आणि नभोवाणी मंत्री विद्याचरण शुक्ला यांना ताकीद देण्यात आली. काँग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआ यांना सुद्धा काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. असे असले तरी इंदिरा गांधींचा अजूनही काँग्रेसवर प्रभाव टिकून होता. त्यांच्या पाठींब्यामुळेच ७ मे १९७७ रोजी काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून ब्रम्हानंद रेड्डी निवडून आले. अध्यक्ष बनल्यानंतर रेड्डीनी स्वतंत्रपणे वागायला सुरुवात केली. अध्यक्ष व इंदिराजींमध्ये संघर्ष वाढला. म्हणूनच १९७७ च्या प्रांतीय निवडणूकीत इंदिरा गांधी सहभागी झाल्या नाहीत. त्या योग्य संधीची वाट पहात होत्या.

१४ जुलै १९७७ रोजी इंदिरा गांधींनी पवनार आश्रमात जाऊन विनोबाजी भावे यांची भेट घेतली. प्रथमच बरेच दिवसानंतर त्या दिल्लीबाहेर पडल्या होत्या. त्यानंतर त्यांनी बिहार राज्यातील बेलची या ठिकाणी १३ ते ३० या वयोगटातील ११ हरिजनांची हत्या होऊन जे अत्याचार झाले त्यांचे सांत्वन करण्यासाठी १४ ऑगस्ट रोजी बेलचीला भेट दिली. बेलचीला भेट देणाऱ्या त्या पहिल्याच राजकीय नेत्या होत्या. बेलचीतून त्या पाटण्याला गेल्या व जयप्रकाशजींची भेट घेतली. जयप्रकाशजींनी मागील गोष्टी विसरुन त्यांना आशीर्वाद दिला. ३ ऑक्टोबर रोजी इंदिराजींना अटक केली. याप्रकारात जनता सरकारच बदनाम झाले. सुटका झाल्यानंतर इंदिराजीनी गुजरात दौरा काढून सभांमधून भाषणे केली. नोव्हेंबर १९७७ मध्ये आंध्रप्रदेशात भयंकर वादळ झाले. या वादळग्रस्त प्रदेशाचा इंदिरा गांधींनी दौरा काढून तेथील लोकांना दिलासा दिला. या सर्व दौऱ्यामागे इंदिरा गांधींनी गेलेली लोकप्रियता परत मिळवून घेण्यात यश मिळविले.

### १२.५.१ इंदिरा काँग्रेसचा उदय :

इंदिरा गांधींच्या अनुयायांनी इंदिरा गांधींना काँग्रेसच्या अध्यक्षा बनविण्याचे प्रयत्न केले पण त्यांना अपयश आले. याचवेळी शहा कमिशनसमोर पूर्वी इंदिरा मंत्रीमंडळात मंत्री असलेले टी.ए. पै आणि सी. सुब्रम्हण्यम या नेत्यांनी इंदिरा गांधी विरोधात साक्ष दिल्याने काँग्रेस मध्ये इंदिरा गांधी समर्थक व इंदिरा विरोधी असे दोन गट निर्माण झाले. कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकार होते व इंदिरा गांधींचे एकनिष्ठ अनुयायी देवराज अर्स हे मुख्यमंत्री होते. त्यांनी राज्यात समांतर काँग्रेसकमिटी स्थापन केल्याने काँग्रेस कार्यकारीणीने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा प्रयत्न केला पण इंदिरा गांधींनी त्याला विरोध केला या प्रश्नावरुन पुन्हा दोन गट निर्माण झाले. या कटकटींना कंटाळून इंदिरा गांधींनी १८ डिसेंबर १९७७ रोजी काँग्रेस कार्यकारीणीचा राजीनामा दिला. इंदिरा गांधींच्या राजीनाम्यानंतर ६१ काँग्रेस नेत्यांनी आखिल भारतीय काँग्रेस कमिटीची बैठक बोलावून हा अंतर्गत प्रश्न चर्चेने सोडवावा असा विचार मांडला. ३१ डिसेंबर १९७७ रोजी कर्नाटकातील देवराज अर्स सरकार बरखास्त करुन तेथे राष्ट्रपती राजवट लागू केली. यामागे काँग्रेसमधील काही इंदिरा विरोधी नेते होते.

१ व २ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा समर्थकांचे राष्ट्रीय सम्मेलन विठ्ठलभाई हाऊसमध्ये भरले. ५००० प्रतिनिधी सम्मेलनाला आले. झालेल्या ठरावात इंदिरा गांधींना काँग्रेसच्या अध्यक्षा म्हणून घोषित केले. ब्रम्हानंद रेड्डी यांनी त्याला विरोध केला. काँग्रेसमध्ये फूट पडून ब्रम्हानंद रेड्डी यांची काँग्रेस व इंदिरा गांधींची काँग्रेस आय निर्माण झाली. १९७८ म्हणजे उर्वरित राज्यांच्या निवडणूका  झाल्या. यावेळी काँग्रेस आय आंध्र कर्नाटकात सत्तेवर आली. महाराष्ट्रात या पक्षाला दुय्यम स्थान मिळाले. या घडामोडींमुळे इंदिरा गांधीं राजकारणात सक्रीय होऊन बलशाली बनल्या.

### १२.५.२ इंदिरा गांधींचा लोकसभेत प्रवेश :

७ नोव्हेंबर १९७८ रोजी कर्नाटकातील चिकमंगळूर या मतदारसंघातून इंदिरा गांधींना लोकसभेवर पाठविण्याचा निर्णय घेतला. इंदिरा गांधींचे समर्थक गुंडु राव, एफ.एम. खान, जाफर शरीफ यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करुन चीकमंगळूर येथून इंदिरा गांधींच्या नावाला दुजोरा दिला. जनता पक्षातर्फे कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री विरेंद्र पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. इंदिरा गांधींच्या दृष्टीने हा जीवन मरणाचा प्रश्न होता. इंदिरा गांधींना निवडून येऊन द्यायचे नाही असा जनता पक्षाने चंग बांधला होता. उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडीस जनता पक्षातर्फे प्रचार मोहिमेचे नेतृत्व सांभाळीत होते. वृत्तपत्रेही इंदिरा विरोधी प्रचार करीत होती. तरीही या अटीतटीच्या लढतीत इंदिरा गांधींनी ७७,३३३ मतांनी ही जागा जिंकली. जनता सरकार अस्वस्थ झाले. जनता पक्षाचा अपेक्षाभंग झाला. पूर्वी मारुती प्रकरणातील भ्रष्टाचाराची चौकशी करणारी समिती नेमली गेली होती. या समितीने इंदिरा गांधींवर ठपका ठेवून त्यांना शिक्षा करण्याचा निर्णय संसदेने घ्यावा असा निर्णय दिला. याचा फायदा घेऊन जनता सरकारने इंदिरा गांधींचे सदस्यत्व रद्द करण्याचे व त्यांना अटक करुन तिहार जेलमध्ये ठेवण्यात आले यावेळी त्यांची लोकप्रियता प्रचंड वाढल्याचे दिसून आले. इंदिरा समर्थकांनी प्रचंड आंदोलन उभारले. अनेक ठिकाणी लाठीहल्ले, अश्रुधूर, अटकसत्र यांचा वापर करावा लागला. २६ डिसेंबर १९७८ रोजी इंदिराजींची सुटका केली गेली. परिणामी जनता पक्षातच मोठ्या प्रमाणात संघर्ष सुरु होऊन १५ जुलै १९७९ रोजी जनता सरकारचे पतन झाले. त्यानंतर चौधरी चरणसिंग औट घटकेचे पंतप्रधान बनले. त्यांना प्रथम पाठींबा देण्याचे कबूल करुन इंदिरा गांधींनी विश्वास ठरावाच्या वेळी पाठींबा काढून घेतल्याने चरणसिंगांना राजीनामा द्यावा लागला. राष्ट्रपतींनी जानेवारी १९८० मध्ये मुदतपूर्व निवडणूका जाहीर केल्या.

### १२.५.३ इंदिरा गांधीं पुन्हा पंतप्रधानपदी (जानेवारी १९८०) :

२२ ऑगस्ट १९७९ रोजी राष्ट्रपतींनी लोकसभेच्या निवडणुका जाहीर केल्या. सर्व राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली. या निवडणूकीत इंदिरा गांधींचा काँग्रेस (आय), जगजीवन राम यांचा जनता पक्ष आणि जनसंघ हे तीनच पक्ष मोठे पक्ष म्हणून सहभागी झाले. ३ व ६ जानेवारी १९८० रोजी लोकसभेच्या झालेल्या निवडणुकीत ५२९ जांगापैकी ३५३ जागा काँग्रेस (आय) ला मिळून पूर्ण बहुमत सिद्ध झाले. पश्चिम बंगाल व केरळ वगळता सर्वत्र काँग्रेस पक्ष निवडून आला. विरोधी पक्षांची दाणादाण उडाली. जनतेने इंदिरा गांधींना देशाच्या सिंहासनावर पुन्हा विराजमान केले. १४ जानेवारी १९८० रोजी इंदिरा गांधींचा पंतप्रधान म्हणून शपथविधी पार पडला.

### १५.५.४ संजय गांधींचा मृत्यु (२३ जून १९८०) :

१९८० च्या निवडणूका काँग्रेससाठी अतिशय लाभदायक ठरल्या. काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाले. याचे सर्व श्रेय इंदिरा गांधींच्या प्रभावाला दिले जाते. पुत्र संजय गांधीसुद्धा अमेठी मतदार संघातून प्रचंड मताने निवडून आले होते. काँग्रेसच्या राजकारणावर त्यांचा मोठा प्रभाव होता. इंदिरा गांधींचे वारस व पंतप्रधान पदाचे दावेदार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. असंख्य तरुण त्यांच्या भोवती जमा झाले होते. ते तरुणांचे प्रेरणास्थान होते पण त्यांच्या आक्रमक वागण्याने काँग्रेसमध्ये दहशत निर्माण झाली होती. त्यांच्या विरोधात बोलण्याची कोणाचीही हिम्मत नव्हती. परंतु संजय गांधींकडे देशाचे नेतृत्व येण्याअगोदरच २३ जून १९८० रोजी त्यांचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्याचा धक्का इंदिरा गांधींना बसला. यानंतरच्या काळात संजय गांधीच्या मृत्युबद्दल अफवांचे पर्व पसरले. त्यात इंदिरा गांधींही बदनामीतून सुटू शकल्या नाहीत. संजय गांधीच्या मृत्युमुळे काँग्रेस पक्षातील दहशतीचे वातावरण संपून काँग्रेस सदस्यांना संकटातून सुटल्याचा आनंद झाला.

## १२.६ इंदिरा गांधीं समोरील समस्या

जनता राजवटीत निर्माण झालेले धार्मिक व जातीय मतभेद इंदिरा राजवटीत अधिक तीव्र झाले. जातीय दंगली वाढल्या. हरिजन, आदिवासी व समाजातील दुबळ्या गंटांवरील अत्याचार वाढले, पंजाबमधील खलीस्तान समस्येने डोकेदुखी निर्माण केली. देशाची आर्थिक परिस्थिती चिंताजनक होती. पोलिसांच्या वाढत्या अत्याचारामुळे जनता नाराज झाली होती. उत्तरप्रदेशात नारायणपुर गावी पोलिसांनी प्रचंड अत्याचार केले. बिहारमधील भागलपूर गावी पोलिसांनी त्यांच्या ताब्यात असलेल्या गुन्हेगारांच्या डोळ्यात ॲसिड टाकून त्यांना आंधळे केले. मुरादाबादेत हिंदू मुस्लिम दंगली होऊन तिचे लोण देशभर पसरले. त्यात शेकडो माणसे मारली गेली. विरोधी पक्षांनी या घटनांचे मोठे भांडवल केले.

इंदिरा गांधींनी मात्र अर्थव्यवस्था सुधारण्याकडे लक्ष केंद्रीत केले. १५ एप्रिल १९८० रोजी आणखी सहा व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. १९८० मध्ये सहावी पंचवार्षिक योजना जाहीर केली. या योजनेसाठी ९७,५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. १९८१ मध्ये प्रशासकीय सुधार आयोग स्थापन करण्यात आला. आर्थिक प्रशासन व सुधारणांबाबत सरकारला सल्ला देण्याचे काम या आयोगाकडे दिले गेले. जानेवारी १९८२ मध्ये इंदिरा गांधींनी २० कलमी कार्यक्रम जाहीर केला. सहाव्या योजना काळात राष्ट्रीय उत्पन्नात ५.३ टक्क्यांनी वाढ झाली व औद्योगिक कामगारांना बोनस जाहीर केला. १९८३ मध्ये पाच कोटी रुपये गुंतवणूक असलेल्या उद्योगांना परवाने घेण्याची आवश्यकता नसल्याचे घोषित केले. ग्रामीण भागासाठी ही मर्यादा १५ कोटीपर्यंत केली या प्रयत्नांमुळे औद्योगिक उत्पादनाचा वेग वाढला.

### १२.६.१काँग्रेसच्या लोकप्रियतेला धक्का :

१९७७ मध्ये जनता सरकारने सत्तेवर येताच काँग्रेस सरकारे बडतर्फ करुन तेथे निवडणूका घेतल्या त्याच घटनेला अनुसरुन इंदिरा गांधींनीही राज्या-राज्यातील जनता सरकारे बडतर्फ करुन १९८० मध्ये विधानसभेच्या निवडणूका घेतल्या. यावेळी काँग्रेसच्या वाढलेल्या अराजकतेमुळे काँग्रेसची प्रतीमा मलीन व्हायला सुरुवात झाली. उच्चवर्णीय व हरिजन यांच्यातील दंगली वाढतच चालल्या होत्या. आसाममधील बांगला निर्वासितांविरुद्ध आंदोलक हिंसक बनले

होते. राज्या-राज्यातील काँग्रेस मंत्रीमंडळे अस्थिर बनत चालली होती. आंध्रप्रदेशात काँग्रेसच्या अस्थिरतेमुळे लोकप्रिय सिनेमा नट एन.टी. रामाराव यांच्या तेलगू देसम या नव्या राजकीय पक्षाने १९८४ च्या निवडणूकीत आंध्रची सत्ता मिळवली. कर्नाटकातही काँग्रेस पक्षाचा पराभव झाला. महाराष्ट्रात मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले सरकारने 'इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठान' स्थापन करुन गैरमार्गाने देणग्या जमा केल्या. याविरुद्ध विरोधकांनी टीकेची झोड उठवली. अंतुलेविरुद्ध न्यायालयात खटला दाखल केला गेला. १९८२ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने अंतुलेंना दोषी ठरविल्याने अंतुलेंना राजीनामा द्यावा लागला. या घटनांमुळे इंदिरा गांधींच्या प्रतिष्ठेला धक्का बसला.

### १२.६.२ राजीव गांधींचा राजकारणातील प्रवेश :

संजय गांधीच्या आकस्मिक मृत्युमुळे राजकारणात विश्वास ठेवण्यासारखी व संकटप्रसंगी धावून येणारी जवळची व्यक्ती इंदिरा गांधींजवळ राहीलेली नव्हती. ही पोकळी भरुन काढण्यासाठी त्यांनी आपले जेष्ठ पुत्र राजीव गांधींना राजकारणात आणण्याचे प्रयत्न सुरु केले. राजीव गांधी इंडियन एअरलाईन्स मध्ये वैमानिक म्हणून नोकरी करीत होते. त्यांना राजकारणात रस नव्हता. पण आईच्या आग्रहामुळे ते राजकारणात आले. अमेठीमधुन लोकसभेवर निवडून गेले व पक्षाचे सरचिटणीस बनले. काँग्रेसने त्यांचे स्वागत केले. इंदिरा गांधींनी राजीवला राजकीय वारस करण्यात घेतलेला निर्णय संजय गांधींच्या पत्नीला (मेनका गांधींना) आवडला नाही. त्यांनी इंदिरा गांधी व राजीव विरुद्ध उघडपणे वृत्तपत्रांतून प्रचार सुरु कला. या कौटुंबिक कलहाचा इंदिराजींना बराच मनःस्ताप झाला. विरोधकांनी मेनका गांधीना जनक करुन इंदिरा गांधींविरुद्ध त्याचा उपयोग करुन घेतला.

### १२.६.३ पंजाब समस्या :

इ.स. १९७१ मध्ये ग्यानी झैलसिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्यांनी अकाली गटाचे नेतृत्व स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न केल्याने अकाली नेते संतापले व त्यांनी स्वतंत्र शीख राज्याची म्हणजेच खलीस्तानची मागणी पुढे केली. लंडनहून सुत्रे हलवणारे जगजीतसिंह चौहान हे स्वतःला खलीस्तानचे अध्यक्ष म्हणवून घेत. आणीबाणीनंतर जनता सरकारात अकाली दलास स्थान मिळाले परंतु जानेवारी १९८० च्या निवडणूकीत इंदिरा काँग्रेसला बहुमत मिळाले. अकाली दलाला पराभव सहन करावा लागला. हा राग त्यांच्या मनात धुमसत होता. १९८२ पासून शिखांनी धर्मयुद्धाला सुरुवात केली. शीख तरुणांनी हिंसाचाराला सुरुवात केली.

१९८० मध्ये पंजाबला हिंसक वळण लावणाऱ्या जर्नेलसिंग भिंद्रनवाले या नेत्याचा उदय झाला. त्याने अकाली दलाच्या धर्मयुध्दाला पाठिंबा दिला. ९ सप्टेंबर १९८१ रोजी खलीस्तान विरोधी लिखाण करणाऱ्या जगत नारायण या प्रसिध्द लेखकाची हत्या झाली. त्यामागे भिंद्रनवालेचा हात होता. त्याला अटक होऊनही गृहमंत्रालयाच्या आदेशाने सुटका केली गेली. यावेळी ग्यानी झैलसिंह हे देशाचे गृहमंत्री होते. सुटका होताच भिंद्रनवाले अमृतसरच्या सुवर्णमंदिरात जाऊन राहिले. तेथे त्यांनी प्रचंड शस्त्रसाठा करण्यास सुरवात केली. त्यांच्या कृत्यामुळे व पाकिस्तानच्या प्रोत्साहनामुळे पंजाबमधील हिंसाचार वाढत गेला. निष्पाप लोकांची हत्या शीख अतिरेक्यांकडून होऊ लागल्या. हा प्रश्न सोडविण्यासाठी इंदिरा गांधीनी अनेकवेळा अकाली दलाशी वाटाघाटी केल्या पण त्या निष्फळ ठरल्या. ही चळवळ वाढवण्यास लोंगोवाल, सुवर्ण मंदिराचे नियंत्रक गुरुचरणसिंग तोहरा, पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंह बादल, आणि तलबंडी ही नेतेमंडळीही जबाबदार होती. त्यांनी अतिरेक्यांना विरोध केला नाही. केंद्र, सरकार

या प्रश्नाबाबत निष्क्रिय आणि उदासिन होते. २३ एप्रिल १९८३ रोजी डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल अटवाल यांची सुवर्ण मंदिरांत हत्या झाली. ५ ऑक्टोबर १९८३ रोजी अतिरेक्यांनी बस अडवून हिंदूची कत्तल केली. एप्रिल १९८४ मध्ये पंजाबमधील ३७ रेल्वेस्थानकांना आगी लावण्यात आल्या. सुवर्ण मंदिराला लष्करी छावणीचे स्वरुप आले होते.

### १२.६.४ ऑपरेशन ब्ल्यू स्टार :

पंजाबमधील अतिशय गंभीर समस्येला इंदिरा गांधींनी अतिशय धैर्याने तोंड दिले. पंजाबमधील हिंसाचार आणि रक्तपात रोखण्यासाठी इंदिरा गांधीनी धाडसी निर्णय घेतला तो म्हणजे सुवर्णमंदिरात लष्करी कारवाई करणे. तेथे आलेल्या अतिरेक्यांचा नाश करण्याच्या कारवाईला 'ऑपरेशन ब्लू स्टार' असे नाव दिले गेले. ५ जून १९८४ रोजी सुवर्णमंदिरात लष्कर घुसले. अतिरेक्यांकडे अत्याधुनिक शस्त्रसाठा असल्याने रणगाडे व तोफांचा वापर केला. या धुमश्चक्रीत भिंद्रनवाले व त्यांचे एक हजार अनुयायी मारले गेले. जवळ जवळ २००-३०० भारतीय सैनिक मारले गेले अकालतख्ताच्या इमारतीचे बरेच नुकसान झाले. अतिरेक्यांचा बिमोड करुन ही मोहिम पूर्णपणे यशस्वी झाली.

## १२.७ इंदिरा गांधीचा शेवट (३१ ऑक्टोबर १९८४)

पंतप्रधान इंदिरा गांधीनी केलेली कारवाई धाडशी व देशाच्या ऐक्यासही महत्वाची होती पण यातून त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. इंदिरा गांधीनी सुवर्णमंदिर अपवित्र केल्याचा समज कर्मठ शीखांचा झाला. ऑपरेशन ब्लू स्टारमुळे शीखांच्या धर्मभावना दुखावल्या गेल्या. या कृतीबद्दल वैयक्तीकरित्या इंदिरा गांधीना जबाबदार धरले. अनेक कर्मठ शीखांना हा आपला अपमान वाटला. अनेकांनी इंदिरा गांधीनी ही कृती करुन नैतिकतेचे उल्लंघन केल्याचा आरोप केला. इंदिराजीच्या कुंटुंबीयाना धमक्या येऊ लागल्या. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी दिल्लीच्या आपल्या निवासस्थानी बाहेरील कार्यालयाकडे निघाल्या असता त्यांचेच शीख पहारेकरी असलेल्या बियातसिंग व सतवंतसिंह यांनी आपल्या जवळील पिस्तोल व स्टेनगन ने इंदिराजीवर गोळीबार केला. यांनंतरच्या झटापटीत बियांतसिंग मारला गेला व सतवतसिंगाला अटक झाली. त्यास १९८९ मध्ये फाशी देण्यात आली इंदिरा गांधीच्या हत्येने संपूर्ण भारताला प्रचंड धक्का बसला.

इंदिरा गांधींच्या निधनाने संपूर्ण देश शोकसागरात बुडून गेला. इंदिरा गांधींच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी रात्रंदिवस रांगा लागल्या. पंडित नेहरुचे ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार झाले तेथेच चंदनाच्या लाकडाच्या चितेवर त्यांच्या देहाला अग्नी दिला. त्या केवळ पंतप्रधानच नव्हत्या तर भारतातील प्रत्येकाच्या आशास्थान होत्या. त्या जनतेच्या नेत्या होत्या. त्यांना गरिबीबद्दल कळवळ होती.. त्यांच्या गरिबी हटाव या घोषणेमुळे त्यांनी काही काळ जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविले. जीवनातील अनेक चढउतारांना धैर्याने तोंड देऊन देशाची सेवा केली. आणिबाणीत संपूर्ण सत्ता हाती एकवटली असताना त्या हुकमशहा बनू शकत होत्या पण त्यांचा लोकशाहीवर विश्वास होता. त्यांनी सतत भारताच्या ज्या संरक्षणाची व ऐक्याची काळजी घेतली, देशाच्या ऐक्यासाठीच प्राणाचे बलिदान केले. त्या देशाच्या लाडक्या नेत्या होत्या. त्यांच्या नंतर काँग्रेस कमिटीने एकमताने राजीव गांधीना पंतप्रधानपदासाठी पाठिंबा दिला व राजीव गांधी देशाचे पंतप्रधान झाले.

**१२.७.१ आपली प्रगती तपासा :**

१. १९८० ते १९८४ च्या काळातील महत्वाच्या घटनांची यादी करा.

## १२.८ सारंश

जनता सरकारच्या माध्यमातून पहिल्या बिगर कॉंग्रेस सरकारची स्थापना भारतामध्ये १९७७ ला झाली व कॉंग्रेसची मक्तेदारी मोडीत काढली त्यानंतर त्यांनी जवळजवळ ३ वर्षे सत्ता उपभोगली परंतु नंतर पुन्हा इंदिरा गांधीनीं आपल्या कर्तुत्वाच्या बळावर निवडणुका जिंकून १९८० ते १९८४ काळात चांगली कामगिरी केली व कॉंग्रेसची प्रतिष्ठा पुन्हा मिळवून दिली.

## १२.९ प्रश्न

१) जनता सरकारची कामगिरी स्पष्ट करा.

२) जनता सरकारच्या कामगिरी व अपयशाचे मूल्यमापन करा.

३) १९८० ते १९८४ या काळातील महत्वाचा घटनाचा वृत्तात दया.

❖❖❖❖

# १३

# स्वतंत्र भारताचे परराष्ट्रीय धोरण १९४७-१९८४

**प्रकरण रुपरेषा :**

१३.० उद्दिष्टे
१३.१ प्रस्तावना
१३.२ परराष्ट्र धोरणाची तत्त्वे
१३.३ अलिप्ततावादी चळवळ
१३.४ भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध
१३.५ भारत अमेरिका संबंध
१३.६ भारत-रशिया संबंध
१३.७ सारांश
१३.८ प्रश्न

## १३.० उद्दिष्टे

१) परराष्ट्र धोरणाची मूलतत्त्वे समजून घेणे.
२) भारताचे शेजारील राष्ट्रांशी असलेले संबंधाचा अभ्यास करणे.
३) भारताचे अमेरिका आणि रशिया यांच्याशी असलेल्या संबंधांचा आढावा घेणे.

## १३.१ प्रस्तावना

भारताच्या परराष्ट्र धोरणाने भारतीय स्वातंत्र्यानंतर आकार घेतलेला असला तरी देशाचे परराष्ट्र धोरण कसे असेल हे काँग्रेसने स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्य चळवळ सुरु असताना निश्चित केले होते. इ.स. १९३८ च्या काँग्रेस बैठकीत एका ठरावात स्पष्ट केले की, भारताचे ध्येय आपल्या शेजारी राष्ट्रांशी व अन्य राष्ट्रांशी मित्रत्वाचे संबंध ठेवणे हे आहे तसेच विश्वशांती ठेवून वंशवादाचा व साम्राज्यवादाचा धिक्कार करणे हे आहे. या ठरावाद्वारे भारताच्या परराष्ट्र धोरणावर प्रकाश पडतो.

भारताच्या परराष्ट्र धोरणावर पंडित जवाहरलाल नेहरुंचा प्रभाव दिसून येतो किंबहूना तेच हिंदूस्थानच्या परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार मानले जातात. आंतरराष्ट्रीय परिषदांच्या निमित्ताने अनेक देशांना भेटी देण्याचा त्याना योग आला. अनेक नेत्यांशी संबंध प्रस्थापित झाले. जागतिक राजकारणात स्वतंत्र भारताची भूमिका कशी राहणार याबद्दल त्यांच्या कल्पना स्पष्ट होत्या. १९२२-२३ पासून जगात चालू असलेल्या राष्ट्रीय चळवळींना शाब्दिक का होईना काँग्रेस पाठिंब्यांचे ठराव देत होते. आम्ही आशिया खंडात रहात आहोत आणि आशिया खंडातील लोक इतरांपेक्षा आम्हांला जवळचे आहेत. भारत व चीन यांच्या नेतृत्वाखाली आशियाई राष्ट्राचे ऐक्य प्रस्थापित झाल्यास जागतिक राजकारणात पाश्चिमात्यांना अनुकूल असलेले सत्तासंतुलन आशियाच्या बाजूने झुकू शकेल असा विश्वास नेहरुंना वाटत होता. स्वातंत्र्य जसे जवळ येऊ लागले तसे जागतिक राजकारणात भारताचा आवाज उठविण्याची गरज नेहरु सांगू लागले. भारताची प्राचीन परंपरा शांततेची व सहिष्णूतेची असल्याने परराष्ट्रांशी संबंध ठेवताना नेहरुंनी या नैतिक मूल्यांचा विसर पडू दिला नाही. १९४६ च्या नभोवाणीवरील भाषणात नेहरुंनी परराष्ट्र धोरणाची दिशा स्पष्ट केली. स्वतंत्र राष्ट्र म्हणून आम्ही आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागी होऊ. आमचे स्वतंत्र धोरण आम्ही अमलात आणू. दुसऱ्या देशाची गुलामगिरी आम्ही स्वीकारणार नाही. प्रत्येक राष्ट्राशी आम्ही स्वतंत्र संबंध ठेवू आणि शांततेच्या दृष्टीने प्रत्येक राष्ट्राशी आम्ही सहकार्य करु असे करतांना निरनिराळया गटांच्या सत्तेच्या राजकारणापासून आम्ही दूर राहू. वसाहतीतील प्रजेला स्वातंत्र्य मिळावे व सर्व वंशातील लोकांना समान संधी मिळावी असा आमचा प्रयत्न राहील. भारताचा आर्थिक व सामाजिक विकास झपाट्याने होण्याची गरज भारतीय नेत्यांना स्वातंत्र्य पूर्व काळापासून जाणवत होती. त्या संदर्भात भारताचा कल साम्राज्यवादाच्या विरोधात समाजवादाकडे झुकलेला होता.

## १३.२ परराष्ट्रीय धोरणाची तत्त्वे (उद्दिष्टे)

१) **प्रादेशिक अखंडतेचे रक्षण :** भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्वाचे व पहिले उद्दिष्ट म्हणजे देशाच्या प्रादेशिक अखंडतेचे रक्षण करणे. यासाठी शस्त्र बळावर अवलंबून राहण्याची आवश्यकता नाही असे नेहरुंचे मत होते. देशाची सुरक्षितता टिकविण्यासाठी लष्कराऐवजी शेजारील व परराष्ट्रांशी मैत्री संबंध निर्माण करणे हे परराष्ट्र धोरणाचे सूत्र होते. संरक्षणासाठी व आर्थिक विकासासाठी महत्व दिले पण त्याचबरोबर काही प्रमाणात संरक्षण सिध्दताही केली. देशाचे सैन्य उभारतांना या सैन्याचा उपयोग दुसऱ्यावर आक्रमण करण्यासाठी होणार नाही हे स्पष्ट केले. देशाच्या अखंडतेसाठी सरहद्दीवर शांततेची गरज नेहरुंना वाटत होती. म्हणूनच शस्त्रकपात घडवून आणणे, आंतरराष्ट्रीय तणाव नाहीसा करणे, शांतता टिकविणे यासाठी नेहरुंनी प्रयत्न केले.

२) **स्वयंनिर्णयाचा पुरस्कार :** सर्व वसाहतीतील लोकांना स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा असे नेहरुंना वाटत होते आणि त्याकरिता भारतीय परराष्ट्र धोरणात त्यांनी तसे उद्दिष्ट ठेवले. लोकांच्या विकासाकरिता शांतात आवश्यक होती. वांशिक, धार्मिक कोणतेही भेदाभेद लक्षात न घेता किंवा आर्थिक विकास कोणत्या मर्यादेपर्यंत झाला आहे याचा विचार न करता स्वातंत्र्याचा

मूलभूत अधिकार लोकांना देणे आवश्यक आहे असे नेहरुंचे मत होते. लोकांचे स्वातंत्र्य दडपणे म्हणजे 'स्वयंनिर्णयाचे तत्व दडपणे' असे नेहरुंना वाटत होते.

**३) आंतरराष्ट्रीय विवादाचा शांततापूर्ण मार्गानी निकाल लावणे :** भारताच्या परराष्ट्र धोरणाचे तिसरे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय विवाद हे शांततापूर्ण मार्गानी सोडविणे हे होत. 'तडजोड' या शब्दावर जोर देण्याऐवजी 'शांततापूर्ण तडजोड' या शब्दावर भर दिला गेला. नेहरुंच्या शब्दात सांगावयाचे झाल्यास आधुनिक जगात आंतरराष्ट्रीय विवाद हे विविध राष्ट्रीय कुस्त्यांचे फड लावून सोडविता येत नाहीत, चूक करणाऱ्याला आपण आपल्या शांततापूर्ण तत्वाचा पुरस्कार करुन प्रतिपक्षावर मात केली पाहिजे.

**४) संयुक्त राष्ट्र संघटनेला भारताचा पाठिंबा :** भारताने सतत शांततेचे धोरण अवलंबल्यामुळे त्याचा संयुक्त राष्ट्रसंघाला नेहमीच पाठिंबा असे. जागतिक प्रश्न हे शांततापूर्ण मार्गांनीच चर्चा करुन सोडवावेत असे भारताचे मत होते. आणि म्हणून संयुक्त राष्ट्रसंघावर त्याचा गाढ विश्वास होता. संयुक्त राष्ट्रसंघाला बाजूला सारुन कोणतेही प्रश्न सोडविता येणार नाहीत असे नेहरुंचे मत होते. म्हणून त्यांनी सदैव संयुक्त राष्ट्रसंघाच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारात संघटनेला पाठिंबा दिला.

**५) देशाचा आर्थिक विकास साधणे :** देशाची आर्थिक प्रगती साध्य करुन घेण्यासाठी नेहरुंनी परराष्ट्र धोरणाचा उपयोग करुन घेण्याचे ठरविले. स्वातंत्र्य व लोकशाहीवर त्यांचा प्रचंड विश्वास होता. लोकशाही स्थिर व यशस्वी होण्यासाठी बळकट समाज व अर्थव्यवस्था असणे महत्वाचे होते. त्याकरित्या आर्थिकदृष्ट्या दुबळया व औदयोगिकदृष्ट्या अत्यंत मागास अवस्थेत असलेल्या भारताला आर्थिक नियोजनाच्या सफलतेसाठी प्रगत व संपन्न राष्ट्राकडून भांडवल, यंत्रसामग्री व तंत्रज्ञान याची मदत मिळणे गरजेचे होते. या मदतीसाठी भारताचे जगातील भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही राष्ट्रांशी मैत्रीसंबंध टिकवणे, सहकार्य प्रस्थापित करणे हे भारताच्या परराष्ट्रनितीचे उद्देश होते.

**६) साम्राज्य व वसाहतवादाला विरोध :** सम्राज्यवाद किंवा वसाहतवादाच्या वरवंट्याखाली केवळ भारत नव्हे तर आशिया व आफ्रिका खंडातील राष्ट्रेही भरडली जात होती त्यामुळे त्या राष्ट्रांबद्दल बोलतांना नेहरु म्हणाले की, आशिया खंडातील आम्ही लोक पाश्चिमात्य साम्राज्यवादाने पिडीत आहोत त्याचे चटके आम्हाला जितके बसले आहेत तेवढे इतर कोणाला बसले नाहीत म्हणून स्वतंत्र होताच या वसाहतवादाविरुध्द व साम्राज्यवादाविरुध्द आम्ही आवाज उठवित आहोत. या प्रत्येक वसाहतीला स्वातंत्र्याचा अधिकार आहे. त्यांच्या स्वातंत्र्याला आमचा पाठिंबा आहे.

या धोरणाला अनुसरुन भारताने प्रथम इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला व हॉलंडविरुध्द आवाज उठविला. भारताच्या पुढाकारामुळे लिबियाला स्वातंत्र्य मिळाले. अल्जेरियाच्या स्वातंत्र्याचाही भारताने पुरस्कार केला.

**७) वंशभेदाला विरोध :** साम्राज्यावादाप्रमाणेच वंशभेदाचा फटका भारताला बसला होता. शेकडो वर्षे भारतीयांनी काळा-गोरा भेद सहन केला. आशिया व आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रात युरोपियांनी मोठ्या प्रमाणात वंशभेदाच्या आधारावर अत्याचार केले होते. वाशिंक समतेचे तत्व आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झालेले असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र वंश व वर्णभेदावरुन अनेक राष्ट्रांत जुलूम, दडपशाही सुरु होती. वांशिक समता हा मानवाचा मुलभूत अधिकार आहे असा नेहरुंचा विश्वास होता. वंशभेदामुळे संघर्षाची व युध्दाची भावना बळावेल असे त्यांना वाटत होते. त्यामुळेच भारताने परराष्ट्र धोरणात कोणत्याही प्रकारच्या वंशभेदाला, वर्णभेदाला विरोध करण्याचे उद्दिष्ट अंमलात आणले त्याचा भारताने निषेध केला एवढेच नव्हे तर दक्षिण आफ्रिका राज्यसंघातील आपले इंडियन हायकमिशनरचे कार्यालय १९५४ मध्ये बंद केले.

**८) तटस्थता :** भारत स्वतंत्र झाला तेव्हा जगात दोन गट एकमेकांविरुध्द उभे राहिलेले होते. अमेरिकेचा 'भांडवलशाही गट' आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी जगातील राष्ट्रांना आपल्याकडे ओढत होता तर रशिया साम्यवादी विचारसरणीचा प्रसार करीत होता. भारताने यापैकी कोणत्याही गटात प्रवेश करुन बाहुले बनण्यापेक्षा तटस्थतेचा स्विकार केला. तसेच जगात 'तटस्थ राष्ट्रांची' संख्या वाढवून जगात 'तिसरा गट' निर्माण केला. अमेरिका व रशिया यांच्या गटात जायचे नसेल तरी त्यांच्याशी मैत्रीसंबंध ठेवून त्यांच्याकडून योग्य ती मदत मिळवून देशाचा विकास करणे तसेच 'तटस्थता म्हणजे निष्क्रीयता किंवा अलिप्तता असा अर्थ नसून आंतरराष्ट्रीय शांततापूर्ण सह जिवनाची वाढ व्हावी म्हणून केला गेलेला प्रयत्न होय.'

**९) परदेशातील भारतीयांचे हितसंबंध जोपासणे :** आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या खंडातील निरनिराळया देशात लाखो भारतीय स्थायीक झालेले होते. १९ व्या शतकात आर्थिक कारणाकरिता ते भारतातून परदेशी गेले होते, ज्या देशात ते स्थायिक झाले त्या ठिकाणच्या सरकारकडून त्यांच्यावर अन्याय झाल्यास, नागरिकत्वाचे हक्क न मिळाल्यास ते भारतीय सरकारकडे मदतीचे आवाहन करीत असत. दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदावरुन भारतीयांवर जूलूम होत होते तर श्रीलंकेमध्ये भारतीयांना राजकीय व नागरिकत्वाचे हक्क मिळत नव्हते. त्यामुळे परदेशातील भारतीयांना शक्य तेवढी मदत करावी हे भारताचे धोरण होते परंतु तसे करताना त्या राष्ट्राच्या हितसंबंधांना धक्का लागणार नाही याची काळजी घेणे सरकारला भाग होते. विविध देशात राहणाऱ्या भारतीयांना तेथील नागरिकत्वांचे हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे किंवा त्या देशातील इतर परकीयांना मिळणाऱ्या सवलती तेथे स्थायिक झालेल्या भारतीयांना मिळाल्या पाहिजेत, त्याबाबत भेदभाव होता कामा नये. परदेशातील भारतीयांना तेथील नागरिकांशी बंधूभावाने व सहकार्याने रहावे याची त्यांना प्रेरणा देणे ही भारत सरकारची भूमिका होती.

**१०) आंतरराष्ट्रीय शांतता व सहकार्य :** भारताने अहिंसा व शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवले होते जागतिक महायुध्दात भारतीयांनी हुकुमशाही राष्ट्रांना किंवा आक्रमक राष्ट्रांना विरोध करुन इंग्लंड-अमेरिकेला मदत केली होती म्हणूनच स्वातंत्र्यानंतर भारताने आंतरराष्ट्रीय शांततेवर भर दिला. हे परराष्ट्र धोरणाचे तत्व आजतागायत सुरु आहे. जागतिक शांततेचा

फायदा अविकसित व विकसनशील राष्ट्रांना होऊन त्यांची प्रगती घडून येईल, अणुयुगाचा काळ सुरु झाल्यामुळे युध्द झाल्यास सर्वनाश घडून येईल अशी भारताची भूमिका होती. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुध्दाला प्रारंभ झाला. अमेरिका व रशिया या दोन्ही राष्ट्रांनी नाटो, वार्सा सारखे लष्करी करार करुन आपले शक्तीशाली गट निर्माण केले. भारताने वेळोवेळी या करारांवर टिका केली व त्यात सामिल होण्यास नकार दिला, समस्यांचे निराकरण अशा प्रकारच्या लष्करी सामर्थ्याने होऊ शकत नाही उलट अशा शक्ती प्रदर्शनाने आंतरराष्ट्रीय शांतता धोक्यात येऊन युध्दाची शक्यता वाढते असे भारताचे मत होते.

### १३.२.१ आपली प्रगती तपासा :

१. भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्वे सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १३.३अलिप्ततावादी चळवळ (NAM-NON ALIGN MOVEMENT)

**१३.३.१ चळवळीचा उदय :** दुसऱ्या महायुध्दानंतर संपूर्ण जग भांडवलशाही व समाजवादी अशा दोन परस्परविरोधी गटात विभागले गेले. नव्याने स्वतंत्र होत असलेल्या राष्ट्रांना या दोघांपैकी कोणत्या तरी गटात सामील होणे क्रमप्राप्त होते व तसे प्रयत्न अमेरिका-रशियाने चालविले होते. परंतु भारताबाबत तसे घडले नाही. स्वंतत्र भारताने कोणत्याही गटात सामील न होता अलिप्त राहण्याचे ठरविले. भारताचे अनुकरण अनेक नवस्वतंत्र राष्ट्रांची केले व अशा राष्ट्रांनी संख्या व त्यांची एकूण लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने जगाला त्यांची दखल घेणे भाग पाडले. आज शंभरपेक्षा अधिक देश अलिप्तता चळवळीत सहभागी आहेत. भारताच्या प्रयत्नामुळेच ही चळवळ जगात वाढली व वाढत आहे म्हणून या चळवळीचे नेतृत्व भारताकडे आलेले आहे.

**१३.३.२ अलिप्तता चळवळीचा अर्थ व स्वरुप :** पश्चिमात्य भांडवलशाही किंवा समजावादी गटाशी स्वतःला लष्करी कराराने बांधून न घेणे म्हणजे अलिप्तता होय. कोणत्याही बड्या राष्ट्राच्या हातातील बाहूले बनून न राहणे, बड्या राष्ट्रांच्या हेव्यादाव्यात किंवा शत्रुत्वात अडकून न पडणे, आंधळेपणाने व नाईलाजाने कोणत्याही राष्ट्रगटाच्या पावलावर पाऊल टाकून न चालणे, कोणत्या प्रसंगी कशी भूमिका घ्यायची याचा निर्णय स्वतंत्रपणे करण्याचा अधिकार अबाधित राखणे या गोष्टी नेहरुंना महत्वाच्या वाटत होत्या. जर एखाद्या राष्ट्रगटाशी बांधले गेलो तर त्या राष्ट्रगटाचे दडपण आपल्या राष्ट्रावर येऊन त्याचा वाईट परिणाम देशाच्या राजकीय स्वातंत्र्यावर होईल याची त्यांना खात्री होती. म्हणूनच या गटांपासून अलिप्त राहण्याचा भारताने निर्णय घेतला.

शीतयुध्दातील कोणत्याही राष्ट्रगटात भारत सामील होणार नाही एवढ्याच अर्थाने भारताने अलिप्तता या शब्दाचा वापर केला आहे. जगातील कोणत्याही घडामोडींशी भारत संबंध ठेवणार नाही असा अलिप्ततेचा अर्थ नव्हता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने सर्व स्वतंत्र राष्ट्रांशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. संयुक्त राष्ट्रसंघाचे भारत हे एक उत्साही राष्ट्र आहे. राष्ट्रकुलाचे सदस्यत्वही भारताने स्वीकारले आहे. तसेच आफ्रो-आशियाई संघटनात भारत मोलाची कामगिरी बजावत आहे त्यावरुन भारताची असंलग्नता म्हणचे संपूर्ण अलिप्तता नव्हे हे सिध्द होते. अमेरिकेतील एका भाषणात नेहरु म्हणाले, "ज्यावेळी स्वातंत्र्याला धोका निर्माण होईल. न्यायाची पायमल्ली होईल किंवा आक्रमण झालेले असेल त्या प्रसंगी आम्ही तटस्थ राहू शकणार नाही व राहणार नाही. यावरुन अलिप्तता म्हणजे दुर्बलता नाही हे भारताने स्पष्ट केलेले आहे.

**१३.३.३ अलिप्त राष्ट्रगटाची उभारणी :** अलिप्तवादी चळवळीला खरा वेग आला तो १९५० नंतर झालेल्या कोरियन युध्दामुळे. भारत, युगोस्लाविया व इजिप्त या तीनही राष्ट्रांनी कोरिया प्रश्नाबाबत समान भूमिका घेतल्याने ही राष्ट्रे अलिप्ततेच्या मुद्यावर त्यांच्या गटात नव्याने स्वतंत्र झालेली बहुसंख्य राष्ट्रे सामील झाली. जास्तीत जास्त राष्ट्रांनी अलिप्त राहावे, लष्करी करारात त्यांनी स्वतःला गुंतवून घेऊ नये असे आवाहन भारताने वेळोवेळी केले पण त्यासाठी कोणावर दडपण आणले नाही. यामागे जगात शांततेचे क्षेत्र विस्तारित व्हावे, तणाव कमी व्हावा, शस्त्रकपात, वर्णवंशभेद, वसाहतवाद यांचे निर्मूलन व्हावे ही अपेक्षा होती.

तटस्थ राष्ट्रांचे नेतृत्व भारताकडे यावे यासाठी प्रथम आशियाई व अरब राष्ट्रांनी पाठिंबा दिला. १९४८ मध्ये युगोस्लावियाचे अध्यक्ष मार्शल जोसेफ टीटो यांचे रशियाशी मतभेद झाले व ते अलिप्ततेकडे वळले. १९५४ मध्ये टीटोंनी भारताला भेट दिली. नेहरु व टीटो यांनी दिलेल्या संयुक्त निवेदनात अलिप्तता म्हणजे निष्क्रीय तटस्थता नव्हे तर जागतिक शांतता टिकविण्याच्या उद्दिष्टाने राबविण्यात येत असलेली गतीमान व विधायक निती आहे असे म्हटले. १९५५ मध्ये नेहरुंनीही युगोस्लावियाला भेट दिली. नेहरुंनी इजिप्तचे शासक अब्दुल गमाल नासेर यांच्याशी संपर्क साधला १९५६ मध्ये नेहरु, टीटो व नासेर यांची एकत्र बैठक युगोस्लसवियाच्या ब्रिओनी येथे झाली व तीन असंलग्न राष्ट्रांची युती दृढ झाली. १९५९ मध्ये टीटो यांनी भारताला भेट दिली. चीनचा धोका या दोन्ही राष्ट्रांना वाटत असल्याने त्यांनी शांततामय सहजीवनावर भर दिला. १९६१ मध्ये बेलग्रेड येथे अलिप्त राष्ट्रांची परिषद आयोजित केली गेली. या परिषदेत घाना, क्युबा, अल्जेरिया, इथिओपिया, अफगाणिस्तान या राष्ट्रांना अलिप्त चळवळीत सामावून घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. तसेच या राष्ट्रांनी स्वतंत्र निती निश्चित करणे, इतर देशातील स्वातंत्र्य चळवळीना पाठिंबा देणे, लष्करी करारात गुंतवून न घेणे, आपल्या भूमिवर परराष्ट्रास लष्करी तळ उभारण्यास परवानगी न देणे हे निर्णय घेतले गेले.

**१३.३.४ अलिप्त राष्ट्रगटाला आंतरराष्ट्रीय मान्यता :** भारताच्या अलिप्त धोरणाबद्दल सुरुवातीला अमेरिका, रशियाने संशय व नापसंती व्यक्त केली होती. भारतासारख्या लोकशाही राष्ट्राने साम्यवादाला विरोध करुन आपल्या गटात सामील व्हावे असे अमेरिकेला वाटत होते.

रशियालाही भारतातील लोकशाहीमुळे ते पाश्चिमात्य राष्ट्रांच्या गटात सामील होईल असा संशय वाटत होता पण असे काहीही न होता भारताने अलिप्तता चळवळीवरच भर दिला व अलिप्त राष्ट्रांचा गट प्रबळ बनत गेला. अलिप्त राष्ट्रगटाच्या कार्याची दखल संपूर्ण जगाने घेतली. १९६० पर्यंत भारताने अलिप्तता चळवळीवरच भर दिला व अलिप्त राष्ट्राचा गट प्रबळ बनत गेला. अलिप्त राष्ट्रगटाच्या कार्याची दखल संपूर्ण जगाने घेतली. १९६० पर्यंत भारताच्या अलिप्तता चळवळीला रशियाकडून मान्यता मिळाली तर १९६१ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष जॉन केनेडी यांनीही या धोरणाला मान्यता दिली. त्यामुळे अलिप्त चळवळीला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाल्याचे निश्चित झाले. याचा चांगला परिणाम म्हणजे या चळवळीचे क्षेत्र विस्तारले. १९६१ मध्ये या गटात २५ राष्ट्रे होती. ही संख्या १९६४ मध्ये ४७ झाली व १९८० नंतर ही संख्या १०० पेक्षाही अधिक झाली.

### १३.३.५ पंचशील धोरण :-

नेहरुंनी आपल्या परराष्ट्र धोरणात व अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीत शांततापूर्ण सहजीवनावर मोठ्या प्रमाणावर भर दिला. त्यातूनच पंचशील धोरणाने आकार घेतला. या धोरणाचा उगम २९ एप्रिल १९५४ रोजी तिबेटसंदर्भात भारत व चीन यांच्यात झालेल्या करार प्रसंगी झाला. यावेळी नेहरुंनी पाच तत्वांचा पुरस्कार केला. त्यांनाच 'पंचशील' असे म्हटले जाते. त्यात पुढील तत्वे होती.

१) परस्परांच्या सार्वभौमत्वाचा व प्रादेशिक अखंडतेचा सन्मान राखणे.
२) परस्परांवर आक्रमण न करणे.
३) परस्परांच्या अंतर्गत राज्यकारभारात हस्तक्षेप न करणे.
४) समानतेचे व परस्पर कल्याणाचे धोरण अंमलात आणणे.
५) शांततामय सहजिवनाला मान्यता देणे.

पंचशील धोरणाला ऑक्टोबर १९५४ मध्ये व्हिएतनामचे अध्यक्ष हो-चि-मिन्ह यांनी मान्यता दिली तर १९५५ मध्ये युगोस्लोवियाने मान्यता दिली. यानंतर चीन, ब्रम्हदेश, लाओस, नेपाळ, कंबोडिया या राष्ट्रांनी पाठिंबा जाहीर केला. एप्रिल १९५५ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या आशियाई राष्ट्रांच्या परिषदेला २०० प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत सर्वांनी पंचशील मान्य केले. त्यानंतर बांडूंग येथे भरलेल्या आफ्रो-आशियाई राष्ट्रांच्या परिषदेत मूलभूत मानवी हक्कांचा सन्मान व आंतरराष्ट्रीय मतभेद शांततेच्या मार्गाने सोडविणे या दोन तत्वांची भर पंचशीलात टाकण्यात आली. १९५५ मध्ये पंचशील धोरणाला ऑस्ट्रेलिया, ऑस्ट्रिया, पोलंड यां राष्ट्रांनी मान्यता दिली.

### १३.३.६ अलिप्त गटाचे कार्य :-

भारताच्या नेतृत्वाखाली निर्माण झालेल्या अलिप्त राष्ट्रगटाने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात निर्माण झालेल्या समस्यांमध्ये लक्ष घालून महत्वाचे कार्य केले. कोरिया संघर्षात उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर केलेला हल्ला या बाबत उत्तर कोरियाला आक्रमक ठरवून उत्तर कोरियाने आपल्या फौजा ३८ अक्षांशापलिकडे माघारी न्याव्यात या युनोच्या ठरावाला भारताने पाठींबा

दिला. परंतु त्यानंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली उत्तर कोरियावर आक्रमण करण्याचा ठराव केला गेला. याला भारताने प्रखर विरोध केला. जर अमेरिकन सैन्याने ३८ अक्षांश सीमारेषा ओलांडली तर चीनही युध्दात उतरेल अशी भिती निर्माण झाली. अमेरिकेने सुरक्षा समितीत चीनला आक्रमक ठरवणारा ठराव मांडला. त्यास भारताने विरोध केला. अखेर भारताच्या प्रयत्नांना यश येऊन १९५२ मध्ये युध्दबंदी घडून आली. युध्दकैदयांना परत पाठविण्यासाठी भारताच्या अध्यक्षतेखली तटस्थ राष्ट्राचे मंडळ स्थापन केले गेले. भारताने आपले सैन्य पाठवून ही जबाबदारी पार पाडली.

सुवेझ कालव्याच्या प्रश्नांवरुन इग्लंड व फ्रान्सने १९५६ मध्ये इजिप्तवर हल्ला केला त्यावेळी या आक्रमणाचा भारताने निषेध केला. रशियाने हंगेरीत हस्तक्षेप केला असता भारताने रशियाच्या या कृत्यावर नापसंती व्यक्त केली. संयुक्त राष्ट्रसंघाला मदत करण्यासाठी भारताने १९५६ मध्ये गाझापट्टीत व १९६१ मध्ये कांगोत आपले सैन्य पाठविले.

चीन हा साम्यवादी असल्याने त्याला संयुक्त राष्ट्रसंघात प्रतिनिधित्व मिळू नये असे अमेरिकेचे मत होते. याला भारताने विरोध करुन चीनला युनोत प्रतिनिधित्व देण्याची मागणी केली. त्यामुळे भारत-अमेरिका मतभेद वाढले पण भारताने तटस्थता धोरणासाठी त्याची पर्वा केली नाही. इंडोचायनातील आंदोलनाला भारताने पाठींबा दिला. अमेरिकेने इंडोचायनात फ्रेचांना लष्करी मदत दिली याचा भारताने व अलिप्त गटाने विरोध केला. अशाप्रकारे नेहरु युगात अलिप्ततावादी चळवळीची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली.

**१३.३.७ नेहरुयुगानंतरची अलिप्त चळवळ :**

इ.स. २७ मे १९६४ रोजी पंडीत नेहरुंचे निधन झाले. देशाचे प्रचंड नुकसान झाले. अनेक समस्यांनी घेरल्यामुळे तटस्थता चळवळीकडे काही प्रमाणात दुर्लक्ष झाले. १९७० पासून मात्र भारताच्या राजकारणात इंदिरा गांधी शक्तीशाली बनल्या व त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रीय सहभाग घेतल्याने अलिप्तता चळवळीत भारताचे महत्व कायम राहिले. १९८१ मध्ये नवी दिल्लीला अलिप्त राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्याची बैठक पार पडली. यावेळी भारताने विकसीत व विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक सहकार्याची गरज स्पष्ट केली. या काळात भारताने इराण-इराक युध्द थांबविण्याचा प्रयत्न केला. कम्पुंचियातून व्हिएतनामी लष्कर मागे घ्यावे, अफगाणमधून रशियन लष्कराने माघार घ्यावी तेथील परकीय हस्तक्षेप बंद व्हावा असा आग्रह धरला.

मार्च १९८३ मध्ये अलिप्त राष्ट्रांची सातवी परिषद नवी दिल्लीला भरविण्यात आली. या परिषदेत ९९ प्रतिनिधी उपस्थित होते. त्यापैकी ६० राष्ट्रप्रमुख होते. यावेळी अध्यक्षपद भारताकडे होते. इंदिरा गांधीनी या परिषदेत, विकसनशील देशांना विकसित राष्ट्रांनी मदत करणे म्हणजे भीक देणे नाही तर जगात न्याय, आर्थिक व्यवस्था प्रस्थापित करणे व हे त्यांच्याही हिताचे आहे असे स्पष्ट केले.

जानेवारी १९८५ मध्ये भारत, मेक्सिको, अर्जेंटिना, टांझानिया, ग्रीस व स्वीडन या सहा अलिप्त राष्ट्रांची शिखर परिषद नवी दिल्ली येथे भरली. इंदिरा गांधींच्या मृत्यूनंतर या गटाचे अध्यक्षपद राजीव गांधींकडे गेले. त्यांनीही अलिप्त चळवळ वाढविण्यासाठी प्रयत्न केले. भारतामुळे आजही ही चळवळ टिकून आहे व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात या चळवळीमुळे भारताचे स्थान उंचावले यात तीळमात्र शंका नाही.

**१३.३.८आपली प्रगती तपासा :**

१. अलिप्ततावादी चळवळीचे पंचशील धोरण कोणते आहे ?

## १३.४ भारताचे शेजारील राष्ट्रांशी संबंध :

**१३.४.१ भारत-पाकिस्तान संबंध :** इ.स. १९४७ मध्ये भारताची फाळणी होऊन जगाच्या नकाशावर भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे दाखविली गेली. तेव्हांपासून भारताच्या सरहद्दीवरचे हे राष्ट्र भारतासाठी तणावाचे कारण बनले. अनेक गोष्टीवरुन या दोन देशातील संबंध तणावाचेच राहिले. बॅ. जिनांनी स्वतंत्र पाकसाठी घडवून आणलेल्या दंगली भारतातील हिंदू कधीच विसरु शकत नव्हते. फाळणीच्यावेळी निर्वासीतांवर झालेले प्रचंड अत्याचार,पाकमधून हिंदूंची हकालपट्टा ,देशाची अनैसर्गिक फाळणी,मुस्लीम बहुसंख्या असलेले काश्मिर भारताला मिळाले या प्रसंगामुळे भारत-पाक शेजारी राष्ट्रे असूनही त्यांचे संबंध संघर्षमय राहिले. आशियात साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिकेने पाकला मदत देणे सुरु केले. त्यामुळे पाकचा भारतद्वेष आणखीनच वाढला.

भारताने नेहमी उदारमतवादी दृष्टीकोन दाखवला. पाकने काश्मीरवर आक्रमण केले असतानाही पाकशी व्यापार सुरु ठेवला. पाकमधून भारतात तंबाखू, ताग, धान्य, लोकर व भारतातून पाकमध्ये कोळसा, कापड, रबर, दोरखंड, पोलाद, साखर या वस्तू जात असत. नेहरु व लियाकत अली यांच्यात रेल्वेचे दळणवळण सुरु झाले. फाळणीनंतर सिंधू नदीच्या पाणीवाटपाचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा भारताने उदारदृष्टीने सिंधू, झेलम व चिनाब नदयांचे पाणी पाकला पुरवण्याचे वचन दिले. तसेच पाकच्या पाणीपुरवठा योजनेसाठी ८४ कोटी रुपये भारताने देण्याचे मान्य केले. तरीही पाकने भारताला कधीही आपला मित्र मानले नाही.

काश्मिर प्रश्न पाकने नेहमी प्रतिष्ठेचा बनवला व अमेरिकेच्या मदतीने संयुक्त राष्ट्रसंघात उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. १९५४ मध्ये अमेरिका-पाकिस्तान यांच्यात लष्करी करार झाला. तसेच १९५५ मध्ये पाकीस्तान अमेरिकन नेतृत्वाखाली मध्यवूर्वेत घडून आलेल्या

'बगदाद कराराचे' सदस्य बनले. भारताने काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे स्पष्ट सांगत हा प्रश्न युनोत नेण्यास नकार दिला. भारताच्या भूमिकेला रशियानेही पाठींबा दिला. १९५८ मध्ये पाकमध्ये जनरल अयुबखान यांची लष्करी राजवट निर्माण झाली. त्यांनी भारतविरोधी भूमिका घेतली. या काळात पाकला अमेरिकेची प्रचंड लष्करी मदत मिळाली व चीनशीही मैत्री झाली. १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केल्याने पाकला आनंद झाला. १९६२ मध्ये पाकने पाकव्यात काश्मीरचा दोन हजार चौरस मैलाचा प्रदेश चीनला देऊन टाकला. त्यामुळे भारताला चीनचा कायमस्वरुपी धोका निर्माण झाला.

१९६४ मध्ये नेहरुंचा मृत्यू झाला व शास्त्री पंतप्रधान झाले. पाकिस्तानला अमेरिकेची लष्करी मदत वाढली होती याचा फायदा घेऊन १९६५ मध्ये त्याने भारताविरुध्द युध्द पुकारले. या युध्दात पाकिस्तानचा दणदणीत पराभव झाला. २२ दिवस चाललेले हे युध्द युनोच्या मध्यस्थीने थांबले. १० जानेवारी १९६६ रोजी पाकिस्तानला ताश्कंद करार मान्य करावा लागला. भारताने या करारातही सलोख्याचे संबंध निर्माण करण्याचे प्रयत्न केले. या युध्दानंतरही पाकिस्तानने संघर्षाची भूमिका सोडली नाही. पूर्व पाक व पश्चिम पाकच्या वादात पाकिस्तानने पूर्व प्रांतावर प्रचंड अत्याचार केल्याने तेथील अनेक निर्वासीत भारतात आले व त्याना भारताने आश्रय दिला हे पाकला आवडले नाही. या प्रश्नावरुन पाकचे याहयाखान यांनी भारताविरुध्द १९७१ मध्ये युध्द जाहिर केले व या युध्दात पाकिस्तानचा दारुण पराभव झाला. पाकचा हा पराभव अत्यंत लाजीरवाणा होता. १९७२ मध्ये सिमला करार होऊन युध्द समाप्त झाले. पूर्व पाक आता बांगलादेश या नावाने स्वतंत्र झाले. या युध्दातून पाकची प्रचंड प्रादेशिक व आर्थिक हानी झाली. १९७४ नंतर भारत-पाक यांची सागरी व विमान वाहतूक सुरु झाली. १९७६ मध्ये राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.

१९७७ मध्ये भारतात  जनता सरकार सत्तेवर आले. त्यांनी पाकशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले. १९७८ मध्ये मोरारजी देसाईंनी जनरल झियांची भेट घेतली. १९८० मध्ये इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. अफगणिस्तानातील पेचप्रसंगामुळे निर्माण झालेल्या अफगाण-पाक भांडणात मध्यस्थी करण्याची भारताने तयारी दाखवली. १९८१ मध्ये भारताने पाकपुढे अनाक्रमणाचा प्रस्ताव मांडला त्यास पाकने फारसा प्रतिसाद दिला नाही. उलट पंजाब व काश्मीरमधील हिंसक कारवांयाना प्रोत्साहन दिले इंदिरा गांधीच्या हत्त्येनंतर राजीव गांधीनी दोन देशातील संबंध सुधारण्यावर भर दिला. पाकने मात्र काश्मीरमध्ये अतिरेक्यांना दिली जाणारी मदत बंद केली नाही. अशाप्रकारे भारत-पाकिस्तानमधील संबंध नेहमीच तणावाचे राहिले असे दिसून येते.

**१३.४.२ भारत-चीन संबंध :** भारताच्या शेजारील मोठे व प्रबळ राष्ट्र चीन आहे. भारताचे चीनशी प्राचीन काळापासून सांस्कृतिक संबंध होते त्यामुळे स्वातंत्र्यांनंतर पंडित नेहरु सरकारने चीनशी राजनैतीक संबंध प्रस्थापित केले. भारताचे चीनमधील राजदूत म्हणून के. एम. पण्णीकर यांची नेमणूक करण्यात आली. १९४९ मध्ये माओच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये साम्यवादी सरकार स्थापन झाले. भारताने या सरकारला लगेच राजनैतिक मान्यता दिली.

१९५० मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केल्याचा भारताने निषेध केल्याने चीनला भारताबद्दल संशय निर्माण झाला. पण भारताने नेहमी संयुक्त राष्ट्रसंघात चीनला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे, फोर्मोसा चीनकडे सोपविले पाहिजे असा आग्रह धरल्याने चीनला भारताबद्दल विश्वास वाटू लागला. पण तिबेट प्रश्नावरुन हे संबंध पुन्हा बिघडू लागले. १९५२ मध्ये तिबेटने चीनचे सार्वभौमत्व झुगारुन दलाई लामांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र सरकार स्थापन केलेले होते. १९५० मध्ये माओने तिबेटच्या मुक्ततेसाठी सैन्य पाठविले. या काळापर्यंत व्यापार, दळणवळण, सांस्कृतिक, घडामोडी याबाबत तिबेटवर भारताचा प्रभाव निर्माण झालेला होता. चीनच्या तिबेटवरील लष्करी कारवाईमुळे भारताला डोकेदुखी निर्माण झाली. चीनला प्रत्यक्ष न दुखावता तिबेटमधील भारताचे हक्क आबाधित ठेवण्याचा नेहरुंचा प्रयत्न होता. शेवटी चीनच्या ताकदीपुढे तिबेटला झुकावे लागले. १९५१ मध्ये चीन-तिबेट करार होऊन त्यात चीनचे सार्वभौमत्व मान्य केले गेले. भारताने या कराराला मान्यता दिली. १९५४ मध्ये भारत-चीन यांच्यात तिबेटबाबत करार होऊन पंचशील तत्त्वे मान्य करण्यात आली. १९५४ ते १९५७ या काळात चीनचे पंतप्रधान चौ-एन-लाय यांनी भारताला चार वेळा भेट दिली. १९५४ मध्ये नेहरुंनी चीनला भेट देऊन दोन देशांतील संबंध वृध्दिंगत करण्याचे प्रयत्न केले. गोवा मुक्ती प्रकरणात चीनने भारताला पाठींबा दिला.

याच दरम्यान चीनने चीनच्या नकाशात भारत-चीन सीमेवरील भारताचा ५० हजार चौरस मैलांचा प्रदेश चीनचा असल्याचे दाखविल्याने नेहरुंनी त्याबाबत तक्रार केली पण चीनने फारशी दखल घेतली नाही. १९५६ पासून चीनने तिबेटमध्ये प्रचंड अत्याचार सुरु केल्याने तिबेटी लोकांनी १९५९ मध्ये चीनविरुध्द उठाव केला. दलाई लामांनी भारतात आश्रय घेतला. हजारो तिबेटी निर्वासित भारतात आहेत हे चीनला आवडले नाही. चीनने मॅकमोहन रेषेचा भंग करुन भारतीय प्रदेशातून रस्ते तयार केले. १९६१ मध्ये भारताने नेफा व लडाख भारताचे भाग असल्याचे सिध्द केले. यातून तणाव वाढत जाऊन ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर अचानक आक्रमण केले व भारताच बराचसा प्रदेश गिळंकृत करुन एक महिन्यात एकतर्फी युध्दबंदी केली. या युध्दामुळे भारताचे प्रचंड नुकसान झाले. चीनने भारताचा विश्वासघात केला त्यामुळे दोन्ही देशात प्रचंड कटूता निर्माण झाली.

१९६२ च्या युध्दानंतरही भारत चीनशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचे प्रयत्न करीत होता व चीन मात्र भारतासाठी शत्रु निर्माण करीत होता. १९६५ मध्ये चीनने पाकिस्तानशी करार करुन त्यास युध्द साहित्याची मदत केली. १९७१ मध्ये भारत-रशिया यांच्यात झालेल्या करारावर टीका केली. १९७१ मध्ये झालेल्या भारत-पाक युध्दात पाकिस्तानाला पाठींबा दिला. पाकचे अध्यक्ष याहयाखान यांच्या मध्यस्थीने अमेरिकेशी मैत्री केली. भारतात अस्थिरता निर्माण करण्यासाठी नागालँड, मणीपूर व मिझोराम राज्यात असंतुष्ट गटांना भारताविरोधी सशस्त्र कारवायांसाठी शस्त्रास्त्रे पुरविली. तरीही भारताने चीनबाबत मैत्रीची भूमिका सोडली नाही.

जनता सरकारच्या काळात चीनचे एक शिष्टमंडळ भारतात आले. मोरारजी देसाईंनी आपल्या भाषणात सरहद्दीच्या वादाचा निकाल लागल्याशिवाय दोन देशात सलोखा निर्माण होणार नाही. भारत-चीन तणाव कमी करण्यासाठी १९७९ मध्ये भारताचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी चीनला भेट दिली व भारत विरोधी कारवाया करणाऱ्यांना चीनने मदत करु नये अशी विनंती केली.

१९८० नंतर इंदिरा गांधींनी हे संबंध पुन्हा सुधारण्याचे प्रयत्न केले. १९८१ च्या कानकून आंतरराष्ट्रीय परिषदेत चिनी नेत्यांशी बोलणी केली. इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्सने चीनला भेट दिली. राजीव गांधीनींही १९८८ मध्ये चीनला भेट दिली. आजही भारत सरकार चीनशी सलोख्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न करीत असले तरी सीमाप्रश्न सुटू शकलेला नाही हे तितकेच खरे आहे.

**१३.४.३ भारत व अफगाणिस्तान संबंध :**

भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये पाकिस्तानच्या सरहद्दीवर असलेले अफगाणिस्तान हे पठाण मुस्लिमांचे राष्ट्र भारताशी सदेव मैत्रीचे संबंध ठेवून होते. मुस्लिम राष्ट्र असूनही त्यांनी पाकिस्तानाला भारताविरुध्द सहकार्य केले नाही. उलट भारताच्या अलिप्त चळवळीला पाठिंबा दिला. १९५० मध्ये भारत-अफगाणिस्तानमध्ये पहिला मैत्री करार घडून आला. १९५८ पासून या मैत्री संबंधाला अधिक चलना मिळाली. १९५८ मध्ये अफगाणचे राजे महमद झहीर शहा हे भारतात १५ दिवसांच्या भेटीवर आले व १९५९ मध्ये नेहरुंनी अफगाणिस्तानला भेट दिली.

१९५५ नंतर अफगाण-पाक संबंधात तणाव निर्माण झाल्याने अफगाणिस्तानने इराण, रशिया व चीनशीही संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. १९६० मध्ये चीनबरोबरच मैत्रीचा व अनाक्रमणाचा करार केला पण भारताशी संबंध बिघडू दिले नाहीत. १९६५ मध्ये अफगाण प्रधानमंत्री डॉ.मोहम्मद यूसूफ व भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यात चर्चा होऊन निरनिराळया क्षेत्रात एकमेकांना सहकार्य देण्याचे ठरले.

१९६६ मध्ये भारताचे उपराष्ट्रपती डॉ.झाकीर हुसेन यांनी काबूलला भेट दिली. १९६९ मध्ये दोन्ही देशांत दीर्घकालीन व्यापारी करार झाला. पण त्यात भारताने हस्तक्षेप केला नाही. १९७७ मध्ये तेथे उठाव होऊन तराकी यांचे सरकार स्थापन झाले. यावेळी भारताचे परराष्ट्रमंत्री वाजपेयींनी अफगाणिस्तान बरोबर सलोखा निर्माण केला. १९७९ मध्ये पुन्हा उठाव होऊन बब्राक कर्माल यांची सत्ता निर्माण झाली. त्यांनी लगेच रशियाला लष्करी मदतीचे आवाहन केले त्यामुळे रशियन लष्कर अफगाणमध्ये घुसले व बब्राक कर्मालच्या विरोधकांना दडपून टाकू लागले. यावर अमेरिका, चीनने टीका केली. पण त्या घटनामुळे भारताच्या सीमेवर अशांतता निर्माण झाली. रशियाचा लष्करी हस्तक्षेप म्हणजे भारताच्या पंचशील तत्वांचा भंग होता. इंदिरा गांधींनी रशियाला मैत्रीच्या नात्याने अफगाणमधून सैन्य काढून घेण्यास सांगितले व अमेरिकेलाही हस्तक्षेप बंद करण्यास सांगितले. रशियाने गोर्बाचेव्ह यांच्या काळात अफगाणमधील लष्कर मागे घेतले. अशाप्रकारे इंदिरा गांधींनी आपल्या मुत्सद्दीपणामुळे अफगाणिस्तानाबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**१३.४.४ भारत-नेपाळ संबंध :**

भारताला लागून असलेले स्वतंत्र राष्ट्र म्हणजे नेपाळ. नेपाळ हे रशिया व चीनमधील आघातप्रतिबंधक राष्ट्र होते. भारत व चीन यांच्यातील संबंध संघर्षमय असल्याने नेपाळ चीनच्या वर्चस्वाखाली जाऊ नये यासाठी भारत प्रयत्नशील होता. ३१ जुलै १९५० रोजी भारत-नेपाळ

यांच्यात मैत्रीचा व शांतता करार झाला. औदयोगिक व आर्थिक विकासासाठी दोन्ही राष्ट्रांनी परस्परांना विशेष सवलती देण्याचे मान्य केले. नेपाळवर कोणीही आक्रमण केल्यास ते भारत सहन करणार नाही असे नेहरुंनी जाहीर केले. भारताने आपली लष्करी दले पाठवून नेपाळी सुरक्षा दलांना प्रशिक्षण दिले. नेपाळ-तिबेट सीमेवर हेरखात्यातील अधिकारी नियुक्त केले. अशाप्रकारे नेपाळवर भारताचा प्रभाव वाढलेला होता.

१९५४ मध्ये नेपाळची राजधानी काठमांडू येथे नेपाळच्या पहिल्या विमानतळाची उभारणी भारतीय अभियंत्यांनी पूर्ण केली. १९५५ मध्ये राजे त्रिभूवन यांचे निधन होऊन त्यांचे पुत्र महेंद्र नेपाळच्या गादीवर आले. त्यांनी चीनशी राजकीय व आर्थिक करार केल्याने भारताने नेपाळच्या पहिल्या पंचवार्षिक व दूसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठी १९६५ या काळात भरघोस मदत केली. त्यामध्ये जलसिंचन, आरोग्य, दळणवळण अशा योजनांचा अंतर्भाव होता. भारतीय प्रदेशावर कोणत्याही नियंत्रणाखाली माल आयात करण्याची व जकात कर न देता भारताला माल निर्यात करण्याची मुभा नेपाळला देण्यात आली. असे असतानाही १९६० पासून नेपाळने आर्थिक व व्यापारी प्रगतीसाठी भारतावर अवलंबून न राहता चीनशी करार केला व पाकिस्तानची मदत घेतली. १९६० मध्ये नेपाळमधील लोकनिर्वाचित मंत्री कोईराला यांना अटक करुन नेपाळ नरेशाने नेपाळी काँग्रेसवर बंदी घातली व लोकशाही चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. भारत-पाक युध्दात नेपाळाने तटस्थ भूमिका घेतली. सिक्किमच्या भारतात झालेल्या विलीनीकरणावर मात्र प्रखर टीका केली. या गोष्टी भारताला अस्वस्थ करणाऱ्या ठरल्या.

१९७२ मध्ये राजे महेंद्र यांचे निधन होऊन राजे विरेंद्र राजपदावर आले. त्यांच्या काळात भारत-नेपाळमधील तणाव कमी होऊ लागला. १९७७ रोजी मोरारजी देसाईंनी राजे विरेंद्र यांची भेट घेवून नवा करार केला. याचकाळात नेपाळमध्ये लोकशाहीची मागणी होऊ लागली. त्यातून हिंसक घटना, बाँबस्फोट होऊ लागले. नेपाळ दक्षिण आशियाई राष्ट्रांच्या प्रादेशिक सहकार्य संघटनेत सार्क सामील झाला. या संघटनेचे कार्यालय काठमांडूला स्थापन झाले. १९८६-८७ मध्ये पुन्हा भारत-नेपाळ यांच्यात तणाव वाढला. भारत-नेपाळ यांच्यात तणाव निर्माण करण्यासाठी भारताचे शत्रूदेश अधिक प्रयत्न करीत होते. सध्या नेपाळमध्ये माओवादी गटाने हिंसक कारवाया वाढविलेल्या दिसतात. भारत आजही नेपाळ बरोबरील मैत्री संबंध दृढ करण्याचेच प्रयत्न करीत आहे.

### १३.४.५ भारत-भूतान संबंध :

हिमालयाच्या कुशीत व भारताच्या उत्तर सिमेवर वसलेले भूतान हे लहानसे राष्ट्रही भारतासाठी महत्त्वाचे होते. १९४९ मध्ये भूतानने भारताशी मैत्री करार केला होता. १९५८ मध्ये नेहरुंनी भूतानला भेट दिली व भूतानच्या आर्थिक विकासावर तेथील महाराजांशी चर्चा केली. चीनच्या आक्रमक हालचालीमुळे भूतान स्वसंरक्षणासाठी भारताकडे वळले. भूतानमध्ये राजकीय स्थैर्य हे आर्थिक स्थैर्यावर अवलंबून असल्याने नेहरुंनी भूतानाचे प्रधानमंत्री दोर्जी यांना मदत करण्याचे आश्वासन दिले. त्यानुसार रस्तेबांधणीसाठी १५ कोटी रुपये मंजूर केले.

१९६५ मध्ये भूतानचे महाराज व लालबहादूर शास्त्री यांची कलकता येथे भेट होऊन भूतानच्या आर्थिक विकासावर भर देण्यात आला.

१९६४ मध्ये भूतानचे पंतप्रधान दोर्जी यांची हत्या झाली. १९६५ मध्ये महाराजांवरदेखील हल्ला झाला त्यामुळे तणाव निर्माण झाला. १९६९ मध्ये भूतानच्या राजाने लोकशाही तत्वावर राजकीय सुधारणा घडवून आणल्याने त्यांस जनतेचा पाठिंबा मिळाला. भारताने भूतानला युनोचे सदस्यत्व मिळवून देण्यासाठी १९७१ मध्ये प्रयत्न केले. १९८३ मध्ये व्यापारी करार होऊन दोन्ही देशात होऊन मुक्त व्यापारी करार करण्याची परवानगी भूतानला भारताने दिली. १९८५ मध्ये पंतप्रधान राजीव गांधीनी भूतानला भेट दिली. अशाप्रकारे भूतान हे भौगोलिकदृष्ट्या छोटे राष्ट्र असले तरी भारताने भूतानबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

### १३.४.६ भारत-बांग्लादेश संबंध :

पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान यांच्यातील संघर्षात भारत ओढला गेला व भारत-पाक युध्द होऊन पाकचा पराभव झाला. पूर्व पाकिस्तान 'बांग्लादेश' या नावाने १९७१ मध्ये स्वतंत्र झाला. शेख मुजीबूर रेहमान यांच्या नेतृत्वाखाली बांग्लादेशात लोकशाही सरकार निर्माण झाले. बांग्लादेशाची निर्मिती ही भारताच्या मदतीमुळेच झालेली असल्याने दोन्ही देशात मैत्रीचे व जिव्हाळयाचे संबंध निर्माण झाले. परंतू हे संबंध शेख मुजीबूर हयात असे पर्यंतच टिकले. १९७५ मध्ये त्यांची हत्या झाल्याने बांग्लादेशात अस्थैर्य निर्माण झाले. याचा फायदा घेऊन पाकिस्तानने असंतूष्ट गटांना हाताशी धरुन भारतविरोधी भावनेचा प्रसार केला.

भारत-बांग्ला मधील गंगा नदीच्या पाण्याचे वाटप, नागा व मिझो बंडखोरांना बांग्लादेशाकडून मिळणारी मदत, बांग्ला निर्वासींताचा प्रश्न या वादग्रस्त समस्या निर्माण झाल्या. १९७८ मध्ये मोरारजी देसाईनी बांग्ला देशाला भेट दिली. १९८२ मध्ये बांग्ला देशात जनरल ईर्शाद यांची लष्करी राजवट सुरू झाली. भारताने या सरकारला आर्थिक सहकार्य देण्याची घोषणा केली. १९८५ मध्ये बांग्लादेशात आलेल्या महापूराने प्रचंड प्राणहानी व वित्तहानी झाली. राजीव गांधींनी बांग्लादेशला सर्व प्रकारची मदत देवू केली. बांग्लादेशांनी सार्क संघटनेचे सदस्यत्व स्विकारल्याने भारताशी मैत्रीचे संबंध निर्माण झाले असले तरी पाकिस्तान कडून आजही बांग्लादेशात भारत विरोधी प्रचार केला जात असल्याने अधून-मधून कटकटी निर्माण होतात. बांग्लादेशातून अनेक घूसखोर बेकायदेशीररित्या भारतात राहत असल्याने संघर्ष निर्माण होताना दिसतो.

### १३.४.७ भारत म्यानमार संबंध (ब्रम्हदेश):

भारताच्या पूर्वेला असलेला म्यानमार ब्रिटीशांच्या नियंत्रणातून ४ जानेवारी १९४८ रोजी स्वतंत्र झाला व उनू हे पंतप्रधान बनले. नेहरुंनी १९५१ मध्ये उनू सरकारशी शांतता व मैत्रीचा व्यापारी करार केला. चीन मध्ये निर्माण झालेल्या साम्यवादी शासनाचा धोका म्यानमारला असल्याने भारताने म्यानमारला सर्व प्रकारची मदत केली. १९५७ मध्ये आर्थिक संकटावर मात करण्यासाठी ३० कोटी रु. कर्ज भारताने मंजूर केले.

१९६२ मध्ये म्यानमारात सत्तापालट होऊन जनरल नवीन यांच्या हाती सत्ता आली. या राजवटीला भारताने मान्यता दिली. नवीन यांनी १९६५ मध्ये एक आठवड्याचा भारतदौरा करुन सलोख्याचे संबंध निमार्ण केले. १९६६ च्या अखेरीस पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींनी ब्रम्हदेशाला भेट दिली. ब्रम्हदेशाने अलिप्त गटाचेही सदस्यत्व स्वीकारले होते. या देशातून भारतात मोठ्या प्रमाणावर तांदूळ आयात होत होता व भारतातून सूती कापड, तेल, लोंखंड-पोलाद उपकरणे, विदुयत उपकरणे, शिवणयंत्रे, सायकली निर्यात होत. याच काळात उभय देशात सीमावाद निर्माण झाला. चीनच्या मदतीने नागा व मिझो बंडखोर ब्रम्हदेशात आश्रय मिळवून भारतात कारवाया करीत होते हे लक्षात येताच इंदिरा गांधींनी १९६९ मध्ये म्यानमारला भेट देऊन सामंजस्याचा करार केला. त्यानुसार म्यानमारने भारतीय व परकीय नागरिकात्वाचे अधिकार देण्याचे मान्य केले. नागा व मिझो बंडखोरांना संयुक्त सीमा व्यवस्था करण्याचे मान्य केले. १९८० मध्ये म्यानमारच्या अध्यक्षांनी भारताला भेट दिली व भारताची विविध प्रकल्पांसाठी मदत मिळविली भारत-म्यानमार मैत्री ही आजतागायत टिकून आहे.

### १३.४.८ भारत-श्रीलंका संबंध :-

भारताने स्वातंत्र्यानंतर इतर शेजारील राष्ट्रांप्रमाणे श्रीलंकेशीही मैत्रीसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण श्रीलंकन सरकारने फारसा प्रतिसाद दिला नाही. १९५६ मध्ये भंडारनायके सरकारच्या काळात हे संबंध सुधारु लागले. श्रीलंका अलिप्त गटात सामील झाली. नेहरु व भंडारनायके यांनी एकमेकांच्या देशांना भेटी दिल्या. १९५९ मध्ये भंडारनायकेंची हत्या झाली व त्यांच्या पत्नी सिरीमाओ भंडारनायके प्रधानमंत्री बनल्या. १९६१ मध्ये त्यांनी सिंहली ही श्रीलंकेची राष्ट्रभाषा केल्याने तेथील तामीळ जनतेने याविरुध्द आंदोलन सुरु केले. भारताने या प्रश्नात हस्तक्षेप केला नाही. श्रीलंकेनेही काश्मीर समस्येत भारताची बाजू उचलून धरली. १९६४ मध्ये श्रीलंकन सरकारशी लालबहादूर शास्त्रीनी तामीळबद्दल महत्वाचा करार केला. त्याप्रमाणे ३ लाख तामीळींना श्रीलंकेने व ४ लाख २५ हजार तामीळींना भारताने नागरिकत्व दयावे असे ठरले. परंतु १९६५ मध्ये आलेल्या युनायटेड नॅशनल पार्टीच्या सरकारने हा करार अमान्य केला त्यामुळे ही समस्या सुटू शकली नाही.

१९६७ मध्ये इंदिरा गांधीनी श्रीलंकेचा व १९६८ मध्ये पंतप्रधान सेनानायके यांनी भारताचा दौरा केला. यात उभयंतांनी मैत्रीसंबंध निर्माण केले. १९७० नंतर भारत व श्रीलंका व्यापार व आर्थिक सहकार्य वाढत गेले. याचकाळात श्रीलंकेत सिंहली विरुध्द तामिळी संघर्षाने उग्र स्वरुप धारण केले. श्रीलंकेतील साडेचार कोटी भारतीयांचे भवितव्य धोक्यात आले. १९८३ च्या वांशिक दंगलीत शेकडो निरपराध तामिळांची हत्या झाली. यातून तामिळ फुटीरवादाचा व दहशतवादाचा जन्म झाला. श्रीलंकन सरकारने तामिळ अतिरेकी संघटनेविरुध्द लष्करी कारवाई सुरु केली. श्रीलंकेतील अस्थैर्याचा फायदा घेण्याचे प्रयत्न अमेरिकेने सुरु केले. त्यामुळे भारताला चिंता वाटू लागली. श्रीलंकेत भारताची तामिळींना सरकारच्या वाटाघाटी घडवून आणल्या पण त्यात अपयश आले. श्रीलंकेत भारताची तामिळींना फूस असल्याचा प्रचार होऊ लागला. राजीव गांधीनी श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी तेथे शांतीसेना पाठवली याचा परीणाम म्हणजे राजीव गांधीनी श्रीलंकेला भेट दिली असता त्यांची हत्या करण्याचा प्रयत्न झाला.

भारताने अनेक प्रयत्न करुनही श्रीलंकेत शांतता निर्माण होऊ शकली नाही. असे असले तरी भारताने तामीळींच्या बाजूने भूमिका घेवून श्रीलंकेला कधीही दुखावले नाही. हा श्रीलंकेचा अंतर्गत प्रश्न असल्याने त्यात फारसा हस्तक्षेप केला नाही म्हणूनच दोन देशातील संबंध सलोख्याचे राहू शकले.

### १३.४.९ आपली प्रगती तपासा :

१. भारताचे पाकिस्तानशी असलेल्या संबंधाचे थोडक्यात वर्णन करा.

## १३.५ भारत-अमेरिका संबंध

### १३.५.१ शीतयुद्धकाळतील भारत-अमेरिका संबंध :

भारत व अमेरिका यांच्यातील संबंध बघत असतांना दोन्ही देशातील संबंध हे कधीही फारसे सलोख्याचे किंवा मैत्रीचे राहिले नाहीत. दोन्ही देशात कायम संशायाचे व परस्परविरोधी दृष्टीकोन राहीला. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी अमेरिकेची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला होता व दुसऱ्या महायुध्दकाळात अमेरिकेनेही काही प्रमाणात भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी इंग्लंडवर दबाव आणला होता. दुसऱ्या महायुध्दानंतर अमेरिका व रशिया यांचा जागतिक महासत्ता म्हणून उदय झाला. १९४७ मध्ये भारतालाही स्वांतत्र्य मिळाले. अमेरिकेत लोकशाही व रशियात साम्यवादी शासन असल्यामुळे उभय देशात संघर्षाला सुरुवात झाली. साम्यवादा विरुध्द पाश्चिमात्य राष्ट्रांनी सुरु केलेल्या लढयाचे नेतृत्व अमेरिकेने केले. त्यासाठी युरोपीय राष्ट्रांनाच नव्हे तर आशियातील राष्ट्राचेही साम्यवादापासून संरक्षण करण्यासाठी लष्करी कडे उभारण्याचे धोरण अमेरिकेने अवलंबिले. साम्यवादाविरुध्द लढा हे अमेरिकेच्या परराष्ट्रधोरणाचे सूत्र बनले. त्यामुळे अमेरिका-रशियातील शीतयुध्द वाढत गेले.

पंडित नेहरुंना मात्र साम्यावादाचा धोका वाटत नव्हता. उलट अमेरिकेच्या लष्करी करारामुळे शीतयुध्दाची तीव्रता व आंतराराष्ट्रीय तणाव वाढून जागतिक शांततेला धोका निर्माण होईल अशी भिती त्यांना वाटत होती. देशाच्या विकासासाठी व स्थैर्यासाठी परस्परविरोधी राष्ट्रगटांपैकी कोणत्याही गटात सामील न होता अलिप्त राहून सर्व राष्ट्रांशी मैत्रीसंबंध निर्माण करण्याचे धोरण भारताने निश्चित केले. अमेरिकेला मात्र भारताचे हे धोरण पसंत नव्हते. कारण आशियातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारताने साम्यवादाविरोधी लढ्यात अमेरिकेचा बालेकिल्ला बनून अमेरिकेला सहकार्य करावे अशी त्यांची अपेक्षा होती. पण नेहरुंनी याबाबत प्रतिसाद न देता अमेरिकन नितीवर नेहमी टीकाच केली. त्यामुळे अमेरिका भारतावर नाराज

झाली. भारताने लोकशाहीचा अपमान केला असून त्यांची अलिप्तता ही धोक्याची टीका करुन भारताविरोधी कारवाया सुरु केल्या.

**१३.५.२ भारत-चीन व अमेरिका :** इ.स. १९४९ मध्ये चीनमध्ये चँग-कै-शेक सरकारविरुध्द माओ-त्से-तुंगने राज्यक्रांती करुन साम्यवादी सरकार स्थापन केले. चँगने पळून जाऊन फार्मोसा बेटावर राष्ट्रीय सरकार निर्माण केले. अमेरिकेने माओ सरकारला विरोध केलेला असतांना भारताने मात्र ३० डिसेंबर १९४९ रोजी शेजारी राष्ट्र समजून माओ सरकारला राजनैतिक मान्यता दिली भारताची ही कृती अमेरिकेला आवडली नाही.

याच काळात १९५० मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण करुन आशियात अशांतता निर्माण झाली. संयुक्त राष्ट्रसंघात उत्तर कोरियाला आक्रमक ठरवून ताबडतोब युध्दबंदी करुन आपल्या फौजा ३८ अक्षांशा पलीकडे न्याव्यात असा ठराव मांडण्यात आला. भारताने या ठरावाला पाठिंबा दिल्याने अमेरिकेला आनंद झाला. असे असले तरी अमेरिकेने युनोत ज्यावेळी उत्तर कोरियाविरुध्द लष्कर उभारुन त्याला सर्व सदस्य राष्ट्रांनी मदत करावी व या लष्कराचे नेतृत्व अमेरिका करेल असा ठराव मांडला तेव्हां या ठरावाला भारताने विरोध केला. कारण अमेरिका, रशिया व चीन यांनी कोरियाचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावा असे भारताला वाटत होते. नेहरुंच्या या भूमिकेमुळे अमेरिका नाराज झाली. कोरिया प्रश्नांत भारताने केलेली मध्यस्थीही तिला आवडली नाही. चीनला संयुक्त राष्ट्रसंघात स्थान द्यावे ही आग्रही मागणी वेळोवेळी भारताने केली. पण अमेरिकेने प्रतिसाद दिला नाही.

एका बाजूला भारत आंतरराष्ट्रीय पातळीवर सतत चीनची बाजू घेऊन चीनशी मैत्री संबंध वाढवीत होता. पण दुसऱ्या बाजूला चीनने मात्र 'हिंदी-चीनी भाई भाई' म्हणून १९६२ मध्ये भारतावर आक्रमण केले होते. त्यामुळे भारताच्या परराष्ट्रनितीला जबरदस्त धक्का बसला. अमेरिकेत मात्र यावेळी भारताबद्दल सहानूभूती निर्माण झाली.भारताच्या मदतीच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन अमेरिकेने ताबडतोब भारताला ५ दशलक्ष डॉलर्सची शस्त्रास्त्रे पुरविली.पाकिस्तानने याला विरोध केला तेव्हा अमेरिकेने पाकिस्तानला गप्प केले. नेहरुंनी याबाबत अमेरिकेकडे कृतज्ञता व्यक्त केली.

**३) काश्मीर प्रश्न व अमेरिका :** अमेरिकेला साम्यवादी रशिया व चीन यांच्याभोवती लष्करी कडे उभारायचे होते. यात भारत सामील न झाल्याने रशियाच्या अगदी जवळ असलेल्या पाकिस्तानला अमेरिकेच्या सामूहिक सुरक्षा पध्दतीत महत्वाचे स्थान मिळाले. त्यामुळे रशिया व चीनवर नजर ठेवणे अमेरिकेला सहज शक्य होणार होते. इ.स. १९५४ मध्ये अमेरिका व पाकिस्तान यांच्यात संरक्षणाचा करार घडून आला. पाकिस्तानला दिली जाणारी शस्त्रास्त्रे भारताच्याविरुध्द वापरली जाणार नाहीत असे आश्वासन अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी भारताला दिले असले तरी भारताचा त्यावर विश्वास बसला नाही. अमेरिकेच्या या कृतीमुळे जनमत प्रक्षुब्ध झाले.

भारत-पाकिस्तान यांच्यातील कळीचा मुद्दा म्हणजे काश्मीर प्रश्न होता. या प्रश्नाबाबत भारताच्या विरोधात नेहमी अमेरिकेने पाकची बाजू उचलून धरली. १९४७ मध्ये पाकच्या काश्मीरवरील हल्ल्यास बेकायदेशीर आक्रमण ठरविण्यासही नकार दिला. पाकिस्तानने काश्मीरमध्ये सार्वमत घेण्याची मागणी केली. याबाबत युनोच्या देखरेखीखाली काश्मीरमध्ये भारताने सार्वमत घेण्यासाठी अमेरिका व इंगलंडने भारतावर दडपणे आणली, परंतू भारताने जोपर्यंत काश्मीरी घुसखोर बाहेर पडत नाहीत, तेथे युध्दबंदी होत नाही तोपर्यंत सार्वमत घेतले जाणार नाही असे ठणकावून सांगितले. १९५४ मध्ये काश्मीरच्या घटनासमितीनेही काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे काश्मीरच्या लोकप्रतिनिधींनी दिलेला कौल म्हणजे सार्वमत होय अशी भूमिका भारताने घेतल्याने अमेरिकेने टीकेची झोड उठवली.

अमेरिकेने पाकला दिलेल्या शस्त्रांचा उपयोग पाकिस्तान भारताविरुध्द करणार नाही हे अमेरिकेने दिलेले आश्वासन पाकने खोटे ठरवून १९६५ मध्ये भारताविरुध्द युध्द पुकारले. युनोच्या सुरक्षा समितीत युध्दबंदीच्या ठरावाला अमेरिकेने पाठिंबा दिला. तसेच दोन्ही राष्ट्रांना दिली जाणारी लष्करी व आर्थिक मदत बंद केली. वरवर अमेरिकेचे धोरण नि:पक्षपाती दिसत असले, पाकला अमेरिकेने मदत बंद केली असली तरी अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांकडून ती मिळतच होती. तसेच अमेरिकेने तर युध्दात पाकला दोषी ठरवलेच नव्हते. काश्मीर मधून पाक फौजा माघारी जाण्यासाठी अमेरिकेने पाकवर दडपण आणावे या लालबहादूर शास्त्रींच्या विनंतीकडे अमेरिकेने दुर्लक्ष केले. युध्दात भारताने मात्र पाकचा पराभव केला.

१९६४ पासून रशिया व चीन यांच्यात मतभेद झाले व पाकच्या याहयाखानच्या मध्यस्थीने १९७१ मध्ये अमेरिका व चीन यांच्यात जवळीक निर्माण झाली. ही भारतासाठी धोक्याची सूचना होती. पूर्व बंगालच्या प्रश्नावरुन अमेरिकन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांच्याशी बोलणी करण्यासाठी १९७१ मध्ये इंदिरा गांधी वॉशिंगटनला गेल्या. पण अमेरिकेने त्यांचे काहीएक न ऐकता तो पाकचा अंतर्गत प्रश्न असून भारताने हस्तक्षेप करु नये असे सांगितले. अन्यथा आर्थिक मदत बंद करण्याची धमकी भारताला दिली.

३ डिसेंबर १९७१ रोजी पाकने भारतावर आक्रमण केले तरीही युनोत अमेरिकेने पाकची बाजू उचलून धरली. भारताची आर्थिक मदत बंद केली पण पाकला मदत देणे चालूच ठेवले. मित्र राष्ट्रांकडून पाकला युध्दसाहित्य पुरविण्याची व्यवस्था केली. एवढेच नव्हे तर भारतावर दबाव आणण्यासाठी अमेरिकेने नौदलाचा सातवा ताफा बंगालच्या उपसागरात उतरविला. अमेरिकेच्या या राजकारणाला शह देण्यासाठी रशियानेही आपल्या नौदलाचा ताफा हिंदी महासागरात आणला. त्यामुळे अमेरिकेला कारवाई करणे अशक्य झाले. दरम्यान इंदिरा गांधीच्या मुत्सद्देगिरीमुळे पाकिस्तानचा पराभव झाला व आशियाई राजकारणात भारत हे प्रभावी राष्ट्र बनले. अमेरिकेने या घडामोडींपासून बोध घेवून १९७४ मध्ये बंद केलेली आर्थिक मदत भारताला देऊ केली. असे असले तरी या दोन राष्ट्रांतील संबंध पूर्णपणे सुधारले नाहीत. हिंदी महासागरातील दियागोगार्सिया बेटावर अमेरिकेने लष्करी तळ-स्थापन केला. व्हिएतनामवर बाँबहल्ले केले याबद्दल भारताने टीका केली. इंदिरागांधींनी देशात १९७५ मध्ये आणिबाणी लादली त्यावेळी भारतावर अमेरिकेने टीका केली त्यामुळे आपसातील कटूता वाढत गेली.

**१३.५.४ गोवामुक्ती प्रकरणात हस्तक्षेप :** भारत स्वतंत्र झाला असला तरी भारतातील गोवा, दीव, दमण या वसाहती पोर्तुगीजांच्या वर्चस्वाखाली होत्या. त्या स्वतंत्र करुन भारतात विलीन करण्याची नेहरुंची इच्छा होती. पोर्तुगाल हे राष्ट्र नाटो करारात सामील असल्याने त्याने व अमरिकेचे मित्रराष्ट्र असल्याने भारताच्या विरुध्द भूमिका घेतली. रशियाने मात्र गोव्याबाबत भारताच्या भूमिकेला पूर्ण पाठिंबा दिला. अमेरिकेने परराष्ट्र सचिव जॉन फॉस्टर डेलेस यांनी गोवा, दीव, दमण हे पोर्तुगालचे प्रांत आहेत असे जाहीर केल्याने भारतीय लोकमत दुखावले गेले.

भारताने ज्यावेळी गोव्याबद्दल लष्करी कारवाई केली तेव्हां अमेरिकेने तीव्र नाराजी व्यक्त केली. अमेरिकेने गोवा प्रश्न सुरक्षा समितीत उपस्थित केला. भारताने युध्दबंदी करुन फौजा माघारी न्याव्यात व शांततेच्या मार्गाने गोवा प्रश्न सोडवावा असा ठराव मांडला. परंतू रशियाच्या गटाने नकाराधिकाराचा वापर केल्याने हा उराव उधळला गेला.

### १३.५.५ भारत-अमेरिका आर्थिक हितसंबंध :-

भारत-अमेरिका राजकीय संबंध चालूच राहीलेले दिसतात. अमेरिकेने पाकिस्तानला भरघोस आर्थिक मदत दिली असली तरी भारतालाही अनुदान, कर्ज, तंत्रज्ञानाची मदत देणे चालू ठेवले. १९५१ मध्ये भारतात तीव्र धान्य टंचाई निर्माण झाली असताना भारताच्या विनंतीवरुन अमेरिकेने १८९.७ दशलक्ष डॉलर्सचे कर्ज भारताला दिले. भारताला पंचवार्षिक योजनांसाठी ३२५० लक्ष पौडांचे कर्ज मंजूर केले. तसेच १९५६ मध्ये भारताशी गहू, तांदुळ, कापूस व इतर शेतीचा माल यांचा पुरवठा करण्याबाबत करार केला. १९५८ मध्ये ‘पी.एल. ४८०’ योजनेअंतर्गत गहू खरेदीसाठी भारताला ३२५ दशलक्ष डॉलर्सचे कर्ज दिले व १९६० मध्ये १२६० दशलक्ष डॉलर्सची मंजूरी दिली. ही आर्थिक मदत देताना मात्र अमेरिका भारतावर विविध अटी लादत होती.भारताचा आर्थिक विकास हा अमेरिकेच्या मर्जीनुसार व्हावा, भारतावर साम्यवादाचा प्रभाव वाढू नये ही अमेरिकेची इच्छा होती. अमेरिकेशी भारताचा व्यापार वाढतच राहीला. १९७१ च्या भारत-पाक युध्दाच्यावेळी अमेरिकने भारताला दिली जाणारी आर्थिक मदत बंद केली. पण भारताचा प्रभाव वाढल्याने १९७४ मध्ये मोरारजी देसाईंनी अमेरिकेला भेट दिली. त्यावेळी परस्पर व्यापारवृध्दीचे व आर्थिक सहकार्याचे करार करण्यात आले. राजीव गांधींच्या काळात भारत-अमेरिका यांच्यात विज्ञान व तंत्रज्ञानात भारताला मदत देण्याबाबत तीन वर्षांचा करार झाला, व्यापारी व आर्थिक सहकार्याचेही करार झाले.

### १३.५.६ भारताची अण्वस्त्र चाचणी :-

इंदिरा गांधी पंतप्रधान असताना १८ मे १९७४ रोजी भारतीय वैज्ञानिकांनी राजस्थानच्या वाळवंटी भागात पोखरण येथे यशस्वी अणूस्फोट घडवून आणला. या अणुस्फोटामुळे अणुशक्तीचे ज्ञान असलेले भारत हे जगातील सहाव्या क्रमांकाचे राष्ट्र बनले. या अणुचाचणीमुळे अमेरिकेने नाराजी व्यक्त केली व भारत जागतिक शांतता धोक्यात आणीत असल्याचा आरोप केला. इंदिरा गांधीनी अणुस्फोटाच्या चाचणीकरिता लागणारी साधनसामुग्री, पैसा व प्रोत्साहन वैज्ञानिकांना १९७२ पासून पुरवले होते. भारताने अणुशक्ती तंत्रज्ञानात स्वावलंबी बनावे अशी त्यांची इच्छा होती. भारताने अणुचाचणी अण्वस्त्रे बनविण्याकरिता नव्हे तर भारताने शांततेसाठी व प्रगतीसाठी केल्याचे इंदिरा गांधीनी स्पष्ट केले.

इ.स. १९७८मध्ये अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टर यांनी भारताला भेट दिली. त्यावेळी भारताला आर्थिक मदतीबरोबर तारापूर येथील अणुभट्टीसाठी युरेनियम देण्याचीही तयारी दाखविली परंतू हे युरेनियम पुरविण्याच्या मार्गात अमेरिकेने भारतावर अनेकवेळा अण्वस्त्र बंदी करारावर सही करण्यासाठी दबाव आणला परंतू भारताने वेळोवेळी नकार देऊन अमेरिकेच्या हातातील बाहुले बनण्याचे टाळले.

### १३.५.७ आणिबाणी-जनता सरकार व अमेरिकेची भूमिका :-

१९७२ नंतर भारताची अंतर्गत परिस्थिती गंभीर बनत गेली. गरीबी, दुष्काळ, महागाई यांनी त्रस्त झालेल्या जनतेने आंदोलने सुरु केली. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन इंदिरा शासनाला विरोध केला. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निकाल इंदिरा गांधींच्या विरोधात गेल्याने इंदिरा गांधींनी राजीनामा द्यावा यासाठी सर्व बाजूंनी प्रचंड दबाव आणला गेला. या घडामोडींमुळे अमेरिकेला आनंद होत होता. कारण इंदिरा गांधींनी वेळोवेळी अमेरिकेच्या राजकारणाला शह दिला होता. त्यामुळे इंदिरा गांधीचे सत्तेवरुन उच्चाटन व्हावे असे अमेरिकेला मनापासून वाटत होते. परंतू इंदिरा गांधीनी राजीनामा न देता देशात १९७५ मध्ये अंतर्गत आणीबाणी लादली व सर्व विरोधकांचे अटकसत्र सुरु केले. आणीबाणीमुळे भारतातील इंदिराविरोधी आवाज बंद होऊन काही प्रमाणात शांतता निर्माण झाली. अमेरिकेने यावेळी भारत सरकार लोकशाही तत्वांची गळचेपी करीत असल्याची टीका केली. १९७७ मध्ये सार्वत्रिक निवडणुका जाहीर होताच सर्व विरोधी पक्षांचा मिळून जनता पक्ष स्थापन केला. या पक्षाने अमेरिकेशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. जनता पक्षाने प्रचारात काँग्रेसच्या परराष्ट्र धोरणावर टीका केली. भारत -रशिया मैत्रीचा फेरविचार व्हावा व भारताने अमेरिकेशी सलोखा वाढवावा असे मत विरोधी नेत्यांनी व्यक्त केले. शेवटी या निवडणुकीत काँग्रेसचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. अमेरिकेतही सत्ता बदल होऊन रिचर्ड निक्सनच्या जागी जिमी कार्टर हे अध्यक्ष बनले.

जनता सरकारच्या काळात भारत-अमेरिका यांच्यातील तणाव काही प्रमाणात ओसरत होता कारण अमेरिकेचे समर्थन करणारे सरकार भारतात स्थापन झाले होते. अध्यक्ष जिमी कार्टर यांनी भारताला अनुकूल अशी भूमिका घेतली. जनता सरकारशी वाटाघाटी करण्यासाठी अमेरिकन उपराष्ट्रपती जुलै १९७७ मध्ये भारतात आले. सप्टेंबर १९७७ मध्ये भारतीय परराष्ट्र मंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी अमेरिकेला भेट दिली व दोन्ही राष्ट्रांत निर्माण झालेली कटुता दूर करण्याचे आश्वासन दिले. १९७८ मध्ये अमेरिकन अध्यक्ष जिमी कार्टर व भारताचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी परस्परांच्या देशांना भेटी दिल्या. उभयतांमध्ये व्यापारवृध्दी व सहकार्याचे करार झाले असले तरी दोन्ही देशात पूर्ण मैत्रीचे संबंध निर्माण होऊ शकले नाहीत. कारण अमेरिकेने हिंदी महासागरात लष्करी तळ वाढविणे व पाकिस्तानला लष्करी मदत देणे बंद केले नाही. याच काळात आय.बी.एम. व कोकाकोला या बहुराष्ट्रीय अमेरिकन कंपन्यांचे भारतातून उच्चाटन करण्यात आल्याने अमेरिका भारतावर नाराज झाली होती. जनता सरकारचे अमेरिकेशी संबंध वाढविण्याचे प्रयत्न वाया गेले असे म्हणावे लागेल.

### १३.५.८ १९८० ते १९८५ या काळातील चढउतार :-

१९८० मध्ये जनता सरकारचे पतन होऊन पुन्हा इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान झाल्या. भारताने पुन्हा अमेरिकेशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न केला. १९७९ मध्ये इराणमध्ये क्रांती होऊन खोमेनी सरकार सत्तारुढ झाले. या शासनाच्या काळात इराणमधील अमेरिकन वकीलातीवर हल्ला झाला. तसेच अफगणिस्तानात उतरलेल्या रशियन लष्कराला मागे जाण्याचा सल्ला भारताने दिला. भारताच्या या कृतीमुळे अमेरिकेला आनंद झाला व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून भारताला कर्ज मिळवून देण्यात तिने अडथळे आणले नाहीत. अमेरिका पाकिस्तानला लष्करी मदत देणे बंद करीत नसल्याने भारतात नाराजी होती.

१९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या होऊन राजीव गांधी पंतप्रधान बनले. राजीव गांधीनी अमेरिकेशी संबंध ठेवताना समझोत्यावर भर दिला. १९८५ मध्ये अमेरिकेचा दौरा करुन राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड यांच्याबरोबर चर्चा केली. जगातील लोकशाही टिकविण्यासाठी भारत-अमेरिका मैत्रीसंबंध असणे जरुरीचे आहे असे राजीव गांधींनी स्पष्ट केले. राजीव गांधींना अमेरिकन काँग्रेसमध्ये भाषण करण्याचाही बहुमान मिळाला. अमेरिका व भारत यांच्यात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला मदत देण्याबाबत तीन वर्षाचा करार झाला. अमेरिकन भांडवल गुंतविण्यासाठी अमेरिकन कंपन्यांना आवाहन केले गेले.

अशाप्रकारे भारत अमेरिकन संबंध कधी तणावाचे तर कधी सहकार्याचे राहिले. भारताने नेहमी युध्दाला, आक्रमणाला, दुसऱ्या देशातील हस्तक्षेपाला विरोध केला. अमेरिकेने आशियात वाढवलेला हस्तक्षेप भारताला आवडला नाही. भारत-रशिया यांच्यातील मैत्रीमुळे अमेरिकेला नेहमी भारताब्दल संशय राहीला व पाकिस्तानच्या माध्यमातून भारताला नेहमी शह देण्याचा प्रयत्न अमेरिकने केला. आज शीतयुध्द समाप्त झाले असले तरी अमेरिका पाकला जवळ करुन भारतात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करते. भारताने नुकताच अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना अणुस्फोट घडवून आणला. त्या पाठोपाठ पाकनेही अणुचाचणी घेतली. पण अमेरिकेने भारताबद्दल कडक भूमिका घेऊन पाकबरोबर नरमाईचे धोरण ठेवले. अमेरिकेच्या या दुटप्पी धोरणाचा राग भारतीय जनतेत आहे. असे असले तरी भारत-अमेरिका यांच्यात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक देवघेव ही सुरुच असते.

### १३.५.९ आपली प्रगती तपासा :-

१. भारत-अमेरिका आर्थिक संबंधावर टीप लिहा.

## १३.६भारत-रशिया संबंध

भारत व रशिया यांच्यात स्वातंत्र्यपूर्वकाळात काही प्रमाणात संबंध प्रस्थापित झाले होते. भारतातील प्रमुख नेत्यांचे रशियातील विचारवंताशी संबंध होते. म.गांधी यांचा टॉलस्टॉयशी पत्रव्यवहार चाले. क्रांतीकारक श्यामची कृष्ण वर्मा यांचा मादाम कामांशी संपर्क होता. रशियन सरकारने मात्र भारताशी राजकीय संबंध निर्माण केले नव्हते कारण. भारतावर इंग्लंडचे वर्चस्व असून रशियाचे इंग्लंडशी शत्रुत्व होते.

१९१७ ची रशियन राज्यक्रांती ही रक्तरंजित असली तरी शेकडो वर्षे अत्याचाराखाली भरडलेल्या शेतकऱ्यांची व कामगारांची सुटका होऊन तेथे साम्यवाद निर्माण झाल्याने भारतीय नेत्यांनी तिचे स्वागत केले. नेहरुंवर तर समाजवादाचा जबरदस्त प्रभाव निर्माण झाला व त्यांनी कॉंग्रेसमध्ये समाजवादी विचार प्रसारीत करण्याचा प्रयत्न केला. १९२७ मध्ये नेहरुंनी रशियाला भेट दिली असतांना तेथील समाजवादी परिवर्तनाने ते प्रभावति झाले होते. ७ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी सरकारचे नेते म्हणून भाषण करतांना त्यांनी अलिप्ततेचे धोरण जाहीर करुन जगातील सर्व राष्ट्रांशी मैत्रीसंबंध निर्माण करण्याचे स्पष्ट केले. तसेच रशियाला शुभेच्छा देऊन सोव्हिएत संघ हे आशिया खंडातील आमचे शेजारी राष्ट्र आहे त्यामुळे जागतिक राजकारणातील अनेक जबाबदाऱ्या आम्हाला परस्पर सहकार्याने पार पाडावयाच्या आहेत असे घोषित केले.

### १३.६.१ स्टॅलिनकालीन भारत-रशिया संबंध :

भारत स्वतंत्र झाला त्यावेळी रशियात स्टॅलीनची साम्यवादी हुकूमशाही होती. पंडित नेहरुंनी रशियाशी मैत्री संबंध निर्माण करण्यासाठी आपल्या भगिनी विजयालक्ष्मी पंडित यांची रशियातील पहिले राजदूत म्हणून नेमणूक केली. रशिया मात्र लोकशाही प्रधान भारताकडे संशयाने पहात होता. कारण भारताने स्वातत्र्यानंतरही राष्ट्रपती म्हणून माऊंटबॅटनची केलेली नेमणूक, १९४९ मध्ये नेहरुंनी अमेरिकेला दिलेली भेट तसेच खुद विजयालक्ष्मी पंडीत यांनी रशियाच्या राजदूत असूनही अमेरिकन व ब्रिटीश वकीलातीशी अधिक संबंध जोडले. त्यामुळे भारत अमेरिकेच्या साम्राज्यवादी गटाच्या बाजूने जाईल असे रशियाला जाणवले. यामुळेच स्टॅलिनने विजयालक्ष्मी पंडित मास्को येथे असूनही त्यांची दखल घेतली नाही. १९४९ मध्ये भारतात पडलेल्या दुष्काळाला तोंड देण्यासाठी भारताने अमेरिकेकडे मदत मागितली पण अमेरिकेने टाळाटाळ केल्याने नेहरु नाराज झाले. या संधीचा फायदा घेऊन रशियाने भारताला अन्नधान्य पुरविण्याची तयारी स्वतःहून दाखविली. तसेच त्याची किंमत भारताने परकीय चलनात न देता ताग, रबर, कापूस या वस्तूंच्या रुपाने देण्याची सवलत दिली यावेळी रशियातील भारताचे राजदूत सर्वपल्ली राधाकृष्णन होते. मुत्स्देगिरीने त्यांनी भारत व रशियातील संशयाचे वातावरण दूर करण्याचे प्रयत्न केले व त्यांना त्यात बरेच यश मिळाले. त्यामुळे काश्मीर प्रश्नाबाबत संयुक्त राष्ट्रसंघात भारताला रशियाचा पाठींबा मिळू शकला. कोरियन युध्दातही भारताने मध्यस्थ म्हणून बजावलेली कामगिरी रशियन नेत्यांना आवडली. १९५२ मध्ये प्रथमच स्टॅलिनने राधाकृष्णन यांच्या मास्कोमधील वास्तव्याची दखल घेतली. असे असले तरी स्टॅलिनकाळात भारत-रशिया यांच्यातील संबंध झपाट्याने वाढलेले दिसत नाहीत. हे संबंध

१९५३ मध्ये स्टॅलिनचा मृत्यू झाल्यानंतर वाढले व नवीन सरकारच्या धोरणात भारताबद्दल अनेक बदल घडून आले.

### १३.६.२ अमेरिकेचे लष्करी करार आणि भारत-रशिया जवळीक :

दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या दोन महासत्तांचा उदय झाला. अमेरिकेला जगात साम्यवादाचा नायनाट करावयाचा असल्याने १९५२-५३ नंतर अमेरिकेने दक्षिण व आग्नेय आशियातील राष्ट्रांशी मैत्रीसंबंध वाढवण्यास सुरुवात केली. अमेरिका भारतालाही आपल्या लष्करी गटात खेचण्याचे प्रयत्न करीत होती. परंतु लष्करी करारांमुळे जागतिक शांतता धोक्यात येईल असे पंडित नेहरुंचे मत असल्याने त्यांनी त्याला विरोध करुन तटस्थ राष्ट्रांचा गट बनविण्यास सुरुवात केली. रशियाने भारताच्या अलिप्ततावादी नितीला मान्यता देऊन या गटातील राष्ट्रांना आर्थिक मदत देणे सुरु केले. अमेरिकेने असंलग्न नितीला विरोध केल्याने साहजिकच भारताने रशियाशी मैत्रीसंबंध १९५२-५३ मध्ये भारतीय शिष्टमंडळांनी सोविएत संघाला भेटी दिल्या त्यातून दोन्ही राष्ट्रात १९५३ मध्ये पहिला व्यापारी करार घडून आला.

### १३.६.३ क्रुश्चेव्ह व बुलगानीनची भारतभेट :

इ.स. १९५५ मध्ये नेहरुंनी रशियाला दिलेली भेट उभय राष्ट्रांच्या मैत्रीसंबंधासाठी महत्वाची ठरली. १५ दिवसांच्या या दौऱ्यात नेहरुंची विविध ठिकाणी प्रभावी भाषणे व प्रचंड स्वागत झाले. भारताच्या तटस्थ नितीला रशियाने पूर्णपणे समर्थन दिले. नेहरुंच्या भेटीनंतर त्याचवर्षी डिसेंबर १९५५ मध्येच रशियन अध्यक्ष व प्रधानमंत्री अनुक्रमे क्रुश्चेव्ह व बुलगानीन यांनी भारताचा दौरा केला. संपूर्ण देशात यावेळी 'हिंदी-रुसी भाई भाई' अशा घोषणा दिल्या. रशियन नेत्यांनी भारताच्या काश्मीर व गोव्यातील हक्कांना पाठींबा दिला. जागतिक शांतता टिकविण्यासाठी भारताने दिलेले योगदान रशियन जनतेच्या दृष्टीने महत्वाचे असल्याचे बुल्गानीन म्हणाले स्टॅलिनकाळात गांधीवादाला विरोध झाला होता. त्या स्मृती पुसून टाकण्यासाठी या दोन नेत्यांनी राजघाटावर जाऊन म.गांधींच्या प्रती आदरभाव व्यक्त केला. १९५५ नंतर भारत-रशिया संबंध मोठ्या प्रमाणात वृध्दिंगत होत गेले. रशियातील वर्तमानपत्रांनी क्रुश्चेव्ह व बुल्गानीनच्या भारतभेटीचा उल्लेख अविस्मरणीय व ऐतिहासिक म्हणून केला.

### १३.६.४ काश्मीर व गोवा प्रकरणी रशियाचे सहकार्य :

पाकिस्तानने १९४७ मध्ये काश्मीर हल्ला करुन हा प्रश्न उग्र बनविला.भारताने शांततेच्या मार्गाने हा प्रश्न सोडविण्यासाठी युनोत नेला. तेथे आपल्याला न्याय मिळेल अशी भारताची अपेक्षा होती. परंतू इंग्लंड व अमेरिकेने या प्रकरणात पाकिस्तानची बाजू उचलून धरल्याने भारताची अडचण झाली. अशाप्रकरणी रशिया भारताच्या मदतीला धावून आल्याने भारताला दिलासा मिळाला. रशियाने काश्मीर प्रश्न भारताची अंतर्गत बाब असल्याने इतरांनी त्यात ढवळाढवळ न करण्याचे आवाहन केले.

१९५२ मध्ये इंग्लंड-अमेरिकेने सुरक्षा समितीत युनोच्या फौजा काश्मीरमध्ये पाठविण्याचा ठराव मांडला परंतु रशियाने या ठरावाला विरोध करुन हा प्रयत्न हाणून पाडला. १९५४ मध्ये अमेरिका-पाकिस्तान यांच्यात लष्करी करार झाल्याने १९५७ मध्ये अमेरिकेने युनोच्या या देखरेखीखाली काश्मीरमध्ये सार्वमत घेतले जावे असा ठराव सुरक्षा समितीत मांडला. यावेळीही रशियाने नकाराधिकार वापरुन हा ठराव उधळून लावला. १९६५ मध्ये रशियाने सुरक्षा समितीत जम्मू-काश्मीरबद्दल रशियाचा वेळोवेळी मिळालेला पाठिंबा भारतासाठी महत्वाचा ठरला. यामुळे भारतात रशियाबद्दलची आदराची भावना मोठ्या प्रमाणात वाढली. काश्मीर प्रश्नाप्रमाणेच भारतातील गोवा, दीव, दमण मधील पोर्तुगीजांच्या अंमलाला रशियाने विरोध केला. गोव्याविरुध्द भारताने लष्करी कारवाई केली. त्यावेळी बुल्गानीन भारतभेटीवर आले होते. या लष्करी कार्यवाहीची कठोर प्रतिक्रिया पाश्चिमात्य राष्ट्रांत उमटली. इंग्लंड-अमेरिकेने भारताला आक्रमक ठरविण्यासाठी हा प्रश्न सुरक्षा समितीत उपस्थित केला. पण रशियाने यावेळी पाश्चिमात्यांच्या धोरणावर कडक टीका करुन भारताला आक्रमक ठरविणारा ठराव उधळून लावला.

### १३.६.५ भारत-पाकिस्तान युध्द व रशियाची भूमिका :

भारत व पाकिस्तान यांच्यातील शत्रूत्व वाढत जाऊन त्यांचे पर्यवसान दोन युध्दात झाले. रशियाने सतत भारताच्या बाजूने राहून महत्वाची भूमिका बजावली. १९६५ मध्ये भारत-पाक युध्दाला सुरवात होताच रशियन पंतप्रधान कोसीजीन यांनी दोघांना युध्दबंदीचे आवाहन केले. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचा पुनरुच्चार रशियाने युनोत केला. रशियाच्या मध्यस्थीमुळे युध्द समाप्त होऊन भारत-पाक यांच्यात ४ ते १० जानेवारी १९६६ रोजी रशियात वाटाघाटी घडून आल्या. पाकचे अध्यक्ष अयुबखान व भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्यात कोसीजीन यांनी ताश्कंद करार घडवून आणला. पण या करारानंतर लगेच रशियातच लालबहादूर शास्त्रींचा ह्रदयविकाराने मृत्यू झाला. यामागे रशियाचा हात असल्याची अफवा भारतात काही गटांनी पसरविली. परंतु पंतप्रधान बनलेल्या इंदिरा गांधींनी १९६६ मध्ये मास्कोला भेट देऊन हे संबंध बिघडू न देण्याची खबरदारी घेतली. तरीही रशिया-भारत यांच्यात काही बाबतीत संशयाचे वातावरण निर्माण झालेच, कारण रशियाने पाकशी करार करुन युध्द साहित्य पुरविले पण त्यामागे पाकने अमेरिकन गटात जाऊ नये ही भावना होती असे रशियन नेत्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे फारसा तणाव निर्माण झाला नाही.

इ.स. १९७१ मध्ये झालेल्या दुसऱ्या भारत-पाक युध्दाने भारत रशिया यांच्यात अधिक जवळीक वाढली. १९६९ मध्ये पाकमध्ये अयुबखानच्या जागी याहयाखान सत्तेवर आले व त्यांनी भारतविरोधी भूमिका घेऊन अमेरिकेशी करार केला. त्यामुळे रशियाने १९७० साली पाकला दिली जाणारी मदत बंद केली. पूर्व पाकवर पाकिस्तानने केलेल्या अत्याचारामुळे अनेक निर्वासित भारतात आले. पाकने भारताच्या सरहद्दीवर हल्ले सुरु केल, या परिस्थितीत भारत व रशिया यांच्यात ९ ऑगस्ट १९७१ राजी शांतता, मैत्री व सहकार्याचा करार झाला. या करारांवर चिनविरोधी व पाकविरोधी लष्करी करार अशी पाश्चिमात्यांनी टीका केली. ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकने भारतावर आक्रमण केले. या युध्दात परकीय राष्ट्रांनी भाग घेतल्यास व युध्द न

थांबल्यास गंभीर परिणाम होतील असा इशारा रशियाने चीन-अमेरिकेला दिला. अमेरिकेने ज्यावेळी भारतावर दबाव आणण्यासाठी सातवे नौदल बंगालच्या उपसागरात उतरवले. त्यावेळी रशियानेही आपले नौदल हिंदी महासागरात आणल्याने अमेरिका कारवाई करु शकली नाही. चीनलाही गप्प बसावे लागले. पाकिस्तान एकाकी पडून त्याचा पराभव झाला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताचे व आशियात रशियाचे महत्व वाढले.

**१३.६.६ भारत-चीन संघर्ष व रशिया :** १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले त्यावेळी चीनशी रशियाचा लष्करी करार झाला होता. तसेच चीन रशियाप्रमाणे साम्यवादी राष्ट्र होते. तरीही रशियाने या आक्रमणाचा निषेध करुन दोन्ही राष्ट्रांनी आपसातील मतभेद वाटाघाटीच्या मार्गाने सोडविण्याचे आवाहन केले. चीनकडून प्रतिसाद न मिळाल्याने रशियाने भारताची बाजू घेतली. चीन वर दडपण आणण्यासाठी चीनला दिला जाणारा खनिज तेलाचा पुरवठा बंद केला.

**१३.६.७ १९७७ ते १९८५ भारत-रशिया राजकीय संबंध :** १९७७ मध्ये भारतात काँग्रेसचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार सत्तेवर आले. या पक्षाने प्रचाराच्या काळात अमेरिकेच्या बाजूने वक्तव्ये करुन भारत-रशिया संबंधांवर टीका केली होती. त्यामुळे रशिया या नव्या सरकारकडे संशयाने बघत होता. पण जनता सरकार दोन्ही देशातील हितसंबंध तोडू शकले नाही. परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांनी जनता सरकार मैत्री करारांचे पालन करेल असे आश्वासन रशियाला दिले. दोन्ही राष्ट्रांत तीन दीर्घमुदतीचे करार झाले. शिवाय भारताला २५ कोटी रुपयांची मदत देण्याचे रशियाने मान्य केले. मोरारजी देसाईंनी १९७८ व १९७९ मध्ये रशियाला भेट दिली. अणुशक्तीचा वापर शांततेसाठी व विकासासाठी करण्याबाबतचा करार दोन्ही राष्ट्रात झाला.

१९८० मध्ये पुन्हा इंदिरा गांधींची सत्ता आली. यावेळी अफगाण प्रश्न निर्माण झाला. कारण अफगाणमधील कर्माल शासनाच्या विनंतीवरुन लष्कर तेथे तळ ठोकून बसले. यावर युनोतून टीका झाली. रशिया भारताचा मित्रदेश असला तरी त्याने अफगाणमध्ये केलेला हस्तक्षेप भारताच्या तत्वात बसणारा नव्हता म्हणून इंदिरा गांधीनी मुत्सेदेगिरीने रशियाला अफगाणमधून सैन्य मागे घेण्याबाबत राजी केले. १९८० साली भारत-रशिया यांच्यात पाच नवे करार होऊन रशियाने भारताला १३०० कोटी रुपयांचे युध्दसाहित्य पुरविण्याचे मान्य केले. इंदिरा गांधींच्या काळात हे संबंध अधिक वृध्दीगंत होत गेले.

१९८४ रोजी इंदिरा गांधींची हत्या झाली व राजीव गांधी पंतप्रधान बनले. त्यांनी आईचेच धोरण पुढे राबवून रशियाशी मैत्री संबंध वाढविले. १९८५ मध्ये त्यांनी रशियाचे अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांची भेट घेतली. यावेळी इंदिरा गांधींच्या कार्याबद्दल रशियातील सर्वोच्च लेनीन पुरस्कार राजीव गांधींकडे प्रदान करण्यात आला. तसेच मॉस्कोतील एका चौकाला इंदिरा गांधीचे नाव देऊन तेथे त्यांचा पुतळा उभारण्यात आला. १९८५ च्या अखेरीस गोर्बाचेव्ह भारतात आले त्यावेळी भारताच्या सातव्या पंचवार्षिक योजनेसाठी मदत देण्याचे मान्य करण्यात आले. औदयोगिक विकासासाठी १९४०० कोटी रुपयांचे कर्ज मंजूर केले.

### १३.६.८ आर्थिक सहकार्य :

देशाचे औदयोगिकरण झपाट्याने घडवून आणण्यासाठी भारताला मदतीची गरज होती. मूलभूत अवजड उदयोग, सार्वजनिक क्षेत्र सरकारी नियंत्रणाखाली असावेत अशी भारताची भूमिका होती. परंतू सार्वजनिक क्षेत्रातील उदयोगांना मदत देण्यास पश्चिमात्य राष्ट्रे तयार नव्हती. त्यांचा भर खाजगी उदयोगांवर होता. तसेच त्यांच्या कर्जाचे व्याज ५ ते ७ टक्के होते व इतर अनेक अटी होत्या ज्या भारताला परवडणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे भारत रशियाकडे वळला. भारत-रशिया यांच्यात १९५३ मध्ये पहिला करार झाला. १९६५ मध्ये बोकारो येथे पोलाद उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. रशियाच्या मदतीमुळे भारतात रांचीचा यंत्रनिर्मिती कारखाना, हरिद्वार येथील विद्युत निर्मितीच्या यांत्रिक उपकरणांचा कारखाना, ऋषीकेश येथील आशियातील सर्वात मोठा असलेला अँटीबायोटीक औषधे निर्मितीचा कारखाना असे अनेक उदयोग प्रकल्प सुरु होऊन भारताची औद्योगिक प्रगती घडून आली. भारताच्या विद्युत निर्मितीतही रशियाने भरघोस मदत केली, राणीपूर येथील अवजड विद्युत उपकरण कारखाना, मद्रासजवळ थर्मल पॉवर स्टेशन, पंजाबमधील भाक्रा जलविद्युत केंद्र, ओरिसातील हिराकुड जलविद्युत केंद्र, अशा विविध विद्युत निर्मिती केंद्रासाठी रशियाने यांत्रिक व पैशाची मदत केली. भारतात तेलाचे साठे शोधून काढण्यासाठी रशियन तज्ञ भारतात आले. १९५६ मध्ये खनिज तेल संशोधनाला सुरुवात झाली. १९५९ मध्ये भारताने सार्वजनिक क्षेत्रात इंडियन ऑईल कंपनीची स्थापना केली.

कृषीक्षेत्रातही रशियाने भारताला मदत केली. राजस्थान मधील सुरतगड येथे १९५६ मध्ये रशियाच्या मदतीने तीस हजार एकर जागेत सरकारी यंत्रचलीत कृषीक्षेत्राची स्थापना केली. त्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामुग्रीसाठी चार कोटी रुपयांची देणगीही रशियाने दिली. १९६६ मध्ये आणखी पाच कृषीक्षेत्रे भारतात स्थापन झाली. १९६७ ते ७० या काळात भारतात विविध ठिकाणी उदा. हरियाना, पंजाब, कर्नाटक, केरळ येथे उत्तम प्रतीची बी-बीयाणे व उच्च प्रतीच्या मेंढया व बैलांची पैदास करणारी केंद्रे रशियाच्या मदतीने सुरु झाली. रशियाकडून मिळणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर फक्त ५ टक्के होता व फारशा जाचक अटी नव्हत्या. रशियातील तज्ञांना दिला जाणरा पगारही कमी होता म्हणूनच आर्थिक बाबतीत भारताने अमेरिकेपेक्षा रशियन मदतीला प्राधान्य दिले. व्यापारक्षेत्रात दोन्ही देशात सहकार्याचे संबंध होते. भारतीय माल खरेदी करणाऱ्या राष्ट्रांत रशिया पुढे होता. दोन्ही राष्ट्रातील व्यापार वृध्दीगंत होत गेला. १९५३ साली १७ कोटी रुपयांचा असलेला व्यापार १९८२ पर्यंत ३३०० कोटी रुपयापर्यंत वाढला. भारताच्या आर्थिक भरभराटीत रशियाचे सहकार्य अतिशय मोलाचे आहे.

### १३.६.९ लष्करी मदत :

भारताच्या शेजारील चीन व पाकिस्तान यांच्या आक्रमक वादाचा धोका मोठ्या प्रमाणात वाढत गेला व त्यांना अमेरिकेने लष्करी मदत करुन भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे देशाचे सार्वभौमत्व टिकविण्यासाठी संरक्षण व्यवस्था मजबूत करण्याचे महत्व भारताला जाणवू लागले. पण यासाठी भारताला इंग्लंड-अमेरिकेसारखी राष्ट्रे मदत करु इच्छित नव्हती. अशावेळी रशियानेच भारताच्या संरक्षणासाठी लष्करी साहित्य पुरवून भारतातच शस्त्रास्त्र निर्मितीसाठी आवश्यक ती आर्थिक व तांत्रिक मदत दिली. १९५५ मध्ये रशियाने भारताला दोन इल्युशिन १४ ही वाहतूक विमाने दिली. १९६२ मध्येही कांही विमाने भारताने रशियाकडून खरेदी केली. एच.एफ. २४ जेट विमानांचे उत्पादन भारताने १९५६ मध्ये बेंगलोर येथे सुरु केले. त्यासाठी लागणाऱ्या इंजिनसाठी रशियाशी १९६२ मध्ये करार केला.

भारतीय नौदल कार्यक्षमबनविण्यासाठी लढावू गलबते व पाणबुड्या भारताला पुरविण्याबाबत १९६५ मध्ये करार झाला. १९६५ मध्ये पहिल्या तीन पाणबुड्या आणण्यात आल्या. त्यावर काम करणारे तंत्रज्ञ हे रशियात प्रशिक्षण घेतलेले भारतीय होते. लष्करी मदत देताना रशियाने भारताकडून फार मोठी अपेक्षा कधीही केली नाही आणि दिलेल्या लष्करी साहित्याच्या उपयोग करण्यासाठी भारताला दीर्घ मुदत दिली होती.

अशाप्रकारे रशिया हे साम्यवादी राष्ट्र असूनही लोकशाही प्रधान भारताशी मैत्री व सलोखा आजपर्यंत टिकून आहे याचे पाश्चिमात्य राष्ट्रांनाही आश्चर्य वाटते. या दोन्ही राष्ट्रांची राजकीय प्रणाली भिन्न असली तरी जागतिक शांतता टिकविण्याचीही भावना, निरपेक्ष मदतीची भावना एकच असल्याने या सबंधात कधीही फारशी कटूता निर्माण होऊ शकली नाही.या दोन राष्ट्रांनी खऱ्या अर्थाने प्रत्येक क्षेत्रात मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**१३.६.१० आपली प्रगती तपासा :**

१. काश्मीर व गोवा मुक्ती प्रकरणी भारत व रशिया संबंध स्पष्ट करा.

## १३.७ सारांश

जगामध्ये शांतता व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी भारताने वेगवेगळ्या माध्यमातून नेहमीच प्रयत्न केलेला आहे. पंचशील कराराच्या तत्वानूसार आपले परराष्ट्र धोरण प्रत्येक राष्ट्रांशी ठेवलेले आहे. अलिप्ततावादी चळवळीतून भारताने फक्त आशियातच नव्हे तर संपूर्ण जगावर आपला ठसा उमटविला आहे. १९४७ ते १९४८ या काळात त्यांनी अमेरिका व रशियाचा दोन महासंत्तबरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित केलेले होत हे दिसून येते.

## १३.८ प्रश्न

१) स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रमुख उद्दिष्टे किंवा तत्वे सांगा.

२) स्वतंत्र भारताच्या अलिप्तता धोरणाचे मूल्यांकन करा.

३) भारताचे शेजारील राष्ट्रांबरोबरील विशेषतः चीन व पाकिस्तान बरोबरील संबंधांचे विश्लेषण करा.

४) १९४७ ते १९८४ या काळातील भारत-अमेरिका संबंध स्पष्ट करा.

५) भारत-रशिया संबंधांचा परीक्षण करा.

❖❖❖❖

# १४

# मुख्य प्रवाह - १

## अ) जमातवादाचा विकास आणि फुटीरतावादी चळवळी
## ब) महिलांचे सबलीकरण

**प्रकरण रुपरेषा :-**

१४.० उद्दिष्टे
१४.१ प्रस्तावना
१४.२ जमातवादाचा विकास
१४.३ धर्मसुधारणा चळवळींचा जमातवादावर परिणाम
१४.४ फुटीरतावादी चळवळी
१४.५ महिलांचे सबलीकरण
१४.६ सारांश
१४.७ प्रश्न

## १४.० उद्दिष्टे

१) भारतातील जमातवादाचा विकास समजून घेणे.
२) स्वातंत्र्यानंतरच्या फुटिरतावादी चळवळी जाणून घेणे.
३) ईशान्येकडील राज्यांच्या फुटिरतावादी चळवळी अभ्यासणे
४) स्वातंत्र्यानंतर महिलांचे सबलीकरण कशाप्रकारे झाले यांचा परामर्श घेणे.

## १४.१ प्रस्तावना :

भारताच्या स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये विविध सामाजिक, आर्थिक, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये बदल घडून आले. भारतामध्ये हिंदू व मुस्लिमांचे प्रश्न निर्माण होऊन जमातवादाचा विकास मोठ्या प्रमाणात झाला व त्याचे दूरगामी परिणाम भारताच्या समाज व्यवस्थेवर झाले. तसेच आर्थिक व धार्मिक मागासलेपणामुळे फुटीरतावादी चळवळी वेगवेगळया भागात उदयास आल्या. भारतामध्ये १९४७ नंतर महिलांचे सबलीकरण व अनुसुचित जाती, जमाती व इतर मागास वर्गियाचे संरक्षण आरक्षणाच्या माध्यमातून करण्यात आले. तसेच

भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भरीव कामगिरी संशोधक व शास्त्रज्ञानी केली. त्यांनी अवकाश संशोधन, अणुसंशोधन, शिक्षणक्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, संगणक इत्यादी क्षेत्रात मोठे शोध लावले व भारताचे नाव जगाच्या इतर देशांमध्ये अजरामर केले. अशाप्रकारे भारताने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करुन नेत्रदिपक यश मिळविले.

## १४.२ जमातवादाचा विकास :

भारतीय समाज हा बहुरंगी, बहुढंगी असून प्राचीन काळापासून गुण्यागोविंदाने लोक नांदत आले आहेत. त्यांचे आचार-विचार, रुढीपरंपरा, धर्म आणि संस्कृती भिन्न असले तरी परस्परांशी ते समतेचा व सौजन्याचा व्यवहार करीत होते. या उलट एकाच धर्माची माणसे व राष्ट्रे आपापसात संघर्ष करताना दिसून येतात. भारतात मात्र प्रत्येक खेड्यात राज्यात आणि साम्राज्यात हिंदू-मुसलमान व्यापारी, समाज शेजारी राहू लागले. परंस्परांनी एकमेकांचे आचारविचार, खानपान, विदया, कला आत्मसात केली एवढेच नव्हे तर अंतरंग एकच आहे. वैदिक तत्त्वज्ञान व मुसलमानातील सूफी पंथाचे तत्त्वज्ञान यात फारसा फरक नाही याची जाणीव झाली. सर्व धर्मातील संतानी विशेषतः संत ज्ञानेश्वरापासून संत रामदासापर्यंत सुफी संत कबीर, शीख धर्म संस्थापक गुरु नानक, तुलसीदास, सूरदास इत्यादी संतांनी हाच संदेश जगाला दिला. थोडक्यात इंग्रज भारतात येण्यापूर्वी सर्व भारतीयांची मिळून एक संमिश्र संस्कृती येथे जन्माला आली होती, नांदत होती.

जमातवाद हा परंपरागत नसून अगदी अलिकडे आधुनिक काळात हिंदू-मुस्लीम धर्मियांत जमातवादाचा उदय झाला. भारतातील जमातवादाच्या समस्येला केवळ हिंदू-मुस्लिम प्रश्न किंवा या दोन धर्मातील विरोध असे म्हणता येणार नाही. या समस्येला धार्मिक आधाराबरोबरच स्वार्थी राजकारणाचा मोठा आधार आहे. खऱ्या अर्थाने भारतीय जमातवादाला खतपाणी घालणारा आणखी एक प्रभावी घटक इंग्रजांच्या रुपाने भारतीय राजकारणात वावरत होता. ते मुसलमानांचे मित्र नव्हते तसेच हिंदूचे शत्रू नव्हते. त्यांचे उद्दिष्ट ब्रिटीश साम्राज्यवाद होता. १८५३ ते १८६० या काळात मुंबईचे गव्हर्नर जॉन एल्फिन्स्टनने 'विभाजीत करा व राज्य करा' या मार्गाचा अवलंब केला. १८५७ च्या उठावात हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य पाहून इंग्रजांनी इतका धसका घेतला की ही एकी नष्ट करण्याचे प्रयत्न सुरु केले. त्यामुळे आधुनिक काळात या दोन धर्मियात जमातवादाचा उदय झाला. आपल्या धार्मिक तत्वज्ञानाबद्दल, धर्मग्रंथांबद्दल, समाजाबद्दल, राजकारणाबद्दल वाटणारा कट्टर अभिमान व इतर धर्मांबद्दल वाटणारा द्वेष याला जमातवाद असे म्हणतात. भारतात १९ व्या शतकात हिंदू व मुस्लिम या जमातीत जमातवादाचा उदय होऊन जमातवादाने उग्र स्वरुप धारण केले. धार्मिक दंगलींना सुरुवात झाली. देशाचे कधीही भरुन न येणारे नुकसान झाले आणि देशाची फाळणीही घडून आली.

### १४.२.१ राष्ट्रीय नेत्यांचा उदारमतवादी दृष्टीकोन :-

इ.स. १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊन राष्ट्रीय चळवळीला दिशा मिळाली. या स्वातंत्र्य चळवळीत अनेक हिंदू-मुस्लिम नेत्यांनी भाग घेतला. १९०५ पर्यंत भारतात

जमातवादाचा फारसा उदय झालेला नव्हता. १९०६ मध्ये इंग्रजांच्या 'फोडा,झोडा आणि राज्य करा' अशा स्वार्थी राजकारणामुळे मुस्लिम लीगची स्थापना होऊन हिंदू-मुस्लिम विभक्तवादाला चालना मिळाली. असे असले तरी धर्माबद्दल अनेक राष्ट्रीय नेत्यांचा दृष्टीकोन हा उदारमतवादी होता. स्वातंत्र्य आंदोलनात हिंदू-मुस्लिमांनी मतभेद विसरुन सहभागी व्हावे असे त्यांना वाटत होते. लो.टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल या जहाल नेत्यांप्रमाणेच म.गांधी, मौलाना आझाद, खान अब्दुल गफारखान यांनी संमीश्र संस्कृतीचे व उदारमतवादाचे समर्थन केले.

लो.टिळकाच्या हिंदू संस्कृतीच्या श्रेष्ठत्वावर विश्वास असला तरी राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत मुस्लिमांचे सहकार्य आवश्यक आहे असे त्यांचे ठाम मत होते म्हणूनच त्यांनी १९१६ च्या लखनौ करारात दोन्ही धर्मांत ऐक्य घडवून आणले. मौलाना अब्दुल कलाम आझाद हे लो.टिळकांच्या तोलामोलाचे राष्ट्रीय मुस्लिम नेते होऊन गेले. त्यांनी महमद पैगंबरांचा संदेश मुस्लिम राष्ट्रभक्तांपर्यंत पोहचावा या हेतूने कुराणाचे उर्दूत सटीक भाषांतर केले. इस्लामी धर्म व संस्कृती यांचा अभिमान बाळगूनही हिंदी राष्ट्रीय निष्ठा जोपासल्या जाऊ शकतात हे त्यांनी दाखवून दिले. माझे राजकारण हा माझा धर्म आहे असे जेव्हा गांधीजी म्हणत तेव्हा धर्माचा त्यांना अभिप्रत असलेला संदर्भ हिंदू धर्माशी नव्हता हे स्पष्टच होते.

समाजात चाललेले सर्व व्यवहार न्यायबुध्दीने चालू राहणे हेच खरे धर्मराज्य आहे यादृष्टीने राष्ट्रवादी नेते धर्माकडे पाहत असल्याने त्यांची धर्मकल्पना संकूचित नसून सर्वसमावेशक होती. धर्माकडे ते क्रांतीकारी शक्ती म्हणून बघत होते. स्वातंत्र्यानंतरही पंडित नेहरु व सरदार पटेलांनी सर्व धर्मीयांच्या बाबत उदार दृष्टीकोन स्विकारला परंतू यावेळेपर्यंत हिंदू राष्ट्रवाद व मुस्लिमांचा जमातवाद भारतात स्थिर झाला होता. अनेक हिंदूत्ववादी व कट्टर इस्लामवादी संघटनांची वाढ झाली होती. हिंदू-मुस्लिम दंगली राष्ट्रीय समस्या बनल्या.

### १४.२.२ हिंदूचा धार्मिक राष्ट्रवाद :

राष्ट्रीय आंदोलनात जसे हिंदू-मुस्लिम जवळ येऊ लागले तसे ब्रिटीश शासनाने ही एकी होऊ नये यासाठी राजकारण सुरु केले. या प्रयत्नात लॉर्ड डफरीन आघाडीवर होते. त्यांनी हिंदुस्थानात हिंदू व मुसलमान अशी दोन राष्ट्रे नांदत असल्याची हाकाटी सुरु केली. राष्ट्रीय कॉंग्रेस ही फक्त हिंदूची संघटना ठरवून मुस्लिमांना तिच्यापासून फोडण्याची कपटनिती सुरु केली. या कारस्थानाला हिंदु व मुस्लिम नेते बळी पडले. त्यातून धर्माच्या आधारावर वेगळया राष्ट्राची मागणी सुरु झाली. कॉंग्रेसचे जहाल नेते एकीकडे हिंदू धर्म व संस्कृतीच्या आधारे राष्ट्रभावना चेतवीत होत त्याचवेळी मुस्लिम समाजाचे सहकार्य मिळविण्याचाही प्रयत्न करीत होते. पण ब्रिटिशांच्या कूटनितीमुळे मुस्लिम नेते कॉंग्रेसबद्दल साशंक होऊ लागले होते. देशातील प्रमुख राजकीय केंद्रे असलेल्या ठिकाणी उसळलेल्या हिंदू-मुस्लिम दंग्याचे प्रमाण वाढत चालले होते.

१९०७ मध्ये पंजाबमध्ये घडलेल्या तीव्र दंगलीमुंळे व हिंदू महासभेच्या स्थापनेमुळे (१९१५) हिंदूराष्ट्र कल्पनेला आकार प्राप्त झाला. १९२१ च्या जनगणनेच्या आधारे हिंदू

महासभेने पुढील ४२० वर्षात मुस्लिम जमात नष्ट होण्याचे भाकित केले व हिंदूंचे संख्याबळ वाढविण्याचे आवाहन दिले. परधर्मात गेलेल्या हिंदूना स्वधर्मात आणण्यासाठी शुध्दी चळवळ सुरु केली. स्वामी श्रध्दानंद हे या चळवळीच्या केंद्रस्थानी होते. तेथूनच हिंदू राष्ट्रव्रादाने जहाल व आक्रमक स्वरुप धारण केले. हिंदू राष्ट्रवादयांना इटलीतील फॅसिस्ट राजवटीच्या व तिच्या हुकूमशहाच्या प्रत्यक्ष सहवासात आलेले पहिले हिंदू राष्ट्रवादी पुढारी बी.एस्.मुंजे हे होते. त्यांनीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला फॅसिस्ट पध्दतीवर आकार दिला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा या हिंदूत्वाच्या दोन आघाड्या वाढत गेल्या. स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर हे हिंदु महासभेचे अध्यक्ष होते. डॉ.हेडगेवार हे १९२६ ते १९३१ या काळात संघाचे राष्ट्रीय स्वयंसेवक अध्यक्ष होते. सावरकरांनी सुरुवातीला हिंदू-मुस्लिम ऐक्याचा विचार केला. परंतु नंतरच्या काळात मुस्लिम समाजाला वगळून ते राष्ट्राची व्याख्या करु लागले. स्वातंत्र्यानंतर अनेक हिंदूत्ववादी संघटना वाढत गेल्या. त्यामध्ये भारतीय जनता पार्टी, विश्व हिंदू परीषद, बजरंग दल, शिवसेना या संघटना प्रमुख आहेत. पाकिस्तानच्या फाळणीच्या नंतर हा हिंदू कट्टरवाद वाढतच गेला. हिंदू संघटनांनी राजकारणातही जम बसवला. हिंदू जमातवादाला चालना मिळून त्याचे पर्यावसान ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी मशीद तोडण्यात झाले. त्यातून संपूर्ण देशभर हिंदू-मुस्लिम दंगली घडून प्रचंड जिवीत व वित्तहानी झाली. यास खऱ्या अर्थाने हिंदुत्ववादी पक्ष व संघटना जबाबदार होत्या.

### १४.२.३ मुस्लिम धार्मिक राष्ट्रवाद :

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात अनेक मुस्लिम नेते हिंदू-मुस्लिम एकतेचे समर्थक होते. त्यामध्ये बॅ.महमद अली जीना हे प्रमुख होते. मुस्लिमांनी स्वयंशासनासाठी हिंदूंना सहकार्य करावे असे त्यांचे म्हणणे होते. मुस्लिम लीगचा त्यांना विरोध होता. परंतू पहिल्या महायुध्दानंतर भारतात अलीबंधूंनी तुर्कस्थानच्या खलीफाची पुनर्स्थापना करण्यासाठी ब्रिटीशांविरुध्द खिलाफत चळवळ सुरु केली. या चळवळीला म.गांधींनी पाठिंबा दिला. पण धार्मिक राजकारणाची चीड असल्यामुळे बॅ.जीनांनी विरोध केला. या घटनेमुळे जीना काँग्रेसपासून दूर गेले. हिंदू महासभेने त्यांच्यावर जमातवादीपणाचा आरोप केला. त्यामुळे बॅ.जीना हिंदू विरोधी झाले व मुस्लिम कट्टर वादाला खतपाणी घालू लागले. भारतातील इस्लाम धोक्यात असल्याची घोषणा करुन त्यांनी दंगलींना चालना दिली. पुढे तर त्यांनी स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करुन काँग्रेसला मोठा धक्का दिला.

दुसरे मुस्लिम नेते सर सय्यद अहमद खान हे देखील हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. परंतू ब्रिटीशांच्या जाळयात ओढले गेल्याने ते हिंदूंचे कट्टर विरोधक बनले. त्यांनी अलीगढ विश्वविदयालय मुस्लिम राजकारणाचे केंद्र बनविले. महंमद इकबाल या राष्ट्रीय कवीने १९३० मध्ये मुस्लिम लीगच्या अध्यक्षपदावरुन बोलताना मुस्लिमांच्या वेगळया राज्याची कल्पना मांडली. यातून पुढे १९४६ मध्ये मुस्लिमांनी पाळलेल्या 'प्रत्यक्ष कृती दिनाच्या' निमित्ताने भारतात दंगली उसळल्या. लाखो लोकांची कत्तल झाली. मुस्लिमांच्या जमातवादापुढे काँग्रेसने हार पत्कारली व स्वतंत्र पाकिस्तानची मागणी मान्य केली.

## १४.३ धर्मसुधारणा चळवळींचा जमातवादावर अप्रत्यक्ष परिणाम

१९ व्या शतकातील हिंदू व मुसलमान धार्मिक सुधारणा चळवळींत काही परस्पर विरोधी तत्वे होती. आपल्या धर्मातील जुन्या टाकावू प्रथापरंपरा नष्ट करुन धर्माला उजाळा देणे ह्या चळवळींचा उद्‌देश होता. परंतू त्यातून काही अनिष्ट तत्वे निर्माण झाली. वहाबींनी सर्व बिगरमुस्लिम जनतेविरुध्द जिहाद पुकारणे आणि देशाला 'दार-उल-इस्लाम' बनविण्याचे स्वप्न पहाणे हिंदूंना चीड आणणारी गोष्ट होती. उलट या देशाला 'आयावर्त' बनविणे,काहींना हिंदू धर्मात परत येण्याचे आवाहन करणे मुसलमानांना अमान्य होते. स्वामी विवेकानंदानी प्राचीन भारताच्या वैभवशाली, गौरवशाली परंपरेचा उल्लेख केल्यामुळे काही मुसलमान नाराज होते आणि ते आपल्या परंपरासाठी पश्चिम आशियाच्या संस्कृतीकडे, इतिहासाकडे पाहू लागले.

### १४.३.१ भारतीय इतिहास लेखनातील जमातवाद :

काही इंग्रज इतिहासकारांनी हिंदू-मुसलमान प्रश्न डोळयासमोर ठेवून भारतीय संस्कृतीचा इतिहास लिहिला आणि अप्रत्यक्षपणे साम्राज्यवादाला चालना दिली. त्यांचे अनुकरण करुन काही भारतीय इतिहासकारांनी तसेच प्रतिपादन केले उदा. प्राचीन भारताच्या इतिहासाला 'हिंदू युग' आणि मध्ययुगीन इतिहासाला 'मुस्लिम युग' असे संबोधून ऐतिहासिक कालखंडाचा आधार धर्म ठरविला. आपल्या राजकीय व आर्थिक उद्दिष्टपूर्तीसाठी राजा आणि प्रजा दोघांनीही धर्माचा आधार घेतला हे खरे आहे. परंतु सर्व मुसलमान शासक होते आणि हिंदू शासित होते असे म्हणणे म्हणजे वस्तुस्थितीचा विपर्यास होय. मुस्लिम सत्तेच्या काळात हिंदूचे शोषण झाले व तेवढे नसले तरी सामान्य मुसलमानांचेही शोषण झाले. शासक मुस्लिम असले तरी सर्वसाधारण मुसलमान गरिब होते. पण अशाप्रकारच्या सत्याकडे पाठ फिरवून केवळ जातीय दृष्टिकोनातून लिहिले गेलेल्या इतिहासाने १९ व्या शतकाच्या शेवटचा कालखंड आणि २० व्या शतकाच्या पूर्वाधातील भारतीय राजकारणाला प्रभावित केले.

### १४.३.२ नवीन वीरगाथा व जमातवाद :

२० व्या शतकाच्या सुरुवातीला जहालवादयांनी महाराणा प्रतापसिंह, छत्रपजी शिवाजी महाराज व गुरु गोविंदसिंह यांना राष्ट्रपुरुष मानून त्यांच्या वीरगाथा जनेतेपर्यंत पोहचविण्याचे प्रयत्न केले. मरगळ आलेल्या हिंदू समाजाला देशभक्तीने भारावून टाकणे, इंग्रजांविरुध्द लढा देण्यास तयार करणे, अन्यायाचा प्रतिकार करण्यास शिकविणे यासाठी वरील आदर्श समोर ठेवण्यात आले. दृष्टी राष्ट्रवादाचीच होती पण असे करताना जाणता-अजाणता अकबर, शहाजहान, औरंगजेब इ. मुस्लिम बादशहांना परकीय संबोधल्यामुळे मुसलमान अस्वस्थ झाले. त्यास खतपाणी घालण्याचे काम मुसलमान पुढाऱ्यांनी केले. त्यातून जमातवाद वाढीस लागला. लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, अरविंद घोष व नंतरच्या काळात म.गांधी हे सर्व हिंदू-मुस्लिम ऐक्याचे समर्थक होते. जनतेला, प्रबोधित करताना त्यांना समजण्यासाठी काही उदाहरणे देत. स्वाभाविक ती हिंदू संस्कृती परंपरांशी निगडीत अशी होती. आदर्श राज्याची कल्पना करताना म.गांधीनी स्वाभाविकरित्या 'रामराज्य' शब्दाचा वापर केला. ते एक उदाहरण होते, लोककल्याणकारी शासनाचे प्रातिनिधीक रुप होते. वास्तविक त्यात जातीयता नव्हती. परंतु

इंग्रजांनी त्यास जमातवादाचा रंग दिला व मुस्लिम पुढाऱ्यांनी ते उचलून धरले. परिणामी रामराज्य हा शब्दही मुसलमानांना खटकू लागला. जातीयवादाचे विष हळूहळू पसरु लागले व याचे दुरगामी परिणाम भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवर झाले.

### १४.३.३ राजकारणातील जमातवाद :

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरुंच्या नेतृत्वाखाली भारताने धर्मनिरपेक्षतेची घोषणा केली. देशाची धार्मिक विविधता, फाळणीचा विदारक अनुभव व अल्पसंख्यांकांना वाटणारी असुरक्षितता या कारणांमुळे धर्मनिरपेक्षतेचा आधार घेणे गरजेचे होते. राज्यघटनेने अल्पसंख्याकांना विशेष हक्क व संरक्षणे दिली. नेहरुंच्या दृष्टीने आधुनिकीकरण हे भारताचे राष्ट्रीय तत्वज्ञान होते त्यासाठी त्यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादावर भर दिला. तरीही भारतीय राजकारणांत धार्मिक जमातवाद टिकून राहीला कारण राज्यकर्ते समान नागरी कायंदा आणू शकले नाहीत. सर्व धर्मांच्या सण, उत्सवांना सरकारी सुट्या सुरुच राहील्या. बनारस हिंदू विदयापिठ, अलीगढ मुस्लिम विदयापीठांना केंद्रिय विदयापीठांचा विशेष दर्जा दिला गेला. मंत्री धार्मिक विधींना हजेरी लावू लागले. त्यामुळे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचा विकास देशात घडून आला नाही. स्वातंत्र्यानंतर हिंदू-मुस्लिमांप्रमाणे शीखांच्याही जमातवादाला चालना मिळाली त्यातून स्वतंत्र खलीस्तानची मागणी उभी राहिली. २० व्या शतकाच्या शेवटी हिंदू राष्ट्रवाद, हिंदू संघटन व हिंदूराष्ट्र या संकल्पनांना पुन्हा महत्व प्राप्त झाले. १९८२-८३ मध्ये विश्व हिंदू परिषदेने एकमाता यात्रा काढून मुस्लिम व ख्रिश्चनांकडून हिंदूचे धर्मातर होत असल्याने हिंदूनी एकत्र यावे असे आवाहन केले. १९८४ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक विनय कटीयार यांनी उत्तर प्रदेशात बजरंग दल या नावाने लढाऊ शाखा स्थापन केली. तरुण स्त्रियांसाठी विश्व हिंदू परिषदेने दूर्गा वाहिनी ची स्थापना केली.

अल्पसंख्याकांचा अनुनय, काँग्रेसचे चूकीचे धोरण, अर्थव्यवस्थेला अपयश, कट्टर धर्मसंघटनांना वेळीच रोखण्याचे उपाय न करणे यातून वरील संघटना वाढत गेल्या. त्यांनी आयोध्येतील बाबरी मशीद जमीनदोस्त केली. या सर्व जमातवादाचा प्रभाव भारतीय राजकारणावर अत्यंत वाईटरित्या पडला. धर्मनिरपेक्षता व संमिश्र राष्ट्रवादाचा विचार मांडणाऱ्यांना सेक्युलर ठरवून हिंदू संस्कृतीचे दुश्मन ठरवले गेले. राजकारणात हिंदूत्ववादी संघटनांना मोठ्या प्रमाणात यश मिळत गेले. हिंदू संघटनाप्रमाणेच जमाते-इ-इस्लामी, मुस्लीम लीग, अकाली दल व ख्रिश्चन संघटनादेखील राजकारणात प्रभाव पाडू लागल्या. १९५२ मध्ये लोकसभेत १४ जागा मिळवणाऱ्या जनसंघाने १९६७ मध्ये ३५ जागा जिकंल्या. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व राजस्थानात जनसंघाचा प्रभाव वाढत होता. १९६० नंतर देशात अनेक ठिकाणी दंगली झाल्या. १९६४, १९६९ मध्ये ५२० आणि १९७० मध्ये ५२१ दंगली होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत-वित्त हानी झाली. १९७५-७७ या आणिबाणीच्या काळात हिंदू-मुस्लिम जामातीच्या नेत्यांनी आपल्या संघटना अधिक गतीशील बनविल्या. इंदिरा सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, जनसंघ, जमाते-इ-इस्लामी या संघटनांवर बंदी आणली. आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत जनसंघ हा बलशाली पक्ष म्हणून पुढे आला व त्यांनी ही बंदी उठवली. जनता सरकारच्या काळात जमातवादाला अधिक चालना मिळाली.

### १४.२.५ स्वार्थी राजकारणाचे परिणाम :

एका बाजूला जमातवाद वाढत असताना दुसऱ्या बाजूला तो कमी करण्याऐवजी राजकीय नेते त्याला वाढविण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. भारतातील या राजकीय परिस्थितीचा फायदा पाकिस्तानसारख्या राष्ट्राला मिळून भारतातील जमातवादाला खतपाणी घालण्याचे काम मोठ्या प्रमाणात या शेजारील राष्ट्रांकडून होते.

भारताच्या राज्यघटनेने उदारमतवादी व धर्मनिरपेक्षतेचे धोरण स्विकारले असले तरी राजकारणात त्याचा फारसा स्विकार केलेला दिसत नाही. सत्ता मिळविण्यासाठी राज्यकर्ते कोणत्याही कट्टर धार्मिक संघटनेशी तडजोड करायला तयार होतात व एकप्रकारे कट्टरवादाला आश्रय देतात. काँग्रेसने आघाडी करतांना मुस्लिम संघटनांना जवळ केले. मुस्लिम पर्सनल लॉ, विविध देणग्या, मशिदींना संरक्षण दिले गेले. मुस्लिमांबद्दल पंडित नेहरु व इंदिरा गांधी काळात उदार व धर्मातीत दृष्टीकोन स्विकारला गेला. १९६० मध्ये केरळमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून निवडून आलेल्या काँग्रेसने मुस्लिम लीगशी युती केली. त्यानंतरच्या काळात केरळमध्ये कम्युनिस्ट पक्ष सत्तेवर आला. त्यानेही मुस्लिम लीगशी युती केली. पंजाबमध्ये अकाली दलाने मुस्लिम लीगची मदत घेतली. ज्या मुस्लिम लीगने देशाची फाळणी घडवुन आणली तीच मुस्लिम लीग स्वातंत्र्यानंतर भारतीय राजकारणात प्रभावी बनली. १९७५-७७ आणिबाणीच्या काळात जयप्रकाश नारायण यांच्या संपूर्ण क्रांतीला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व जमाते-इ-इस्लामी या संघटनांनी पाठींबा दिला. १९७७ च्या जनता सरकारमध्ये प्रभावी पक्ष म्हणून जनसंघाचा उदय झाला. संकुचित राजकारणामुळे धार्मिक संघटना मोठ्या प्रमाणात वाढत गेल्या. या संघटनांच्या पाठिंब्यांसाठी राजकीय नेते अनेक आश्वासने देऊ लागले. भारतात हिंदूंप्रमाणेच मुस्लिम, शीख, ख्रिश्चनांचा जमातवाद हा भयानक बनत गेला. त्यातून देशाचे प्रचंड नुकसान घडून आले. शीख जमातवादाला चालना मिळाल्यामुळे १९८० मध्ये पंजाब प्रश्न गंभीर बनला. जमातवादी संघर्षामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला कायम धक्के बसले, सामाजिक शांतता व एकता धोक्यात आली, दोन जमातींमधील संशयाचे वातावरण नष्ट होऊ शकले नाही.

जमातवादी भावना कमी होण्यासाठी राजकीय क्षेत्रात मोठे बदल घडून येणे आवश्यक आहेत. प्रत्येक राज्यातील सरकारांनी लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे आवश्यक आहे. शिक्षण व रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध करुन दिले पाहिजेत, जलद आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या पाहिजेत. लोकांमध्ये परस्पर विश्वासाचे सहकार्याचे वातावरण निर्माण करावे लागेल तरच धार्मिक कट्टरतावाद, संघर्ष व जमातवाद कमी होईल.

### आपली प्रगती तपासा:

१ भारतीय इतिहास लेखनातील जमातवादावर थोडक्यात टीप लिहा.

---

---

---

---

## १४.४फुटीरतावादी चळवळी

१९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी या स्वातंत्र्यासमोर अनेक गंभीर समस्या आवासून उभ्या होत्या. भारताला मिळालेले स्वातंत्र्य टिकू शकेल की नाही याबद्दल पाश्चात्यांनाही शंका होती. परंतु पंडित जवाहरलाल नेहरु सरकारने विविध मार्गानी या समस्या सोडविण्याचे प्रयत्न केले. त्यात त्यांना काही प्रमाणात यशही आले. शेकडो संस्थानांना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळाल्याने भारताच्या अखंडतेला धोका निर्माण झाला. भारताचे गृहमंत्री सरदार पटेलांनी अतिशय सावधपणे प्रसंगी कठोरपणे या सर्व संस्थानांचे विलीनीकरण घडवून आणले व अखंड भारताचे स्वप्न पूर्ण केले. यानंतर पंडित नेहरुं पुढे भाषिक राज्याचा प्रश्न निर्माण झाला. त्यासाठी देशभर आंदोलने व दंगली झाल्या. भाषिक राज्य निर्मितीमुळे देशाची एकता डळमळू लागली. चीन व पाकिस्तानच्या गुप्त कारवायांमुळे या एकतेला कायम धक्के बसू लागले. भारताचे तुकडे करण्यासाठी शत्रू राष्ट्रांनी मोठी मोहीम उघडली. त्यातूनच भारतात काश्मीर व पंजाबसारखे गंभीर प्रश्न निर्माण झाले. अनेक राज्यात फुटीरतावादी किंवा अलगतावादी चळवळी निर्माण झाल्या. त्याचे अनेक वाईट परिणाम देशाला भोगावे लागले.

### १४.३.१ काश्मीर समस्या :

भारतात स्वातंत्र्योत्तर काळात ज्या काही गंभीर समस्या निर्माण झाल्या त्यापैकी एक काश्मीर समस्या होय. भारतातील अनेक अंतर्गत प्रश्न सोडविण्यात सरकारला यश आले. पंरतू काश्मीर प्रश्न अदयापही सुटू शकला नाही. त्यामागे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे राजकारणही जबाबदार आहे. पाकिस्तानच्या फाळणीनंतर पाकला काश्मीर हवा होता. त्यासाठी पाकने हिंसक कारवायांना सुरुवात केली. तेव्हापासून काश्मीरची जखम चिघळत गेली आणि अदयाप ती बरी होऊ शकली नाही.

जम्मू-काश्मीर राज्याचे भारताच्या नकाशावरील स्थान पाहिले तर हे राज्य आंतरराष्ट्रीय दृष्टीने महत्वाचे आहे. काश्मीरला निसर्गाचे फार मोठे वरदान लाभलेले आहे. प्रचंड नैसर्गिक साधनसामग्रीची उपलब्धता व प्रमुख पर्यटन स्थळ असल्यामुळे या राज्यातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न सरकारला मिळते. १९८१ च्या जनगणनेनुसार या राज्याची एकूण लोकसंख्या होती. राज्यातील काश्मीर खोऱ्यात ९६ टक्के मुस्लिम व ४ टक्के हिंदू होते. जम्मू मधील क्षेत्रफळापैकी ७८, ११४ चौ.कि.मी.चा प्रदेश पाकव्याप्त व ४२,७३५ चौ.कि.मी.चा प्रदेश चीन व्याप्त म्हणून ओळखला जातो. इंग्लंड-अमेरिका व चीनच्या राजकारणामुळे काश्मीर प्रश्न सुटू शकलेला नाही. या प्रश्नांचे घोंगडे संयुक्त राष्ट्रसंघात अदयाप भिजत पडलेले आहे.

#### १४.४.१.१ स्वातंत्र्यपूर्व काश्मीर :

इ.स. १९२५ मध्ये राजा हरिसिंग काश्मीरच्या गादीवर आला. त्याच्या आधी पिता अमरसिंह व काका प्रतापसिंह यांच्या संघर्षात अमरसिंहाने सत्ता मिळविण्यासाठी इंग्रजांची मदत घेतली. त्यामुळे अमरसिंह व त्यांच्यात मैत्रीचे संबंध होते. परंतु राजा हरिसिंहाचा स्वभाव पहाता त्याने इंग्रजांशी मैत्री करण्याऐवजी संघर्षात्मक भूमिका घेतली. १८८५ पासून श्रीनगरच्या

रेसिडेंट ऑफिसवर फडकत असलेले इंग्रजांचे युनियन जॅक त्याने काढून टाकले तसेच इंग्रजांच्या ताब्यात असणारा गिलगीट प्रांत १९२९ मध्ये ताब्यात घेतला.

या काळात काश्मीरमध्ये महत्वाचा उदय झाला ते म्हणजे शेख अब्दुल्ला यांचा ज्यांना 'शेर-ए-काश्मीर' असे म्हटले जाते. काश्मीरचा इतिहास म्हणजे शेख अब्दुल्लांचा इतिहास असेच समीकरण बनले होते. कवी मंहमद इकबाल हे त्यांचे प्रेरणास्थान होते. १९३० पर्यंत भारतवादी असलेले अब्दुल्ला नंतर भारतविरोधक बनले. त्यांच्या अध्यक्षतेखाली १६ ऑक्टोबर १९३२ रोजी ऑल जम्मू अँड काश्मीर मुस्लिम कॉन्फरन्स या संघटनेची स्थापना झाली तिलाच पुढे नॅशनल कॉन्फरन्स या नावाने ओळखले गेले.

या काळात काश्मीरमध्ये हिंदू-मुस्लिम दंगलींना प्रारंभ झाला. मुस्लिमांनी आंदोलन उभारले. 'इस्लाम खतरेमे' च्या घोषणा ऐकू येवू लागल्या. काश्मीरी पंडित श्री. बजाब यांनी म.गांधी व पंडित नेहरुंनी पत्रे पाठवून मदतीची याचना केली. संपूर्ण भारतात बॅ.जिनांच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांनी स्वतंत्र पाकिस्तानचे आंदोलन उभारले असतांना काश्मीरच्या शेख अब्दुल्लांना पाकिस्तान निर्माण व्हावे असे वाटत असले तरी पाकमध्ये जायचे नव्हते तर भारतातच पण स्वतंत्र राहायचे होते. १९४४ मध्ये पाठिंब्यासाठी शेख अब्दुल्लांनी बॅ.जीनांना बोलाविले असता त्यांनी मात्र नॅशनल कॉन्फरन्स ही गुंडांची संघटना असून पाकिस्तानचा प्रचार केला त्यामुळे अब्दुल्लांचा भ्रमनिरास झाला. ऑगस्ट १९४५ मध्ये पंडित नेहरुंनी काश्मीरला भेट देऊन काश्मीरी पंडितांना नॅशनल कॉन्फरन्समध्ये सामील होण्याचे आवाहन केले. १९ मे १९४६ रोजी शेख अब्दुल्लांनी राजा हरिसिंह विरुध्द काश्मीर छोडो आंदोलन सुरु केले व काही दिवसात बॅ.जीनांनी भारतभर १६ ऑगस्ट १९४६ रोजी 'प्रत्यक्ष कृती दिन' जाहीर केला.

### १४.४.१.२ काश्मीरचे विलीनीकरण :

१४ व १५ ऑगस्ट १९४७ रोजी अनुक्रमे पाकिस्तान व भारत या दोन स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म झाला. भारताच्या स्वातंत्र्यावेळी ब्रिटिशांनी कपटनिती करुन संस्थानांना सार्वभौम बनवून भारताचे शेकडो तुकडे करण्याचे कारस्थान रचले. परंतु सरदार पटेलांच्या पोलादी धोरणामुळे शेकडो संस्थाने भारतात विलिन झाली. काही संस्थांनांचा प्रश्न मात्र सुटू शकला नव्हता त्यापैकी काश्मीर हे संस्थान होते. माऊंट-बॅटनला काश्मीर पाकला मिळावे असे वाटत होते. त्यामुळे पंडित नेहरुंनी काश्मीरबाबत उदासीन धोरण स्विकारले. सप्टेंबर १९४७ पासून पाकने आपले सैन्य काश्मीरमध्ये घुसवले. २२ ऑक्टोबर १९४७ पासून पाकने 'ऑपरेशन गुलमर्ग' सुरु करुन भारतीय सैनिकांवर हल्ले सुरु केले. काश्मीरमध्ये घुसखोरांनी प्रचंड विध्वंस सुरु केला. बारामुल्ला पूर्ण निर्मनुष्य झाले. १४ हजार लोकसंख्येच्या शहरात १२ हजार लोक मारले गेले. बलात्काराची गणतीच नव्हती. या घटनेमुळे शेख अब्दुल्लांना धक्का बसला. महाराज हरिसिंह व पंतप्रधान महाजनांनी भारताकडे मदत मागितली. यावेळेपर्यंत घुसखोर श्रीनगरजवळ पोहचले. परिस्थितीच्या दडपणाखाली राजा हरिसिंगने २६ ऑक्टोबर १९४७ रोजी भारतात विलीन होण्याच्या करारावर सह्या केल्या. शेख अब्दुल्लांनीही याला पाठींबा दिला. एल.पी.सेन या लष्करी अधिकाऱ्याने पराक्रम गाजवून काश्मीर खोरे मुक्त केले. उरी ताब्यात घेतले पण

सरकारच्या उदासीनतेमुळे सैन्य पुढे जाऊ शकले नाही. उरीपलीकडील भाग पाकव्यात काश्मीर बनला. १४ नोव्हेंबर १९४७ रोजी युध्दबंदी जाहीर करण्यात आली. माऊंट बॅटनच्या आग्रहामुळे नेहरुंनी काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात नेला. पण बड्या राष्ट्रांनी भारताबद्दल पक्षपाती धोरण स्विकारल्याने हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला.

### १४.४.१.३ शेख अब्दुल्लांचे राजकारण :

१९४८ मध्ये शेख अब्दुल्लांना काश्मीरचे पंतप्रधान बनवण्यात आले. राजा हरिसिंगाच्या जागी त्यांचा मुलगा डॉ. करणसिंग हा राजा बनला. परंतू काही काळातच काश्मीरच्या राजकारणावर शेख अब्दुल्लांचे वर्चस्व वाढले. त्यांनी पंडित नेहरुंकडे 'जर काश्मीरला खास दर्जा व वागणूक देत असाल तरच भारतात राहू' अशी धमकीवजा मागणी केली. त्यातून काश्मीरला खास दर्जा देणाऱ्या ३७० कलमाचा जन्म झाला. या कलमाला मंत्रीमंडळाने सुरुवातीला विरोध केला पण नंतर ते मंजूर झाले. तरीही शेख अब्दुल्लांचे विरोधाचे धोरण कायम राहिले. ३१ ऑक्टोबर १९५१ रोजी काश्मीरची घटनासमिती बनवण्यात आली. याविरुद्ध १९५२ पासून प्रजापरिषदेने आंदोलन सुरु केले. 'एक देशमें दो विधान दो निशान, दो प्रधान नही चलेंगे' अशा घोषण दिल्या. पण त्यांची समजूत नेहरुंनी घातली.

लवकरच पंडित नेहरु व शेख अब्दुल्ला यांच्यातील संघर्षाला सुरुवात झाली. १९५३ पासून अब्दुल्ला स्वतंत्र काश्मीरची भाषा बोलू लागले. त्यामुळे ८ ऑगस्ट १९५३ रोजी शेख अब्दुल्लांना अटक करण्यात आली. शेख अब्दुल्लांनी अटकेत असतांनाही हालचाली सुरु ठेवल्या व आपली पत्नी बेगम अब्दुला व जावयाचा भाऊ ख्वाजा अलिशाह यांच्या मदतीने 'वॉर कॉन्सील' या दहशतवादी संघटनेची स्थापना केली.त्यांनी पुन्हा आंदोलन सुरु केल्याने ३० एप्रिल रोजी पुन्हा अटक केली. त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला चालविण्यात आला. ८ एप्रिल १९६४ रोजी त्यांची मुक्तता झाली.या दरम्यान २७ मे १९६४ रोजी पंडित नेहरुंचे निधन होऊन लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले.

### १४.१.१.४ पाकिस्तानचे राजकारण :

स्वतंत्र काश्मीरसाठी शेख अब्दुल्लांचे राजकारण सुरु असताना दुसऱ्या बाजूला काश्मीर पाकला मिळविण्यासाठी पाकिस्तानची धडपड सुरु होती. या राजकारणात पाकला पाश्चात्य राष्ट्रांनीही पाठींबा दिला. १९५४ मध्ये अमेरिका-पाक यांच्यात लष्करी करार झाला. सप्टेंबर १९५५ मध्ये अमेरिकेच्या पाठींब्याने पाकने काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघात पुन्हा उकरुन काढला.१९५७ मध्ये पाकमध्ये जनरल अयुबखानाची लष्करी राजवट सुरु झाली. या राजवटीला अमेरिकेने भरघोस लष्करी मदत दिली. तसेच चीन व पाकिस्तान यांच्यातील मैत्री वाढली. २ मार्च १९६३ रोजी चीन-पाकिस्तान सीमा निर्धारित करण्याच्या निमित्ताने पाकव्याप्त काश्मीर प्रदेशापैकी दोन हजार चौरस मैलांपेक्षाही मोठा प्रदेश पाकने चीनला देऊन टाकला. पंडित नेहरुंच्या मृत्यूनंतर पाकने १९६५ मध्ये भारताशी युध्द पुकारले. या युध्दात शेख अब्दुल्लांनी पाकला मदत केली. २२ दिवसात हे युध्द समाप्त होऊन पाकचा पराभव झाला. पूर्व पाकिस्तानच्या प्रश्नावरुन पुन्हा भारत-पाक यांच्यात १९७१ मध्ये युध्द झाले. या युध्दात पाकचा

दणदणीत पराभव होऊन बांगला देश स्वतंत्र झाला. युध्दात भारताचा आपण पराभव करु शकत नाही हे दिसून आल्याने पाकने काश्मीरमधील अतिरेकी संघटनांना भरघोस लष्करी व आर्थिक मदत देणे सुरु केले.

काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असल्यामुळे तो भारत व पाकिस्तान यांच्यातील वादाचा विषय असू शकत नाही. या भारताच्या भूमिकेला बळकटी आणण्यासाठी इंदिरा गांधीनी १९७५ साली शेख अब्दुल्लांशी वाटाघाटी करुन काश्मीरला घटनेच्या ३७० कलमान्वये देण्यात आलेला खास दर्जा कायम ठेवला जाईल, आर्थिक विकासासाठी केंद्र सरकारकडून साहाय्य दिले जाईल असे आश्वासन दिले. या आगोदर अब्दुल्लांना स्थानबध्द केलेले होते. त्यातून त्यांची मुक्तता करुन २५ फेब्रुवारी १९७५ रोजी काश्मीरचे मुख्यमंत्री बनविण्यात आले. १९७७ च्या निवडणुकीत नॅशनल कान्फरन्सला बहुमत मिळाले.

### १४.४.१.५ अतिरेकी कारवाया :

भारत सरकारचे उदासीन धोरण व शेख अब्दुल्लांची कारस्थाने यांच्यामुळे काश्मीरच्या फुटीरतावादी चळवळीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. काश्मीरला स्वतंत्र करण्यासाठी अनेक अतिरेकी संघटना निर्माण झाल्या. त्यामध्ये अल-फतेह, अल-बोरो, अल-काश्मीर, आझाद काश्मीर, जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट या सुरुवातीच्या काळातील प्रमुख संघटना होत्या. १९७० मध्ये अतिरेक्यांनी केलेल्या कारवाईत अनेक घरांना आगी लावल्या गेल्या. एकट्या बारामुल्लात दोन दुकाने ७७ घरे जळून भस्मसात झाली. दोन महिन्यात २०० आगी, विमान अपहरण घडून आले. राज्यात बॉबस्फोटाची मालीकाच सुरु झाली. १९८३ मध्ये भारत-वेस्ट इंडिज यांच्यात होणारा क्रिकेट सामना उधळला गेला. १९८४ मध्ये ६ कॉंग्रेस नेत्यांची हत्या झाली. पीपल्स लीग, पीपल्स कॉन्फरन्स, जमाते-इ-इस्लामी या संघटनांनी हत्यासत्र सुरु केले. नॅशनल कॅान्फरन्सच्या नेत्यांच्याही हत्या होऊ लागल्या. १९८८ मध्ये पाकच्या जनरल झियाचा अपघातात मृत्यू झाला. त्यावेळी काश्मीरमध्ये दंगली उसळल्या. अतिरेक्यांनी काश्मीरी जनतेसाठी अनेक हुकूम जारी केले. त्यामध्ये घड्याळे पाकच्या वेळेनुसार लावणे, शुक्रवारी न्यालयात जाऊ नये, स्त्रियांनी बुरख्याचे बंधन पाळावे इ.

१९८९ मध्ये प्रचंड हिंसाचार करण्यात आला. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या दिवशी तिरंगे जाळले जाऊ लागले. बुरखा न घालणाऱ्या तरुणींवर ॲसिडचे हल्ले करण्यात आले. २१ ऑगस्ट १९८० रोजी नॅशनल कॉन्फरन्सचे नेते युसूफ दलवाई व भाजपा नेते टापळू यांचा खून केला गेला. शेख अब्दुल्लांचे पुतळे जाळण्यात आले. मकबूल बट या अतिरेक्याला फाशीची शिक्षा सुनावणारे न्यायाधीश गंजू यांना दिवसाढवळया गोळ्या घातल्या. १९८९ च्या निवडणुकांवर बहिष्कार घातला. काश्मीरमधून हिंदूना हाकलेले जाऊ लागले. १९ डिसेंबर १९८९ रोजी केंद्रीय गृहमंत्र्याची मुलगी डॉ. रुबीया सईदचे अतिरेक्यांनी अपहरण केले. तिच्या सुटकेच्या मोबदल्यात भारत सरकारने पाच कडव्या अतिरेक्यांची सुटका केल्याने अतिरेक्यांचे मनोधैर्य वाढले. यानंतर हिजबूल मुजाहिदीन या नव्या दहशतवादी संघटनेचा उदय झाला. ३ लाख हिंदू काश्मीर सोडून निघून गेले. निर्वासितांची अत्यंत वाईट अवस्था झाली. काश्मीर खोऱ्यात फिरणेही धोक्याचे झाले.

८ डिसेंबर १९८२ रोजी शेख अब्दुल्लांचा मृत्यू होऊन त्यांच्या जागी त्यांचा मुलगा फारुख अब्दुल्ला मुख्यमंत्री बनले. पण त्यांनी पित्याचेच धोरण चालू ठेवले. अतिरेक्यांच्या वाढत्या कारवायांमुळे १९८४ मध्ये ते कांही काळ इंग्लंडला जाऊन राहीले इतकी गंभीर स्थिती निर्माण झाली होती. या दहशतवादामुळे काश्मीरचे नंदनवन उधवस्त झाले. भारत सरकारच्या प्रयत्नाने पुन्हा काश्मीरमध्ये निवडणूक प्रक्रिया सुरु करण्यात आली. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान झाले असता त्यांनी पाकशी मैत्री वाढवण्यावर भर दिला. त्यामुळे काश्मीरमध्ये पूर्वीपेक्षा काही प्रमाणात स्थिरता आली पण अजूनही हा प्रश्न पूर्णतः सुटू शकला नाही.

### १४.४.२ खलीस्तान चळवळ :

पंजाबमध्ये शीख धर्माची स्थापना गुरु नानकांनी केली. या धर्मात दहा धर्मगुरु होऊन गेले. हिंदू व इस्लाम धर्मातील चांगली तत्वे या धर्मात घेतली गेली. शीखांचे पाचवे गुरु अर्जुनसिंग यांनी अमृतसरमध्ये सुवर्णमंदिराची स्थापना केली. हेच मंदिर शीखांचे पवित्र धर्मस्थळ बनले. अर्जुनसिंगांचे पुत्र गुरु हरगोविंद यांनी येथेच अकाल तख्त मंदिर बांधले. मोगलकाळात शीख-मोगल संघर्षाला सुरवात झाली. त्यामुळे शेवटचे व दहावे धर्मगुरु गुरु गोविंदसिंगानी खालसा पंथाची स्थापना करुन शीखांचे लढाऊ जमातीत रुपांतर केले. १७९९ मध्ये रणजितसिंहाने शक्तीशाली शीख राज्याची स्थापना केली. १८४९ पर्यंत म्हणजे रणजितसिंहाच्या मृत्यूपर्यंत या राज्याची प्रचंड भरभराट झाली पण त्यानंतर इंग्रजांनी शिखांचे राज्य नष्ट केले. १८५७ च्या उठावात शिखांनी इंग्रजांना मदत केल्याने इंग्रजांनी लष्करात मोठ्या प्रमाणात शिखांची भरती केली तसेच त्यांच्या मनात शीख म्हणजे वेगळे राष्ट्र आहे ही फुटीरतावादी भावना रुजविली.

### १४.४.२.१ गुरुद्वारा मुक्ती चळवळ :

भारतात स्वातंत्र्य चळवळ सुरु असताना १३ एप्रिल १९१९ मध्ये पंजाब प्रांतातील जालीयनवाला बाग येथे जनरल डायरने भयानक हत्याकांड घडवून आणले. असे असताना ब्रिटिश समर्थक असलेल्या सुवर्णमंदिरातील शीख धर्मगुरुंनी जनरल डायरचा सुवर्णमंदिरात सत्कार केला. या घटनेचा सर्वसामान्य शिखांना तिटकारा वाटू लागला व त्यांनी ब्रिटिशनिष्ठ भ्रष्टाचारी धर्मगुरुंच्या नियंत्रणातून गुरुद्वारा मुक्त करण्यासाठी चळवळ सुरु केली. १९२५ मध्ये शीख गुरूद्वाराचे व्यवस्थापन योग्य रितीने व्हावे यासाठी एक ठराव पास करुन 'शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समिती स्थापन' केली. या समितीचे सदस्य शीखांनी निवडलेले असत. त्यासाठी लहान लहान मतदारसंघाची स्थापना करण्यात आली. त्यामुळे ही समिती म्हणजे शिखांची संसदच बनली.

### १४.४.२.२ अकाली दलाची स्थापन व फुटीरतावादाचा उदय :

शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीशी संबंध असलेल्या व शीखांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अकाली दल या राजकीय पक्षाची या काळात स्थापना झाली व पंजाबच्या राजकारणाला नवीन वळण लागले. काँग्रेस ही हिंदू संघटना आहे व तिच्याशी हातमिळवणी केल्यास शीखांचेअस्तित्व नष्ट होईल असे अकाली दलाचे मत असल्याने त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत ब्रिटिशांना सहकार्य देणे सुरु केले. दुसऱ्या महायुध्दानंतर लवकरच भारताला स्वातंत्र्य मिळाले. यावेळी हिंदूना

हिंदूस्थान, मुस्लिमांना पाकिस्तान मिळाले. शीखांना मात्र काहीच न मिळाल्याने अकाली दलाने स्वतंत्र शीख राष्ट्राची मागणी केली पण त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यामुळे भारताच्या राजकीय चौकटीतच राहून त्यांनी स्वायत्त पंजाबी राज्याची मागणी सुरु केली. पंडित नेहरुंनी ही मागणी फेटाळली. भाषिक राज्य मंडळानेही पंजाब हे संवेदनाक्षम सीमाराज्य असल्याने व तेथे पंजाबी व हिंदी भाषा बोलल्या जात असल्याने त्याचे विभाजन होऊ नये अशी शिफारस केली. त्यामुळे अकाली नेते संतापले. १९६६ मध्ये इंदिरा गांधीनी हिंदी भाषिक हरियाणा पंजाबपासून वेगळा करुन पंजाबी भाषिक राज्याच्या निर्मितीला मान्यता दिली.

### १४.४.२.३ आनंदपूर साहेब ठराव व खलिस्तान मागणीचा उदय :

पंजाबची सत्ता हस्तगत करण्याइतकी अकाली दलाची ताकद नव्हती. त्यामुळे १९७१ च्या निवडणूकीत काँग्रेसचा विजय होऊन ग्यानी झैलसिंग हे मुख्यमंत्री बनले. त्यांनी अकालीचे नेतृत्व स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न सुरु केल्याने अकाली नेत्यांनी खलिस्तानच्या मागणीला प्रारंभ केला. ज्या ठिकाणी शीखांचे दहावे धर्मगुरु गोविंदसिंग यांनी खालसांची पहिली सभा घेतली या ठिकाणच्या सभेत जेथे खालसा सर्वश्रेष्ठ असतील असे एक राज्य भारतात असले पाहिजे. पंजाबमध्ये केंद्र सरकारचा हस्तक्षेप केवळ संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, चलन व दळणवळण यापुरताच मर्यादित असावा असा ठराव पास केला. सार्वभौम सत्ता हातात असल्याशिवाय शीख धर्माचे संरक्षण करणे अशक्य आहे असे उघडपणे या ठरावात नमूद केले होते.

आणीबाणीनंतर १९७७ च्या निवडणूकीत अकाली दलाला बहुमत मिळून जनता पक्षाच्या मदतीने त्यांनी सरकार स्थापन केले. परंतू अंतर्गत मतभेदामुळे जनता सरकार कोसळले. १९८० साली झालेल्या निवडणूकीत केंद्रात इंदिरा गांधींचे सरकार येऊन पंजाबमध्येही काँग्रेसचे सरकार विराजमान झाले. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या अकालींनी संघर्षाला सुरुवात केली. सशस्त्र शीख तरुणांनी १९८१ पासून शीखांच्या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी हिंसाचाराला सुरुवात केली.

### १४.४.२.४ भिंद्रनवालेचा उदय :

१९८० च्या सुमारास पंजाबच्या अशांत वातावरणात जर्नेलसिंग भिंद्रनवाले या शक्तीशाली नेत्याचा उदय झाला. १९७७ मध्ये सत्तेवर असलेल्या अकाली पक्षात फूट पाडण्यासाठी ग्यानी झैलसिंग व संजय गांधींनीच भिंद्रनवाले यास हाताशी धरुन त्यांची ताकद वाढवली होती. हेच भिंद्रनवाले पुढे काँग्रेसविरोधी बनले. अकालींनी पुकारलेल्या धर्मयुध्दात ते सहभागी झाले. ९ सप्टेंबर १९८१ रोजी आपल्या वृत्तपत्रातून खलिस्तानला विरोध करणाऱ्या जगतनारायण संपादकाची हत्या झाली यामागे भिंद्रनवालेंचा हात होता. २० सप्टेंबर रोजी त्याला अटक झाली पण गृहमंत्रलयाच्या हस्तक्षेपामुळे १४ ऑक्टोबरला सोडून देण्यात आले. ग्यानी झैलसिंग केंद्रीय मंत्रिमंडळात गृहमंत्री होते. यानंतर भिंद्रनवालेंनी सुवर्णमंदिरात आपला तळ ठोकला. त्यांच्या सशस्त्र अनुयायांचा तेथे चोवीस तास पहारा असे. खलिस्तानच्या समर्थकांची त्यांच्याभोवती गर्दी वाढू लागली. प्रसिध्दीमाध्यमांनीही त्यांना मोठी प्रसिध्दी दिली.

**१४.४.२.५ इंदिरा गांधीचे वाटाघाटीचे प्रयत्न :**

अकाली नेत्यांशी वाटाघाटी करुन परिस्थितीतून मार्ग काढण्याचे आटोकाट प्रयत्न इंदिरा गांधींनी केले पण अकाली नेते कोणत्याही तडजोडीला तयार नव्हते. अकालींच्या आनंदपूर ठरावाला मान्यता देणे किंवा भारतातून फुटून निघून स्वतंत्र खलिस्तानच्या निर्मितीला मान्यता देणे इंदिरा गांधीना अशक्य होते. त्यामुळे वाटाघाटी अपयशी ठरत होत्या. खलिस्तानच्या मागणी शिवाय चंदीगढ पंजाबमध्ये सामील केला जावा आणि रावी, बियास, सतलज नदयांचे पाणी राजस्थानला दिले जाऊ नये अशी मागणी शीख नेत्यांनी सुरु केली. परंतु चंदीगढ पंजाबला दिल्यास हरियाणात आंदोलन सुरु होईल असे इंदिरा गांधींना वाटत होते त्यामुळे त्यांनी या मागण्या फेटाळल्या. याविरुध्द शीखांनी आंदोलन सुरु केले. शीख दहशतवादयांनी निष्पाप लोकांचे हत्यासत्र सुरु केल्याने देशभर अस्थिरतेची भावना पसरली.

**१४.४.२.६ दहशतवादी कारवाया :**

दिवसेंदिवस पंजाबमधील परिस्थिती चिंताजनक होत होती. दहशतवादाच्या नावाखाली पोलीस निष्पाप शीखांची हत्या करीत असल्याचे आरोप अकाली नेते करु लागले. पंजाबचा गुंता वाढविण्यामध्ये अकाली नेते हरचंदिसिंग लोंगोवाल, सुवर्णमंदिराचे नियंत्रक गुरुचरणसिंग तोहरा व पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल ही मंडळीही जबाबदार होती. कारण परस्परांतील संघर्षामुळे या तिघांनी जर्नेलसिंग भिंद्रनवालेला रान मोकळे करुन दिले. त्यातून खलिस्तानी दहशतवादाचा पाया मजबूत होत गेला. १९८३ मध्ये अकाली दल व सरकार यांच्यातील वाटाघाटी पुन्हा फिसकटल्या आणि पंजाबमधील हिंसाचार वाढला. २३ एप्रिल १९८३ रोजी डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ए.एस. अटवाल यांची दिवसा ढवळ्या सुवर्णमंदिरात दहशतवाद्यांनी हत्या केली. १९८३ ते १९८४ या काळात सुवर्णमंदिरातून २० मृतदेह बाहेर फेकले गेले. हिंदूंना पंजाबमधून हाकलून लावण्यासाठी ५ ऑक्टोबर १९८३ रोजी शीख दहशतवाद्यांनी एक बस अडवून त्यातील हिंदू प्रवाशांची कत्तल केली. दुसरे दिवशी इंदिरा गांधींनी प्रकाशसिंग बादल मंत्रीमंडळ बरखास्त करुन पंजाब केंद्र शासनाखाली घेतले पण दहशतवाद कमी होत नव्हता. १९८४ मध्ये ३७ रेल्वे स्थानकांना आगी लावण्यात आल्या. सरकार कांही कार्यवाही करेल असे वाटून भिंद्रनवालेंनी सुवर्णमंदिराची संरक्षणव्यवस्था मजबूत केली. सुवर्णमंदिर म्हणजे दारुगोळा व शस्त्रास्त्रांचे कोठार बनले. रक्तपात ही पंजाबच्या जीवनाची नित्याची बाब होऊन बसली. भिंद्रनवालेंचे सामर्थ्य दिवसेंदिवस वाढत होते व राष्ट्रीय ऐक्याला मोठा धोका निर्माण झाला होता.

**१४.४.२.७ ऑपरेशन ब्ल्यू स्टार :**

२ जून १९८४ रोजी इंदिरा गांधीनी अकाली नेत्यांना वाटाघाटींसाठी आवाहन केले पण त्यांना प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी लष्करी कार्यवाहीचा निर्णय घेतला. ३ जून १९८४ रोजी भारतीय लष्कराने सुवर्णमंदिरात शिरुन ऑपरेशन ब्ल्यू स्टार सुरु केले. लष्कराने रणगाडे व तोफांचा वापर केला. यावेळी दहशतवादी व सैनिक मारले गेले. जर्नेलसिंग भिंद्रनवाले व त्यांचे १००० अनुयायी मारले गेले. २०० ते ३०० सैनिक ठार झाले. अकाल तख्तची इमारत भुईसपाट झाली. सर्वात पवित्र मानल्या गेलेल्या हरमंदिर साहेब या प्रार्थना स्थळालाही धक्का लागला. मंदिराच्या भिंतीवर रक्ताचे सडे पडले. ६ जून रोजी ही कार्यवाही समाप्त झाली. भारतीय लष्कराला मोठे यश मिळून पंजाबमधील दहशतवाद्यांचे मोठ्या प्रमाणात उच्चाटन झाले.

### १४.४.२.८ इंदिरा गांधीची हत्या :

इंदिरा गांधींनी केलेली लष्करी कारवाई राष्ट्रीय ऐक्य टिकविण्यासाठी, देशाच्या भल्यासाठी होती. परंतु या कारवाईमुळे सुवर्णमंदिराचे पावित्र्य नष्ट झाल्याची भावना शीख समाजात निर्माण झाली. पाकिस्तानने या बाबतीत शीखांना पाठींबा दिला. अनेक शीख तरुणांनी इंदिरा गांधींवर सूड उगविण्याच्या शपथा घेतल्या. आपल्या हत्येचे प्रयत्न होत आहेत याची इंदिरा गांधींनाही कल्पना होती. त्यांना धमकीची पत्रे येऊ लागली पण त्यांच्या मनोधैर्यावर मात्र कोणताही परिणाम झाला नाही. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्या अकबर रोड कार्यालयासमोरच्या हिरवळीवर त्यांची दूरदर्शनसाठी मुलाखत होणार होती त्यामुळे बुलटप्रुफ जाकीट न घालताच त्या आपल्या कार्यालयाकडे निघाल्या. त्यांच्या सुरक्षा पथकात असलेल्या शीखांना दूर करण्याची सूचना अधिकाऱ्यांनी इंदिराजींना या आधी केली पण इंदिरा गांधीनी धर्मनिरपेक्षतेचे कारण सांगून ती फेटाळली. पहाऱ्यावर असलेल्या बियातसिंग व सतवंतसिंग या त्यांच्याच अंगरक्षकांनी कार्यालयाकडे निघालेल्या इंदिरा गांधींवर पिस्तोल व स्टेनगनने अगदी जवळून गोळया झाडल्या. इंदिरा गांधी जागीच कोसळल्या. या हत्येने देशाला प्रचंड धक्का बसला. खलिस्तान चळवळीने अशाप्रकारे देशाचे फार मोठे नुकसान केले.

### १४.४.२.९ राजीव गांधी आणि पंजाब समस्या :

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान बनले. त्यांनी पंजाबची समस्या वाटाघाटीने सोडविण्याचे प्रयत्न केले व त्यात यश येऊन २४ जुलै १९८५ रोजी अकाली दलाचे अध्यक्ष संत हरचंदसिंग लोगोंवाल व राजीव गांधी यांच्यात करार झाला. त्यानुसार चंदीगढ पंजाबला दयावा, शीखांना पुन्हा लष्कारात घ्यावे, रावी, बियास, नदयांच्या पाण्याचा प्रश्न लवाद समितीकडे सोपवावा या अटी मान्य केल्या. पण हा करार आक्रमक गटांना मान्य न झाल्याने त्यांनी आंदोलन सुरु केले. २० ऑगस्ट १९८५ रोजी संत हरचंदसिंग लोगोंवालांचीच हत्या झाल्याने हा करार मागे पडला. १९८५ च्या विधानसभा निवडणूकीत अकाली दल सत्तेवर आला. पंजाबमंदिरातून दहशतवाद सुरुच होता. २९ एप्रिल १९८६ रोजी अतिरेक्यांनी सुवर्णमंदिरातून स्वतंत्र खलिस्तानची घोषणा केली. त्यामुळे सुरजीतसिंग बर्नाला सरकारने पोलीस कारवाई करुन अतिरेक्यांना हाकलून हे मंदिर शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीच्या ताब्यात दिले.

अतिरेक्यांना पाककडून साहाय्य मिळू लागले. ऑपरेशन ब्ल्यू स्टारचे प्रमुख व सेवानिवृत्त झालेले जनरल अरुणकुमार वैद्य यांची पुण्यात हत्या झाली. पंजाबच्या पोलिस दलाचे प्रमुख ज्युलिओ रिबेरो यांच्या हत्येचा प्रयत्न झाला.१९८६ मध्ये बर्नाला सरकारने राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली प्रकाशसिंग बादल, गुरुचरणसिंग तोहरा व ऑलइंडिया शीख स्टुडंन्स फेडरेशनच्या नेत्यांना अटक केली. पंजाबची समस्या १९९० नंतर सुटायला सुरुवात झाली. सध्या पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन झाले असून शांतता नांदत असलेली दिसते.

### १४.४.३ आसाममधील चळवळ :

१९ व्या शतकाच्या प्रारंभापासून दाट लोकवस्ती असलेल्या पूर्व बंगालमधील विरळ लोकवस्ती असलेल्या सुपीक आसाममध्ये अनेक लोक वास्तव्याला येत होते. यामध्ये हिंदू व

मुस्लिम अशा दोन्ही धर्माचे लोक होते. आसाममध्ये स्थायिक होण्यास या लोकांना त्यावेळी फारसा विरोध झाला नाही कारण येथील जमीनदार व मळेवाल्यांना स्वस्त दरात मजूर पुरवठा उपलब्ध झाला. तसेच काँग्रेसच्या नेत्यांनी या लोकांकडून मते मिळण्याची खात्री असल्याने त्यांना विरोध केला नाही.

### १४.४.३.१ बंगाली विरुध्द आसामी संघर्ष :

१९६१ मध्ये आसाममध्ये झालेल्या जनगणनेत इतर राज्यांच्या तुलनेत आसामच्या लोकसंख्येत बेसूमार वाढ झाल्याचे समजले त्यामुळे तेथे प्रचंड खळबळ माजली. अशा परिस्थितीत १९७१ मध्ये पूर्व पाक व पश्चिम पाक यांच्यातील संघर्षामुळे पूर्व पाकिस्तानातून दहा लाखांहून जास्त निर्वासित आसाममध्ये आले. या अधिक लोकसंख्येचा ताण आसामच्या अर्थव्यवस्थेवर पडल्याने लोकांच्या संतापात भर पडली. यानंतर लवकरच बांगलादेशाची निर्मिती झाली. त्यामुळे आसाममध्ये आलेल्या सर्व निर्वासितांना बांगला देशात परत पाठविण्यात आले. असे असले तरी सर्वच निर्वासित बांगला देशात न जाता एक लाख निर्वासित आसाममध्येच राहीले. भारत व बांगला देशात करार होऊन त्यानुसार १९७१ नंतर आसामात गेलेल्या नागरिकानांच त्यांच्या नागरिकत्वाची ओळख पटल्यास बांगला देशात परत घेतले जाईल असे ठरले. त्यामुळे १९७१ पूर्वी आलेल्या बंगाली लोकांना परत जाण्याचा प्रश्नच नव्हता यातून आसामी व बंगाली यांच्यात नवीन वादास सुरुवात झाली.

### १४.४.३.२ आंदोलनात वाढ :

१९७९ मध्ये मतदार यादयांचा पुर्नविचार झाला तेव्हा त्या यादीतील सुमारे साडेतीन लक्ष लोकांचे राष्ट्रीयत्व वादग्रस्त असल्याचे दिसून आले. ते सर्व लोक बांगला देशातून आलेले दरिद्री,अशिक्षित व निर्वासित मुसलमान होते. १९८० मधील लोकसभा निवडणूकीकरता तयार करण्यात आलेल्या मतदारांच्या यादीत अनेक परकीयांचा विशेषतः बांगला देशातून आलेल्या निर्वासितांचा अंतर्भाव झालेला होता. या कारणावरुन आसाममधील जनता इतकी भडकली होती की १६ पैकी १४ मतदारसंघात निवडणूका घेणे अशक्य झाले. या आंदोलनास हिंसक वळण लागले. त्याचे नेतृत्व ‘ऑल आसाम स्टुडंन्स युनियन’ व ’आसाम गणसंग्राम परिषद’ या संघटनांनी केले. आसामातील परकीयांना शोधून काढावे, त्यांना मतदानाचा हक्क देऊ नये, त्यांना बांग्लादेशात किंवा भारताच्या इतर राज्यात पाठवून द्यावे अशा त्यांच्या मागण्या होत्या. या मागण्या मान्य होईपर्यंत राज्यातील कामकाज सुरळीत चालू न देण्याची त्यांनी धमकी दिली. त्यानुसार संघटनांनी सार्वत्रिक संप, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, सरकारी कार्यालये, बॅका, पोस्ट यांचे कामकाज चालू न देणे अशाप्रकारे आंदोलन वाढविल्याने राज्यातील जनजीवन ठप्प झाले. देशात लागणाऱ्या खनिज तेलाचा एक तृतीयांश पुरवठा आसाममधून होत होता. तो पुरवठा बंद करणे हे या संघटनांच्या हातातील प्रभावी शस्त्र होते. या संघटनांना आसामी जनतेचा व स्थानिक प्रशासनाचा पाठींबा असल्याने हिंसाचाराला रोखणे कठीण झाले.

### १४.४.३.३ केंद्रसरकारचे प्रयत्न :

आसाममधील परिस्थिती भयानक झाल्याने केंद्र सरकारने सीमा सुरक्षा पथके व केंद्रीय राखीव पोलीस दल तेथे तैनात केले. इंदिरा गांधींनी आंदोलक नेत्यांशी स्वतः वाटाघाटी केल्या.

त्यात २५ मार्च १९६९ पूर्वी मतदार म्हणून नोंदणी झालेल्या लोकांना आसामचे नागरिक म्हणून मान्यता देणे, भारत-बांगला सीमेवर प्रभावी पोलिस यंत्रणा ठेवणे या गोष्टी मान्य केल्या. विद्यार्थी संघटनांनी मात्र इंदिरा गांधींची योजना फेटाळून लावली व १९५१ नंतर आलेल्या लोकांना आसाममधून हाकलून लावावे अशी मागणी केली. आंदोलन कमी होत नसल्याचे पाहून इंदिरा गांधीनी संपूर्ण आसामला अशांत क्षेत्र म्हणून घोषित केले. तेथे सैन्य पाठूवन सार्वजनिक सेवांतील संपावर व सभांवर बंदी घातली तरी आंदोलकांनी कायदेभंगाची चळवळ चालू ठेवली. १९८० मध्ये इंदिरा गांधीनी आसामसाठी 'नॅशनल सेक्युरिटी' वटहुकूम पास करुन घेतला. त्यानुसार सार्वजनिक शांततेचा भंग करणाऱ्याविरुध्द खटला न भरता अटक करण्यात येईल व संप करण्यास बंदी घालण्यासाठी इसेन्शियल सर्व्हिसेस मेन्टनन्स ॲक्ट हा कायदा पास केला.

### १४.४.३.४ १९८५ चा करार व शांतता :

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी पंतप्रधान बनले व त्यांनी पंजाब, आसाम समस्या सोडविण्यासाठी पावले उचलली. आंदोलक नेत्यांना वाटाघाटींसाठी दिल्लीला बोलावले. यावेळी झालेल्या चर्चेला यश येऊन १५ ऑगस्ट १९८५ रोजी उभयतामध्ये करार मान्य करण्यात आला. त्यातील अटी पुढीलप्रमाणे :

१) २४ मार्च १९७१ नंतर बेकायदेशीरपणे आसाममध्ये आलेल्या सर्व लोकांना बाहेर काढावे.

२) २४ मार्च १९७१ पर्यंतच्या काळात बेकायदेशीरपणे मतदारयादीत ओलेली नावे रद्द करावीत.

३) आसामी भाषा, संस्कृती व अस्मितेच्या रक्षणासाठी प्रयत्न करणे.

४) चळवळीच्या काळात ज्या आंदोलकांवर सरकारी खटले भरले त्यातील गंभीर स्वरुपाचे खटले वगळून इतरांबद्दल सहानुभती पूर्वक विचार केला जाईल.

या करारामुळे आसाममधील हिंसक आंदोलन थांबले. निवडणुका घडुन आल्या. या निवडणूकीत कॉंग्रेसला यशाची खात्री होती परंतु प्रफुल्ल मोहंती या विद्यार्थी नेत्याच्या नेतृत्वाखाली आसाममधील सर्व संघटनांची युती होऊन 'आसाम गण परिषद' नावाचा नवा पक्ष निर्माण झाला. या पक्षाने निवडणुकीत बहुमत मिळवले व मोहंती हे मुख्यमंत्री बनले. यानंतर आसाममध्ये 'युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम' (उल्फा) या संघटनेने सरकारविरोधात दशहतवादी आंदोलन सुरु केल्याने आसाममधील शांततेला पुन्हा ग्रहण लागले.

### १४.५.४ ईशान्येकडील राज्यांच्या फुटीरतावादी चळवळी :

नॉर्थ इस्टर्न एजन्सी किंवा नफा ही प्रामुख्याने आसाम व सीमेवरील विभागासाठी निर्माण झालेली संघटना आहे. ईशान्येकडील विविध आदिवासी राज्यांची निर्मिती झालेली दिसते. १९६० मध्ये नागालॅड, १९७१ मध्ये गारो, खासी, जैतीया आदिवासींचे मेघालय, १९७२ मध्ये अरुणाचल प्रदेश, १९८७ मध्ये मिझोरामला स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळाला. या ईशान्येकडील विभागात विविध आदिवासी जमातींच्या चळवळी घडून आल्या. यापैकी नागा व मिझो यांच्या फुटीरतावादी चळवळींनी मोठ्या समस्या निर्माण केल्या.

**१४.५.४.१ नागांचे बड :**

अंगामी झापू फिझो या नागा नेत्याच्या नेतृत्वाखाली नागा आदिवासींची फुटीरतावादी चळवळ भारताच्या स्वांतत्र्यानंतर सुरु झाली .ज्यावेळी आसाम सरकारने नागा राष्ट्रीय समितीबरोबर नागा विभागात राजकीय व प्रशासकीय गोष्टी लागू करण्याबाबतच्या कराराचे उल्लंघन केले. त्यावेळी नागांनी आंदोलन सुरु केले. नागांच्या या बंडाला हिंसक वळण लागल्याने केंद्र सरकारने लष्कर पाठवून हे बंड दडपून टाकण्याचा प्रयत्न केला आणि नागांच्या स्वातंत्र्यावर तात्पुरती बंदी लावण्यात आली. गनीमी युध्द करणाऱ्या नागा बंडखोरांपासून इतर लोकांना वेगळे ठेवण्याचे उपायही योजण्यात आले. एका बाजुला केंद्र सरकार नागांची फुटीरतावादी चळवळ दडपून टाकण्याचे प्रयत्न करीत होते व दुसऱ्या बाजूला मार्च १९६० मध्ये स्वतंत्र नागालँडला भारतातील १६ वे राज्य म्हणून मान्यता दिल्यानंतरसुद्धा कारवाया सुरुच होत्या. त्यामुळे त्यांच्या विरुध्दची लष्करी कारवाई १९७८ पर्यंत चालू होती.

पंडित नेहरु यांच्या काळात केंद्र सरकारने फुटीरता वाद्यांशी संवाद साधण्यास नकार दिला. परंतु इंदिरा गांधीच्या काळात या धोरणात बदल घडून आला. इंदिरा गांधींनी बंडखोर नेत्यांना १९६६-६७ मध्ये नवी दिल्लीत बोलावले. इंदिरा गांधींनी नागालॅडच्या राजकारणात मध्यस्थीची भूमिका स्विकारुन शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**१४.५.४.२ मिझोरामचा प्रश्न :**

केंद्र सरकारने आसामची पुर्नरचना करुन मिझोराम या भागाची निर्मिती केली. परंतु मिझोराममधील फुटीरतावादी चळवळीमुळे तेथे अशांतता निर्माण झाली. आसाम सरकारकडून मिझो लोकांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने त्यांच्यात असंतोष वाढत होता. या चळवळीचे नेतृत्व एल.सी.लालडेंगा यांच्या मिझो नॅशनल फ्रंट या संघटनेने केले. मार्च १९६६ मध्ये या संघटनेने मिझोरामची मागणी केली असली तरी परिस्थितीत फारसा बदल झाला नाही.

नागालँडप्रमाणेच इंदिरा गांधींनी मिझोरामबद्दल भूमिका घेऊन मिझोरामचे नेते लालडेंगांशी चर्चा केली. १९८४ च्या निवडणूकीत कॉंग्रेसला मिझोरामच्या असेंब्लित यश मिळाले यावेळेपासून लालडेंगा व कॉग्रेस यांच्यातील नवीन संबंधांना सुरुवात झाली. राजीव गांधी काळात मिझोराममधील असंतोष नाहीसा करुन शांतता प्रस्थापित व्हावी या हेतुने मिझो नेत्यांशी राजीव गांधी यांनी वाटाघाटी केल्या. त्यातून राजीव गांधी व लालडेंगा यांच्यात २६ जुलै १९८६ रोजी नवीन करार झाला. या कराराने मिझोराम राज्याला खास दर्जा देण्यात येऊन धर्म, सामाजिक रुढी, रितीरिवाज जमिनीची विक्री व हस्तातरण या सर्व बाबतीत कायदे करण्याबाबत स्वायत्ता देण्यात आली. या करारानंतर मिझोराममध्ये मिझो नॅशनलफ्रंट व इंदिरा कॉंग्रेस यांचे काळजीपूर्वक संमिश्र सरकार तेथील लोकप्रिय नेते लालडेंगा यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आले. मिझो कराराचा परिणाम अन्य राज्यांवर झाला. पश्चिम बंगालच्या नेपाळी लोकवस्तीवर असलेल्या दार्जिलिंग जिल्ह्याच्या गुरखा नॅशनल लिबरेशन फ्रंटने स्वतंत्र केंद्रशासित प्रदेशात वेगळे राज्य निर्माण करण्यासाठी चळवळ सुरु झाली.

अशा प्रकारच्या अनेक फुटीरतावादी चळवळी भारतात घडून आल्या व त्यांने सरकारला डोकेदुखी निर्माण झाली. या फुटीरतावादी चळवळींना पाकिस्तान व चीनसारखी राष्ट्रे गुप्तपणे मदत पुरवित असल्याने त्यांना बळ मिळत होते. पण भारत सरकारने अत्यंत संयमीपणाने अनेक ठिकाणी शांतता निर्माण करण्यात यश मिळविले व भारताचे अखंडत्व व एकता कायम ठेवली.

**१४.५.५ आपली प्रगती तपासा :**

१. ऑपरेशन ब्ल्यू स्टार वर थोडक्यात टीपा लिहा.

## १४.५महिलांचे सबलीकरण :-

### १. स्त्रियांच्या अधिकारांचा व सामर्थ्याचा विकास :

प्राचीन काळातील पूर्व वैदिक काळात स्त्रियांची स्थिती समाधान कारक व पुढारलेली होती. स्त्रियांना पुरुषांबरोबरीचा दर्जा होता. सर्व क्षेत्रात स्त्रियां पुरुषांच्याबरोबरीने काम करीत होत्या. स्त्रिया लढायांतही भाग घेत. परंतु पुढे मात्र त्यांचा दर्जा खालावत गेला. तसेच मनुस्मृतीने त्यांना सर्व प्रकारचे अधिकार नाकारले. पितृसत्ताक पध्दती, इस्लामचे आक्रमण, युरोपीयन शक्तीचे आगमन, मराठ्यांचा उदय या सर्व घडामोडींचा स्त्रियांच्या जीवनावर मोठा परिणाम घडून आला. स्त्रीला दुय्यम दर्जा मिळून 'चूल व मूल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र बनले. स्त्रियांसाठी कठोर नियम व कायदे तयार झाले. त्यामुळे अज्ञानी, धर्म-भोळेपणाचे व विचारहीन आयुष्य त्यांना जगावे लागले. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात हिंदू स्त्रियांची परिस्थिती विनाशाच्या उंबरठ्यावर पोहोचली. तिला पूर्ण पारतंत्र्यात ठेवले गेले, समाजात व कुटुंबात तिला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व किंवा स्थान नव्हते. तिचे मत, आवडी-निवडी विचारात घेतल्या जात नव्हत्या. थोडक्यात मुलगी म्हणजे ओझे व ते लवकर दूर करणे हेच समीकरण बनले. स्त्रीला कोणत्याही सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्यक्रमात भाग घेण्यास मनाई होती. प्राचीन व मध्ययुगात भारतामधील स्त्रियांची परिस्थिती अतिशय दयनीय होती.

### १४.५.२ सामाजिक सुधारणा चळवळ :

भारतात सामाजिक सुधारणांची चळवळ सुरु करणारे व स्त्रियांचा कैवार घेणारे पहिले भारतीय म्हणजे राजा राममोहन रॉय. भारतीय समाजातील स्त्रियांची झालेली दुरावस्था विशेषतः अमानुष सतीची प्रथा पाहून त्यांचे मन व्यथित झाले. या प्रथेविरुध्द त्यांनी मोठे आंदोलन उभारले. त्यांच्या प्रयत्नामुळे लॉर्ड बेंटिंकने १८२९ मध्ये सतीप्रथाबंदीचा कायदा केला. राजा राममोहन रॉय यांनी स्थापन केलेल्या ब्राम्हो समाजाने स्त्रीसुधारणेचे कार्य पुढे चालू ठेवले. १८७२ चा स्थानिक विवाह कायदा पास करण्यासाठी केशवचंद्र सेन यांनी मेहनत घेतली. ईश्वरचंद्र

विद्यासागर यांनी बालविवाह व बहुपत्नीत्वाविरुध्द चळवळ उभारली. उच्च जातींच्या मुलींसाठी १८४९ मध्ये हिंदू बालिका विद्यालय सुरु केले. केवळ सात महिन्यांत ३५ मुलींच्या शाळा सुरु केल्या. त्यांच्या प्रयत्नांमुळे १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. महाराष्ट्रामध्ये नव्हेतर संपूर्ण भारतामध्ये स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी मुलींची पहिली शाळा १८४८ मध्ये सुरु करणारे महात्मा ज्योतिबा फुले हे महान समाजसुधारक होते. त्यांच्यी पत्नी सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणप्रसाराच्या व समाजसुधारणेच्या कार्यात अनेक हाल भोगले. म.फुल्यांनी विधवांच्या मुलांना संरक्षण देण्यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. महादेव गोविंद रानडे यांनी विधवांच्या समस्यांना पाठींबा देऊन त्या सोडविण्यासाठी खंबीर पावले उचलली. त्यांनी आपल्या अडाणी पत्नीला रमाबाईला सुशिक्षित बनविले. रमाबाईंनी स्त्रीयांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. स्त्रियांसाठी शिक्षण आवश्यक असून शिकलेली स्त्री स्वतःचे प्रश्न सोडवू शकेल आणि स्त्रियांना आदर दिल्यास राष्ट्र महान बनू शकेल असे स्वामी विवेकानंदाचे मत होते.

स्त्रियांना सामर्थ्यशील बनविण्यामध्ये महर्षि धोंडो केशव कर्वे यांनी महान कामगिरी केली. पहिल्या पत्नीच्या मृत्यूनंतर गोदुबाई नावाच्या विधवेशी विवाह करुन त्यांनी विधवा पुर्नविवाहास पाठिंबा दिला. स्त्रियांच्या कल्याणासाठी अनाथ बालकाश्रम, महिला विद्यालय व निष्काम कर्ममठ या तीन संस्थांची स्थापना केली. १९१६ मध्ये त्यांनी पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली जे नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठ म्हणून प्रसिध्द आहे. असे शेकडो समाजसुधारक देशात होऊन गेले व या समाजसुधारकांच्या कार्यामुळे स्त्रियांना आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली. स्त्री शिक्षणाची चळवळ दिवसेंदिवस वाढत गेली. ब्रिटिशकाळातच स्त्री कल्याणाचे काही कायदे पास झाले. त्यामुळे स्त्रियांचे जीवन पूर्वीपेक्षा सुसहय बनू लागले व त्यांच्या जीवनात हळुहळु सुधारणात्मक बदल दिसून येऊ लागले.

### १४.५.३ स्वातंत्र्यचळवळीत स्त्रियांचे स्थान :

स्त्रियांना परंपरागत जोखडातून मुक्त करण्यासाठी सामाजिक सुधारणा चळवळीने मोठे योगदान दिले. त्यामुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्यासाठी स्त्रिया घराबाहेर पडू शकल्या.

राष्ट्रीय चळवळीत गांधीयुगात स्त्रियांनी महान कार्य केले. म.गांधी हे महान राजकीय नेते व समाज सुधारकही होते. त्यांनी आपल्या रचनात्मक कार्यक्रमात स्त्री उध्दाराचा अंतर्भाव केला होता. गांधीजींच्या आश्रमात स्त्रिया व पुरुषांना समान वागणूक दिली जाई. म. गांधीनी बरोबर राहणाऱ्या मुली व स्त्रियांमध्ये स्वातंत्र्याची आस व आत्मविश्वास जागविला होता. हुंडाप्रथेला विरोध करुन ही प्रथा नष्ट करण्यासाठी गांधीजींनी मुलींना योग्य वर मिळेपर्यंत आवश्यक असेल तर जन्मभर अविवाहीत राहण्याचा सल्ला दिला. त्यांनी स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी व त्यांच्या बुध्दिला वाव देण्यासाठी अनेक प्रकारचे कार्यक्रम राबवले. चरख्याचा उपयोग सुरु केला.

म.गांधीजींच्या असहकार चळवळीने हिंदूंच्या सामाजिक रचनेला मोठा धक्का दिला. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, भारत छोडो आंदोलन या गांधीयुगातील राष्ट्रीय चळवळींत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी हातात तिरंगा घेऊन भाग घेतला. लाठ्यांचे तडाखे, बंदुकीच्या गोळ्या अंगावर झेलल्या. भगीनी निवेदिता, मादाम कामा, ॲनी बेझंट या स्त्रियांनी स्वातंत्र्यचळवळीत केलेल्या कार्याचा प्रभाव अनेक स्त्रियांवर पडला. नेताजी सुभाषचंद्र बोस हे देखील स्त्री मुक्तीचे समर्थक होते. त्यांनी आपल्या आझाद हिंद फौजेत स्त्रियांची राणी लक्ष्मीबाई पलटण तयार केली स्वातंत्र्य लढयात स्त्रियांनी अनेक अत्याचार सहन केले. आपले व आपल्या कुटुंबाचेही बलिदान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेगवेगळ्या आंदोलनातही मोठ्या प्रमाणात महिलांनी सहभाग घेतला होता.

### १४.५.४. स्वातंत्र्यपूर्वकाळातील स्त्रियांच्या संघटना :

इ.स. १८८६ मध्ये स्वर्णकुमारी देवीने कलकत्ता येथे महिला संघटनेची स्थापना केली. स्त्रियांना शिक्षण व नोकरी देण्यासाठी पंडीता रमाबाईंनी १८९२ मध्ये शारदा सदनची स्थापना केली. पारशी स्त्रियांना मदत करण्यासाठी मुंबईत १९०३ मध्ये झोरोस्ट्रीयन मंडळ स्थापन झाले. १९०८ मध्ये मुंबईच्या बी.एम.मोतीवाला यांनी गुजराती हिंदू स्त्री मंडळ सुरु केले. १९०९ मध्ये पंडीता रमाबाई रानडेंनी पुण्यात सेवासदन ही संस्था सुरु केली. स्त्रियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी १९१४ मध्ये बडोदा येथे चिमणाबाई बालकल्याणसंघाची स्थापना केली.

राष्ट्रीय पातळीवर सुरु झालेली वुमेन्स इंडियन असोसिएशन ही पहिली महिला संघटना होती. ८ मे १९१७ रोजी डोरोथी जिनारा जाडेजा यांनी अडयार येथे ही स्थापन केली. या संघटनेने मुलींचे शिक्षण, देवदासी प्रथा या क्षेत्रात भरीव कार्य केले. १९२५ मध्ये नॅशलन कौन्सिल ऑफ वुमेन ही संघटना स्थापन झाली. या संघटनेने मुंबईत वेश्याकायदा पास करण्यासाठी प्रयत्न केले तसेच स्त्रियांचे वेतन, वारसाहक्क, कारागृहातील स्त्री विभागात सुधारणा, स्त्री पोलिस यांच्यासाठी कार्य केले. २४ जुलै १९२० रोजी कलकत्ता येथे फेडरेशन ऑफ युनिर्व्हसिटी वुमेन या संघटनेची स्थापना झाली. विद्यापीठातील महिलांमध्ये सर्व जाती-जमातीतील जीवनाबद्दल तळमळ निर्माण करण्याचे कार्य या संघटनेने केले. सर्व जाती-जमातीतील स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९३४ मध्ये ज्योतीसंघ स्थापन झाला. अशा प्रकारे अनेक महिला संघटना या स्वातंत्र्या आधीच निर्माण झालेल्या असल्याने त्यांच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये स्वाभिमानाची जागृती निर्माण झाली होती.

### १४.५.५. स्वातंत्र्योत्तर सरकारची स्त्री विषयक भूमिका व हिंदू कोड बील :

इ.स. १९४१ रोजी स्थापन करण्यात आलेल्या सर बेनेगल राव समितीने महिलांसंबंधी सर्व मुद्यांचा विचार करुन तर्कशुध्द, न्याय्य व सुसंगत अशी हिंदू कायद्यांची संहिता तयार करुन त्यात सर्व मुद्यांचा समावेश करावा अशी शिफारस केली. स्वातंत्र्यानंतर या शिफारसींकडे सरकारने लक्ष पुरविले. स्त्रियांच्या एकंदरीत सर्व समस्यांचा विचार करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संसदेत हिंदू धर्मातील अनिष्ठ रुढींविरुध्द एक बिल मांडले. त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे अधिकार होते. या बिलास 'हिंदू कोड बील' म्हटले जाते. यामध्ये स्त्रियांचे

विवाहविषयक शिक्षणाच्या संधी, हुंडा, घटस्फोट, संपत्ती वारसा हक्क व समानतेच्या अधिकारांचा समावेश होता.

या विधेयकावरुन संसदेत प्रंचड गदारोळ माजला. सनातनी सदस्यांनी महिलांना समान अधिकार देण्यास या बिलाला प्रचंड विरोध केला. या विधेयकामुळे हिंदुंची समाज व्यवस्था धोक्यात येईल, एकत्र कुटुंबपध्दती नष्ट होईल, परंपरागत मूल्यांचा नाश होईल अशी टीका करुन या बिलास विरोध केला. पण काँग्रसमधील डॉ. राजेद्रप्रसाद सारख्या अनेक नेत्यांनी समाजातील एका मोठ्या गटाला दुखावणे बरोबर नसल्याचे मत मांडले. सरदार पटेलही समर्थन देत नव्हते. पंडित नेहरुंवरही सर्व बाजूंनी दबाव आल्याने त्यांनी या विधेयकाचा नाद सोडून दिला. डॉ. आंबेडकरांनी या विधेयकाचे कायदयात रुपांतर व्हावे यासाठी कसोशीने प्रयत्न केले. पण त्यात अपयश आल्याने पंडित नेहरु व काँग्रेसवर नाराज होऊन त्यांनी १९५१ मध्ये आपल्या कायदे मंत्रीपदाचा राजीनामा दिला. परंतु पुढे हिंदू कोड बीलाच्या वेगवेगळया कायदयास संसदेने मान्यता दिली हिंदु कोड बिल माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खऱ्या अर्थाने भारतातील महिलांचे सक्षमीकरण करवयाचे होते असे दिसून येते.

### १४.५.६ हिंदू विवाह कायदा :

१९५२ च्या निवडणूकीत काँग्रेसला प्रचंड बहुमत मिळाल्याने पंडित नेहरुंचे हात बळकट झाले. देशात अनेक महिला संघटनांनी सभा घेवून सरकारकडे सुधारणांची मागणी केली. त्यामुळे पंडित नेहरुंनी हिंदु कोड बील मूळ स्वरुपात न मांडता त्यांतील महत्वाच्या तरतुदींसाठी स्वतंत्र कायदा करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हिंदू विवाहसंबंध व स्त्री सुधारणेसंबंधी पुढील कायदे पास झाले

१) १९५४साली स्पेशल मॅरेज अ‍ॅक्ट पास करुन भिन्नधर्मीय स्त्री-पुरुषांना आपला धर्म न सोडता विवाह करण्याची तरतूद केली गेली.

२) १९५४ मध्ये हिंदू मॅरेज अ‍ॅक्ट पास झाला त्यानुसार पहिल्या पत्नीच्या किंवा पतीच्या हयातीत केलेला दुसरा विवाह बेकायदेशीर ठरवून त्यासाठी सात वर्षे सक्तमजूरीची शिक्षा सांगितली गेली. विशेष कारणासाठी पतीपत्नीला एकमेकांपासून घटस्फोट घेता येईल.

३) १९५६ मध्ये पास झालेल्या हिंदू वारसा हक्काच्या कायदयाने पतीच्या इस्टेटीत पत्नीला बरोबरीचा हक्क देण्यात आला तसेच मुलांबरोबर मुलींनाही इस्टेटीचा वाटा मिळण्याची तरतूद केली गेली.

४) १९५६ च्या हिंदू अज्ञान व पालकत्वाच्या कायदयाने पती-पत्नी विभक्त झाल्यास मुलांचा ताबा कोणाकडे असावा याचे नियम केले गेले. अज्ञान मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी पित्यावर टाकण्यात आली.

५) हिंदू दत्तक व पोटगी कायदयाने विधवा, घटस्फोटित किंवा अविववाहित स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्यास तिला दत्तक घेण्याचा अधिकार देण्यात आला. मुलाप्रमाणे मुलगी दत्तक घेणेही कायदेशीर मानण्यात आले.

६) १९५६ साली कायदा करुन स्त्रियांच्या अनैतिक व्यापाराला बंदी घालण्यात आली

७) १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा पास करुन हुंड्याच्या अनिष्ठ प्रथेला आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**१४.५.७ स्त्रियांचा राजकारणातील सहभाग :**

स्वातंत्र्य चळवळीत स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी होत होत्या. स्वातंत्र्यानंतर जरी स्त्रियांना मताधिकार मिळाला असला तरी एकूण संख्येकडे पाहिले असता असे दिसून येते की, सुरुवातीला मतदान करणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच कमी होती व त्यांना खूप कमी जागा काबीज करता आल्या तसेच अप्रत्यक्ष नियंत्रण पुरुषांचे होते.

सध्या स्त्रियांचा जो गट राजकारणात येत आहे तो पूर्वीच्या राजकारणाचा अनुभव नसल्याने निवडणूकीद्वारेच राजकीय क्षेत्रात प्रवेश करणार आहे. जवळ जवळ सर्वच पक्ष स्त्रियांना उमेद्वारी देण्यास मागेपुढे पाहतात. त्यामुळे यशस्वी स्त्री उमेदवारांची संख्या फार कमी आहे. सर्व पक्षांमध्ये स्त्रियांचा सहभाग असला तरी तो कमी-अधिक प्रमाणात साहाय्यक विभाग म्हणून काम करतो. तरीही काही महिला नेत्या पक्षाच्या अध्यक्षपदी किंवा विधीमंडळ नेतेपदी पोहचल्या आहेत. उदा.प्रभा राव, मोहसिना किडवाई, चंद्रावती, मायावती, सुषमा स्वराज, जयललिता, मिराकुमार, उमा भारती, वसुंधरा राजे, शीला दिक्षित, मार्गारेट अल्वा, सूर्यकांता पाटील वगैरे. काहीवेळा पतीचा किंवा भावाचा राजकारणाशी संबंध असल्याने स्त्रियांनी राजकारणात प्रवेश केला. उदा. बेगम अबीदा अहमद, ताराबाई साठे, इंदिरा गांधी, मेनका गांधी, सोनिया गांधी, माया एस रे, कमला बहुगुणा तसेच काही जोडपी राजकारणात एकत्र काम करु लागली. उदा.आचार्य कृपलानी व सुचेता कृपलानी, फिरोज गांधी व इंदिरा गांधी इ. विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे आज देशाच्या सर्वोच्चपदी (राष्ट्रपती) प्रतिभाताई पाटील यांची झालेली निवड ही उल्लेखनीय बाब आहे.

**१४.५.८ आर्थिक विकासात स्त्रियांचा सहभाग :**

ग्रामीण भागातील स्त्री पूर्णपणे शेती व्यवसायात गुंतलेली आहे. त्यासाठी विशेष कौशल्याची गरज नसते. ग्रामीण स्त्रियांना शेती कामाबरोबर घरकामही करावे लागते. भूमिहीन कामगार व आदिवासी यांच्यात विणकाम, टोपल्या हत्यारे तयार करणे यासारखे स्त्रियांचे व्यवसाय आहेत.

शहरातील मध्यमवर्गीय व उच्चवर्णीय स्त्रिया घराबाहेर पडून नोकऱ्या करु लागल्या. शहरातील महागाईमुळे नोकरी करणे स्त्रियांना आवश्यक बनले. स्त्रिया आता दुकाने, व्यापारी संस्था, बँका इन्शुरन्स कंपन्या यांमध्ये चांगल्या नोकऱ्या करु लागल्या. शिक्षणाच्या प्रसारामुळे कारकूनी, प्रशासकीय व व्यावसायिक कामांमध्ये स्त्रियांना अधिकाअधिक संधी उपलब्ध झाल्या. मुख्यतः कुटुंबाच्या उत्पन्नाला पूरक म्हणूनच शिक्षित स्त्रिया नोकऱ्या करतात. औदयोगिकरण व यांत्रिकीकरणामुळे परंपरागत हस्तव्यवसांयांचा नाश झाला. त्यात कार्यरत असलेल्या गरीब स्त्रियांना बेरोजगारीला तोंड दयावे लागले. अज्ञानामुळे आपला असंघटीत व्यवसाय त्यांना

सोडता येत नाही व त्यात कोणतीही सुरक्षा मिळत नाही. काजू प्रकियेमध्ये १० % स्त्रियां नोकरीवर असतात. पाच लाखांहून अधिक व्यक्तींना नोकरी व स्त्रियांचे वर्चस्व असलेला दुसरा व्यवसाय म्हणजे नारळाच्या काथ्यांचा. परंतू या स्त्रियांचा घरातील दर्जा खालचा असतो. लोकरीच्या घरगुती व्यवसायात दोन लाख स्त्रिया गुंतल्या गेल्या. जी कामे मशीनद्वारे केली जात नाहीत किंवा कंटाळवाणी असतात अशीच कामे स्त्रियांना दिली जातात. सरकारने निर्यातीला उत्तेजन दिले. या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अनियमितता असल्याने त्या उदयोगांचे मालक तात्पुरत्या व सुलभतेने काढून टाकता येण्यासारख्या स्त्रीकामगारांची निवड करतो. त्यामुळे तेथे स्त्रियांना दुय्यम कामे मिळतात, मुंबईमध्ये ईलेक्ट्रॉनिक्स विभागात १२ केंद्रे असून त्यामध्ये अकुशल स्त्रिया मोठ्या प्रमाणात काम करतात.

स्वातंत्र्यानंतर उच्च शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला यात स्त्रियांचे प्रमाण पुरुषांपेक्षा अधिक होते. सध्या संगणकयुग असल्याने स्त्रियांनी त्यातही प्रगती केली. खाजगी क्षेत्र वाढत असल्याने विविध उदयोग, व्यवसाय, दुकाने, शोरुम, शाळा-महाविदयालये, सरकारी सेवा यात नोकरी करण्याऱ्या स्त्रियांचे प्रमाण लक्षणीय वाढले आहे. यात मध्यमवर्गीय स्त्रिया मोठ्या प्रमाणात दिसून येतात. सिनेमा, दूरचित्रवाणी, रेडिओ मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे स्त्रियांच्या जिवनमानात बदल घडून आलेले दिसून येतात. आता त्या प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करत आहेत.

### १४.५.९ महिला संघटन व चळवळी :

गरीब महिलांना रोजगार मिळवून देण्यासाठी १९७२ मध्ये महिला स्वयंरोजगार संस्था अहमदाबाद येथे स्थापन होऊन गुजरात, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, बिहार, दिल्ली, केरळ येथील दोन लाखांपेक्षा अधिक महिला तिच्या सदस्य बनल्या. या संघटनेने अकुशल, अर्धकुशल, अज्ञानी, गरीब, हस्तव्यवसाय करणाऱ्या महिलांना योग्य रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. या संघटनेने स्वतःचे काही उदयोग व बँका तयार करुन गरीब महिलांना त्यात सामावून घेतले. महाराष्ट्रातील धुळे जिल्हयातील आदिवासी महिलांसाठी कार्य करणारी श्रमिक संघटना १९७० च्या दरम्यान निर्माण झाली. या संघटनेने आदिवासींच्या जमिनी वाचवण्यासाठी व त्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी चळवळही उभारली. आदिवासी स्त्रियांना संघटीत करुन त्यांचे प्रशिक्षण शिबीर १९७३ मध्ये भरवले. ग्रामीण भागातील स्त्रियांसाठी रात्रशाळा सुरु केल्या. पुरुषांचे दारुचे व्यसन, जुगार, पत्नीला मारहाण या गोष्टी थांबविण्याचे प्रयत्न या संघटनेने केले.

प्रमिला दंडवतेची महिला दक्षता समिती, दिल्लीमधील 'सहेली' या महिला संघटनेच्या चळवळीमुळे १९६१ चा हुंडाप्रतिबंधक कायदा सरकारने पास केला. १९८४ मध्ये पुन्हा या कायदयाची व्याप्ती वाढविण्यात आली. महिलांनी अनेक सामाजिक चळवळीत भाग घेतला. जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीने प्रभावित होऊन साम्यवादी महिलांनी १९७३ ते ७५ या काळात महाराष्ट्र व गुजरातमध्ये नवनिर्माण चळवळ उभारली. उत्तराखंडात सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या पर्यावरण संरक्षण चळवळीत म्हणजे 'चिपको आंदोलनात' महिलांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष

साजरे करण्यास सुरवात केली. त्यामुळे महिलांच्या हक्क व अधिकारांकडे लक्ष वेधले गेले व त्यांची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात येऊ लागली.

**१४.५.१० व्यवसायिक प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य :**

१९५३ मध्ये महिला व बालकल्याणासाठी सरकारने केंद्रिय समाजकल्याण मंडळ स्थापना केले. या मंडळाच्या शाखांनी विविध राष्ट्रातील महिलांसाठी व्यवसायिक प्रशिक्षण शिबीरे, पुर्नवसन केंद्र महिलांच्या साक्षर करण्याचा कार्यक्रम १९५८ मध्ये सुरु होऊन १९७५ पर्यंत व्यापक बनत गेला. १८ ते ५० वयोगटातील महिलांसाठी व्यावसायिक शिक्षणाचे प्रकल्प सुरु केले गेले. १९७६ मध्ये महिला कल्याण व विकासाच्या योजना आखण्यासाठी नॅशनल प्लॅन ऑफ ॲक्शन फॉर वीमेन तयार केला गेला. महिलांना आर्थिक साहाय्य देण्याची व्यवस्था १९८२ मध्ये करण्यात आली. १९८६ मध्ये महिला विकास कार्यालय स्थापन करण्यात येऊन नोकऱ्याची दारे महिलांसाठी मोठ्या प्रमाणात खुली केली गेली. भारताच्या स्तरावरील महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी संसदेने कायदा पास करुन राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली व त्याचा कारभार प्रत्येक राज्यात पोहोचविण्यासाठी राज्य महिला आयोगाची स्थापना प्रत्येक राज्यात करण्यात आली. यामुळे महिलांच्या जिवनात खूप मोठ्या प्रमाणात बदल दिसून येतात. व त्या प्रत्येक क्षेत्रात भरीव कामगिरी करत आहेत.

**१४.५.११ आपली प्रगती तपासा :-**

१.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५४ मध्ये सादर केलेल्या हिंदू कोड बील मधील तरतूद सांगा

## १४.६ सारांश

वरील विवेचनावरुन आपणांस असे दिसून येते की, जमातवादाचा विकास रोखण्यासाठी व हे थांबविण्यासाठी खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांची योग्य पध्दतीने अमंलबजावणी केली पाहिजे व त्यानुसार भारताच्या विविध स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये पुनर्रचना करायला हवी.जमातवाद थांबवण्यासाठी या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन त्यांचा शास्त्रशुध्दपध्दतीने अभ्यास व्हायला हवा.भारताने नेहमीच हा प्रश्न अनुत्तरीत ठेवला आहे.

स्वातंत्र्यानंतर महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी भारत सरकारने तसेच प्रत्येक घटक राज्यातील सरकारने विविध उपाययोजना केल्या.त्यामुळेच आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करीत आहेत.जिवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होत आहेत.पंरतु ग्रामीण क्षेत्रात

अजून तेवढा बदल झालेला दिसून येत नाही.यासाठी सरकारला विविध कायदयांची अंमलबजावणी व्यवस्थित पणे केली पाहिजे त्यानंतरच संपूर्ण भारत एक महासत्ता बनू शकते.

## १४.७ प्रश्न :

प्र.१ जमातवाद म्हणजे काय ? जमातवादास जबाबदार असणारे घटक सांगा.

प्र.२ जमातवादाचा अर्थ सांगून जमातवादाचे परिणाम स्पष्ट करा.

प्र.३ महिलांच्या सबलीकरणासाठी सरकारने केलेल्या उपाययोजनांची चर्चा करा.

प्र.४ स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय फुटिरतावादी चळवळीचा आढावा घ्या.

❖❖❖❖

# १५

# मुख्य प्रवाह - २

## अ) आरक्षणाचे धोरण
## ब) विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास

**प्रकरण रुपरेषा**

१५.० उद्दिष्टे
१५.१ प्रस्तावना
१५.२ आरक्षणाचे धोरण
१५.३ विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास
१५.४ स्वातंत्र्योत्तर धोरण
१५.५ सारांश
१५.६ प्रश्न

## १५.० उद्दीष्टे

१) आरक्षणाच्या धोरणाचा अभ्यास करणे.
२) भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा अभ्यास करणे.
३) विसाव्या शतकातील शास्त्रीय शोधांचा व संशोधकाचा अभ्यास करणे.
४) भारतच्या अवकाश संशोधन व अणुसंशोधन या क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेणे.

## १५.१ प्रस्तावना

भारतीय समाजरचना ही वर्णव्यवस्थेतून निर्माण झालेली आहे. आर्यांच्या काळापासून वर्णव्यवस्थेला सुरुवात झाली. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्णन अस्तिवात होते. कांलातराने वर्णव्यवस्थेला जातीव्यवस्थेचे स्वरुप प्राप्त झाले. स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेमध्ये तरतूद केल्याप्रमाणे आरक्षणाचे धोरण राबविले गेले. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक दृष्टया दुबळया जाती-जमातींना आरक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी शासन वेगवेगळ्या पध्दतीने आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करीत आहे.

भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास कोणकोणत्या टप्प्यात झाला त्यामध्ये वेगवेगळ्या शास्त्रज्ञांची कामगिरी तसेच तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

## १५.२ आरक्षणाचे धोरण

भारतात प्राचीन काळापासून भेदनितीवर व असमानतेवर आधारीत असलेली जातीव्यवस्था अस्तित्वात होती. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य, शूद्र या चातुर्वर्ण्य पध्दतीतून अनेक जाती व उपजाती तयार झाल्या. वर्णव्यवस्थेतील शूद्रां वर मोठ्या प्रमाणात बंधने लादली गेली. जन्माने जात ठरवली गेली व मरेपर्यंत त्याच जातीत मानवाला जगणे भाग पडले. कुठल्याही जातीला व्यवसायाचे, विवाहाचे मनाप्रमाणे स्वातंत्र्य नव्हते. जातीप्रथेमुळे सामाजिक गतीशिलता अत्यंत मंद गतीने होऊन समाजाचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास होऊ शकला नाही. स्पृश्य-अस्पृश्यतेमुळे खालच्या जातींवर अनेक अत्याचार झाले. अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्याचा, मंदिरात प्रवेश करण्याचा, शिक्षणाचा, श्रेष्ठ व्यवसाय करण्याचा, धार्मिक क्रिया करण्याचा, गावामध्ये राहण्याचा अधिकार नाकारला गेला. त्यामुळे हजारो कनिष्ट जातींचा कोणत्याही क्षेत्रात विकास होऊ शकला नाही. जातीव्यवस्थेमुळे हिंदु समाज कधीही संघटीत राहू शकला नाही. त्याचा फायदा परकीयांना मिळून त्यांनी भारतावर आक्रमणे केली. जातीव्यवस्था हा हिंदू धर्मावरील कलंक आहे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. याचे दूरगामी परिणाम भारताच्या समाज व्यवस्थेवर दिसून येतात.

जातीव्यवस्थेमुळेच हिंदू धर्मावर टिका होऊन बौध्द धर्म व जैन धर्म स्वतंत्रपणे अस्तित्वात आले. बौध्द धर्माने समतेचे तत्व राबविल्यामुळे अनेक कनिष्ठ जातींनी या धर्मात प्रवेश केला. या जातीप्रथेविरुध्द मध्ययुगीन काळात निर्माण झालेल्या भक्ती चळवळीनेही आपल्या परीने प्रयत्न केले. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायात तर सर्व जातीतील संत उदयास आले व त्यांनी समाजातील भेदभाव नष्ट करुन सामाजिक ऐक्य निर्माण करण्याची शिकवण दिली. ब्रिटिशांच्या आगमनामुळे जातीव्यवस्थेला वारवांर धक्के बसू लागले. ब्रिटिशांनी भारतात पाश्चात्य शिक्षण, वृत्तपत्रे, दळणवळणाची साधने, लोकशाही, आधुनिक न्यायालये या गोष्टी सुरु केल्या. त्यांचा मोठा प्रभाव जातीप्रथेवर पडून जुनी बंधने कमी होऊ लागली. याच काळात १९ व्या शतकात इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीय सुशिक्षित तरुणांनी समाजसुधारणा चळवळ सुरु केली. जातीभेदांविरुध्द आंदोलन उभारले. महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर अशा समाज सुधारकांनी समाजात समानता आणण्याचा प्रयत्न केला.

### १५.२.१ स्वातंत्र्यपूर्व काळातील घडामोडी :

इंग्रजी राजवट, सामाजिक सुधारणा चळवळ यांच्यामुळे कनिष्ठ जातीच्या समस्यांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. राज्यकर्त्यांना देखील या संदर्भात काहीतरी उपाय करावे असे वाटू लागले. त्यातून कोल्हापूर संस्थानाचे संस्थानिक छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी भरीव कार्य केले व बहूजन समाजाला १९०२ मध्ये नोकरीत ५०% राखीव जागा

दिल्या. डॉ.आंबेडकरांसारख्या हुशार विदयार्थ्यांना सर्वेतोपरी मदत केली. १९२१ मध्ये म्हैसूरचा राजा कृष्णराज वाडीयार यांनी कनिष्ठ जातींना नोकऱ्या देण्यासाठी सरकारी आरक्षण मंजूर केले. मद्रासमध्ये आरक्षणाची मागणी होऊ लागल्याने तेथील सरकारने नोकऱ्या व शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण जाहीर केले. पुढे अस्पृश्यांच्या जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची केले. दलितांना हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत अस्यपृश्यांचे प्रश्न मांडले व इंग्लंडचे पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १९३२ मध्ये जातीय निवाडा जाहीर केला. यानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाला परंतु या निर्णयाच्या विरोधात पुण्याच्या येरवडा तुरुंगात गांधीजींनी आमरण उपोषण सुरु केले व शेवटी गांधीजीचे प्राण वाचविण्यासाठी नाईलाजास्तव डॉ. आंबेडकरांनी ‘पुणे कराराचा’ स्विकार केला. यानुसार अस्पृश्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा विधिमंडळात राखीव ठेवण्यात आल्या.पुढे या करारातील तरतुदींचा समावेश १९३५ च्या कायदयामध्ये करण्यात आला व त्याची अमंलबजावणी करण्यास सुरुवात केली.

### १५.२.२ घटनात्मक तरतुदी :

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर डॉ.आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाचा मसुदा तयार करण्यात आला. या राज्यघटनेत भारतातील सर्वच नागरिकांना स्वतंत्र घोषित करुन त्यांना व्यक्तिस्वातंत्र्याचे हक्क बहाल केले. हे हक्क सर्व धर्म व जातीतील व्यक्तींना प्राप्त झाले. तसेच काही खास कलमान्वये अस्पृश्यांवरील विविध बंधने रद्द केली गेली. राज्य घटनेच्या कलम नं. १५ नुसार धर्म, वंश, जात किंवा जन्मस्थळ किंवा लिंग किंवा इतर कोणत्याही आधारे भारतीय नागरिकात कोणताही भेदभाव मानला जाणार नाही असे घोषित करुन दुकाने, उपहारगृहे, सार्वजनिक करमणूक केंद्रे, बाग-बागीचे विहीरी, तलाव, नदी, रस्ते वगैरेचा वापर सर्वांना खुला केला गेला. कलम १६ नुसार सरकारी व बिगर सरकारी क्षेत्रात मागासवर्गीयां यासाठी नोकरीच्या आरक्षणाचा कोणताही कायदा करण्याचा अधिकार लोकसभेला देण्यात आला. कलम १७ नुसार अस्पृश्यतेचे पालन करण्यास प्रतिबंध करण्यात आले. कलम २५ नुसार हिंदू धर्माच्या सर्व धार्मिक संस्था सर्व हिंदूना खुल्या राहतील व कोणत्याही आधारे कोणालाही येथे विरोध केला जाणार नाही. कलम ४६ अन्वये लोकसभा व राज्याच्या विधानसभेने अनुसूचित जाती व जमातीच्या प्रतिनिधींसाठी खास राखीव जागा ठेवल्या आहेत. कलम ३३५ नुसार मध्यवर्ती व राज्य सरकारी खात्यात अनुसूचित जातींसाठी काही प्रमाणात नोकरीतील जागा राखून ठेवण्यात आल्या आहेत. कलम ३३८ प्रमाणे अनुसूचित जाती व जमातींसाठी घटेनेने दिलेल्या संरक्षात्मक तरतुदींचे पालन होते की नाही हे पहाणे व त्याबाबत अहवाल राष्ट्रपतींना सादर करणे हे त्यांचे खास काम आहे. राष्ट्रपती संसदेच्या दोन्ही सभागृहापुढे हे अहवाल आणतील. कलम ३४० अन्वये राष्ट्रपती शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास लोंकांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी व त्याबाबत अहवाल तयार करण्यासाठी खास आयोग नेमू शकतील अशा तरतुदी राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केल्या.

### १५.२.३ सामाजिक समतेसाठी सरकारचे प्रयत्न :

१ जून १९५५ रोजी भारत सरकारने अस्पृश्यता निवारणाचा कायदा केला. त्यानुसार अनुसूचित जातींवरील सर्व सामाजिक बंधने बेकायदेशीर ठरविण्यात आली. तसेच हिंदूंच्या सर्व सार्वजनिक संस्था व स्थळे त्यांना खुली करण्यात येवून या अधिकारांपासून त्यांना वंचित करण्याचा प्रयत्न केल्यास तो दंडनीय गुन्हा मानला गेला. अस्पृश्यता पाळणे व तिला प्रोत्साहन देणे हा देखील गुन्हा ठरवून त्यासाठी कारावास व दंडाची शिक्षा ठरविली गेली.

१९५५ च्या अत्याचार प्रतिबंधक कायदयातील उणीवा दूर करण्यासाठी १९७६ मध्ये नागरी हक्क संरक्षण (PCR) कायदा करण्यात आला. त्यानुसार अस्पृश्यता पालन करण्याऱ्या संस्थांची अनुदाने बंद करणे, अस्पृश्यांकडून सक्तीची सेवा घेण्याच्याविरुध्द कायदेशीर कारवाई करणे, समूहाकडून अस्पृश्यतेचा गुन्हा घडल्यास सामुहिक दंड बसवणे या गोष्टी मंजूर केल्या गेल्या. अनुसूचित जमातीच्या अपात्रता दूर करुन त्यांचा सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविण्यावर शासन भर देत आहे. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, तालुका पंचायत, स्थानिक स्वराज संस्था तसेच सरकारी व खाजगी क्षेत्रात नोकऱ्या राखून ठेवल्या आहेत. समाजिक न्यायाच्या तत्वावर अनेक सोयी-सवलती दिल्या आहेत. त्यासाठी समाज कल्याण मंत्रालयाची स्थापना करण्यात आली आहे. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून अधिकाधिक व्यापक योजना आखून त्यासाठी अधिक निधी राखून ठेवला जातो. हरिजन दिवस, हरिजन सप्ताह पाळून अस्पृश्यतेविरुध्द जागृती केली जाते. अस्पृश्यता निवारण्यासाठी हरिजन सेवक संघ गाडगे महाराज मिशन, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटी या सारख्या ऐच्छिक संघंटनांना प्रोत्साहन व अर्थबळ पुरविले जाते. अनुसूचित जातीतील लोकांना वैदयकीय, शैक्षणिक, नोकरी विषयक सवलती, स्पर्धात्मक परिक्षांसाठी मार्गदर्शन, वयाच्या अटीत शिथीलता, मुलाखतीला जाण्या-येण्याचा खर्च अशा सोयी सवलती दिल्या जातात. शैक्षणिक सुविधाही पुरविल्याने त्यांच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत होत आहे. यामुळे त्याच्या जिवनमानात हळुहळू बदल होताना दिसत आहे.

### १५.२.४. विविध आयोग व शिफारशी :

भारतात पूर्वीपासून जातीव्यवस्था अस्तित्वात होती. त्यामध्ये चार्तुवर्ण्य व्यवस्था म्हणजे समाजातील प्रमुख उतरंड होती यामध्ये ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे चार प्रमुख वर्ण होते. शूद्रांचे काम वरच्या तीन वर्णाची सेवा व चाकरी करणे होता. पुढे त्यांना शेतकरी व कारागीर म्हणून संबोधण्यात येऊ लागले. पूर्वी त्यांना बलुतेदार व हस्तव्यवसाय करणारे कारागीर व शेतावर काम करणारे कामगार सुध्दा म्हटले जात होते. व्यवसायानुसार त्यांच्यात जातीप्रथा रुढ होती. परंतु ब्रिटिशांच्या आगमनाने कारखानदारी सुरु झाल्याने, यांत्रिक माल तयार होऊ लागल्याने भारतीय कारागिरांचे व्यवसाय बुडाले. त्यांची आर्थिक स्थिती गंभीर बनली. ते आर्थिकदृष्ट्या शैक्षणिकदृष्ट्या व सामाजिकदृष्टया मागासलेले असल्याने त्यांना इतर मागासवर्गीय किंवा ओबीसी म्हटले जाऊ लागले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी इंग्रज सरकारकडे ओ.बी.सी. साठी नोकऱ्यांमध्ये राखीव जागांची मागणी केली. १९०२ मध्ये कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी नोकरीत ५० टक्के राखीव जागा ओ.बी.सी. साठी ठेवल्या. स्वातंत्र्यानंतर

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या कलम ३४० अन्वये राष्ट्रपती शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास लोकांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी व त्याबाबत अहवाल तयार करण्यासाठी खास आयोग नेमू शकतील अशी तरतूद करुन ठेवली.

या कलमाच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण भारतात ओ.बी.सी. चा विचार करण्यासाठी केंद्र सरकारने १९५३ मध्ये काकासाहेब कालेलकरांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. १९५५ पर्यंत या आयोगाने आपला अहवाल सरकारला सादर केला. अहवालामध्ये २३९९ समुदायांची यादी सादर केली होती. त्यातील अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीयांची संख्या दाखवून त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा देण्याची शिफारस केली. परंतु कालेलकरांच्या सांगण्यावरुनच केंद्र सरकारने या शिफारशी मान्य केल्या नाहीत. १९७० च्या सुमारास तामिळनाडू व कर्नाटक या राज्यांनी ओ.बी.सीं. ना शैक्षणिक व सार्वजनिक नोकऱ्यांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात राखीव जागा दिल्या. याचा प्रभाव इतर राज्यांवर पडला. आणीबाणीनंतर १९७७ मध्ये केंद्रात मोरारजी देसाईच्या नेतृत्वाखाली जनता सरकार सत्तेवर आले. या सरकारने मागास जातींसाठी दुसरे कमिशन १९७९ मध्ये बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली नेमले. मंडल आयोगाने आपला अहवाल १९८० मध्ये सरकारला दिला. त्यात आयोगाने सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक निकषांवर मागसलेपणा निश्चित केला. तसेच ५२ टक्के लोकसंख्येतील ३७४३ जातींना ओ.बी.सी. ठरवून सरकारी नोकरीत २७ टक्के राखीव जागांची शिफारस केली. मंडल आयोगाच्या या शिफारसींची दखल कॉंग्रेस सरकारने फारशी घेतली नाही. परंतु १९९० मध्ये विविध पक्षांची संयुक्त आघाडी असलेले नॅशनल फ्रंट सरकार सत्तेवर आले. पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी मान्य केल्याची घोषणा केली. मंडल आयोगाच्या शिफारसी लागू होताच उत्तर भारतात उच्च जातीय विदयार्थ्यांनी मोठे आंदोलन सुरु केले कारण या राखीव जागांमुळे आपल्यावर बेकारीचे संकट येईल अशी भिती त्यांना वाटत होती. अनेकांनी आत्मदहनाची धमकी दिली. सर्वोच्च न्यायालयात या निर्णयास आव्हान दिले गेले. न्यायालयाने या निर्णयावर स्थगिती आणली.

या मुद्यावरुन व्हि.पी. सिंग सरकार पडले व पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस सरकार सत्तेवर आले. या सरकारने मंडल आयोगाच्या शिफारसीवर पुनर्विचार करुन १० टक्के राखीव जागा आर्थिकदृष्टया मागासलेल्या बिगर-मागासवर्गीय लोकांसाठी घोषित केल्या. परंतु सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयास घटनाबाह्य ठरवून स्थगिती दिली. कारण आरक्षण आर्थिकदृष्ट्या या मागासलेल्या लोकांना देता येत नसून ते ऐतिहासिक दृष्ट्या शैक्षणिक व सामाजिक मागासलेल्या लोकांनाच देता येते. पुढे १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने इतर मागासवर्गीयांना राखीव जागा दिल्या. परंतु ओ.बी.सी. च्या बाबतीत सरकारने 'क्रिमीलेअरचे' तत्व स्विकारले आहे. त्यानुसार ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त आहे त्यांना राखीव जागेचा फायदा मिळत नाही परंतु नवीन सरकारे ही मर्यादा वाढवित आहे.

### १५.२.५. विविध राज्यातील आरक्षणाची निती :

कर्नाटक राज्यात लिंगायत जातीचा मोठा प्रभाव आहे. १९७० मध्ये कॉंग्रेसचे मुख्यमंत्री देवराज अर्स यांनी मागास आयोग नेमला. या आयोगाने मागासवर्गीय जातींना सोयी सवलती देण्याची शिफारस केली. यातून लिंगायत जाती वगळण्यात आल्या होत्या. देवराज अर्स यांनी हा अहवाल स्विकारला पण त्यात कांही बदल करुन आणखी काही जातींना सवलती लागू केल्या.

परंतु याहवनूर कमिशनला कोर्टात आवाहन दिले गेले. १९८३ मध्ये जनता सरकार सत्तेवर आले. मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी व्यंकटस्वामी मागास आयोग नेमला. या आयोगाने मागास जातींची पूर्वीची यादी बदलली. वोकालिगास व लिंगायत या जातीना त्यातून वगळले गेले.

तामीळनाडूत द्रवीड मुन्नेत्र कळघम या पक्षाने सत्ता काबीज केली आणि १९६९ मध्ये पहिला मागास आयोग नेमला. या आयोगाने २५ ते ३३ टक्के आरक्षण मागावर्गीयांसाठी सुचविले. सरकारने आयोगाच्या शिफारसी स्विकारल्या. १९७९ मध्ये ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाचे मुख्यमंत्री एम.जी. रामचंद्रन यांनी मागास वर्गीयांचे आरक्षण ५० टक्क्यापर्यंत वाढवले.

आंध्रप्रदेशात राज्य सरकारने १९७५ मध्ये ९२ वर्गातील मागास जाती व जमातींना आरक्षण लागू केले. १९८६ मध्ये एन.टी.रामाराव यांच्या तेलगू देसम सरकारने मागास जाती जमातींसाठी २५ ते ४४ टक्के आरक्षण घोषित केले.

१९७१ मध्ये काँग्रेस सरकारने बिहारमध्ये नेमलेल्या मागास आयोगाने सरकारी संस्थात तसेच शाळा व महाविद्यालयात मागास जातींसाठी आरक्षण ठेवण्याची सूचना केली परंतू काँग्रेसला उच्च जातींच्या गटाचा पाठींबा सत्तेत असल्याने या शिफारसी लागू केल्या नाहीत.१९७८ मध्ये जनता पक्षाचे सरकार सत्तेवर येऊन मुख्यमंत्र्यांनी मागास जातींना सरकारी नोकऱ्यात २६ टक्के आरक्षण जाहीर केले.

उत्तरप्रदेशात ब्राम्हण व रजपूत या उच्च जातींचे आणि आहीर, कर्मी, जाट या मागास जातींचा प्रभाव आहे. येथील सरकारने १९६७ मध्ये सरकारी नोकऱ्यात मागास जातींना १६ टक्के आरक्षण लागू केले.

गुजरातमध्ये १९७२ मध्ये बक्षी कमिशन नेमले गेले या कमिशनने १९७६ मध्ये दिलेल्या अहवालात ८२ मागास जाती जमातींचे परीक्षण करुन त्यांना १० टक्के सरकारी नोकरीत व शैक्षणिक संस्थात राखीव जागांची शिफारस केली. काँग्रेस सरकारने याबाबत लगेच निर्णय घेतला नाही. पण १९७८ मध्ये जनता सरकारने या शिफारसी स्विकारल्या. १९८० मध्ये पुन्हा माधवसिंग सोळंकींच्या नेतृत्वाखाली आलेल्या काँग्रेस सरकारने राणे कमिशन नेमले.१९८३ मध्ये या कमिशनचा अहवाल आला. यात ६३ व्यावसायिकांना मागासवर्गीय ठरवून त्यांना २८ टक्के आरक्षण देण्याचे सुचविले. गुजरातमधील उच्च जातींच्या विदयार्थ्यांनी पदवीनंतरच्या मेडीकल कोर्समधील आरक्षणाविरुध्द आंदोलनात ५० लोक मारले गेले. काँग्रेसच्या उदार आरक्षण नितीची वाईट प्रतिक्रिया राज्यात उमटली होती. सोळंकी सरकारने१९८५ मध्ये ओ.बी.सीं. साठीही १० ते २८ टक्के आरक्षण जाहीर केले. बिगर मागासवर्गीयांचे आंदोलन मेडीकल व इंजीनिअरींग महाविदयालयाबरोबर इतर शाळा-महाविदयालयात जाऊन पोहचले. अहमदाबादमध्ये दंगली भडकल्या. शेवटी सोळंकीना राजीनामा दयावा लागला. नव्या सरकारने

अतिरिक्त आरक्षण रद्द करण्याचा निर्णय घेतला.अशा प्रकारे प्रत्येक राज्यात आरक्षणाच्या धोरणाची अंमलबजावनी करण्यात आली.

### १५.२.६ आपली प्रगती तपासा :

१) मागासवर्गीयांसाठी असलेल्या घटनात्मक तरतूदींवर प्रकाश टाका.

## १५.३ विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास

### १५.३.११९ व्या शतकातील शास्त्रीय शोध :

आधुनिक वैज्ञानिक प्रगतीत इंग्रजांच्या सहवासाने भारतात १९ व्या शतकात पाश्चात्य शिक्षणाचा व शास्त्रांचा प्रसार झाला. पाश्चात्य शिक्षणामुळे राष्ट्रवाद लोकशाही या गुणांबरोबर विज्ञानासंबधी आवड निर्माण झाली. त्यातून आधुनिक शास्त्रांच्या अध्ययन, निरीक्षण, चिंतन, मनन व संशोधानाची सुरुवात झाली. आशिया खंडातील जपान सारख्या छोट्या राष्ट्राने कमी वेळात जागतिक पातळीवर घडवून आणलेल्या विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीचा भारतावरही प्रभाव पडणे स्वाभाविक होते. भारतात ब्रिटीशांचे साम्राज्य असूनही काही संशोधक आपल्या परीने विज्ञानक्षेत्राला योगदान देण्याचा प्रयत्न करीत होते. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे :

### १. डॉ. जगदीशचंद्र बोस (१८५८-१९३७) :

३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगाल प्रांतातील सरीखेल गावात त्यांचा जन्म झाला.शालेय शिक्षण कलकत्याला पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. १८८४ साली त्यांनी केंब्रीज विदयापीठाची व सन १८८५ मध्ये लंडन विद्यापीठाची पदवी प्राप्त केली.

भारतात परतल्यानंतर कलकत्यांच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये पदार्थविज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली. वक्रीभवन, प्रकाश - परिवर्तन, अपारदर्शक वस्तुंचे प्रकाशिय गुणधर्म यांवर संशोधन केले. 'विद्युतीय वक्रीभवनांकाचे मोजमाप' या संशोधन प्रबंधामुळे त्यांना लंडन विद्यापीठाची डॉक्टरेट मिळाली. प्राणी व वनस्पती यांच्या क्रियांमधील साम्य या प्राणिशास्त्रातील विषयाकडे ते आकृष्ट झाले. वनस्पतीना प्राण्यांप्रमाणेच भावना व संवेदना असतात हे त्यांनी सप्रयोग सिध्द केले. त्यांनी असेही दाखवून दिले की, विष, जीवनसत्वे, अल्कोहोल, यांचा जसा मानवावर परिणाम होतो तसा तो वनस्पतींवरही होतो. 'वनस्पतीच्या संवेदना' नावाचे पुस्तक त्यांनी लिहिले. या संशोधनामुळे त्यांची किर्ती जगभर पसरली. कलकत्ता येथे त्यांनी बोस रिसर्च इन्स्टीटयूट स्थापन केली. जगातील खूप देशात त्यांना व्याख्यानासाठी बोलावत. १९१६ साली

बोस यांना ब्रिटिश सरकारने 'नाईट' ही पदवी बहाल केली १९२७ साली बोस भारतीय विज्ञान परिषदेचे अध्यक्ष बनले. युरोपातील अनेक व्यक्तींनी त्यांचा गौरव केला. फ्रेंच लेखक रोमा रोलाँ यांनी त्यांना 'नवविश्वाचा द्रष्टा' असे म्हणून गौरव केला. त्यांना अनेक मान-सन्मान मिळाले. त्यांनी 'रिस्पॉन्स इन द लिव्हिंग ॲण्ड नॉन लिव्हिंग' 'द नर्व्हस मेकॅनिझम ऑफ प्लांटस' 'द मोटर मेकॅनिझम ऑफ प्लांटस्' अशी पुस्तके लिहिली. २२ नोव्हेंबर १९३७ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## २. डॉ.सी.व्ही.रामन (१८८८-१९७०)

त्रिचन्नापल्ली येथे ७ नोव्हेंबर १८८८ रोजी चंद्रशेखर व्यंकट रामन यांचा जन्म झाला. वडील पदार्थविज्ञानशास्त्राचे प्राध्यापक होते. रामन यांनी पदार्थविज्ञान या विषयात पदवी संपादन केली. वयाच्या १५ व्या वर्षी ध्वनीलहरींवर शोधनिबंध लिहीला. दुसऱ्या वर्षी त्यांनी प्रकाशावर शोध-निबंध लिहिला. कलकत्याच्या भारतीय विज्ञान संवर्धन संस्थेमध्ये त्यांनी वैज्ञानिक संशोधन सुरु केले. १९२४ मध्ये कॅनडामधील जागतिक परिषदेसाठी उपस्थित राहिले. जाताना सागराचे निरीक्षण करुन समुद्राचा रंग या दोन्ही गोष्टी, घटना स्वतंत्र आहेत. 'प्रकाश किरण पाण्यातून जात असताना त्यांचे विवर्तन होते' असा सिध्दांत मांडला. विषाणूंमुळे होणारे किरण विवर्तन हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. या लेखनामुळे त्यांना जागतिक किर्ति प्राप्त झाली. सन १९२८ मध्ये रामन यांनी प्रकाशशास्त्रा वरील आपला जगप्रसिध्द सिध्दांत जाहीर केला. या सिध्दांतालाच 'रामन परिणाम' असे म्हणतात. या संशोधनाबद्दल त्यांना १९३० सालचे नोबेल पारितोषिक मिळाले. विज्ञानातील नोबेल पारितोषक मिळाविणारे ते पहिले भारतीय व पहिले आशीयायी होते. ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली. हिऱ्यामधील परमाणू एका विशिष्ट पध्दतीने दोलायमान होतात व त्यामुळे एक वेगळाच वर्णपट तयार होतो. असा नवीन शोध लावला.

कलकत्ता विद्यापीठातून सेवानिवृत्त झाल्यावर १९३३ मध्ये बेंगलोर येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या प्रसिध्द संस्थेचे संचालक बनले. त्यांच्या प्रेरणेने १९४३ मध्ये बेंगलोरला ॲकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना झाला. १९४८ मध्ये भारत सरकारने त्यांना पदार्थविज्ञानाचे पहिले राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून सन्मानित केले. १९५४ साली भारत सरकारने त्यांना भारतरत्न ही सर्वोच्च मानाची पदवी बहाल केली. १९५७ मध्ये रशियाने लेनिन पुरस्कार देऊन गौरव केला. २१ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## ३ . एस.रामनुजन (१८८७-१९१९)

महान गणिती श्रीनिवास रामानुजन अय्यंगार यांचा जन्म २२ डिसेंबर १८८७ रोजी तंजावर जिल्हयात एरोड या गावी झाला. त्यांची स्मरणशक्ती असामान्य होती. फक्त दोन वर्षात प्राथमिक शिक्षण संपवून ते वयाच्या सातव्या वर्षीच हास्कूलमध्ये दाखल झाले. १९०३ मध्ये ते मॅट्रिक झाले. परंतु इंग्रजी हा विषय कच्चा असल्यामुळे ते बी.ए. होऊ शकले नाहीत, अखेर मद्रासला बंदर विभागात कारकुनाची नोकरी पत्करली.

१९१२ मध्ये गणितावरील त्यांचा प्रबंध वाचून प्रा.हार्डी यांनी त्यांना केंब्रिजला बोलावले. १९१४ साली मद्रास विद्यापीठाने त्यांना केंब्रिजला पाठविले. केंब्रिजमध्ये त्यांनी गणितातील बी.ए.ची परीक्षा दोन वर्षात पूर्ण केली. १९१८ मध्ये रॉयल सोसायटीने त्यांना फेलोशीप देऊन सन्मानित केले. वयाच्या केवळ २१ व्या वर्षी त्यांना हा सन्मान मिळाला. केंब्रिज विद्यापीठाने त्यांची संशोधक प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. परंतु क्षयाने पछाडल्याने ते भारतात आले. अंकगणित, बीजगणित, त्रिकोणमिती, समीकरण सिध्दांत यांत त्यांची अद्वितीय गती होती. 'डग्लस रामानुजन आयडेंटीटी', 'हार्डी व रामानुजन राऊंड नंबर्स', 'पार्टिशन, हाय्यर जॉमेट्रिकल सिरीज ही त्यांची गणितातील संशोधने होती. २० एप्रिल १९१९ रोजी वयाच्या ३३ व्या वर्षी ते मृत्यू पावले.

## ४. सत्येंद्रनाथ बोस :- (१८९४-१९७४)

सत्येंद्रनाथ बोस यांचा जन्म १ जानेवारी १८९४ रोजी कलकत्ता येथे झाला. कलकत्याच्या हिंदू स्कूलमध्ये शालेय शिक्षण झाले. गणित विषयात ते अत्यंत हुशार होते. शास्त्र विषयाची त्यांना आवड होती. कलकत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेज मधून गणित विषय घेऊन ते एम.एस्सी झाले. कलकत्याच्या सायन्स कॉलेजमध्ये व्याख्याता म्हणून ते काम करु लागले. काही संशोधन प्रबंध लिहून लंडन फिलॉसॉफिकल मध्ये पाठविले. या लेखांमुळे त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली.

१९२१ मध्ये ढाक्का विदयापीठात ते संख्या शास्त्राचे रीडर म्हणून काम करु लागले. येथे असतानाच त्यांनी 'बोस-आइनस्टाईन सांख्यिकी' या सिध्दांतातील लेख लिहिला. यामुळेच 'पुंज-सांख्यिकी' शाखेचा पाया घातला गेला. १९२४ मध्ये पॅरिस-बर्लिन येथे शास्त्रज्ञांच्या चर्चामंडळात ते सहभागी झाले. इंग्लंडमधील रॉयल सोसायटीने फेलोशीप देऊन त्यांचा सन्मान केला. रविंद्रनाथ टागोरांच्या विश्वभारती या शिक्षण संस्थेत त्यांनी उपकुलगुरुपदी काम केले. भारत सरकारने त्यांची राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून नेमणूक केल्यानंतर त्यांनी विश्वभारतीचे काम सोडले. त्यांना इंग्रजी. फ्रेंच, हिब्रू, जर्मन इत्यादी भाषा अवगत होत्या. वाचन व संगीत हे त्यांचे आवडीचे विषय होते. १९४८ मध्ये त्यांनी बंगाल विज्ञान परिषद स्थापन केली. ४ फेब्रुवारी १९७४ रोजी त्यांचे निधन झाले.

## ५. डॉ.बिरबल सहानी (१८९१-१९४९)

भारतातील महान वनस्पतीशास्त्रज्ञ बिरबल सहानी यांचा जन्म १४ नाव्हेंबर १८९१ रोजी पंजाबमध्ये शहापूर जिल्ह्यात मेरा या गावी झाला. वडील रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांना वृक्ष, वनस्पती, झाडे-झुडपे यांचे निरीक्षण करण्याचा छंद होता. सेंदव पर्वताच्या भूगर्भशास्त्रीय संशोधनास त्यांनी बालपणापासून प्रारंभ केला. १९११ मध्ये पंजाब विदयापीठातून ते बी.एस्सी झाले. उच्च शिक्षणासाठी ते केंब्रिज विदयापीठात गेले. केंब्रिज विदयापीठाची ट्रायपॉय पदवी मिळाली. अल्बर्ट सेवार्ड यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनास सुरुवात केली. केंब्रिज विदयापीठाची डी.एस्सी पदवी मिळविणारे ते पहिले भारतीय होते. अधिक शिक्षणासाठी ते लंडन विदयापीठात काही काळ होते. भारतात आल्यावर लाहोर व बनारस विदयापीठात ते वनस्पती शात्राचे व्याख्याते बनले. प्राचीन वनस्पतींचे ठसे असणाऱ्या दगडांचा संग्रह त्यांनी केला. १९३९ मध्ये वनस्पती मुद्राशास्त्राची माहिती देणारे पालिओबॉटनी नावाचे मासिक त्यांनी सुरु केले.

पेन्टॉक्सिलियास या नावाचा वनस्पती समूहाचा शोध लावला. भू रसायनशास्त्राचा त्यांचा अभ्यास होता. १९३६ मध्ये रॉयल सोसायटीने त्यांना सदस्यत्व देऊन त्यांचा सन्मान केला. १९४१ मध्ये ते इंडियन सायन्स काँग्रेसचे अध्यक्ष झाले. १९४७ मध्ये त्यांना सर सी.आर.रेड्डी पारितोषिक दिले होते. १९५० मध्ये आंतरराष्ट्रीय वनस्पतीशास्त्र परिषदेचे अध्यक्ष होण्याचा बहुमान मिळाला. त्यांनी भारतीय वनस्पतीशास्त्र परिषद या संस्थेची स्थापना केली. याशिवाय प्राचीन भारतातील नाणी पाडणाऱ्या पध्दती हा त्यांचा वेगळ्या विषयावरील ग्रंथ प्रसिध्द आहे. पॅलिओ बॉटनीचे ते जागतिक तज्ञ होते. त्यांनी हिमालयाचा इतिहास, दक्षिणेच्या पठाराचा इतिहास, गोंडवना संबंधीचा इतिहास उत्खननाद्वारे शोधला. १० एप्रिल १९४९ रोजी त्यांचे निधन झाले.

## ६. डॉ. मेघनाद सहा (१८९३-१९५६)

मेघनाद सहा यांचा जन्म बंगालमध्ये ढाका जिल्हयात शेवरावाली येथे ६ ऑक्टोबर १८९३ मध्ये झाला. १९४९ मध्ये त्यांना सर सी.आर. रेड्डी पारितोषिक मिळाले. दारिद्रयात शालेय शिक्षण पूर्ण करुन पुढील शिक्षणासाठी ते ढाक्याला गेले. १९०९ मध्ये संपूर्ण बंगालमध्ये शालान्त परीक्षेत प्रथम आले. १९१५ मध्ये कलकत्ता विद्यापीठातून ते एम.एस्सी. झाले १९१६ मध्ये आशुतोष मखर्जी यांनी रामन यांचे मदतनीस म्हणून सहांची नेमणूक केली. तेथे जर्मन शिकून आइनस्टाइन यांच्या सिध्दांताद्वारे सहांनी ताऱ्यांतील हालचाली संबंधीचा एक नवा सिध्दांत मांडला. त्याबद्दल त्यांना डॉक्टरेट मिळाली. नंतर त्यांनी ज्योतिर्वास्तव शास्त्रात संशोधन केले. सूर्य व तारका यांचा अभ्यास करुन 'तारकांचे औष्णिक आयनन' हा प्रबंध लिहिला. त्यांनी कलकत्ता शहरात अणुकेंद्र स्थापन केले. पंचांगात सुधारणा करण्याचेही काम त्यांनी केले. ताऱ्यांच्या उष्णतेचे मोजमाप करण्याचे यंत्र शोधून काढले. इ.स. १९५६ मध्ये त्यांचे निधन झाले.

## ७. डॉ. विक्रम साराभाई (१९१९-१९७१)

भारताच्या अणुशक्ती मंडळाचे अध्यक्ष व अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख डॉ. विक्रम साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अहमदाबाद येथे झाला. वडील अंबालाल साराभाई केमीकल्स या प्रचंड औषधी उदयोगाचे मालक होते. डॉ. विक्रम साराभाई हे अत्यंत तल्लख बुध्दीचे होते. गणित व विज्ञान हे त्यांच्या आवडीचे विषय होते. शालेय शिक्षण पूर्ण करुन पुढील शिक्षणासाठी ते केंब्रिजला गेले. १९४० मध्ये ते विज्ञान शाखेतील ट्रायपास परीक्षा पास झाले. भारतात येऊन बेंगलोरला डॉ.रामन यांच्या संस्थेत दाखल झाले. डॉ.भाभा यांच्या बरोबर साराभाईंनाही अंतरिक्ष किरणावरील प्रबंधसाठी केंब्रिज विद्यापीठाची पीएच.डी. पदवी मिळाली. त्यांनी अहमदाबाद येथे फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी संस्था स्थापन केली.

डॉ. साराभाईनी जागतिक अवकाश संशोधन नकाशावर भारतास प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करुन दिले. १९६१ मध्ये अणुशक्ती मंडळाच्या अंतर्गत भारत सरकारने अवकाश संशोधन विभाग स्थापन करुन त्याचे प्रमुखपद त्यांना दिले होते. १९६२ मध्ये भारत सरकारने 'दि इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च' ही राष्ट्रीय संस्था स्थापन केली व तिचे अध्यक्षपद साराभाई यांना दिले. १९६३ रोजी युनोने पाठविलेल्या तंत्रज्ञान मंडळाने डॉ. साराभाईंच्या मार्गदर्शनाखाली केरळमधील थुंबा हे ठिकाण अवकाश संशोधन केंद्रासाठी निश्चित केले. डॉ.

साराभाईंच्या परिश्रमाने थुंबा येथे भारतातील पहिले अवकाश संशोधन केंद्र स्थापन झाले. १९६६ मध्ये डॉ. भाभांच्या मृत्यूनंतर डॉ.साराभाईंनी अणुशक्ती मंडळाची सूत्रे हाती घेतली. डॉ. साराभाईंनी १९७०-८० या दशकातील अणुशक्तीच्या संशोधनाचा आराखडा तयार केला.

१९६२ मध्ये भौतिकशास्त्रातील शांतिस्वरुप भटनागर हे सन्माननीय पदक त्यांना बहाल केले. १९६६ मध्ये भारत सरकारने त्यांना पदमभूषण पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. इंग्लंडमधील फिजिकल सोसायटी, फिलॉसॉफिकल सोसायटी, अमेरिकेतील जिओफिजिकल सोसायटी इत्यादी जागतिक दर्जाच्या संस्थानीही त्यांना सन्माननीय सभासद म्हणून गौरविले होते. अणुशक्ती व अवकाश संशोधन या दोन्ही क्षेत्रात नवनवीन शोध-कल्पना राबवण्यास मग्न झालेल्या या शास्त्रज्ञाचा थुंबा या ठिकाणी कार्यमग्न असताना ३० डिसेंबर १९७१ रोजी मृत्यू पावले.

## ८. डॉ. सुबमण्यम चंद्रशेखर (१९१०-१९९५)

नोबेल पारितोषिक विजेते रामन यांचे पुतणे व अमेरिकेत स्थायिक झालेले महान भारतीय एस.चंद्रशेखर १९ ऑक्टोबर १९१० रोजी लाहोर येथे जन्माला आले. शालेय शिक्षण पूर्ण करुन उच्च शिक्षणासाठी ते मद्रासला आले. १९३० मध्ये ते एम.ए. झाले. बालपणापासून त्यांना खेगालशास्त्राची आवड निर्माण झाली. पुढे इंग्लंडला केंब्रिज विद्यापीठातील ट्रिनिटी कॉलेजमध्ये शिक्षणासाठी गेले. १९३० मध्ये केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजमध्ये पाऊलर व मिलेन या महान ज्योतिर्विदांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी ताऱ्यासंबंधी संशोधन केले. १९३४ साली त्यांना केंब्रिज विद्यापीठाने पीएच.डी. दिली. १९४२ मध्ये खगोलशास्त्रातील संशोधनाबद्दल डी.एस्सी. बहाल केली गेली. त्यांनी अतिघन ताऱ्यांविषयी जे सिध्दांत मांडले ते आजही सर्वमान्य आहेत.

१९४७ साली महत्वपूर्ण संशोधनासाठी त्यांना केंब्रिज विद्यापीठाने ॲडम्स पारितोषिक दिले. १९५२ साली पॅसिफिक खगोल संस्थेने ब्रूस पारितोषिक दिले. १९५३ व १९६२ साली लंडनच्या रॉयल ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटीने त्यांना सुवर्णपदक दिले.१९५३ व १९६२ मध्ये भारत सरकारने पद्मभूषण हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. 'न्यूक्लिअर रिॲक्यशन्स केमिकल मूलद्रव्ये' या संशोधनासाठी त्यांना १९८३ चे नोबेल पारितोषिक मिळाले ते काही काळ शिकागो विद्यापीठात ज्योतिर्वास्तव शास्त्राचे प्राध्यापक होते. २१ ऑगस्ट १९९५ रोजी त्याचे निधन झाले.

## ९. डॉ. होमी भाभा (१९०९-१९६६)

डॉ. होमी भाभा यांचा जन्म ३० ऑक्टोबर १९०९ रोजी मुंबईत झाला. वयाच्या १५ व्या वर्षी ते केंब्रीज परीक्षा पास झाले. कॅथेड्रल व जॉन कॅनन स्कूलमध्ये शिक्षण झाल्यावर एल्फिस्टन कॉलेज व रॉयल इन्स्टिटयूट ऑफ सायन्स येथे उच्च शिक्षण घेतले. २५ व्या वर्षी त्यांनी अणुविज्ञानाचा अभ्यास करुन केंब्रीज विद्यापीठातून १९३४ मध्ये पीएच.डी. पदवी संपादन केली. विज्ञानाच्या विशेष अभ्यासासाठी ऐझॅक न्यूटन शिष्यवृत्ती मिळाली. १९४० मध्ये बंगलोर येथील इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स मध्ये प्रायोगिक पदार्थ विज्ञान शास्त्राचे रीडर म्हणून ते काम पाहू लागले. त्यांनी भारत आणि उदयोगपती टाटा यांना आवाहन करुन १९४५ रोजी मुंबई येथे टाटा मूलभूत संशोधन संस्था स्थापन केली. यांचे पहिले संचालक डॉ. भाभा होते. 'शत्किपुंजवाद' 'प्राथमिक वैज्ञानिक परमाणूचा सिध्दांत''कॉस्मिक रेडिएशन' हे त्यांचे आवडते

विषय होते. लंडनच्या रॉयल सोसायटीचे ते सभासद होते. भारताच्या अणुऊर्जा आयोगाचे ते पाहिले अध्यक्ष होते. मुंबई येथील तुर्भे या ठिकाणी त्यांनी अणुनगरी उभारली. १९५५ साली जिनेव्हा येथे शांततेसाठी अणुऊर्जेचा वापर करण्याचे उपाय शोधण्याकरिता एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. तिचे अध्यक्ष डॉ. होमी भाभा होते.

१९४५ ते १९६६ या काळात भारत सरकारच डिपार्टमेंट ऑफ अॅटॉमिक एनर्जीचे ते प्रमुख होते. १९५१ च्या इंडियन सायन्स कॉंग्रेसचे ते अध्यक्ष होते. १९५५ च्या इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन दि पीसफुल यूझेस ऑफ अॅटॉमिक एनर्जी या परिषदेचे ते अध्यक्ष होते. इंटरनॅशनल अॅटॉमिक एनर्जी कमिशनच्या सायंटिफिक अॅडव्हायझरी कमिटीचे ते सभासद होते. त्यांच्या संशोधनाबद्दल त्यांना अॅडम्स पारितोषिक (१९४८) हॉपकिन्स पारितोषिक (१९४८) पद्मभूषण (१९५४) इ. गौरवाचे किताब मिळाले. 'क्वॉटम थिअरी', 'एलेमेंटरी फिजीकल पार्टिकल्स', 'कॉस्मिक रेडिएशन' हे त्यांचे प्रसिध्द संशोधन सिद्धांत आहेत. २४ जानेवारी १९६६ रोजी विमान अपघात त्याचे दुदैवी निधन झाले.

## १०. डॉ. हरगोविंद खुराना

१९६८ चे औषधी विज्ञानातील नोबेल पारितोषिक भारताला मिळवून देणाऱ्या डॉ. खुराना यांचा जन्म मध्यप्रदेशातील रायपूर येथे ९ जानेवारी १९२२ रोजी झाला. शालेय शिक्षण मध्यप्रदेशात घेऊन पुढील शिक्षण लाहोरला घेतले. १९४३ मध्ये ते पंजाब विद्यापिठातून पहिल्या वर्गात बी.एस्सी. व १९४५ मध्ये एम.एस्सी झाले. रसायन हा त्यांचा आवडता विषय होता. भारत सरकारची शिष्यवृत्ती घेऊन ते इंग्लंडला गेले व १९४८ मध्ये लिव्हरपूल विद्यापीठातून त्यांनी पीएच.डी. संपादन केली. १९५० मध्ये अलेक्झांडर टॉड यांच्या मार्गदर्शनखाली 'न्युक्लिओ टाईडस' विषयी त्यांनी पेपटाइडर्स, प्रथिने, फोस्फेट, ईस्टर्सचे रासायनिक संश्लेषण, डायन्युक्लेइक आम्ल व रियबो डायन्यूक्लेईक आम्लाचे संश्लेषण केले.

## ११. डॉ. जयंत नारळीकर

भारताचे महान शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूरात झाला. वडील रँग्लर होते. नारळीकरांचे शिक्षण बनारसला झाले. १९५६ मध्ये बनारस विद्यापीठातून बी.एस्सी ची परीक्षा पाहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्यांना टाटा शिष्यवृत्ती मिळाली. १९५७ मध्ये ते ट्रायपाससाठी केंब्रिजला गेले. १९६० मध्ये ते सिनीअर बी.स्टार रँग्लर झाले. १९६२ मध्ये गणित विषय घेऊन ते एम.एस्सी झाले. त्याच वर्षी केंब्रीज विद्यापीठातील किंग्ज कॉलेजने गणितासाठी फेलोशिप दिली. १९६५ मध्ये ते गणितात डॉक्टर झाले. 'अराउंड ऑफ टाईम' या विषयावरील त्यांच्या भाषणामुळे व रेडिओ सोर्सेसच्या लेखनामुळे ते संशोधक म्हणून प्रसिध्द झाले.

डॉ. नारळीकर व त्यांचे संशोधक मित्र डॉ.फ्रेंड हॉईल यांनी गणिताच्या आधारे सिध्द केले की, विश्वातील अत्यंत दूरचे तारे जर नष्ट झाले, तर पृथ्वी वरच्या लोकोच वजन दुप्पट होईल व सूर्याची उष्णता शंभर पट जास्त होईल. डॉ. नारळीकरांच्या म्हणण्याप्रमाणे विश्वातील सारे द्रव्य काढून टाकले तर गुरुत्वाकर्षण पण नष्ट होईल. विश्वात आढळणारे जे सुपरस्टारसारखे तारे आहेत, त्यांना प्राप्त झालेली प्रचंड शक्ती ही त्यांच्या गुरुत्वाकर्षणतेच्या

शक्तीमुळेच प्राप्त झालेली आहे. भारत सरकारने त्यांनी केलेल्या संशोधनाबद्दल १९६५ मध्ये पद्मभूषण किताब दिला.

## १५.४ स्वातंत्र्योत्तर धोरण :

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु पुरोगामी विचाराचे व आधुनिकतचे भोक्ते असल्याने विज्ञान व तंत्रज्ञानाशिवाय देशाची प्रगती होणार नाही हे त्यांनी ओळखले होते. म्हणून पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून संशोधन कार्यावर भर देण्यात आला. १९५६ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना करुन शिक्षण व संशोधनाला चालना दिली. १९५८ मध्ये भारत सरकारने देशाच्या गरजा लक्षात घेऊन ठराव पास केला. त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, संरक्षण शेती या महत्वाच्या क्षेत्रात प्रगती घडवून आणण्यासाठी उच्च श्रेणीचे प्रशिक्षित लोक तयार करणे, शिष्यवृत्ती देऊन संशोधनाला प्रोत्साहन देणे असे मंजूर करण्यात आले. देशाच्या विभिन्न भागात इस्न्टियूट ऑफ सायन्स व इन्टियूट ऑफ टेक्नॉलॉजी या संस्था स्थापन करण्यात आल्या. कृषी उत्पादनाला चालना देण्यासाठी शेतकी संशोधन संस्था स्थापन केल्या. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात पिछाडीवर असलेला भारत जगातील दहा आण्विक राष्ट्राच्या पंगतीत बसला आहे याचे श्रेय विज्ञान शाखांचा भक्कम पाया घालून देणाऱ्या पंतप्रधान पंडित नेहरुंना व पुढील काळातील पंतप्रधान इंदिरा गांधीना आहे. भारताने स्वातंत्र्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अणुसंशोधनाचा समावेश होता.

### १५.४.१अणुसंशोधन क्षेत्रातील प्रगती :

अणुशक्तीचा वापर समाजाच्या भौतिक विकासासाठी करुन घेता येईल याची नेहरुंना जाणीव होती म्हणूनच त्यांनी १९४८ मध्ये अणुशक्ती आयोगाची स्थापना केली व तिच्या अध्यक्षपदी जागतिक किर्तीचे शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा यांची नियुक्ती केली. केंद्रशासनात स्वतंत्र अणुशक्ती खाते निर्माण केले. १९५७ मध्ये मुंबईजवळ तुर्भे येथे अणुसंशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. आज यालाच भाभा अणुसंशोधन केंद्र म्हणून ओळखले जाते. या अणुसंशोधन केंद्रातअप्सरा, झरलिना, सायरस, पूर्णिमा-२ अशा पाच अणुभट्ट्यांची उभारणी करण्यात आली. १९६६ मध्ये डॉ.होमी भाभांचा अपघाती मृत्यू झाल्यानंतर डॉ.विक्रम साराभाई या केंद्राचे संचालक बनले. त्यांनीही अणुसंशोधन कार्यात मोठे योगदान दिले. १९६९ मध्ये तारापूर येथे पहिले अणुउर्जा केंद्र स्थापन करण्यात आले व तेथे व्यापारी तत्वावर वीजनिर्मिती करण्यात येऊ लागली. त्यामुळे महाराष्ट्र व गुजरात यांस मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा होऊ लागला. राजस्थानातील कोटा, महाराष्ट्रातील तारापूर व तामीळनाडूतील कल्पकम येथेही अशा संस्था स्थापन केल्या.

सुरुवातीच्या काळात अणुशक्ती निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियम करिता पाश्चिमात्य राष्ट्रांवर अवलंबून रहावे लागे परंतु बिहारमध्ये युरेनियमचा शोध लागल्याने हे परावलंबित्व कमी झाले. तुर्भेच्या अणुशक्ती केंद्रात परमाणू संशोधनासाठी लागणारी यंत्रसामग्री व उपकरणे तयार होऊ लागली. महत्वाच्या औषधांबाबतही संशोधन सुरु झाले. कर्करोगासारख्या असाध्य आजारावर प्रयोग होऊ लागले. धान्याचा दर्जा व उत्पादनाचे प्रमाण सुधारण्यासाठी, खादयपदार्थ टिकविण्यासाठी नवे संशोधन सुरु झाले. डॉ.एच.एन.सेठना यांच्या अध्यक्षतेखाली अणुउर्जा आयोगाने इंदिरा गांधींच्या पाठींब्याने १८ मे १९७४ रोजी राजस्थानातील पोखरण येथे पहिला

भूमिगत अणूस्फोट घडवून आणला. अणुशक्तीचा वापर विनाशकार्यासाठी न करता शांततापूर्ण केला जाईल हे पंतप्रधान पंडित नेहरुंनी दिलेले आश्वासन आजपर्यंतच्या राज्यकर्त्यांनी पाळलेले दिसून येते. अणुसंशोधनात भारताचा जगात सहावा क्रमांक लागतो.

**१५.४.२अवकाश क्षेत्रातील संशोधन :**

भारताने १९६२ मध्ये अवकाश संशोधन राष्ट्रीय समिती स्थापन करुन या क्षेत्रात प्रवेश केला. या समितीचे अध्यक्षपद अणु व अवकाश संशोधक डॉ.विक्रम साराभाई यांच्याकडे सोपविण्यात आले. १९६९ मध्ये अवकाश संशोधन संघटना स्थापन करुन तिच्याकडे अवकाश संशोधनाचे उपक्रम अंमलात आणण्याचे काम देण्यात आले. १९७२ मध्ये भारत सरकारने पास केलेल्या ठरावानुसार अवकाश आयोगाची स्थापना करण्यात आली. १९६२ मध्ये इंडियन नॅशनल कमिटी फॉर स्पेस रिसर्च स्थापन झाली. १९६३ साली त्रिवेद्रमजवळ थुंबा येथे अग्नीबाण केंद्राची उभारणी सुरु झाली. युनोतर्फे विषुववृत्ताजवळ संशोधनासाठी अग्नीबाण सोडण्याचे आंतरराष्ट्रीय केंद्र म्हणून त्यास मान्यताही मिळाली. १९६९ मध्ये भारताने सेटेलाईट इनस्ट्रक्शनल टैलीव्हीजन एक्स कार्यक्रमाविषयी अमेरिकेशी करार केला. त्यानुसार जून १९७५ ते जून १९७६ या काळात अमेरिकेचा उपग्रह भारतावर आणण्यात येऊन दुरदर्शन संचाद्वारे कार्यक्रम जनतेला दाखविण्यास सुरुवात झाली.

१९६३ मध्ये थुंबा येथुन पाहिला भारतीय अग्नीबाण अवकाशात सोडण्यात आला. १९६९ मध्ये घन इंधनाचा वापर असलेला रोहीणी १२५ हा अग्नीबाण सोडण्यात आला. १९७५ मध्ये रशियाच्या सहाय्याने आर्यभट्ट हा पहिला भारतीय उपग्रह अंतराळात फिरु लागला. नंतर भास्कर-१, भास्कर-२, ॲपल व रोहीणी-३ हे उपग्रह सोडण्यात आले. रोहीणी उपग्रह सोडण्यासाठी भारतीय अग्नीबाणाचा वापर करण्यात आला. १९८२ मध्ये इनसॅट-१ आणि १९८३ मध्ये इनसॅट-१बी हे उपग्रह अमेरिकेच्या ‘चॅलेजर स्पेस शटलमधून’ अंतराळात पाठविण्यात आले. अवकाश क्षेत्रात मोलाची कामगिरी करताना मृत्यूमुखी पडलेल्या कल्पना चावलाचे नाव सुवर्णक्षरात कोरले गेले.

भारताच्या संरक्षणाच्या दृष्टीने भारतात काही महत्वाची क्षेपणास्त्रे विकसीत केलेली दिसून येतात. त्यापैकी पृथ्वी, अग्नी, त्रिशुल, नाग, आकाश या क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी भारताने केलेली आहे.

**१५.४.३ माहिती तंत्रज्ञानातील प्रगती :-**

भारताने माहिती - तंत्रज्ञान क्षेत्रातही अभूतपूर्व प्रगती केली. १९४७ साली देशात सहा रेडीओ स्टेशन्स होती. १९९६ पर्यंत त्यांची संख्या १८७ झाली आहे. १९६०-६१ च्या सुमारास भारतात फक्त एकच टी.व्ही. ट्रान्समीटर होता व १९९६ पर्यंत ८३४ ट्रान्समीटर वाढले. भारतातील ग्रामीण व शहरी भाग रेडीओ, टी.व्ही. टेलिफोन यांनी जोडला गेला. सॉफ्टवेअर क्षेत्रातही भारत अग्रेसर बनला आहे. भारतीय रेल्वे आशियातील पहिल्या क्रमांकाची तर जगात चौथ्या क्रमांकाची मानली जाते. जीवनाचे प्रत्येक क्षेत्र विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या प्रभावाशी जखडलेले आहे.

**१५.४.४ आपली प्रगती तपासा :-**

१. भारताने स्वातंत्र्यानंतर अवकाश संशोधन क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घ्या.

## १५.५ सारांश :

वरील प्रमाणे आरक्षणाचे धोरण भारतामध्ये कशा प्रकारे राबविला जाते तसेच त्याची घटनात्मक तरतूद व वेगवेगळ्या पातळीवर या विषयी घेतलेले निर्णय त्याचप्रमाणे वेगवेगळ्या आयोगाला केलेल्या शिफारशींचा विचार या प्रकारणामध्ये केलेल्या आहे. या शिवाय भारतातील विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा सुध्दा आढावा येथे घेण्यात आला आहे.भारताची स्वातंत्र्यपुर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील प्रगती त्यामध्ये वेगवेगळ्या शास्त्रज्ञांचे योगदान याची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये अभ्यासली आहे.

## १५.६ प्रश्न

१) भारत सरकारचे आरक्षणांसंबंधीचे धोरण स्पष्ट करा.

२) स्वतंत्र्य भारताने विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घ्या.

३) टिपा लिहा.

१. आरक्षणाचे धोरण

२.अवकाश क्षेत्रातील भारताची प्रगती.

❖❖❖❖